वि. पु. गोखले

काव्यसंग्रह. २५.

## महाराष्ट्रकविविठ्ठलकृत

# कवितासंग्रह.

फर्निचर वर्क्स.
सुतार.
रोड, सांगली.

हा

**वामन दाजी ओक,**

हेडमास्तर, हायस्कूल, रायपुर;

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन जुनाट हस्तलिखित अनेक प्रतींच्या आधारें शुद्ध करून तयार केला.

तो

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९६.

किंमत २ रुपये.

हा ग्रंथ,

**कै० माधव चंद्रोबा डुकले**

अमूल्य महाराष्ट्रकाव्योदधि 'सर्वसंग्रह' याचे संपादक व प्रकाशक

यांच्या अमर आत्म्यास,

**त्यांचे मराठी काव्यग्रंथांच्या उद्धाराविषयीं अविरत परिश्रम,
काव्यग्रंथप्रसारणेच्छा, त्याचें मार्मिक व हृदयंगम
अर्थप्रकाशन, कविताप्रेम, महाराष्ट्रभाषेची आस्था,
इत्यादि अनेक परम दुर्मिळ गुणांच्या
अभिनंदनार्थ परमपूज्यबुद्धीनें**

**अर्पण केला आहे.**

'काव्यसंग्रह'कार.

# अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक. | काव्यनाम. | पृष्ठसंख्या. | ग्रंथसंख्या. |
|---|---|---|---|
| १ | वामनचरित. .... .... .... | १–९ | ९५ |
| २ | शुकरंभासंवाद. .... .... .... | १०–१४ | ४९ |
| ३ | सीतास्वयंवर–सर्ग पहिला. .... .... | १४–२१ | ६१ |
| | ,, ,, दुसरा .... ... | २२–२८ | ५८ |
| | ,, ,, तिसरा .... .... | २८–३५ | ४९ |
| | ,, ,, चवथा .... .... | ३५–४३ | ५५ |
| | ,, ,, पांचवा .... .... | ४४–५१ | ५२ |
| | ,, ,, सहावा .... .... | ५१–५७ | ४१ |
| | ,, ,, सातवा .... .... | ५७–६४ | ४७ |
| ४ | रुक्मिणीस्वयंवर–सर्ग पहिला.... .... | ६५–७५ | ६१ |
| | ,, ,, दुसरा .... .... | ७५–८१ | ३१ |
| | ,, ,, तिसरा .... .... | ८१–८७ | ४१ |
| | ,, ,, चवथा .... .... | ८७–९४ | ४५ |
| | ,, ,, पांचवा .... .... | ९४–१०४ | ५५ |
| | ,, ,, सहावा .... .... | १०४–११३ | ५३ |
| | ,, ,, सातवा .... .... | ११४–१२६ | ६५ |
| | ,, उपसंहार .... .... | १२६–१२७ | २ |
| ५ | विद्वज्जीवन–उल्लास पहिला .... .... | १२[illegible]–१३७ | ४१ |
| | ,, ,, दुसरा .... .... | १३७–१४२ | २५ |
| | ,, ,, तिसरा .... .... | १४३–१४७ | २९ |
| | ,, ,, चवथा .... .... | १४७–१५४ | ४३ |
| | ,, ,, पांचवा .... .... | १५४–१६० | ३८ |
| | ,, ,, सहावा .... .... | १६०–१६६ | २७ |
| | ,, ,, सातवा .... .... | १६६–१७४ | ४३ |
| | ,, सज्जनप्रार्थना .... .... | १७५–१७६ | ५ |
| ६ | द्रौपदीवस्त्रहरण. (पहिलें) .... .... | १७६–२०० | २३१ |

| अनुक्रमांक. | काव्यनाम. | पृष्ठसंख्या. | ग्रंथसंख्या. |
|---|---|---|---|
| ७ | भगवद्गीता .... .... .... .... | २०१–२०७ | १८ |
| ८ | बिल्हणचरित्र–पूर्वार्ध .... .... | २०७–२१४ | ६० |
| | ,, –उत्तरार्ध .... .... | २१४–२२० | ५६ |
| ९ | रसमंजरी–उपोद्घात .... .... .... | २२०–२२१ | २ |
| | ,, उल्लास–पहिला .... .... | २२१–२२७ | ३६ |
| | ,, ,, –दुसरा–विषयोपन्यास | २२७–२२७ | १ |
| | ,, ,, ,, नायिकावर्णन | २२७–२३६ | ५० |
| | ,, ,, –तिसरा .... .... | २३६–२४२ | ३६ |
| | ,, उपसंहार .... .... .... | २४२– | २ |
| १० | पांचालीस्तवन .... .... .... | २४२–२४६ | २३ |
| ११ | कबीरकथा .... .... .... .... | २४६–२५० | ४६ |
| १२ | पदसंग्रह–भक्तिपर पदें .... .... | २५०–२७१ | १–५६ |
| | ,, उपदेशपर पदें .... .... | २७१–२८१ | ५७–८० |
| | ,, प्रासंगिक पदें .... .... | २८१–२९४ | ८१–११८ |
| | ,, संस्कृत पदें .... .... | २९४–२९५ | ११९–१२४ |
| | ,, हिंदी पदें .... .... .... | २९५–२९६ | १२५–१२६ |
| १३ | भूपाळ्या .... .... .... .... | २९६–२९८ | ३ |
| १४ | पाळणा .... .... .... .... | २९८– | १ |
| १५ | कूटसंग्रह .... .... .... .... | २९९–३०० | ८ |
| १६ | आणखी उपलब्ध झालेलीं पदें .... | ३००–३०२ | १२७–१३३ |
| १७ | द्रौपदीवस्त्रहरण (दुसरें) .... .... | ३०३–३०९ | ४३ |
| १८ | रुक्मिणीस्वयंवरांतील बंध .... .... | १–४६ | |
| १९ | सीतास्वयंवरांतील बंध .... .... | ४७–४८ | |


एकंदर ग्रंथसंख्या–१९९६



# परिशिष्टें.


| अनुक्रमांक. | परिशिष्टनाम. | पृष्ठांक. |
| --- | --- | --- |
| १ | विठ्ठलत्रयाविषयीं दोन शब्द .... .... .... .... .... | १–३ |
| २ | अनुक्रमणिका .... .... .... .... .... .... | १–२ |


**सूचना**—या पुस्तकांतील काव्यग्रंथ मिळवून देण्याच्या कामीं रा० रा० **भगवंत बाळकृष्ण पै रायकर**, ह० भ० प० **गोविंदबोवा गोसावी निगडीकर**, रा० **श्रीनिवास नीलकंठ सरमोकादम**, **व्यंकटेश यशवंत शिंगबाळ**, **गोविंद विष्णु श्रीखंडे**, डा० **रामजी धोंडजी खानोलकर** यांनीं व प्रत्यंतरासाठीं आणखी प्रती मिळवून देण्याच्या कामीं श्री० **रघोजीराव भोसले**, यांचे विशाळ, विविध व उत्तम पुस्तकसंग्रहांतील जुने लेखी ग्रंथ रा० रा० **तुकाराम तात्या पडवळ**, **पांडुरंग केशव** ओव्हरसीयर, व **चिंतो गोविंद वैशंपायन** यांचें फार साहाय्य झालें यास्तव आम्ही या सर्व सज्जनांचे फार फार आभार मानतों आणि 'असेंच वारंवार साहाय्य करावें' असें सविनय सुचवितों.

**'काव्यसंग्रह'कार.**

# विठ्ठलत्रयाविषयीं दोन शब्द.

प्रत्येक कवीचे ग्रंथ समग्र छापून झाले म्हणजे त्याच्याविषयीं जी कांहीं माहिती मिळाली असेल, ती वाचकांस सादर करावी असा आमचा परिपाठ आहे. त्यास अनुसरून **विठ्ठल**त्रयाविषयीं जी थोडीशी माहिती उपलब्ध झाली आहे ती येथें देतों. या भागांत एकंदर **विठ्ठल** नांवाच्या तीन कवींची कविता प्रसिद्ध झाली आहे, तेव्हां त्या तिघांविषयींही येथें दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. माहिती मिळेल या हेतूनें आजपर्यंत वाट पाहिली, पण तसा सुयोग जुळला नाहीं आणि जुळण्याची तूर्त आशाही नाहीं. तेव्हां पुढील अल्प लेखावरच निर्वाह केला पाहिजे.

(१) **बीडकर विठ्ठल कवि**–हा कवि **रामदासस्वामींचा**, (शा० श० १५३०–१६०३) **मुक्तेश्वराचा**, आणि **वामनाचा** समकालीन होता असें यानें आपल्या काव्यांच्या शेवटीं दिलेल्या शकवर्षावरून निष्पन्न होतें. यानें शके १५९६ त '**रुक्मिणीस्वयंवर**' केलें. [पृ० १२६ श्लो० १.] याच वर्षीं यानें आपलें दुसरें लघुकाव्य '**पांचालीस्तवन**' हें संपविलें. [पृ० २४६ श्लो० २२.] त्यानें '**सीतास्वयंवर**' हें काव्य शके १५९९ मध्यें समाप्त केलें. [पृ० ६४ श्लो० ४७.] तसेंच भानुदासकृत संस्कृत '**रसमंजरी**'चें महाराष्ट्र भाषांतर. '**रसमंजरी**' हें प्रकरण शा० शके १६०१ **प्रभव**नाम संवत्सरीं **शहागड** येथें केलें. [पृ० २४२–उपसंहार श्लो० १-२.] '**द्रौपदीवस्त्रहरण**' हें लघुकाव्य शके १६०२ **रौद्र**नाम संवत्सरीं माघ मासांत केलें. [पृ० ३०८ श्लो० ४३.] यावरून हा कवि छत्रपति **शिवाजी** महाराजांचे वेळीं होऊन गेला असें ठरतें. हा कवि **बीड** शहरानजिक **गौरीपुर** येथील राहणारा होय, म्हणून यास आम्ही '**बीडकर**' असें उपपद लाविलें आहे. सुप्रसिद्ध ज्योतिर्विदग्रणी **भास्कराचार्य**[१] हे याच गांवचे होत. तेव्हां **विठ्ठल** आणि **भास्कराचार्य** हे एकग्रामस्थ होत. **विठ्ठल** हा जातीनें ऋग्वेदी ब्राह्मण असून **कौशिक**गोत्रोत्पन्न होता. [पृ० ६४ श्लो० ४६, पृ० १२७ श्लो० १-२, पृ० १७५ श्लो० ४, पृ० २४२ श्लो० २]. **बीड** हा गांव **मोंगलाईत पैठणाच्या** आग्नेयीस सुमारें ५० कोस, **अहमदनगराच्या** पूर्वेस ४० कोस आणि **दौलताबादेच्या** दक्षिणेस ६० कोस आहे. [पृ० १२७ टीप ३ पहा.] याच्या वडिलांचें नांव **अनंत** असावें असें वाटतें. [पृ० २४६ श्लो० २२.] या कवीनें प्राचीन संस्कृत काव्यग्रंथ वाचिले होते असें त्याच्या काव्यांतून जे कोठें कोठें उल्लेख केले आहेत त्यांजवरून वाटतें. याचा प्राचीन काव्यग्रंथाशीं बराच परिचय होता असें म्हटलें तरी चालेल. **वाल्मीकि**कृत '**बालकांड**' वाचल्याविषयीं त्यानें स्पष्ट उल्लेख केला आहे. [पृ० ६४ श्लो० ४५.] असाच उल्लेख '**हनुमन्नाटक**,' '**रघुवंश**' आणि '**आदिकविप्रमेयरचना**' यांजविषयीं '**सीतास्वयंवरा**'च्या तृतीय सर्गाच्या आरंभीं दृष्टीस पडतो. [पृ० २८ श्लो० १.] आपला **श्रीमद्भागवताशींही** परिचय होता असें यानेंच सांगितलें आहे. [पृ० ६६ श्लो० ९.] याला छंदःशास्त्राची आणि चित्रकाव्याची चांगली माहिती होती. याचें छंदःशास्त्रनैपुण्य आणि चित्रकाव्यकौशल्य हीं '**सीतास्वयंवर**' आणि '**रुक्मिणीस्वयंवर**' या काव्यांत चांगलीं दिसून येतात.

---

१. 'भारतीय ज्योतिःशास्त्र' पृ० २४८–२६७–२७१ पहा.

यानें योजिलेल्या वृत्तांचीं नांवें आणि लक्षणें जागोजाग दाखल केलीं आहेत आणि निरनिराळ्या बंधांचीं चित्रें याच्या काव्यसंग्रहाच्या शेवटीं जोडिलीं आहेत. **मोरोपंतांच्या** '**सन्मणिमाले**'वरून **विठ्ठलानें** 'चित्रकूटात्मक' काव्यरचना केली असें स्पष्ट होतें. **पंत** म्हणतातः–'**विठ्ठलकविच्या** भलता लंघूं न शकेचि **चित्रकूटातें** । प्रबलतर हि पर जेंवी श्री**राम**निवास **चित्र**कूटातें. ॥' ७४ ॥ [सन्मणिमाला–पृ० १०.] संस्कृत साहित्यशास्त्र-ग्रंथांत चित्रकाव्याची गणना कनिष्ठप्रतीची मानिली आहे हें सुप्रसिद्ध आहे. **विठ्ठलाला** याच काव्याची अतोनात हौस होती. आम्ही जे बंध शेवटीं जोडिले आहेत तसे बंध याच्या काव्यांत अन्यत्रही आहेत. याची कविता संस्कृत काव्याच्या धाटणीवर केलेली दिसते. '**सीता**स्वयंवर'काव्याच्या आरंभींच [सीतास्वयंवर–स० १ श्लो० ६ पृ० १५] 'छंदादिनानाविध' प्रकारांचा समावेश केल्याचें कवीनें दर्शविलें आहे. यानें अनेक गणवृत्तांची योजना आपल्या काव्यांत केली आहे तरी गणवृत्तांची माहिती आपल्यास फारशी नाहीं, असें कबूल करून **का**लिदासाप्रमाणें आपलें मंदत्व दर्शविलें आहे, ही गोष्ट कवीच्या विनयाची सूचक होय. [पृ० १५ श्लो० ९.] याची वर्णन करण्याची शैली बरीच मनोरम आणि सरळ आहे. याच्या काव्यांत साधारण वाचकास आनंद देणारीं अशीं स्थळें अनेक आहेत. याची कविता श्रेष्ठ प्रतीची अशी जरी गणितां आली नाहीं तरी तींत मार्दव, वृत्तवैचित्र्य आणि सौष्ठव असल्यामुळें तिला मोहकत्व प्राप्त झालें आहे. कोठें कोठें वृत्तसुखार्थ कवीनें व्याकरणशुद्धतेकडे विशेष लक्ष पुरविलें नाहीं असें दिसतें, पण तो ज्या कालीं उदय पावला त्या कालाकडे दृष्टि दिली असतां तें क्षम्य होय असें म्हटलें पाहिजे. या भागांत **बी**डकर **विठ्ठ**लकवीची कविता–(१) **सी**तास्वयंवर, (२) रुक्मिणीस्वयंवर, (३) विद्वज्जीवन, (४) बिल्हणचरित्र, (५) रसमंजरी,(६)**पां**चालीस्तव,(७) पदें १-२।४-११। १४-२०।२२-२६।३०-३७।४१-७३।७७-८०।८२।९४।१०१-१०२।१०९।१२५-१२६, (८) भूपाळ्या-पाळणा, (९)[१] **कू**टसंग्रह, (१०) **द्रौ**पदीवस्त्रहरण (दुसरें) इतकी आहे. यानें **कृ**ष्णलीलावर्णनपर आणखी बरीच कविता केली असावी असें हरिदासांच्या कीर्तनांतील प्रसंगोपात्त कानीं पडणाऱ्या चुटक्यांवरून दिसून येतें.

(२) **दीक्षित विठ्ठल**–या भागांत **भ**गवद्गीतेवर एक कटिबंध प्रसिद्ध झाला आहे तो **बी**डकर **विठ्ठ**लाचा नव्हे. या प्रकरणाच्या अखेरीस [पृ० २०७ ओळ २] '**दीक्षित विठ्ठल**' असें नांव आलें आहे. यावरून हा कटिबंध **विठ्ठल दी**क्षिताचा असावा हें उघड आहे. या कवीची आणखी कविता आहे. ती एका मित्रानें मिळवून देण्याचें अभिवचन दिलें आहे. ती सुदैवानें हातीं आल्यास तिचें प्रकाशन यथावकाश अवश्य करूं. या लहानशा कटिबंधांत **भ**गवद्गीतेचें सार संग्रहीत करून कवीनें आपलें शब्दरचनाचातुर्य दाखविलें आहे. अनेक ठिकाणीं शब्दांची योजना अशा प्रकारची केली आहे कीं, ध्वनिमाधुर्यानेंच कर्णतृप्ति होऊन मन तल्लीन होतें.

---

१. हीं कूटें तिसऱ्या **विठ्ठ**लाचीं आहेत असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण सबळ प्रमाणें खात्री करण्याजोगीं अद्यापि कोणी पुढें आणिलीं नाहींत. तसें होईपर्यंत लोकग्रहाप्रमाणें आम्हीही प्रथम विठ्ठलासच कूटजनकत्व देत आहों.

(३) **केरीकर विठ्ठल**—या भागांत ज्या तिसऱ्या विठ्ठलाची कविता आली आहे, तो **विठ्ठल नरसिंह** होय. हा गोमांतकांतील केरी नामक गांवचा राहणारा म्हणून याला **केरीकर विठ्ठल** असें नांव दिलें आहे. या भागांतील (१) वामनचरित, (२) शुकरंभा-संवाद, (३) कबीरकथा, आणि (४) पदें ३।१२।१३।२१।२७-२९।३८-४०।७४-७६। ८१।८३-९३।९५-१००।१०३-१०८।११०-१२४।१२७-१३३ इतकी कविता विठ्ठल नरसिंह याची होय. या कवीविषयीं माहिती आमचे सन्मान्य मित्र रा० रा० भगवंत बाळकृष्ण पै रायकर यांनीं कृपा करून पाठविली. तिचा सारांश असा:—हा काश्यप-गोत्रोत्पन्न गौडसारस्वत ब्राह्मण गोमंतकांतील केरीगांवीं राहणारा होता. याचें पुरें नांव **'विठ्ठल नरसिंह नाईक सांखोळकर'** असें होतें. यानें आपल्या पदांत आपलें कुलदैवत मंगीश याचा वारंवार उल्लेख केला आहे. मंगीशाचें देवालय अंत्रूज महालांत वेलंग नांवाच्या गांवीं आहे. हा विठ्ठल नरसिंह जाडा विद्वान् असून यानें काशीच्या पंडितांपासून मानपत्र मिळविलें होतें. त्यांत त्यास बहुमानादाखल आसनास दोन पाट ठेवावे असें होतें, म्हणून त्यास **'दुपाटी विठ्ठल'** असें म्हणण्याचा परिपाठ होता. हा इतका विद्वान् होता तरी त्यास उपरतिज्ञानाचा गंधही नव्हता असें दिसतें आणि हा कवि विशेषसा प्रसिद्धीस न येण्याचें कारण हेंच असावें असें वाटतें. याच्या विद्वत्तेवरून त्यांस **'विठ्ठलाचार्य'** असेंही म्हणत असत. एकदां एके ठिकाणीं मौंजीबंधनप्रयोग चालला होता. त्या ठिकाणीं हे विठ्ठलाचार्य पोंचले. पण तेथें यांचा बहुमान झाला नाहीं म्हणून त्यांस फार वाईट वाटलें. त्या वेळीं 'आच्छादनं दूरीकृत्वा' या प्रयोगास नुकताच आरंभ झाला होता. तेव्हां यांनीं ऋत्विग्मंडळीस प्रश्न केला कीं, 'या आपल्या दूरीकरणाची मर्यादा कोठपर्यंत समजावयाची? मंडपाचे तटापर्यंत, कीं गांवचे सीमेपर्यंत, कीं कोठपर्यंत, तें सांगावें?' ऋत्विग्मंडळीस कांहीं सांगतां येईना तेव्हां त्यांनीं याची माफी मागून बहुमान दिला व प्रयोगास सुरुवात झाली. हा कवि वेदशास्त्रकलानिपुण होता त्याप्रमाणें गायन-कलाभिज्ञ असावा असें त्याच्या पदांवरून दिसतें. ह्या कवीचा निश्चित काळ कळत नाहीं. तरी पण हा कवि बांदेग्रामस्थ सोहिरोबा आंबिये यांचे वेळीं म्हणजे सुमारें १५०। १७५ वर्षांपूर्वी होऊन गेला असावा असें वाटतें.

(४) या भागांत 'द्रौपदीवस्त्रहरण' [पृ० १७६-२००] म्हणून एक काव्य आहे तें बीडकर विठ्ठलाचें म्हणून आम्ही प्रसिद्ध केलें. पण त्याचें जनकत्व संशयग्रस्त दिसतें. ह्या काव्याच्या अखेरीस कवीचें नांव नाहीं आणि वर्णनपद्धति आणि रचनाशैली यांचें सादृश्य या भागांतील इतर कोणत्याही काव्याशीं नाहीं, यावरून हें काव्य पूर्वोक्त विठ्ठलांपैकीं कोणाचेंच नव्हे, असें तूर्त म्हटलें पाहिजे.

या भागांतील काव्यांच्या कर्त्यांविषयीं ज्यास्त माहिती कोणी कळविल्यास तिचा आम्ही मोठ्या आदरानें स्वीकार करून 'काव्यसंग्रहा'च्या वाचकांस उपयोग होईल अशी व्यवस्था करूं.

**'काव्यसंग्रह'कार.**

# विठ्ठलकविकृत काव्यें.

## वामनचरित[१].

(गीतिवृत्त.)

जो भक्तिनें अदितिच्या आला उदरासि त्याचि बटु[२] हरितें ।
वंदुनि, चरित तयाचें गातां कलिजन्यवृजिन[३] पटु[४] हरितें. ॥ १
स्वसुतांचें[५] दितिजांनीं[६] हरिलें सर्वस्व[७] म्हणुनि तडफडली; ।
अदिति[८] पतीस निवेदी हृद्गत चिंता समग्र, जड पडली. ॥ २
हास्य करुनि कश्यपमुनि बोले दयितेस, ‘आयिकें सुभगे ! ।
हे हरिमाया चित्रचि, विचारितां काय तें अशुभ शुभ गे ! ॥ ३
यश अपयश जय अपजय समयविशेषेंचि पावती जंतू[९], ।
परि तें मायिक विसरुनि, हरि न विसरिजे जगत्पटीं[१०] तंतू.’ ॥ ४
अदिति वदे, ‘मुनिराया ! हें ब्रह्मज्ञान[११] काय वनितांतें[१२] ।

---

१. प्रल्हादाचा पौत्र आणि विरोचनाचा पुत्र बळि यानें इंद्राचा पराभव करण्यासाठीं दैत्यकुलगुरु भृगु (शुक्राचार्य) यांच्या प्रसादानें विश्वजिन्नामक यज्ञ करून अग्नीपासून दिव्यरथ, इंद्राच्या घोड्यांसारखे घोडे, सिंहांकित ध्वज, धनुष्यबाण, इत्यादि युद्धोपयोगी सामग्री मिळवून त्या अजिंक्य रथावर आरोहण करून इंद्रावर स्वारी केली आणि त्याचा मोड करून इंद्रपद घेतलें. तेव्हां तें त्यास परत देण्यासाठीं श्रीविष्णूनीं कश्यपापासून अदितीच्या उदरीं वामनाचा अवतार घेऊन बटुवेषानें बळीपासून यज्ञ करीत असतां त्रिपादभूमिदानाचें उदक स्वहस्तीं घेतलें. बळीनें उदक सोडतांच, वामनानें विराटरूप धारण करून एका पावलांत पृथ्वी आणि दुसऱ्या पावलांत आकाश व्यापून, तिसरें पाऊल ठेवण्यासाठीं पाऊलभर जमीन मागितली. तेव्हां बळीनें आपल्या मस्तकावर तिसरें पाऊल ठेवण्यास सांगितलें. मग वामनानें तिसरें पाऊल त्याच्या मस्तकीं दिलें आणि त्यास पाताळीं लोटिलें. अशी कथा या आख्यानांत आहे म्हणून यास ‘वामनचरित’ असें नांव आहे. ही कथा श्रीमद्भागवताच्या आठव्या स्कंधांत अध्याय १५-२३ यांत वर्णिली आहे. २. मुंज न झालेला द्विजबाल. ३. पातक. ४. कुशलपणें. ५. देवाचें. ६. दिति ही कश्यपऋषीची दुसरी स्त्री. हिचा पुत्र हिरण्यकशिपु. त्याचाच प्रपौत्र बळि, तेव्हां दितिजांनीं=बळि इत्यादि दैत्यांनीं. (अध्याय १६ श्लोक १.) ७. इंद्रपद (स्वर्ग). ८. देवमाता. ९. प्राणी. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. जगत् हा पट (वस्त्र) असून त्यांत तंतूसारखा (धाग्यासारखा) आहे; तंतूशिवाय पट असावयाचा नाहीं. ११. ज्यांत ईश्वरसत्ता दैव याचें प्राधान्य, आणि प्रयत्न लोकव्यवहार यांची निंदा आहे अशा तात्पर्याचें भाषण. १२. स्त्रियांतें.

तुष्ट करावें मातें स्वसुतातें विविधदुःखजनितातें. ॥ ५
सत्वर सुतांसि माझ्या सुरभुवनप्राप्ति संपतीसहित ।
व्हावी, सुख मज तेणें, लेंकीं[1] सुख तेंचि दंपतीस हितें[2]'. ॥ ६
मुनि तीस वदे, 'चतुरे ! सुतहितकारिणि विचारितां गमतें, ।
सकलसुखास्पद[3] विष्णुव्रत विश्वीं मान्य आत्मयोनिमतें[4]. ॥ ७
ज्यासि पयोव्रत[5] आख्या[6] तें आचरितांचि कामनापूर्ती[7] ।
हे गोष्टि सत्य मानीं, मी तुज सांगेन कां मनापूर्ती ?' ॥ ८
मुनिर्गदित विधीपूर्वक[9] विष्णुव्रत सांग[10] आचरोनि सती ।
झाली त्रिभुवनधन्या, तत्तुल्या अन्य बहु तशा नसती. ॥ ९
तीच्या व्रतपुण्यबळें वरदेशें[11] तीस दाविली वरता, ।
सायुध सांग चतुर्भुज 'वर माग' म्हणे 'सुरांबिके[12] ! पुरता.' ॥ १०
अदिति वदे, 'सर्वज्ञा ! हृद्गत तुजलागिं काय सांगावें ? ।
विश्वमनोगत[13] जाणसि, नाम तुझें त्यजुनि दुःख कां गावें ?' ॥ ११
दनुजत्रस्तसुतास्तव[14] जीव तुझा सति ! उदास कळकळला, ।
मी भक्तपक्षपाती[15], वृत्तांत तुझा मला सकळ कळला. ॥ १२
मी पूर्णकाम[16], परि निजभक्तांचा पक्षपात मज करणें, ।
त्वरितचि पूर्ण मनोरथ करितों, हा अंतरीं समज करणें. ॥ १३
सुत[17] होऊनि तुझा मी स्वपदाप्रति पाववीन सुरबंधु, ।
कां तुज हृद्गत चिंता, मी असतां दीनबंधु[18] सुखसिंधु ?' ॥ १४
आश्वासुनि सुरमातेप्रति अंतर्धान[19] पावला हरि तो, ।
जो दुःख दुःखिताचें स्मरतां तत्काळ सदय परिहरितो[20]. ॥ १५

---

१. पुत्राला. २. कल्याणप्रद. हा चरण सुभाषितरूप आहे. ३. सर्व सुखाचें स्थान. ४. आत्मयोनीच्या (ब्रह्मदेवाच्या) मताप्रमाणें. ५. ईश्वरप्राप्ति व्हावी म्हणून गाईच्या गोठ्यांत एक महिना किंवा बारा दिवस अथवा तीन दिवस किंवा एक दिवस देवाला दुधाचा (पयाचा) नैवेद्य समर्पून तें प्राशन करण्याचें व्रत. (अध्याय १६ श्लोक २५-२६). ६. नांव. ७. इच्छा सफल होणें. ८. सांगितलेलें. ९. अध्याय १६ श्लोक २६-६२ पहा. १०. परिपूर्ण. ११. वरद+ईश=वर देणाऱ्यांच्या स्वामीनें. (विष्णूनें.) १२. देवमाते (अदिति). १३. सकल विश्वाचे मनोव्यापार. १४. दानवांनीं पीडिलेल्या मुलासाठीं. १५. स्वभक्ताचा कैवारी. १६. सफलमनोरथ. १७. वामनरूपें पुत्र होऊन. (अध्याय १७ श्लोक १८.) १८. दीनांचा नाथ. १९. अध्याय १७ श्लोक २१ पहा. २०. लयाला नेतो.

[1]तदुपरि पतिसहवासें झाली ते अदिति [2]अजितगर्भवर्ती; ।
ती जाणे खुण कश्यप, जाणे तैसीच [3]पद्मसंभव ती. ॥ १६
[4]गर्भस्तुति करि हरिची ब्रह्मा येऊनि निकट पाय नमी, ।
'तूं स्वजनपक्षरक्षक, तेथें बहु काय करुनि गायन मी?' ॥ १७
विधि विनवुनि जाय, तदा [5]अमरांचें [6]वृंद जाहलें तुष्ट; ।
[7]म्हणति, 'सहाय अजित, मग कोठुनियां कष्ट? [8]नाशती दुष्ट.' ॥ १८
तयिं रोमविवरगर्भी धरि जो ब्रह्मांडकोटिच्याकोटी, ।
तो अज अव्यय अच्युत अवतरला हो! अदीतिचे पोटीं. ॥ १९
बाहुचतुष्टय करधृतचक्रगदाशंखपद्म रमणीय, ।
पीतांबरधर, ज्याचें नयन[9]नलिनयुग [10]विलोल [11]कमनीय. ॥ २०
[12]नीरदनीलद्युतिमान् [13]चलमकराकारकुंडलें [14]लसती, ।
[15]श्रवणीं श्रीमद्वदनीं कुंडलमणिसुप्रभा करी वसती. ॥ २१
श्रीवत्सांकित वक्षःस्थल, [16]वनमाला विराजती कंठीं, ।
[17]तत्सुरभिगंधहर्षें [18]मधुकरमाला सदा समय [19]कंठी. ॥ २२
मस्तकिं किरीट, वलयांगदयुत बाहुप्रदेश शोभविती, ।
[20]रुणझुणति पदीं [21]नूपुर [22]योगिमनोमधुकरांसि लोभविती. ॥ २३
यापरि कश्यपसदनीं तो माधव [23]निजतनुप्रभा मिरवी, ।
कंठीं कौस्तुभ ज्याच्या जैसा अतिनीलगगनगामि रवी. ॥ २४
तेकाळीं भूतेंद्रियदेवातें हर्ष जाहला भारी ।
प्रतिती तेथेंचि नसे भावी जो मीच पद्मनाभारी. ॥ २५

---

१. त्यानंतर. २. अजित (विष्णु) आहे गर्भी जिच्या अशी. ३. विधाता. (पद्मापासून=कमळापासून संभव=जन्म ज्याचा तो; अब्जयोनि.) ४. अध्याय १७ श्लोक २५-२८ पहा. ५. देवांचें. ६. समूह. ('वृंद' शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे.) ७. अमर म्हणती. ८. दुष्ट नाश पावतील. ९. कमल. १०. चंचल. ११. सुंदर, लोभनीय. १२. नीरद (मेघ) नील (निळा, श्याम) द्युतिमान् (कांतियुक्त)=मेघासारखा नीलप्रभ. १३. चल (चंचल) मकराकार (माशाचा आकार) कुंडलें=चंचलमत्स्याकृति कर्णभूषणें. १४. शोभती. १५. कानांत. १६. आपादलंबिनी माला. 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥.' (अध्याय १८–श्लोक १-३). १७. त्या मालेच्या मधुर सुवासाच्या आनंदानें. १८. भ्रमरपंक्ति. १९. घालवी, लोटी. २०. वाजती. (रुणझुण=पैंजण तोरड्या इत्यादि भूषणांचा शब्द.) २१. पैंजण. २२. योग्यांच्या मनोरूप भ्रमराला भुलवितात. २३. स्वशरीरकांति.

निजगर्भी अवतरला हरि निरखुनि तोष देवजननीला, ।
तैसाच कश्यपातें होय, म्हणे, 'धन्य धन्य [1]घननीला!' ॥ २६
बटुवेषवामनातें निरखुनि मुनिवर्य हर्षले सकळ, ।
करविति [2]कर्में कश्यप पुढें करुनि न पडतां मनास कळ. ॥ २७
[3]उपनीयमान बटुतें [4]सावित्रीतें कथी तदा [5]सविता ।
दे ब्रह्मसूत्र [6]गीष्पति, दे पुत्रालागिं मेखला [7]सविता. ॥ २८
[8]मृगचर्म मेदिनी दे, दे दंड [9]शशांक जो धरि शशाला; ।
जननी कौपीनातें, दे छत्र [10]स्वर्ग वंदुनि तशाला. ॥ २९
दे विधि कमंडलूतें, देती [11]सप्तर्षि नूतन [12]कुशाला. ।
दे [13]अक्षमालिकेतें सरस्वती रम्य परम पुरुषाला. ॥ ३०
दे [14]यक्षप [15]पात्रीतें, दे भिक्षेतें उमा अनादि [16]सती. ।
तो तरला हरिलीला हे रम्या ज्याचिया मना दिसती. ॥ ३१
नयनीं फुटल्या [17]रसना, त्यांतें गमला [18]सुधासुरसभेला. ।
तो [19]ब्रह्मवर्चसें बटु रुचला [20]राया! बुधा! [21]सुरसभेला. ॥ ३२
व्रतबंधकर्म विधिवत् संपादुनि जेथ यज्ञ बळि करितो, ।
त्या [22]नर्मदातटाकीं याचकवेषेंचि जाय बटु हरि तो. ॥ ३३
तो अश्वमेधयज्ञीं भृगुवंशोत्पन्न विप्र त्यास हित ।
पृच्छक ते क्षणिं तेथें शंकित यजमान होय त्यांसहित. ॥ ३४
बोलति परस्परें ते, 'येतो यज्ञासि कोण हा [23]रविसा, ।
कीं वन्हि कीं सनक हा, [24]भा सर्वांच्या हि येथ [25]हारविसा?' ॥ ३५
त्या [26]यज्ञमंडपीं ते करितां तर्कासि छत्रधर बटु तो ।

---

१. हे घनश्यामा (अध्याय १८ श्लोक ११). २. जातकर्मादिक संस्कार (श्लोक १३). ३. उपनयनास योग्य अशा. ४. मंत्रातें. ५. सूर्य (श्लोक १४). ६. बृहस्पति. ७. जन्म देणारा जनक. (कश्यप.) ८. कृष्णाजिन. ९. चंद्र. (चंद्राला वनस्पति म्हणजे वनांचा पति—असें मूळांत म्हटलें म्हणून त्यानें दंड दिला.) १०. मूळांत 'द्यौ' असें आहे. ११. मरीचि, अत्रि, अंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ हे सात ऋषि होत. १२. दर्भाला. १३. जप करण्याची रुद्राक्षांची माळ. १४. कुबेर. १५. भिक्षापात्र. १६. भगवती अंबिका. १७. जिव्हा. १८. सुधा+सुरस+भेला. अमृताचा मधुरभेला (गुळाचा लहान बांधलेला गोळा.) १९. तपःस्वाध्यायादिकांच्या तेजानें. २०. परीक्षित् राजा. २१. देवांच्या सभेला. २२. नर्मदेच्या उत्तरतीरीं. २३. सूर्यासारखा. अध्याय १८ श्लोक २१-२३ पहा. २४. तेज, कांति. २५ घेणारा असा. २६. अश्वमेधमंडपांत.

आला सभेंत, पाहुनि नृप चित्तीं हर्षला परम पटु तो. ॥ ३६
दंडकमंडलु हातीं, मौंजी [1]मध्यासिं शोभली बरवी, ।
सर्वांसि जो स्वतेजें [2]प्रत्युत्थानादि तत्क्षणीं करवी. ॥ ३७
[3]आसन देऊनि बळी स्वागत पुसतां, मनीं चमत्कार ।
भासे ज्यासि, परम सुख मानुनि, त्यातें करी नमस्कार. ॥ ३८
बटुचरण प्रक्षाळुनि घे माथां भूप [4]दुरितहर जळ तें ।
जेणें [5]शशिधर [6]खरगर निववी स्वशरीरपुरित हर [7]जळतें. ॥ ३९
[8]नृप बोले, 'विप्रशिशो! आगमनें यज्ञ जाहला सांग, ।
झाले तृप्त [9]पितर, परि काय [10]अपेक्षा तुझी मला सांग. ॥ ४०
जें जें वांछिसि चित्तीं तें तें निःशंक वित्त मागावें, ।
[11]कांचन रथ गज [12]वाजी किंवा घे ब्रह्मवित्तमा! [13]गांवें.' ॥ ४१
[14]'बोलसि यथार्थ राया! सत्यत्वाचा तुझ्या कुळास ठसा, ।
दृष्ट श्रुत न च ऐसा कोणी वंशांत जाहला [15]शठसा. ॥ ४२
या तुझिया वचनाचे हे साक्षी विप्रवर महाराजा! ।
परलोकाच्या ठायीं वेत्ता प्रल्हाद ही तुझा आजा. ॥ ४३
रणतीर्थदानविषयीं पाठी तुझिया कुळांत नर सरला, ।
नायिकलाचि कदापि हि, तूं कां सरशील सांग? न रस मला. ॥ ४४
यास्तव [16]मत्पदमितिनें तुजपासुनि तीन पाउलेंच मही ।
मी वांछितसें राया! तुज दातृत्वासि किमपि न श्रमही. ॥ ४५
येणेंचि तृप्ति असतां, चिंतीना चित्त वस्तु या परतें, ।
दातृत्वशक्तिपरतें मागावें तें अयोग्य पापरतें.' ॥ ४६
हास्य करुनि बलि बोले येथें विप्रापुढें करी [17]पाणी, ।
'वांछित काय तुझें हें? असो, शिशो! सोडितों करीं [18]पाणी'. ॥ ४७
भाव नृपाचा समजुनि दानातें शुक्र तद्गुरु निवारी, ।
बोले, '[19]राया! हरि हा, वससी स्वकरांत कां धरुनि [20]वारी? ॥ ४८

---

१. कमरेला. २. सत्कारार्थ उठून उभें राहणें इत्यादि क्रिया. ३. अध्याय १८ श्लोक २६-२७ पहा. ४. पापनाशक. ५. चंद्रमौली. ६. उग्रविष. ७. जाज्वल्य. ८. बळि. (अध्याय १८ श्लोक २९-३२.) ९. पूर्वज (श्लोक ३०). १०. इच्छा, कामना. ११. सोनें. १२. घोडे. १३. ग्राम (श्लोक ३२). १४. अध्याय १९ श्लोक १-१०. १५. ठगासारखा. १६. माझ्या पावलाच्या प्रमाणानें (अध्याय १९ श्लोक १६). १७. हस्त. १८. उदक. १९. अध्याय १९ श्लोक ३०-३४ पहा. २०. उदक.

बटुसा तुज गमतो परि तंतुचि हा विश्वमायिकपटाचा. ।
विबुधहितास्तव[1] धरिला वेष, तुला वंचनार्थ[2] कपटाचा. ॥ ४९
न कळे चरित तुज जरी, परि मजला हें नृपा! सकळ कळतें, ।
श्रम पावशील यास्तव मानस तुज सत्कृपास कळकळतें.' ॥ ५०
'अनृत[3] वदावें, तरि मज संकट तें काय? आज वद गुरुजी! ।
वाग्दत्त[4] जाहल्यावरि, मजवरती व्यर्थ करिसि गुरगुर[5] जी. ॥ ५१
**वि**ष्णु असो, अथवा हा याचक कोणी तरी असो भलता, ।
मी देउनि चुकलों, तूं याची कां छेदितोसि लोभलता?' ॥ ५२
नायिकतां स्वाज्ञापित[6], दे **ब**ळितें **शु**क्र शाप कविवर तो, ।
हतदैव[7] पुरुष जैसा नेणुनि निज हित मनांत न विवरितो. ॥ ५३
'मद्वचनोल्लंघनफल[8] पावसि निःश्रीकता[9] नराधिपते! ।
पडती व्यसनीं जे गुरुवचन न धरिती मनीं नराधिप[10] ते'. ॥ ५४
कथिलें गुरुनें हा सुरकार्यार्थी **ह**रि तवाहित[11] रिपू जी! ।
तद्वचनशाप न गणुनि तो **ब**लि त्या **मा**धवा हि तरि पूजी. ॥ ५५
तत्पत्नी[12] **विं**ध्यावलि कलश करीं, त्यांत विमल जल भरिलें, ।
ओती बटुचरणावरि धुउनि चरण तें नृपें शिरीं धरिलें. ॥ ५६
त्या कर्मातें स्तविती[13] सुरमुनिगंधर्वकिन्नरादि, किती ।
वर्षति कुसुमसमूहें, यश गाउनि, सुजन मस्तकें तुकिती[14]. ॥ ५७
विस्मयकर रूपातें **अ**नंतगुण जाहला तदा वरिता, ।
पातालभूमिनभदिक्चक्रांतारें पाहतां न ठाव रिता. ॥ ५८
भुवनें स्वतनुविभागीं **ह**रिनें **ब**ळिलागिं दाविलीं[15] चवदा, ।
जैसा सधन पसारी दावी स्वदुकानमंडपीं[16] सवदा; ॥ ५९
एकपदें क्रमिली महि, पदें द्वितीयें त्रिविष्टपें[17] भरलीं, ।
तृतिय[18] चरण मोजावें तरि **वि**धिभवनातळीं स्थळें सरलीं. ॥ ६०

---

१. देवांच्या हितास्तव. २. फसविण्यासाठीं. ३. खोटें. (अन्+ऋत=असत्य.) ४ वाचेनें दिलेला. ५. क्रोधावेशसूचक शब्द. ६. आपली आज्ञा. ७. दुर्दैवी, दैवप्रहित. (अध्याय २० श्लोक १४.) ८. माझी आज्ञा मोडण्याचें फळ. ९. निर्धनता, लक्ष्मीनाश. १० राजे. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ११. तव+अहित. तुझें अकल्याण करणारा. १२. त्या बलीची भार्या. १३. अध्याय २० श्लोक १७–२० पहा. १४. डोलविती. १५. श्लोक २२ पहा. १६. 'दुकान' आणि 'सवदा' हे शब्द फारशी आहेत. 'स्वदुकानमंडपीं' हा संस्कृतप्राकृत शब्दांचा समास चिंतनीय आहे. १७. स्वर्ग. १८. वृत्तसुखार्थ येथें 'ति' ह्रस्व आहे.

ते हरिपद विधि भावुनि प्रवेशतां विधि सभासदांसहित ।
निरखुनि वदूनि पूजुनि म्हणति पदातें करीं स्वदासहित. ॥ ६१
हरिपदमार्जित जल तें सरिद्वरा[1] होय भारता राया ! ।
गगनपथें उतरे या महिवरि कृतदुरितभार[2] ताराया. ॥ ६२
सर्वस्वहरण[3] बळिचें निरखुनि ते दानवी सकळ सेना ।
वामनहननार्थ निघे, चित्त जिचें लव नृशंस कळसेना[4]. ॥ ६३
नंदसुनंदादि[5] तदा हरिगण ताडिति तदीय कटकातें; ।
बळि दनुजांसि म्हणे, 'कां मरतें मत्सैन्य फुकट ? हटका तें. ॥ ६४
अस्मद्धितकर हरि तो झालासे साह्य विबुधनिकरातें[6] ।
जय अपजय कालोद्भव समजुनि करिती न विबुध निकरातें. ॥ ६५
जो त्रिदशपक्षपाती[7] त्यातें हा पक्ष कायसा मान्य ? ।
धरिला सुरार्थ जेणें, पहा पहा काय काय[8] सामान्य.' ॥ ६६
या बलिवचनश्रवणें दितिदनु[9]सुतकुल रसातळीं[10] शिरलें ।
कुशल हि काय करिल तरि जरि समयें दैव पाठिशीं फिरलें[11] ? ॥ ६७
तदुपरि हरिचित्ताशय[12] जाणुनि विनतासुतें[13] तया बळिला ।
धरुनि वरुणपाशांहीं दृढ बांधुनि तद्धितार्थ आंवळिला. ॥ ६८
श्रीहरिभावार्थ असा कीं याची निरसिजे अहंममता[14] ।
यास्तव हरूनि दोन्ही दावी बळिलागिं आपुली समता. ॥ ६९
श्रीविहत[15] परि स्थिरमति धर्मात्मा जो कधीं न पापरत, ।
त्यासि वदे हरि, 'दिधलें या वचनातें न धर्मपा[16] ! परत.' ॥ ७०
जें जें इच्छिसि मातें त्या तुझिया सकळ कामना[17] पुरती[18] ।
मागसि मज बळिलागुनि ते मागें गोष्टि वामना ! पुरती[19]. ॥ ७१

---

१. मोठी नदी. २. केले आहेत दुरिताचे भार (पापराशि) ज्यांनीं त्यांला. ३. अध्याय २१ श्लोक १०-१२ पहा. ४. लवेना. ५. अध्याय २१ श्लोक १८-२४ पहा. ६. देवांच्या समुदायाला. ७. देवांचा कैवार घेणारा. ८. देह. ९. दैत्य, दानव. दितीच्या पुत्रांला 'दैत्य' आणि दनूच्या पुत्रांला 'दानव' म्हणतात. दैत्य आणि दानव हे समस्वभाव असल्यामुळें त्यांत फारसा भेद मानीत नाहींत. १०. पाताळांत. (अध्याय २१ श्लोक २५ पहा.) ११. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १२. हरीच्या मनांतील अभिप्राय. १३. गरुडानें. विनता ही गरुडाची माता (श्लोक २६). १४. अहंपणा आणि ममता. १५. निर्धन, दैवहत. १६. हे धर्मरक्षका बले. १७. इच्छा. १८. सफल होती. १९. परिपूर्ण.

ऐसें असतां तुज मी मागितलीं तीन पाउलें धरणी[१] ।
ते देउनि मज आतां वाक् संरक्षीं महत्पुरःसरणी. ॥ ७२
एकाचि पाउलें महि भरली, दुसऱ्या पदें गगन भरलें[२], ।
दे तिसरें पद उरलें नाहीं तरि बोल 'मद्वचन हरलें.' ॥ ७३
वाग्दत्त न परिहरतां जासी नरकासि[३] विगतसंदेह; ।
ऐसेचि अहंममतायोगें श्रमलेत बहुत मंदेह.' ॥ ७४
ऐसा छळिला जरि तरि न ढळे सत्त्वासि दानवेश[५] शमी[६] ।
तो वदतो श्रीहरितें, 'मद्वचनातें कसा नसें वश मी? ॥ ७५
तुजलागिं वचन दिधलें त्यातें देवा? न मी कदापि सरें, ।
पदयुग्मपूर्ति झाली तरि दे पद वंद्य मस्तकीं तिसरें. ॥ ७६
भीती मज नरकाची न दरिद्राची न वरुणपाशाची, ।
लोकीं दुर्वादाची[७] भीति मला एक, इतर काशाची? ॥ ७७
परोक्ष्य[८] परम गुरु तूं असुरांचा सर्व गर्व हारविसी, ।
तम निरसी विश्वाचें म्हणवुनि कीं काय दोष हा रविसी? ॥ ७८
तुजशीं वैर करुनि बहु विबुधेतर[९] खळभवांबुधी तरले, ।
गुह्य असें नेणति जे, पाय तुझे त्यांस मात्र अंतरले. ॥ ७९
सकल प्रपंच मिथ्या समजुनि तव चरणपल्लवीं जडला, ।
त्या प्रल्हादश्रेयें निरुपम मज योग हा तुझा घडला. ॥ ८०
शरण पितामह माझा अनुसरला 'पतितपावना[११]! तूतें ।
झाला सुखीच तत्कुलसंभव हा पतित पाव नातूतें.' ॥ ८१
ते समयीं प्रल्हादहि येउनि[१२] वर्णूनि वंद्य गुण बळिचा ।
स्तविताहे श्रीहरिला, 'रक्षावा दास दनुजकुलबळिचा.' ॥ ८२
बळिपत्नी विंध्यावलि वंदुनि देवासि सुवदनें विनवी, ।
'त्वद्दत्त[१३] समर्पुनि तुज देती हे मूढ काय जोड नवी?' ॥ ८३
विधि विनवी देवातें, 'या समयीं योग्य काय हा निकर[१४]? ।

---

१. पृथ्वी. १. व्यापिलें. (अध्याय २१ श्लोक ३१.) ३. अध्याय २१ श्लोक ३२ पहा. ४. निः-संशय. ५. बळि. ६. शांतिसंपन्न. ७. असाधुवादाची. (अध्याय २२ श्लोक १-३) ८. अदृश्य, अलोकनीय, शत्रुछलानें असणारा. (श्लोक ४ पहा.) ९. देवांहून अन्य. १०. प्रल्हाद. ११. पातकीजनांला पावन करणारा. १२. अध्याय २२ श्लोक १२ पहा. १३. अध्याय २२ श्लोक २० पहा. १४. निग्रह. पाशांत बांधून ठेवणें यासमयीं योग्य नाहीं—असा भाव. (श्लोक २१.)

सर्वस्व अर्पिलें तुज तें बळिलागूनि काय हानिकर? ॥ ८४
फलजलदूर्वार्पण तुज करितां देतोसि बा! निज गतीतें[1] ।
यासि घडेल कशी ते तुजचि समर्पूनि हानि जगतीतें[2].' ॥ ८५
स्तुति विधिची ऐकुनि हरि बोले देवाधिदेव धात्यासी, ।
'मद्भक्तगर्वहर मी, तो बा! ठेवीन सांग कां त्यासी? ॥ ८६
बहुतचि छळिला मी परि हा माझ्या उतरला छळकसातें[3], ।
याच्या सत्वगुणांचें वंचिन तरि मी महत्फल कसा तें? ॥ ८७
मन्वंतर सावर्णीमनुचें[4] सरतांचि नाकपालकता[5] ।
पावेल इंद्र होउनि मग इतरांची उडेल चालकता. ॥ ८८
तंवपर्यंत सुतळ[6] जें रचिलें अतिरम्य विश्वकर्मकरें, ।
तेथें असोनि येणें भोगावीं शुभ फळें सुशर्मकरें[7]. ॥ ८९
आधिव्याधि[8]जराभयबाधा जेथें न जननमरणाची. ।
तेथें राहुनि येणें स्मृति रक्षावी मदीय चरणाची. ॥ ९०
रे इंद्रसेन[9] राया! जावें सुतळासि दितिज[10]परिवारें; ।
मच्चक्र तेथ रक्षक न कृतांताचेंहि जेथ परि वारें. ॥ ९१
रे बळिराया! तूझें निरुपम मज मानलें महाशील[11], ।
यास्तव तुझिया द्वारीं वसेन मजला सदा पहाशील.' ॥ ९२
वंदुनि हरितें सहगण गेला सुतळासि बळि वसायाला, ।
त्याच्या भक्तीस्तव हरि सोडूं तरि मी म्हणे कसा याला. ॥ ९३
बळि सुतळाप्रति जातां, उपेंद्र[12] ही जाय विबुधलोकासी[13], ।
हृष्ट करूनि अदितितें केला देवेंद्र तेथ मोकासी[14]. ॥ ९४
यापरि हरिचीं चरितें ऐकुनि गाउनि भवार्णवीं[15] तरती ।
त्याच्या चरणरजाची विठ्ठलहृदयांत पूर्ण सतत रती[16]. ॥ ९५

---

१. उत्तम गतीतें. २. पृथ्वीतें. (अध्याय २२-श्लोक २२-२३ पहा.) ३. छळाच्या कसोटीला. ४. चवदा मनूंतील आठवा. (सवर्णराजाचा पुत्र सावर्णि.) ५. बळि इंद्र होऊन स्वर्गीचें राज्य पावेल. ६. पाताळ. (अध्याय २२ श्लोक ३२.) हें सप्तपाताळांतील एक होय. ७. उत्तम शर्म (सुख) देणारीं. ८. आधि=मनोव्यथा, व्याधि=शरीरपीडा. ९. हे बळे. (अध्याय २२ श्लोक ३३-३६.) १०. ज्ञातीसह. ११. उत्तम स्वभाव. १२. इंद्राच्या मागें इंद्रपदवीचा जो अधिकारी तो. १३. स्वर्गलोकास. १४. मिरासदार, जमीनदार, इनामदार. १५ संसारसमुद्रांत. १६. गोडी, प्रीति.

## शुकरंभासंवाद[1].

(गीतिवृत्त.)

श्रीनरहरिपद[2]पद्मीं मानस[3]मधुपासि पाजवील सुधा, ।
कामासि तोचि जिंकिल, करिल पदरजें पवित्र हे वसुधा[4]. ॥　१
वंदुनि संतजनाप्रति वर्णिन विश्वांत मान्य सुकथा रे! ।
शुक[5]रंभा[6]संवादश्रवणें चित्तांत शांतिसुख थारे[7]. ॥　२
प्रयत निरंजन[8]देशीं उपवन[9] घन शांत जें विवेकाचें, ।
वैराग्यवसंतोज्जृंभितासनचि तेथ मानस शुकाचें. ॥　३
त्याच्या तपसामर्थ्यें सहस्रकर[10]चंद्र लोपती तारा, ।
अमरासनेंहि चळती, स्वर्गीं शक्रासि ना निघे थारा. ॥　४
ते काळीं मुनि नारद येतां स्वर्गासि वासव[11]ाजवळी ।
सकळ सुरांसह सुरपति[12] वंदुनि पदयुग्म आदरें कवळी. ॥　५
पूजा करुनि यथाविधि सप्रेमें श्रीविरिंचितनयातें[13] ।
प्रश्न करी संक्रंदन[12] वचनें जावूनि पूर्ण विनयातें. ॥　६
'भूमंडळप्रदेशीं स्वामी ! तप कोण आचरे सुकृती[14] ।
सर्वज्ञ तुम्ही जाणा त्रिभुवनभुवनांत धन्य परम कृती.' ॥　७
मुनि वदतां शुकमहिमा, श्रवण करुनि शक्र मानसीं विवरी[15] ।
'कवण तपातें खंडुनि निःसार[16] करी तयासि भूमिवरी?' ॥　८
यापरि हृदयिं विवरितां तपनाशालागिं कल्पिली ललना[17]; ।
स्त्रीयोगें बहु थकले ज्ञानीहि तपांत पावले चलना. ॥　९
त्रिपुरांतक चतुरानन मी सुरपति इंद्र तापसांत किती? ।
विश्वामित्र पराशर शृंगी व्यासादि कोण करिल मिती? ॥　१०

---

१. हें प्रकरण महाभारतांत शांतिपर्वांतर्गत 'मोक्षधर्म' नामक भागांत आहे. २. चरणकमळीं. ३. मनोरूप भ्रमरास. (मधुप=मध पिणारा भ्रमर.) ४. पृथ्वी. ५. शुक हा कृष्णद्वैपायनव्यासाचा घृताचीअप्सरेपासून झालेला पुत्र. ६. रंभा ही इंद्रानें शुकाचें मन मोहण्यास्तव पाठविलेली अप्सरा. ७. वसे. ८. जन्ममरण दुःखसुखादिरहित. ९. बाग. १०. सूर्य. (सहस्र आहेत कर किरण=ज्याला तो.) ११. इंद्रासमीप. १२. इंद्र. १३. विरिंचीच्या (विधात्याच्या) मुलातें—नारदातें. १४. कुशल, पुण्यशाली. १५. विवरण करी, विचार करी. १६. निःसत्त्व, बलहीन. १७. सुंदर स्त्री.

दंभी[1] जंभाहित[2] संरंभें[3] रंभोरु[4] आणवी रंभा[5] ।
संभावुनि[6] परमोचित जृंभित वाक् कल्पि तो समारंभा. ॥ ११
'तुम्हीं स्त्रियांनिं बहुतचि तपोनिधी करुनि दाविलेत रिते, ।
तूं ही जाणसि, तेथें किमर्थ बोलुनि दाखवूं तरि तें? ॥ १२
जाऊनि मृत्युभुवनीं[7] शुकमुनिच्या सत्तपासि नाश करीं, ।
साहित्य युक्त घेउनि जैसें मीनासि दाश[8] पाश करीं.' ॥ १३
मान्य करुनि ती सुकुचा रंभा निर्जरवरेशपाय[9] नमी. ।
विनवी, 'केंवि उरे शुक करितां संगीत नृत्य गायन मी? ॥ १४
चंद्रमुखी चपलाक्षी चूर्णकचा चारुचित्रचीरधरा ।
लिकुचकुचा चामीकर[10]रुचिरुचिरा पाहते शुकोच्चधरा. ॥ १५
सीमंत[11]मध्यदेशीं सिंदूरारक्त रेखितें रेखा ।
वेणीफणी सुकुंकुम कज्जल धरितांचि काय शुकलेखौ[12]. ॥ १६
नासाभरण सुरंजित कर्णफुलें जडुनि रत्नकापासी, ।
मुक्ताहारांगदकंकणरम्या पावत्यें शुकापाशीं. ॥ १७
धरितें बहु मृदु जांबूनद[13]रंजित रम्य रत्न हीरमणी, ।
लीन निरंतर चरणीं, वंद्य नसे काय मोहिनी रमणी? ॥ १८
मंजीर[14]शिंजितें मीं रंजवितें राजयोगिरायातें ।
स्त्रीचरित विदित असतां सहस्त्रनयन न शिणो गिरा यातें.' ॥ १९
जीं जीं वाक्यें वदली तच्छतगुणितें सुरांगना[15] नटली, ।
पाहूनि सुरपतीच्या चित्तांतचि तत्क्षणीं निशा पटली. ॥ २०
मलयपवन कुसुमाकर[16] मित्रमुकुटमणि सहायकर जोडी, ।
ती सहसा साहित्यें गीतें संक्रंदनासि[17] कर जोडी. ॥ २१

---

१. कपटी. २. इंद्र. (जंभासुराचा वैरी.) ३. व्यग्रतेनें, व्याकुळ होऊन. ४. रंभा+ऊरु=केळीच्या गाभ्यासारख्या मांड्या आहेत जिच्या अशी. ५. रंभादिक अप्सरांचा व्यवसाय गाननर्तनादिक व्यापारानें देवांस संतुष्ट करणें, आणि देवांचा राजा इंद्र याला कोणाच्या तपश्चर्येचें भय पडलें असतां, त्याच्या आज्ञेनें त्या तपस्विवर्यास भुलवून तपोभंग करणें, असा वर्णिलेला आहे. ६. आदर करून. ७. मर्त्यलोकांत, पृथ्वीवर. ८. कोळी, धिवर. ९. इंद्राचे पाय. (निर्जरांत–देवांत जे वर–श्रेष्ठ त्यांचा ईश–स्वामी) १०. सोनें. ११. भांग. १२. पाड. १३. सुवर्णमंडित. १४. तोरड्या, पैंजण इत्यादि पादभूषण (मंजीर) त्याच्या आवाजानें. १५. देवांगना. १६. वसंत. १७. इंद्राला.

पुरुहूताज्ञा वंदुनि रंभा भूमंडळीं शुकाजवळी ।
येऊनि गायनाचे फेरे मारुनि बहु निज माज वळी. ॥ २२
कुसुमाकरें रचुनि वनशोभासंपत्ति दाविली बरवी, ।
फलपुष्पसुरभिगंधित सभोंवतीं रम्य वाटिका हिरवी. ॥ २३
स्पर्शुनि कुसुमसमूहा मलयानिल तेथ भंवत आकाशीं, ।
मंद सुगंध सुशीतल लागे जाऊनि मुनिस नाकासी. ॥ २४
कारंडवकोकिलशुकहंसमयूरादिपक्षिनादानें ।
उद्यान हृद्य तेथें मर्त्योद्यानें अँवद्य नादानें. ॥ २५
परिमलजलकासारीं सुवर्णपद्मासभोंवते भ्रमती, ।
भ्रमर प्रमोदगुंजारवें शुकालागिं दावि संभ्रम ती. ॥ २६
आयास बहुत रंभा करितां योगी नव्हेचि तो जागा, ।
कां पुनरावृत्ति करी ज्याला संप्राप्त होय तो जागा. ॥ २७
अयुतदलसुपंकजगत वायु निरोधूनि आत्मलाभानें, ।
पूर्ण सुखी मग कोठुनि देहेंद्रियजन्य त्याजला भानें? ॥ २८
जे रँजनी विश्वाची तेथें तो योगिराज जागतसे, ।
त्या द्रष्ट्याची रजनी तेथें हें भूतजात वागतसे. ॥ २९
ब्रह्मानंदसमुद्रीं निमग्न जो जाहला दिवारजनी, ।
त्या लाभाहुनि त्याला बोलें बोलाल काय सार जनीं? ॥ ३०
यत्न विफलचि विलोकुनि शुकतनुवरि चैलँपल्लवें वारा ।
घाली, चळे न तो मग, मानी रंभा वृथा स्वपरिवारा. ॥ ३१
ती ब्रह्मनिष्ठितातें स्पर्शून करें बळेंच हालविते, ।
आनंदनिर्भराच्या वृत्त्यमृतीं कालकूट कालविते. ॥ ३२
स्पर्श करिल हरिमाया यास्तव उदरांत जननिच्या बारा ।
वत्सर वसे तपस्वी रंभेचा त्यास काय परि वारा? ॥ ३३
वर्षें द्वादश होतां श्रीहरि जामीन देउनी व्यासें ।
बाहेर आणिला जो तो रंभेच्या भ्रमेल हव्यासें. ॥ ३४

---

१. इंद्राची आज्ञा. २. मलयपर्वतापासून येणारा अनिल (वायु). ३. रमणीय. ४. क्षुद्र. ५. रात्र. ('या निशा सर्वभूतानाम्' इत्यादि भगवद्गीतांतर्गत श्लोकाचा यास आधार आहे. भगवद्गीता—अध्याय २ श्लोक ६९.) ६. प्राणिसमूह. ७. वस्त्राच्या पदरानें. ८. आपल्या साहाय्यकर्त्या जनाला. ९. भयंकर विष. १०. हा शब्द आरबी आहे.

परतोनि शुका पाहें या व्यासोच्चस्वरासि ओ देती ।
सकलवनस्पति तेणें सह रंभा काय करुन मोदे ती. ॥ ३५
तीच्या दुराग्रहास्तव समाधि सोडूनि लागला बोलूं, ।
यानंतर दोघांचे परस्परें स्पष्ट बोल ते बोलूं. ॥ ३६
'कोठील कोण तूं? कां येथें येणें किमर्थ सांगावें? ।
मी दीन तापसी; मजपाशीं येऊनि फुकट कां गावें?' ॥ ३७
'शृंगारमूर्ति रंभा सुरलोकीं मान्य देव[1]रायातें, ।
आलें स्वामींस्तव मी, आज्ञा मज आजि दे वरायातें.' ॥ ३८
'स्त्रीलब्धि[2]लुब्ध असतों तरि कां मी बायि[3]ला वनीं वसतों? ।
संसारसुखीं ठसतों तरि कां मी बायिला जनीं बसतों? ॥ ३९
हरिहरविधि संसारीं रमती कांतां[4]सवें महा ज्ञानी, ।
स्त्रीसंभोगाविण सुख अन्य वदावें स्मरूनि सुज्ञानीं. ॥ ४०
प्रापंचीं सुख असतें तरि कां योगी वनांतरीं बसती? ।
स्त्रीस विसर्जुनि फसती, तरि कां एकांत सेवुनी वसती? ॥ ४१
अतिविमलतरल[5]हारा हरिणाक्षी वृत्त[6]पीनकुचभारा. ।
संभोगाविण संसृ[7]ति ये त्याचा व्यर्थ देहभव सारा. ॥ ४२
मांसासृ[8]ङ्मज्जास्थीसांकर्यें व्याप्त जो मळें मूत्रें, ।
त्या देहातें स्तविसी रंभे! जो बद्ध नाडिकासूत्रें. ॥ ४३
मर्त्यस्थलोकवनितेपरि दुर्गंधी कशी रिघे नाकीं? ।
उदर विदारुन दाविन कुंकु[9]मकस्तूरिगंध घे नाकीं. ॥ ४४
माते! द्वादशवर्षें भोगियली येथ मातृ[10]उदरदरी, ।
हें ठावें असतें तरि आलों असतों तुझेचि कीं उदरीं.' ॥ ४५
हें वाक्य ऐकतेक्षणिं, रंभा लागे शुकाचिये चरणीं, ।
'स्वामी! क्षमा करावी, प्रवर्तल्यें व्यर्थ कीं दुराचरणीं.' ॥ ४६
यापरि विनवुनि मुनितें खिन्नमुखी जाय श[11]क्रसदनासी, ।
मुनि सहज समाधिसुखीं स्थिर झाला दमुनि दुष्ट मदनासी. ॥ ४७

---

१. इंद्रातें. २. स्त्रीच्या प्राप्तीस्तव आसक्त. ३. बायल्या, बाइक्या, स्त्रीबुद्धि. ४. भार्यांसवें. ५. चंचल. ६. वृत्त=वर्तुलाकार, पीन=पुष्ट. ७. संसार. ८. असृक्=रक्त. ९. केशर. १०. आईचें पोट हीच एक खोरी. ११. इंद्राच्या गृहाला.

**भा**गवतादिपुराणीं **शुक**देहोत्पत्ति विविध बोलियली, ।
ते विबुधांप्रति ठावी, मी आयकिली तशीच हे लिहिली. ॥ ४८
श्रीमन्नृसिंहचरणीं **शुकरं**भावाद अर्पिला [1]भावें, ।
**वि**ठ्ठल म्हणतो, '**गं**गोदक तें **गं**गेसि काय लाभावें?' ॥ ४९

---

## सीतास्वयंवर.

### सर्ग पहिला.

(श्लोक.)

[2]श्रीमन्मंगळमूर्ति तूं सुमति दे पूर्ति **रा**घवकीर्ति सुकीर्ती,
ते मी गाईन गाणीं साक्षी पूराणीं अद्भुत आणी रस वाणीं, ।
बोधी चित्त जनाचें मंडण साचें सुरसाचें
विघ्नें सर्व निवारीं मजला तारीं ये अवतारीं. ॥ १
[3]**श्रीगण**नायक सिद्धिविनायक मंगळदायक मंगळमूर्ती,
स्फूर्तिवरप्रद **जा**न्हविचा ह्रद एक [4]सितच्छदभापरिपूर्ती, ।
भूषणमंडित दुंदिल पंडित [5]शुंडअखंडितदंडितदंदी,
को[6]कनदासन मूषकवाहन विश्वविमोहन **वि**ठ्ठल वंदी. ॥ २
[7]प्रणमित जगदंबे! कल्पवल्लीकदंबे!
कवि तुज न विसंबे, प्रेम पोटीं [8]झळंबे, ।
मजवरि जरि अंबे! त्वत्कृपादृष्टि [9]तिंबे,
तरि रस अविलंबे काव्यसाहित्य बिंबे. ॥ ३
[10]शांता श्रीगुरु रत्नपीठभुवनीं चिद्रत्नसिंहासनीं,
हस्ताब्जीं वरदाभयें प्रियतमाशांति क्षमा आसनीं, ।
सालंकार उदार पुस्तक पुढें शिष्या प्रबोधीतसे,
वाक्यें [11]तत्त्वमसीति **वि**ठ्ठलकवी साष्टांग वंदीतसे. ॥ ४

---

१. भक्तीनें. २. या श्लोकाचें वृत्त कळत नाहीं. बहुधा हें पद असावें व याचीं आणखी कडवीं असावींत. जोंपर्यंत दुसरीं कडवीं मिळत नाहींत तोंपर्यंत पदाची चालही सांगणें कठिण. ३. मदिरा छंद. ४. हंसासारिख्या शुभ्रकांतीनें पूर्ण. सितच्छद=हंस. (सित=पांढरे आहेत च्छद=पक्ष ज्याचे ते) ५. शुंडेनें निरंतर दंडिले उन्मत्त ज्याणें असा. ६. रक्तकमल आसन ज्याचें असा. ७. मालिनी छंद. या पद्यांत 'बे' याची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून अनुप्रासालंकार येथें आहे. ८. चिकटे. ९. सांठवे. १०. शार्दूलविक्रीडित छंद. ११. तत् त्वम् असि=तें तूं आहेस—हें वेदांतांतील मुख्य वाक्य.

[1]भरद्वाज वाल्मीकिचें काव्य शोधी, विधाता स्वयें नारदातें प्रबोधी; ।
महादेव आख्यान सांगे भवानी, रिझे वासुकी शेष तो चक्षुकानीं. ॥ ५

या ग्रंथीं प्रतिपाद्य सत्कविऋषी छंदादिनानाविधें,
सीता सादृश देवता भगवती ज्या सर्वदा सन्निधें, ।
[2]गंबीजादिप्रशक्ति[3]कीलक [4]धरापुत्री प्रयोगांतरें
जाणावाचि नियोग विठ्ठल म्हणे पद्यें जपा आदरें. ॥ ६

मेघश्याम [5]अनंगधाम चपला सीता भजावी बुधीं,
चौंहातीं वरदाभयें प्रतिधनुर्बाणीं क्रमें आयुधीं, ।
आत्माराम समस्त काम पुरवी वाचे सदां गाइजे,
सालंकार उदार हास्य हृदयीं सद्विठ्ठलें ध्याइजे. ॥ ७

यंत्रोद्धार किजे, त्रिकोण लिहिजे, श्रीराम बिंदुस्थळीं
मांडावा, भरतादि दक्षिणदिशे संस्थापिजे मंडळीं, ।
शत्रुघ्ना [6]श्रुतकीर्तियुक्त [7]यजिजे वामांगभागोत्तमीं,
पूर्वे लक्ष्मण[8]ऊर्मिळा दशदिशा दिक्पाळ मंत्रागमीं. ॥ ८

[9]न जाणें मी छंदें, विशद यमकें बंधरचना,
न जाणें मी काव्यें [10]नवरस अलंकारसुचना, ।
वि[11]भक्ती मी कोशादिक न समजें नाटक निकें,
मराठी हे वाणी, नसति [12]अभिधानें सुरसिकें. ॥ ९

मराष्ट्रें होत्सातें [13]चतुरजनिं हें मान्य करिती,
मनाच्या उल्हासें रचिन तरि मी नाटकरिती, ।
टिका मूळाधारें प्रथम धरिली संस्कृत कथा,
सभेमध्यें श्रोते परिसतु महाराष्ट्र [14]उलथा. ॥ १०

होता[15] पद्माक्ष राजा तप करित बहू, [16]श्री [17]सुता होय जेणें,
लक्ष्मी स्वप्नांत सांगे 'हरिभजन करीं' प्रार्थिला विष्णू तेणें; ।

---

१. भुजंगप्रयात छंद. २. मंत्रादिकाचें जें बीजाक्षर तें. ३. खिळा, मेंढ. ४. अयोनिजा. (सीता.) ५. कामाचें गृह. ६. शत्रुघ्नाची स्त्री. ७. पुजावें. ८. लक्ष्मणाची स्त्री. ९. शिखरिणी छंद. १०. शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, शांत, असे नव रस. ११. व्याकरणकोशादि. १२. शब्द. १३. ज्ञाता जनांत. १४. तर्जुमा. १५. स्रग्धरा छंद. १६. लक्ष्मी. १७. कन्या.

भूपाळें याग[1] केला, नृप सुर मिनले[2], मातुलुंगीं[3] निघाली,
देवां दैत्यां न लाभे, जनकजननि तैं संगरीं शांत झाली. ॥ ११
प[4]द्मावती नगर उद्धस झालियानें, यागीं प्रवेश करि वे[5]दवती भयानें, ।
गेलें[6] अरिष्ट मग तें करि वन्हिसेवा, भोगावया[7] मनिं भजे पति वासुदेवा. ॥ १२
कित्येक मास दिन सं[8]क्रमले तयासी, गेला दशानन पुढें शिवदर्शनासीं, ।
जिंतूनि वै[9]श्रवण ये उपविष्ट यांनीं[10] तों देखिली पुरिंत उद्धस राजधानी. ॥ १३
राजा पुसे, प्रकट सा[11]रण दूत सांगे, तेणें निशाचरपतिप्रति हर्ष जागे; ।
आला तितें वश करीन म्हणोनि शोनें[12] बोले समर्पक सुधावचनें निधानें. ॥ १४
दशग्रीव तीतें म्हणे, ‘चंचळाक्षी श[13]रच्चद्रबिंबानने ! यक्षसाक्षी, ।
कशी एकली कंठिशी रात्रिमानीं ? उठें चाल लंकेसि, बैसें विमानीं. ॥ १५

---

१. यज्ञ. २. मिळाले. ३. महाळुंगीचें झाड व फळ. विठ्ठलानें वेदवतीची उत्पत्ति महाळुंगांतून लिहिली आहे, पण पंतांनीं कमलांतून. (मंत्ररामायण—उत्तरकांड—गीति ८५, काव्यसंग्रह पृष्ठ १७४). ४. वसंततिलका छंद. ५. वेदवतीविषयीं वाल्मीकिरामायणांत (उत्तरकांड-सर्ग १७) भिन्न कथा आढळते. तिचा सारांश:—वेदवती ही कुशध्वज नामक ब्रह्मर्षीची कन्या. हिच्या मातेचें नांव मालावती. ही लक्ष्मीच्या अंशानें जन्मास आली. नित्य वेदाभ्यास करणाऱ्या कुशध्वजाची ही वाङ्मयी कन्या म्हणून हिचें नांव ‘वेदवती’ असें पडलें. आपला जामाता विष्णु असावा अशी इच्छा धरून यानें कन्येला देव राक्षस गंधर्व हे मागावयास आले असतां दिलें नाहीं; असें होतां होतां शंभु नामक दैत्याधिपानें आपल्यास वेदवती मिळत नाहीं यास्तव कुशध्वजास मारलें. तेव्हां तिच्या मातेनें पतीबरोबर सहगमन केलें. नंतर वेदवतीनें तपश्चर्या केली, तेव्हा ‘तूं पुढील जन्मीं विष्णुपत्नी होशील’ अशी आकाशवाणी झाली. पुढें ही गंधमादन पर्वतावर असतां रावण फिरत फिरत हिच्या आश्रमांत आला. त्यानें विचारल्यावरून तिनें आपला समग्र वृत्तांत त्याला सांगितला. कंदर्पशरपीडित रावणानें तिला वश करण्यासाठीं पुष्कळ लाडीगोडी केली, परंतु ती वळली नाहीं. नंतर तो तिला केंस धरून ओढूं लागला. तेव्हां तिनें संतप्त होऊन ‘तुझ्या वधार्थ मी अयोनिजा साध्वीरूपानें जन्मास येईन’ असा शाप दिला आणि अग्निप्रवेश केला. ही वेदवती पुढें दुसऱ्या जन्मीं जनकाच्या कुळांत सीता नांवानें जन्मास येऊन रामाची स्त्री झाली. रावणानें हिचें हरण केलें म्हणून हिच्या निमित्तानें रामानें युद्ध केलें. त्यांत रावण मरण पावला. विठ्ठलाच्या काव्यांतील कथाभाग आणि येथें वर सांगितलेला सारांश यांत बराच भेद आहे. या संबंधें पंतांचीं संस्कृत व मराठीं मंत्ररामायणें—उत्तरकांड, अनुक्रमें पृष्ठ २४३-४४ श्लोक २२२-२३७ (काव्येतिहाससंग्रह) व पृष्ठ १७४ गीति ७७-८८ (काव्यसंग्रह) पहा. तसेंच महाकविक्षेमेंद्रप्रणीत दशावतारचरित (श्रीरामावतार, श्लोक ६२-६७) पहा. ६. ‘गेले समस्त मग ते’ असाही पाठभेद आढळतो. ७. ‘पावावया पति भजे मनिं वासुदेवा’ असाही पाठ आढळतो. ८. गेले. ९. कुबेर. १०. पुष्पकविमानीं उपविष्ट (बसलेला). ११. या नांवाचा एक दूत. १२. चांगलें. (‘सुधावचन’ या शब्दाचें विशेषण.) १३. शरत्कालच्या चंद्रबिंबासारखें आहे आनन (मुख) जिचें ती.

ऐशीं सहस्र वनिता मज रावणासीं, तूं होय त्यां मुखरणी मणिभूषणासीं; ।
मंदोदरीप्रमुख होतिल सर्व दासी तूं वंद्य जेंवि कनक[1] प्रिय पारदासी[2].'॥ १६
म्हणे काय पद्मालया[3] रावणातें, 'अरे दुर्मदा! नेणसी आपणातें, ।
न इच्छीं कदां माझिया आभिलाषा, विषाची तुला काय वाटे पिपासा[4]?' १७
धराया दशग्रीव जों झेंप घाली, असें वाक्य बोलोनि यागीं निघाली, ।
मखाग्नीस मंत्रोदकें शांत केलें, तदा[5] रत्न संप्राप्त झालें निमोलें. ॥ १८
विमानीं बसे घातिलें रत्न पेटीं जवें जाय मंदोदरीलागिं भेटी, ।
दशग्रीव लंकापुरी शीघ्र सेवी, रमारत्न देव्हारचौकींत[6] ठेवी. ॥ १९
पुढें कोणिएके दिनीं रात्रिमानीं प्रियायुक्त एकांतभोगावसानीं[7], ।
प्रसंगें निघाली कथा गोड लागे, दशग्रीव मंदोदरीलागिं सांगे. ॥ २०
'कुबेरासि जिंतूनि येतां विमानीं, पुढें वोस[8] म्यां देखिली राजधानी, ।
महीपाळ पद्माक्ष पद्मावतीचा, तयाची सुता रूपरेखा रतीचा. ॥ २१
मखांतूनियां मातुलुंगीं निघाली, तयेतें भली वासना पाश घाली, ।
सुरां दानवां घोर संग्राम झाला, प्रसंगीं तया भूप युद्धीं निमाला[9]. ॥ २२
पुढें तेस्थळीं काळ कित्येक होती, करी वन्हिसेवा प्रिया रत्नजोती, ।
नव्हे वश्य ते अग्निकुंडीं निघाली, तितें शोधितां रत्नसंप्राप्ति झाली. ॥ २३
पुढें रत्ननिक्षेप[10] पेटींत केलें, घरा आणिलें, काळ कित्येक गेले; ।
तुतें भूषणायोग्य तें रत्न आहे, उठें जाइं देव्हारचौकीस पाहें.' ॥ २४
निरीक्षावया[11] राजपत्नी निघाली, पदीं पादुका, चालिली हंसचाली, ।
गृहामाजि देव्हारचौकीस आली, करीं घे, तदा पेटिका जाड्य झाली. ॥ २५
मंदोदरी उचलितां नुचलेचि पेटी, सांगावया परतली दशकंठभेटी. ।
विज्ञापना करि, म्हणे, 'तुम्हिं विघ्न मोठें हें आणिलें निजगृहा, परि कर्म खोटें. ॥ २६
माता पिता सुहृद गोत जिच्यानि योगें झाले हताहत सुरासुर कर्मभोगें; ।
आली परंतु इचि निर्गति[12] शीघ्र देखा, होणार ते अढळ भाविनि कर्मरेखा.' ॥ २७
लंकेश विस्मय करी भयचित्त कांक्षी[13], पेटी किमर्थ नुचले कमलायताक्षी[14]! ।
मी आणितों प्रियतमे! म्हणतेसि काय?' देवालयांत मग रावण शीघ्र जाय. ॥ २८

---

१. सोनें. २. पान्यास. ३. लक्ष्मी. ४. प्राशन करण्याची इच्छा. ५. 'तदां शोधितां रत्न संप्राप्त झालें' असाही पाठ आढळतो. ६. देवघराच्या कोठडींत. ७. शेवटीं. ८. ओसाड, विध्वस्त. ९. मरण पावला. ही जन्मकथा कदाचित् अद्भुतरामायणांत असेल. १०. ठेवणें. ११. पाहण्यासाठीं. १२. बाहेर जाणें. १३. संशयी. १४. कमळासारखे लांब डोळे जिचे ती.

उचली[1] **द**शकंधर त्या नुचले, जड मांदुस[2] यत्न कदा न चले; ।
**म**यजा[3] मग काय म्हणे, 'नृपती! अभिवंदुनि[4] ईस करा विनती'. ॥ २९
**द**शकंठ तितें प्रणिपात[5] करी, उघडी मणिमांदुस याउपरी; ।
अतिसुंदर त्यांत कुमारि असे, समतेशि दुजी भुवनांत नसे. ॥ ३०
वयें पूर्ण षण्मास **लं**केस देखे, तुळेना तिशीं **पा**र्वती रूपरेखे, ।
विलोकूनि **मं**दोदरी स्तब्ध झाली, पुन्हा मांदुसेमाजि साशंक घाली. ॥ ३१
म्हणे काय **मं**दोदरी **रा**वणातें, 'तुम्हीं विघ्न हें आणिलें आपणातें, ।
इला येस्थळीं सर्वथा नेठवावें[6], पवित्रा स्थळा आणखी पाठवावें.' ॥ ३२
नृपें दूत पाचारिले त्यांसि सांगे, 'कुमारीस नेणें तुम्हांलागिं लागे, ।
तुम्हीं न्या इतें शीघ्र **वै**देहदेशीं, महीमाजि निक्षेपिजे साक्षपेशीं.' ॥ ३३
हळू झाली पेटी, गण उचलितां ते उचलली,
पुढें नेतां पंथीं ध्वनिं गगनिं [7]गो काय वदली, ।
म्हणे, 'आतां जातें पुनरपि मि येईन कुमती !
तुझ्या तेव्हां वंशा क्षय करिन **लं**कापुरपती !' ॥ ३४
**द**शग्रीवें शंका हृदयकमळीं पूर्ण धरिली,
गणीं पेटी नेली, मग **ज**नकदेशांत पुरिली; ।
पुढें होती पेटी दिन बहुत भूमींत, उपरी,
सभे आला आशीर्वचन **ज**नका ब्राह्मण करी. ॥ ३५
विप्रातें नव भूमिदान **ज**नकें संकल्पिलें[8] त्या द्विजा,
तासीं[9] नागर जुंपिला, मनिं म्हणे, 'पेरीन नाना बिजा.' ।
प्रारंभीं हळदंति[10] त्या अडकली पेटी समुत्पाटली[11],
देखे ब्राह्मण तो निघे प्रभुप्रती आणी, सभा दाटली. ॥ ३६
राजा म्हणे, 'द्विजवरा ! क्षितिदान[12] केलें, तें घेइजे तरि पुराकृत[13] पुण्य गेलें. ।
क्षेत्रीं धनादि तितुकें तुमचें दयाळा ! हें[14] आइकें.' द्विज म्हणे, 'परिसें नृपाळा!' ॥
'दिल्हें क्षेत्र तेव्हां न संकल्प केला, तुझ्या गुप्तवित्ता नसें मी भुकेला; ।
कृषी[15] आमुची, हें तुझें द्रव्य राया ! धनाचा मला लोभ नाहीं पुरा या. ॥ ३८

१. तोटक छंद. २. पेटी. ३. मयासुराला हेमा नामक देवांगनेपासून झालेली दुसरी कन्या मंदोदरी. ४. नमस्कार करून. ५. नमस्कार. ६. न ठेवावें. ७. वाणी. ८. 'संकल्पुनी दे द्विजा' असाही पाठ आहे. ९. नांगरण्याविषयीं. १०. हलाच्या (नांगराच्या) फाळांत. ११. फुटली, उपडली. १२. पृथ्वीदान. १३. पूर्वीं केलेलें. १४. 'हें ऐकुनी' असाही पाठ आहे. १५. शेतकी.

महाथोर संकष्ट रायासि झालें, प्रधानांसि राजा म्हणे, 'विघ्न आलें, ।
धना ब्राह्मणाच्या न आम्हासि घेणें, विचारूनि सांगा निकें[1] होय जेणें.'॥३९

जनक परम पुण्यश्लोक[2], त्यातें प्रधानीं
दृढमति विनवीलें, 'आमुचे शब्द मानीं, ।
उघडुनि अवलोकीं काय पेटींत आहे.'
तदनुमतविचारीं भूपती स्वस्थ राहे. ॥ ४०

उघडित मग पेटी त्यांत पंचाब्दकन्या[3],
कुसुमधनुषमूर्ति[4] ब्रह्मरूपा सुधन्या; ।
त्रिभुवनजनित्याचें तें शिरोरत्न भासे,
जनक नयनपद्मीं चित्र देखोनि हांसे. ॥ ४१

[5]संतोषला ब्राह्मण देखिली सुता, दे देव, आशीर्वचनासि मागुता; ।
राजा म्हणे, 'हे दुहिता दिल्ही भवें[6],' दानें द्विजांतें करि भूप वैभवें. ॥ ४२

तोरणादि[7] मखरें उभारिलीं, गोधनें द्विजवरांसि वांटिलीं; ।
दुंदुभी[8]प्रमुख वाजती तुरें[9] शोभलीं लखलखीत गोपुरें[10]. ॥ ४३

[11]राजा पवित्र जनकाहुनि कोण आहे? ज्ञानी दयाळु दुसरा उपमा न साहे. ।
देहीं असोनि जन त्यासि म्हणे [12]विदेही, द्वारीं शुकादिक उभे सुरें[13] सिद्ध तेही.॥
दिसेंदीस संवर्धमानासि पावे, सुलावण्यसिंधूसि तारुण्य धांवे; ।
अकस्मात ये राम[14] षष्ठावतारी[15] महर्षीसवें नारद ब्रह्मचारी. ॥ ४५

[16]भाट अचाट पुढें गुण वर्णिति, गौरविले जनकें क्षितिपाळें,
होय महोत्सव त्या मिथुळापुरिं[17], नांदति लोक सुखी चिरकाळें. ।

---

१. खरें. २. ज्याचे नामस्मरणानें पाप जातें तो; ज्याची कीर्ति (श्लोक) पवित्र (पुण्य) आहे तो. ३. पांच वर्षांची कन्या. (अब्द=वर्ष.) ४. कुसुमधनुष्यासारखी (मदनासारखी) मूर्ति जिची अशी. ५. इंद्रवंशा छंद. ६. महादेवानें. ७. रथोद्धता वृत्त. ८. नगारा. ९. तूर्यं, वाद्यें (मृदंगादिक, तालादिक, वंशादिक आणि वीणादिक अशीं चार प्रकारचीं.) १०. पुरद्वारें—शहराचे दरवाजे. ११. वसंततिलका वृत्त. १२. सूर्यवंशीय इक्ष्वाकुराजाचा पुत्र निमि याला 'तुझा देह पतन पावेल' असा वसिष्ठानें शाप दिला. त्याप्रमाणें त्याचें देहपतन झालें. तेव्हांपासून पुढें झालेल्या निमिवंशजांस 'विदेह' असें नांव पडलें. या निमीचा पुत्र मिथि हा केवळ जनकाच्या देहापासून झाला. यांत मातेचा संबंध नव्हता. त्याचें 'जनक' हेंही नांव पडलें. १३. देव. १४. परशुराम. १५. विष्णूच्या मत्स्यकूर्मादि दहा अवतारांपैकीं परशुराम हा सहावा अवतार त्रेतायुगांत झाला. याचा बाप जमदग्नि ब्राह्मण आणि माता रेणुका क्षत्रिया म्हणून याच्यामध्यें ब्राह्मण आणि क्षत्रिय अशीं दोन्ही तेजें होतीं. १६. सवाई वृत्त. १७. मिथिराजानें बापाचें वैजयंत म्हणून नगर होतें तें आपली राजधानी केली, तेव्हां राजाच्या नांवावरून वैजयंत नगराला 'मिथिला' असें नांव पडलें.

दु:ख दरिद्र जरामरणादिक रोग नसे, सुकृति प्रतिपाळी,
नर्तन कीर्तन सौख्य घरोघरिं नागरिकांप्रति नित्य दिवाळी. ॥ ४६
**भा**र्गवराम तथा मुनि **ना**रद ते **ज**नकाप्रति भेटिस आले,
बैसविले मुनि विष्टर[1] देउनि आदर देखुनि साधु निवाले. ।
पूजन भोजन गंधविलेपन वंदन सांग यथाविधि केलें,
षोडश[2] त्यां उपचार करी स्तुति भूप म्हणे, 'निजभाग्य उदेलें.' ॥ ४७
संतोषला **प**रशुराम म्हणे, 'नृपाळा! पाहों तुझी कुमरि लक्षणयुक्त बाळा.' ।
'आणा' वदे नृप म्हणे परिचारिकांसी[3] तों ते सख्यांसहित खेळतसे विलासी. ४८
सख्या पांचशें त्यांसवें ते निघाली, पुढें चाप देखोनियां स्तब्ध झाली; ।
तिनें शीघ्र केलें धनुर्दंड घोडें, वरी बैसवी नाचवी लाडकोडें[4]. ॥ ४९
देखोनिया **प**रशुराम मनीं निवाला, अंकावरी बसविली, शिकवी नृपाळा; ।
'हे तों नव्हे तव सुता, बुझि[5] **आ**दिमाया[6] भाग्योदयें प्रगटली त्रिजगांत राया!'
राजा म्हणे, 'न धरिजे मनिं कोप कांहीं, अज्ञान बाळक इला गुणदोष नाहीं; ।
केलें इनें तव शरासन[7]वज्र घोडें क्रीडा करी तुजपुढें बहुलाडकोडें.' ॥ ५१
**प**रशुराम करी **ज**नकीं कृपा, 'धनुष ठेविं' म्हणे 'सदनीं नृपा! ।
गुण[8] शरासनिं योजिल जो इला, वरिल' हा पण दारुण बोलिला. ॥ ५२
तो गेलिया **ज**नक काय म्हणे प्रधाना, **सी**तास्वयंवर किजे, वचनार्थ माना. ।
तों ते पुरोहित वदेति, 'करा अनुज्ञा[9].' हें मानलें अमृतवाक्य विशेष सुज्ञा. ॥ ५३
पत्रें कुंकुममंडितें लिहुनियां दूतां दिल्हीं भूभुजें[10],
आणा भूतळिंचे नरेंद्र तितुके संगें स्वगंत्रीं[11] बुजें[12], ।
स्वर्गींचे सुर सिद्ध सप्ततळिंचे[13] **शे**षादि राजे मुनी
**वि**श्वामित्र समागमें द्विज ऋषी घेवूनि या वंदुनी. ॥ ५४
राजाज्ञा मुकुटीं[14] तुरंबुनि[15] गणीं गंतव्य केलें असे,
पत्रें कुंकुममंडितें तिहिं दिल्हीं ज्या ज्या स्थळीं जो वसे; ।

---

१. आसन. २. सोळा उपचारांचीं नांवें येणेंप्रमाणें आहेत:—'आसनं स्वागतं पाद्यमर्घ्यमाचमनीयकम् । मधुपर्काचमस्नानं वसनाभरणानि च ॥ गंधपुष्पे धूपदीपौ नैवेद्यं वंदनं तथा ॥.' ३. दासी. ४. आवडीनें, कौतुकानें. ५. समज. ६. ईश्वराची शक्ति जिच्या योगानें हा सर्व प्रपंच होतो ती, आदिशक्ति, भवानी. ७. धनुष्य (शर+असन=ज्याच्या योगें शर (बाण) फेंकतात तें. असन=फेंकणें.) ८. दोरी. ९. आज्ञा, हुकूम. १०. राजानें. (भूचा भोग घेणारा—भूभुक्.) ११. आपल्या स्थानीं. १२. निघें. १३. सात पाताळांतील भूमीच्या अधोभागीं जे सात बिलस्वर्ग—अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, आणि पाताल—आहेत त्यांस सप्तपाताल म्हणतात. १४. मस्तकीं. १५. हुंगून, मान्य करून.

गांवीं पुत्र[1] नसे तयास्तव नये राजा अयोध्यापती,[2]
 आले त्या व्यतिरिक्त सर्व नृपती ऐसी कथा सन्मती. ॥ ५५
लंकेशें शुक[3]सारणांस वसुधा पाहावया धाडिलें,
 ते दोघेजण हिंडती तंव तिहीं आश्चर्य हें देखिलें; ।
तीहीं जाउनि रावणासि कथिलें तो चालला आदरें,
 बैसे पुष्पकवाहनीं मग निघे निर्मूळ सीतास्वरें. ॥ ५६
तेजःपुंज विमान पुष्पक फुलीं वेष्टीत मुक्तावळी,
 रत्नस्तंभ खणोखणीं घणघणा वाजेति घंटावळी, ।
बैसाया स्थळ तें मनोमय पुरे रात्रौ मृगांका[4]परी,
 भू स्त्री हारमणी दिवा दिनमणी उद्बोध जैसा करी. ॥ ५७
रघु[5]नाथकथा बहु नेटकि जे, भजकां सुखदायक पाठ किजे, ।
रसवृद्धि समृद्धि धनासि करी अनुपम्य सुधा[6]रविची लहरी[7]. ॥ ५८
वाणी पवित्र रघुनाथचरित्र गातां तें आइका, पतित[8] पावन होय आतां; ।
हे पंडितांस विनती करणें न लागे, 'घ्याहो ! सुगंध' मधुपाप्रति कोण सांगे ?॥ ५९
धान्याचे बहु ढीग सत्य वरुते त्री त्यांतळीं मांडणें,
 पूर्वी पुस्तक पूजणें शकुन पैं त्यानंतरें पाहणें, ।
तीं ठायीं तिन पोफळें वरि फुलें चिंतूनियां ठेवणें
 आदौ सर्ग तथा दशा दशकिंचा श्लोक क्रमें देखणें. ॥ ६०
श्रीमज्जानकिचें स्वयंवर कथा उत्पत्ति सांगीतली,
 रामें[10] उद्धरिली शिला[11] पदरजें जे बोलणें लागली, ।
वक्ता सत्कविराज विठ्ठल म्हणे सौभाग्यदायी कथा,
 इच्छेतें पुरवील सर्ग पहिला, [12]श्लोकार्थ घ्या, नान्यथा[13]. ॥ ६१

---

१. राम. २. दशरथ. ३. शुक आणि सारण हे रावणाचे अमात्य. ४. चंद्र. ५. तोटक वृत्त. ६. अमृतरूप सूर्याची. ७. लाट. ८. पापी. ९. हा चरण सुभाषितरूप आहे. १०. 'मार्गी उद्धरिली शिळा रघुवरें तें बोलणें लागलें' असा अन्य पाठ आहे. ११. गौतमाच्या शापानें शिळा झालेली त्यांची पत्नी अहल्या. १२. 'भावार्थ' असाही पाठ आहे. १३. या प्रथम सर्गास 'जानकीसंभवकथा' असें नांव एका हस्तलिखित प्रतींत आढळतें.

## सर्ग दुसरा.

(श्लोक.)

[1]**द**शरथाप्रति येउनि **कौ**[2]शिकें वचन मागितलें पहिलें निकें, ।
'[3]अजसुता ! **र**विवंशविभूषणा **र**घुपतीस दिजे [4]मखरक्षणा.' ॥ १
मग **व**सिष्ठ म्हणे, '[5]अजनंदना ! पुरविजे मुनिची मनकामना.' ।
नृपतिनें हृदयांत विचारिलें, शिकविलें गुरुचें प्रतिपाळिलें. ॥ २
**र**घुपती दिधला मुनिकारणें [6]सह**सु**मित्र दुजा अवधारणें, ।
मग नरेंद्र म्हणे, 'ऋषि**कौ**शिका ! उभयतां प्रतिपाळ किजे निका.'॥३
[7]त्रिजगमित्र मुनी मनिं तोषले, मग तिघे वहनावरि बैसले. ।
[8]रणतुरें करिती घन गर्जना, '[9]कंदनिं **रा**घव मर्दिल दुर्जना.' ॥ ४

[10]**वि**श्वामित्रऋषीश्वरें **द**शरथा प्रार्थूनि आराधिलें,
याागा रक्षण **रामल**क्ष्मण सवें तेणें मखा आणिले. ।
शस्त्रास्त्रें उपदेशिलीं मुनिवरें **रा**मा **सु**मित्राप्रती,
दोघे बंधु विराजमान सरिसे एकासनीं शोभती. ॥ ५
मार्गी मारुनि [11]**ता**टिकेप्रति शरें, केला **सु**बाहू पुरा,
**लं**काप्राप्ति **म**रीचिला करुनियां संरक्षिलें [12]अध्वरा. ।
ते काळीं **मि**थिलेंद्र[13]दूत जवळी सिद्धाश्रमा पातले,
केलें मस्तक नम्र, पत्र दिधलें, दोघे उभे ठाकले. ॥ ६
वाची कुंकुमपत्र **कौ**शिकमुनी, **रा**म स्वयें आइके,
ते अर्थी मुनि रोविला पृथिविचे भूपाळ येती निके; ।
'स्वामीनें ऋषि सर्व घेउनि धनुर्यागा त्वरें येइजे,'
तेकाळीं परमादरें मुनिवरें **रा**माप्रती बोलिजे. ॥ ७
'आम्ही जात असों स्वयंवरसभा पाहावयाकारणें,
[14]राजाज्ञा नसतां तुम्हांसि **मि**थिळे नेऊं नये आपणें; ।
आतां जा **श**रयूतटाप्रति तुम्हीं, आम्हांसि आज्ञा दिजे,'
ऐसें उत्तर आइकोनि विनती श्री**रा**मचंद्रें किजे. ॥ ८

---

१. द्रुतविलंबित वृत्त. २. विश्वामित्रानें. ३. दशरथा. (हा अजराजाचा पुत्र.) ४. यज्ञसंरक्षणासाठीं. ५. हे दशरथा. ६. लक्ष्मणासह. ७. 'त्रिजगन्मित्र' असा समास व्हावयाचा, पण तसा केला नाहीं. ८. रणवाद्यें. ९. युद्धांत. १०. शार्दूलविक्रीडित वृत्त. ११. ताटिका ही सुकेतु नामक यक्षाची कन्या. हिच्या पतीचें नांव सुंद. याजपासून हिला सुबाहु आणि मारीच असे दोन पुत्र झाले. १२. यज्ञा. १३. जनकराजाचे दूत. १४. दशरथाची आज्ञा.

'भूमंडळींचे क्षितिपाळ येती ते या प्रसंगीं मुनि! देखिजेती, ।
पाहूं चला कौतुक, बाध नाहीं, राजा न कोपे अणुमात्र कांहीं.' ॥ ९
ज्ञाता महर्षी हृदयीं विचारी, 'हा तारक ब्रह्म गुणावतारीं, ।
होणार तें तें न टळे स्वसंगें, रामासि आहे यश या प्रसंगें.' ॥ १०
रथारूढ वेगीं तिघे [1]स्वार झाले, ऋषींचे थवे चालती भोंवताले, ।
पुढें वाजती दुंदुभी शंख [2]भेरी, अनेकें तुरें आणि नाना नफेरी. ॥ ११
[3]कांताशिरीं सजळ कुंभ शुभ प्रयाणीं, होती पुढें शकुन [4]वायस सव्यपाणी, ।
जाती मयूर नकुलादि कुरंग मार्गें, [5]तैसेचि [6]तास हरिणीगण वामभागें. ॥ १२
**सौ**मित्र **राम** ऋषि भद्रवनासि आले, देखोनियां [7]विपिनं रम्य निवांत झाले. ।
छायासुशीतळकुशोपवनीं निवाले, केला रथ स्थिर, **र**घूत्तम मंद चाले. ॥ १३
वायू सुशीतळ सुगंधित मंद व्हावे, तो लागतां [8]तनुशि सौख्य महा दुणावे; ।
होती [9]कुहू कुहु [10]सुधारव कोकिलांचे, उत्फुल्लले नव कळे [11]अरुणोत्पळांचे. ॥१४

फुलित ललित वल्ली मालती पुष्पयाती,
　भ्रमरनिकर [12]गुंजोत्कारती, मंद भाती, ।
फळति सकळ [13]शाखी रोहिला **राम** देखा,
　**मि**थिळपुरिस दूरी योजनें पंच लेखा. ॥ १५

एकीकडे विपिन उद्वस **राम** देखे, तो त्या वनांत नवपल्लवता न देखे. ।
'हें किंनिमित्त?' **र**घुनाथ पुसे मुनींद्रा, संतोषला मुनि म्हणे, 'परिसें [14]महींद्रा! ॥

[15]उपहत वन, याचें भाग्य आतां उदेलें,
　परिससि **र**घुनाथा! भूत वर्तोनि गेलें.' ।
[16]विपिनकथन **वि**श्वामित्र **रा**मा निरोपी,
　त्रिभुवनपति गोष्टी होति अद्यापि [17]गोपी. ॥ १७

'हें तों **अ**हल्यावन नाम याचें **रा**मा! दिसे उद्वस **गौ**तमाचें, ।
आहे तपस्थानक शापजाळें विध्वंसिलें उद्धरिं शीघ्रकाळें.' ॥ १८

'**अ**हल्या कोणाची' **र**घुपति पुसे 'सद्गुरु! मला,
　कधीं सांगा कोणी कठिण तिजला शाप दिधला?' ।

---

१. सवार. (हा शब्द फारसी आहे.) २. नगारा. ३. बायकांच्या मस्तकावर. ४. कावळे. ५. 'तैसेचि ते हरिणिचे गण वामभागें' असाही पाठ आहे. ६. चाष. ७. अरण्य. ८. शरीराला. ९. कोकिळपक्ष्याचा स्वर. १०. अमृतासारखे मधुर शब्द. ११. कमळांचे. १२. गुंजारव करिती. १३. वृक्ष. १४. धरावीशा. १५. उद्वस्त. १६. अरण्याची गोष्ट. १७. गुप्त.

तया **वि**श्वामित्रें कृतयुगकथा [1]सांग कथिजे,
गुणीं आक[2]र्णाया क्षणभरि निकें मानस दिजे. ॥ १९

'अहल्या **ब्र**ह्म्याची बुज **र**घुपती ! मानससुता
तिच्या सौंदर्यासी सुरयुवति [3]सामान्य बहुता, ।
**वि**[4]रंचीनें केला पण कठिण, 'हे आत्मतनया
प्रदक्षणा भूमीची प्रथम करि जो देइन तया.' ॥ २०

**इं**द्रादि देव नर कि[5]न्नर दैत्य आले, एकापुढें पळत एक [6]जैवें निघाले. ।
हें कृत्य **गौ**तमऋषीप्रति श्रू[7]त झालें, तो चालिला मुनि पथीं [8]शकुनी निवाले. ॥

उभैतोमुखी [9]गौ पुढें प्राप्त झाली, म्हणे 'हेचि पृथ्वी' नमस्कार घाली. ।
करी सप्त आवर्तनें भोंवताला नमस्कारिलें, **ब्र**ह्मधामासि आला. ॥ २२

**वि**रंचीनें कन्या मुनिस दिधली नेमवचनें,
पुढें आला [10]**वृं**त्रासुरमथन देखोन नयनें, ।
म्हणे, 'कोठें होतां?' मग **वि**रिंचिनें तथ्य कथिलें,
न चाले **इं**द्राचें परि वि[11]भ्रम चित्तांत धरिलें. ॥ २३

कपट जाणितलें **क**मलासनें, मुनिस [12]सांगितलें **च**तुराननें, ।
'क्षण [13]इतें परतें न करीं कधीं, [14]ठकिल **इं**द्र इला, त्यजिशी तधीं.' ॥ २४

बहुत [15]वासर संक्रमले तिला, [16]**श**तमखें टपतां दिन साधिला; ।
परम पर्वणि सूर्य[17]परागिंची वि[18]शद पुण्यकथा परिसा तिची. ॥ २५

श्रीसूर्यग्रहणीं समेत [19]तरणी साधावया पर्वणी,
गेला **वै**[20]तरणीस **गौ**तममुनी स्नानास संतर्पणी. ।
मोक्षांतीं गृहिणीस पाककरणीं धाडी पुढें तेक्षणीं,
होता तो तरुणीस **इं**द्र टपणी तों पातला अंगणीं. ॥ २६

आला **गौ**तमरूप घेउनि गृहामध्यें उभा ठाकला.
मागे तीसें[21] रती, धरी मनगटीं, कामज्वरें [22]दोहिला; ।

---

१. संपूर्ण. २. समज. ३. 'माने न बहुधा' असाही पाठ आहे. ४. विधात्यानें. ५. कुबेरदूत. ६. वेगानें. ७. येथें वृत्तसुखार्थ 'श्रु' दीर्घ केला आहे. ८. पक्षी. ९. गाय. १०. इंद्र. (वृत्र नामक असुराचें मथन करणारा.) ११. 'कपट पोटांत धरिलें' असाही पाठ आहे. १२. 'जाणविलें' असाही पाठ आहे. १३. या अहल्येला. १४. ठकवील. १५. दिवस. १६. इंद्रानें. १७. पराग=ग्रहण. १८. स्पष्ट. १९. सूर्य. २०. नदी. २१. तिजपाशीं रतिसुख मागे. २२. 'व्यापिला' असाही पाठ आहे.

ते बोले, 'रति वर्ज दोष दिवसा, शास्त्रार्थ हा ठाउका,
　　स्वामी! केंवि तुम्ही अधर्म करितां? नेदी कदा भाउका.' ॥ २७

तो बोले, 'मृगशावलोलनयने[२]! सामर्थ्यवंतापुढें
　　दोषादोषविचार चार करिती नेणेति शास्त्रें, मुढे!।
कोपें भस्म करूं सके त्रिभुवना, त्या दोष कैं बाधिती?
　　शापाँनुग्रह[३] मी समर्थ, मजला ब्रह्मेंद्र आराधिती. ॥ २८

स्वक्षेत्रीं स्वमनोदयें विचरतां निर्दोष लोकीं असे,
　　आच्छादूं रविबिंब काय दिवसा? हें पाहसी लालसे!।
पाडूं दारुण अंधकार इतुका, अत्याग्रहो नाकिजे.
　　शास्त्रार्थीं तिस गोविलें, मग तिनें संभोग त्यातें दिजे. ॥ २९

इंद्रत्वा प्रगटी रतांतसमयीं देखे सती दुर्गती,
　　कंटाळूनि थरारिली, 'उठ' म्हणे 'पापात्मका! दुर्मती!।
दोघां शापिल ये क्षणीं कवण पैं वर्जी तपोवर्धना?
　　कापट्यें ठकिलें, कळंक मजला त्वां लाविला दुर्जना!' ॥ ३०

दोघांच्या सुरतप्रसंगसमयीं गुंफेसि[४] आला मुनी,
　　तो जाणे परगामिनी, मग म्हणे सक्रोध बाहेरुनी,।
पाचारी ऋषि, 'चोरटा कवण तूं? संभोगिली तीं[५] सती.'
　　आशंका[६] धरि पाँकशासन[७], तया दूषी अहल्या सती. ॥ ३१

'चांडाळा! निघ बाहिरी' झिडकिला; मार्जारवेषें दडे;
　　झाला कीटक इंद्रगोप[८] सहसा दृष्टीस जातां पडे.।
झारीचें जळ शिंपिलें मग पुढें केला उभा चोरटा,
　　बोले त्याप्रति, 'घातकी विषयता संपादिली वोखटा[९]. ॥ ३२

जेठायीं रमला तसीं तुज भगें होती सहस्रावधी[१०],
　　दोनी अंड झडो तुझी लुति गळो दुर्गंध हो मंदधी!।
आच्छादी मुख दाखवी पुनरपी तात्काळ हो शापितां
　　सर्वांगीं स्थिति बाणली सुरपती उःशाप नेघे भितां. ॥ ३३

---

१. कल्याणा. २. हरिणबालकांच्या सारखे चंचल आहेत डोळे जिचे अशी. ३. अनुग्रह=प्रसाद. ४. उटजांत. ५. त्वां. ६. भीति. ७. इंद्र. ८. सोनकिडा, ताम्रकृमि. ९. वाईट. १०. याच कारणास्तव इंद्राला 'सहस्रनयन' असें म्हणतात.

इंद्राचें युगदंडअंड गळतां ऐरावतें झेलिला,
तो माथां धरितां शतक्रतु पळे स्त्रीसीं ऋषी बोलिला, ।
'कां लत्ताप्रहरीं तया न दिधला? होई शिला येक्षिती,
तूं कैशी रमतां म्हणेसि पळ तूं दोघां ऋषी शापिती.' ॥ ३४
ते बोले, 'तुमचें स्वरूप धरिलें, शास्त्रार्थ वाखाणिला,
मी तों निष्कपटी, पदार्थ इतुका दैवें घडों आणिला.' ।
उ:शापा करुणानिधी[2] मग मुनी जल्पे सुधासौरसी,
'श्रीरामांघ्रिसरोजरेणु[3] जडतां पूर्वस्थिती पावशी.' ॥ ३५

होतां ऋषी गौतम पाठिमोरा, तात्काळ शापें मळरूप घोरा, ।
वर्षें शिळा साठिसहस्र झाली, कुंडाग्निनें पर्णकुटी जळाली. ॥ ३६

झाडिलें मग मृगासन तेणें शापिलें विपिन यास्तव एणें, ।
श्वापदें पळति वृक्ष जळाले, कोरडे नदि सरोवर झाले. ॥ ३७

परित्यागिलीं रम्य नीडें[4] पवित्रें, तरू शुष्क झाले समूळाग्रपत्रें. ।
न राहे वनामाजि मुंगी न मासी गतक्रोध वैराग्य ये गौतमासी. ॥ ३८
मेरुशृंगातें तपातें निघाला, ऐसा शक्रें[5] घातला त्यासि घाला, ।
पश्चात्तापें क्रोधशांत्यर्थ झाला, तोयस्पर्शें अग्नि जैसा विझाला. ॥ ३९

शांता रसाजवळि वीर कदा न राहे, सूर्योदया तिमिरें[6] देखुनि काय राहे? ।
धर्मापुढें दुरित[7] राहिल हें घडेना, श्री[8] आलियावरि दरिद्र जसें उरेना. ॥ ४०
म्हणे, 'म्यां कसा आपुला घात केला? शुचिस्नात आलों स्वगुंफे भुकेला, ।
पुढें इंद्र येवोनि कापट्यवेषें सती भोगिली लिंपिली पापलेशें. ॥ ४१
यदर्थीं अहल्येस संतोष नाहीं, वृथा शापिली, म्यां न जाणोनि कांहीं, ।
नव्हे इंद्र सामान्य देवाभिमानी न जाणोनि केली तपोपुण्यहानी. ॥ ४२
कौमारदेहीं सुरतानुरागी[9] चंद्राग्निगंधर्व तिघे विभागी, ।
एकेक संवत्सर दोन्हि भोगि, दुर्बोध याचा धरि कोण योगी? ॥ ४३

---

१. इंद्रानें गौतमरूप धरून अहल्येपाशीं जारकर्म केल्यावर गौतमानें त्याला 'तुझ्या अंगास सहस्र भगें पडतील' असा शाप दिला, व तिला 'तूं शिळा होशील' असा शाप दिला. नंतर तिच्या प्रार्थनेनें प्रसन्न होऊन 'रामाच्या पादस्पर्शानें तुझा उद्धार होईल' असा उ:शाप दिला, अशी कथा आहे. २. दयासागर. ३. पादकमळ. ४. गृहें, घरटे. ५. इंद्रें. ६. काळोख. ७. पाप. ८. लक्ष्मी. ९. रतिसुखाभिलाषी.

मनश्चंद्रमा अ[1]र्यमा नेत्र ज्याचे, मुखापासूनी भूत इंद्राग्नि त्याचे, ।
जगत्प्राण जो प्राण संपूर्णगात्रीं विराटस्वरूपी हरी देहमात्रीं. ॥ ४४
होणार तें तों न टळे प्रमाणीं बोलोनि गेले मुनि वेदवाणी, ।
ब्रह्मादिकां भोग घडे अनिच्छा, बे[2]ळी असे केवळ ईश्वरेच्छा. ॥ ४५
क्रोधें असा घात समस्त केला, पुण्यक्षयो संग्रह सर्व गेला.' ।
तो क्रोध संदग्ध करावयातें प्रस्थान केलें मुनिनें तपातें. ॥ ४६
आत्माराम गुणाभिराम भगवान् श्रीराम जाणोनिया,
विश्वामित्र कथा निरूपण करी त्यातें म्हणे, 'स्वामिया ! ।
पाहूं शीघ्र, चला शिला कवण ते कोण स्थळीं ते कसी ?
'ते पैं उद्धरिसील' कौशिक म्हणे 'उःशाप तूं जाणसी.' ॥ ४७
विश्वामित्र म्हणे, 'शिळा पसरली स्त्रीरूप वंशातळीं,
पादस्पर्श किजे.' रघूत्तम वदे, 'शापील कोपानळीं.' ।
सांगे कौशिक, 'उद्धरीं पदरजें निर्दोष आज्ञा असे.'
पादक्षालन आचमनादि करुनी रामांघ्रि लावीतसे. ॥ ४८
पाहे राम समेत कौशिक मुनी आश्चर्यता वाटली,
ते तत्काळ पैं[3]दाब्जरेणु जडतां पूर्वस्थिति पावली. ।
श्रीरा[4]मांघ्रि नमूनि गौतमसती वंदी तपोवर्धना,
बोले, 'उद्धरिलें तुझ्या पदरजें ठेवी पदीं मू[5]र्धना.' ॥ ४९
पुसे राम, 'तूं कोण ? होतीस कोठें ?' म्हणे, 'मी अहल्या, सती भाग्य मोठें, ।
तुझीं देखिलीं दिव्य पा[6]दारविंदें, जयाकारणें देव झाले [7]मिलिंदें. ॥ ५०
रामा कैवल्यधामा ! न कळसि निर्ग[8]मा नेति वामांगि रा[9]मा
जिव्हे ! श्रीरामनामावळि जपत उमाकांत चित्ताभिरामा, ।
दे[10]शी मोक्षार्थकामामृत पद परमानंद तूं पूर्णकामा
नाना अन्याय सामाविशि, तव महिमा जाणशी तूंचि रामा !' ॥ ५१
कांता उद्धरिली म्हणोनि कळलें ज्ञानीं ऋषीगौतमा,
आला शीघ्रगती उभा रघुपतीपासीं स[11]मीरोपमा. ।

---

१. सूर्य. २. हा चरण सुभाषितरूप आहे. ३. चरणकमळांच्या धुळीचा कण. ४. अंघ्रि=पाद. ५. मस्तका. ६. पादरूप कमळें (अरविंदें). ७. भ्रमर. ८. वेदाला. ९. स्त्री. १०. 'देशी धमार्थकामामृतपदमहमानंद तूं पूर्णकामा नाना अन्याय सामाविशि तव गरिमा जाणसी तूंचि रामा' असाही पाठ आढळतो. ११. वायूसारखा.

झाली भेटि परस्परें स्तुति करी साकार ब्रह्म स्वयें,
तो 'तूं मूर्त निरीक्षिलासि नयनीं भाग्योदयें निश्चयें.' ॥ ९२
**अ**हल्या दिल्ही **गौ**तमा वेदमंत्रीं विधानोक्त जें बोलिलें कर्म तंत्रीं, ।
**वि**रिंच्यादि [1]गीर्वाण तेथें मिळाले, ऋषीकारणें प्रार्थिते सर्व झाले. ॥ ९३
'महाराज ! **इं**द्रासि उःशाप दीजे, समस्ता सुरांमाजि तो मान्य कीजे, ।
न चालेति **इं**द्राविना यज्ञदानें, कृपें यासि उःशाप दीजे विधानें[2].' ॥ ९४
म्हणे, 'देवहो ! **वा**सवालागिं आणा, पुन्हा त्यासि उःशाप देईन जाणा.' ।
समुद्रांतुनी आणिला **इं**द्र देवीं, वदे, 'वंद्य देवांत तूं सर्व सेवीं.' ॥ ९५
भगांचे शरीरावरी नेत्र झाले ठसे मोर पिच्छावरी साक्षि चाले, ।
सहस्राक्ष तैंपासुनी **इं**द्र झाला दिल्हे अंड ऐरावताचे तयाला. ॥ ९६
वंदूनि **गौ**तमऋषीप्रति देव गेले, गुंफे तपोधन निवे सुखि सर्व झाले. ।
एके रथीं ऋषि **र**घूत्तमबंधु बैसे, [3]ब्रह्मा **मु**कुंद जगवंदनमूर्ति तैसे. ॥ ९७
**वा**ल्मीकिची प्रकट संस्कृत गोड वाचा, **सी**तास्वयंवरकथा उलथा तयाचा, ।
सर्ग द्वितीय **र**घुराजचरित्र वर्णी वित्पन्न **वि**ठ्ठल म्हणे परिसोत कर्णी[4]. ॥ ९८

---

## सर्ग तिसरा.

(श्लोक.)

कांहीं 'श्रीहनुमंतनाटककथा', कांहीं '**र**घूवंशि'ची
कांहीं **आ**दिकविप्रमेयरचना, कांहीं गिरा[5] देशिंची, ।
पद्यें सार्थक पादपूर्तिरचना नाहींत गौणाक्षरें[6]
चैत्रींचें नवरात्र **रा**मनवमीपर्यंत गा आदरें. ॥ १
[7]भद्रवनांतुनि शीघ्र निघाले, [8]स्यंदन वायुगतीं बहु चाले; ।
[9]भाट अचाट पुढें गुण गाती अन्य ऋषी रथ वेष्टित जाती. ॥ २
शृंगार हास्य करुणारस दिव्य मूर्ति एके स्थळीं वसति सम्यक पादपूर्ती, ।
[10]तैसे तिघेजण रथावरि [11]सानुरागें सेनासमूह परिवेष्टित जाय मागें. ॥ ३

---

१. देव. २. यथाविधि. ३. 'ब्रह्मा मुकुंद शिव वर्णिति कीर्ति तैसे' असाही पाठ आढळतो. ४. या सर्गास 'अहल्योद्धार' असें नांव आहे. ५. वाणी. ६. अल्पाक्षरें. ७. दोधक छंद. ८. रथ. ९. स्तुतिपाठक. १०. शृंगारहास्यकरुणरसांप्रमाणें. ११. प्रेमयुक्त.

शोभायमान रथ सुंदर राघवाचा, वर्णूं शके चतुर कोण उदारवाचा ? ।
वेगासि कुंठित करी [१]मलयानिलातें गाती पुढें सुरसमंगलगायनातें. ॥ ४
पुढें देखिला [२]जान्हवीस्रोत रामें, जगज्जीवनें [३]भर्गचित्ताभिरामें, ।
असा प्रश्न केला तदा कौशिकासी, निगेपी कथा तो रमानायकासी. ॥ ५
'रामा ! पूर्वज जो तुझा सगर तो [४]सूर्यांशिचा बोलिजे,
त्यातें [५]साठिसहस्र आत्मज, तिहीं यागाश्वमेधा किजे; ।
घोडा पृथ्विसि सोडिला भुजबळें [६]गोत्रापती जिंकिले
पाताळा [७]हय नेत शक्रहि तया शोधावया चालिले. ॥ ६
आले [८]बिंदुसरोवरा सगर तैं घोडा तयां नादिसे,
केलें विघ्न मखाप्रती शतमखें झाले [९]तुरंगीं पिसे; ।
होतें बंधन त्या हयासि कपिलाचार्याचिये पृष्ठिसी,
[१०]तेथें जाउनि वारुसी लपविला नेणेचि तो तापसी. ॥ ७
[११]खाणितलें [१२]सगरीं धरणीतळ '[१३]सागर' नाम तधींहुनि झालें,
धुंडित धुंडित ते विवरांतुन येति सवें दळ वेष्टित चाले. ।
श्यामलकर्ण [१४]तुरंगम देखुनि श्री[१५]कपिलार्य समाधिसि साधी,
चोर[१६] असें मनिं भाउनि त्यावरि [१७]एकसरें पडिले [१८]अपराधी. ॥ ८

---

१. मलयपर्वतसंबंधी वायूतें. २. गंगाप्रवाह. ३. महादेवाच्या मनाचा आवडता. ४. सूर्यवंशींचा. ५. साठ हजार पुत्र. ६. पृथ्वीपति. ७. घोडा. ८. शंकरानें भागीरथीचा ओघ आपल्या मस्तकीं धरला. त्यांतून जलाचे बिंदु पडून हिमालयाच्या हिरण्यशृंग नामक शिखराच्या पायथ्यासमीप जें सरोवर झालें त्यास 'बिंदुसरोवर' असें नांव आहे. ९. घोड्यामुळें. १०. 'राजे शोधिति दुर्गमें गिरिवनें त्यांच्या नये दृष्टिसी' असाही पाठ आहे. ११. सवाई वृत्त. १२. सगरपुत्रांनीं. १३. सगराच्या साठसहस्र पुत्रांनीं अश्वशोधार्थ समुद्र खणिला म्हणून समुद्रास 'सागर' असें नांव पडलें. सगरास दोन स्त्रिया होत्या. पहिली सुमति, तिला साठ हजार; आणि दुसरी केशिनी, तिला असमंजस नांवाचा एकच असे त्याला पुत्र होते. या असमंजसाचा पुत्र अंशुमान् होय. १४. अश्व. १५. कपिल हा मोठा ऋषि होता. यास कपिल महामुनि असें ही म्हणतात. सगर नामक इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजानें अश्वमेध करण्याच्या वेळीं आपल्या साठ हजार मुलांस रक्षणार्थ बरोबर देऊन यज्ञिय अश्व पृथ्वीवर सोडला असतां, इंद्रानें तो गुप्तपणें चोरून पाताळीं कपिलाच्या आश्रमांत ठेवून दिला. तेव्हा सगरपुत्र सचिंत होऊन त्याच्या शोधास लागले, परंतु त्याचा कोठें ठिकाण लागेना. तथापि निराश न होतां त्यांनीं समुद्र खणून पृथ्वीस मोठें भोंक पाडून पाताळीं कपिलाच्या आश्रमांत जाऊन तेथें अश्व शोधून काढिला. या समयीं कपिल मुनि समाधिस्थ होता. अश्व चोरणारा हाच असावा असें समजून ते मुनीस ताडन करूं लागले. इतक्यांत त्यानें रागानें नेत्र उघडून यांजकडे पाहिलें, त्यावरोबर त्या सगरपुत्रांचें भस्म झालें. याची सिद्ध नामक देवांत गणना आहे. हा सांख्यशास्त्रप्रणेता होय असें समजतात. १६. त्या कपिलाला चोर असें समजून. १७. एकदम. १८. दोषी (सगरपुत्र.)

असो. भंग केला समाधीसि तींहीं, तयां शापिलें, 'रे! जळा याचि देहीं.'।
अकस्मात नेत्रानलें[1] दग्ध झाले, पुढें त्यांसि उःशाप कांहीं न बोले. ॥ ९

[2]कोणी वार्ता न सांगे सगरपति करी नित्य चिंता सुतांची,
त्याचा नातू प्रतापी [3]समदश म्हणिजे तो करी शुद्धि त्यांची; ।
धुंडाळी देश दुर्गें[4] नगर उपवनें धुंडितां श्रांत[5] झाला,
[6]द्वीपीं खंडीं न देखे नकळत विवरद्वारमार्गीं[7] रिघाला[8]. ॥ १०
पाताळीं[9] करुनि प्रवेश कपिलाचार्यापुढें देखिला[10],
पाहे [11]पूर्वज त्यासमोर जळती, तो भाव त्या पूसिला; ।
तेणें अर्थ निरूपिला, मग तया वंदूनि नानापरी,
उःशापी सगरासि, नम्र विनती बद्धांजलीनें करी. ॥ ११
'माझे पूर्वज उद्धरीं, त्रिभुवनीं सत्कीर्ति नांदो बरी,
[12]शापानुग्रहिं तूं समर्थ, करुणा वर्तो तुझ्या अंतरीं,'।
संतोषोनि मुनी म्हणे समदशा, '[13]श्रीतीर्थचूडामणी
आणी, न्हाणि तयां, [14]महेशमुकुटीं मानोनि गंगावणी[15].' ॥ १२
[16]त्यानंतरें समदशें तप उग्र केलें, त्याचें [17]कलेवर पुरश्चरणांत[18] गेलें. ।
वंशीं पुढें सुत भगीरथ धन्य झाला, भागीरथीजळ शिवें दिधलें तयाला. १३
[19]ब्रह्यानें भरला [20]कमंडलु जळें ब्रह्मांडसारोदकें,
दानांतीं [21]बलिच्या [22]पदाब्ज [23]बटुचें प्रक्षाळिलें [24]बोधकें, ।

---

१. नेत्रांतील अग्नीनें. २. स्रग्धरा वृत्त. ३. समदश (अंशुमान्) यानें आपल्या चुलत्यांचें काय झालें याचा शोध लावून आणि कपिलाला प्रसन्न करून अश्वमेधीय अश्व सोडवून आणून आपल्या पितामहाचा यज्ञ पूर्ण केला आणि कपिलाच्या वचनास अनुसरून भागीरथीच्या जलस्पर्शानें पितृव्यांच्या उद्धारासाठीं तप आरंभिलें. पुढें भगीरथानें त्यांचा उद्धार केला. अंशुमान् हा सगराचा पौत्र. परंतु या काव्यांत त्यास 'समदश' असें नांव आढळतें. ४. किल्ले. ५. श्रमयुक्त. ६. बेटांत. ७. पृथ्वी विदारण करून केलेल्या विवरांत. ८. प्रवेश केला. ९. शार्दूलविक्रीडित वृत्त. १०. अश्व पाहिला. ११. चुलते—सगरपुत्र. १२. शाप देण्यास आणि अनुग्रह (प्रसाद) करण्यास. १३. सर्व तीर्थांमध्यें श्रेष्ठ. १४. शिवमस्तकस्थित. १५. भागीरथी. १६. वसंततिलका वृत्त. १७. शरीर. १८. तपोनुष्ठानांत. पुरश्चरण=मंत्र आपणांस सिद्ध व्हावा यास्तव तदनुसार त्या मंत्राचा अमुक संख्याक जप करावा इत्यादि मंत्रशास्त्रामध्यें जें अनुष्ठान सांगितलें आहे तें. १९. शार्दूलविक्रीडित वृत्त. २०. मृन्मय अथवा काष्ठमय उदकपात्र. २१. बलिराजाच्या. २२. पदकमळ. २३. वामनरूपधारी विष्णु बटूचें. २४. आचार्यानें.

ती धारा धरिली **शि**वें, मग दिली श्री**जा**न्हवी चालिली,
केले पूर्वज मुक्त, देवसरिता[1] पूर्वांबुधीं[2] लाविली. ॥ १४
हे जाण **कौ**शिककथा परिपूर्ण झाली, साष्टांग **रा**घव तितें प्रणिपात[3] घाली. ।
आले तटासि तंव नीर[4] गंभीर[5] वाहे, श्री**रा**राम नावकरियाप्रति[6] शीघ्र बाहे[7].॥ १५
'अरे **गु**ह्यका[8] ! नाविका ! नाव आणी त्वरें ऊतरीं **जा**न्हवी खोलपाणी, ।
मुहूर्तीं महा कार्य आहे प्रयाणीं.' वदे कर्णधारा[9] सुधातुल्य वाणी. ॥ १६
पदकमळ रजानें मुक्त पाषाणदेही
ऋषिमहिषि[10] **अ**हल्या पावली साक्ष तेही, ।
उपलयुवति[11] होती वस्ति **विं**ध्याचळाची,
**र**घुपति ! पुरवीली वासना तापसाची[12]. ॥ १७
**र**घुपति ! करवेना स्त्री दुजी दुर्बळातें,
अणुभरि तरि नाहीं भेद काष्ठोपळातें[13]. ।
धुविन चरणरेणू, तीर्थ घेईन जेव्हां,
बसविन मग नौकेमाजि देवासि तेव्हां. ॥ १८
यानंतरें उतरिजे पैलपार[14] **रा**में, केलें स्वकर्म सवनादिक[15] पूर्णकामें, ।
आरूढले तिघ रथावरि, सैन्य मागें, आले समीप **मि**थिळे पवनानुवेगें. ॥ १९
जैसा रवीउदय[16] पाणितळीं न झांके, तैसें सुवर्णमणितेज दिशांत फांके. ।
शृंगारिलें स्वपुटभेदन[17] भूमिपाळें, एका खणावरि विराजति सप्त ताळें. ॥ २०
मी काय वर्णु.........पुटभेदनासी ? तें देखिल्या सकळ दुर्घट भेद नासी. ।
ज्ञानी अभेद भजनीं गुण गौरवासी तेथें कदापि न कधीं जन पापवासी.॥ २१

---

१. भागीरथी नदी. २. पूर्वसमुद्रीं. नद्या ह्या समुद्राच्या स्त्रिया आणि पर्वताच्या कन्या होत ह्या कविप्रसिद्धीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ३. नमस्कार. ४. उदक. ५. गंभीर. ६. नावाडी. ७. बोलावी. ८. गुह (गुह्यक) शृंगवेरपुरीचा राजा. हा किरात होता. यानें मित्रत्वास्तव सीतालक्ष्मणांसह राम वनवासास जात असतां आपल्या नौकेंत त्यांस बसवून भागीरथीचें पार दक्षिणतीरीं उतरून दिलें. यानें आपल्या नगरीं रामानें रहावें म्हणून फार आग्रह केला आणि त्याचा आदरसत्कार केला म्हणून रामास संतोष वाटला. ९. नावाड्याला. १०. अगस्त्यमुनीची भार्या. (येथें 'महिषी'शब्द वृत्तसुखार्थ ऱ्हस्व केला आहे. अशीं उदाहरणें या काव्यांत अनेक आढळतात.) ११. पाषाणरूपी स्त्री. (अहल्या.) १२. अगस्त्यमुनीची. १३. लांकूड व पाषाण यांतें. १४. पैलतीराला. १५. यथार्थ समंत्रक स्नानादिक. १६. 'रव्युदय' असें संधि केलेलें सामासिक पद असावें, परंतु वृत्तसुखार्थ संधि केला नाहीं आणि 'रवि'शब्द दीर्घ केला आहे. १७. शहरासि.

बाजार हाट [1]वटिया मढिलीं दुकानें, [2]वीथी [3]चतुष्पथ विचित्र विराजमानें, ।
देवालयादि मठ मंडप पट्टशाळा श्रीगोपुरावरि महा विलसे विशाळा. ॥ २२

दिव्य स्थळें भुमि [4]समार्जित [5]कुंकुमानें देवालयें करि कथा बहु दीपदानें, ।
वृंदावनें तुळसिचीं बहुदीपमाळा, श्रीतोरणादि मखरें गुढिया विशाळा. ॥ २३

ठायीं ठायीं पुराणें श्रवण हरिकथा, नृत्य, वाद्यें स्फुराणें,
वाचे श्री**राम**गाणें जन [6]उदिम करी नीतिशास्त्राप्रमाणें, ।
नाहीं देशीं रहाणें, भय धरुनि पळे पाप लाजीरवाणें,
**रा**मश्रीकृष्णनाणें [7]जनपद मिरवी मुक्ति जीवंत ज्याणें. ॥ २४

विश्वामित्रसमागमें द्विजमुनी आले, वनीं राहिले,
दूतीं जाणविले [8]वृतांत **ज**नका, [9]सामंत पाचारिले; ।
सामोरा नृप जाय त्या उपवनीं वेष्टीत सेना सवें,
वाद्यें वाजति सैन्यासिंधु सरिसा शृंगारिला वैभवें. ॥ २५

**वि**श्वामित्र मुनी तपोधन महा जो सृष्टिकर्ता दुजा,
भेटाया द्विज चालिले नगरिंचे हर्षें स्फुरेती [10]भुजा; ।
झाले शीघ्रगती [11]पुरौकस पुढें हो लोचना [12]पारणें,
वाजी [13]वारण वाहनादि शिबिका बैसावया कारणें. ॥ २६

संन्यासी [14]भट वैद्य ज्योतिषि महा [15]मौनी [16]तडीतापडी,
[17]श्रोत्री पंडित सिद्ध साधक मुनी तीर्थाटणी [18]कापडी, ।
[19]श्रौतस्मार्तक साधु [20]याज्ञिक भले शास्त्रज्ञ जे बोलिले,
मंत्री [21]गोपक नाव्य गायक पुढें भेटावया चालिले. ॥ २७

शेटे [22]महाजन [23]सराफ धनाढ्य [24]चौटे वाणी वणिज्ज उदमी पुरपंथ दाटे, ।

---

१. ओव्या. २. गल्ल्या. ३. चवाठे. ४. पाणी घालून झाडून स्वच्छ केलेली. ५. केशरानें. ६. व्यापार. ७. देश. ८. 'वृत्तांत' पाहिजे, पण वृत्तसुखार्थ 'वृतांत' असें लिहिलें आहे. ९. मांडलिकराजे. १०. बाहु स्फुरण पावे. ११. नगरांतील लोक. १२. डोळ्यांचें इष्टविषयलाभानें समाधान झालें. १३. गज. १४. भिक्षुक ब्राह्मण. १५. मौन धारण करून असणारे. १६. भिक्षा मागून पोट भरणारे गोंसावी, बैरागी. १७. वेदवेत्ते ब्राह्मण. १८. भगवीं वस्त्रें धारण करून भागीरथीची कावड खांद्यावर घेऊन तीर्थयात्रा करीत फिरणारे कापडी. १९. वेदशास्त्रोक्त कर्म जाणणारे द्विज. २०. विवाह, मुंज, व्रतोद्यापन, देवप्रतिष्ठा, इत्यादि कर्मांचें अनुष्ठान चालविणें हे जाणणारे ब्राह्मण. २१. रक्षणकर्ते. २२. सावकार. २३. हुंडी, नाणें, रोकड, यांची देवघेव करून उपजीविका करणारा पुरुष. २४. कापडकरी.

धूळीरसें सकळ धूंसर विश्व भासे, दूरूनि देखुनि मुनी जनकासि हांसे. ॥२८

सहस्रावधी त्यापुढें वेत्रेपाणी, प्रतापोत्कटा वर्णिती भाट वाणी. ।

वि[४]देही नमस्कार साष्टांग घाली, पदस्पर्शनें चि[६]त्कळा एकि झाली. ॥ २९

जगन्मित्र 'कल्याण कल्याण' बोले, क्षमालिंगनें एक होऊन ठेले, ।

नमस्कारिती जे सर्वे भूप आले, दिशा दाटल्या, भाग भूगोळ हाले. ॥३०

पुंण्यश्लोक जनार्दनादि नळ जो धर्म प्रभू द्वापरीं,
त्रेतांतीं जनक क्षमापति असा नाहीं त्रि[११]खंडांतरीं; ।
देहीं देह विदेह वामनयना पाद स्तनें मर्दिती,
श्रीगंधें पद एक चिन्हित तया पृथ्वीपती अर्जिती. ॥　　३१

समारंभें घोरें मिरवत निघाले वनिंहुनी,
तदीं त्यांच्या संगें इतर नृपती दंड धरुनी, ।
नमस्कारा येती नगरजनपद्या द्विजमुनी,
पुढें नाना वाद्यें [१२]जनपद निवारीत नमुनी. ॥　　३२

सभास्थाना आले, मणिमय दिले वि[१३]ष्टरें तयां,
तदा विश्वामित्रा पुरत वसतां बंधुउभयां ।
दिसे राया दृष्टी 'रघुवर परब्रह्म नटलें',
नृपां लोकां भासे सदन मदनाचें प्रगटलें. ॥　　३३

[१५]श्यामसुंदर मनोहर भासे, [१६]कौसिलें कनकअंबर कासे, ।
मस्तकीं मुकुट, कौस्तुभ वक्षीं, वांकि तोडर पदीं नृप लक्षी. ॥　३४

[१८]क्षत्रियासि नरनाथ दीसती, सज्जनांसि अवतार भासती, ।
कौशिकाप्रति पुसे धरापती, 'कोण हे उभय बंधु शोभती?' ॥　३५

---

१. काळवट. २. छडीदार. ३. प्रभावयुक्त. ४. जनक. ५. साष्टांग वंदन=अष्टांगपात=अष्टांग-प्रणाम='जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरित: ॥,' दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, भाळ, वाचा, नेत्र, ऊर, आणि बुद्धि या अंगांनीं केलेला नमस्कार. ६. चैतन्याचें ऐक्य. ७. भूगोलाचा भाग हाले. ८. पृथ्वीच्या गोलाकारत्वाची माहिती असावी असें 'भूगोल' या शब्दावरून दिसतें. ९. पुण्यकारक यश ज्याचें असा. १०. पृथ्वीपति. ११. पाताल, भू, स्वर्ग, या तीन लोकांत. १२. लोक. १३. आसनें. १४. पुढें. १५ स्वागता वृत्त. १६. बांधिलें. १७. समुद्र मथन करून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांपैकीं एक कौस्तुभ म्हणून होतें. हें विष्णूचें कंठभूषण होय. त्याच्या वक्षावरचें भूषण श्रीवत्स. १८. रथोद्धता छंद.

तदुपरि मुनि सांगे, 'राज्य यांचें अयोध्ये,<br>
कुमर दशरथाचे, वीर हे [१]चंड योद्धे. ।<br>
दिनकरकुळ यांचें, शिष्य होती वसिष्ठा,<br>
करणि रघुपतीची आइकें, श्रीवरिष्ठा ! ॥ ३६

रक्षिला मख रघूत्तमें वरा, ताटिका उडविली दिगंतरा, ।<br>
मूळपत्र तुमचें विलोकिलें, म्यां तदा शुभमुहूर्त साधिलें. ॥ ३७

चालतां विपि[२]नें दाट लागलें, तेस्थळीं नवल वर्तलें भलें, ।<br>
शापिलें निजकल[३]त्र गौतमें, तारिलें पदरजें रघूत्तमें. ॥ ३८

घेतां नाम समस्त काम पुरवी श्रीराम तो हा असे,<br>
आत्माराम [४]गुणाभिराम भगवान् सर्वांतरीं जो वसे. ।<br>
राया ! तारक ब्रह्म चि[५]द्घन तुतें भेटावया आणिला,<br>
विष्णूचा अवतार [६]सप्तम तुवां भाग्योदयें देखिला. ॥ ३९

याचा बंधु सुमित्र, यासम सखा शेषावतारीं स्वयें,<br>
दोघे वीर पराक्रमी त्रिभुवनामध्यें बळी निश्चयें. ।<br>
[७]लीलाविग्रहि, वेदनीतिमहिमा प्रत्यक्ष तो हा स्वभू.'<br>
ऐसें उत्तर आइकोनि हृदयीं संतोषला तो प्रभू. ॥ ४०

रामरूप नयनीं वि[८]सावलें, अंतरीं बहुत हो ! ठसावलें. ।<br>
तों वदे जनक भूप आपणा, 'व्यर्थ म्यां धनुष योजिलें [९]पणा. ॥ ४१

जानकीसि [१०]वर हा नि[११]का असे, यासम त्रिभुवनीं दुजा नसे. ।<br>
[१२]भागधेय उदयो करी जरी मैथिली तरि रघूत्तमा वरी.' ॥ ४२

'राजे आले, आइका सावधानें.' वक्ता सांगे [१३]भूपदेशाभिधानें, ।<br>
वस्त्रें भिन्नें राजचिन्हें पवित्रें नानावर्णें [१४]आतपत्रें विचित्रें. ॥ ४३

---

१. भयंकर, उग्र. २. वन. ३. आपली स्त्री. (अहल्या.) ४. गुणांनीं अभिराम (रमणीय). ५. ज्ञानस्वरूप मेघ. ६. सातवा अवतार. या दहा अवतारांचीं नांवें आणि त्यांतील कृत्यें पुढील श्लोकांत निरूपण केलीं आहेत:—'वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते । पौलस्त्यं जहते हलं कलयते कारुण्यमातन्वते म्लेच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥,' 'मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः । रामो रामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दश ॥.' ७. कौतुकास्तव देह धारण करणारे. ८. स्थिर झालें. ९. शिवाचें प्रचंड धनुष्य उचलून त्याजवर जो बाण लावील त्याला आपली कन्या सीता द्यावयाची असा जनकाचा पण होता. १०. पति. ११. सत्य, निखालस. १२. भाग्य. १३. राजांचीं व देशांचीं नांवें. १४. छत्रें.

छत्रें वर्तुळ रत्नदंड चवरें चंद्रोपमा साजती,
शार्दूळाकृति सिंह मत्स्य वदनें भारापुढें चालती, ।
झांके अंबर मेघडंबर तसें [1]मार्तंडपत्रध्वजा,
वाद्यें वाजति, भाट गाति [2]बिरुदें, पाहाति [3]पौरें प्रजा. ॥ ४४
पृथ्वीचे [4]नरनाथ दिग्विजयि तैं आले बळें वैभवें,
ते रायें नृप आणिले सह[5]चमू जावोनियां गौरवें, ।
आले दैत्यकुळादि राक्षस महा तेणें सभा दाटली,
स्वर्गीं **इं**द्रसभेसिं तुल्य दुसरी [6]धात्रीवरी शोभली. ॥ ४५
स्तंभीं [7]पूतळिया करीं दिवटिया [8]स्मेरानना सुप्रिया,
हातीं आरतिया महाबरविया हे चित्रलेख[9]क्रिया; ।
मुक्तें [10]चांदविया मृदासन तयां मुक्तांचिया जाळिया,
रत्नें त्यांवरि शोभती [11]चंवरिया खालीं मृदू गादिया. ॥ ४६
ज्यां ज्यां योग्य जसीं स्थळें तसिंतसीं त्यां त्यां दिलीं आसनें,
[12]नानाकांचनरत्नसंसदिपुढें होती महागायनें; ।
**वि**श्वामित्रमुनीश्वरादि **ज**नकें पृथ्वीपती पूजिले,
वाद्यें वाजति, भाट गाति बिरुदें, सत्कार त्यां योजिले. ॥ ४७
विमानें नभीं दाटलीं दैवतांचीं, महीमंडळीं वाहनें [13]भूभुजांचीं, ।
प्रसंगीं भुपांचीं निरोपीन नामें, गुणज्ञीं सभे आयकावीं [14]ललामें.' ॥ ४८
वाग्देवते ! **ह**रिकथे नटि होइं साचे, [15]'तूं मूर्तिमंत रसनेवरि सज्जनांचे, ।
**सी**तास्वयंवरकथारस गोड लागे, सर्ग तृतीय कवि **वि**ठ्ठलदास [16]सांगे. ॥ ४९

---

## सर्ग चवथा.

(श्लोक.)

**ज**नक मनिं विचारी, चित्त कोठें गमेना,
कठिण धनुष वज्रातुल्य **रा**मा नमेना; ।

---

१. सूर्य. २. विद्याकलागुणाविषयीं जो बाणा त्याचें ज्ञापक चिन्ह. ३. नगरसंबंधी लोक. ४. राजे. ५. सेना. ६. पृथ्वीवरी. ७. बाहुल्या. ८. हास्ययुक्त मुख ज्यांचें अशा. ९. चितान्याचें कर्म (कसब). १०. चांदव्याला. ११. चामरें. (चमर नामक मृगाच्या शेंपटाच्या शेवटास गोंडे असतात त्यांच्या चंवऱ्या करतात.) १२. अनेक प्रकारचीं जीं सुवर्णें व रत्नें यांहीं युक्त जी सभा तिच्या पुढें. १३. राजांचीं. (भूचा भोग घेणारे जे त्यांचीं.) १४. चिन्हें. १५. 'ऐकोनि सज्जनमनें अति हंस नाचे' असाही पाठ आहे. १६. या सर्गास 'जानकीवरजनकसभाप्रवेश' असें नांव आहे.

भृगुपति गुण चापा तो कदा लंघवेना,
म्हणउनि धरि राजा मौनमुद्रा, वदेना. ॥ १
अमुप नृप मिळाले सार्वभौमाभिमानी,
[1]त्रिदश [2]दनुज आले लंकनाथाभिमानी, ।
'[3]सदसिं धनुष आणा' प्रेरिलें मंत्रियांतें;
मग सकळ निघाले चाप आणावयातें. ॥ २
[4]दिग्मातंग जसे मदोन्मत तसे धूरेसि आटोपिती,
चौदाशें [5]मत्त बैल, [6]रानखुळगे सोळाशतें जुंपिती, ।
[7]जेठी लोटिति सा सहस्र धनुषा, सायासिं तें आणिलें,
दिक्चापासमतुल्य [8]भूभुजसभे रंगांगणीं टाकिलें. ॥ ३
केली रंगसुरंग भूमि जनकें, संमार्जिली कुंकुमें,
गोपद्मावरि पंचरंग मिरवे श्रीस्वस्तिकें [9]कौसुमें; ।
भूपूजा विधिवेदपूर्वक किजे अर्चूनियां [10]भूभुजें,
तेथें कार्मुक ठेविलें मग म्हणे [11]उद्बाहु [12]वक्रांबुजें. ॥ ४
प्रगट जनक बोले, 'भूपती! आइका हो!
विनवित सकळांतें मी उभारूनि [13]बाहो, ।
भृगुपति गुण [14]चापा ज्या चढे त्यासि [15]शीली
त्रिभुवनजयलक्ष्मी मैथिली माळ घाली.' ॥ ५
[16]अजासर्पन्यायें नृप धनुष देखोनि विटले,
[17]स्फुरद्रोमा अंगीं पुलकित [18]गलद्बिंदु सुटले, ।
मृतच्छाया आली, अचुक भय पोटांत भरलें,
शरीरें प्रेतांचीं धरुनि म्हणती आयु सरलें. ॥ ६
प्रधानें सर्वांतें नमुनि मग केली विनवणी,
'उठाना कां स्वामी! धनुष उचलाया दृढपणी, ।

---

१. देव. २. दानव. ३. सभेंत. ४. दिग्गज. ५. मत्त, माजलेले. ६. रानम्हैसे. ७. पैलवान, मल्ल. (जेठी=ज्येष्ठ—'वयानें मोठा' असा मूळ अर्थ असून 'बळानें मोठा' असा कालांतरानें अर्थ झाला.) ८. राजसभे. ९. पुष्पांचीं. १०. राजानें. ११. वर हात करून. १२. मुखकमलें. १३. भुज. १४. भृगुपति चापा ज्या गुण (दोरी) चढे त्यासी—असा अन्वय. येथें संस्कारच्युति हा दोष आहे. १५. गुणवती. १६. शेळी आणि साप यांच्या न्यायानें; शेळी सापास पाहून दचकते त्याप्रमाणें. १७. शरीररोम उभे राहिले ज्यांचे. १८. गलत्+बिंदु. घामाचे गळणारे बिंदु.

प्रतापाचे मेरू बळकट महाख्याति धरणीं[1]
तुम्ही आहां, पाहा सचकित न राहा नृपगणीं.' ॥ ७
वृक्षाच्या लांब शाखा करचरण तसे, पर्वतातुल्य माथा,[2]
दाहा तोंडें कराळें,[3] सचकित नृपती देखती लंकनाथा; ।
मोठा आजानुबाहो[4] रजनिचरपती[5] बोलता काय झाला,
सालंकारें विराजे नवजलदतनू[6] दर्प सर्वां नृपांला. ॥ ८
'दुर्गा गणेश गुह[7] नंदि शिवःसभेला कैलास ज्यां भुजबळें श्लथरूप[8] केला, ।
तो मी धरीन पडतां नभ[9] वामबाहें, कोदंड[10] खंडिल असा नृप कोण आहे? ॥ ९
ज्यां नाहीं नृप जिंकिला रणभुमी[11] तो कोण आला असे?
माझा दर्प सुरेश्वरा, भय बहू शेषासि माझें असे, ।
भूची घालिन मी घडी, उतरडी पाडीन मी स्वर्गिच्या,
पाताळें उकलूनि बांधिन चऱ्या लंकेचिया दुर्गिच्या. ॥ १०
विद्यासत्कुळभाग्यकीर्तिसकळीं संपन्न मी भूतळीं,
दंडीं खंडिन येक्षणीं भुजबळें कोदंड भूमंडळीं; ।
पाहा मत्पुरुषार्थ;' गर्जुनि उभा राहोनि तेथें करी,
तों सीता उपरीवरी[12] सहसख्या पाहे सभा सुंदरी. ॥ ११
उपरिवरि मृगाक्षी भूभुजांतें[13] निरीक्षी,
कर धरुनि सखीचा कोण कैसा परीक्षी; ।
'सहचरि! मज दावीं कीर्तिविख्यात राजे
प्रगट गुण निरूपीं कोण कैसा विराजे?' ॥ १२
'[14]द्वीपें पुष्कर जंबु शाल्मलि कुश क्रौंचादिचे भूपती,
शाकःशृंगलिंचे स्वयंवरसभे आले महादिक्पती; ।
खंडें चारण भस्म सिद्ध चवथें नागादिकें वर्णिलीं
गंधर्वेंद्र सुवर्ण ताम्र भरत[15] श्रेणी समाकर्णिली. ॥ १३

---

१. पृथ्वीवर. २. मस्तक. ३. भयंकर. ४. गुडघ्यापर्यंत लांब हात ज्याचे असा. ५. राक्षसराजा. ६. नूतन मेघासारखें शरीर ज्याचें असा. ७. षडानन. ८. गलित. ९. आकाश. १०. धनुष्य. ११. 'पृथिवीचा' असाही पाठ आहे. १२. मांडीवरी. १३. राजांतें. १४. सप्तद्वीपें:—'जंबूप्लक्षाहवौ द्वीपौ शाल्मलिश्चापरो द्विज। कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥' (विष्णुपुराण). १५. नट.

भूर्भुः[1]स्वर्गजनस्तपोमह तथा सत्यादि[2] मेरूवरी,
पाताळें अतळादिकें[3] वितळ मी वर्णीतसें वैखरीं[4], ।
त्याखालें वितळादि सूतळ महा, तेथें विराजे बळी[5],
पुण्यश्लोक तळातळीं भुमितळीं पाताळ सप्तावळीं[6]. ॥ १४

सर्पी इक्षुसुरादधीपयमधू क्षारांबुधी सप्तमा,
अष्टौ दिक्पति[7], सिद्ध, चारण, महा हाहा हुहू चंद्रमा, ।
सद्विद्याधर यक्ष गुह्यक रवी पाहावया पातले
गंधर्वाप्सरकिन्नरेंद्र गगनीं यानीं सुखें बैसले. ॥ १५

राजे अंग कलिंग वंग मगध द्रावीड कर्नाटकी
गौडश्चोल निषाद बर्बर महाकांबोज बंगालिकी, ।
काश्मीरादि विदर्भ गुर्जर तथा सौराष्ट्र तैलंगणी
कालिंगा शबरादि नैषध पुढें पाहे प्रभू कोंकणी. ॥ १६

उज्जन्यादि पुलिंद कुंतल महाकौशल्य मत्स्याळिंचे
राजे केरळ चोरली वृजइचे टंकाण कैरातिचे ।
काशीराज कलिंद कैकय महानद्यादिनाटप्रभू
सिंहालादिक चैद्य जांगल कुरू गांधार आंध्र स्वभू. ॥ १७

पाहे ताम्रमुखादि शाम हबशी राजे फिरंगाणिंचे,
पाहे कैकट कच्छ ते अरुबुरू राजे खुरासानिंचे, ।
पाहे म्लेच्छ पठाण कैकड महाराजे कनौजे भले,
पाहे डोंब गरीब भिल्ल चतुरे राजे सभे शोभले. ॥ १८

पाहे लाट विराट मालव महाराष्ट्र प्रभू देशिंचे,
गौडी काउर मारवाड नृपती नेपाळ पांचाळिंचे; ।

---

१. हे सात स्वर्ग होत. भूलोक (मृत्युलोक), भुवर्लोक (अंतरिक्षलोक), स्वर्गलोक (इंद्राचा लोक), महर्लोक (भृग्वादिक महर्षींचा लोक), जनोलोक (सनकादिकांचा लोक), तपोलोक (महातपस्वी व सिद्ध यांचा लोक), आणि सत्यलोक (ब्रह्मदेवाचा लोक). हे लोक पृथ्वीच्या ऊर्ध्वभागवर्ती समजावयाचे. २. सत्यलोकादि. ३. पृथ्वीच्या अधोभागीं जे सात बिलस्वर्ग आहेत त्यांतील एक. त्यांचीं नांवें:— अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, आणि पाताळ. ४. वाणीनें. ५. बलिनामक दैत्याला विष्णूनें वामनावतारीं त्रिपाद भूमि मागून, ती न दिल्यामुळें पाताळीं घातलें, अशी कथा आहे, तिजकडे येथें लक्ष्य आहे. ६. सातांची पंक्ति. ७. आठ दिक्पालः—इंद्र, वरुण, अग्नि, वायु, कुबेर, यम इत्यादि.

श्रीताम्रध्वज नीलकेतु मिनले[1], शोभा कसी ते दिसे ?
　　पाहे रावण राक्षसाधिप उभा मेरू जसा लालसें[2]. ॥ १९
पाहे भूभुज[3] सार्वभौम जितुके ज्याच्या भयें कांपती,
　　स्वर्गी निर्जर[4] शक्रमुख्य अवघे ज्याच्या घरीं राबती, ।
चौदाचौकडिया युगद्विगणना छपन्न हे संपदा,
　　दर्पे कापति ज्याचिया त्रिभुवनीं गर्वाभिमानी सदा. ॥ २०
बंदीं निर्जर घातले, भुजबळें कैलास आंदोळिला,
　　ब्रह्याचा पणतू चहूंश्रुतिवरी भाष्यार्थ जो बोलिला, ।
केला देशोधडी[5] कुबेर, हरिली लंका समुद्रोदरीं,
　　दाहा मौळि[6] विसा भुजा, सखि म्हणे सीतेसि नम्रोत्तरीं. ॥ २१
'अष्टौ भैरव[7] कोतवाल सठवी बालांचि रक्षा[8] करी,
　　चामुंडा परिचारिका[9], अनुकुला स्त्रीरत्न मंदोदरी, ।
वायूनें वरुणें समार्जन किजे, पंचांग सांगे विधी,
　　खंडेराव सभेसि दर्पण करीं, राबेति सिद्धी[10] निधी[11]. ॥ २२
चंद्र च्छत्र धरी नव ग्रह उभे द्वाराचिया पाइरीं,
　　सूर्य द्वारपदीं, वसंत सुमनें घाली पलंगावरी, ।
माळी वासव[12], पाक[13] पावक करी, हेरंब[14] राखे गुरें
　　भांडारी अळकेश[15], यापरि किजे साम्राज्य लंकेश्वरें. ॥ २३
रत्नस्तंभ सुवर्णभूमि नगरी पाषाण चिंतामणी[16],
　　क्रीडा कल्पतरू अशोकविपिनीं दिव्यांगना नाचणी; ।
दुर्गाचीं शिखरें जशीं फणिफणाद्वारें दिशांचीं मुखें,
　　सिंधूचें कटिसूत्र वेष्टित पुरी लंकेश नांदे सुखें. ॥ २४
तो हा दशानन सभेंत उभा विराजे, हे सार्वभौम मशकासम त्यासि राजे;' ।

---

१. मिळाले. २. इच्छेनें. ३. भूपति. ४. देव. ५. देशांतरस्थ. ६. शिरीं. ७. असितांग, रुद्र, चंड, क्रोध, उन्मत्त, कुपति (कपाली), भीषण आणि संहार हे शिवाचे भयंकरस्वरूपी आठ अवतार होत. ८. रक्षण. ९. दासी. १०. अणिमा, गरिमा, महिमा, लधिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व ह्या आठ सिद्धि होत. ११. महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व, हे कुबेराजवळचे धनाचे नऊ निधि होत. १२. इंद्र. १३. स्वयंपाक. १४. गणपति. १५. अलकानगरीचा स्वामी. (कुबेर.) १६. रत्नें. (चिंतामणि=चिंतिलेला पदार्थ देणारा मणिविशेष.)

देखोनियां धरणिजा[1] भयभीत झाली, वर्णीतसे सखिपुढें रविवंशशाली.॥२५

‘अयोध्येचा राजा दशरथ महाख्याति जगतीं,
गभस्तीचे[2] वंशीं नृपसुत निरीक्षीं रघुपती; ।
असे मार्गी केला मुनियुवतिउद्धार[3] चरणें
पुढें विश्वामित्राऋषिजवळि तो त्वां वळखणें. ॥ २६

माथां कोटीर[4] साजे, जडित फणिमणीतेज दिक्प्रांत माजे,
कर्णी श्रीकुंडलीं जे, मणि लखलखती ज्यांसि चंद्रार्क[5] लाजे; ।
नानारत्नीं विराजे पदक हृदयिंचें रावणालागिं डाजे[6],
ब्रीदांचा घोष गाजे निबिड पदयुगीं तोडरीं बद्ध राजे. ॥ २७

भाळीं त्रिपुंड्र[7]करवर्तुळ दंड दोन्ही सामुद्रिकीं सकळलक्षणयुक्त चिन्हीं, ।
आपादमस्तक[8] रुळे नव वैजयंती[9] कंठीं नवीन तुळसीस्रज[10] भाग्यवंती. ॥ २८

कणत्किंकिणी[11]क्षुद्रघंटा [12]नितंबी महारत्न[13]कांची[14] निनादें विलंबी, ।
करीं चाप नाराच[15] तो देख दृष्टीं शरीं अक्षयी[16] बांधला तूण[17] पृष्ठीं. ॥ २९

इंद्रनीळ[18]मणिकीळसांवळा कांति कोटि कुसुमेश[19]पूतळा, ।
कंकणें जडितमुक्तहस्तकीं रत्नपुंज अवतंस[20] मस्तकीं. ॥ ३०

निर्धनासि धन जेंवि सांपडे, जानकीस नयनीं तसा पडे, ।
अंतरीं मदनमूर्ति रंगली, बाह्यदृष्टिसि समाधि लागली. ॥ ३१

देखतां विकळरूप धारणा घालिती सहचरी[21] समीरणा[22] ।
बाह्य चंचल पदार्थ वर्जिले, नेत्रपद्म उदकें समार्जिलें. ॥ ३२

उपरि सावध होउनि जानकी मग म्हणे, ‘परिसें विजये! सखी ।
रघुविराविण कांत[23] मना नये, त्वरित भेटविं तों मजला सये! ॥ ३३

कठिण कांसवपृष्ठ तसें धनू[24] मदनमूर्ति रघूत्तम आननू ।
विजयि[25] होइल काय कळे मला, अह! पित्या! पण दारुण घातला. ॥ ३४

---

१. सीता. २. सूर्याचे. ३. अहल्येचा उद्धार. ४. मुकुट. ५. चंद्र आणि सूर्य. ६. रावणाच्या हृदयांत सले. ७. मृत्तिका, गोमय, गंध इत्यादिकांचा तीन पट्ट्यांचा तिलक, शिवशक्त्युपासक कपाळीं लावतात तो. ८. मस्तकापासून पायांपर्यंत. ९. मालाविशेष. (विष्णूचें भूषण.) १०. तुळशी-मंजरींची माळा. ११. वाजणारे घुंगुर. १२. कटीचे ठायीं. १३. रत्नखचित. १४. कमरपट्टा. १५. बाण. १६. क्षय न होणारा. १७. भाता. १८. इंद्रनील मण्याच्या शकलांसारिखा नीलवर्ण. १९. मदन. २०. तुरा. २१. सोबतिणी. २२. वायूला. २३. पति. २४. शिवचाप. २५. जयशाली.

रा[1]म दिसे सुकुमार निमासुर सुंदर ना[2]गर मन्मथगाभा
　　हस्त सुकोमल अं[3]बुदशामल [4]चाचर कुं[5]तल [6]षट्पदशोभा, ।
वज्रशरासन त्याप्रति शासन केंवि घडे रघुनंदनहातें ?
　　रावण हें उचलील कदाचित तैं त[7]नु टाकिन वाट पहातें.' ॥　　३५
येरीकडे रावण सिद्ध झाला, कोदं[8]ड दंडें उचलावयाला. ।
अन्य प्रभू त्यासम कोण तोले? देखोनि सीता मग काय बोले. ॥　　३६
　'लंकेशा नुचलो शरासन', म[9]ही मातेसि सीता म्हणे,
　　'अंबे ! मंगलमातरे ! सुखकरे । तस्मै नमो ब्रह्मणे; ।
　देवद्रोहक हा छळीं, क्षितितळीं पाडीं उताणा वरी
　　चक्रन्यायजवें उरावरि भ्रमो कोदंड वज्रापरी. ॥　　३७
　विघ्नेशा ! करिं विघ्न चाप नुचलो लंकेश्वरा दुर्मदा,
　　[10]भूतेशा ! नुचलो त्रियंबक तुझें दुष्टा छळो सर्वदा; ।
　चामुंडा नवकोटि येउनि बळें बैसोत बाणासनीं
　　[11]देवी छप्पनकोटि भार धनुषीं घालोत कात्यायिनीं. ॥　　३८
　शेषा ! येउनि भार घाल धनुशीं भूभार घेवोनियां,
　　इंद्रा ! निर्जरकुं[12]जरांसहित तूं आकाशें येवोनियां; ।
　लंकेशा छळिं सत्यलोकरमणा ! ये आदिनारायणा !
　　कूर्मा ! तूं निजकूर्मचक्र फिरवीं त्रैलोक्यपारायणा ! ॥　　३९
　भैरुंडा भुवनेश्वरी भगवती ऐंद्री उमा षोडशी,
　　श्रीबाळा बगळामुखी व्रततिथी एकादशी द्वादशी, ।
　तारा पं[13]चदशी सरस्वति ! महा आरूढ हंसावरी
　　सावित्री शचि [14]काळरात्रि ! धनुषीं बैसोत धन्वंतरी. ॥　　४०
　अष्टौ भैरव आठकोटि गणना वेताळ भूतावळी,
　　भूत प्रेत पिशाच विभ्रतितनू झोटिंग मुंजे बळी, ।
　[15]कूष्मांडादिक पूतना दृढबळि श्री[16]शाकिनी [16]डाकिनी,
　　क्रूरा क्रूरतरा धरा धनु महामारी तुम्हीं या दिनीं. ॥　　४१

---

१. सवाई वृत्त. २. चपल. ३. मेघासारखा कृष्णवर्ण. ४. जटा. ५. केश. ६. भ्रमरासारिखे नीलवर्ण. ७. देह. ८. चाप. ९. पृथ्वी. १०. महादेवा. ११. 'सर्वे येउनि भार या धनुषिं त्या घालोत कात्यायिनीं' असाही पाठ आहे. १२. देवांचे हत्ती. १३. पूर्णिमा. १४. काळरात्रि ही महाभयंकर आणि संहारकारक अशी भवानीची मूर्ति होय. १५. शिवगणादिक, कुष्मांड=भूतगणविशेष. १६. पिशाचीविशेष.

नवस परशुरामा! हें तुझें चाप आहे
विसभुजिं उचलीतां मी न वांचेन पाहें, ।
धनुष जड करावें होसि षष्ठावतारी[1],
तुजविण जडजीवाकारणें कोण तारी? ॥ ४२

नगरजन मिळाले चित्रे[2] पाहावया तें
अभिनव मग तेहीं देखिलें रावणातें; ।
भूभुज[3] सकळि तेथें पाहती खाल मानें
गगनिं सुरवरांचीं स्तब्ध झालीं विमानें. ॥ ४३

लंकेचा नृप कास घालुनि पुढें चापाकडे चालिला,
मूधूलीं भुज मार्दिले भुजबळें मूर्धाबळें तोलिला; ।
देखे त्र्यंबकचाप, कांप सुटला सैंटोप आरंभिला,
दावी भाव सितावरास सकळी धैर्यें उभा राहिला. ॥ ४४

तें इंद्रवज्रासमतुल्य भासे, लंकेश भूधूलि भुजांसि घांसे, ।
स्पर्शें सितेच्या बळहीन केलें कोदंड तोली तंव धैर्य गेलें. ॥ ४५

देशावरीं संचित फार केलें, तें तस्करीं द्रव्य हिरोनि नेलें, ।
झाला तसा न्याय दशाननातें, लज्जा नृपांची धिर दे मनातें. ॥ ४६

ओढी चाप विसांभुजीं न गवसे तों मांडखुंटी बसे,
जानू टेंकुनि भूमिसी भुजबळें तोलूनि पाहातसे; ।
हालेना तिळमात्र, याउपरि तें कोदंड आलिंगिलें,
पोटीं धाक न माय, कंप सुटला, गुल्फावरी आणिलें. ॥ ४७

झोलें तोलें प्रतापें धरित विसभुजीं आणिलें जानुदेशीं,
टेंका पृथ्वीसि ज्याचा शिथिल डळमळी नावरे साक्षपेंसी; ।
सर्वांगीं खेद[10] दाटे, धनुष उलथलें, वायु त्या साह्य झाला,
त्याच्या झोकें उताणा क्षितिवरि पडला, नाद धात्रीं विझाला. ॥ ४८

मेरूचा खचला कडा तडकला[11], भूगोल ढांसाळला,
सूर्याचे रथिचा तुरंग कचला[12], ऐसा निधों[13] दाटला. ।

---

१. सहावा अवतार धरणारा परशुराम. २. आश्चर्य. ३. राजे. ४. गर्वानें, अभिमानानें, मगरुरीनें. ५. दोरीच्या. ६. गोळा केलेलें. ७. पायाचा घोटा. ८. गुडघा, ढोंपर. ९. 'त्याच्या धाकें उताणा क्षितिवरि पडला जरिं तें सीत चंड त्रैलोकीं कोणि नाहीं हरिविण दुसरा सीतधारी प्रचंड' असाही पाठ आहे. १०. घाम. ११. फुटला. तडकणें=चीर जाणें, फाटणें, फुटणें. १२. कचणें=कचरणें, कच खाणें, भयानें मागें सरणें. १३. त्रास.

नेणों मेघ गडाडिला, समय तो **लंकेश्वरा** वर्तला,
**सीता**मानस फार तांडवनटें नाचे महा हर्षला. ॥ ४९
टाळी एकचि पीटिली, जनपदीं पौरांगना हांसती,
झालासे कलका महागलबला, नादें दिशा घूमती; ।
**सीता** हास्य करीतसे गदगदां, भीती प्रभू अंतरीं,
झालें विघ्न विटंबिलें, सखि म्हणे, 'श्री**राम**चंद्रा वरीं.' ॥ ५०
जैसें वज्र **हि**मालयावरि पडे कोदंड तैशापरी,
भारें **रावण** खालता दडपला मुद्रा जडे खेचरी, ।
तोंडीं रक्तहि धूलि त्यांत भरिली आरक्त झाली तनू,
चक्रन्याय उरोदरावरि फिरे वज्रोपमा तें धनू. ॥ ५१
ज्या चापें **त्रिपुरें**[1] विशाळ नगरें निर्दाळिलीं **शंकरें**,
तें क्रोधें करिं[2] घेउनी उचलितां दुर्विघ्न झालीं पुरें, ।
रक्ताच्या उलट्या[3] वमे[4] भडभडां, प्राणांत आरंभिला,
तेव्हां त्याजवळी प्रधान निकरा[5] देखोनि धांविन्नला. ॥ ५२
**सू**मंतादि प्रधान चंड बळि ते बाणासना[6] झोंबती,
कैचें रत्नकिरीट भूतळवटीं शीरें रितीं लोळती; ।
कोदंडाप्रति लोटिलें, उठविला **लंकापती सारणें**[7],
टाकी श्वास, घटोदकें मग मुखें प्रक्षाळिलीं **रावणें**. ॥ ५३
केला सावध **सारणें**, मग सभेमध्यें पुन्हा बैसला,
झांकी **रावण** सुंदरें निजमुखें श्लोकार्थ वाखाणिला; ।
झाला लौकिक लाज, मृत्यु चुकला, दैवें असें जाहलें
नेणो काय करील दुर्भंग महाराजां मनीं बैसलें. ॥ ५४
श्री**राम** भंगिल धनू पुढिल्या प्रसंगीं, तें आइका प्रगट काव्यकथातरंगीं; ।
**सीता**स्वयंवर मनोहर सर्ग चौथा, तोडील **विठ्ठल** म्हणे भवभोगवेर्था. ॥[9] ५५

---

१. तारकासुर, कमलाक्ष व विद्युन्माली या तीन दानवांसाठीं मयासुरानें लोह, रजत आणि सुवर्ण यांचीं बांधलेलीं तीन नगरें. हीं शंकरानें देवांच्या प्रार्थनेवरुन जाळून टाकिलीं. २. 'दशकंधरें उचलितां' असाही पाठ आहे. ३. उलटी=ओकारी, वांति. ४. ओके. ५. आणिबाणीचा प्रसंग. ६. धनुष्याला. ७. रावणाच्या अमात्यांतील एक. ८. व्यथा. ९. या सर्गाचें नांव 'रावणगर्वपरिहरण' असें एका जुनाट हस्तलिखित प्रतींत आहे.

## सर्ग पांचवा.

(श्लोक.)

द॒शग्रीव काचावला मानभंगें, महाकार्मुकें चूर्ण केलीं षडंगें,
सभेमाजि राजे भयाभीत झाले, सुपर्णापुढें सर्प जैसे झुझाले. ॥ १
सदसिं जनकरायें काय विज्ञप्ति केली?
दशवदनभुजांची शक्ति खुंटोन गेली; ।
लववुनि शिवचापा ज्या चढे त्या उदारा;
त्रिभुवनजयलक्ष्मी मैथिली होय दारा. ॥ २
गांभीर्य धैर्य बहु वीर्य तुम्हांसि आहे, यांमाजि एकहि नुठे धनुषा न पाहे; ।
पृथ्वींत वीर दशकंधर काय होता, तो भंगला गरुडदृष्टि जसा कपोता. ॥ ३
राजे स्तब्ध भयासि लुब्ध अवघे वाग्बद्धचित्रोपमा,
प्रेतपाय अधोमुखें न वदती जाणोनि त्यांची क्षमा; ।
राजा बोलतसे तटस्थ नृपती टाकोनि संभाषणें,
'निःसंदेह मला गमे वर नसे श्रीजानकीकारणें. ॥ ४
भूगोळीं जितुके महींद्र तितुके आले सभासंगमा,
कन्या हे कलधौतसुंदरगुणी श्रीकीर्तिलाभोद्यमा, ।
वोढीना ठणकारिना लवविना उत्थापिना येस्थळीं
कोणीही न धरी महाधनु करीं निर्वीर उर्वीतळीं.' ॥ ५
ऐसें उत्तर आइकोनि ऋषिनें रामाकडे पाहिलें,
'आज्ञा' पूज्य समर्थ राघव म्हणे तों लक्ष्मणें बोलिलें, ।
'झाला रावणमानभंग जनकें निर्वीरसें मानिलें
हा तों शब्द न साहवे रविकुळीं आम्हां उणें आणिलें.' ॥ ६
आवेशें दृढ कास घालुनि म्हणे दोर्दंड मर्दूनियां,
'माझें कौतुक पाहणें नृपसभेमध्यें तुम्हीं स्वामियां, ।
मेरू मंद्र समुद्र चंद्र न गणीं दासास आज्ञा किजे,
हें तों जीर्ण पिनाक काय गणना सामर्थ्य वीलोकिजे.' ॥ ७
राघवें मधुर बोलिलें कसें, लक्ष्मणा! क्षणभरी उगा असें, ।
कौशिकें मज समर्पिलें जरी, एकल्या नच चटे उठें तरी. ॥ ८

---

१. कचला. २. सहा अवयव. ३. गरुडापुढें. ४. घाबरले, भ्याले. ५. सभेमध्यें. ६. स्त्री. ७. राजे. ८. सुवर्ण, रुपें यांसारिखे सुंदर गुण जीचे असी. ९. विश्वामित्रानें.

पाहें सुमित्रा उगलाचि बैसें, निर्वीर उर्वीतळ होय कैसें, ।
आम्हांसि हा शब्द उणा न साहे, राजा मनीं विस्मित होय राहे. ॥ ९
घातली सदृढ कास राघवें, वंदिलें [१]गुरुपदाब्ज [२]लाघवें, ।
ठेविला वरद हस्त मूर्धनीं, 'पाव तूं विजय चाप मर्दुनी.' ॥ १०
जनकजा मिरवे [३]उपरीवरी [४]सहचरी [५]वसनांचळ सांवरी, ।
सखि म्हणे, 'रघुवीर उभा असे, धनुष भंगिल संशय हा नसे'.॥ ११
ती भूमीसि म्हणे, 'उमानिधनुषा ! रामासि साह्या करीं,
शेषा लोटिं शरासनासि तपना ओढीं सहस्रां करीं, ।
शंभूकार्मुक आवरीं दशभुजीं पृष्ठीसि कूर्मा धरीं,
चापा दिग्गज हो ! धरा विधि तुवां होई हळू तें करीं. ॥ १२
तीर्थें व्रतें जप पुरश्चरणादि दानें, उद्यापनादि हवनें द्विजभुक्तमानें, ।
साह्या करो सुकृत पूर्विल आजि मातें, भंगो शरासन खरें रघुवीरहातें. ॥ १३
नाना तिणें नवसिले सुर भूमिसाक्षी, भंगावया धनुष ऊदित सर्वसाक्षी; ।
श्रीमूर्ति ते उभि असे [६]भुपतींत देखा, त्याच्या स्वरूपिं दुसरा करि कोण लेखा ?॥
केयूरांगद कुंडलें मणगटीं, [७]जांबूनदें कंकणें,
वांकी तोडर गर्जती घनरवें पादांबुजीं भूषणें; ।
सीताचित्तमयूर नृत्य करि तो श्रीराम सर्वांपुढें,
[८]धीरोदार उभा प्रतापमहिमा नेणेति शास्त्रें मुढें. ॥ १५
राजे मानवदेवदानवसभे नृत्यांगना नाचती,
वाद्यांचे घनघोष होति, अवघे रामाकडे पाहती; ।
नाना तें [९]चतुरंग सैन्य परिधीं पाहों उभें ठाकलें,
विप्रांचे जयशब्द होति अवघे चित्रोपमा थोकले. ॥ १६
भाळीं लाउनि तर्जनी भुजलता भूपासुनी मर्दिल्या,
ज्यांला भूषण सुंदरें अतिमणी विद्युल्लता वर्जिल्या; ।
तेजःपुंज कटाक्ष [१०]कंजचरणीं झुंकारती नूपुरें,
[११]कांची किंकिणि घंटिका लघुकटीं ब्रीदें अतीसुंदरें. ॥ १७

---

१. गुरुचरणकमळ. २. अल्पप्रयत्नें. ३. माडीवर. ४. दासी. ५. वस्त्राचा पदर. ६. येथें वृत्तसुखार्थ 'भू' ऱ्हस्व केला आहे. ७. सुवर्णमय. ८. धीर+उदार. ९. गज, अश्व, पदाति, रथ, या चार प्रकारांनीं युक्त असें. १०. कमलरूप पायीं. ११. कमरपटा.

उल्हासें चमकोनि जाय धनुषापाशीं उभा राहिला,
सांगातें अवघे पुरोहित पुढें श्री**राम** तो एकला; ।
कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें,
दोर्दंडें उचलोनियां चढविलें कर्णांत[1] तें ओढिलें. ॥ १८
**रा**मानें सहवर्तमान मुनिच्या कोदंड उच्चालिलें,
राजे आणि **वि**देहसंशयधिया संयुक्त आस्फाळिलें; ।
**सी**ताचित्तसमेत ओढुनि भृगूपुत्रादि[2] साहंकृती,[3]
त्यांचा दुर्मद गर्व भंगुनि धनुर्भृत्त्यक्तसर्वाकृती[4]. ॥ १९
घोषें चाप कडाडिलें **र**घुपती कोदंड ओढी बळें,
तेंव्हां[5] कोटि कडाडिलें घन विजा कोदंडकोलाहलें; ।
सीमा सांडिति सिंधु, मस्तक तुकी[6] **शं**भु स्वयें आपुलें,
ते सर्वै भुप **राम** शक्ति नयनीं देखोनि वेडावले. ॥ २०
कोपे शेष उलंडलीं उडुगणें[7], हेलावला वारिधी,
राजे विस्मित, **राम** सस्मित[8] उभा, जो शौर्यतेजोनिधी; ।
**वि**श्वामित्र **सु**मित्र मित्र अवघे भूपाळ **मा**रू[9] कुरू,
**लं**केशा **ज**नकादि त्यांत विजयी कोदंडदीक्षागुरू. ॥ २१
निक्षत्री क्षितिचक्र एकविसदां केलें बळें **भा**र्गवें,
युद्धीं राक्षस दुष्ट दैत्य वधिले चापाचिया आर्जवें; ।
तीं पापें धनुषासि घोर वडलीं प्रायश्चिता योजिलें,
देह श्री**र**घुनाथपाणिकमळीं तीर्थीं परित्यागिलें. ॥ २२
पुष्पें निर्जरें[10] वर्षले, 'जय जय श्री**राम**!' गर्जिन्नले,
स्वर्गीं वाजति देवदुंदुभि, तुरें भूर्लोक संतोषले; ।
निर्घोषें बहु गर्जल्या नभ दिशा संपूर्ण नादें भरे,
**सी**तेच्या स्फुरती भुजा **र**घुविरा भेटावया आदरें[11]. ॥ २३
निशाणाच्या घायीं ध्वनित बिरुदाईत विजयी,
ऋषी **वि**श्वामित्रादिक सुखि **सु**मित्रादि विषयी; ।

---

१. कर्णापर्यंत. २. भार्गवराम. ३. गर्विष्ठ. ४. धनुष्य धरणारे जे राजे त्यांकरवीं टाकविल्या आकृती ज्याणें असा. ५. 'दिग्मातंग थरारिले रविरथीं उच्चैश्रवाद्दक् भुले' असाही पाठ आहे. ६. हालवी, डोलवी. ७. नक्षत्रें. ८. हास्ययुक्त. ९. मरुदेशसंबंधी. १०. देव. ११. 'गौरवें' असाही पाठ आहे.

पुढें झाले राजे रघुपति विराजे तदुपरी,
उभी पाहे सीता प्रमुदित[1] धराया धनुकरी[2]. ॥ २४
पुढें आला बाहो[3] पसरुनि तदा कौशिकमुनी,
तयातें वंदूनी रघुविर[4] वदे नम्रवचनीं, ।
म्हणे, 'स्वामी झाला विजय धनुषापासुनि मला,
गुरूआशीर्वादें[5] सकळ भवसंताप[6] हरला.' ॥ २५
सौमित्रा परिरंभिलें[7] रघुविरें राजे यथानुक्रमें,
अर्धोन्मीलित[8] नेत्र रावण दिसे जो चेवला[9] विक्रमें; ।
श्रोत्रीं साधु महानुभाव[10] अवघीं श्रीराम आलिंगिला,
रत्नें कांचनपर्यळीं[11] प्रणयिनीं[12] काकुत्स्थ[13] ओवाळिला. ॥ २६
सभेमध्यें नेला रघुविर समस्तीं नृपवरीं,
दिसे जैसा मेरू मणिमयमहाशैल शिखरीं; ।
विमानें देवांचीं निबिड दिसती दिव्य गगनीं,
कसा आकर्षीतो सितें[14] रघुपती पाहुं नयनीं. ॥ २७
रंभा उर्वशि मेनिका नृपसभे इत्यादि देवांगना,
आल्या नृत्य करावयासि सरिसे गंधर्वही गायना; ।
भाटादी[15] गुण वर्णिती, जनक दे सत्कार त्यांकारणें,
झालें राम निरीक्षितां सुरवरां नेत्रांबुजां[16] पारणें[17]. ॥ २८
प्रधानासि सांगीतलें भूमिपाळें, 'तुम्हीं जानकी आणिजे शीघ्रकाळें.' ।
नृपातें तिहीं मूर्धनी[18] नम्र केले, सवें सैन्य आणावयालागिं गेले. ॥ २९
सहस्रावधी धांवले वेत्रपाणी[19], पुढें होतसे पीयूषातुल्य[20] वाणी, ।
'धनू भंगिलें रामचंद्रें प्रतापें, तुम्हांलागिं पाचारिलें शीघ्र बापें. ॥ ३०

---

१. हर्षयुक्त. २. राम. ३. बाहु, भुज. ४. रघुवीर. ५. गुरूच्या आशीर्वादानें. ६. संसाराचा ताप. ७. आलिंगिलें. ८. अर्धे उघडलेले नेत्र ज्याचे असा. ९. शेंफारला, फुरफुरला. १०. थोर आहे प्रभाव ज्याचा असा; महाशय, प्रशस्तमन, सदाचारसंपन्न. ११. सुवर्णाच्या ताटीं. १२. प्रेम करणाऱ्या जनांनीं. १३. ककुत्स्थ नामक राजाच्या वंशामध्यें झालेला राम. हा ककुत्स्थ राजा महापराक्रमी होता. इंद्राचें यानें मोठें कार्य केलें. इंद्रानें आपले शत्रु मारण्यासाठीं वृषभाचें रूप घेतलें. त्याजवर हा राजा बसला. नंतर यानें इंद्राचे शत्रु मारिले तेव्हां इंद्रानें संतुष्ट होऊन याचा मोठा मान केला, अशी कथा आहे. (ककुद=वृषांग, बैलाचें कोळें.) १४. धनुष्याची दोरी. १५. स्तुतिपाठक. १६. नेत्रकमळांला. १७. तृप्ति, संतोष. १८. मस्तक. १९. छडीदार. २०. अमृतासारखी.

द्वारीं उन्मत हत्तिणी उभि असे, शृंगार वेगें करा,
माळा घेउनियां करीं तुम्हि चला श्रीरामचंद्रा वरा.' ।
ऐसे उत्तर आइकोनि हृदयीं संतोषली **जा**नकी,
ते काळीं रसनायिका शिकविती **सी**तेप्रती साधकी. ॥ ३१
भूकन्याकुचकुंभ [1]कर्कश महा देखोनि लाजे [2]करी,
भ्रूचापें नयनासि मीन न [3]तुळे पावे कटी [4]केसरी, ।
[5]चंद्रास्या [6]अलिकुंतला मृगदृशा लज्जा पडे [7]मन्मथा,
ते तों मुख्य [8]**अ**जा [9]**वृ**षध्वजसखा त्याची प्रिया नान्यथा. ॥ ३२
[10]कंबुग्रीवा कृशांगी [11]त्रिवळिस उपमा [12]कामसोपान साजे,
[13]रंभास्तंभोरुकांडें अनुपम चरणीं नूपुरीं घोष गाजे, ।
रत्नें कीं दंतपंक्ती श्रुतियुत पुतळ्या ज्यांसि चंद्रार्क लाजे
भांगीं सेंदूररेखा, [14]मृगमद [15]निढळीं, [16]मुक्त नाकीं विराजे. ॥ ३३
**सी**तेची लांब वेणी नवकनकमणीं साम्य साजे [17]त्रिवेणी,
ल्याली संपूर्ण [18]लेणीं, [19]कटिस्थळ हरिणीसाम्य [20]लावण्यखाणी, ।
[21]केयूरें पोतिपाणी तळयुगचरणीं [22]रक्तबिंबोष्ठखाणी,
कंठीं माला पुराणी स्तविति कवि गुणी गौरवा मंदवाणी. ॥ ३४
अंगीं चंदन चर्चिला परिमळा, कासे [23]पट्ट [24]कासिला,
ल्याली दाटित कंचुकी [25]मणिकरामध्यें हिरा गुंफिला; ।
रत्नें शोभति कंकणें मणगटीं पंचांगुलीं [26]मुद्रिका,
नेत्रीं अंजन घातलें मग दिसे जैसी [27]शरच्चंद्रिका. ॥ ३९

---

१. कठिण. २. हत्ती. ३. साम्य. ४. सिंह. ५. चंद्रमुखी. ६. भ्रमरांसारखे काळे कुंतल (केश) जीचे अशी. ७. कामा. ८. जन्मरहिता. (माया.) ९. महादेवाचा सखा. (राम.) १०. शंखासारिखी मान जीची अशी. ११. उदराच्या तीन चिरम्यांचा समूह ती त्रिवळी. १२. कामाचें (मदनाचें) सोपान (शिडी). १३. केळीच्या खांबासारिख्या मोठ्या मांड्या जीच्या अशी. १४. कस्तूरी. १५. कपाळीं. १६. मोत्यें. १७. गंगा यमुना व सरस्वति यांच्या संगमासारखी तीन पेड्यांची. १८. अलंकार. १९. या चरणांत 'कटिस्थल' येथें छंदोभंग झाला आहे. 'वत करिति झणी नेत्र देखोनि एणी' असाही पाठ आहे. २०. सौंदर्याची खाण. २१. बाहुभूषण. (बाजुबंद, वांकी इत्यादि.) २२. पिकलेल्या तोंडल्यासारखे ओंठ. २३. पट, पीतांबर. २४. बांधिला, नेसिला. २५. मण्यार, जव्हेरी मणेर. २६. आंगठ्या. २७. शरत्कालांतील चांदणें, चंद्राची कांति.

विरोल्या पो[1]ल्हारें [2]अनवट झणाणीत विजयी,
　　पदांगुष्ठीं लेणें रुणझुणित ल्याली गुणमयी; ।
सुगंधें सौगंधें नग कनक [3]जांबूनद अजा
　　विराजे श्री**सी**ता, मग [4]मुकुर पाहे **जन**कजा. ॥ ३६

सुपक्का पानाच्या मग [5]हेडपिणी देति विडिया,
　　उभी राहे **सी**ता पसरिति भुमीं पायघडिया; ।
पुढें आले मंत्री स्तुति करिति, 'माते! अवनिजे !
　　करीं माळा घेई करिणिवरि बैसें **जन**कजे !' ॥ ३७

म्हणे माता **सी**तेप्रति मधुरपी[6]यूषवचनीं,
　　'तुझ्या योगें आम्हीं त्रिभुवनिं महाधन्य जननी ! ।
वरी श्री**रा**मातें, उशिर न लवीं, वेळ बरवी;
　　म्हणे लाभस्तेषां अभिजित मुहूर्तोदय रवी.' ॥ ३८

निघाली प[7]द्माक्षी घवघवित [8]शृंगारसरिता,
　　जिंच्या सौंदर्यासी [10]सुरयुवति सामान्य बहुता, ।
पदें मंदें टाकी [11]गजगमनगा मं[12]जुगतिनें,
　　महाद्वारीं केलें प्रगट निजरूपा मग तिनें. ॥ ३९

विड्या देती एकी [13]उशिरव्यजनें एक [14]विजिती,
　　उभ्या एकी हातीं जडित पिकदान्या मिरवती; ।
लघूवस्त्रें एकी [15]मुखमुहुरबिंदूसि पुसती,
　　सख्या एकी तीसीं बहुमधुरशब्दें रिझविती. ॥ ४०

पुढें शृंगारेंसी मणिचवर ढाली युत बरी,
　　म्हणे **सी**तेपाशीं, '[16]करिणिवरि आरोहण करी;' ।
प्रवेशे सोपानें उपरि मिरवे आसनपदीं,
　　प्रभा फांके तेणें लखलखित भूगोळ अगदीं. ॥ ४१

---

१. स्त्रियांच्या पायांतील अलंकारविशेष. २. रुप्याचा अलंकारविशेष. ३. सोन्याचे. ४. आरसा. ५. न्हाव्यांच्या स्त्रिया. ६. अमृत. ७. कमलाक्षी. ८. शृंगाररसाची नदी. ९. 'सख्या संभारेशीं स्तुति करिति आनंदभरिता' असाही पाठ आहे. १०. देवांची स्त्री. ११. हत्तीसारखी मंद चालणारी. १२. सुंदर गतीनें. १३. वाळ्याचे विंझण्यानें. १४. वारा घालिती. १५. मुखावरीऊ घामाच्या बिंदूला. १६. हत्तिणीवर.

समारंभें सेनागवसित विराजे जनकजा,
पुढें नानावाद्यें प्रमुदित निघाली [१]कमलजा; ।
सभास्थाना आली करिणिवरि बैसोनि विजयी,
[२]करांभोजीं माळा नृपजनकबाळा गुणमयी. ॥ ४२

श्रोत्री वैदिक वैद्य पंडित मुनी ईहीं सभा दाटली,
राजेमानवयक्षदानवचमू दाहींदिशीं शोभली, ।
नादें [३]अंबर कोंदलें दुमदुमी, आल्हाद सर्वां मनीं,
आटाळ्या [४]उपऱ्यांवरी जन मिळे पाहावया लोचनीं. ॥ ४३

देवाचे जयशब्द होति गगनीं [५]भूदेव [६]धात्रीतळीं,
विश्वामित्र ऋषेश्वरादिक मुनी होते सभामंडळीं; ।
श्रोत्री वैदिक शांतिपाठ म्हणती देवांगना नाचती,
गंधर्वाप्सरगायनें अनुपमें [७]स्वस्त्यायनें गर्जती. ॥ ४४

मागें हस्तिणिये अमात्य सरिसे मंदें पदें चालती,
हातीं कांचनरत्नदंड सरळे पंथीं पुढें धांवती; ।
दूती वारिति [८]चामरें, मणगटीं झुंकारिती कंकणें,
सीतेला मग दाविती सहचरी श्रीराम तो पाहणें. ॥ ४५

पुढें विश्वामित्राजवळि जगदात्मा रघुपती
महामूर्ध्निस्थानीं मुकुटमणितेजें झळकती; ।
नवा कासे पीतांबर कटितटीं युक्त [९]रसना,
पदांभोजीं नादाकुळित बिरुदें शत्रुशमना. ॥ ४६

सीता श्रीरघुवीर धीर नयनीं देखोनि आनंदली,
हातीं घेवुनि माळ बाळ हरिणी नेत्रापुढें पातली, ।
देवर्षीनृपसूर्यसाक्ष धरणी लोकीं सभा दाटली,
हर्षें तेसमयीं रघूत्तमगळां माळा निकी घातली. ॥ ४७

सुलग्नीं माध्यान्हीं [१०]अभिजित [११]पतंगें गवसिला,
[१२]महीजेनें तेव्हां रघुविर निजांगें [१३]प्रणियला; ।

---

१. लक्ष्मी. २. हस्तकमळांत. ३. आकाश. ४. मांड्यांवर. ५. ब्राह्मण. ६. पृथ्वीतळीं. ७. स्वस्त्ययन=अरिष्टनिरसनार्थ केलेलें मंत्रपठन, पुण्याहवाचन. ८. चवऱ्यांतें. चमर नांवाचे मृगविशेष असतात. त्यांच्या शेपटांस केंस पुष्कळ असतात. त्यांच्या चवऱ्या करतात. ९. डाव, कमरपट्टा. १०. मुहूर्तविशेष. ११. सूर्यानें. १२. सीतेनें. १३. वरिला. परिणय=विवाह.

नृपप्रीया रत्नीं रघुपतिसि ओवाळिति धनें,
विमानीं संतोषें त्रिदश[1] करिती वृष्टि सुमनें. ॥ ४८

वाद्यें वाजति, नाचती सुरसती, गंधर्व आलापिती,
आशीर्वाद मुनींद्र देति अवघे, मंत्राक्षता घालिती, ।
भाटां गौरविलें सभेसि जनकें सूर्यांश[2] जे वर्णिती,
त्यांतें द्रव्य अपार देत नृप तो राजे सभे पाहती. ॥ ४९

खगपति[3] भुजगाचीं जेंवि पाडी दुखंडें,
शिवधनु रघुनाथें भंगिलें तेंवि दंडें, ।
प्रणियलि भुमिकन्या कीर्ति त्रैलोकिं झाली,
दशवदनमुखासी काळिमा स्पष्ट आली. ॥ ५०

नृपति जनकभूपें पूजिले सानुरागें[4],
बहुत विनित झाला कीर्ति वर्णी विभागें; ।
दशमुख अपमानें शीघ्र लंके निघाला,
धरणिपतिसमूहो[5] त्यावरी[6] स्वार झाला. ॥ ५१

जनक दशरथातें मूळ योजी प्रधाना,
लिखित लिहित विश्वामित्र लग्नार्थ माना, ।
पुढिल कथन ऐसें पंचमः सर्ग झाला
अभय वरद देतें पंडितीं विठ्ठलाला. ॥ ५२

---

## सर्ग सहावा.

(श्लोक.)

धनुर्यागाप्रांतीं[7] नृप सकळ गेले स्वनगरा,
म्हणे विश्वामित्राप्रति जनकराजा मुनिवरा, ।
'स्वहस्तें गोसावी! लिखित अजपुत्रासि[8] लिहिजे
प्रधाना प्रेरावें, निज कुळ तुम्हीं सार्थक किजे.' ॥ १

विश्वामित्रें लिखित लिहिलें बुद्धिमंतें स्वहस्तें,
पूर्वारंभीं प्रभुति सकळीं भूतकर्मैं प्रशस्तें; ।

---

१. देव. २. सूर्यवंश. ३. गरुड. ४. प्रेमानें, प्रीतीनें. ५. राजसमूह. ६. त्यानंतर. ७. शेवटीं. ८. दशरथासि.

प्रज्ञावंतें कुशल दिधलें आपुलें पत्र रायें,
वार्ता सांगे नृपदशरथालागिं आणा उपायें. ॥ २

गेले प्रधान तिसरेमजले अयोध्ये, सेनासमूह सरिसे बळिवंत योद्धे; ।
वंदूनियां दशरथाप्रति पत्र देती, वाक्यें समर्पक सुधावचनें वदे तीं. ॥ ३

नृपतिदशरथातें प्रार्थिलें राजमंत्रीं,
विनवणि जनकाची वाचिजे सांग पत्रीं; ।
मग लिखित वसिष्ठें वाचिलें हर्षमानें,
अजसुत निजचित्तें आइके सावधानें. ॥ ४

ऋषीविश्वामित्रें प्रणमुनि वसिष्ठासि पहिलें,
पुढें आशीर्वादें नृपदशरथा पत्र लिहिलें; ।
'यशोदारांमध्यें त्रिभुवनिं तुझी कीर्ति मिरवे,
तुझे राया ! दोघे कुमर सुखि आहेत बरवे. ॥ ५

तुम्हांपासुनी स्वाश्रमा स्वार झालों, दिसां चौंच सिद्धाश्रमालागिं आलों; ।
पथीं राघवें ताटका मुक्त केली, असी कीर्ति लोकत्रयामाजि गेली. ॥ ६

पुढें याग संरक्षिला सप्तरात्री, सुबाहू निमाला तिळप्राय गात्रीं, ।
मरीची पिसारोन लंकेसि गेला, अहल्येसि उद्धार मार्गांत केला. ॥ ७

तदुपरि जनकाचें मूळ आम्हांसि आलें,
मिथुळपुरिसि गेलों थोर आश्चर्य झालें; ।
रघुविरकरतीर्थीं त्यागिलें देह चापें,
प्रणिलि मग सिता ते रामचंद्रें प्रतापें. ॥ ८

धनुष दमुनि झाली जानकी रामभार्या,
म्हणवुनि तुम्हि यावें सर्वथा लग्नकार्या; ।
विधियुत परिणावी मैथुळी लग्नदानीं.'
दशरथ हरिखेला धाव घाली निशाणीं. ॥ ९

सुमंतासि पाचारिलें भूमिपाळें, म्हणे, 'सैन्य पाल्हाणिजे शीघ्रकाळें.' ।
नृपाज्ञेसि वंदूनि माथां महंतें, चमू सिद्ध केली प्रधानें सुमंतें. ॥ १०

अरब्बी इराणी हरी पंचरंगी, विराजेति कच्छी प्रयाणप्रसंगीं, ।

---

१. बुद्धिमंतें. २. अमृतवचनें. ३. झाला, मेला. ४. विवाह केला. ५. सज्ज कीजे. ६. घोडे.

महाधीर गंभीर ते घोर आंगें, बळें धांवतां टाकिती वायु मागें. ॥ ११

भांडारें बहु फोडिलीं दशरथें जीं जीर्ण संपादिलीं,
द्रव्यें बाहिर आणिलीं मग रथीं अश्वीं गजीं लादिलीं; ।
रत्नें फार अमोलिकें नृपवरें दिव्यांबरें घेतलीं,
हर्षे भूप, न सांठवे त्रिभुवनीं वाद्यें रवें मातलीं. ॥ १२

मार्कंडेयवसिष्ठकाश्यपऋषी हे चालिले गौरवें,
जाबालीमुनि वामदेव बहुधा कात्यायनादी स्वयें, ।
भूपाळें नरवाहनीं बसविले जे सृष्टिकर्ते[1] दुजे
श्रोत्री साधु महानुभाव सरिसे जे स्वाधिकारी पुजे. ॥ १३

घोडेही शत चालिले दुलदुलें[2] शृंगारिले साजिरे,
ज्यांचें गर्जन आयकोनि हृदयीं भूगोळ नादें विरे; ।
मुक्तें मंडित पाखरा[3] मखमली पृष्ठीवरीं साजती,
मोहाळीं[4] शिरताज[5] साज सडका[6] कांडें[7] पटे राजती. ॥ १४

वाजी[8] बोरचि[9], तोंड नीळ, तुरकी[10] श्रीपंचकल्याण[11] जे,
सारंगे[12] जरदे कुमाइत[13] महा देखोनि राजा भजे; ।
पायीं तोडर गर्जती, नभ खुरीं झेंपाविती चालिले,
नाना ते द्विट पर्वतीं नृपतिनें जिंतूनियां आणिले. ॥ १५

लांगूलें[14] पद कुक्षिभाग दुघडीं लाक्षा रजें रंगिले,
तोंडीं रत्न खलीन[15], जीन वरुते, दोहींकडे तंगिले; ।
दांडी[16] कानसमान, मान धवळे[17] नेणों दुधें धूतलें,
जे आपावरि[18] चालतां नभखुरीं नाहींत पैं रूतले. ॥ १६

---

१. प्रजापति. २. अलंकारविशेषें. ३. घोड्यास गोळी वगैरे न लागावी म्हणून वस्त्रादिकांचें आच्छादन घालितात ती. ४. अलंकारविशेष. मोहाळें=सकलादीचें तोंडासाठीं केलेलें आच्छादन. ५. शिरोमणि, मस्तकभूषण. ६. उंच वस्त्राची केलेली चौकट घोड्याचे पाठीवर घालतात ती. ७. सकलादीनें किंवा मखमालीनें मढिवलेली दोरी, जी घोड्याच्या जिनास असते ती. ८. घोडा. ९. घोड्याचा वर्ण. १०. तुर्कस्थानांत झालेला. ११. ज्याला पांच शुभलक्षणें आहेत असा घोडा; ज्या घोड्याचे चार पाय गुडघ्यापर्यंत पांढरे आणि तोंडावर पांढरा पट्टा असतो तो घोडा. १२. सारंगा=केवळ तांबडा नव्हे, कांहीं आंत काळसरपणा असावा अशा रंगाचा जो घोडा तो. १३. दांडी, अयाळ, गुडघे, पद, कान काळे असून शरीरानें रक्तवण असे घोडे. १४. शेंपट्या. १५. लगाम. १६. पुच्छ. १७. शुभ्र. १८. पाण्यांत.

पृष्ठीं राउत आयुधें मिरवती शस्त्रें अलंकारिले,
माथां टोप शरीरबंध कवचें सेनेपुढें थारले; ।
पायांचे गण चालिले [1]असिलता झोलीत ते हस्तकीं,
माजी सारसने भुजासि चवरें नाना तुरे मस्तकीं. ॥ १७

हस्ती मस्त दुरस्त डुल्लत उभे सिंदूर सोंडेवरी,
आंग स्थूळ विशाळ शूळ दशनीं ऐरावताचेपरी; ।
पृष्ठीं कांचनमंडितें अतिनिकें चौ[2]ढाल चित्रांबरीं;
[3]षष्ठीहायन पुष्करीं [4]गुंदरिले द्वीपांतरींचे [5]करी. ॥ १८

प्रभू संपदाशीळ तो **श्रा**वणारी, निघाल्या रथाच्या सहस्रादि हारी, ।
पताकाध्वजीं शोभती चित्रवर्णा, असे नित्य वास्तव्य तेथें सुपर्णा. ॥ १९
जरी हो ! प्रभू सर्वदा सिद्धमंत्रें, तरी राजचिन्हें धरावीं स्वतंत्रें, ।
महासिंह शार्दूळ मच्छादि दंडें, विशाळाक्ष त्यांचे जसीं वन्हिकुंडें. ॥ २०

मेघडंबर दिगंबर साजे, आतपत्र शिरिं एक विराजे, ।
सुंदरें बहुविधें रविपत्रें, देखिलें **द**शरथासि जगत्रें. ॥ २१

यंत्रें उष्टरपृष्ठिं वेष्टित गजीं सेनामुखीं चालती,
पायांचीं म्हणती [6]तुरंगम किती आम्हांपुढें धांवती; ।
वाद्यांचे बहु घोष होय बिरुदें वेताळ वाखाणिती,
दे सत्कार उदार धीर नृपती [7]शंक्रादि ज्यातें भिती. ॥ २२

गजस्कंधीं एकाहुनि अधिक एका प्रथुरथी,
विमानीं देवांसी इतर नरयानीं पुरपती; ।
समारंभें राजा **द**शरथ निघे जाय **मि**थुळे,
असे आला चौथे वसतिस पहाया जन मिळे. ॥ २३

[8]तुतारे नगारे तुरे शंख भेरी, मृदंगादि वीणे दमामे नफेरी; ।
डफांचे झणत्कार शृंगें बुरंगें, किती चौकडी झल्लरी वेणुरंगें. ॥ २४

**द**शरथ नृप आला आपुले वैभवेंसी,
जनपद चमु पाहों पातली गौरवेंसी, ।

---

१. खड्ग, तरवार. २. चौकोनी, चित्रविचित्र केलेलें वस्त्र. ३. गज. (साठ वर्षांचे). ४. माखले. ५. गज. ६. घोडे. ७. इंद्रादिक. ८. मुखानें वाजवावयाचें एक पितळेचें वाद्य.

**जनक** मग निघाला त्यासि भेटावयातें,
सरिसि सकळ सेना नोपमा[1] द्यावयातें. ॥ २५
वाद्यें चंड धडै धडै धडकती धों धों दमामे बळें,
भेरींचे भुबुकार शंखगजरें संह्लग्न दोन्हीं दळें; ।
यंत्रांचे[2] भडमार होति, धुळिनें मार्तंड[3] आच्छादिला,
पायांचे गण धांवती चमुपुढें पंथा तदीं दाटला. ॥ २६
सुवर्णाचे अंदू[4] लखलखित सेंदूरवदनीं[5]
घणाणीती घंटामणि झळकती इंदुदशनीं[6] ।
गलद्गंडस्थानीं मद गलित दानोदकझरे[7]
महांवंत[8] स्कंधीं गजचवरडोलें श्रित बरे. ॥ २७
रथांची निघाली असंभव्य थाटी, विराजीत दोनी दळें एकवाटी, ।
निनादीत[9] घोषें रथीं चक्रलोटी पथीं पादिनी पंथभूमीसि दाटी. ॥ २८
संनद्ध भार **मिथुलेंद्र** करूनि सानें, राजा निघे चमुपुढें तगटी निशाणें. ।
शृंगारिले तुरग कुंतलदिव्यदेही भेटावया **द**शरथाप्रति ये **वि**देही. ॥ २९
कटक[10] ऊतरलें पुरिबाहिरी उभविले पटकूट[11] जसे गिरी, ।
नियम जानवसासि[12] तयेस्थळीं स्थळ सुशीतळ रम्य वनस्थळीं. ॥ ३०
समारंभें आला **जनक** मग भेटे **द**शरथा,
तयामागें भेटी त्रिभुवनपती पितृसि तथा. ।
**व**सिष्ठासी तेव्हां नमुनि मुनिला क्षेम[13] दिधली
सभे आले तीं तीं कथिन अभिधानें तिं सकळीं. ॥ ३१
भूपाळें **भर**ता स्वनेत्रकमळीं श्री**राम**सा देखिला,
**सौ**मित्रासमरूप भासत पुढें **श**त्रुघ्न तो देखिला. ।
राजा विस्मित होय त्याचसमयीं भेटावयाकारणें,
**वि**श्वामित्र **सु**मित्र **रा**घव तिघे आले सभे पाहणें. ॥ ३२
**वि**श्वामित्रमुनीश्वरा 'कवण हे' राजा पुसे '[14]सांवळे ?'
'**कै**केपासुनि पुत्र हे **द**शरथा' सांगे ऋषी 'जावळे[15].' ।

---

१. न उपमा. २. तोफांचे. ३. सूर्य. ४. हत्तीला बांधावयाच्या सांखळा. ५. हत्तीच्या मुखांत. ६. चंद्रासारख्या शुभ्र दांतांत. ७. गंडस्थळापासून स्रवणाऱ्या उदकाचे झरे. ८. माहूत. ९. वृत्तसुखार्थ 'दी' दीर्घ आहे. १०. सैन्य. ११. तंबू. १२. वऱ्हाडास उतरावयास दिलेली जागा. १३. आलिंगन. १४. श्यामवर्ण. १५. जुळे.

'कौसल्यात्मज राम, लक्ष्मण तया माता सुमित्रा सती,'
ऐसें उत्तर आइकोनि मुनिसी बोले पुन्हा भूपती. ॥ ३३
'सीता राज्य हरावयासि मिथुळे आला [1]सुधन्वा पणें,
त्यातें मारुनि राज्य घेउनि दिलें म्या बांधवाकारणें. ।
तो मद्बंधु सखा [2]कुशध्वज असे राजा [3]संकाशीपुरी
कन्या दोनि तयासि त्या असति हो बंधूद्वया [4]अंतुरी. ॥ ३४
मांडव्या श्रुतकीर्ति एकि भरता शत्रुघ्नया दूसरी
सौमित्राप्रति ऊर्मिला, क्षितिसुता श्रीरामचंद्रा वरी; ।
मार्कंडेय वसिष्ठ काश्यप नृपापासीं सभेभीतरी
[5]निर्धारा शुभलग्न वेळ जनका विज्ञापिजे यापरी. ॥ ३५
[6]उत्तराफाल्गुनी तारका त्या दिनीं, लग्न निर्धारिलें मध्यमे [7]यामिनीं ।
सूर्यवंशावळी श्रीवशिष्ठें मुखें, वर्णिली आइका भूपतीसन्मुखें. ॥ ३६
सूर्यापासुनियां मनू प्रथम तो इक्ष्वाकु त्या बोलिजे,
पृथ्वी हे पृथुपासुनी तदुपरी उत्तानपादादि जे, ।
तत्पुत्र ध्रुव धुंधुमार परिसा राजे रवीवंशिचे,
मांधाता मुचकुंद पूर्वज हरिश्चंद्रादि या देशिंचे. ॥ ३७
पुढें झाला रुक्मांगद कुमर धर्मांगद तथा,
प्रतापी अंबर्षी मग सगर जाणा भगिरथा, ।

---

१. सुधन्वा–"इंद्रदेशाचा राजा. यानें सीरध्वजासमीप सीतेविषयीं मागणें केलें असतां, त्यानें सांगितलें कीं, 'माहेश चापाचा माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें भंग कर म्हणजे सीता मी तुला देतों.' ती गोष्ट हा मान्य करीना, त्यामुळें जनकहि यास सीता देईना. म्हणून यानें मोठ्या सेनेसहित येऊन, मिथिला नगरीस वेढा दिला, आणि जनकास व त्याच्या प्रजेस फार त्रास केला. त्यावरुन जनकास क्रोध येऊन त्यानें याशीं इतक्या निकराचें युद्ध केलें कीं, त्यांत यास ठार मारिलें, आणि याच्या देशाची राजधानी सांकाश्या नगरी तींत आपला भ्राता कुशध्वज याची स्थापना केली. या सुधन्व्यास कंबुग्रीव नांवाचा पुत्र होता." २. कुशध्वज–"ह्रस्वरोमा नामक जनकाच्या दोन पुत्रांतील दुसरा. सीरध्वज जनकाचा कनिष्ठ बंधु. हा इंद्रदेशाच्या सांकाश्या नामक राजधानींत राज्य करीत असे. (रामायण–बालकांड–सर्ग ७०). मांडवी आणि श्रुतकीर्ति त्या दोघी याच्या कन्या असून त्या यानें दशरथपुत्र भरत आणि शत्रुघ्न यांस क्रमानें दिल्या होत्या. सीरध्वजास पुत्र नव्हता म्हणून हाच पुढें मिथिलेचा राजा झाला होता. यास पुत्र होता त्याचें नांव धर्मध्वज जनक." ३. सांकाश्या नामक नगरी. (बालकांड–सर्ग ७० श्लोक ३.) ४. स्त्रिया. ५. निश्चित करा. ६. बालकांड–सर्ग ७२ श्लोक १३ पहा. ७. रात्री. ८. बालकांड–सर्ग ७० पहा.

ककुत्स्थापासूनी दिलिपनृपतीचा सुत रघू,
अजाचा हा पाहा दशरथ महाख्याति अलघू. ॥ ३८
अहिल्येचा ज्येष्ठात्मज मुनि शतानंद विनवी,
उपाध्या तो सांगे जनककुळविस्तारपदवी. ।
निमी राजा त्याचा मिथुलपुरविख्यातचि महा,
विदेही वैदेही जनक अभिमानी जनक हा.' ॥ ३९
तेकाळीं भरतासि मातुळ सखा आला असे पाहणें,
लग्ना राहविलें तया दशरथें यूधाजिताकारणें. ।
आले गोत्रज इष्ट मित्र समयीं लग्नासि पाचारिले,
केलें गौरव त्यांसि मंडप दिले स्थानांतरीं राहिले. ॥ ४०
केला लग्नविचारसार जनकें घेवोनि आज्ञा फुलें
आलासे निजमंडपासि मिरवी सौभाग्य तें आपुलें; ।
सीताभूमिसुतास्वयंवरकथाश्लोकार्थ वाचा निका,
वर्णी विठ्ठल सर्ग सप्तम पुढें विद्वांस हो आइका. ॥ ४१

---

## सर्ग सातवा.

(श्लोक.)

पूर्वी वेदवती, तयाउपरि ते पद्मा धरानंदिनी;
सीता श्रीमिथुळाधिराजतनया साक्षात मंदाकिनी. ।
कालिंदीतिरिं ऊर्मिळाजनक तो क्षेत्र प्रयागोपमा,
दोंमध्यें कविची सरस्वति वसे योग त्रिवेणीसमा. ॥ १
पुण्याहवाचन करी नृप वेदमंत्रें तैसाचि तो विधि किजे अजराजपुत्रें, ।
दों मंडपीं हळदि लाविलि वोहरांतें गर्जेति मंगळतुरें सुख निर्जरांतें ॥ २
नांदीश्राद्धविधान देवक नृपें संस्थापिलें मंडपीं,
गोदानें वसनें धनें जनक दे रत्नें द्विजां सांक्षपीं. ।

---

१. बालकांड–सर्ग ७१ पहा. २. मामा=केकयराजपुत्र युधाजित्. ३. हें संस्कृत व्याकरणाप्रमाणें 'विद्वस्' शब्दाचें अनेकवचन आहे. ४. लक्ष्मी. ५. यमुनातीरीं. ६. गंगा, यमुना, आणि सरस्वती या नद्यांच्या संगमाप्रमाणें. ७. विवाह, मौंजीबंधन, यज्ञ, इत्यादिकांचे आरंभीं जें कर्म करतात तें. ८. विवाहसूचक शुभलक्षण आहे. ९. वधूवरांतें. १०. वाद्यें. ११. देवांतें. १२. अगस्त्यानें.

त्यापेक्षां धन वेचिलें दशरथें उत्साह आरंभिला,
तेथें श्रीरघुवीर तारक भवा ब्रह्मा स्वयें बोलिला. ॥ ३
तदुपरि जनकाची पट्टराणी सु[1]मेधा
रघुपतिपदपद्मीं तीस अत्यंत मेधा[2], ।
मिरवत वनलक्ष्मी जाय तैसी निकुं[3]जा
रुखवत गजरेंसीं सांग सीमंतपूजा. ॥ ४
[4]अन्यांगनांसि दिधलीं वहनें अपारें,
यानासमान शिबिकायुत राजभारें, ।
शोभायमान जनकप्रमदा निघाली
गर्जेति भाटु पटु चाटु अचाटुशाली. ॥ ५
उल्हासें वरमंडपीं नृप निघे संगें सुमेधा सती,
आले बांधव सोइरे दशरथें सन्मान केला अती; ।
नाना ते पटकूट मंडपसभे बैसावया आसनें,
तेथें श्रेष्ठ वसिष्ठ कौशिकगुरू होती पुढें गायनें. ॥ ६
चारी चौरंग चौघां जनक नृप करी रामसौमित्रपूजा
अर्ची तैसाचि कुशध्वज वर भरतायुक्त शत्रुघ्न दूजा, ।
रत्नालंकार वस्त्रें विधियुत दिधलीं पूजिल्या दिव्य मूर्ती
वेदीं [5]ऋग्वेद तैसा रघुविर सुहृदांमाजि सप्रेम कीर्ती. ॥ ७
तेलवणादिक भोजन नेलें, तें जनकें सुहृदार्पण केलें, ।
मावळला दिन पद्मिणिलग्ना चालविले वर सत्वर लग्ना. ॥ ८
मग दशरथराजा पुत्रलग्ना निघाला,
द्विजमुनिजनसंगें वाहनारूढ झाला. ।
चपळतुरं[6]गयानीं नोवरे शोभताती,
बहु गजर तुरांचे भाट वाखाणिताती. ॥ ९
पेटे हिलाल[7] दिवट्या [8]शरदिंदुज्योती
दारू नळे तुं[9]बक अंबुदनाद होती; ।

---

१. सीरध्वज जनकाची स्त्री. २. बुद्धि. ३. झालीला. ४. इतर स्त्रियांना. ५. चार वेदांत. ६. घोडे. ७. पलिते. (उत्साहाचे दिवशीं प्रकाशार्थ काठीचे अग्रास पणतीसारखें बांधलेलें लोखंडाचें पात्र.) ८. चंद्रज्योती. ९. बंदुक.

पंथीं [1]पुरौकस निरीक्षिति सर्व पाहीं
चालावयासि धरणीप्रति मार्ग नाहीं. ॥ १०
वेश्या आणि पतिव्रता त्रिभुवनीं रूपागळी [2]पिंगळा,
ते नाचे रघुनायकापुढति हो! कुंदेंदु तो चांगला; ।
संन्याशांप्रति लागतां मग ढका दंडें तयां हाणती
आम्हांलागुनि कां विटाळ करितां त्या [3]मस्कऱ्यां हांसती. ॥ ११
नाहीं वृत्ति निमग्न तोंवरि कदा संन्यास घेवों नये,
कर्मीं जोंवरि बद्ध तोंवरि कसें [4]सायुज्य हातासि ये ? ।
मेल्या मुक्ति घडेल काय न घडे या संशयीं जो पडे
दोषादोषविटाळ त्याप्रति कदा श्रीराम [5]नो सांपडे. ॥ १२
मिरवत मग आले मंडपातें निवाडें,
तंव नृपवरदासीं लिप्त केलीं कवाडें. ।
उचित बहु तयातें दीधलें प्रेम दाटे
प्रमुदित मग त्यांहीं मुक्त केलीं कपाटें ॥ १३
वऱ्हाडी सभामंडपीं सर्व आले विचित्रासनीं बैसते सर्व झाले. ।
पुढें नोवऱ्या आणिल्या मंडपासी अयोध्यापती सांग पूजी तयांसी.॥ १४
दशरथ फळ वस्त्रें भूषणें दिव्य वाहे
जनक मग वरातें पूजिता होय पाहें, ।
विधियुत [6]मधुपर्कालागिं संपादिलेंसे
उभयकुळउपाध्ये त्यांसि संतोषिलेंसे. ॥ १५
लग्नाची घटिका प्रतिष्ठिलि जळीं आरंभिली तांतडी,
वस्त्रें नेसविलीं चहूं वधुवरां संलग्न आली घडी. ।

---

१. नगरवासी लोक. २. पिंगळा—जनकाच्या राजधानींत पिंगळा नामक एक अतिरूपवती वेश्या होती. वेश्याजनाच्या रीतीप्रमाणें जो अधिक पैसा देईल त्याच्या संगतीनें रात्र घालवावी असा तिचा क्रम होता. एके दिवशीं तिनें आधीं आलेल्या पुष्कळ धनवंत पुरुषांस, अधिक द्रव्य देणारा कोणी आणखी दुसरा पुरुष मिळेल या आशेनें परत लाविलें; मग तिनें मध्यरात्र होईपर्यंत पुष्कळ वाट पाहिली, परंतु कोणी पुरुष त्यादिवशीं मिळाला नाही. तेव्हां, परम पुरुष जो परमेश्वर त्याचा त्याग करून ह्या लौकिक पुरुषांची इच्छा करितें ही किती अयोग्य गोष्ट आहे? असा तिला पश्चात्ताप होऊन ती विरक्त झाली आणि परमेश्वरास शरण गेली. मग तिला ईश्वरानें उत्तम गति दिली, अशी कथा आहे. (नवनीत.) ३. संन्याशां. ४. चार मुक्तीपैकीं शेवटची मुक्ति. हींत जीवाशीं आणि ईश्वराशीं अभेद होतो, दोन्ही एकरूप होतात. ५. न सांपडे. ६. गणक.

मध्यें अंत्रपटासनादि ग[१]णिकीं दोहींकडे काढिलीं
　होती मंगळ मंत्र लग्नसमयीं तू[२]ष्णीं सभा राहिली. ॥　१६
मै[३]त्तेभानन[४]षट्पदाकुलगलद्गंडांतदानोदकें
　हस्तीं पाश वराभ त्या कुशपदा संहृष्ट जो मोदकें; ।
कांची वस्त्र कटीं त्रिनेत्र निढळीं चंद्रार्क कंठीं फणीं,
　ऐसा मंगलमूर्ति तो सुरगणीं [५]कुर्यात् सदा मंगलम्. ॥　१७
वैकुंठीं उपविष्ट रत्नसदनीं सिंहासनीं श्रीहरी
　कंठीं कौस्तुभ आयुधें चहुंकरीं तेणें रिपू संहरी, ।
रत्नज्योति विभूषणें स्तुतिकथा गंधर्वआलापनें
　लक्ष्मीयुक्त मुरारि तो वधुवरां कुर्यात् सदा मंगलम्. ॥　१८
वामांगीं [६]नगजा [७]कुमार सहजा [८]वामान्यभागीं दुजा
　आस्यें पंच गजाजिनांबर तिजा दिग्गुप्त दाही भुजा, ।
गंगा मूर्ध्नि अजानुबाहु सहजानंदें हरा त्या भजा,
　भाळीं [९]नक्तप [१०]जांश्वनीळ मनुजा कुर्यात् सदा मंगलम्. ॥　१९
ज्याचा स्यं[११]दन एकचक्र भुजगीं वेष्टीत रज्जूदृढें
　सप्ताश्वीं युत सारथी अरुण तो गंधर्व गाती पुढें, ।
छायेसीं सहवर्तमान असिजे श्रीसूर्यनारायणें,
　कीजे स्वस्ति वधूवरांप्रति म्हणे कुर्यात् सदा मंगलम्. ॥　२०
[१२]कौमारी कमलात्मजा कमलजा कामेश्वरी कालिका
　काली कौमुदि कालरात्रि कमला कात्यायनी कौळिका; ।
कल्याणी [१३]कलिकल्मषापहरिणी [१४]कारुण्यकल्लोलिनी
　वंदी विठ्ठल सत्कवी प्रतिदिनीं कुर्यात् सदा मंगलम्. ॥　२१
देवर्षी सनकः सनंदन पिते गंधर्व हाहा हुहू
　नाना किंनर यक्ष किंपुरुष ते रक्षोगणादी बहू, ।

---

१. जोशी, दैवज्ञ. २. उगीच. ३. माजलेल्या इभाचें (गजाचें) आनन (मुख.) ४. भ्रमरयुक्त. ५. सदा मंगळ करो. ६. पार्वती. ७. कार्तिकेय. (पुत्र.) ८. उजव्या बाजूस. ९. चंद्र. १०. महादेव. ११. रथ. १२. हें अनुप्रासालंकाराचें उदाहरण आहे. १३. कलिपाप हरण करणारी. १४. दयानदी.

सद्विद्याधर गुह्यकाप्सर मुनी पैशाच भूमंडळीं
　ब्रह्मा विष्णु महेश देव सकळीं कुर्यात् सदा मंगलम्. ॥ २२
आतां सावध सावधान घटिका संपूर्ण आली भरूं
　भावें सद्गुरुतें भजा, गलबला कोण्ही नका हो! करूं, ।
चिंतावें कुळदैवतेसि हृदयें एकाग्रचित्तें बसा,
　वेदीच्या कलशासि सादर असा कुर्वंतु वो मंगलम्. ॥ २३
लक्ष्मीकांतपदारविंदभजनीं निष्ठा असों द्या बरी,
　झाली पूर्ण घडी, वसानसमयीं राहोत वाजंतरी, ।
आधीं नोवरि अक्षता वरि शिरीं घालूनि रामा वरू,
　सोडा अंत्रपटा म्हणे कुळगुरू कुर्यात् सदा मंगलम्. ॥ २४
'ओंपुण्या' म्हणुनी चहूं वधुवरीं दिव्याक्षता घालिती
　श्रीरामासहवर्तमान नवरे जायांसि वीराजती, ।
वाद्यें वाजति, विप्र मंत्र म्हणती, प्राचीमुखी नोवरे,
　चारी पश्चिमदिग्मुखी नवरिया ब्रह्मांड हर्षें भरे. ॥ २५
त्रीसूत्रीं सुतवोनि सूत्रवलयें त्यां वोहरां बांधिलीं,
　आंबा शिंपुनि आणिलीं वधुवरें वेदीवरी बैसलीं, ।
पैं पाणिग्रहणादि सप्तपदिचे होमासि संपादिलें
　वामांगीं मग नोवऱ्या बसविल्या द्रव्य द्विजां वांटिलें. ॥ २६
राशी द्वादश त्या वरा नतु अदी युग्मध्वज प्रीतिमान्
　तें एकादशपर्ण कुंडल शुभा फांके तदा दीप्तिमान् ।
चौषष्टीसम अष्टमी नव मतें केलीं त्रिधा पंचमें
　भूषष्टी युतवे विवेकरित ते शोभे नसे सप्तमे. ॥ २७
श्रीरामें जनकाप्रती विनविलें 'आम्हांसि आज्ञा दिजे'
　प्रार्थी भूप 'चतुर्थहोम करणें' रामें पुनः बोलिजे ।
'आहे कार्य विशेष याहुनि पुढें येथें नव्हे राहणें'
　बोले भूपति 'भोजनांतर तुम्हीं प्रस्थान कीजे' म्हणे. ॥ २८

---

१. तुमचें कल्याण करोत. २. पूर्वेकडे मुख करून. ३. पश्चिमेकडे मुखें ज्यांचीं अशा. ४. सुतानें वेष्टून. ५. वधूवरांसि.

काश्मीरोदक सारिलें सकळिकीं संपादिलीं मज्जनें
रांगोळ्या मणिपर्यळी अडणिया विस्तीर्ण पीठासनें, ।
राजे पंक्तिस बैसले द्विज मुनी वाढी [1]सुमेधा सती
अष्टौ सिद्धिहि वाढिती नवजणी दीपांसि ओवाळिती. २९
शाखा वाढिति [2]सैंधवादिक मिरें विस्तारिलीं रायतीं
सांबारीं [3]पैरमान्न भात भरिला त्या ओगराळ्यांप्रती, ।
पक्वान्नादि वरान्न पापड वडे क्षीरी मधू शर्करा
सद्यस्तप्त घृतें पयोदधि मधू कोशिंबिरी निर्भरा. ॥ ३०
दिव्यान्नें [4]घृतपाचितें बहुविधें संपूर्ण विस्तारिलीं
स्वादिष्टें उदकें भरोनि कलशीं, [5]आपोषणें सारिलीं, ।
राजर्षी द्विज जेविती प्रतिपदीं तार्तम्य राजा करी
झाले तृप्त समस्त याउपरि ते आले सभेभीतरी. ॥ ३१
गंधाक्षता [6]सुमन चंदन भूप दावी, अर्पी त्रयोदशगुणी नवरंग लावी, ।
संपादिलें सकळ [7]ऐरिणिपूजनातें, राजा [8]अजात्मज निघे [9]पुटभेदनातें. ॥ ३२
गजस्कंधीं चारी नवचवरडोलीं वधुवरें
पुढें नाना वाद्यें अपशकुन झाले अवसरें, ।
तया विश्वामित्राप्रति दशरथें चिन्ह पुशिलें,
भविष्याचें प्रत्युत्तर मुनिवरें त्यासि दिधलें. ॥ ३३
हातीं कार्मुक सज्ज, [10]वेदें वदनीं, [11]द्वीतूंण पृष्ठीवरी,
तो '[12]शापादपि ही शरादपि' तपी क्षत्र्यांवरी [13]केसरी ।
[14]भस्मोद्धूलितमौलि, लांछन उरीं रुद्राक्षमाला धरी
[15]मांजीष्टांबर ब्रह्मदंड रसना व्याघ्राजिनें उत्तरीं. ॥ ३४
राघवें धनुषदंड भंगिला भार्गवें परम कोप मानिला. ।

---

१. जनकाची स्त्री. २. मीठ इत्यादि. ३. पायस. ४. तुपांत पक्व केलेलीं. ५. आपोशान=भोजनाचे प्रारंभीं व अंतीं तळहातावर उदक घेऊन प्राशन करणें. ६. पुष्प. ७. लग्नांत साडे करतात तेव्हां पिठाचे दीप लावून ज्या वंशपात्रांत ठेवितात त्याला 'ऐरिणी' म्हणतात, तिचें पूजन. ८. दशरथ. ९. नगरातें. १०. 'वेदशास्त्रवदनीं' असाही पाठ आहे. ११. दोन भाते. १२. शापानें आणि शरानेंही निग्रह करणारा; ज्यामध्यें क्षात्र आणि ब्राह्म तेज एकवटलें असा. १३. सिंह. १४. भस्मयुक्त मस्तक ज्याचें असा. १५. तांबड्या रंगाचें वस्त्र.

पातला रघुविरा जिंणावया[1] राघवारहित मानिती भया. ॥ ३५

म्हणे, 'काकुत्स्था ! रे ! नयनतनुवेळा भुजबळी
धरत्री[2] निक्षत्री करुनि विजयी मी द्विजकुळीं ।
प्रतापें म्यां केलें असुररुधिरें तर्पण रणीं
तुसीं झूजों आलों शिवधनुषभंगप्रकरणीं.' ॥ ३६

भाळीं विस्तृत कंकपिच्छ शर ते सोडी भुजातें तुळी
बाणें बाण निवारिले रघुविरें घालुनि गोधांगुळी[3]; ।
देखे विक्रम आगळा[4] मग म्हणे, 'तूं कोण रे ! झूजसी.'
त्यांतें उत्तर दे रघूत्तम वदे, 'सर्वज्ञ तूं जाणसी. ॥ ३७

क्षत्री मी रविवंशिचा, कुळगुरू आम्हां वशिष्ठा असे,
दिव्यास्त्रें उपदेशिलीं मुनिवरें श्रीकौशिकें तापसें. ।
आम्हीं ब्राह्मणभक्त शस्त्र न धरूं आज्ञा गुरूची असे,
'मूर्ध्नी छेद' म्हणोनि मस्तक पुढें श्रीराम लोटीतसे. ॥ ३८

स्वामीसीं वदतों यथार्थ न घडे संग्रामवार्ता कदा,
देवा ! तूजपुढें हिणें नृपकुळें दीनासमानें सदा. ।
आम्हां एकगुणें धनुर्बळ असे बोले गिरा[5] कोवळी,
स्वामीचें बळ आगळें नवगुणें[6] यज्ञोपवीतें बळी. ॥ ३९

रिता देखे भाता, धनुष नुसतें पैं लडबडी,
न चाले रामासीं मग परशुपाणी[7] हडबडी. ।
म्हणे आतां मोडीं म्हणवुनि दिल्हें वैष्णव धनु
बलप्रौढी दावी मग समरभूमीप्रति ननु. ॥ ४०

धनू भंगावें तों कर परशुरामें गंवसिला
समाधानें रामें हृदयकमळीं राम धरिला. ।
म्हणे, 'घेईं रामा उचित दिधलें वैष्णव धनु.'
दिल्ही आज्ञा गेले मिरवत अयोध्येप्रति ननु. ॥ ४१


१. जिंकावया. २. पृथ्वी. ३. गोधा=चमड्याचें बंधन. धनुष्याचें घर्षण बाहूंस न व्हावें म्हणून केलेला चामड्याचा बाहुबंध. ४. अधिक, श्रेष्ठ. ५. वाणी. ६. नऊपटीनें. ७. भार्गवराम. (परशु=आयुध आहे पाणीच्या ठायीं=हातांत ज्याच्या तो.)


वस्त्रें कापडिलीं दुकानमखरें उंचावलीं तोरणें
खानंदें गुडिया ध्वजा उभविल्या, दृष्टीं फिटे पारणें. ।
चौहाटींबिदिं रुंदहाटवटियीं वृंदावनीं देवुळीं
शास्त्रें वेद पुराण गायन कथा होती अयोध्येस्थळीं. ॥ ४२
सडे नानातैलें बहु उधळिले रंग धरणीं
विराजे शृंगारें अमृतनगरी पुण्यकरणी, ।
महाद्वारीं मूर्ती कलश जलपूर्णस्थिति बरे
[1]दधीं दूर्वांकूरीं भरुनि वरुते कुंभ दुसरे. ॥ ४३
सुमित्रा कौसल्या भरतजननी हास्यवदना
महालक्ष्मी केली गृह भरुनियां सूख नयना. ।
सुना चौघी चारी सुत जवळि आनंदभरिता
द्विजां देती दानें कविवर करी पूर्ण चरिता. ॥ ४४
शत्रुघ्ना भरतासि मातुळगृहीं युद्धाजितें नेइजे
रामा राज्य समर्पिलें दशरथें वृद्धामतें योजिजे; ।
वाल्मीकीकृत 'बालकांड' इतुकें रामायणीं वाचिलें
त्याचा अर्थ पहा विचारुनि निका श्लोकार्थ वाखाणिले. ॥ ४५
[2]ॠग्वेदोत्तम आश्वलायन महाशाखा कवीची असे
वस्तीचें स्थळ बीडें[3] त्या तळवटीं गौरीपुरीं पैं वसे; ।
जाणा कौशिक गोत्र त्यासि भजणें श्रीराघवाकारणें,
सीतेचें रचिलें स्वयंवर जना कल्याण हो! मी म्हणे. ॥ ४६
स्वस्ति श्रीनृपशालिवाहनशके [4]नैव्याणवूपंधरा
अब्दीं पिंगल चैत्र शुद्ध नवमी श्लोकांकसंख्या धरा; ।
त्रीषैट्[5]कें शिवनेत्र श्लोकरचना संपूर्ण झाली कथा
वक्ता सत्कविराज विठ्ठल म्हणे दोषा क्षमा नान्यथा. ॥ ४७

---


१. 'समारंभें गेले मिरवत गृहा दिव्यनगरें' असाही पाठ आहे. २. असाच आरंभ 'रुक्मिणीस्वयंवरां'तील सातव्या सर्गाच्या ६७ व्या श्लोकाच्या तिसऱ्या चरणाचा आहे. ३. बीड शहराजवळ गौरीपूर येथील विठ्ठल कवि हा राहणारा होय. ४. शा० श० १५९९ या वर्षी. ५. तीनशें त्रेसष्ट.

## अम्लान पंकजमालाबंधरचना.



## अम्लान पंकजमाला बंधरचना.



# रुक्मिणीस्वयंवर.[1]

## सर्ग पहिला.

(श्लोक.)

श्री[2]मन्मंगलमूर्ति [3]भूषित चहूं हस्तांगुलीं [4]मुद्रिका
रत्नाचे मुगुटीं [5]झळाळ [6]फुलले जैशा [7]शरच्चंद्रिका, ।
भाळीं [8]चंद्रकलार्ध, सोंड सरळी, सिंदूर हा [9]लेपिला,
[10]उंदीरासन मोद[11]काशन, मुखीं स्फूर्तिप्रद स्थापिला. ॥ १

[12][13]विराजे [14]वाग्देवी अभयवरपाशांकुशधरा,
[15]करांभोजीं वीणा, रुणझुणत वाजे स्वर बरा, ।
त्रिनेत्री [16]अर्धेंदूतिलक [17]निढळीं, [18]शुक्लवसना
प्रसन्न श्रीपद्मासनिं नमुनि [19]वंदीन चरणा. ॥ २

[20]असंभाव्य [21]संसारसिंधू तराया नमस्कारिलें सद्गुरू संतराया, ।
[22]करांबूज माझे शिरीं त्वां धरावा, कृपे आपुला दास पैं उद्धरावा. ॥ ३

[23]हा [24]दुःखमूल [25]भवसागर निस्तराया, विद्या विदेशीं[26] [27]गुणिसंगम संतराया; ।
चौथा पदार्थ न दिसे उतरावयासी तूं [28]धर्मनाव [29]जडजीव तरावयासी. ॥ ४

---

१. ही कथा श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाच्या ५२-५४ अध्यायांत आहे. 'रुक्मिणीस्वयंवर' हें काव्य शके १५९६ त केलें असें कवीनें याच्या शेवटच्या सर्गात सांगितलें आहे. यांत अनेक वृत्तें आणि अनेक बंध योजून कवीनें आपलें छंदःशास्त्रनैपुण्य आणि चित्रकाव्यकौशल्य दाखविलें आहे. वृत्तांचीं नांवें यथास्थळ दाखल करून बंधांविषयीं माहिती अखेरीस देण्याचें योजिलें आहे. २. शार्दूलविक्रीडितछंद. ३. चहूं हस्तांगुलीं मुद्रिका भूषित—असा अन्वय. ४. आंगठी. ५. चकाकी. ६. 'सुटले' असाही पाठ आहे. ७. शरदृतूसंबंधी चांदणें. ८. चंद्राच्या कलेचा अर्धा भाग भाळावर आहे असा. ९. 'आलेपिला' असाही पाठ आहे. १०. 'सीतास्वयंवर' काव्याच्या प्रथम सर्गांतील पहिले १० श्लोक या प्रकरणांतील आरंभींच्या श्लोकांशीं ताडून पाहिले असतां एकाच ग्रंथकाराच्या कृतींत साम्य कितपत असतें हें कळून येईल. ११. मोदक भक्षण करणारा. १२. शिखरिणीछंद. १३. शोभे. १४. सरस्वती. १५. हस्तकमळीं. १६. अर्धचंद्र हाच तिलक अशी. १७. कपाळीं. १८. स्वच्छ वस्त्र धारण करणारी. १९. 'वर्णीन' असाही पाठ आहे. २०. भुजंगप्रयातछंद. २१. 'हा शब्दसिंधू तराया' असाही पाठ आहे. २२. करकमळ. येथें वृत्तनियमासाठीं 'अंबुज'शब्दांतील 'बु' दीर्घ केला आहे. २३. वसंततिलकाछंद. २४. दुःखास कारण असा. २५. संसाररूप सागर. २६. परदेश. २७. गुणवान् पुरुषांचा समागम. २८. धर्मरूप नौका. २९. अचेतन प्राणी.

[1]पुंडलीकवरद[2]प्रभुसाहें रुक्मिणीरमण विठ्ठल पाहें; ।
पांडुरंग कुळदैवत नांवें 'स्वागता' सुरसवृत्त [3]बुझावें. ॥ ५
[4]कमलपत्रदलायतलो[5]चनें [6]कमलजें [7]कलिकल्मषमोचनें ।
कमल भक्तिरसें तुज वाहिजे [8]कमलजावर यास्तव लाहिजे. ॥ ६
श्रोते हो ! जितुकें चरित्र तितुकें मीं काय वर्णूं सकें ?
[9]सर्पारीस [10]निकें सुधारस फिकें नेलें जसें [11]भातुकें, ।
तैसें म्यां इतुकें [12]कवित्व [13]यमकें आरंभिलें कौतुकें
[14]सालंकार तुकें विचित्र गमकें, वाचा मनोरंजकें. ॥ ७
हे कथा अनुभवामृतजोडी, नित्य नूतन इची बहु गोडी, ।
[15]पूर्वजन्मदुरितद्रुम खोडी, वाचितां करि सुधारुचि थोडी. ॥ ८
[16]पुण्यश्लोक परिक्षिती क्षिति[17]पती जल्पे शुकेंद्राप्रती
श्रीमद्भागवतीं पवित्र दशमस्कंधीं कथापद्धती, ।
[18]आध्यें तीन [19]अतिप्रगल्भ असती [20]पौराणिच्या संमती,
मी वर्णीन [21]रती [22]रहस्य, निवती जेणें गुणें [23]भूपती. ॥ ९

---

१. स्वागताछंद. २. 'प्रदसाहे' असाही पाठ आहे. ३. समजावें, जाणावें. ४. द्रुतविलंबितछंद. ५. कमलपत्रासारिखे विस्तीर्ण नेत्र ज्याचे असा. ६. ब्रह्मदेवानें. ७. कलिदोष आणि पाप यांचें मोचन करणारा. ८. लक्ष्मीचा वर. ९. गरुडास. १०. खरें. ११. खाऊ. १२. 'चरित्र गमकें' असाही पाठ आहे. १३. यमकः—'तुल्यश्रुतिक्रमाणामन्यार्थानां मिथस्तु वर्णानाम् । पुनरावृत्तिर्यमकं प्रायश्छंदांसि विषयोऽस्य ॥' (काव्यालंकार–अध्याय ३ श्लोक १); तसेंच 'पदमनेकार्थमक्षरं वावृत्तं स्थाननियमे यमकम्' (काव्यालंकारसूत्राणि–चतुर्थ अधिकरण–अध्याय १ सूत्र १) असें यमकाचें लक्षण संस्कृत साहित्य-ग्रंथांत दिलें आहे. १४. अलंकारयुक्त. या पद्यांतही 'द्वादशदलकमलबंध' हा चित्रालंकार साधिला आहे. १५. पूर्व जन्मांत घडलेल्या पापाचा वृक्ष नाशिते. १६. पुण्य (पवित्र) आहे श्लोक (कीर्ति) यश ज्याची तो. 'पद्ये यशसि च श्लोकः' इत्यमरः. १७. राजा. १८. अध्याय ५२–५३–५४. १९. अतिप्रौढ. २०. पुराणाच्या. २१. अल्पभाग. २२. गोपनीय अंश. या पद्यांत 'ती' या अक्षराची वारंवार आवृत्ति झाली आहे म्हणून हें अनुप्रासालंकाराचें उदाहरण होय. तसेंच वरच्या सप्तम पद्यांत आणि पुढच्या दशम पद्यांत हाच शब्दालंकार आहे. याचे छेकानुप्रास, वृत्त्यनुप्रास, लाटानुप्रास असे अनेक भेद आहेत. तसेच वर्णांच्या आवृत्तीवरून याच्या मधुरा, प्रौढा, परुषा, ललिता आणि भद्रा अशा पांच वृत्ति आहेत. याचें लक्षणः–'एकद्वित्रांतरितं व्यंजनमविवक्षितस्वरं बहुशः । आवर्तते निरंतरमथवा यदसावनुप्रासः ॥' (काव्यालंकार–अध्याय २ पद्य १८ पहा). २३. राजे.

हे वाणी त्रि[1]पथा यथार्थचि, तथा मानाल हो! नान्यथा,
श्लोकाचा उलथा अनुक्रम यथान्यायें असे सर्वथा. ।
[2]संग्रामाब्धि मथावया वि[3]दुरथा चै[4]द्यादि आले वृथा,
[4]शौरी एक, तथापि श[5]त्रुचळथा मर्दील ऐसी कथा. ॥ १०
कलारत्न भूमंडळीं [6]कीर्तिनामा नटश्रेष्ठ आला वि[7]दर्भेंद्रधामा, ।
करी नृत्य संगीतशास्त्रप्रमाणें, उणें त्यापुढें दिव्य गंधर्वगाणें. ॥ ११
[8]भद्रासनीं नृप यशोधन मेरु जैसा [9]सामंतवेष्टित नरेंद्र [10]मृगेंद्र तैसा, ।
कन्या पुढें रुक्मिणी असतां स्वभावें [11]संमोहिली हरिकथाश्रवणप्रभावें. ॥ १२
हरिकथाश्रवणें [12]नृपनंदिनी पडिलि मूर्छित होउनि मेदिनीं, ।
सगुण रूप मनोहर शोभलें, मनिं महद्भुत संचरलें भलें. ॥ १३
हरीचे पदीं वृत्ति तीची [13]मुराली, महद्भूतबाधा जगीं ख्यात झाली, ।
[14]नृपें तोय घेऊनि संकल्प केला, 'वरू श्रीपती माझिये कन्यकेला'. ॥ १४
[15]रुक्मि ज्येष्ठ सुत, चारि धाकुटे, [16]रुक्मनाम चवघांसि नासुटे; ।
त्या कनिष्ठ रथ बाहु जाणिजे केश मालि इति, एक [17]लेंकि जे. ॥ १५
पाचारूनि सभेसि रुक्मि शिकवी [18]ज्योतिर्विदां ब्राह्मणां,
'कृष्णासीं [19]घटितार्थ लाभत नसे, चै[20]द्येश्वरा 'द्या' म्हणा, ।
नाहीं [21]चामर [22]आतपत्र अकुळी [23]सिंहासनावेगळा
गोत्र क्षेत्र न [24]नांवरूप, नवरा कोणें [25]गुणें [26]आगळा? ॥ १६

---

१. गंगा. भागीरथीस 'त्रिपथगा' 'त्रिस्रोता' अशीं नांवें आहेत. जिचे तीन पथ (मार्ग) आहेत ती त्रिपथा अथवा जी तीन मार्गांनीं जाते ती त्रिपथगा. याविषयीं महाभारतांत पुढील वचन आहे:— 'क्षितौ तारयते मर्त्यान्नागांस्तारयतेऽप्यधः । दिवि तारयते देवांस्तेन त्रिपथगा स्मृता ॥.' २. रणसागर. ३. यादवविशेष. ४. कृष्ण. ५. शत्रूंचा समुदाय. ६. कीर्ति हें नांव ज्याचें असा. (हें वर्णन दशमस्कंधांत नाहीं). ७. भीष्मकराजाच्या गृहाला. ८. नृपासनीं. 'नृपासनं तु यद्भद्रासनम्'इत्यमरः. मण्यादिकृत जें भद्र (कल्याणप्रद) आसन तें भद्रासन. ९. मांडलिक राजांनीं वेष्टित. १०. सिंहासारिखा. ११. मोहित झाली. १२. रुक्मिणी (अध्याय ५२ श्लोक २३). १३. गढून गेली. १४. भीष्मकें. १५. रथोद्धताछंद. १६. 'रुक्मवर्ण' असाही पाठ आहे. १७. मुलगी—रुक्मिणी. रुक्मी, रुक्मबाहु, रुक्मरथ, रुक्मकेश आणि रुक्ममाली अशीं पांच मुलांचीं नांवें होतीं. १८. जोतिषशास्त्र जाणत्या ब्राह्मणांस. १९. वधूवरांच्या जन्मकाळावरून ज्योतिःशास्त्रमान्य जो परस्परांचा अनुकूलभाव तो. २०. शिशुपाळाला. २१. चवरी. २२. छत्र. २३. सिंहासनरहित. सिंहासन=सुवर्णकृत सिंहाकार आसन=राजासन; चामर, छत्र, सिंहासन इत्यादि राजचिन्हें नाहींत असा. २४. लौकिक, कीर्ति. [illegible] 'कोण्या मतें आगळा' असाही पाठ आहे. २६. अधिक.

[1]नाटोपे कृष्ण [2]काळा, कुटिल [3]अवमळा कैं न लिंपे विटाळा,
चोरीचा त्यासि चाळा, गवळणि [4]अबळा मोहिल्या [5]चक्रचाळा, ।
[6]घाली मं[7]दारमाळा, [8]अजगर [9]बगळा मारिला, [10]कांग काळा,
त्या नेदी राजबाळा, कवण करि बळात्कार पाहों नृपाळा? ॥ १७
कैंचें भांडार [11]गांठीं? पशु [12]वेळि, कुरटी कांबळी, वेणु काठी,
कासेसी मालगांठी, [13]चंवर धरि मुठी, थापटी धेनुपाठी; ।
[14]कालिंदीवाळुवंटीं उपटुनि [15]वरटी मारिला कंस [16]जेठी,
ऐशातें [17]कंबुकंठी वरिल [18]निजदिठीं, तैं [19]पुरी कोण [20]कंठी? ॥ १८
श्री[21]वत्साचें [22]यदृच्छा पदक धरि उरीं, वर्तताहे [23]स्वइच्छा,
सोंगें वे [24]कूर्ममच्छादिक, बहु कपटी, राज्यभोगीं [25]अनिच्छा, ।
कंठीं मंदा[26]रगुच्छावळि, मणि मुकुटीं, वेष्टिता केकिपि[27]च्छा,
दुष्कर्में सर्व आच्छादुनि यश मिरवी, हे जयाची चिकि[28]च्छा. ॥ १९

---

१. श्लोक १७ वा आणि १८ वा यांत अनुप्रासालंकार योजून 'द्वादशदलकमलबंध'ही साधिला आहे. २. काळाला. ३. पापरूप मळा. ४. स्त्रिया. ५. कृष्णा. ६. 'कंठीं' असाही पाठ आहे. ७. मंदारसंज्ञक कल्पवृक्षाच्या पुष्पांची माळा. ८. अघासुर हा कृष्णाचा घात करण्यासाठीं मोठा अजगर होऊन आला होता, त्याला कृष्णानें मारिलें. ९. बकासुर हा कृष्णाला मारण्यासाठीं बगळा होऊन आला होता, त्याला कृष्णानें मारिलें. १०. कावळा. ११. पदरीं धन कोठें आहे? १२. वळवितो. १३. चवरी. १४. यमुनेच्या वाळवंटांत. १५. घातकी. १६. अतिबलवान्. (जेठी=ज्येष्ठ, वयानें जो अत्यंत थोर तो बळानें थोर असा अर्थ कालांतरानें झाला.) १७. शंखासारखी मान जीची अशी (रुक्मिणी). १८. आपल्या दृष्टीनें. १९. नगरी. २०. कंठणें=दुःख सोसून जाणें, मग नगराला जाण्याचे श्रम कोण घेतो? २१. कृष्णाच्या वक्षस्थळावर ब्राह्मणाच्या लत्ताप्रहाराचें जें चिन्ह तें. २२. आपल्या इच्छेनें. २३. श्लोक १९ वा आणि २३ वा यांत अनुप्रासालंकार आहे. २४. मत्स्य कूर्म वराह इत्यादि दशअवतारांस अनुलक्षून हें वर्णन आहे. या दहा अवतारांचीं नांवें आणि त्यांतील कृत्यें पुढील श्लोकांत निरूपण केलीं आहेत:—'वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते म्लेच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥,' 'मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः । रामो रामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दश ॥'. २५. इच्छारहित. २६. मंदार नामक कल्पवृक्षाच्या पुष्पस्तबकांची माळा. २७. मयूरपिच्छा. २८. परीक्षा.

[1]व्रजा पातली **पूतना** लंबकेशी [2]**तृणावर्तवत्सासुरारिष्टकेशी** ।
असे मर्दिले [3]**धेनुका** [4]**शाकटासी**, [5]स्वसा केंवि देवूं तया [6]लंपटासी ?' ॥ २०
[7]राजा वृद्ध, परंतु यत्न न चले त्या ज्येष्ठपुत्रापुढें,
**चैद्या रुक्मिणि** नेमिली, वर **हरी** [8]निर्भर्त्सिलासे मुढें. ।
[9]मूळें पाठविलीं नृपांसि, [10]नगरी शृंगारिली साजिरी,
तेकाळीं मृगलोचना नृपसुता झाली असे घाबरी. ॥ २१
[11]अति चतुर मृगाक्षी काय चित्तीं विचारी,
'नकळत वडिलांतें, कोण आणी **मुरारी** ?' ।
[12]द्विजवर [13]सलगीचा त्यासि गुह्यार्थ सांगे,
'झडकरि तुज जाणें द्वारके [14]आजि लागे.' ॥ २२
**हरहृदयविसावा** मंत्र जो [15]चोविसावा
अनुभवि [16]अकरावा ज्या ध्वजीं [17]पंधरावा ।
**अज** म्हणति अणावा ब्रह्मपूर्णत्व नावा
व्रजगवळणि ध्यावा लुब्ध तो आणि गावा. ॥ २३
वदे **भीम**की [18]भूसिदेवा **सुदेवा**, '[19]त्वरें जाउनी पत्र दे **वासुदेवा**; ।

---

१. गोकुळा. २. तृणावर्त—कंसाचा अनुचर एक असुर. यानें प्रचंड चक्रवाताचें रूप घेऊन कृष्णास आकाशांत उडवून नेलें. तेव्हां कृष्णानें याला खालीं शिळेवर इतक्या जोरानें आपटिलें कीं तो त्याक्षणीं मरण पावला (भागवत—स्कंध १० अध्याय ७). वत्सासुर—कंसपक्षीय असुर यानें कृष्णास मारण्यासाठीं वत्साचें रूप घेऊन गोवत्सांत प्रवेश केला. हें कपट जाणून कृष्णानें त्याला कपित्थ (कंवठीच्या) वृक्षावर आपटून मारिलें (भागवत—स्कंध १० अध्याय ११). अरिष्ट—कंसपक्षीय असुर. यानें वृषभाचें रूप धारण करून गोकुळांत प्रवेश केला. यास कृष्णाच्या हातून मरण आलें (भागवत—स्कंध १० अध्याय ३६). केशी—कंसपक्षीय राक्षस. यानें अश्वाचें रूप धरून कृष्णास पीडा देण्यासाठीं गोकुळांत प्रवेश केला. तेव्हां कृष्णानें यास मारिलें (भागवत—स्कंध १० अध्याय ३७). ३. धेनुक=धेनकासुर—हा वृंदावनासमीपवर्ती राक्षस. हा गर्दभरूप धारण करून बळरामावर धांवून गेला, तेव्हां यास ठार मारिलें (भागवत—स्कंध १० अध्याय १५). ४. शाकट=शकटासुर—कंससेवक राक्षस. हा शकटाचें (गाड्याचें) रूप घेऊन कृष्णास मारण्यासाठीं आला होता, पण कृष्णानें त्यास ठार मारिलें (भागवत—स्कंध १० अध्याय १२). ५. भगिनी. ६. स्त्रीलंपट. येथें रुक्मीचें भाषण समाप्त झालें. ७. भीष्मक. ८. निंदित केला. ९. बलाविणें, आमंत्रणें. १०. कुंडिनपुरी. ११. मालिनीछंद. १२. सुदेव. १३. 'सलगी' हा फारशी शब्द आहे. १४. 'लागिं' असाही पाठ आहे. १५. कृष्ण. १६. ईश्वर. (हा साठ संवत्सरांपैकीं अकरावा आहे.) १७. वृष. (वृषध्वज=उमापति. वृष हा पंधरावा संवत्सर होय). १८. ब्राह्मणा. १९. 'जवें' असाही पाठ आहे.

नभा एवढें कोण आदान[1] वारी[2]? न जातां तुम्ही कैंवि ये दानवारी[3]? ॥२४
विना[4] **वा**सुदेवा परावा[5] **सु**देवा ! पिता श्रेष्ठ[6]भावासमानस्वभावा[7] ।
मनाचा विसावा भजे चोविसावा त्यजीं बत्तिसावा[9] पथीं चौतिसांवा[10]. ॥ २५
मन[11]पवनतुरंगीं स्वार व्हावें **सु**देवा 'रवि[12]उदय न होतां आणि तूं **वा**सुदेवा; ।
अळस न करिं, लग्ना आंडवी[13] एक राती, उदइक[14] तरि येई, चैद्य[15] येती अराती[16]'.॥
पाठिलाग करि विप्र मनाचा येवढा[17] जव[18] जया गमनाचा, ।
टाकिली नगरि **कौं**डिण मागें, **द्वा**रकापुरपिठीं मन[19]वेगें. ॥ २७
अनर्घ्या[20] रत्नाचे कळस नभचुंबीत असती,
रवी[21]चंद्रज्वाला[22]नलतडित[23]वेष्टीत वसती[24], ।
सुवर्णाच्या भिंती सरितपति[25] दुर्गा[26] गवसणी,
फणाकारा हारी[27] झळकति गृहा[28] रत्नकिरणी. ॥ २८
माणिक्यें[29] मणि पुष्पराग[29] मरकें[29] वैडूर्य[29] चिंतामणी,
गोमेद[29]उत्तम[30] इंद्रनीळ[29] जडिले पेरोज[31] पाटांगणीं, ।
पाची[32]प्रस्तर पद्मराग सरळे वज्रप्रभा[33] सांवळी[34],
कुंज[35]स्तंभ सुमेद मंडप निके रत्नाचिया पोंवळी[36]. ॥ २९

---

१. आदान=रोगकारण. २. निवारण करी. ३. दानवांचा शत्रु. (कृष्ण.) ४. या श्लोकांत अनुप्रास योजून 'अष्टदलकमलबंध' साधिला आहे. ५. परकी. ६. 'ज्येष्ठ' असाही पाठ आहे. ७. 'प्रभावा' असाही पाठ आहे. ८. श्रीकृष्ण. ९. विलंब (संवत्सर). १०. शार्वरी (संवत्सर). रात्र. ११. मन अथवा वायु यांजसारख्या शीघ्रगामी घोड्यावर. १२. रवीचा उदय असा अर्थ. येथें समास असल्यामुळें 'रव्युदय' असा संधि कर्तव्य असून केला नाहीं. अशीं उदाहरणें या काव्यांत पुष्कळ आहेत. १३. मध्यंतरीं एक रात्रच आहे. १४. 'उदइं त्वरित यावें' आणि 'उदय नसत येईं' असे पाठभेद आढळतात. १५. शिशुपालादि. १६. शत्रु. १७. 'येवढा हरुष त्या गमनाचा' असा अन्य पाठ आहे. १८. वेग. १९. 'नभमार्गें' असा पाठभेद आहे. २०. अमोलिक. २१. 'रविचंद्रज्वालानलतडिद्वेष्टित' असें या समासाचें रूप पाहिजे, परंतु कवीनें वृत्तनियमार्थ बरीच ओढाताण केली आहे. २२. दवाग्नि. २३. विद्युल्लता यांच्या तेजानें व्याप्त अशी. २४. गृहें. २५. समुद्र. २६. किल्ल्याला. २७. ओळी, पंक्ती. २८. 'महा' असाही पाठ आहे. २९. हीं रत्नांचीं नांवें आहेत. एकंदर नवरत्नें आहेत:–'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ । पद्मरागं मरकतं नीलं चेति यथाक्रमम् ॥.' ३०. पाषाणविशेष. हा मणि हिमालयावर आणि सिंधुनदांत सांपडतो. याचा रंग पांढरा, पिंवळा, अस्मानी, व तांबडा, असा चार प्रकारचा आहे. याचे शुभावह आणि अशुभावह असे गुणांवरून दोन भेद आहेत (रसरत्नसमुच्चय अध्याय ४ श्लोक ५४-५६). ३१. पेरोज, पेरुजा, पेरोजा–हें एक वैडूर्य जातीचें रत्न आहे. हा शब्द आरबी आहे. ३२. पाचरूप पाषाण. ३३. हिऱ्याचें तेज. ३४. 'वज्रप्रवाळावळी' असा पाठभेद आहे. ३५. 'कुड्यस्तंभ सुवेदि मंडप' असा अन्य पाठ आहे. ३६. वाड्याची भिंत.

[1]सुंदरें मंदिरें [2]दिव्यदामोदरें वास तेथें किजे नित्य दामोदरें, ।
लोक संपन्न ते पुत्रदाराधनें, दाससायुज्यता श्रीपदाराधनें. ॥ ३०
द्वारकेसि उपमा कवणाची ? दिव्य साम्य पुरि [3]वैश्रवणाची, ।
भुक्तिमुक्तिफल दे [4]अकलंका या गुणें अतुलसाम्यक लंका. ॥ ३१
गोमतीनदितटीं [5]सुरवाडें पुष्पितें उपवनें फुलझाडें, ।
डोलती [6]सफल तीं [7]पवमानें विप्र पाठ करिती [8]पवमानें. ॥ ३२
द्वारीं मंगळमूर्ति [9]भैरव [10]महासिद्धिप्रदाता सदा,
[11]मुद्रा दिक्पति [12]मातृका [13]नवनिधी [14]हंसासना शारदा ।
तेजःपुंज[15]सुदर्शनावरि पुरी निर्माण केली महा,
भोंवे चक्र पळांत एकविसदां, '[16]शार्दूलविक्रीड' हा. ॥ ३३
कृष्णें [17]त्रिंशतयोजनें स्थल निकें [18]रत्नाकरा याचिलें,
शेषापासुनि कूर्मचक्र अवघें शोधूनियां पाहिलें, ।
दीपस्थानक तें [19]बेरी रचि पुरी जो [20]विश्वकर्मा स्वयें,
संख्या [21]सप्ततियोजनें नगरिचा [22]आवर्त तो निश्चयें. ॥ ३४
योजनें स्थळ चतुर्दश जेथें बिंदुमध्य हरिमंदिर तेथें, ।
अष्टपत्र [23]चतुरस्र विहारी [24]गोपुरें चहुंदिशांप्रति चारी. ॥ ३५
[25]वैकुंठ सालंकृत नित्य जेथें वेश्या मुमुक्षां गति एक तेथें, ।
भक्तां अभक्तां स्थिति भिन्न नाहीं '[25]उपेंद्रवज्रा' पठ [26]वृत्त पाहीं. ॥ ३६

---

१. स्रग्विणीछंद. २. सुंदर मालांनीं युक्त उदरें (मध्यभाग) ज्यांचे अशीं (मंदिरें). ३. कुबेराची. ४. जो कलंकरहित (निष्पाप) आहे त्याला. ५. श्रेष्ठ. ६. 'सकल' असाही पाठ आहे. ७. वायूनें. ८. पवमाननामक वेदमंत्र. ९. भैरव–शिवाच्या भयंकरस्वरूपी असितांग, रुरु, चंड, क्रोध, उन्मत्त, कुपति, भीषण आणि संहार या आठ अवतारांपैकीं प्रत्येकास भैरव अशी संज्ञा आहे. १०. अष्टमहासिद्धि देणारा. अणिमा गरिमा लघिमा इत्यादि महासिद्धि होत. ११. आठ मुद्रा. आठ दिक्पति, आणि आठ मातृका आहेत. १२. ह्या आठ मातृका आहेत. 'ब्राह्मी माहेश्वरी चैंद्री वाराही वैष्णवी तथा । कौमारीत्यपि चामुंडा चर्चिकेत्यष्ट मातरः ॥.' १३. कुबेराचे नऊ निधि आहेत त्यांचीं नांवें:–महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व. १४. शारदा (सरस्वती). हिचें वाहन हंस आहे. निरनिराळ्या देवतांचीं निरनिराळीं वाहनें आहेत:— गरुडासन (विष्णु) शिखिवाहन (कार्तिकेय) मेघवाहन (इंद्र). १५. विष्णुचक्र. (ज्याचें दर्शन शोभन तो सुदर्शन. हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी आहे. १६. छंदविशेष. शार्दूला(वाघा)सारखी क्रीडा (कृति ज्याची) असा हा (कृष्ण). १७. तीस योजनें. १८. समुद्रा. १९. 'स्थळीं' असाही पाठ आहे. २०. देवांचा सुतार. २१. सत्तर योजनें. २२. घेरा. २३. चवकोनी. २४. शहराचे दरवाजे. २५. उपेंद्रवज्राछंद. २६. उपेंद्रवज्रा हें वृत्ताचें नांव आहे.

मुमुक्षु[2] तडितापडी[3] जटिल[4] कंदमूलाशनी[5]
दिगंबर[6] **शिवालयीं** धरुनि बैसले आसनीं, ।
उपासक उपासना धरुनि[7] राहिले साधनीं,
अखंड मठमंडपीं वसति[8] मंत्रआराधनीं. ॥ ३७

**द्वार**का सकळपापहारका देखिली परमसौख्यकारका, ।
सप्तमोक्षपुरि[9] त्यांत उन्नता[10]. छंद हा कवि म्हणे **'रथोद्धता'**. ॥ ३८

**कृ**ष्णकीर्तनकथा परोपरी नृत्य गीत करिती घरोघरीं, ।
कल्पवृक्ष लवती फुलीं फळीं मोक्षदायक पुरी महीतळीं. ॥ ३९

जरा ना मरी शोक ना दुःख कांहीं सदाचार सत्यव्रती लोक पाहीं, ।
कथानृत्यगीतादि होती पुराणें जगामाजि वर्ते खरें नामनाणें. ॥ ४०

गृहें गोपुरें चित्रिल्या पट्टशाला विराजीत मुक्तामणी रंगमाळा, ।
प्रदीपावळी सोहळ्याची दिवाळी असें सौख्य नेणें कदां नाकपाळी[11].॥४१

वेदांती अग्निहोत्री भट गणक[12] महावैद्य गोपाळ मंत्री[13],
संन्यासी पाणिपात्री जपति **हरि** मुनी **द्वार**का मोक्षदात्री, ।
सद्विद्याभ्यास रात्रिंदिवस गुरुमुखें साधिती सांख्यशास्त्री[14],
निर्वैरें पुण्य धात्री[15] वसतिजन सुखें अर्जिती[16] **कृ**ष्णमैत्री. ॥ ४२

चतुष्पथ[17] पदोपदीं मणिमनोहरा वेदिका,
समार्जित सुकुंकुमें सरणि[18] वीथिरथ्यादिका; ।
पवित्र तुळसीवनें सजल कुंभ कुंभावरी,
महोत्सव पुरौकसां[19], नगरि रम्य पृथ्वीवरी. ॥ ४३

**व्यव्हारे[20] जन उदिमी सराफ चौटे[21] सर्वांतें शतमख[22]सौख्य तुच्छ वाटे; ।**
**इत्यादि द्विज नृप वैश्य शूद्र पाहे स्वानंदें वसति, म्हणा 'प्रहर्षिणी[23]' हे.॥४४**

---

१. पृथ्वीछंद. २. जन्ममरणापासून मुक्ति इच्छिणारा. ३. भिक्षा मागून पोट भरणारा, गोसावी, वैरागी. ४. जटाधारी. ५. भक्षणोपयोगी कंद आणि मूळें खाऊन उपजीवन करणारा साधु. ६. नग्न साधु, दिशा आकाश मेघ इत्यादिकांनीं आच्छादित असा साधु. ७. 'करुनि' असाही पाठ आहे. ८. 'जपति' असाही पाठ आहे. ९. अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका आणि द्वारका, अशा सात पुरींमध्यें द्वारका श्रेष्ठ. १०. श्रेष्ठ. ११. स्वर्ग रक्षण करणारा. (इंद्र.) १२. जोशी. १३. सर्पादिकांचें विष उतरावयाचा मंत्र जाणतो तो. १४. 'सूत्री' असाही पाठ आहे. १५. पृथ्वी. १६. 'अर्चिती कृष्ण गात्रीं' असाही पाठ आहे. १७. चवाठे. १८. मोठे मार्ग. १९. नगरवासी लोकांस. २०. क्रय विक्रय करणारा व्यापारी. २१. वस्त्रांचें दुकान घालणारे जन. २२. इंद्राचें सुख. २३. छंदविशेष.

शृंगारें[1] वणिजवधू पहा दुकानीं तांटंका[2]प्रति उपमा रवींदु[3] कानीं, ।
वक्षोजीं[4] स्रग[5] धरिती उदार बाळा, ते शोभा करि मदनाग्निचा उबाळा[6]. ४५

कृष्ण **द्वा**रवतीस राज्य करितां पाळी प्रजांकारणें,
दंड च्छत्र पताक चामर तया सारी[7]प्रती मारणें, ।
पुण्या बंधन, कीर्तिला दवडणें, पापासि संहारणें,
कोष्टा कोष्टक चोर चोर[8] म्हणिजे ना सर्वथा रक्षणें. ॥ ४६

केला प्रवेश नगरांत जवें **सु**देवें, बोले, 'अपूर्व रचिलें स्थल **वा**सुदेवें'. ।
सिंहासनीं मदनमूर्ति उदार जेथें आला त्वरें करुनियां द्विजराज तेथें. ॥४७

चित्स्वरूप[9] नटलें जनीं वनीं नाठवे **ह**रिविणें दुजें मनीं, ।
देखिली मदनमूर्ति लोचनीं जे उदार[10] भवबंधमोचनीं. ॥ ४८

देखिला द्विज **सु**देव **मा**धवें हर्षयुक्त अतिदीनबांधवें, ।
गौरवें बसविलें निजासनीं[11], लाभ तो बहुत मानिला मनीं. ॥ ४९

आपणासि सुर जेंवि पूजिती अर्चिला द्विज तसा बऱ्या रिती, ।
भोजनादि उपभोग देउनी बैसले स्थळ विविक्तें[12] सेउनी. ॥ ५०

धरूनि हस्तांबुज[13] वाग्विलासें पृच्छा किजे मंद उदार हांसे, ।
'कथा निवेदा सुरसा अपूर्वा सुवृत्त[14] जाणा 'विपरीतपूर्वा.' ॥ ५१

अहो! **सु**देवा! परिसा द्विजोत्तमा! विचारितां ब्राह्मणदेवसत्तमा. ।
परंतु त्याची स्थिति भिन्न देखणें, 'सुवृत्त वंशस्थ[15]' वदेल लक्षणें. ॥ ५२

असंतुष्ट त्या **इं**द्र तोषूं शकेना, गृहीं कामधेनू[16] तयाचे दुभेना[17], ।
अहंकार ज्यांहीं असे दग्ध केला, स्वयें त्याचिया दर्शनाचा भुकेला. ॥ ५३

असंतुष्ट संपत्ति एका असोनी सदां तुष्ट **ल**क्ष्मी कितेकां नसोनी, ।
समाधान चित्तीं जयाच्या, **सु**देवा! असे वंद्य त्याची करीं पादसेवा. ॥५४

तुम्हीं आपुलें कार्य सांगा **सु**देवा! पुरी कोण? कोठोनि आलेति? देवा! ।
अटव्यें[18] वनें चालतां भागलेती, किमर्थ द्विजा! या स्थळा पातलेती? ॥५५

---

१. प्रहर्षणी वृत्त. २. अलंकारविशेष (तानवडें) त्याप्रत. ३. रवि+इंदु. ४. स्तनीं. ५. माला. ६. ऊब, संताप, कढ येणें. ७. सोंगट्यांप्रत. ८. 'थोर म्हणणें सर्वार्थ संरक्षणें' असाही पाठ आहे. ९. 'विश्वरूप' असाही पाठ आहे. १०. जी मदनमूर्ति भवबंधमोचनीं उदार—असा अन्वय. ११. आपल्या आसनाचा. १२. एकांत. १३. करकमळ. १४. 'उपेंद्रवज्रा विपरीतपूर्वा' असाही पाठ आहे. १५. या श्लोकाचें वृत्त 'वंशस्थ' आहे. १६. इष्टवस्तु देणारी धेनु. १७. दूध देईना. १८. गहन, दुर्गम.

परब्रह्म देखोनि [1]प्रत्यक्ष पाहीं द्विजा नाठवे पत्रसंदेशें[2] कांहीं, ।
स्मृतिभ्रंश वृत्तांत सांगावयाचा [3]मनीं देव जाणोनि पूसे सुवाचा. ॥ ५६

विदर्भदेशिंचा स्वभू उदार [4]**कौं**डण प्रभू,
[5]तयाचि जे स्वपुत्रिका तिणें दिल्ही स्वपत्रिका, ।
गुणाभिधान **रु**क्मिणी [6]वसू[7]नगस्वरूपिणी,
न होय वश्य आणिका तुम्हांविण '[8]**प्र**माणिका.' ॥ ५७

आदरपूर्वक गुह्य निरोपी, कुंकुमपत्र मग द्विज ओपी, ।
चुंबुनि देव पुढें अनुरागें '**दो**[10]धकवृत्त' बुधाप्रति सांगे. ॥ ५८

[11]छंद बंध यमकें अनुपम्यें [12]काव्यरीतिवचनें [13]ननु रम्यें, ।
दोष टाकुनि तुम्हीं गुण घ्यावा **वि**ठ्ठलासि अभयंकर द्यावा. ॥ ५९

[14]श्रीम**द्रु**क्मिणिचें स्वयंवर निकें सौभाग्यसंवर्धनी,
श्रोते सादर आयकोत रचना साहित्य चित्स्पर्धनीं, ।
वर्णी **वि**ठ्ठल दास यावरि किजे प्रस्थान **दा**मोदरें,
तेथें पंडित चित्त देत कमळीं भृंगी जसी सादरें. ॥ ६०

---

१. 'साक्षात' असा पाठभेद आहे. २. निरोप. ३. 'पुसे श्रीहरी भाव जाणोनि त्याचा' असा पाठभेद आहे. ४. 'भीष्मक' असा अन्य पाठ. ५. 'तयास एक पुत्रिका' अन्य पाठभेद. ६. 'महामती' अन्य पाठभेद. ७. मेरुपर्वतासारिखें स्वरूप जीचें. सुवर्णासारिखी तेजस्वी–असा भाव. ८. या श्लोकाचें वृत्त 'पंचचामर' आहे. याचें लक्षणः–'प्रमाणिकापदद्वयं वदंति पंचचामरम्' अथवा–'जरौ जरौ ततो जगौ च पंचचामरं वदेत्.' 'प्रमाणिका'वृत्ताची दुपट केल्यानें 'पंचचामर' होतें. 'प्रमाणिका जरौ लगौ' असें या वृत्ताचें लक्षण आहे. ९. प्रेमानें. १०. या 'दोधक'वृत्ताचें लक्षणः–'दोधकमिच्छति भत्रितयाद्गौ.' यांत तीन भगण आणि दोन गुरु अक्षरें असतात. ११. वंशस्थ, दोधक, शार्दूलविक्रीडित, इत्यादि छंद, द्वादशदलकमलबंध, अष्टदलकमलबंध, अश्वबंध, चामरबंध, खड्गबंध, बाणबंध, मुरजबंध, इत्यादि. या बंधांचे अनेक प्रकार आहेतः–'बाणबाणासनव्योमखड्गमुद्गरशक्तयः । मृदंगपद्मशृंगाटदंभोलिमुसलांकुशाः ॥ पदं रथस्य नागस्य पुष्करिण्यसिपत्रिका । एते बंधास्तथा चान्येऽप्येवं ज्ञेयाः स्वयं बुधैः ॥' यमकें=अर्थ असून जेथें अर्थभिन्न समान वर्णाची आवृत्ति होते तेथें यमक होतें. याचे श्लोकपादावरून अनेक प्रकार आहेतः–मुख, संदंश, आवृत्ति, गर्भ, संदष्टक, पुच्छ, पंक्ति, युग्मक, परिवृत्ति, समुद्र, महायमक, इत्यादि. १२. काव्यरीति–रसाला अनुकूल अशी जी काव्यांतील पदरचना तिला 'रीति' असें म्हणतात. ही तीन प्रकारची आहेः–वैदर्भी, गौडी आणि पांचाली. भोजराजाच्या मतें ही सहा प्रकारची आहेः–वैदर्भी, गौडी, पांचाली, अवंतिका, मागधी आणि लाटीया. १३. खरोखर. १४. दोन जुनाट हस्तलिखित प्रतींत हा श्लोक आढळत नाहीं तेव्हां हा कदाचित् प्रक्षिप्त असावा.

श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर निकें साहित्यपद्योत्तरीं,
वाची **श्री**पति पत्रिका उकलुनी चातुर्यवर्णाक्षरीं; ।
श्लोकाची [1]रसवृत्तिशुद्ध रचना वित्पन्न ते जाणती,
वर्णी **विठ्ठल** दास सर्ग पहिला मऱ्हाष्ट्र हे [2]पद्धती. ॥ ६१

---

## सर्ग दुसरा.

(श्लोक.)

सुवर्णाचें पत्राक्षर [3]कमलपत्राक्ष उकली,
प्रभा [4]काश्मीराची, [5]द्युति [6]हिमकराची, प्रगटली, ।
[7]उडंगें आकाशीं रजनिअवकाशीं उगवती,
तशा बिंदू रेखावळि घनसुरेखा मिरवती. ॥ १
अनंता श्री**कृ**ष्णा! नमन तव साष्टांग चरणा,
अनंतब्रह्मांडोदरपति परित्राणकरणा, ।
**मु**कुंदा! [8]मंदारा! **य**दुपति! उदारा! गुणनिधी!
करी [9]**वे**दोनारायण भजन [10]**गं**गांधर [11]**वि**धी. ॥ २
घनश्यामा **रा**मा [12]भुजगपतिपर्यंकशयना,
[13]यजी [14]**प**द्मा वक्षावरि तव पदें [15]पद्मनयना! ।
पुनः प्रेमा नामामृत [16]ईश विषस्ताप नुरवी,
रसीक **व्या**सर्षी सहजचि वदे वर्धन कवी. ॥ ३
तुझ्या सौंदर्याचा त्रिभुवनिं ठसा एक न दिसे,
पदप्राप्तीसाठीं [17]सुरवर **म**हेंद्रादिक पिसे, ।

---

१. रस=शृंगार, हास्य, करुणा, रौद्र, वीर, भयानक, इत्यादि रस आहेत. 'शृंगारवीरकरुणा बीभत्सभयानकाद्भुता हास्यः । रौद्रः शांतः प्रेयानिति मंतव्या रसाः सर्वे ॥' [काव्यालंकार–अध्याय १२ श्लोक ३]. वृत्ति=रसाला उपकारक जी वर्णरचना तिला 'वृत्ति' म्हणतात ती मधुरा, प्रौढा आणि परुषा अशी तीन प्रकारची आहे. यांसच कैशिकी, सात्वती आणि आरभटी अशीं नांवें आहेत. या तीन वृत्ति माधुर्य, प्रसाद आणि ओज या गुणांच्या पोषक आहेत. शृंगारवर्णनांत कैशिकी आणि वीररसवर्णनांत सात्वती व आरभटी यांचा उपयोग करतात. २. 'भारती' असा अन्य पाठ आहे. ३. कृष्ण. ४. केशराची. ५. कांति. ६. चंद्राची. ७. नक्षत्रें. ८. कल्पवृक्षा. ९. अग्नि. १०. महादेव. ११. ब्रह्मदेव. १२. शेषावर शयन करणाऱ्या, १३. पूजी. १४. लक्ष्मी, १५. कृष्णा. १६. अल्प. १७, देवश्रेष्ठ.

त्रिताप[1] ध्वंसेति श्रवण करितां कीर्तिगरिमा[2],
कळेना वेदांता स्तुतचरणराजीवमहिमा[3]. ॥ ४
मुकुंदा ! जो रूप द्रविण[4] कुळ विद्या वय धरी
नरांमध्यें पंचानन[5], न वरि[6] या कोण नवरी ? ।
नपावेति व्रीडावति[7] कुलवती उत्कटतपें[8],
वराका[9] मी तेथें तुज वरिन कैसेंनि पडंपें[10] ? ॥ ५
मनोवाचा काया[11] हरि ! तुझिच जाया[12] भरंवसा,
तुझ्या अर्धांगातें[13] वरिल दमघोषात्मज[14] कसा ? ।
मृगेंद्रांच्या[15] लाभें फळ कवळु[16] गोमायु[17] तरुणा,
घडेना कल्पांतीं, मुनिजनपरित्राणकरुणा ! ॥ ६
गुरूपूजा सेवा व्रत नियम देवार्चनगती
तळीं वापी[18] कूपादिक मठ अंबूपार[19] जगती, ।
घडे हें प्राग्जन्मीं, तरिच इहजन्मीं परिणिसी[20]
तनूची फांसाटी, करिन[21] तुजसाठीं धरणिसी, ॥ ७
दयाळा ! माझें त्वां भजनिं मन सर्वस्व हरिलें,
निरातंका[22] चैद्या गमन परवां लग्न धरिलें; ।
न येणें एकाकी प्रगट गुज कोण्हा न करणें,
समारंभें यावें, जंव न पडती सूर्यकिरणें. ॥ ८
रथ शृंगारावे मदगलित[23] दंतावळ बरे,
तुळे ज्यांसीं ऐरावत सुहृद चौदंत[24] दुसरे, ।

---

१. त्रिविध ताप नाहींसा करतोस. त्रिताप=आधिभौतिक, आध्यात्मिक आणि आधिदैविक–असे तापाचे तीन प्रकार आहेत. आधिभौतिक—पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश या पंचमहाभूतांच्या क्षोभानें होणारा–जसा भूकंप, अतिवृष्टि, समुद्रमर्यादोल्लंघन), आध्यात्मिक—(मनाच्या क्षोभापासून अथवा शरीराच्या रोगापासून होणारा–जसा खरूज, ताप), आणि आधिदैविक—(देवतांच्या क्षोभापासून होणारा–जसा वीज पडणें). २. कीर्तीचा मोठेपणा. ३. स्तवन केलेल्या चरणकमळाचा मोठेपणा. ४. वित्त. ५. सिंह. ६. वरीत नाहीं, स्वीकार करीत नाहीं. ७. लज्जायुक्त. ८. उग्रतपानें. ९. नीचा. १०. प्रतिष्ठेनें. ११. शरीरानें. १२. भार्या. १३. अर्धांग=स्त्री, बायको, प्रिया. १४. दमघोषसंज्ञक राजाचा पुत्र (शिशुपाळ). १५. सिंहाच्या. १६. ग्रास, घांस. १७. कोल्हा. १८. तळी. १९. अनंत. २०. विवाहिसी. २१. ‘त्यजिन’ असा पाठभेद आहे. २२. शंकारहिता. २३. मदोन्मत्त. २४. हत्ती.

तुरंगीं[1] पाल्हाणें[2] मणिगणयुतें सज्ज करणें,
बृहद्यंत्रीं[3] दारूभरण भरिजे सावधपणें. ॥ ९
खटाटोपें यावें, नृप **मगध** **चैद्यादि** मिळती,
प्रतापें जिंकावे रसनवकुळींचे[4] क्षितिपती,[5] ।
उद्यां लग्नाआधीं मथुनि रणसिंधू बळनिधी
बळात्कारें पाणिग्रहण[6] करणें राक्षसविधी.[7] ॥ १०
**जरासंधा** **शाल्वादिक** विर्मत **चैद्य** क्षितिपती,
जिणावे[9] संग्रामीं, मज हरुनि न्यावें **यदुपती** ! ।

---

१. घोड्यावर. २. खोगीर. ३. मोठ्या तोफेंत. ४. रस म्हणजे सहा (षड्रस) आणि नऊ मिळून शाण्णव कुळींचे राजे:—या राजांचीं नांवें सह्याद्रिखंडांत दिलीं आहेत तीं—अनुज, देवक, पृथु, ऋतुपर्ण, जय, सुभीष्म, सौवाम, सुमंत, कौंडीण, मंडुक, कुशीक, मार्तंड. कामपतीचे पुत्र सोमवंशी—पद्म, शाम, पृथु, श्रीधर, ब्रह्मज्ञ, चंपक, शार्दूल, नोल, विद्युत्पति, सुरब्रह्म, रघु, मागध, शैल, मान, श्रीपति, शल, नकुल, शैल, भूरथ, यदु, पौंडीक, जघव, मन्मथ, पार्थिव, रंधक, प्रघोष, शशी, दान, सारंग, वज्रदंष्ट्र, देव, मंत्रोद्भव, श्रीपाल, मयुरण्य, सुरसेन, नरहरि, मंडूक, भार्गव, सुग्रीव, सप्तसंधर, चैत्र, धर्म, रिपु, शाश्वत, दान, शाल्मली, जायव, विदर्भ, प्राणनाथ, वैजयंत, पार्थिव, भूरिसेन, पृषद, वासुकी, कीर्तिमान, सुवर, गोत्रज, अतिवार, सुदेष्ण, रुक्मरथ, सुरथ, महाराज, अरिमर्दन, प्रीतिनाम, सहस्रजित, चित्ररथ, सीम, आदि, गज, असीमहीधर, श्वेत, सुक्षेत्र, महाविद्वान्, सुविद्वान्, कामद, श्रीधर, प्रजायाल, वेदवार, ध्रुववंश, स्वायंभुमनुचा रघुवंश, वैवस्वत मनूचा जनकवंश, पुरूचा कुरुवंश, यदुवंश, सूर्यवंशशिवराज. ५. राजे. ६. विवाह. ७. राक्षसविधि=राक्षसविवाह. विवाहाचे आठ प्रकार आहेत:—(१) विद्या व सदाचार यांनीं युक्त असून, कन्येची याचना न करणारा अशा वराला सत्कारपूर्वक बोलावून आणि वस्त्रालंकारांनीं पूजून कन्यादान करणें हा 'ब्राह्मविवाह.' (२) ज्योतिष्टोमादि यज्ञ होत असतां, यथाविधि कर्म करण्याऱ्या ऋत्विजाला अलंकारयुक्त कन्यादान करणें हा 'दैवविवाह.' (३) वरापासून धर्मार्थ म्हणजे यागादि सिद्धींसाठीं किंवा कन्येला देण्यासाठीं एक गोमिथुन (एक गाय व बैल), अथवा दोन गोमिथुनें घेऊन त्याला यथाशास्त्र कन्यादान करणें हा 'आर्षविवाह.' (४) 'तुम्ही उभयतां मिळून धर्माचरण करावें' असा कन्यादानकालीं पूर्वी नियम करवून पूजा करून कन्यादान करणें हा 'प्राजापत्यविवाह.' (५) कन्येच्या पित्रादि ज्ञातींला आणि कन्येला यथाशक्ति स्वेच्छेनें धन देऊन कन्येचा स्वीकार करणें हा 'आसुरविवाह.' (६) कन्या आणि वर यांच्या अन्योन्यानुरागानें आलिंगनादिरूप परस्पर वधूवरांचा संयोग हा 'गांधर्वविवाह.' (७) कन्यापक्षीय लोकांचा नाश करून अथवा त्यांचे शरीराला जखमा करून व प्राकारादि फोडून, रोदन करणारी आणि पित्याला व भ्रात्यांला आक्रोशपूर्वक हाका मारणारी अशी कन्या गृहांतून बलात्कारानें आणणें हा 'राक्षसविवाह.' (८) निजलेली मद्यमदविव्हल अथवा शीलसंरक्षणविरहित अशा स्त्रियेशीं एकांतीं मैथुनधर्मी प्रवृत्त होणें हा 'पैशाचविवाह.' (मनुस्मृति–अध्याय ३ श्लोक २७–३४.) ८. शत्रु. ९. जिंकावे.

समाधानें पाणिग्रहण न घडे **कौं**डिणपुरीं,
  किजे लग्न **द्वा**रावतिस विधिनें मंगळ[1]तुरीं. ॥ ११
न मानीं आशंका, मज म्हणसि अंतःपुरचरें
  बलात्कारें नेतां खवळतिल बंधू उपवरें, ।
वधूं जातां त्यांतें [2]बेत करिल ऐसें न म्हणिजे,
  उपाय प्राणेशा ! प्रथम रचिला म्यां समजिजे. ॥ १२
असे लग्नापूर्वीं **भ**गवतिस यात्रा नवसिली,
  निघाया बाहेरी कमलनयना ! युक्ति रचिली, ।
[3]पुरीबालोद्यानीं जवळि **ज**गदंबालयपदी
  तुझी माझी [4]संज्ञा, हरण करणें कार्य [5]संपदी. ॥ १३
पित्यानें, गोपाळा ! वचन **शि**शुपाळा न दिधलें,
  न चाले ताताचें, करि निजसुताचें म्हणितलें, ।
[6]परश्वींचे लग्नीं स्वभु सुहृद संलग्न [7]विवशीं,
  उद्यां येई नेई, तुज वरिन, येईन [8]सरसीं. ॥ १४
[9]कृपापारावारा ! [10]कुकुरपरिवारा सज्जुनियां,
  त्वरें पावें चिंतामणि ! भुवनचिंता त्यजुनियां, ।
महा**ल**क्ष्मीनाथा ! करिं मज अनाथावरि दया,
  नुपेक्षीं दातारा ! चुकविं [11]दुरितारातिविष या. ॥ १५
फुकाची मी दासी, झणि मन उदासीन करिसी,
  न येसी तैं जाणा तुजविण [12]यजीना नृपतिसी. ।
यशःश्री गोपाला ! समुख **शि**शुपालाप्रति नये,
  रथीं कीजे पाणिग्रहण शरपाणीसहित ये. ॥ १६
कदाचित् गोपाळा ! म्हणसिल महाधीट नवरी,
  न नेतां पाचारी किमपि **शि**शुपाळासि न वरी, ।
असी हे [13]ढाळाची चतुर [14]घरघेणी [15]परिणिजे
  गृहा येतां मातें वश करिल ऐसें न म्हणिजे. ॥ १७

---

१. वाद्यें. २. खेद. ३. नगराबाहेरच्या बागेंत. ४. संकेत. ५. तत्क्षणीं. ६. परवांचे. ७. परवश, पराधीन. ८. उत्साहयुक्त. ९. दयासागरा. १०. कुकुरसंज्ञक यादवसमूहा. ११. पापरूप शत्रु-विषास. १२. पूजीना. १३. तऱ्हेची. १४. घरबुडवी. १५. विवाहिजे.

पिता माता भ्राते मज वडिल ते ज्येष्ठ नमिती,
　तुझ्याठायीं [1]चौघेजण [2]विनितें, निंदा न करिती, ।
दुरात्मा तो रुक्मा खल [3]पतित [4]हाला [5]प्रचुर पी
　[6]स्वखड्गें दंडावा, रणिं मुख न दावी पुनरपी. ॥ १८
[7]गजेंद्रें आक्रांतीं स्मरण करितां शोक हरिला,
　दयाब्धी [8]प्रल्हादें [9]स्तवन करितां [10]स्तंभ चिरिला; ।
[11]व्रजासाठीं गोवर्धन उचलिला त्वां जिवविलीं
　विचित्रें [12]पांचाळीप्रति अमुप वस्त्रें पुरविलीं. ॥ १९
स्वयें वांछी पादांबुजरज उमावल्लभ हरी,
　जटाजूटीं गंगा तवचरणतीर्थोदक धरी, ।
न जाणेति ब्रह्मादिक [13]उपनिषद्भाग सुमती,
　न येसी तूं तैं मीं वरिन शतजन्मीं दृढमती. ॥ २०

---

१. चौघे बंधु. २. नम्र. ३. पातकी. ४. मद्य. ५. 'हालाहलरुपी' असा पाठभेद आहे. ६. 'स्वदंडें' असा अन्य पाठ आहे. ७. गजेंद्र—ही कथा श्रीमद्भागवत—स्कंध ८ अध्याय २-४ यांत आहे. क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें, आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषार्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें पकडिलें. तेव्हां त्यानें नक्राच्या हातून सुटण्याचा पुष्कळ यत्न केला, परंतु सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया, आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांचेंही कांहीं चालेना. या उद्योगांत हजार वर्षें गेलीं; सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं परमेश्वराचा धांवा केला (अध्याय २ श्लोक २-२९). 'मी ग्राहापासून मुक्त होण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों' इत्यादि स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान् हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायणा! अखिलगुरो! भगवन्नमस्ते' असें म्हणून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपटून भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून, चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें. (अध्याय ३ श्लोक ३३.) ८. प्रल्हाद—हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेला ज्येष्ठपुत्र. हा भगवन्निष्ट आणि विष्णूचा उपासक म्हणून पित्यानें ह्याचा पुष्कळ छळ केला. शेवटीं परमभागवताच्या सेवेनें प्रसन्न होऊन नृसिंहानें याच्या पित्याचा वध केला आणि याचें संरक्षण केलें. (भागवत—स्कंध ७ अध्याय १-१०.) ९. 'स्मरण' असा पाठभेद आहे. १०. खांब. ११. गोकुळासाठीं. १२. द्रौपदीस श्रीकृष्णानें वस्त्रें पुरविलीं, ही कथा महाभारत—सभापर्वांत आहे. १३. उपनिषदें.

रमाकांता! झाली लिखित लिहितां तांतडि मला,
नसे शाई दौती, [1]प्रचुर मज संदेह गमला, ।
कळावें ना कोण्हा हितगुज विचारूनि [2]वेहिलें
[3]कनिष्ठेनें [4]नेत्रांजनघनरसें पत्र लिहिलें.' ॥ २१
वाचोनि पत्र [5]नवपंकजनेत्र राहे, विप्राकडे स्मितमुखें क्षणएक पाहे; ।
बोले **सु**देव लिखितार्थ निका विचारा, 'कर्तव्य तें त्वरित कार्य किजे उदारा!'
तूं सर्वसाक्षी सकळांतरात्मा सर्वज्ञ सर्वेश्वर सच्चिदात्मा, ।
ब्रह्मेंद्र वेद स्तविती [6]**पु**रारी अगाध तूझा महिमा **मु**रारी! ॥ २३
गृहीं प्रिया [7]**मा**, परिपूर्णकामा, [8]मुदीरधामा मदनाभिरामा, ।
स्वसैन्य नीलांबर मेघनीला चाले सुशीला धरिं वीरलीला. ॥ २४
विप्रबोलश्रवणें [9]**व**नमाळी, हास्य पावुनि पिटी करटाळी, ।
**रु**क्मिणीसि विरहास्तव निद्रा, अल्प ये न रजनींत मुनींद्रा. ॥ २५
राजे [10]संग्रामयज्ञीं [11]हविन पशु जसे, **रु**क्म दंडीन युद्धीं,
नाना संतृप्त [12]भूतें करिन भुजबळें मेदमांसीं [13]अशुद्धीं, ।
काष्ठें मंथूनि दोनी [14]हुतवहविशिखा काढिजे जेंवि आगें,
**वै**दर्भी एकला मीं [15]खलु [16]प्रणिन तितें पूसिलें [17]सानुरागें. ॥ २६
पाचारिला कुशल [18]**दा**रुक त्यासि सांगे, 'जाणें **वि**दर्भनगरीप्रति आजि लागे, ।
कोणासि त्वां न कळतां रथ सज्ज कीजे, बैसावया [19]द्विजवरासी तुरंग दीजे.॥२७
[20]संजोगिला रथ मनोरथपूर्णकर्ता, जो [21]शत्रुसाधन यशोधन सर्वहर्ता, ।
[22]ग्रीष्मार्कबिंबशरदिंदु तसीं [23]रथांगें वायूपमा रणसमुद्र तरे निजांगें. ॥ २८

---

१. पुष्कळ. २. तत्काळ. ३. कनिष्ठिका अंगुलीनें. ४. डोळ्यांसंबंधीं काजळाच्या दाट रसानें. ५. नव्या कमळासारखे डोळे ज्याचे तो. (कृष्ण.) ६. त्रिपुरासुराचा शत्रु. (महादेव.) ७. लक्ष्मी. ८. घनकांति (मेघवर्णा.) ९. जो वनमाला धारण करतो तो. 'आपादपद्म या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; अथवा 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥' तात्पर्यार्थ—कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला वनमाला असें नांव आहे. श्रीकृष्णाची माला पूर्वोक्त प्रकारची असे म्हणून त्याला 'वनमाली' असें नांव आहे. १०. युद्धरूप यज्ञांत. ११. होम करीन, बळी देईन. १२. प्राणी. १३. रक्तांनीं. १४. अग्नीची ज्योत. १५. निश्चयार्थ अव्यय. १६. परिणय करीन. १७. प्रेमपूर्वक. १८. दारुक=कृष्णाचा सारथी, याला काश्यपेय असें नामांतर होतें. १९. सुदेवाला. २०. जोडिला. २१. शत्रूला साधून देणारा. ज्यांत बैसलें असतां शत्रु आपल्या स्वाधीन होतो असा—भाव. २२. ग्रीष्मकाळांतील सूर्यबिंब आणि शरत्कालांतील चंद्र, यांजसारखीं (रथांगें.) २३. चाकें.

**सु**[1]ग्रीव **शै**[1]ब्य **सु**[1]बळाहक **मे**[1]घपुष्प वर्णोपमा [2]त्रिदशवाहिनिमेघपुष्प, ।
शृंगारिले मणिगणाभरणीं [3]ललामें, ज्यांचीं कदा न लगती धरणीं लगामें.॥२९
आरोहणा स्यंदन **वा**सुदेवा, बैसावया [4]वाह नवा **सु**देवा; ।
शस्त्रें रथीं स्थापुनि **पू**तनारी जिंतावया नोवरि [5]पूत नारी. ॥ ३०
श्री**मद्रु**क्मिणिची स्वयंवरकथा सौभाग्यसंवर्धिनी
श्रोते सादर आयकोत रचना साहित्यविस्पर्धिनी, ।
वर्णी **वि**ठ्ठल दास यापरि किजे प्रस्थान **दा**मोदरें,
तेथें पंडित चित्त देउ, कमळीं भृंगें जसीं [6]आदरें. ॥ ३१

---

## सर्ग तिसरा.

(श्लोक.)

शुक म्हणे परिसें **कु**रुनंदना! चतुरवर्धन तूं रिपुभंजना! ।
[7]नवसरोरुहनेत्र चढे रथा '**द्रु**तविलंबितवृत्त' [8]बुझे कथा. ॥ १
[9]गाधिनीनंदनें योजिलें स्यंदना, आदरें जाणवी **दे**वकीनंदना, ।
**कृष्ण** आणावया चालिला **रु**क्मिणी, सत्कवी गातसे छंद हा, '[10]स्रग्विणी. ॥ २
[11]**अ**नर्तदेशींहुनि पूर्वपंथें प्रयाण केलें [12]**व**सुदेवसूतें, ।
एकानिशीमाजि **वि**दर्भदेशा घेऊनि आला द्विज [13]इंदिरेशा. ॥ ३
[14]राजे आले वराडा म्हणउनि [15]नृपती त्यांसि गेला [16]पुढारां,
सन्मानेसीं [17]गुढारासहित [18]निजपुरामाजि नेलें [19]विडोरा; ।
**चै**द्याच्या [20]लग्नचाडा नरवर [21]मिनले, भाट गाती पवाडा,
**वृ**ष्णी येनाति पाडा, परि करिल **ह**री क्षात्रधर्मीं निवाडा. ॥ ४
शृंगारिलें नगर [22]हाट [23]वट्या दुकानें [24]रथ्या [25]चतुष्पथ [26]संमार्जित [27]कुंकुमानें; ।
चित्रध्वजादि मखरें [28]नव रंगमाला दिव्यांबरें युवतिराजित [29]पट्टशाळा. ॥ ५

---

१. हीं कृष्णाच्या अश्वाचीं नांवें. (श्रीमद्भागवत–दशमस्कंध–अध्याय ५३ श्लोक ५ पहा.) २. देवनदी (गंगा) तिचें उदक. ३. घोड्यांच्या अलंकारविशेषें. ४. घोडा. ५. पवित्र. ६. 'सादरें' असा पाठभेद आहे. ७. नूतनकमळासारिखे नेत्र ज्याचे असा (कृष्ण.) ८. समजे. ९. दारुकानें. १०. स्रग्विणी=छंदोविशेष. यांत चार 'र'गण प्रत्येक चरणांत असतात. यास चार चरण असतात. हा जगती छंदाचा पोटभेद आहे. ११. दशमस्कंध अध्याय ५३ श्लोक ५ पहा. १२. 'यदुवंशनाथें' असा पाठभेद आढळतो. १३. लक्ष्मीपति कृष्ण त्याला. १४. हें 'अष्टदलकमलबंधा'चें उदाहरण आहे. १५. भीष्मक. १६. 'पुऱ्हाडा' असा अन्य पाठ. १७. सैन्यासह. १८. कुंडिनपुराला. १९. 'बिऱ्हाडा' असा अन्य पाठ. २०. विवाहकौतुका. (चाड=आवड.) २१. मिळाले. २२. बाजार. २३. ओट्या. २४. गल्ल्या. २५. चवाठे. २६. शिंपलेले. २७. केशरानें. २८. नूतन. २९. हवेल्या.

[1]नांदीश्राद्धविधान देवकविधी आरंभिला [2]संभ्रमें,
केला होम अथर्वणा, मग दिलीं दानें यथानुक्रमें, ।
वैदर्भी सति ठेविली हळदिका दों मंडपीं सोहळा,
चैद्येशें विधि याह्नुनी बहुगुणें संपादिला मोकळा. ॥ ६

आले शाल्व वि[3]दूरथादिक जरासंध प्रतापी बळें,
'नेऊं जिंकुनि रुक्मिणीस' म्हणती [4]संनद्ध केलीं द[5]ळें, ।
येती सत्वर राम कृष्ण, परि ते आम्हांपुढें कायसे ?
लाऊं दाटुनि लग्न, मुख्य रुकमा चैद्यादि साह्या असे.' ॥ ७

असो, यावरी वर्तलें द्वारकेसी प्र[6]लंबघ्न जाणे विभू एक देसीं ।
नसे सैन्यसंपत्ति यालागिं जावें 'भुजंगप्रयाता' बुझा छंद नावें. ॥ ८

पँ[7]त्रमंत्र कळला बळदेवा, झुंजती नृपति तुंबळ, देवा ! ।
प्रेरिलें हरिस मूळ सुदेवा, तो विचार कथिला वसुदेवा. ॥ ९

संजोगिलें कुकुरसैन्य पळार्धमात्रें, चौदंति कुंजर नगोपम वज्रगात्रें; ।
घंटावळीयुत बळोद्धतशूळदंती शृंगारिले [8]जलदनील जसे वसंतीं. ॥ १०

तोडीं [9]खलीन, बहु चित्रविचित्र [10]वांजी [11]कुक्षीवरी जडित जीन [12]ललामराजी, ।
जे कां नभासि टिपिती पुढिल्या खुरानें [13]हिंसेति, [14]चंड [15]ककुभा भरल्या [16]रवानें. ॥ ११

शृंगारिले रथसहस्र [17]समेत वाजी संजोगिले [18]गरुडकेतु तया विराजी, ।
तीं जाहजें रणसमुद्र तरावयाचीं, आरूढ वीर, कवचें सुदृढें तयांचीं. ॥ १२

[19]क्रमेलक [20]दुतंगिले सदृढ [21]लोहयंत्रें वरी
असंख्य [22]चमु चालली त्रि[23]दशवाहिनीचेपरी; ।
पदातिगण [24]चोलिले, चरणिं तोडरीं राजती,
उदार चतुरंगणीं गरुडपक्षलीलावती. ॥ १३

---

१. विहादि मंगलकार्य करण्यापूर्वी करतात जें नांदीश्राद्ध तें. यांत बाप, आजा, पणजा; आई, बापाची आई, बापाची आजी; आणि आईचा बाप, आईचा आजा, आईचा पणजा—या नऊ पितरांचा उच्चार मात्र येतो. २. आदरानें. ३. दशमस्कंध–अध्याय ५३ श्लोक १७ पहा. ४. सज्ज. ५. सैन्यें. ६. प्रलंबसंज्ञक दैत्याचा नाश करणारा बलराम. ७. रुक्मिणीच्या पत्रिकेंतील मसलत. ८. मेघासारखे निळे. ९. लगामें. १०. घोडे. ११. 'पृष्टीवरी' असा पाठभेद आहे. १२. भूषणपंक्ति. १३. गर्जतात, खिंकाळतात. १४. भयंकर. १५. दिशा. १६. शब्दानें. १७. युक्त, सहित. १८. गरुडध्वज. (कृष्ण.) १९. उंट. २०. दुहेरी बंध बांधून सज्ज केलें. २१. बंदूका तोफा. २२. सेना. २३. देवसेनेसारिखी. २४. 'सजले' असा पाठभेद.

रथावरि महारथी कुकुर बैसले आगळे,
किंतेक शिबिकासनीं, चवर डोलिंचे वेगळे. ।
अपार चमु चालिली, गणित पायभारा[1] नसे,
तुरें पणव[2] दुंदुभी जलदगर्जना होतसे. ॥ १४
वीरां उष्णिक[3], ऊरुकांसि[4] कवचें, अंघ्रिद्वयीं यूतिका[5]
शस्त्रें सारसनीं[6] निबद्ध जघनीं जिंकावया अंतका, ।
सेनाचक्र हलायुधें[7] गवसुनी प्रस्थान केलें असे,
आला कौंडणनामपूरनगरीं, श्रीकृष्ण जेथें असे ॥ १५
अवस्था मनीं लागली रुक्मिणीसी, 'नये श्रीहरी कां?' म्हणे सजणीसी[8]; ।
उद्यां लग्न, केली उपेक्षा मुकुंदें, जळें स्रावती नूतनें नेत्रकुंदें[9]. ॥ १६
पर्यंकारूढ शंकाकुल विकळ गळा भूषणें रत्नगर्भा;
फुल्लांभोजायताक्षी[10] सहचरिस म्हणे निर्मिलें[11] रुक्मगर्भा; ।
जें जें होणार तें तें अचुक फळ घडे भाविनी[12] तें कळेना, ।
कैसें आतां करावें? अजुनि हरि न ये, वेदना आकळेना[13]. ॥ १७
द्वारा[14] येऊनि जाये[15], किमपि द्विज नये, धाडिला कृष्णसोये,
वत्सा लागोनि गाये[16] हुंबरत[17] जसि ये, रुक्मिणी तेंवि होये; ।
सांगावें गुह्य माये, तरि सुहृदभयें गुप्त गोष्टी नराये[18],
कैसा कीजे उपाये हितगुज सखिये सांगतां सिद्धि काये. ॥ १८
धन्वंत्री[19] त्रिविध[20] प्रकार वदतां चित्तास उल्हास ये,
नानामंद सुगंध शीतळ परी तापाग्निचा हो सये, ।

---

१. पायदळ, पदातिसैन्य. २. वाद्यविशेष. ३. सांड. ४. युद्धांतील निशाणाचे हत्ती. ५. जोडलेलीं. ६. योद्ध्यांचा कमरपट्टा. ७. बळरामानें. [हल—नांगर आहे आयुध ज्याचें तो.] ८. सोबतीणींशीं. ९. नेत्ररूप कुंदें. १०. प्रफुल्लकमलासारिखे नेत्र जीचे असी. ११. 'वर्तलें' असा अन्य पाठ. १२. होणारी गोष्ट. १३. एका पोथींत सतरा आणि अठरा या दोन पद्यांमध्यें आणखी एक पद्य आहे तें येथें देतों:—नेलें नाहीं पत्र किंवा सुदेवें[1], उपेक्षीलें वा[2] मला वासुदेवें[3]; । आला नाहीं जाब कां कागदाचा? येईना तो अग्रजू[4] कां गदाचा? ॥ [१. सुदेव नामक ब्राह्मणानें. २. किंवा. ३. कृष्णानें. ४. गद म्हणून वसुदेवाचा मुलगा होता त्याचा अग्रज=वडील भाऊ (कृष्ण.)] १४. येथें अनुप्रासालंकार आहे. १५. जा ये करी. १६. धेनु. १७. हंबरत. १८. न राहे. येथें प्रासासाठीं 'हे'काराच्या स्थानीं 'ये'कार योजिला आहे. १९. वैद्य. २०. तीन प्रकारचा ताप.

कंदर्पज्वर[1]तापकांप सुटला, स्वेदांग झाली असे,
श्रीकृष्णाविण कृष्णसारनयना[2] चंद्रासि दूषितसे. ॥ १९
चंद्रातें क्षयरोग[3], भाद्रपदिंचा पाहों नये चौथिचा[4],
बिंबा-लांछन सिंहिकासुत[5] गिळी पूर्णेंदुच्या रातिचा, ।
यापेक्षां गुरुतल्पदोष[6] परि तो शुक्लद्वितीयानिशीं,
त्रैलोक्याप्रति वंद्य शंभु मुकुटालंकार अंबूधिशीं. ॥ २०
स्रक्चंदनादि उपचार विहारकाळीं,
झाले असह्य धरिजे तव कंठनाळीं; ।
संकोचला वदनचंद्र सचिंत बाळी
कामाग्निनें तळमळी, विरहाग्नि जाळी. ॥ २१
चंचल चित्त अचंचल[8] तूं करिं, अंचल[9] सांवरिं, निश्चल राहें,
चाल, रुळे चरणांबुज हा, वरि कां चळ कांप तुला सुटलाहे; ।
चारु[10] म्हणे सखि चंद्रमुखी उठिं, चांचरि[11] चालिसि, सावध पाहें,
हेमकले! प्रमदामुकुटेश्वरि! धीर धरीं, हरी संनिध आहे. ॥ २२
[12]अतिविव्हल होय विदर्भसुता, तिसिं आवरिती सखिया बहुता, ।
तव वाम[13] भुजें दृग विस्फुरती शुभ चिन्ह दिसे वदती युवती. ॥ २३
तंव ते समयीं द्विज ये सदना, प्रणिपात करी हरिणीनयना, ।
मग काय सुदेव म्हणे तिजला, कवि तोचें[14] सुवृत्त निकें वदला. ॥ २४

---

१. कामज्वर. २. हरिणासारखे नेत्र जीचे असी (रुक्मिणी) (कृष्णसार=काळवीट.) ३. चंद्राच्या सत्तावीस स्त्रिया ह्या प्राचेतस दक्षाच्या कन्या. यांत रोहिणी म्हणून एक स्त्री होती, तिजवर चंद्राचें विशेष प्रेम असे. हिला त्याजपासून बुध हा पुत्र झाला. तेव्हां तिच्या इतर सपत्नींनीं (सवतींनीं) व भगिनींनीं बापाकडे गाऱ्हाणें केलें त्यावरून 'तूं क्षयरोगी' होशील असा दक्षानें चंद्रास शाप दिला–अशी कथा आहे. ४. चंद्राला आपल्या लावण्याविषयीं मोठा अभिमान होता. तो एकदां गणपतीकडे पाहून त्याच्या बोजड देहाला हांसला तें गणपतीस सहन झालें नाहीं, तेव्हां त्यानें 'तुजकडे कोणी पाहणार नाहीं' असा चंद्राला शाप दिला–अशी कथा आहे. ५. राहु चंद्राचा ग्रास करतो–अशी कथा आहे. ६. गुरु+तल्प+दोष=बृहस्पति+स्त्री+गमनदोष. चंद्र हा गुरुपत्नीशीं (तारेशीं) रत झाला म्हणून त्यास कलंक लागला–अशी कथा आहे. ७. या पद्याचें वृत्त सवाई किंवा मदिरा. ८. स्थिर. ९. पदर. १०. सुंदर, मधुर. ११. अडखळत. १२. या पद्याचें वृत्त तोटक. १३. डावा बाहु आणि डोळा हीं स्त्रियांचीं स्फुरण पावलीं असतां शुभावह आणि प्रियप्राप्तिसूचक होत. (दशमस्कंद–अध्याय ५ श्लोक २७.) १४. 'कवि तोटक वृत्त निकें वदला' असा अन्य पाठ आहे.

[1]निजपुरि उपकंठीं **कृ**ष्ण सेनादळेंसीं,
जवळि उतरला तो [2]**पे**द्मपाणी बळेंसीं; ।
न करिं दुरळ चिंतासर्पिणी टाकि दूरीं,
[3]अमृतमधुरवाणी ‘[4]**मा**लिनी’ गाति [5]चारी. ॥ २५
[6]हली **कृ**ष्ण आले असा गुप्तरूपें समाचार जाणोनि [7]**वै**दर्भभूपें, ।
असें शीघ्र गंतव्य भेटीसि केलें, यथायुक्त [8]सीमंतपूजेसि नेलें. ॥ २६
**कृ**ष्णाची थोर [9]सेना पसरलि गगनासारिखी पाहवेना,
पृथ्वीछाया दिसेना [10]दशशतवदना भार तो साहवेना, ।
भूतें जैसीं [11]निधाना गवसित गगना कोटिसंख्या कळेना,
वायू तेथें शिरेना **कु**कुरचमु मनीं [12]मोहितां आकळेना. ॥ २७
राजा भेटीस आला, **ह**लिहरिस नमस्कार साष्टांग केला,
चित्तीं बोधें निवाला **य**दुविर नयनीं देखतां खेद गेला; ।
पूजा सन्मान केला, मृदुवच वदनीं कीर्ति वर्णू निघाला,
तेणें श्री**कृ**ष्ण [13]धाला, श्रुत करि कविता ‘[14]**स्र**ग्धरा’ श्रोतयाला.॥२८
मी दर्शनाचा तुझिये भुकेला, त्वां आजि आम्हांवरि लोभ केला, ।
संसारतापाग्नि असे विजाला, संप्राप्त रंका [15]निधि जेंवि [16]जाला.’ ॥ २९
प्रार्थी राजा कमलनयना आत्म**वृ**ष्णीबळेंसीं,
ग्रामामध्यें [17]वसति करणें, **चै**द्य आले [18]दळेंसीं. ।
त्यातें प्रत्युत्तर **ह**रि वदे वैर त्यां राजयांसीं
‘[19]**मं**दाक्रांता’ फुकट कलहो कां करावा तयांसीं. ॥ ३०
[20]बाह्योद्यानीं **अं**बिकास्थान जेथें आज्ञा द्यावी आजि राहोन तेथें. ।
राजा हांसे, मानला शब्द [21]रामा, श्रोते गाती ‘[22]**शा**लिनी’ छंद नामा. ॥३१

---

१. आपुल्या नगरीजवळ. २. ‘सीरपाणी’ असा अन्य पाठ. सीरपाणी=बलराम. ३. ‘अमृतवचन बोले विप्र आला मुरारी आणि ‘अमृतसरसवाणी मालिनी गाति नारी’ असे अन्य पाठ आहेत. ४. या वृत्ताचें नांव ‘मालिनी’ आहे. ५. दासी. ६. नांगर धरणारा. (बलराम.) ७. भीष्मक राजानें. ८. सीमांत पूजा, सीमांत पूजन=कन्या वरावयासाठीं आलेल्या वराची ग्रामाच्या सीमेच्या अंतीं अथवा देवालयादिकांचे ठायीं जी पूजा करतात ती. ९. या पद्यांत अनुप्रासालंकार आहे. १०. सहस्रमुख शेषाला. ११. मरणा. १२. ‘मोजितां’ असा अन्य पाठ. १३. तृप्त झाला. १४. छंदविशेष. १५. ठेव. १६. झाला. १७. गृह. १८. सैन्यासहवर्तमान. १९. ‘मंदाक्रांता’ हें वृत्ताचें नांव आहे. याचें लक्षण:–‘मंदाक्रांतांबुधिरसनगैर्मो भनौ तौ गयुग्मम्’. २०. बाहेर बागेमध्यें. २१. बळरामा. २२. शालिनी छंदाचें लक्षण:–‘मात्तौ गौ चेत् शालिनी वेद लोकैः’.

पाहावयातें बहु लोक पातले, दिव्यांगनाचे गण फार दाटले. ।
श्रीकृष्ण नेत्रीं जवळूनि पाहती, हा [1]इंदुवंशीं गुणवंत [2]जाणती. ॥ ३२
अंबालयीं वसतिचा हळि नेम केला, आज्ञा दिली नृपवरें, नगराशि गेला; ।
या नंतरें हरि निघे नियमस्थळाशीं, गाती 'वसंततिलका' प्रिय सज्जनाशीं. ३३

कोटिकाम मूर्तिमंत कृष्णरूप ओतलें,
ब्रह्मपूर्ण निष्प्रपंच साक्षिभूत शोभलें, ।
शुद्धबुद्धि वेद[3]भेद नेति[4]पार आदरें
त्यासि भृत्य [5]व्यंजिताति रत्नदंड '[6]चामरें.' ॥ ३४

[7]मृगनयना वदती [8]नृपबाळा हरिविण ते न वरू शिशुपाळा ।
मुखकमलें गुण वर्णिति जाया, भुवनिं हे हरि रुक्मिणि जाया. ॥ ३५
आमुचें सुकृत आजि फळावें माधवें नृपसुतेसि वरावें. ।
रुक्मिणीसि वर हाचि विराजे, [9]म्लानमूख शिशुपाळ न साजे. ॥ ३६
अंबालयीं स्थळ सुशीतल दाट [10]सांई, पुष्पीं फलीं लवति [11]पादप आंबराई. ।
[12]आरामधाम बलरामसमेत [13]शौरी, ते स्थानिं कीं उतरले गंवसेति गौरी. ॥ ३७

आले मागध चैद्य आदिकरुनी ते ते यथानुक्रमें,
रायें [14]भूभुज पूजिले, धडकती भेरी तुरें [15]संभ्रमें. ।
[16]पाचारूनि कुमार भीमक म्हणे गंभीरवाणीं तया,
'सेना सज्ज करीं वधू भगवती ने शीघ्र पूजावया. ॥ ३८
वृद्धाचार परंपरागत कुळीं नाहीं तुला सूचना,
लग्नापूर्वदिनीं वधू भगवती न्यावी नवी पूजना.' ।
ऐसें उत्तर आयकोनि हृदयीं रुक्मा [17]विरोला असे,
झाला म्लान म्हणे, 'अरिष्ट रचलें चैद्याकडे हा नसे.' ॥ ३९

---

१. चंद्रवंशीं. २. या छंदाचें नांव 'इंद्रवंशा.' याचें लक्षण:—'ती इंद्रवंशा कविराज हेरिती । ताता जरा हे गण येति ये रितीं.' ३. मंत्र. ४. पार नाहीं याप्रकारें. ५. वारा घालतात. (व्यंजन=पंखा.) ६. चंवऱ्या. या वृत्ताचें नांव चामर. ७. एणाक्षी. ८. या वृत्ताचें नाव 'तामरस.' याचें लक्षण:—'इह वद तामरसं नजजा: य:' म्हणजे यांत न, ज, ज, आणि य असे गण अनुक्रमें येतात. ९. येथें वृत्तनियमासाठीं 'मुख'शब्दांतील उ दीर्घ केला आहे. १०. छाया. ११. वृक्ष. १२. शांति किंवा सुख यांचें स्थान. १३. श्रीकृष्ण. १४. राजे (भूचे भोक्ते). १५. गडबडीनें. १६. 'पाचारी कुमराशिं' असा पाठभेद आहे. १७. खिन्न झाला. विरघळून गेला, भग्नमनोरथ झाला.

[1]मागध चैद्य तयां प्रति येउनि रुक्म भयातुर होउनि सांगे,
'ओढवलें तरि विघ्न महद्भुत लग्न उद्यां कवणेपरि लागे, ।
[2]पूर्वदिनीं नवरीसि भवानिसि नेउनि दर्शन पूजन कीजे,
याचनिमित्त तुम्हीं सह होउनि सैन्य वधूसमरक्षण कीजे.' ॥ ४०
श्रीम[3]द्रुक्मिणिचें स्वयंवरकथा हे, आयका हो! सुखें
श्रोता मुख्य परिक्षिती शुकमुनी वक्ता निवेदी मुखें, ।
बाला यौ[4]वनषोडशी हरिकथा वृद्धा वयें जाणिजे,
प्रार्थी विठ्ठल दास सर्ग तिसरा विद्वज्जनीं वाचिजे. ॥ ४१

---

## सर्ग चवथा.

(श्लोक.)

प्रतापें [5]महाचैद्य सज्जूनि येती, वधू [6]पार्वतीपूजनालागिं नेती; ।
अलंकार लेऊनि बाहेर आली, समुद्रांतुनीं जेंवि लक्ष्मी निघाली. ॥ १
अश्वारूढ नव्हे, न यान, न गजस्कंधादिकें वाहनें,
पायानें [7]चमके मराळनयना वेष्टीत यो[8]षा जनें ।
राजे मागध चैद्य सर्व [9]सरिसे मागें पुढें चालती,
श्रीचक्राकृति सैन्य तें रचियलें, संगें सख्या धांवती. ॥ २
वैदर्भी मंद चाले, गजगति उपमें, हंस सामान्य झाले,
चौघे बंधू निघाले गवसित सरिसे मागधी चैद्य आले, ।
चक्रें खड्गादि भाले धरुनि भुजबळें झेलिती आपुलाले,
राजे लग्ना मिळाले, परि कुकुरभयें गर्व त्यांचे [10]गळाले. ॥ ३
चौदंत दं[11]तावळ भ[12]द्रजाती [13]फौजांपुढें डुल्लत तुंग जाती ।
आरूढ [14]औधोरण आयुधेंसी, जैसा तपें सूर्य [15]सुधांबुधेसीं ॥ ४

---

१. या वृत्ताचें नांव 'मदिरा.' २. 'पूर्वदिनीं नवरीस हि नेउनि दर्शनपूजन संभ्रम कीजे' असा पाठभेद आहे. ३. 'श्रीमद्भागवतीं' असा पाठभेद आहे. ४. सोळा वर्षांची तरुणी. ५. 'महा-दैत्य' असा अन्य पाठ. ६. 'पार्वतीदर्शनालागीं' असा पाठभेद आहे. ७. 'पायीं चामकली' अन्य पाठ. ८. स्त्रिया. ९. नीट, बरोबर. १०. या श्लोकांत अनुप्रासालंकार साधला आहे. ११. हत्ती. १२. मत्त हत्ती. (मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय १ ओंवी १६३.) १३. 'भारापुढें डुल्लत मत्त जाती' असा अन्य पाठ आहे. १४. महात. १५. सागराला.

चंद्राकारें वर्तुलें आतपत्रें[1] तैसीं माना सुंदरें सूर्यपत्रें. ।
सेनेमध्यें राजभारीं उदंडे दूतांहातीं चामरें हेमदंडें[2]. ॥ ५

वधू जातसे **पा**र्वतीपूजनासी, तुरें गर्जती, हर्ष बंदीजनासीं ।
पुढें वारिती वेत्रधारी जनासी, असी[3] दाटि ते होतसे हो जनासी. ॥ ६

सडे घातले कुंकुमाचंदनाचे, थवे चालती दिव्यवारांगनाचे[4], ।
महागर्जना होत वैतालिकांची[5], मुखें वर्णिती कीर्ति **चै**द्यादिकांची. ॥ ७

समारंभें जाते मिरवत मनोल्हासउचितें,
सवें पूजाद्रव्यें भरुनि तबकें रत्नखचितें, ।
विचित्रें आस्तर्णें पसरिति पथीं पायघडिया,
**वि**दर्भीच्या संगें नगरजनपत्न्या सुघडिया. ॥ ८

फुल्लांबुजाक्षी गुणरत्नशाली **अं**बालयासंनिध शीघ्र आली, ।
केलें पदक्षालन हस्तशुद्धी शुद्धाचमनें[6] घेत विशेषबुद्धी. ॥ ९

तयानंतरें देउळामाजि आली, नमस्कार साष्टांग देवीस घाली, ।
विसर्जूनियां मौनमुद्रा प्रभूजा[7], करी स्वस्थचित्तें यथायुक्त पूजा. ॥ १०

कुंकूं तांड[8] हरिद्रिका[9] गळसरी पूर्णांबरें कोहळें,
दाळिंबें फणसें फुलें यव धनें कर्पूर पूंगीफलें[10], ।
नारेळें उद इक्षुदंड उतत्या[11] निंबें लवंगा बुका
कस्तूर्यागरु दीप गुग्गुळ पुढें ठेवी स्तवी पादुका. ॥ ११

इंद्राणी[12] कुलदेवता नृपतिची प्रत्यक्ष आवाहिली[13]
चौहातीं चतुरायुधें[14] त्रिनयना पीठासनीं स्थापिली; ।
माथां[15] रत्नकिरीट, हार हृदयीं, बालार्कपीतांबरा[16]
श्रीचक्रेश्वररुक्मिणी[17] स्तुति करी 'तूं वारिं आडंबरा.' ॥ १२

'भूबीजा जठरीं त्रिकंकण करीं शृंगारदामोदरीं
आठांची नगरी चतुर्दश गिरीं दोहीं दिशारांतरीं ।

---

१. छत्रें. २. सुवर्णदंडयुक्त. ३. 'वना चालली कोकिळा कूजनासीं' असा अन्य पाठ आहे. ४. वेश्यांचे. ५. भाटांची. ६. शुद्धाचमनें. ७. नृपात्मजा. ८. ताडपत्र. ९. हळद. १०. सुपाऱ्या. ११.उदबत्त्या. वृत्तसुखार्थ 'उतत्या' असें रूपांतर केलें असावें. १२.इंद्राची पत्नी शची. हिचें पहिल्या दोन चरणांत आहे. १३.आवाहन केलें, मंत्रादिकांनीं देवतेस जवळ करणें=आवाहन करणें. १४.चार प्रकाराचीं आयुधें आहेत तीं:—१ मुक्त–चक्रादिक; २ अमुक्त–खड्गादिक; ३ मुक्तामुक्त–पाशतोमरादिक; आणि ४ यंत्रमुक्त–शरगोलकादिक. १५. या दोन चरणांत रुक्मिणीचें वर्णन आहे. १६. झगझगीत शालू नेसलेली. १७. राजा भीमकाची कन्या रुक्मिणी.

रंध्राचे पदरीं त्रिकोण उदरीं विंध्याचिया मंदिरीं
तूं माते! त्रिपुरीं वसोनि शिखरीं [1]हस्ताब्ज ठेवीं शिरीं.' ॥ १३
[2]पूजा सांगेति शुद्धा गवसित वसुधाविप्रपत्न्या विशुद्धा,
रत्नालंकार गंधादिक नग बहुधा वाहवीती प्रबुद्धा; ।
दावी नैवेद्य दुग्धांबुधि[3]कुमरि सुधापात्र नाना सुगंधा,
वर्णी दैत्यारि[4]मुग्धा भगवति! वि[5]बुधाधीशजाया प्रबंधा. ॥ १४
तूं माया विश्वरूपा भगवति! अजपा त्वद्विभूती अमूपा,
विद्याविद्या अरूपा अखिल तव कृपा तूं परब्रह्मरूपा. ।
संहारीं शाल्वभूपादिक मगधनृपा तूं सदा चित्स्वरूपा,
काढीं चैद्यांधकूपांतुनि तरण उपाया प्रयोजीं स्वरूपा. ॥ १५
माझे संकल्प चौघें[6] [7]पुरविसि अनघे अंबिके! [8]कामदूघे
सर्वज्ञ प्रेमओघें स्तविति तुज तिघे[9] त्यां त्वदाज्ञा नुलंघे; ।
जिव्हा दुःस्वाद नेघे, हरिभजनिं रिघे, हें करीं भक्तिसंघे,
ज्याचा जो भाग तो घे, वरकड अवघे अन्नहारी अमोघे. ॥ १६
तूं काली कमला सरस्वति कलाकाष्ठा जगद्वत्सला,
तूं तारा तरला गिरीशतनया ज्वालामुखी सोज्वला, ।
या बाला अबला मिळोनि सकळा घालीन मी गोंधळा
श्रीकृष्णा कुशला वरीन चपळा तैं [10]स्वाप लागो दळा. ॥ १७
[11][12]मराळगमनी मनीषिणि सवें सवें उपरमे रमे मन जवें, ।
जवेंकरुनि घे निघे स्तुति करीं, [13]करींद्रगति ये तिये शचि [13]घरीं. ॥ १८

---

१. करकमल. २. श्लोक १४,१५,१६ आणि १७ यांत द्वादशदलकमलबंध योजिला आहे. ३. 'कुसुम' असा अन्य पाठ आहे. ४. वयपरत्वें स्त्रियांचे चार वर्ग मानले आहेत:—बाला, प्रौढा, मुग्धा आणि प्रगल्भा. मुग्धा=चोवीसपासून बत्तीस वर्षेपर्यंत; प्रगल्भा=बत्तीसपासून चाळीस वर्षेपर्यंत; प्रौढा=बारापासून चोवीस वर्षेपर्यंत; आणि बाला=बारा वर्षेपर्यंत. दैत्यारिमुग्धा=देवांगना. ५. देवराजभार्या. (इंद्राणी.) ६. चार. (धर्म, अर्थ, काम, मोक्ष.) ७. पुरीवणारी. ८. मनोरथ पूर्ण करणारी. ९. ब्रह्मा, विष्णु, महेश्वर. १०. निद्रा. ११. पादांतमध्ययमकाचें हें उदाहरण आहे. १२. या पद्याचें वृत्त 'जलोद्धतगति.' याचें लक्षण:—'रसैर्जसजसा जलोद्धतगतिः' म्हणजे यांत ज स ज स असे गण अनुक्रम येतात. या अठराव्या श्लोकाबद्दल एका जुनाट हस्तलिखित पोथींत श्लोक आढळतो तो:—'मरालगमनी मनीं परमविस्मयें तोषिली, जगत्रजननी जनीं सकल जीवनीं पावली। नमूनि जगदंबिके दृढ धरूनियां पाउली, तयेसि उजवे करा करुनि बैसली राउळीं ॥'. १३. गजगामिनी.

संतुष्ट झाली नगराजबाळी, माळांगिकारी मग राजबाळी; ।
बाहेरि इंदूवदना रिघाली, मोहास्त्रसेने मदनारि घाली. ॥ १९
शरत्कोटिपूर्णेंदुबिंबोपमास्या ज्वलद्रुक्मगौरप्रभांगी सुहास्या ।
परंज्योतिचिद्ब्रह्मरूपा अनादी, कळा षोडशी नेणती भेदवादी. ॥ २०
परा पश्यती मध्यमा वैखरी या, न जाणेति वाग्देवता चारि जी या ।
[illegible]लीलें स्वरूपें धरी वेगळालीं, नृपांचीं तपें मंदवीर्यें गळालीं. ॥ २१
वैद[illegible]र्भी कोमलांगी युत जडितनगीं दिव्यरत्नें अनेगीं
जैसी गंगा प्रयागीं गवसित अपगी सागरा जाय वेगीं, ।
कालिंदी धौ[illegible]मिलांगी कुसुममगमगी जान्हवी उत्तमांगीं
ब्रांह्मी सेंदूरभांगीं अरुण जलजगीं देखिजे मध्यभागीं. ॥ २२
[11]बीजे वंद्य मुदा, [12]चतुर्थिसि [illegible]कदा पाहों नये दुर्मदा,
मासांतीं समुदालय प्रतिपदापर्यंत तो सर्वदा, ।
[13]स्वर्भानु क्षणदाकरा ग्रसि तदा लोपे कलासंपदा
[15]वृद्धी त्यासि क्षयो सदा निरखिती येथें[16] नसे तें कदा. ॥ २३

---

१. पार्वती. २. शरदृतुसंबंधी कोटिपूर्णचंद्राच्या बिंबासारिखें [illegible] तप्तसुवर्णासारिखें गौरवर्ण जीचें अंग. ४. सोळावी. ५. वाणी. ६. वाणी चार आहेत; परा (कान), पश्यंती, (नयन), मध्यमा (घ्राण), वैखरी (जिव्हा). परा=केवळ सकल शब्दांचें बीजभूत असें जें योगगम्य शब्दरूप ती; पश्यंती=परेपासून हृदयस्थानीं ईषन्मात्र उमटणारी वाणी ती; मध्यमा=वैखरी आणि पश्यंती यांच्यामधील जी वाणी ती; वैखरी=जीणेंकरून शब्द स्पष्ट बाहेर पडतात अशी जी चवथी वाणी ती. याप्रमाणें वाणी चतुर्विध आहे. ७. नदी. ८. जान्हवी–भगीरथानें स्वर्गाहून गंगा आणिली, ती हिमालयावरून खालीं येत असतां मध्यें जन्हूचा आश्रम लागला, तेथें जन्हु यज्ञ करीत होता, त्याची यज्ञसामग्री वाहूं लागली तेव्हां त्याला राग येऊन त्यानें ती पिऊन टाकिली. तेव्हां भगीरथानें त्याची प्रार्थना केल्यावर तिला त्यानें कानाच्या वाटेनें सोडून दिलें. तेव्हांपासून तिला जान्हवी हें नांव मिळालें. (नवनीत.) ९. मस्तकीं. १०. सरस्वती. ११. द्वितीयेला. द्वितीयेचा चंद्र वाढणारा (वर्धिष्णु) म्हणून दर्शनीय होय. यालाच 'प्रतिपच्चंद्र' असें म्हणतात. [येथें 'प्रतिपद' शब्दानें द्वितीयेचें ग्रहण करणें इष्ट आहे. रघुवंश सर्ग ८ श्लोक ६५ पहा.] १२. गणपतीचें बेढब रूप पाहून चंद्र हांसला, तेव्हां क्रोधाविष्ट होऊन गणपतीनें चंद्राला शाप दिला कीं, 'तुला कोणी पाहणार नाहीं'. नंतर चंद्रानें गणपतीची प्रार्थना केली. तो प्रसन्न झाला, व त्यानें उ:शाप दिला कीं, 'तुला चतुर्थीच्या दिवसीं मात्र कोणी पाहणार नाहीं'. अशी कथा आहे. १३. राहु. १४. चंद्राला. १५. 'कल्कांगी प्रमदा मुखींहि न पदा वृद्धिक्षयो त्या सदा' असा अन्य पाठ आहे. १६. भीमकीच्या मुखचंद्राचे ठायीं.

वक्रीं पूर्णेंदु तोषास्तव धरि धनुषाकार सुभ्रू विशेषा  
  हेमांगी रत्नभूषान्वित चपलझषा साम्य [1]दृग्बाणलेशा, ।  
कंठाग्रीं मुक्तघोषावळि कलिकलुषा संहरी चैद्यघोषा,  
  वर्णेना पार शेषा [2]सुरवरविदुषा वर्णिती रूपरेषा. ॥ २४

[3]बाळा [4]सोळा कळांची [5]छवि नवि रविची तेंवि दावी स्ववीची,  
  माळा [6]ज्वाळानळाची गुणिफणिमणिची हारि भारी मरीची, ।  
झुंकारे कामुकाची घटि [7]कटितटिंची ख्याति गाती सतीची,  
  हंसाची साक्ष साची गति, [8]रतिपतिची [9]कांतिमा तीव्र तीची. ॥ २५

लेणीं वेणीकलापा गवसित चढवी भ्रूलता वक्रचापा,  
  कर्णीं कंदर्पमापा तळपति तळिंपा पंचबाणें प्रतापा, ।  
कामाची कुंजगुंफा, त्रिभुवनजनिता श्लोकसाहित्य गुंफा,  
  कंठीं ताईतगोपासहित कुचयुगांतूनि देखा [10]द्विरेफां. ॥ २६

देशपरत्वें प्राकृत लेणें, भूषणिं रत्नें द्योतत तेणें ।  
केवळ पद्मा भूभुजबाळा, शोभित कंठीं '[11]चंपकमाळा.' ॥ २७

अंगुलीस नवरत्नमुद्रिका शोभवी नृपसुता [12]वितंद्रिका, ।  
भूषणें चरणिचीं [13]कलस्वरें गर्जती मणियुतें [14]घनस्वरें. ॥ २८

---

१. दृष्टिरूप बाणाच्या लेशाला (हिशाला). २. देवश्रेष्ठ इंद्र आणि विद्वान् यांला. ३. अम्लान-पंकजमाला बंध. ४. चंद्राच्या कळा सोळा आहेत:—'अमृता मानदा पूषा तुष्टिः पुष्टी रतिर्धृतिः । शशिनी चंद्रिका कांतिर्ज्योत्स्ना श्रीः प्रीतिरेव च । अंगदा च तथा पूर्णामृता षोडश वै कलाः ॥'. या कलांचीं नांवें अन्य ग्रंथांत दिलेलीं आढळतात तीः—शंखिनी, पद्मिणी, लक्ष्मणी, कामिनी, पोषिणी, पुष्टिवर्धिनी, आल्हादिनी, अश्वपदिनी, व्यापिनी, प्रमोदिनी, मोहिनी, प्रभा, क्षीरवर्धिनी, वेधवर्धिनी, विकाशिनी आणि शौमिनी. (कथाकल्पतरु.) शंखिनी, पद्मिणी, लक्ष्मणी, कामिनी, पक्षिणी, व्यापिनी, विद्या, मोहिनी, प्रमोदिनी, मिथुनी, विकाशा, अमृता, अमृतसंजीवनी, नीचवणी, ज्ञानदृष्टि आणि सत्रावी. (मूळस्तंभ.) ५. प्रभा. ६. ज्वालाग्नीची. ७. "शरीराच्या मोठ्या अवयवाच्या कोणत्याही भागास तट म्हणण्याचा काव्यांत प्रचार पुष्कळ आढळतो; वामन म्हणतात:—'वंशी नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटीं पटीं;' 'प्रियाकुचतटीं जिहीं न बहुवार पत्रावळी' (मोरोपंत—केकावलि ७.) ८. कामदेवाची. ९. तेजोलक्ष्मी. १०. भ्रमरा. ११. चंपकमाळा छंद; (पक्षीं) चंपक पुष्पांची माळा. या छंदाचें लक्षण:—'चंपकमाला तीस म्हणावें । भा म स गा ते जेथ गणावे ॥.' १२. आळसरहित. १३. मधुरशब्दें. १४. 'रथोद्धता' वृत्त.

[1]जांबूनदलेणी ल्याली [2]हरिणाक्षी, [3]व्यंजत्स्तन दोनी बिंबाधरसाक्षी ।
शोभे मदनाची माता [4]नृपबाला [5]हारावलि कंठींमध्यें '[6]मणिमाला.'॥ २९

मुद राखडी [7]प्रभुत मंडित वेणी, उभि राहिली जडित लेउनि [8]लेणीं,
करकंकणादि[9]रशना [10]विहरीणी नृपनंदिनी [11]मधुरमंजुळवाणी. ॥ ३०

[12]अनंग जाळिला [13]भवें मग [14]स्वभूसि वैभवें,
सुतप्रदान [13]शांभवें दिलें [14]तया [12]मनोभवें, ।
[15]शरासनीं स्वसंभवें [16]क्षुरप्र योजिलें जवें,
'[17]प्रपंचचामरा' जवें [18]विजीति दूत [19]लांघवें. ॥ ३१

[20]भिल्लीमागें लागला [21]शूळपाणी, [22]वृंदाकामें व्यापिला [23]चक्रपाणी; ।
रंध्रें देहीं लाधला [24]वज्रपाणी, ऐसा योद्धा [25]पुष्पकोदंडपाणी. ॥ ३२

---

१. सुवर्णाचे अलंकार. जांबूनद=जंबू नदींत उत्पन्न झालेलें (सोनें). एका महान् गगनगामी जंबूवृक्षाच्या फलांच्या रसापासून ही नदी उत्पन्न झाली असून ती मेरुपर्वतास प्रदक्षिणा करून उत्तर कुरुदेशास जाते व तींत सोनें उत्पन्न होतें असें वर्णन पुराणांत आहे. २. मृगाक्षी. ३. स्पष्ट होणारे स्तन. ४. रुक्मिणी. ५. हारांची आवलि (पंक्ति). अनेक हार कंठांत होते. ६. 'मणि-माला' हें वृत्ताचें नांव; यांत त, य, त, य, असे गण येतात. याचें लक्षण:—'त्यौ त्यौ मणिमाला छिन्ना गुहवक्त्रैः' यांत सहाव्या अक्षरावर यति आहे. मणिमाला=रत्नादि मण्यांची माळा. ७. पुष्कळ. ८. अलंकार. ९. कमरपट्टा. १०. आनंदी. (विहारिणी.) ११. या श्लोकाचें वृत्त कलहंस. यालाच 'सिंहनाद' आणि 'कुटजा' अशीं दुसरीं नांवें आहेत. यांत स, ज, स, स, ग असे गण येतात. 'सजसाः सगौ च कथितः कलहंसः' यांत यति सातव्या आणि तेराव्या अक्षरांवर आहे. १२. काम. १३. शंकरानें. १४. विष्णूस. १५. शरासन=धनुष्य. १६. तीव्र बाण. १७. चमर नामक हरिणाच्या शेपटाची केलेली चंवरी; 'पंचचामर' हें वृत्ताचें नांव. १८. वारा घालिती. १९. हें 'अष्टदलकमलबंधा'चें उदाहरण आहे. २०. भिल्लिणीचें रूप घेतलेल्या पार्वतीमागें. २१. शंकर. २२. जलंधरसंज्ञक दैत्याची स्त्री (वृंदा) तिच्या इच्छेनें. "वृंदा ही जालंधर नामें असुर होता त्याची स्त्री. ही मोठी पतिव्रता होती म्हणून तिचे पुण्यानें सुरासुरयुद्धांत जालंधराचा पराजय होत नसे. ह्यामुळें विष्णूस संकट पडून जालंधर युद्धांत गुंतला असतां विष्णूनें जालंधराचे रूपानें वृंदेच्या पातिव्रत्याचा भंग केला. ह्या पातकानें जालंधर युद्धांत मरण पावला. पुढें वृंदेला हें जेव्हां विष्णूचें कपट समजलें तेव्हां तिनें त्याला स्त्रीवियोग होईल म्हणून शाप दिला; त्याप्रमाणें त्याला रामावतारीं सीतेचा वियोग झाला. पुढें वृंदा जालंधराबरोबर सती गेली, पण विष्णूला तिचा वियोग सोसवेना म्हणून तिनें सती जाण्यापूर्वीं त्याला सांगितलें कीं, 'मी सती गेल्यावर माझे चितेवर तुळस उत्पन्न होईल तिजशीं विवाह कर म्हणजे तुझें वियोगदुःख शांत होईल'; त्याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याची शांति झाली अशी कथा आहे." (नवनीत.) २३. कृष्ण (विष्णु). २४. वज्र धरणारा. (इंद्र.) इंद्रानें अहल्येशीं व्यभिचारकर्म केलें म्हणून गौतममुनीनें त्याला शाप दिला कीं, 'तुझ्या देहाला सहस्र भगें (रंध्रें) पडतील—अशी कथा आहे. २५. फुलांचें (पुष्पांचें) चाप (कोदंड) आहे ज्याच्या हातांत (पाणीच्या ठायीं) तो. (मदन.)

स्मरशरें भिनले परिसा रथी, गज तुरंगम यापरि सारथी; ।
मदनमूर्च्छित ते जगतीतळीं अज परात्पर तेज गती तळीं. ॥ ३३
तुरें शंख भेरी नफेऱ्या तुसारे बळें गर्जती वाजवीती तुतारे, ।
दिशाचक्र धूमांधकारें दिसेना, भ्रमें भ्रांत निभ्रांत चैद्यादिसेना. ॥ ३४
[1]इंदिरा सुनवरी नव गौरी, तो पुराण पुरुषोत्तम शौरी, ।
देखिला प्रकृतिनें परमात्मा जो [2]परावरजगीं जगदात्मा. ॥ ३५
विश्वासली [3]विद्युसमद्युति [4]हेमकांती [5]उद्द्योधली [6]उडुधवप्रतिमा वसंतीं; ।
अग्रें निकी असि निरीक्षिलि नारि आली, हर्षें सती हरिस लुब्धलि माळ घाली.॥
[7]फुल्लारविंदनयनें [8]मदनाभिरामें राजात्मजा [9]प्रणियली [10]परिपूर्णकामें, ।
मध्यान्हकाळ [11]घटिका करि सूर्य निष्ठा श्लोकाष्टमंगळ म्हणे विधि ॐप्रतिष्ठा. ॥
यानंतरें हरि तिची उचलूनि [12]बाहे घे स्यंदनावरि, तिचा मुखचंद्र पाहे, ।
आश्वासिली मग तिला बसवी [13]निजांकीं, संलग्न [14]रोहिणि जसी मिरवे [15]शशांकीं. ॥
शैब्य सुग्रिव बलाहक घोडे, मेघपुष्प चतुरोत्तम जोडे, ।
दारुकें मुरडिला रथ रंगें, आणिला निजदळीं हरिसंगें. ॥ ३९
येरीकडे सावध वीर झाले, विप्रांगनालागिं पुसों निघाले; ।
राजात्मजा येथुनि काय झाली, प्रत्युत्तरें देति उदारशाली. ॥ ४०

---

१. लक्ष्मी. २. स्थावरजंगमात्मकविश्वीं. ३. विजेसारिखी कांति जीची. ४. सुवर्णप्रभा. ५. प्रकट झाली. ६. चंद्रासारखी. [उडु+धव+प्रतिमा=तारा+पति+सदृश.] ७. प्रफुल्ल कमळासारिखे नेत्र ज्याचे त्या कृष्णानें. ८. मदनासारख्या मनोहरानें. ९. परिणय केला, विवाह केला. १०. ज्याचे काम परिपूर्ण (समाप्त) आहेत त्या कृष्णानें. ११.'घटका' हा शब्द अर्थांतरसिद्ध व ऐतिहासिक होय. 'घटिका' हें 'घटी' या स्त्रीलिंगी शब्दास स्वार्थी 'क' प्रत्यय होऊन रूप झालेलें आहे. याचा मूळचा अर्थ 'लहान घडा' असा होय. पुढें कालमापनार्थ जेव्हां त्याची योजना होऊं लागली तेव्हां मूळ अर्थांत फेर होऊन सध्यांचा रूढ अर्थ प्रचारांत आला. 'घट' व 'घटी' या संस्कृत शब्दांचे मराठींत जे अपभ्रंश झाले आहेत त्यांतही मूळचा अर्थभेद तसाच राहिला आहे. पहिल्याचा अपभ्रंश 'घडा' हा 'मडक्या'चा वाचक आहे; आणि 'घडि' या शब्दांत वस्तुत: तोच अर्थ असतां रूढार्थ 'घटका' असा कालांशवाचक झाला आहे. 'घड्याळ' व 'सुगड' हे शब्द अनुक्रमें करुन 'घट्यालय' व 'सुघट' यांचे अपभ्रंश होत हें सहज ध्यानांत येणारें आहे. (निबंधमाला अंक ३७.) १२. बाहु, भुज. १३. आपल्या मांडीवर. १४. चंद्राची स्त्री. चंद्राला 'रोहिणीप्रिय' असें नांव आहे. १५. शशांक=चंद्र. [शश (ससा) हा अंक (चिन्ह) आहे ज्याला तो चंद्र (मृगांक)].

‘[1]आज्ञा ज्याची विरिंची नमुनि जग रची [2]भर्ग जो [3]निष्प्रपंची,
तोही नामामृताची [4]धणि परमरुची सर्वदा घे रसाची; ।
सूर्याचंद्रादिकांची गति कवण रची [5]बल्लवीवल्लभाची
झाली [6]जाया तयाची रुकमिणि तुमची दृष्टि बांधोनि साची. ॥४१
[7]ऐका श्रीकृष्णनामें [8]दहति अनुपमें पातकें घोरधामें,
नामामध्यें [9]ललामें प्रणयशमदमें जाणिजे सुप्रणामें; ।
नामें पूर्णाभिरामें रुचिकर सुगमें मोक्षधर्मार्थकामें,
उद्दामें गाति [10]सामें रुकमिणिकुसुमें वाहिलीं त्यासि नेमें. ॥ ४२
मेरु[11]चा कोण [12]लेखा ? लखलखित रथीं केतु [13]सर्पारि देखा,
खड्गा चक्राब्जशंखादिक धनुष करीं भ्रूलता वक्र रेखा, ।
श्याम श्मश्रू सुरेखा, अनुज [14]शतमुखा, दारुका पाठिराखा,
तेणें हस्ताब्जशाखा धरुनि परिणिली, वोळखा रूपरेखा. ॥ ४३
[15]नव[16]नीरज आनन सिंह वरी विभु कोण तितें इन देव हरी, ।
वर आन हरीविण ते न वरी हरिली विभुनें वरिली नवरी.’ ॥ ४४
हें आयकोनि [17]करें चोळिति चैद्य राजे, ऐसी स्वयंवरकथा[18]त्रिपथा विराजे; ।
संपूर्ण सर्ग चवथा कविराज सांगे, धूर्तांसि विठ्ठलकवी अवधान मागे. ॥ ४५

---

## सर्ग पांचवा.

(श्लोक.)

मुकुटवर्धन [19]भूभुज चालिले, रथ त्वरें कुकुरावरि प्रेरिले; ।
रुकमिणी हरिली [20]लघुगोवळें, वदति भूपति ‘युद्ध करूं बळें.’ ॥ १
भारें भार उठावले चहुंकडे वाजेति [21]वाजंतरें,
भेरींचे भुभुकार, शंख सुरले, वाद्यें [22]महाभ्यासुरें; ।
झालासे भडमार [23]उद्भट [24]बृहद्यंत्राग्निधूमें [25]दृशा,
वर्णें [26]धूसर सूर्यबिंब न दिसे, भ्रांतासि भासे दिशा. ॥ २

---

१. हें ‘वापीबंधा’चें उदाहरण आहे. २. महादेव. ३. विरक्त. ४. तृप्ति, लाभ. ५. गवळणीच्या प्रिय कृष्णाची. ६. स्त्री. ७. हें ‘द्वादशदलकमलबंधा’चें उदाहरण आहे. ८. दग्ध होती. ९. भूषणें. १०. सामगीत. ११. हें ‘वापीबंधा’चें उदाहरण आहे. १२. पाड, गणना, हिशेब. १३. गरुड. १४. इंद्रा. १५. लुप्तपादबंध. १६. नीरज=कमल. १७. हस्त. १८. भागीरथी. त्रिपथा=जिचे पथ (मार्ग) तीन ती; भागीरथीचे तीन ओघ (स्रोतस्) आहेत म्हणून तिला असें म्हणतात. १९. राजे. २०. गवळ्यानें (गोपालानें-कृष्णानें.) २१. ‘पांवे तुरे’ असा पाठभेद आहे. २२. मोठीं भयंकर. २३. मोठा. २४. यंत्र=तोफ. २५. डोळे. २६. कबरा रंगी.

घोर घोष सु[1]भटीं रणिं केला, नाद तो गगनिं भेदित गेला; ।
शेष कूर्म अवतार वराहें, गर्जती जगति लोक धरा हे. ॥ ३

उपसुनि क[2]रवाळें घेतलीं नग्न हातीं,
चि[3]कळुनि ढकलीले मत्त ह[4]स्ती म[5]हातीं; ।
उठविति विर घोडे स्वार ते आयुधेंसी
करिति विशि[6]खवृष्टी योग शुक्रें बुधेंसी. ॥ ४

नि[7]शंक भरले शिरीं, तिखट खड्गधारा करीं,
रुळेति पदकें उरीं, भुज विराजती चामरीं; ।
धरूनि धनुषें करीं, सुभट लोटले सं[8]गरीं,
अलोट रणसागरीं म[9]करवीरमंता [10]तरी. ॥ ५

[11]देती घोड्यास का[12]वे, त[13]वक न धरवे, वीर मारा उठावे,
भेरी वाजेति पांवे डफरण पणवे, घोष दिक्प्रांत पावे, ।

---

१. उत्तम वीरांनीं. २. तलवारी. ३. खिजवून. ४. 'हस्ती' या शब्दावरून अपभ्रंश कसे चमत्कारिक होतात व भाषेंतील शब्दसंग्रह कसा वाढत जातो हें चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. मूळनक्षत्र-वाचक शब्द 'हस्त' आहे. 'अश्विनी,' 'मृग' हीं नांवें जशीं आकृतिसादृश्यावरून पडलीं आहेत त्याप्रमाणेंच 'हस्त' हें नांवही हाताच्या आकृतीवरून वरील नक्षत्रास मिळालें आहे. पण अशी मूळ स्थिती असतां मराठींत प्रयोग पहा कसे दृष्टीस पडतात! 'हत्ती गर्जायाला लागला,' 'कोसळेल हत्ती तर पाडील भिंती.' हा चमत्कार होण्यास दोन तीन कारणें झालीं आहेत. एक तर अगोदर 'हस्त' आणि 'हस्ती' (हत्ती) हें वर्णसादृश्य. दुसरी गोष्ट ही कीं, मध्यें वीज जी बंदींत पडली असते ती वरील नक्षत्र लागतांच पुन: गर्जायाला जाते. तेव्हां गर्जनाची कल्पना साहजिक रीतीनें 'हत्ती'वर बसतेच. तिसरें असें कीं, हत्तीच्या दणक्याप्रमाणेंच वरील नक्षत्राची गर्दी असते. हत्त मोकळा सुटून जर बोकळला तर गंडस्थलाच्या धडकांनीं जसें कांहीं राहूं देणार नाहीं व सारा विध्वंस करून टाकील, त्याप्रमाणेंच हस्ताच्या अमलांतही धडाधड घरें पडताहेत, वाऱ्याच्या सपाट्यानें मोठमोठे वृक्ष उपळताहेत, वीजांचा कडकडाट चाललाच आहे, मुसळासारखे धोधाटे चालून चोहोंकडे जळबंब होऊन गेलें आहे, हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडतो. याखेरीजही ही एक कल्पना लोकांच्या मनांत बिंबलेली आहेच, कीं मेघांचा स्वामी जो इंद्र त्याचे हत्ती समुद्राचें पाणी सोंडेनें शोषून घेऊन चोहोंकडे त्याची वृष्टी करतात! (निबंधमाला अंक ५३ पहा.) ५. हत्तीतें हांकणारे; हस्तिपक. ६. बाणवृष्टि. ७. 'अष्टदलकमलबंध' या पद्यांत योजिला आहे. ८. रणांत. ९. सुसरीरूप वीर जीच्या ठायीं. १०. 'मकरतुंड यंत्रावरी' असा पाठभेद आहे. ११. या पद्यांत 'द्वादशदलकमलबंध' योजिला आहे. १२. कावा=घोडा भरधांव जात असतां त्याला फिरवून वळसा देणें, मोठ्या वेगानें चालविणें. घोड्याला दोन चार कावे दिले, मग निबळ झाला; घोडा उजव्या काव्यावर फिरीव—इत्यादि प्रयोग सुप्रसिद्ध आहेत. १३. आवेश.

स्वारी केले उठावे, नृप करुनि थवे पेटले युद्धहांवे,
एकाग्रें एक धांवे, विमुख न करवे, कीर्ति कैसेंनि पावे ? ६
[1]भानुकोटिप्रभा रुक्मिणीवल्लभा, [2]भाग्यदायी [3]शुभाशीससें वल्लभा, ।
भार येती उभारूनि भाले नभा, भाट गाती सभाधीट वाचा शुभा, ॥ ७
[4]फुल्लांभोजदृशा म्हणे, 'अपयशा मी लाधलें सर्वेशा,
नेणों भाग्यदशा कसी विधिवशा आरंभिली दुर्दशा; ।
राजे मागध शाल्व चैद्य शतशा वेष्टीत आले दिशा'
धाकें पूर्ण [5]निशापतीमुखकृशा प्रार्थीतसे [6]गौरिशा. ॥ ८
[7]तेव्हां लक्ष्मीनिवासें रुकमिणिसि कसें पाहिलें [8]दृग्विलासें,
स्नेहें गंभीरहासें तिस अमृतरसें सिंचिलें राजहंसें; ।
'आलें युद्धप्रयासें नृप रणतरसें मोडिती अप्रयासें,
वैदर्भी ! [9]प्रादुरासें, भय न धरिं,' असें बोलिलें [10]श्रीनिवासें. ॥ ९
[11]तुरंगी कसे वीर शोभेति भारी, करीं हातयंत्रें धनुर्बाणधारी; ।
कुरंगाकृती वीर शोभेति भारी, शिरीं [12]आतपत्रें, तनुत्राणधारी. ॥ १०
[13]अरीभार [14]भौंरी अबाधीत आले, धुरा थोरथोरां धुरोळे मिळाले. ।
तुरें फार फारें तुतारे नगारे, विराजे रजें राबिली भू विदारे. ॥ ११
[15]वज्रांगें [16]सधटें महाबळकटें वीरांकरीं कांबिटें,
बाणाचीं तकटें, मुखें पसरटें, ताटें निघोटें निटें, ।
रुंदाटें तिखटें तयावरि पुटें मंत्राग्निचीं रागिटें,
स्वर्णाचीं तकटें शरासिं निहटें लाऊनि येती [17]घिटें. ॥ १२
अस्य श्रीरणयागऋत्विज हरी, योद्धे नृपाळोत्तम,
शंखश्चक्रयमादि दैवत महा, घेघेति बीजोपम; ।

---

१. कोटी सूर्यां प्रमाणें कांति जिची अशी. या वृत्ताचें नांव 'स्त्रग्विणी;' यांत चार 'र'गण येतात. २. यांत 'धनुर्बाणबंध' योजिला आहे. ३. उत्तम आशीर्वादास. ४. फुललेल्या कमळासारखी दृष्टि जीची अशी (रुक्मिणी.) ५. निशापति=चंद्र. ६. 'गौरीशा' असें रूप पाहिजे, पण छंदोभंग न व्हावा म्हणून ऱ्हस्व प्रयोग केला आहे. ७. या पद्यांत 'द्वादशदलकमलबंध योजिला आहो ८. दृष्टिविभ्रमें. ९. प्रकट झालों. १०. 'पीतवासें' असा अन्य पाठ. ११. भुजंगप्रयात वृत्त. या पद्यांत 'उष्ट्रबंध' आणि 'अश्वबंध' साधिला आहे. १२. छत्रें. १३. शत्रूंचा समुदाय. १४. हें 'चक्रबंधा'चें उदाहरण आहे. १५. हें 'व्यजनबंधा'चें उदाहरण आहे. १६. दृढें. १७. 'हटें' असा अन्य पाठ.

हाहा शक्ति, कुद्दळ [1]कीलक विनियोगासन [2]क्ष्मातळीं,
गात्रें छंद षडंगसंगर भट ध्यानादि मुद्रावळी. ॥ १३
सेनालक्षण मूर्ति आकृति तिची वर्णीन [3]पद्योत्तरीं.
आत्मा **कृ**ष्ण वरी प्रधान [4]**मु**सळी **अ**क्रूर मध्योत्तरीं. ।
[5]दोर्दंडीं **गद सा**त्यकी कटितटीं **श्री**चक्रदेवोत्तमा,
गुह्यांगीं [6]**कृ**तवर्म वर्तत असे, जो सूर्य [7]शत्रूतमा. ॥ १४
[8]पादांभोरुह **कं**क **सा**रण, तिचे **सौ**फल्क पृष्ठीं वसे,
जिव्हा **सा**त्यकि, दंतपंक्ति असती [9]दंती प्रतापी असे; ।
धैर्याचें परिधानवस्त्र जघनीं, सत्त्वोपमा कंचुकी
[10]ल्यांली, विक्रमकंकणें मणगटीं, शोभे [11]चमूकामुकी. ॥ १५
पदाती [12]सांटोपें [13]विकट भिडती [14]झोंटधरणी,
यशश्री **शौ**रीही करि अरिकुळाची [15]उधरणी; ।
न होती माघारें समुख पडती वीर धरणी,
रणीं रक्तें शोभे [16]परमरुचि [17]चित्रांग [18]धरणी. ॥ १६
पायभार समरास निघाला, घालिती **कुकुर** त्यावरि घाला; ।
पावले अमृतयुद्धसमंधें नाचती [19]रणमहीस [20]कबंधें. ॥ १७
[21]**अं**ग **वं**ग पैं **क**लिंग **चै**द्यआदि धांवले,
**व**क्रदंत **शाल्व पौं**ड्र **मा**गधादि पातले; ।
**के**शिकादि **का**रुषादि येइजे **ग**वेषणें,
ठेविती **वि**दूरथादि **या**दवास दूषणें. ॥ १८
[22]**कृ**ष्णदळीं **ब**ळिभद्र यशोधन **सा**रण **सा**त्यिक पैं **कृ**तवर्मा,
**सा**त्यकि **कं**क **सु**फल्क **ग**दादिक वीर उताविळ [23]संगरधर्मा; ।
**क्रू**र तथा **अ**तिदंत महाद्भुत देव [24]रथांगबळोद्धत हावे
**या**दववीर विभाग विभागिति, कोण बळें कवणावरि धांवे? ॥ १९

---

१. खांब, मेढ. २. पृथ्वीतळीं. ३. पुढच्या श्लोकांत. ४. बळराम. ५. बाहुदंडीं. ६. कृतवर्मा. ७. शत्रुरूप अंधकारास. ८. पादकमळ. ९. हत्ती. १०. नेसली. ११. सेनारूप कामिनी. १२. डौलानें, अहंकारानें. १३. मोठे, भयंकर. १४. केशधरणी. १५. 'अरातीचें वेढे सुभट धरिती सर्व धरणी । यशस्वी गौरीशा करि अरिकुळाची उधरणी' असा अन्य पाठ आहे. १६. अतिकांतियुक्त. १७. चित्रविचित्रित. १८. पृथ्वी. १९. 'रणमखांत' असा अन्य पाठ. २०. धडें. २१. चामरवृत्त. यांत र, ज, र, ज, र हे गण येतात. २२. मदिरा वृत्त. २३. युद्धधर्म (आचरण्यासाठीं). २४. चक्राच्या बळानें अतिबळकट.

**अ**क्रूर त्यासम **वि**दूरथ भाग पाहे, **पौं**ड्रप्रभूसि **कृ**तवर्म समान लाहे; ।
घे **सा**त्यकी **वि**कटदंतसमेत राजे **कृ**ष्णासि **शा**ल्वक **ग**दा **म**गधेंद्र साजे. ॥ २०
येर येरांप्रती वीर पाचारिती, अश्व [1]अश्वांप्रती नाग नागांप्रती, ।
भार भारांप्रती चालिले विक्रमें, युद्ध आरंभिलें आयकानुक्रमें. ॥ २१
**ग**वेषण उठावला, **कु**कुर त्यावरी लोटले,
धनुर्धर [2]शरासनें धरुनि संगरा पेटले, ।
असंख्य शर सोडिले, गगन [3]बाणजालें भरे,
रथावरि [4]महारथी भिडति, कोप त्यां [5]नावरे. ॥ २२
**अ**क्रूर त्यावरि **वि**दूरथ लोटलासे, तैसाच **शा**ल्व नरनायक [6]भीम भासे; ।
[7]नाराच सोडुनि, तिहीं नभ पूर्ण केलें, **वृ**ष्णीयशोधन समस्त हिरोनि नेलें. ॥ २३
**पौं**ड्रिकावरि चढे **कृ**तवर्मा, **सा**त्यकी **वि**कटदंत अकर्मा; ।
**मा**गधेंद्र **ग**द आणिक राजे झूजती, [8]रणतुरीं नभ गाजे. ॥ २४
भीडती रणमुखीं परस्परें, गर्जती रणतुरें पुरस्करें; ।
कार्मुकें प्रसवती [9]शरावळी, [10]ताम्रवर्ण मिरवे महीतळीं. ॥ २५
लागापाठीं लाग येताति कैसे, [11]बाणामागें बाण विंधीत जैसे; ।
रंगामागें ओढवे रंग नाना, तैसे राजे दाविती युक्ति नाना. ॥ २६
प्रळयविजुसमूहा सर्पचालीं कडाडी,
प्रळयविशिखवातें वन्हि जैसा धडाडी; ।
पसरलि नभमार्गीं मंडपाकार जाळी
कुकुर करिति वृष्टी घोर संग्रामकाळीं. ॥ २७

---

१. 'संगरीं लोटले कोण कोणे रिती' असा अन्य पाठ आहे. २. धनुष्यें. ३. बाण+जालें=शर+समुदायानें. ४. महारथी–रथांत राहून युद्ध करणाऱ्या वीरांचे महारथ, अतिरथ, रथ आणि अर्धरथ असे चार वर्ग मानले आहेत. त्यांची व्याख्या अशी:—'एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम् । शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥ अमितान्योधयेद्यस्तु संप्रोक्तोऽतिरथस्तु सः । रथस्त्वेकेन यो योद्धा तन्नूनोऽर्धरथः स्मृतः ॥.' याचा भावार्थः—जो शास्त्रविद्येमध्यें प्रवीण असून एकटा दहा हजार धनुर्धर वीरांशीं युद्ध करतो त्यास 'महारथ' असें म्हणतात. जो अगणित धनुर्धारी वीरांशीं युद्ध करतो त्यास 'अतिरथ' असें नांव आहे. जो एकट्या वीराशीं लढतो तो 'रथ' आणि जो त्याहून कमी तो 'अर्धरथ'. यांसच महारथी, अतिरथी, रथी आणि अर्धरथी असें म्हणतात. ५. न+आवरे. ६. भयंकर. ७. बाण. (नाराच=सर्वलोहमय शर; नरानाचामति, यद्वा नराणां समूहो नारम् । नारमाचामति, असा विग्रह आढळतो. नराचें आचमन (भक्षण) करणारा शर–असा अर्थ.) ८. रणवाद्यांनीं. ९. शर+आवळी=शरसमुदाय. १०. रक्ताचा तांबडा रंग. ११. एका बाणामागून अनेक बाण.

[1]आगळें बळ दिसे कुकुराचें, भूप युद्ध करिती [2]निकुराचें, ।
कोटि सैन्य खचलें अनुबंधें, नाचती रणमहीस [3]कबंधें. ॥ २८

महत्वाची आशा धरुनि समरीं भूप भिडती,
परंतु प्रारब्धीं अपयश, मुखें म्लान दिसती; ।
जरासंधें चित्तीं हित मग विचारूनि [4]वहिलें,
निघाला, सेनेतें निजनगरमार्गें मुरडिलें. ॥ २९

मारी [5]वज्रहलें हली स्वमुसळें निर्जीव केलीं दळें,
[6]भेणें राजकुळें पळोनि सकळें रामापुढें निर्बळें; ।
कित्येकें [7]विकळें महीस [8]निढळें टेंकूनि ठेलीं स्थळें,
दुःखें [9]पाणितळें [10]पिटीति विपुळें विस्तीर्ण [11]वक्षस्थळें. ॥ ३०

[12]यंत्रांचे भडिमार होति समरीं, धूम्रें दिशा दाटल्या,
[13]चौथीतें [14]परिणावया रणमखीं वीरीं उड्या घातल्या; ।
भूमी लोळति [15]कीरिटी, कितिक ते काळें करीं वेतले,
जैसीं तीं कमळें गजें [16]विखुरिलीं, जीवें प्रभू वेचले. ॥ ३१

भयानक महा दिसे रण, उभे मुखें म्लानती,
विमुक्त कबरीजुडे मुकुट कुंडलें वाहती; ।
खळाळ पडले नदी [17]दशनवालुवेचे रवे,
[18]चिरें विखुरलीं जसीं तरुण [19]राजपिंडे [20]नवे. ॥ ३२

खड्गें तोमर पाश पट्टिश गदा चापें शराच्या सऱ्या,
चक्रें अंकुश मुद्गलादि सुरिया चर्में कटारा बऱ्या; ।
घोडे [21]वारण उष्ट्रें रथ रणीं झालीं नदीचीं तटें,
प्रेतें सूसरमत्स्यकच्छपचमू वाहे दिसे वोखटें. ॥ ३३

नानासंगरभूमिकेरणखळें [22]संकर्षणें रोपिलें,
शत्रूमर्दन [23]लांगलें करुनियां युद्धासि आटोपिलें; ।

---

१. अधिक, मोठें. २. नेटाचें, जोराचें. ३. धडें. ४. तत्क्षणीं. ५. वज्रासारख्या हलानें (नांगरानें). ६. भयानें. ७. व्याकुळें, व्यथितें. ८. कपाळें. ९. हस्ततळें. १०. ताडिती. ११. यांत 'ळें' याची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून येथें अनुप्रास अलंकार आहे. १२. तोफांचे. १३. सलोकता, सरूपता, समीपता, व सायुज्यता. यांतून चौथी जी सायुज्यता तीतें (मुक्तीतें). १४. विवाह (परिणय) करण्यासाठीं. १५. शिरोभूषणें. १६. पसरलीं. १७. दंतरूपवाळूचे. १८. वस्त्रें. १९. सुंदर. २०. 'सिरें विखुरलीं मही, तरुण राजविंडे नवे' पाठभेद. २१. गज. २२. बळरामाला. २३. नांगरानें.

पूरें तुंबळ दूथडी रणनदी रक्तोदकें दाटली,
प्रेतें भीम[1]भयानकें उसळती गोठोनि कोंदाटलीं. ॥ ३४
चौकोणें रणभूमिकुंड रचिलें प्राची[2]दिशा साधुनी,
इध्मा[3] बर्हि[4] शरासनें शरशिरीं पूर्णाहुती घालुनी; ।
अष्टौ[5] भैरवयोगिनीग्रहदिशां भूतावळी दे बळी,
केलें साध्य निधान राजतनया, सत्कीर्ति यावेगळी. ॥ ३५
लाजोनियां मुरडले मगधादि राजे, युद्धीं तयां यश नये, मनिं दुःख डाजे, ।
घायाळ घालुनि पुढें पळती खटारे, हें आयकोनि शिशु[6]पाळ उगा न थारे[7].॥३६
पालाणिली[8] सकळ वाहिनि[9] चैद्यनाथें, केलें प्रयाण समरीं रणयागपंथें; ।
प्रेतें पुढें, शकुन होति, मनीं विराला, तों भेटला मगधराज म्हणे तयाला.॥३७
'नरां[10]माजि शार्दूळ तूं चैद्यराया! कळेना बळी ईश्वरी योगमाया, ।
न होतें घडे काळचक्रें करूनी, मरावें वृथा, दुःख देहीं धरूनी. ॥ ३८

---

१. 'भूरि' पाठभेद. २. पूर्वदिशा. ३. यज्ञादिकांमध्यें होम करण्याकरितां ज्या पंधरा समिधा एकत्र बांधिल्या असतात तो. ४. घृतपात्रादिकें ठेवण्याकरितां जे मूठभर दर्भ असतात तो. ५. अष्टभैरव= असितांग, रुरु, चंड, क्रोध, उन्मत्त, कपाली, भीषण आणि संहार; अष्टयोगिनी=मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिद्धा आणि संकटा; अष्टग्रह=रवि मंगल इत्यादि; अष्टदिशा= पूर्व पश्चिम इत्यादि. ६. शिशुपाल–हा सोमवंशीय दमघोष राजाचा पुत्र. ह्याची माता श्रुतश्रवा. ही वसुदेवाची भगिनी, तेव्हां हा कृष्णाचा आतेभाऊ. शिशुपालाच्या आजाचें नांव चेदि म्हणून याला 'चैद्य' अथवा 'चेदिप' आणि ह्याच्या देशास 'चेदि' असें नांव पडलें. या देशाची राजधानी शुक्तिमती नामक नगरी. शिशुपाल हा हिरण्यकशिपूचा अंशावतार होय. यास जन्मतः तीन डोळे व चार हात होते. हा कृष्णाच्या मांडीवर बसला तेव्हां याचे दोन हात व एक डोळा असे गळून पडले. तत्क्षणींच श्रुतश्रवा भयभीत होऊन कृष्णास शरण गेली आणि 'यास मारणार नाहीं असें वचन दे' असें त्यास म्हणाली. 'मी या शिशुपालाचे शतापराध क्षमा करीन' असें कृष्णानें आपल्या आतेस वचन देऊन संतुष्ट केलें. नंतर तो द्वारकेस परत आला. पुढें राजसूययज्ञांत इंद्रप्रस्थ येथें कृष्णाची अग्रपूजा करावी असें ठरलें. ती गोष्ट शिशुपालास पसंत न पडून त्यानें भीष्माची आणि कृष्णाची अद्वातद्वा बोलून अतोनात निंदा केली. ती कृष्णास सहन झाली नाहीं, तेव्हां त्यानें शिशुपालाचे शंभर अपराध होतांच आपल्या चक्रानें त्याचें शिर तोडिलें व तो तत्काळ मरण पावला. (सभापर्व– अध्याय ४५.) ह्या शिशुपालवधाच्या कथानकावर माघकवीचें 'शिशुपालवध' नामक एक उत्तम संस्कृत काव्य आहे. ७. राहे. ८. सज्ज केली. ९. सेना. १०. अध्याय ५४ श्लोक ११ पहा.

[1]क्षोणी तेवीस माझा मधुपरिस रणीं भार युद्धीं गळाला,

संग्रामीं चैद्यराया! यदुपति [2]सतरावेळ मागें पळाला; ।

तो मी त्रासें निघालों, समर न करवे आगळें तों न साहे,

इच्छा सर्वोत्तमाची, [3]बत! किती करणें, तत्वता काळ साह्ये. ॥ ३९

आतां कदा तूं समरा न जावें, [4]मुग्धाभिलाषें मरसील पाहें, ।

दीपावरी झेप [5]पतंग घाली, तैसी न कीजे मति युद्धशाली. ॥ ४०

स्तंभसूत्र करणार लाघवी, [6]बाहुल्या [7]असु नसोनि [8]नाचवी, ।

जैत्य हार अवघी [9]नटाकरीं युक्तिनें मुरडि, कोप आवरीं.' ॥ ४१

ऐसा [10]वृत्तांत कळला मग [11]रुक्म वेगें आला नृपाप्रति वदे वचनें [12]अनेगें; ।

राजे भयाभित जवें नगरा निघाले, चैद्यादि मागध रणीं [13]हतवीर्य झाले. ॥ ४२

---

१. अक्षौहिणी. या संबंधें पुढील कोष्टक लक्षांत ठेवण्यासारखें आहे:—'अक्षौहिण्यामित्यधिकैः सप्तत्या ह्यष्टभिः शतैः । संख्या युक्ता सहस्राणि गजानामेकविंशतिः ॥ एवमेव रथानां तु संख्यानं कीर्तितं बुधैः । पञ्चषष्टिः सहस्राणि षट् शतानि दशैव तु ॥ संख्यातास्तुरगास्तज्ज्ञैर्विना रथतुरंगमैः । नृणां शतसहस्रं तु सहस्राणि नवैव तु ॥ शतानि त्रीणि चान्यानि पञ्चाशच्च पदातयः॥.'

| सेना | पत्तिः | सेनामुखम् | गुल्मः | गणः | वाहिनी | पृतना | चमूः | अनीकिनी | अक्षौहिणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गजाः,–रथाः | १ | ३ | ९ | २७ | ८१ | २४३ | ७२९ | २१८७ | २१८७० |
| अश्वाः– | ३ | ९ | २७ | ८१ | २४३ | ७२९ | २१८७ | ६५६१ | ६५६१० |
| पदातयः– | ५ | १५ | ४५ | १३५ | ४०५ | १२१५ | ३६४५ | १०९३५ | १०९३५० |

यावरून १ पत्ति=१ रथ+१गज+३अश्व+५पदाति; ३ पत्ति=सेनामुख, ३ सेनामुख=१ गुल्म; ३ गुल्म=१ गण; ३ गण=१वाहिनी; ३ वाहिनी=१ पृतना; ३ पृतना=१ चमू; ३चमू=१ अनीकिनी; १० अनीकिनी=१ अक्षौहिणी. २. अध्याय ५४ श्लोक १३ पहा. ३. खेदार्थी अव्यय. ४. मूर्ख इच्छेनें. ५. शलभ. ६. अध्याय ५४ श्लोक १२ पहा. ७. प्राण. ८. 'दुरि बसोनि नाचवी' असा अन्य पाठ आहे. ९. नटरूपी जो भगवान् त्याच्या हातीं. १०. 'वृत्तान्त' असा शब्द असून छंदोनियमानुसारें 'वृ' ऱ्हस्व केला आहे. ११. अध्याय ५४ श्लोक १८ पहा. १२. शपथरूप (वचनांचें विशेषण.) १३. भग्नोत्साह.

राजे मागेति[1] आज्ञा, तंव नृपतनयो[2] काय बोले प्रतिज्ञा;
क्षेत्रीं संग्रामयज्ञां त्यजिति तरि अहो नर्कप्राप्ती[3] अभिज्ञा, ।
श्रेष्ठें केली अनुज्ञा[4] सुहृद जनक हा धर्मयुद्धांत सुज्ञा !
नाहीं दुर्बोध[5] प्राज्ञा रणिं वध घडतां, हे न कीजे अवज्ञा. ॥ ४३
जिंतूं[6] वृष्णीकदंबा[7] वसुमतिपति[8] हो ! कार्यभागावलंबा,
खड्गें बांधा नितंबा[9], रण जरि करणें तैं न लावा विलंबा; ।
साह्या होईल अंबा, परि तुम्हि पळतां मृत्युभेणें न थंबा,
जिंतेना जैं प्रलंबा तवंक[10] हरि तरी भेटि नेदी कुटुंबा. ॥ ४४
कृष्णाचें सैन्य साजे विजयि निजरथीं रुक्मिणीसीं विराजे,
वाद्यांचा घोष गाजे, नभ दुमदुमिजे, जिंतिले चैद्य राजे; ।
कोणी कोणा न लाजे, न पुसत नृप जे चालिले, दुःख डाजे,
तेणें दुर्वार[11] माजे रण कुकुरदळीं, दुंदुभीलक्ष वाजे. ॥ ४५
रुक्मा निघाला समरासि विक्रमें, अक्षौहिणी[12] सैन्य सवें अनुक्रमें; ।
व्यासें पुराणीं[13] गणना निरूपिली, ते सत्कवीनें प्रकटार्थ बोलिली. ॥ ४६
लक्षैक[14] वीर, दशलक्ष तुरंग भारी, छत्तीसलक्ष पदभृत्य पुढें विचारी; ।
दाहासहस्र गज उन्मत भार चाले, क्षोणीगणा त्रिगुणिनें रथ ते निघाले.॥४७

---

१. मागतात. २. रुक्मी.(अध्याय ५४ श्लोक १९.) ३. नरकप्राप्ति. ४.आज्ञा. ५. 'दुर्बुद्धि संज्ञा' असा पाठभेद आहे. ६. हें 'वापीबंधा'चें उदाहरण आहे. ७. वृष्णींच्या (यादवांच्या) कदंबा (समुदायाला). ८.वसुमती+पति=हे पृथ्वीपती हो (राजे). ९.कमर–असा एथें अर्थ इष्ट आहे. १०. 'तवक न धरि तें मी न भेटें कुटुंबा' असा पाठभेद आहे. ११. निवारण करण्यास कठीण. १२. अध्याय ५४ श्लोक १८ पहा. 'चतुरंग सैन्य सकळ । एक अक्षौहिणी दळ । संनद्ध करूनियां प्रबळ । संख्या केवळ परियेसा ॥ ९० ॥ दोन लक्ष अठरा सहस्र । अधिक सात शतें वीर । संख्या अक्षौहिणी प्रकार । केला निर्धार श्रीव्यासें ॥ ९१ ॥ किती गज किती रथ । अश्व पदाति समस्त । विभागसंख्या सुनिश्चित । संख्या केवळ पुराणोक्त सांगेन ॥ ९२ ॥ एकविस सहस्र आठ शत । सत्तरी संख्या जी रथ । तितुकेचि गजभार उन्मत्त । सैन्या आंत चालती ॥ ९३ ॥ एक लक्ष सहस्र नव । तीन शत पन्नास अश्व । पायांचे वीर अभिनव । सांगेन सर्व परियेसा ॥ ९४ ॥ एक लक्ष नव सहस्र । तीनशें पन्नास पदाति भार । अश्वसादी रथ कुंजर । संख्या समग्र अक्षौहिणी ॥ ९५ ॥ पांसष्टि सहस्र सा शतें । एक लक्षक अधिक तेथें । वीर पायांचे भीडते । युद्धीं पुरते निज गडे ॥ ९६ ॥ इतुकी सैन्याची मिळणी । तया नाम अक्षौहिणी । संख्या बोलिली पुराणीं । महामुनि श्रीव्यासें ॥ ९७ ॥ (अध्याय ५४ श्रीहरिवरदा.) १३. श्रीमद्भागवतांत. १४. 'नागायुतानि त्रिगुणीकृतानि लक्षैकयोद्धा दशलक्षवाजी । पदातिषट्त्रिंशतिलक्षसंख्या क्षोणीसमैके मुनयो वदंति ॥.'

रुक्मा युद्धासि आला गवसित सरिसा सैन्यसिंधू निघाला,
　　बोले घालोनि घाला, हरि गद मुसळी[1] जिंतिल्या यां तिघांला; ।
लावा रथ्यांबु[2]काळांजन विभुवदना वीर हो ! त्यां बुकाळा[3],
　　दैत्यारी शंभु काळा मृगपतिवनिता कैं वरी जंबुकाला[4] ? ॥　　४८
देखे तेजस्वि मेरूपरिस रथ मरुदेशिंचा सज्ज चारू[5],
　　शस्त्रास्त्रें बाण दारू लखलखित गरुत्मापताकीं प्रचारू; ।
वैदर्भी वामऊरूवरि भुवनगुरू बैसली विश्वतारू,
　　हस्ताब्जीं वेत्रधारू अतिचपळ महत् वागवी चार वारू[6]. ॥　　४९
रुक्मा कृष्णासि बाहे, 'नवरि तुजपुढें देखतां देह दाहे,
　　मोठें आश्चर्य पाहे, मृगपतिललना[7] केंवि गोमायु[8] लाहे ? ।
माझें संधान साहें, झणि पळसि रणीं शीघ्र शारंग[9] वाहें,
　　युद्धाचा गर्व आहे, तरि भिड मजसीं सन्मुखीं तिष्ठ[10], राहें. ॥　　५०
स्त्रीचोरा ! मंदमूढा ! गवळणिस दृढालिंगनें देसि गाढा,
　　प्रौढा मुग्धा नवोढा कुवलयनयना[11] नूतना दिव्य सोढा; ।
या गोष्टी ज्ञानगूढा ! सकळ परिशिल्या भूतळामाजि रूढा,
　　ऐसें बोलोनि दाढा रगडुनि चढवी रुक्मया रुक्ममेढा. ॥　　५१
'आतां[12] इंदीवराक्षा[13] ! त्यजिं रुकमिणिची आस, सायास कांक्षा,
　　चोरा लावीन शिक्षा, बहु दिन करितों संगराची अपेक्षा[14], ।
राजे गेले उपेक्षा करुनि म्हणउनी तूझि घेतों परीक्षा,
　　साहें संधानदक्षा !' म्हणउनि धनुसीं कांड[15] योजी, निरीक्षा. ॥　　५२
　　　'पळविन दळ तूझें, देख संधान माझें,
　　　　　पळसिल[16] झणि झुंजें, कां त्यजीं दारवोझें ? ।
　　　मरसिल हरि ! वायां माझिया लाग पायां,
　　　　　शरण रिघ मला यां देखतां सर्व रायां. ॥　　५३

---

१. बळराम. २. गळ्यांतील पाण्याचा चिखल. ३. बुक्यांनीं मारा. ४. कोल्ह्याला. ५. सुंदर. ६. घोडे. ७. हरिणाचा स्वामी जो सिंह त्याची स्त्री. ८. कोल्हा. ९. कृष्णाच्या हातांतील धनुष्य (शार्ङ्ग). १०. अध्याय ५४ श्लोक २२ पहा. ११. कमलनेत्रा. १२. या पद्यांत 'चक्रबंध' साधिला आहे. १३. कमलनेत्रा ! १४. 'प्रतीक्षा' अन्य पाठ. १५. बाण. १६. 'म्हणवुनि शर योजीं मंत्रबीजें सबीजें' असाही एक पाठ आहे.

राजे [1]मेले पळाले, म्हणउनि कुकुर द्वारकेतें निघाले,
[2]रेवेपाशीं मिळाले [3]गोवसुनि धनुषें टोप तूणास केले; ।
तों मागें रुक्मभाले झळकति मग ते सिद्ध युद्धासि झाले,
शत्रू अश्लाघ्य बोले, सकळ मुरडिले क्षात्र भूमीस आले. ॥ ९४
श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर निकें हे आयका कौतुकें,
छंदें शुद्ध विचित्रबंधयमकें नानाभिधानें तुकें; ।
दोहींचीं कटकें उभीं रथ पुढें कीजे जगन्नायकें,
वर्णी विठ्ठल सर्ग पंचम पुढें पद्यें मनोरंजकें. ॥ ९५

---

## सर्ग सहावा.

(श्लोक.)

शुक म्हणे, ‘कुरुनाथ परीक्षिती, कुकुर युद्ध विचित्र निरीक्षिती; ।
रुक्मसैन्य उभें दुरि राहिलें, धनुष राजसुतें मग वाहिलें. ॥ १
ठणत्कारिलें चाप भूपाळपुत्रें, गुणीं लाविले बाण निर्वाणसूत्रें; ।
रथारूढ [4]संनद्ध [5]माहेंद्रठाणीं, त्रिबाणीं रणीं विंधिला चक्रपाणी. ॥ २
सुसाटध्वनीवन्हिवातें उलाले, [6]पतत्री, [7]धरित्री जळाली, पळाले, ।
बलोत्कर्ष देखोनि [8]सारंगपाणी ठणत्कारिलें चाप [9]सारंगपाणी. ॥ ३
गुणीं लाविले [10]बांण षड्बाण वेगें, सुसाटध्वनी सोडिले भक्तरंगें; ।
तिहीं बाण जाळोनि आश्चर्य केलें, ध्वजा छेदली चाप [11]भंगासि नेलें. ॥ ४
आनंदकंदें रणरंगधीरें [12]राजीवनेत्रें कुकुरप्रवीरें ।
कोदंड सज्जूनि पुन्हा[13]ष्टबाणीं, संधान केलें स्थिरवज्रठाणीं. ॥ ५
चारी वाजी सारथी चूर्ण केला, क्रोधें रुक्मा ओष्ठ चावूनि ठेला; ।
वेगें [14]अन्यस्यंदनारूढ झाला, पांचां बाणीं शीघ्र विंधों निघाला. ॥ ६
बाणामागें रुक्मया बाण सोडी, तें तें [15]कांडें [16]पुंडरीकाक्ष तोडी; ।
जैसा सर्पा [17]वैनतेयो विखंडी, तैसा [18]शौरी शीघ्र [19]नाराच खंडी. ॥ ७

---

१. ‘गेले’ पाठभेद. २. नर्मदा नदी तिजपाशीं. ३. बांधून. ४. कवचयुक्त. ५. महेशचापाच्या ठायीं. (अध्याय ५४–श्लोक २४.) ६. पक्षी. ७. पृथ्वी. ८. शार्ङ्गपाणि. (कृष्ण.) ९. सारंग+पाणि=मतंगज+हस्त=हस्तीसारखे हात ज्याचे तो–असा अर्थ दिसतो. १०. अध्याय ५४ श्लोक २६ पहा. ११. छेदिलें. १२. कमलनयनें. १३. अध्याय ५४ श्लोक २७ पहा. १४. दुसऱ्या रथावर बसलेला. १५. कांड=बाण. १६. कमलासारिखे नेत्र ज्याचे तो. (कृष्ण.) १७. गरुड, विनतेचा पुत्र. १८, कृष्ण. १९. बाण.

'बाणीं दंडीन लंडी म्हणउनि [1]तवकें [2]तूणिरातें उलंडी,
गर्जें ठोकोनि मांडी, धनुष धरुनियां, विक्रमें [3]ठाण मांडी; ।
विद्या योजी उदंडी मजविण तुजला [4]संगरीं कोण दंडी?'
ऐशा वाचा विखंडी, तंव हरि करिंचें [5]वज्रकोदंड खंडी. ॥ ८
सक्रोधें राजसूनू दृढ धरुनि धनू बाण लावी [6]धानू
संख्या [7]आवर्तभानू जपुनि मग मनु प्रार्थिलासे [8]कृशानू; ।
अग्रें वामांग जानू करुनि हरितनू साधितां होय सानू,
झाला [9]वैश्वानरानुग्रह सबळ [10]ननु [11]द्योतला, काय वानू? ॥ ९
ज्येष्ठ भ्रातर [12]**द**क्षिणाग्नि, दुसरा तो **आ**वसथ्य स्वयें,
त्या [13]सानानुज **गा**र्हपत्य तिसरा नामें यथाअन्वयें; ।
श्रौत स्मार्त उपासनादि सकळी प्राधान्य पूजाविधी
सांगोपांग विधान पूर्ण घडतां संप्राप्त [14]सिद्धी [15]निधी. ॥ १०
[16]विद्युन्माजि जळीं स्थळीं [17]दिनकरीं [18]काष्ठोपळीं सागरीं,
[19]**श**र्वाणीपतिचे तृतीयनयनीं, प्रत्यक्ष भूतांतरीं; ।
देवांचें [20]मुख [21]जातवेद इतुक्या स्थानांतरीं राहिला,
[22]तो आव्हानित रोषयुक्तचि तदा बाणाग्नि तैं [23]मातला. ॥ ११

---

१. आवेशानें. २. भात्यातें. ३. आसन घाली. ४. युद्धीं. ५. वज्रासारखें कठीण चाप. ६. तीन. (नंदभाषेंत.) ७. 'आदित्यहृदय' नामक जो मनु (मंत्र) त्याचा जप करून. ८. अग्नि. ९. वैश्वानर+अनुग्रह=अग्नि+प्रसाद. १०. ननु=खरोखर. ११. प्रकाशित झाला. १२. दक्षिण, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य आणि आवसथ्य अशीं पांच अग्नींचीं नांवें आहेत. १३. सान+अनुज=धाकटा+बंधु. १४. अणिमादि आठ सिद्धि. १५. शंख पद्म इत्यादि नऊ निधि. [कुबेराच्या घरीं द्रव्याचे नऊ खजिने (निधि) आहेत अशी समजूत आहे. यांचीं नांवें:—'पद्मोऽस्त्रियां महापद्मः शंखो मकरकच्छपौ । मुकुंदकुंदनीलाश्च खर्वश्च निधयो नवः ॥' इति शब्दार्णवः.] १६. विद्युल्लतेमध्यें. १७. सूर्यामध्यें. १८. काष्ठपाषाणीं [संस्कृत शब्दांच्या अंतिम 'ल'च्या स्थानीं मराठींत 'ळ' होतो:—जसें बल=बळ, कुल=कुळ, स्थूल=स्थूळ, उपल=उपळ, कला=कळा.] १९. पार्वतीपतीचे. (शिवाचे, शर्वाणी=भवानी.) २०. अग्नि हा देवांचें मुख होय म्हणून देवांला 'बर्हिर्मुख' असें नांव आहे. (बर्हिः+मुख=अग्नि+मुख.) देव हे अग्निद्वारा हुतद्रव्यभक्षण करतात या प्राचीन समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे. 'अग्निमुखा वै देवाः' अशी श्रुति आहे. २१. अग्नि. ['जातवेदस्' या शब्दाचा विग्रह अमरकोषाच्या रामाश्रमी टीकेंत केला आहे तो:—'जातं वेदो धनं यस्मात् । जाते जाते विद्यते वा । जातं वेत्ति वेदयते वा ॥' झालेल्या प्राण्यांतें जाणतो तो 'जातवेदा' असाही अर्थ एका टीकाग्रंथांत दिला आहे.] २२. 'तो रोषघ्न हिमंतमांतक तदा बाणाग्नि आवानिला', 'तो रोगघ्न हिमांत कांतक नृपें बाणाग्नि आव्हानिला' आणि 'तो रोगघ्न हिमांत घातक तदा बाणाग्नि आव्हाइला' असे पाठभेद आहेत. २३. चेतला, माजला.

चंड ज्वाला क[1]राला उसळति त[2]रळा पंचवर्णांतराळा,
ताम्रा पीता उ[3]माळा करित शतबलाकानलज्वालमाळा; ।
येती व्योमीं उसाळा, विगळति ग[4]रला कालनागेंद्रकाळा,
तेजाळा आ[5]ळुमाळा पसरति अ[6]चळा, मांडला निर्धुमाळा. ॥ १२
उष्णें झालीं त[7]डागें, उकडति उ[8]रगें वन्हितापानुरागें,
संतापास्त्रप्रयोगें पळति वनमृगें ज्ञातिभ्रष्टें वियोगें; ।
त्यापूर्वी भक्तरंगें न[9]वकमलदृगें घोरसंसारभंगें
**श्री**रंगें लागवेगें अनळ जळखगें शांत कीजे अ[10]नेगें. ॥ १३
[11]अंकीं **श्री**पुष्कराक्षा **रु**कमिण विनवी, 'वारिं दिव्यास्त्र भारी,
अत्युग्र ज्वाल येती, विपुल विझविं, तूं जिंतिं **रु**क्मा **मु**रारी ! ।
स्वस्था सांभाळिं काळानलशर शमवीं, ख्यातिनें राय जिंकीं,
मिथ्या मूर्ख व्यवस्था वरि करित नसे, [12]कांडलक्ष्या विलोकीं.' ॥ १४
वीनवी लालसा हा नला माजवी, वीजमालास्त्र हें तीव्र जें वीजवीं; ।
वीजवीं जें **र**मानायका नीरवीं, वीर नीकारुनी ख्याति लावी नवी. ॥ १५
योद्धे देखोनि दृष्टीं जलधर धनुषीं लावितां होय वृष्टी,
मेघें संपूर्ण सृष्टीवरि निजचमुची घातली [13]बुंथि पृष्ठीं; ।
तेव्हां पाताळ धृ[14]ष्टीपति धरि जगती वज्रदंष्ट्रा सं[15]घृष्टी,
[16]झांडी कूर्म स्वपृष्ठी गगन लवथवी तोयधाराप्रवृष्टी. ॥ १६
[17]निर्घोषें कालधारा वरुनि पडति त्या मंडळीं वज्रधारा,
पर्जन्याचा फुगारा रि[18]चवति नि[19]बरा पर्वतातुल्य गारा, ।
दुर्वारा **रु**क्मभारावरि पडति सराच्या प्रचंडप्रहारा
विद्युन्माळी उदारा लवति बळधरा सर्पचाली अपारा. ॥ १७
तेजाचे चमकाट दाट लवती विद्युल्लता अंबरीं,
मेघांचे त[20]डके प्रचंड फुटती त्रै[21]ष्टांडभांडोदरीं; ।

---

१. भयंकर. २. चंचळा. ३. उद्भव. ४. विषा. ५. थोडा. ६. पर्वता. ७. सरोवरें. ८. साप. ९. नूतन कमलनयनें. १०. प्रतिज्ञेनें. ११. मांडीवर. १२. शराच्या निशाणा. (लक्ष्य=शरव्य, लक्ष.) १३. बुरखा, आच्छादन, गांठ. १४. धृष्टि=वराह, डुकर. ['धृष्टिः स्त्री घर्षणस्पर्धाविष्णुक्रांतासु ना किरौ' इति विश्वः.] १५. घर्षणयुक्त. हा वापीबंध आहे. १६. 'साही' असा पाठभेद आहे. १७. शब्दें. १८. सोडिती, रिक्त करिती. १९. कठिण. २०. कळपे. २१. ब्रह्मांडामध्यें.

[1]भौमाच्या [2]जननीवरी रिचवती धारा जशा आगळ्या,
लोहाच्या सरळा पडेति विपुळा शांत्यर्थ मंत्रानला. ॥ १८
अबद्धोत्तरें पंडितें [3]खंडिजेती, तसीं शालकास्त्रें अजें [4]खंडिजेती; ।
अभाग्यासि ऊदीम कैं हात नेदी, तसा रुक्म जाणोनि वातास्त्र भेदी.॥ १९
[5]समीरास्त्र तें योजिलें राजपुत्रें, गुणीं लाविले बाण निर्वाणसूत्रें; ।
[6]जगत्प्राण जो व्यापिला देहमात्रीं [7]दशस्थानकीं तो वसे [8]जंतुगात्रीं. ॥ २०
[9]वक्षीं प्राण, तसा अपान दुसरा वर्ते गुदीं, सत्तमा
[10]व्यानोदानसमान [11]देहदमनीं, नाभीस्थळीं पंचमा; ।
ब्रह्मांडीं इतुकेच पांच वसती ज्ञाते खुणा जाणती,
[12]झंझामारुत तो रणीं प्रकटतां, [13]कादंबिनी फांकती. ॥ २१
झाडें [14]उन्मळलीं, घरें उडवलीं, व्योमीं भ्रमों लागलीं,
मेघांचीं पटळें बळें वितुळलीं, दाहीदिशा फांकलीं; ।
दुर्वारा रस माजला, दुरि करी वातास्त्र तैसें परी,
[15]धन्वंतावरि पर्वतास्त्र धनुषीं नाराच लावी हरी. ॥ २२

---

१. मंगलसंज्ञक ग्रहाच्या. २. मातेवरि (पृथ्वीवरि). ३. भंगिजेती. ४. तोडिजेती. ५. समीर=वायु. ६. वायु. ७. दहा ठिकाणीं. ८. प्राण्यांच्या देहांत. ९. "वायूचे प्राण, उदान, व्यान, समान व अपान असे पांच भेद आहेत. त्यांपैकीं प्राणवायु डोक्यांत वास करून ऊर व कंठ ह्या स्थानांत संचार करितो. तो बुद्धि, हृदय, इंद्रियें व चित्त यांना धारण करितो व थुंकणें, शिंकणें, ढेंकर देणें, श्वास घेणें व अन्न गिळणें इत्यादि क्रिया चालवितो. उदान वायूचें स्थान ऊर असून तो नाभि, गळा व नासिका ह्या स्थानांतून संचार करितो; व वाचा, ऐच्छिक क्रिया, उत्साह, बल, वर्ण, स्मृति इत्यादि गोष्टी उत्पन्न करितो. व्यान वायु हृदयांत राहून सर्व शरीरांत संचार करितो. त्याचा वेग फार तीव्र असून चालणें, हस्तादिकांचें आकुंचन व प्रसारण, पापण्या उघडणें, व मिटणें इत्यादि सर्व शारीर क्रिया प्राय: त्याजवर अवलंबून आहेत. समान वायु पाचकाग्नि जवळ राहून सर्व कोठ्यांत संचार करितो. अन्नाचें ग्रहण व पचन करितो व त्याचा सत्वांश मलापासून पृथक् करून मलाचें विसर्जन करितो. अपानवायु गुदस्थानीं राहत असून कुल्ले, बस्ति, शिस्न व मांड्या ह्या स्थानांत संचार करितो. व शुक्र, आर्तव, मल, व गर्भ यांना बाहेर काढितो." (गर्देकृत वाग्भट–अष्टांगहृदय, सूत्रस्थान, अध्याय १२ वा, श्लोक ४-९. पृष्ठ १४८-१४९) १०. व्यान, उदान आणि समान. ११. 'जाण अवघे' पाठभेद. १२. मोठा वारा. १३. मेघमाला. (कादंबिनी=कादंब म्हणजे कलहंस ते जिला असतात, ते जिच्या पाठीमागें बगळ्याप्रमाणें जातात, ती कादंबिनी.) १४. उन्मूलित झालीं, उपटलीं. १५. धनुष्याच्या अग्रभागीं.

इंदिरा रुकमिणी [1]रमणांकीं [2]रोहिणी जसि समीप [3]शशांकीं, ।
कृष्ण कौतुक उदार निरीक्षी, युद्ध होय [4]अनलास्त्र परीक्षी. ॥ २३
[5]अंगुष्ठत्राण बोटीं, [6]वलय मणगटीं, [7]युक्तवर्णा सुवर्णी
केयूरें बाहुयुग्मीं, मणिमुकुट शिरीं, कुंडलें दिव्य कर्णीं; ।
पुष्पांची वैजयंती तरुणतुळसिची शुद्ध [8]आपाद माळा,
कंसारी बाण योजी [9]अचळ उचलले घालिती भूमिपाळा. ॥ २४
पर्वतीं [10]परिघ भूसि घातला, चंड वात [11]ककुभांत बांधला; ।
वायुचक्र निमिषांत नाशिलें, उत्तमें अधम जेंवि दूषिलें. ॥ २५
जो कां निर्गुण [12]निष्प्रपंच [13]निगमा धुंडाळितां नाढळे,
ब्रह्मांडें घुसळेति रोमविवरीं ज्याची कळा नाकळे; ।
आत्माराम गुणाभिराम भगवान् आराम जो इंदिरे,
त्यासीं युद्ध करूं जपे, पुनरपी शैलास्त्र, जेणें विरे. ॥ २६
जपे मंत्र रुक्मा धनुर्बाणभारी नभांतूनियां चालिल्या वज्रहारी; ।
महाशैल दिग्बंध फांकोनि गेला, अजें वज्रवज्रासि संयोग केला. ॥ २७
गर्वाचा क्रूर ताठा धरुनि, करितसे वीर संग्रामलाठा,
शस्त्रास्त्रें मंत्र पाठांतर सकळ जपे आवृती आठआठा; ।
चावी सक्रोध ओंठा, थरकुनि उठले, कंप रोमांच कंठा,
योजी रुद्रास्त्र पीठावळिसहित रणीं प्रार्थिलें [14]नीलकंठा. ॥ २८
[15]जटाजूट [16]निर्मुक्त भूमीस लोळे, मिशा पिंगटा [17]खांड, आरक्त डोळे; ।
नभीं मूर्धनी वक्र विक्राळ दाढा, असा चालिला [18]रुद्र युद्धासि गाढा. ॥२९
महारुद्र देखोनि [19]लक्ष्मीविलासें गुणीं लाविले बाण, गंभीरहासें, ।
असो प्रार्थिलें शीघ्र [20]भस्मासुरासी, उभा ठाकला तेज [21]फांके दिशांसी. ॥३०

---

१. रमणाच्या (प्रियाच्या) अंकीं (मांडीवर). २. रोहिणी ही एक नक्षत्र असून दक्षाची कन्या आणि चंद्राची अत्यंत आवडती प्रिया होय. याच कारणास्तव चंद्राला 'रोहिणीप्रिय', 'रोहिणीपति', 'रोहिणीवल्लभ' अशीं नांवें आहेत. ३. चंद्रावर. ४. अनल=अग्नि. ५. बोटांच्या संरक्षणार्थ ज्या पिशव्या घालितात त्या. ६. कडें. ७. 'युक्तमुद्रा' असा अन्य पाठ आहे. ८. पायघोळ, पायांपर्यंत. ९. पर्वत. १०. वेढा. ११. दिशांत. १२. अविक्रिय, निर्विकार. १३. वेदांला. कारण, 'यतो वाचो निवर्तते अप्राप्य मनसा सह' अशीं वेदवचनें आहेत. १४. शितिकंठ (शिव). १५. जटानां जूटः बंधः=जटाजूटः. यालाच कपर्द असें म्हणतात. पार्वतीभर्ता जो शिव त्याच्या केशबंधास 'जटाजूट' असें म्हणतात. १६. सोडलेला. १७. दाट. १८. शिव. १९. 'लक्ष्मीनिवासें' असा अन्य पाठ आहे. २०. भस्मासुर–या असुराला शंकराचा वर असा होता कीं हा ज्याच्या मस्तकीं हात ठेवील त्याचें भस्म व्हावें. या वरानेंच याचा अंत झाला. २१. 'धांवे' असा अन्य पाठ आहे.

शांभवास्त्र गुण आपुला करी, वैष्णवास्त्र उचले तयावरी; ।
दैवतें उभयतां परस्परें, गुप्त होति गगनीं[1] घनस्वरें. ॥ ३१
बापाचा ताप भारी तनय दुरि करी, ध्वांत[2] जैसा तमारी,[3]
आजा नातू विदारी म्हणउनि शिखरी[4] धांवले कोंडमारी; ।
तेणें पृथ्वी थरारी, गगन गरगरी, दाटलीसे[5] घुमारी;
वज्रें वज्रास हारी, तदुपरि समरीं भस्म रुद्रा निवारी. ॥ ३२
[6]वीराजते मत्त उदार पाहें वीरा धरीं शक्तिशराव साहें; ।
हें सावरा शक्ति शरीं धरावी हें पारदां उत्तम तेजरावी. ॥ ३३
जें जें शरासन धरी रुकम प्रतापें, तें तें विखंड करि पंकजनेत्र[7] चापें; ।
विद्या समस्त सरली, हृदयीं विचारी, कृष्णावरी सरळ शूळ बळें उगारी.॥३४
त्रिशूळास्त्र तें देवकीगर्भरत्नें जवें[8] छेदिलें सायकें अप्रयत्नें; ।
नसे चाप नाराच[9] झुंजावयासी.[10] चुरी हात[11] रुक्मा, त्यजी स्यंदनासी. ॥३५
[12]परिघ [13]पट्टिश तोमरें[14] सांवरी, परशु[15] खेटक[16] शक्ति[17] करीं धरी; ।
सकळ टाकित जाय अनुक्रमें, हरि विदारितसे[18] स्वपराक्रमें. ॥ ३६
पाणीतळीं[19] झेलित ये कृपाणी,[20] राणीव[21] बोले स्वभुजस्फुराणीं, ।
'नारीसवें क्रीडसि, पूतनारी! हारीस[22] येतां, पळसी विहारीं[23]'. ॥ ३७

---

१. आकाशांत. २. काळोख. ३. सूर्य. ४. पर्वत. ५. धुमाकूळ, धुमश्चक्री, धुमाळी. ६. हा लुप्तपादबंध आहे. हें श्लोकार्धगत 'प्रतिलोम' नामक यमकाचें उदाहरण आहे. प्रतिलोमत्वानें अक्षरांची आवृत्ति झाली असतां, त्रिविध यमक उत्पन्न होण्याचा संभव आहे:—पादगत, श्लोकार्धगत आणि श्लोकगत (प्रतिलोम यमक). 'आवृत्तिः प्रातिलोम्येन पादार्धश्लोकगोचरा । यमकं प्रतिलोमत्वात् प्रतिलोममिति स्मृतम् ॥' [काव्यादर्श—तृतीय परिच्छेद ७३] जेव्हां पूर्व पादाची उत्तर पादाशीं अथवा उत्तर पादाची पूर्व पादाशीं प्रतिलोमावृत्ति होते तेव्हां पादगत प्रतिलोम यमक होतें; जेव्हां पूर्वार्धाची उत्तरार्धाशीं अथवा उत्तरार्धाची पूर्वार्धाशीं प्रतिलोमावृत्ति होते तेव्हां श्लोकार्धगत प्रतिलोम यमक होतें. हेंच यमक प्रस्तुत ३३ व्या श्लोकांत आहे. ७. कमलनेत्र. (कृष्ण.) ८. वेगानें. ९. सर्व लोहमय शर. यास प्रक्ष्वेडन असें दुसरें नांव आहे. 'प्रक्ष्वेडनास्तु नाराचाः' इत्यमरः. १०. झुंज=युद्ध, झुंझार=योद्धृ. ११. हात चुरणें, हातपाय चोळणें=चुसमुसणें, जळफळणें, चडफडणें. १२. गदा, लोहांगी. १३. शस्त्रविशेष, पट्टा, धोप. १४. गंडासा, शस्त्रविशेष. याला 'गुरगूज' असें म्हणतात. हें घुसळण्याच्या रवीसारखें असतें. १५. कुऱ्हाड, कुठार. १६. ढाल, चर्म. १७. आयुधविशेष. 'शक्तिरस्त्रांतरे गौर्यामुत्साहादौ बले स्त्रियाम्' इति मेदिनी. १८. ह्या पद्याचें वृत्त 'द्रुतविलंबित' आहे. १९. येथें मूळचा 'पाणि' शब्द ऱ्हस्व असतांही गण जमण्यासाठीं 'पाणी' असा कवीनें दीर्घ केला आहे. विठ्ठलाच्या कवितेंत हा प्रकार बराच आढळतो. २०. तलवार. २१. राजा (रुक्मा). २२. हारीस येणें=जेरीस येणें, वठणीस येणें, पराजित होणें, चीत होणें. २३. क्रीडास्थळीं.

[1]पतंग [2]दीपावरि झेंप घाली, तैसी तयाची [3]कैव शीघ्र आली. ।
मारावया [4]वारु रथातळीं ये, [5]उत्फाळती अश्व महाबळीये. ॥ ३८
[6]अश्वराज बरवे सुलक्षणे 'बाप बाप' इति सारथी म्हणे, ।
कोप राजकुमरासि नावरे, भूतळीं रथ कदां न थावरे. ॥ ३९
रथापासीं आला, दृढ धरुनि हातीं [8]असिलता,
[9]रथांगें छेदाया निकट [10]भट [11]भोवे सभंवता; ।
कवेखालें पाहें, परि रथ न फावे समरिंचा.
शिर छेदावें तों रुकमिण धरी हस्त हरिचा. ॥ ४०
'[12]मारायातें शक्तिविषादें यजिसी तूं, तूझ्याठायीं [13]धीयुत [14]कामज्वरभित् तूं; ।
मातें देईं तूं [15]भिमयुद्धीं यश रामा! [16]मायावी तूं, '[17]मत्तमयूरो'त्तमनामा.' ॥ ४१
[18]अनंगाच्या बापें [19]नृपतनय चापें गवसिला,
धरूनी [20]केशाग्रीं [21]रथमकरभागीं बसविला; ।
[22]जगन्माता [23]चांफेकळिललित कांपे [24]सुचकिता,
[25]महोद्वेगें कोमाइलि सुतनु [26]रमा [27]पुलकिता. ॥ ४२

---

१.शलभ. २.पतंगदीपन्याय सुप्रसिद्ध आहे. पतंग मोठ्या वेगानें दीपावर झडप घालतो आणि मरण पावतो, पण दीपाचें कांहींच होत नाहीं; त्याप्रमाणें रुक्म्यानें (पतंगानें) घोड्यांवर झडप घातली, पण घोडे उसळून गेले आणि तो व्यर्थ शीण मात्र पावला, इत्यादि. ३. पकड, मिठी, पकडून धरणें. ४.घोडे. ५. उडतात, उसळून जातात. ६. या पद्याचें वृत्त 'रथोद्धता.' ७. हा शब्द देशी आहे. ८. खड्गरूप वल्लि. ९. चक्रें. १०. वीर, योद्धा. ११. भ्रमण करी, फिरे. १२. हें 'छत्रबंधा'चें उदाहरण आहे. १३. बुद्धिमान्. १४.कामरूप ज्वराचा नाशकर्ता. १५. येथें 'भीम'शब्द वृत्तसुखार्थ ऱ्हस्व केला आहे. १६.कपटी. (माया=कपट.) 'विन्'प्रत्यय माया, मेधा आणि स्रज् या शब्दांपुढें आणि असन्त शब्दांपुढें मतुबर्थी होतो; जसें मायाविन् (कपटी), मेधाविन् (बुद्धिमान्), स्रग्विन् (मालाधारी), तपस्विन्, यशस्विन् इत्यादि. १७. या श्लोकाचें वृत्त 'मत्तमयूर.' याचें लक्षण:—'वेदै रंध्रैर्म्तौ यसगा मत्तमयूर:'— यांत म त य स आणि एक गुरु अक्षर यांची योजना असते आणि चवथ्या व नवव्या अक्षरांवर यति आहे. किरात–सर्ग १८ श्लो० २८, शिशुपालवध–सर्ग ४ श्लो० ४४, सर्ग ६ श्लो० ७६ आणि रघुवंश–सर्ग ९ श्लोक ७५ यांचें हेंच वृत्त आहे. १८. मदनाच्या. १९. रुक्मी. २०. ही निमित्तवाचक अथवा करणी सप्तमी होय. "कोणास धरावयाचें असतां त्याचा जो अवयव धरावयाचा तद्वाचक शब्दाची सप्तमी योजण्याचा संप्रदाय संस्कृतांतही आहे." (नवनीत.) हाच प्रकार प्राकृत काव्यांत अन्यत्रही आढळतो:—'भूपें हळूच धरिला कलहंस पायीं' इत्यादि. २१.रथाच्या मुख्य भागीं. [मकर= मुख्य भाग.] २२. रुक्मिणी. २३. चंपकाच्या कळीसारखी सुंदर. २४. अत्यंत घाबरी झालेली, भीरु. २५. मोठ्या खेदानें. २६. स्त्री (लक्ष्मी). २७. रोमांचयुक्त देह जीचा अशी; जीचें शरीर रोमांचित झालें अशी. (पुलक=भयानें अथवा आनंदानें शरीरावर जो कांटा उभा राहतो तो.)

[1]परब्रह्मा ब्रह्मादिक सुरमुनी ध्याति [2]भुवनें,
वधू [3]पद्मा मर्दी, नमि चरण [4]शोणस्तनघनें; ।
घनश्यामा [5]रामा वचनिं विनवी, 'ताप हरणें
रणीं तीव्रें शस्त्रें शशक न हणी निष्ठुरपणें.' ॥ ४३

करी रोदना रुक्मिणी मंदवाणी, तियेसीं विनोदें वदे चक्रपाणी; ।
'न मारी तुझा बंधु, मत्कोप गेला, ध्वजस्तंभि त्यातें [6]भुजाबंध केला.' ॥ ४४

[7]अर्धखांडसम बोडिली मिशी, [8]पांच पाट मग काढिले [9]शिरीं; ।
[10]नागमूत्र वदनासि लाविलें, [11]चूर्णलेपन करूनि गोविलें. ॥ ४५

शौरी म्हणे, 'रुकमिणी ! सुखरूप राहें, तूं [12]निंबलोण करिं बंधुमुखासि पाहें; ।
केलें असें [13]वपन शुद्ध[14]मुखारविंदा, [15]भद्रानिमित्त घडली बहु यासि निंदा.' ॥ ४६

[16]हें झालिया उपरि [17]राम समीप आला, सोडूनि बाहु मग काय म्हणे तयाला; ।
'हा क्षत्रधर्म हरि ! कोण अधर्म केला ? याचा पुढें सकळ लौकिक मान गेला. ॥

---

१. परमेश्वराला. २. स्वर्ग, मृत्यु, पाताळ हीं तीन भुवनें, तीन लोक. ३. लक्ष्मी. ४. लाल आणि पुष्ट स्तनें. ५. स्त्री (लक्ष्मी.) ६. मोरोपंतकृत कृष्णविजय—उत्तरार्ध—अध्याय ५४ वा, पद्यें ४०-४५ पहा. ७. खांडमिशांसारखी ८. पांच पाट काढणें.=डोईचे मध्यें मध्यें केश काढणें. (हा एक दंड अथवा शासन करण्याचा प्रकार आहे.) ९. मस्तकीं. १०. हत्तीचें मूत. ११. तोंडाला चुना फांसला. चूर्ण=चुना. १२. दृष्टीचा अगर भूतबाधेचा विकार न व्हावा म्हणून मीठ, मोहऱ्या, व कडू निंबाचीं पानें हीं ओंवाळून टाकणें, या कृत्याला 'निंबलोण करणें' म्हणतात. (नवनीत.) १३. वपन=केश काढणें. १४. मुख+अरविंदा=तोंड+कमळाला. १५. भद्रा=भद्राकरण, वपन, हजामत करणें, मुंडन, भादरणें. "मनुष्य जसा कुसंगतीनें बिघडतो तसेंच कांहीं अंशीं शब्दांचें आहे. चांगल्या अर्थाचे शब्द असतात ते अशिक्षित वाईट लोकांच्या योगानें वाईट होतात. 'भद्राकरण' याचा मूलार्थ 'मुंडनपूर्वक चौलादिक मंगल संस्कार करणें' असा असून त्यांतील केवळ मुंडनार्थाकडे लक्ष देऊन त्याचा अर्थ नुसतें 'केस काढणें' असा केला. त्यांत देखील आणखी निंदा ध्वनित होते. 'भादरणें' हा शब्द बहुश: 'म्हैस वगैरे भादरणें' अशा ठिकाणीं योजतात. मूळचे चांगल्या अर्थाचे असून आलीकडे वाईट किंवा बीभत्स झालेले असे भाषेमध्यें पुष्कळ शब्द आहेत. कित्येक शब्द मूळचे फारच प्रतिष्ठित असून आतां ते उच्चारण्यास किंवा लिहिण्यास देखील अयोग्य असे झाले आहेत. कोमल तृणवाचक जो कालिदासादि कवींचा आवडता शब्द त्या बिचाऱ्यास तर मराठी बोलणाऱ्या चावट लोकांनीं इतका बाटवून टाकिला कीं तो पतित होऊन पुन: शुद्ध होण्याची आशा उरली नाहीं." (व्युत्पत्तिप्रदीप पृ० ४९.) १६. बंधनमुंडनरूप कर्म. १७. बलराम.

सांपडे सुहृद[१] जैं रणांगणीं, त्यासि गौरव दिजे बुझाउनी;[२] ।
मारितासि तरि मोक्ष[३] पावता, निंद्य कर्म घडलें गुणोन्नता.[४] ॥ ४८
चौऱ्याशीं[५] लक्ष योनी उपजवुनि मनीं वागवी सूत्र[६] पाणीं,
वेदीं[७] शास्त्रीं[८] पुराणीं[९] अभिनव करणी वर्णितां मौन्य[१०] वाणी; ।
तो[११] हा सारंगपाणी[१२] सुरमुकुटमणी, त्यासि तूं पट्टराणी
माया दृष्टीस नाणीं, बंत[१३] करिसि झणी, पैं 'न[१४] फीटे शिराणी.[१५]' ॥ ४९
तालांकी[१६] मग रुक्मयाप्रति कथा श्लोकार्थ भाषीतसे[१७]
युद्धीं गोत्रज बंधुवर्ग वधितां निर्दोष शास्त्रीं असे, ।

---

१. मित्र, आप्त, स्नेही. २. समजावून (बुध जाणणें.)=बुझणें. ३. कृष्णाच्या हातीं मरण पावला म्हणून मुक्ति पावता—असा भाव. ४. गुण+उन्नत=गुणांनीं श्रेष्ठा. ५. चौऱ्याशीं लक्ष योनी=एकंदर वस्तुमात्राच्या चार खाणी म्हणजे वर्ग अथवा कोटी आहेत व प्रत्येक खाणींत एकवीस लक्ष योनी आहेत. त्यांचा तपशील—२१ लक्ष योनी अंडज कोटींतील (९ लक्ष योनी सर्प मुंगी इत्यादि+४ लक्ष योनी जळचर +८ लक्ष योनी पक्षी.) २१ लक्ष योनी जारजकोटींतील. (९ लक्ष योनी द्विपद+४ लक्ष योनी चतुष्पद+८ लक्ष योनी श्वापद.) २१ लक्ष योनी उद्भिज्ज कोटींतील (९ लक्ष योनी अन्य धान्यादिक +४ लक्ष योनी सुगंधादि पदार्थ+८ लक्ष योनी वृक्ष तृण इत्यादि.) २१ लक्ष योनी स्वेदज कोटींतील (९ लक्ष योनी तारागणादिक+४ यक्ष योनी मेघमाळा+८ लक्ष हीरक रत्नादिक मणि.) दुसऱ्या मताप्रमाणें २० लक्ष वृक्ष योनी, ११ कीटक, ३० पशु, ९ जलचर, १० पक्षी आणि ४ मनुष्य. चौऱ्याशीं योनी=चौऱ्याशींचा फेरा, गरका. ६. जन्ममरणाची दोरी (सूत्र) हातांत ठेवी. ७. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वणवेद-अशा चार वेदांत. ८. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत, या सहा शास्त्रांत. ९. अठरा पुराणें आणि उपपुराणें यांत. [यांचीं नांवें:—'ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टकं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा ॥' व अठरा उपपुराणें आहेत तीं अशीं:—'अष्टान्युपपुराणानि मुनिभिः कथितानि तु । आद्यं सनत्कुमारोक्तं नारसिंहमतः परम् ॥ तृतीयं नारदं प्रोक्तं कुमारेण तु भाषितम् । चतुर्थं शिवधर्माख्यं साक्षान्नंदीशभाषितम् ॥ दुर्वाससोक्तमाश्चर्यं नारदोक्तमतः परम् । कापिलं मानवं चैव तथैवोशनसेरितम् ॥ ब्रह्मांडं वारुणं चाथ कालिकाह्वयमेव च । माहेश्वरं तथा शांबं सौरं सर्वार्थसंचयम् ॥ पराशरोक्तं प्रवरं तथा भागवतद्वयम् । इदमष्टादशं प्रोक्तं पुराणं कौर्मसंज्ञितम् ॥ चतुर्धा संस्थितं पुण्यं संहितानां प्रभेदतः ॥.' १०. वाणी मौन्य पावे. ११. यांत चक्रबंध आहे. १२. सारंगपाणी=शार्ङ्गपाणी=कृष्ण. [शार्ङ्ग नांवाचें धनुष्य पाणीच्या (हाताच्या) ठायीं ज्याच्या तो.] १३. खेद. १४. फिटणें=पूर्ण होणें. १५. कौतुक. १६. तालांकी=ताल आहे अंक (ध्वज) ज्याचा तो. 'तालांको मुसली हली' इत्यमरः तालांक=अच्युताग्रज बळराम. १७. बोलतसे.

**ब्र**ह्म्यानें विधि[1] निर्मिला, विषमता[2] आम्हां न लागे कदा,
दोषा क्षालन पावलासि, न करीं चिंता[3] चितासंपदा.' ॥ ९०
**रा**में राजसुता निरोप दिधला, तेथूनि तो चालिला,
गेला **भो**जकटासि[4], वस्ति करुनी, लज्जामठीं राहिला; ।
राजे आणिक सार्वभौम शतशा युद्धासि आले बळें,
त्यासीं **या**दव झुंजिले, पळविलीं दिग्मंडळींचीं दळें[5]. ॥ ९१
राजे दुर्धर जिंतिले[6], अतिशयें **रु**क्मा विटंबूनियां[7],
कोदंडाप्रति[8] घातल्या गंवसणी[9], तूंणीर[10] ठेवोनियां; ।
[11]भेरीचे भंभकार[12] मंगळतुरें सेनामुखीं वाजती,
स्वानंदें जयकार वीर करुनी **द्वा**रावती चालती[13]. ॥ ९२
श्रीम**द्रु**क्मिणिचें स्वयंवर निकें संग्राम झाल्यावरी
तेजःपुंज वधूवरें निजरथीं साक्षांत **ल**क्ष्मी **ह**री, ।
सेनाचक्र सभोंवतें गवसुनी प्रस्थान **रा**में किजे[14],
वर्णी **वि**ठ्ठल सर्ग षष्ठम कथा विद्वज्जनीं सेविजे. ॥ ९३

---

१. दैव किंवा विधान. २. कमजास्तपणा, दोष. ३. चिंता हीच चितेची संपदा म्हणजे मोठी चिता. ४. भोजकट या नांवाच्या नगराला. रुक्मी जेथें पराभव पावला तेथेंच भोजकट नामक नगर वसवून (कुंडिनपुरास न जातां) राहिला. ५. सैन्यें. ६. पराभूत केले. ७. अप्रतिष्ठा करून. ८. धनुष्याला. ९. अभ्रा, आच्छादन, वेष्टन, गवसणी घालणें=बांधून ठेवणें. पिशवींत घालणें (वीणा, सतार इत्यादि). १०. भाता. ११. भेरी, नगारे. १२. गर्जना, 'भभकार' हा अनुकरणवाचक शब्द आहे. १३. या श्लोकांत 'वाजती' 'चालती' हीं वर्तमानकाळचीं रूपें योजिलीं आहेत. पण तीं भूतकाळदर्शक आहेत. ज्या रूपांचा प्रयोग प्रायः गद्यात्मक ग्रंथांत रीतिभूतकाळीं होतो त्या रूपांचा प्रयोग पद्यात्मक ग्रंथांत प्रायः वर्तमानकाळीं आणि पुष्कळदां शुद्ध भूतकाळीं होतो. याचीं कित्येक उदाहरणें:-(१) मंत्रजप करुनि तो कवि येरे वत्सा कचा असें **बाहे**, (२) भेदुनि वृकोदरें पल सर्व **निघे** त्यांत लेशहि न **राहे**, (३) कच येतां बहु **हर्षे** धन्य **म्हणें** मीच कन्यका मातें, (४) '**पूजी**' नरदेवातें '**करि**' तेव्हां स्ववपु दीपक ज्योती, (५) जातां स्वर्गीं '**मिरविति**' निजगुरुसुतरत्न देव यानीं तें, (६) '**वर्णिति**' दैत्यातें किति, किति कवितें कितिक देवयानीतें. याच प्रकारचीं दुसरीं अनेक उदाहरणें वाचणारास सहज आढळतील. १४. केलें. 'किजे' हें वर्तमानकाळींचें कर्मणिरूप भूतकाळाच्या जागीं योजिलें आहे. केव्हां केव्हां कवितेंत वर्तमानकालवाचक कर्मणिरूप भूतकालदर्शक होतें:-'नको विसरूं आम्हांसि, असों येथें, । वदुनि **धरिजे** गहिंवरा महीनाथें ॥.'

## सर्ग सातवा.

(श्लोक.)

शृंगें वंशी[1] दमामे[2] पणव[3] रणतुरें[4] शंख भेरी उधंटा[5],
धों धों त्रों त्रों तुतारे[6] मुरज[7] किणकिणी झल्लरी टाळ[8] घंटा, ।
वाद्यांच्या चंडघोषें[9] नभ[10] दुमदुमिलें, भाट[11] गाती पवाडे,
ऐसे आले प्रभासा[12], मिरवत गजरें लोक झाले पुढारे. ॥ १
प्रमुदित[13] मग आले **सो**रटीसोमनाथा,
नमन करुनि पायीं ठेवि **कं**सारि माथा; ।
उतरुनि निजसेना राहिले **वृ**ष्णि जेथें,
तदुपरि हरिभेटी[14] ये[15] **वि**दर्भेंद्र तेथें. ॥ २
राजा आला, भेटला **रामकृ**ष्णा, बोले, 'झाली सर्व संतृप्त तृष्णा; ।
आतां कीजे लग्न विध्युक्त[16] देवा! पूजा घ्यावी वार चत्वारि[17] सेवा[18].' ॥ ३
वचन **के**शवें अंगिकारिलें, मग हलायुधा[19] तेंचि मानलें; ।
'बहु बरें' म्हणे भूभुजोत्तमा[20], वदति सत्कवी हे 'मनोरमा[21].' ॥ ४

---

१. पांवे. २. दमामा=नगारा, धोशा. [हा फारशी शब्द आहे.] ३. वाद्यविशेष. ४. युद्धाचीं वाद्यें. ५. वाद्यांतील भेदविशेष. ६. तुतारी=वाद्यविशेष. ७. मृदंग. ८. वाद्यविशेष. याला 'झांज' असें म्हणतात. ९. भयंकर. १०. आकाश. ११. स्तुतिपाठक. १२. प्रभास या नांवाच्या सुप्रसिद्ध क्षेत्रास. १३. हर्षयुक्त. १४. हरिदर्शनासाठीं. १५. ये=आला, येता झाला; हें येथें भूतकालवाचक रूप आहे. सामान्य नियम असा आहे कीं 'एकारान्त व ओकारान्त' धातूंच्या विध्यर्थीच्या द्वितीय पुरुषाच्या एकवचनाचा प्रयोग कधीं कधीं कवितेंत तृतीयपुरुषीं (वर्तमानकाळीं व भूतकाळीं) एकवचनीं आढळतो.' [प्रौढबोध मराठी व्याकरण, नियम २८ पहा.] या नियमांचीं इतर उदाहरणें:–(१) न **दे** पाठि कोणिच राया बळी रे, (२) म्हणे हरी प्रेरुनि **ने** जयातें, (३) मागूनि **ये** दूरुनि चक्रपाणी, (४) **घे** इक्षु वारण जसा करपुष्करानें, (५) असें देखतां **ये** कृपा माधवातें. १६. यथाविधि. १७. चार. ['चत्वारि' हें संस्कृताप्रमाणें प्रथमेचें नपुंसकलिंगी रूप आहे.] १८. या वृत्ताचें नांव 'शालिनी.' याचें लक्षण:–'मात्तौ गौ चेच्छालिनी वेदलोकैः' याच्या प्रत्येक पादांत म, दोन तगण व दोन गुरु अक्षरें यथाक्रम असतात व यति चवथ्या आणि सातव्या अक्षरांवर असतो. १९. बलरामाला (हल+आयुध=नांगर+हत्यार; हल आहे आयुध ज्याचें तो.) २०. राजश्रेष्ठा. २१. 'मनोरमा' हें पंक्तिजातीच्या म्हणजे दशाक्षरात्मक जातीच्या वृत्ताचें नांव आहे; याचें लक्षण:–'नरजगैर्भवेन्मनोरमा.' पण या चवथ्या पद्याचें वृत्त 'मनोरमा' नसून त्रिष्टुभ्जातीय एकादशाक्षरात्मक 'शुद्ध कामदा' आहे. याचें लक्षण:–'म्हणति तीस बा शुद्ध कामदा, न र र ल ग हे येती ज्या पदा.'

[1]मूळ **मा**धवनिवास जे स्थळीं, तें निकें स्थळ दिसे वनस्थळीं; ।
राहिले **कुकुर** देउनी [2]दुंषें, **भो**ज ते [3]बिरुंदवंत [4]पौरुषें. ॥ ५
पाचारिली युवति शुद्धमती [5]भुंपाळें, आली त्वरें विभव घेउनि शीघ्र काळें, ।
दूष्यें विचित्र दिधलीं [6]बहुताभिधानी, विस्तीर्ण मंडप मनोहर राजधानी. ॥ ६
**द्वा**रकेसि मग मूळ धाडिलें, उत्सवें तइं वऱ्हाड चालिलें; ।
[7]वाजि [8]वारण रथादि वाहनें, रत्नपुंज शिबिका सुखासनें. ॥ ७
**दे**वकी [9]चवरडोलवाहनीं, **रे**वती बसविली सुखासनीं, ।
पालकींत मिरवे **सु**भद्रिका, आणिखी प्रतिरथीं [10]पुंरंध्रिका. ॥ ८
[11]उग्रसेन **व**सुदेव [12]कुंजरीं बैसले, बहुत तोष अंतरीं; ।
वाजती निबिड दुंदुभी [13]तुरें, [14]खेचरें प्रचरतीं भयातुरें. ॥ ९
[15]चामुंडा नवकोटिभार [16]सरिशा त्या मातृका धांवल्या,
संख्या छप्पनकोटिसैन्यगणना [17]**का**त्यायनी पातल्या; ।

---

१. या पद्याचें वृत्त ‘रथोद्धता.’ याचें सलक्षण विवेचन श्रीक्षेमेंद्रकृत ‘सुवृत्ततिलक’ नामक छंदोग्रंथांत केलें आहे:–‘रनरैरन्वितं युक्तं लघुना गुरुणा तथा । ख्यातं **रथोद्धता** नाम वृत्तमेकादशाक्षरम् ॥.’ [१।२३.] ‘विसर्गयुक्तैः पादान्तैर्विराजति **रथोद्धता**। कलापरिचयैर्याता लटभेव प्रगल्भताम् ॥’ [२।१३.] २. दूष्यें (तंबू). प्रासाकरितां ‘दूषें.’ ३. यशस्वी. भोज हे पराक्रमाचें बिरुद (ब्रीद, पट्टा). बांधणारे होते. ४. पराक्रमामुळें. ५. ‘नृपाळें’ असें येथें असतें तर ‘भूपाळें’ यांतील ‘भु’ ऱ्हस्व करण्याचें प्रयोजन पडतें ना. ६. बहुत+अभिधानी=अनेक+नामें. ७. घोडे. ८. हत्ती. ९. चवरडोल=अंबारीसारखें हत्तीवर बसायाचें वितानयुक्त आसन. [डोल=हा आरबी शब्द आहे. याचा अर्थ झोकेखात जाणारें पालखीसारखें वाहन. याचा उपयोग अद्यापि हिंदी भाषेंत प्रचलित आहे. ‘आज अनंत चौरस है. गणेशजीके **डोल** आज निकलें गे’ इत्यादि. १०. पतिपुत्रवती स्त्रिया. ११ कंसाचा बाप. १२. कुंजर=हत्ती. १३. वाद्यें. १४. खेचरें (देव, गंधर्व, अप्सरा, किन्नर, यक्ष इत्यादि आकाशमार्गी जन) भयातुरें (भयानें व्याकुळ होत्साते) प्रचरतीं (पळत सुटती). पूर्वोक्त वाद्यांचा गजर इतका प्रचंड झाला कीं ते पळत सुटले. १५. विवाहादि सर्व मंगलकार्यांत पुण्याहवाचन व तदंगभूत नांदीश्राद्ध, मातृकापूजन वगैरे कर्में करायाचीं असतात. त्या कार्यांत देवतादिकांना ‘अक्षतपुंजेष्वावाहयामि’ असें म्हणून बोलावीत असतात. परंतु प्रस्तुत विवाहसमयीं जी मंडळी अक्षतपुंजांत यावयाची ती प्रत्यक्ष आली असें विठ्ठलकवि ह्या दहाव्या व पुढील पद्यांत म्हणतो. मातृकापूजनांत २६ देवतांचें आवाहन करीत असतात. त्या देवता:—‘गौरी पद्मा शची मेधा सावित्री विजया जया । देवसेना स्वधा स्वाहा मातरो लोकमातरः । धृतिः पुष्टिस्तथा तुष्टिरात्मनः कुलदेवताः॥.’ या गौर्यादिक षोडश मातृका. ‘ब्राह्मी माहेश्वरी चैव कौमारी वैष्णवी तथा । माहेंद्री चैव वाराही चामुंडा सप्त मातरः॥’ या ब्राह्म्यादि सप्त मातृका. ‘गणपतिर्दुर्गा च क्षेत्रपालश्च ।’ आणखी कांहीं देवतांचें इतर प्रसंगीं आवाहन करीत असतात. येथें शेवटच्या तीन देवतांशिवाय

एकी त्या शव[1]वाहिनी वेगळल्या[2] विंचावरी[3] आणिका  
सर्वां श्रेष्ठ **गणेश** आखुवहनीं[4] निर्विघ्नकर्ता निका. ॥ १०  
[5]शृंगार वीर करुणाद्भुत रौद्र आले शांता बिभत्सक[6] भयानक आठ झाले, ।  
आतां असे प्रगटला रस हास्य[7] सांगे वर्णीन कौतुकविनोदकर्थानुरागें[8]. ॥ ११  
मोठें पोट, विशाळ ओठ, मिरवे सिंदूर सोंडेवरी,  
थोंटा दंत, **गणेश** मूर्त अवघ्यां आधीं निघाला, परी ।  
पायीं आंखुड, चालतां लटलटां तो जातसे चांचरी[9],  
हें देखोनि व्ऱ्हाडिणी[10] गदगदां हांसेति नि[11]म्नोदरी. ॥ १२  
[12]महामातृका आपुलाल्या प्रकारीं पुढें धांवतां निंदिलें त्यासि नारीं, ।  
**गणे**शासि तेणें महाक्षोभ झाला, पथीं चालतां विघ्न केलें तयांला. ॥ १३  
हाग ओक सुटली वऱ्हाडिणी, मोडिले शकट[13] चातुरंगणी; ।  
त्यां हिमज्वर व्यथा महा करी, लोळती धरणिमंडळावरी. ॥ १४  
दूतीं समाचार **ह**रीस नेला, साकल्य तींहीं श्रुत सर्व केला; ।  
**कृ**ष्णें समाधान किजे तयांचें, वऱ्हाड आलें मग वैभवाचें[14]. ॥ १५

---

करून बाकीच्या २३ मातृकांस महामातृका असें विठ्ठलानें म्हटलें आहे. (पुढें श्लोक १३ पहा.) दशम श्लोकाचा अर्थः—पहिला चरण–सप्तमाता चामुंडा नऊ कोटी सैन्य घेऊन आल्या. दुसरा चरण–कात्यायनी (गौरी) वगैरे सोळा मातृका आपलें ५६ कोटी सैन्य घेऊन आल्या. तिसरा चरण–मात्र शववाहिनी (मुडदे फरास) व विंचवावर बसणाऱ्या अशा प्रकारच्या देवतांच्या अमंगल सेनेला या विवाहप्रसंगीं वगळिलें होतें, कारण मंगलकार्याला ह्या तेवीस मातृका जात होत्या, तेथें शववाहिनी मातृकांचें अर्थात् प्रयोजन नव्हतें. १६. त्वरेनें. १७. भवानी.

१. प्रेत नेणाऱ्या. २. टाकिल्या, न घेतल्या. ३. विंचवावर. ४. उंदीरवाहनीं. ५. हे रस नऊ आहेत, कित्येक शांत रस वर्ज्य करतातः–'शृंगारहास्यकरुणरौद्रवीरभयानकाः । बीभत्सोद्भुत इत्यष्टौ रसाः शांतस्तथा मतः ॥' [साहित्यदर्पण–३-२०९], 'शृंगारहास्यकरुणरौद्रवीरभयानकाः । बीभत्साद्भुतसंज्ञौ चेत्यष्टौ नाट्ये रसाः स्मृताः ॥' [काव्यप्रदीप–४ उल्लास ६ कारिका, काव्यमाला २४, पृष्ठ ८७], 'निर्वेदस्थायि भावाख्यः शांतोऽपि नवमो रसः' [काव्यप्रदीप–४ उल्लास १२ कारिका], 'शृंगारवीरकरुणाहास्याद्भुतभयानकाः । रौद्रबीभत्सशांताश्च नवैते कथिता बुधैः ॥' [वाग्भट–पंचम परिच्छेद ३ पहा]. ६. 'बीभत्सक' असा शब्द आहे. पण वृत्तसुखार्थ येथें ऱ्हस्व केला आहे. ७. विकृत, आकृति, वाणी, अंग, वेष, हावभाव यांच्या दर्शनापासून उत्पन्न होणारा जो रस तो 'हास्य' रस होय. याचे उत्तम मध्यम आणि नीच या तीन अवस्थांमुळें सहा भेद आहेतः—स्मित, हसित, विहसित, अवहसित, अपहसित आणि अतिहसित. [रसगंगाधर–पृष्ठ ४३-४४ पहा.] ८. अनुराग=प्रेम. ९. अडखळत. १०. हें पद्य हास्यरसाचें उदाहरण आहे. ११. निम्न=उदर+गंभीर ज्यांचें उदर (नाभि) अशा. १२. गौर्यादि व ब्राह्म्यादि मिळून २३ मातृका. १३. रथ. १४. थाटमाटाचें.

रुकमिणि मग बापें आश्रमामाजि नेली,
सकळ [1]रुखवताची आइती सिद्धि केली; ।
तदुपरि मग झाली [2]देवकाची प्रतिष्ठा
हळदि वधुवरांतें [3]लाविती एकनिष्ठा. ॥ १६
[4]नांदीश्राद्धविधान मंगळतुरीं दोमंडपीं सोहळा,
लग्नाची घटिका [5]प्रतिष्ठिलि जळीं, राजा मनीं मोकळा; ।
गाई [6]हेम विचित्र राजवसनें दे ब्राह्मणांकारणें,
त्यापेक्षां[7]नकदुंदुभी करितसे दानें यथालक्षणें. ॥ १७
वराकारणें मूळ राजा निघाला, विमानांत अंतःपुरीं [8]सिद्ध झाला; ।
पुढें चंड वाद्यें, नभीं घोष गाजे, सवें सर्व सीमंतपूजा विराजे. ॥ १८
मिरवत गजरेंसी राजसेना निघाली;
रथ गज [9]हय यानें चालतां दाटि झाली. ।
निबिड जनपदातें वारिती [10]वेत्रपाणी,
[11]सुकृत नरपतीचें वानिती भाट गाणीं. ॥ १९
[12]मग येइजे अतिसमीप विवाहीं वसुदेव त्यासमुख ये लवलाहीं; ।
प्रभु भेटले उभयतां सुख त्यांसी मणियुक्त [13]विष्टरें दिले सकळांसीं. ॥ २०
नृप करि [14]वरपूजा वेदविध्युक्तमंत्रीं,
तदुपरि मृदु शब्दें प्रार्थिला भूप [15]मंत्रीं. ।
'लव पळ घटिकेचें मान वेचून जातें
उचित समय साधा' सांगती [16]भूभुजातें. ॥ २१

---

१. रुखवत–वरप्रस्थानाचे पूर्वी वरास कन्येच्या बापाकडून समारंभपूर्वक फराळाची इत्यादि सामग्री आणितात, आणि तें फराळाचें वरापुढें ठेवून त्याजकडून फराळ करवितात, असा जो समारंभ करितात तें. हा समारंभ वरप्रस्थानानंतर वधूमंडपांतही क्वचित् करण्याचा प्रचार आहे. २. देवकस्थापना. ३. 'लागली' असा अन्य पाठ. ४. पृष्ठ ८२ टीप १ पहा. ५. स्थापिली. ६. सोनें. ७. वसुदेव. (वसुदेवाच्या जन्मप्रसंगीं देवांनीं आनक नामक दुंदुभि वाजविले म्हणून त्यास 'आनकदुंदुभि' असें नांव पडलें. वसुदेवाचा पिता आनकदुंदुभ म्हणून होता, त्यावरुन त्याचा पुत्र तो 'आनकदुंदुभि' अशी व्युत्पत्ति कोणी करितात, ती निर्मूल होय.) ८. 'विमानीं वधूभारही सिद्ध झाला' असा अन्य पाठ. ९. घोडे. १०. चोपदार. ११. पुण्य. १२. या पद्याचें वृत्त 'कलहंस.' यालाच 'सिंहनाद' आणि 'कुटजा' असीं ही नांवें आहेत. याचें लक्षणः–'सजसा सगौ च कथितः कलहंसः' १३. रत्नखचित आसन. १४. वराची पूजा. १५. सचिवांनीं. १६. भूभुज्=राजा.

[1]उच्चैःश्रवा वडिल बंधु घडे जयाचा ऐसा तुरंगम [2]सरोरुहलोचनाचा; ।
आरूढला मग तयावरि **दा**नवारी **वृ**ष्णी [3]हलायुध सवें परि **पू**तनारी. ॥ २२

[4]प्रदीप्त लक्ष दीपिका, [5]असंख्यचंद्रलोपिका,
पदोपदीं अमोलिका मनोहरा [6]सतेजिका; ।
[7]अपार पुष्पवल्लिका विराजती प्रफुल्लिका,
[8]चतुष्पथादि [9]वीथिका सुरंगिता [10]सुवेदिका. ॥ २३

[11]वारस्त्रिया नाचति रंगभूमिके, सत्कार त्यांतें **व**सुदेव दे निके. ।
पदोपदीं लोक उभे विलोकिती, भाट प्रसंगें गुण वर्णिती किती. ॥ २४

मिरवत **ह**रि आला नोवरीमंडपासीं,
तंव सदृढ कवाडें लाविती राजदासी. ।
उचित समयकाळीं पावल्या त्या [12]निर्वाडें
तदुपरि मग तीहीं मुक्त केलीं कवाडें. ॥ २५

वऱ्हाडी सभामंडपामाजि आले, विचित्रासनीं बैसते सर्व झाले. ।
[13]सुधर्मा सभा [14]नाकलोकीं विराजे तसी [15]संसदी भूतळीं दिव्य साजे. ॥ २६

रत्नस्तंभविराजमान मढिल्या भिंती [16]विचित्रांबरीं,
चौरंगावरि [17]उत्तरच्छद निके दिव्यो[18]पधानें बरीं. ।
वाद्यें वाजति, भाट गाति बिरुदें श्री**कृ**ष्णलीला मुखें,
नेत्रीं देखति सोहळा सुर उभे राहोनियां सन्मुखें. ॥ २७

---

१. समुद्रमथनसमयीं निघालेल्या चौदा रत्नांपैकीं एक, उच्चैःश्रवा. हा अत्युत्तम अश्व होता. याचे कान (श्रव) उच्च होते म्हणून याला उच्चैःश्रवा असें नांव पडलें. हा इंद्राचा अश्व होय. २. कमलनेत्राचा. (कृष्णाचा.) ३. हलायुध=नांगर धरणारा. (बलराम.) बळरामाचीं आयुधें हल मुसल असल्यामुळें त्याला 'अमरकोशां'त हली सीरपाणी मुसली हलायुध अशीं नांवें दिलेलीं आढळतात. 'बलभद्रः प्रलंबघ्नो बलदेवोऽच्युताग्रजः । रेवतीरमणो रामः कामपालो हलायुधः ॥ नीलाम्बरो रौहिणेयस्तालांको मुसली हली । संकर्षणः सीरपाणिः कालिंदीभेदनो बलः ॥' ४. या पद्याचें वृत्त 'पंचचामर'. याचें लक्षण:–प्रमाणिकापदद्वयं वदंति पंचचामरम्.' किंवा 'जरौ जरौ ततो जगौ च पंचचामरं वदेत्.' याच्या प्रत्येक पादांत ज, र, ज, र, ज, ग, अशीं अक्षरें येतात. यांत प्रत्येक चवथ्या अथवा आठव्या अक्षरावर यति असतो. ५. अगणित चंद्रांच्या प्रकाशाचा लोप करणाऱ्या (दीपिका). ६. 'अलौकिका' असा अन्यपाठ ७. 'हें अष्टदलकमलबंधांचें' उदाहरण होय. ८. चवाठे आदिकरून. ९. गल्ल्या. १०. वेदियुक्त. ११. वेश्या. १२. निश्चयें. १३. सुधर्मन्=देवांची सभा. १४. स्वर्गीं. १५. सभा. १६. अंबर=वस्त्र. १७. आच्छादन. १८. दिव्य+उपधान=शोभायमान+गिरद्या.

[1]वसुदेव पूजन करी नवरीचें, मनिं वांछिती [2]सुरवधू यश जीचें; ।
[3]मधुपर्क वेदविधिपूर्वक केला, फल वाहिलें नृपवरें [4]नृपजेला. ॥ २८
अलंकार वस्त्रें नवीनें विचित्रें, [5]सुने वाहिलीं यादवेंद्रें पवित्रें; ।
उपाध्या दिलीं [6]कोटिरत्नें अपारें सुवर्णांबरें दिव्य नानाप्रकारें. ॥ २९

'आली लग्नघडी' पुरोहित म्हणे, 'आतां करा [7]तांतडी.'
वस्त्रें नेसविलीं सुगंध[8]सुमनें वाहोनियां आवडी. ।
माड्याच्या घडिया तयां वधुवरां पायांतळीं घातल्या
नांदी काढुनि [9]अंत्रपाट धरिला मंत्रध्वनी लागल्या. ॥ ३०

श्रीवत्सांकित भूषणें तुळसिचीं, [10]आपाद माळा रुळे,
माथां रत्नकिरीट, कौस्तुभ गळां, सूर्यप्रभे नातुळे; ।
केयूरांगद कुंडलें सु[11]रशना हस्तांबुजीं आयुधें,
लक्ष्मीयुक्त मुरारि तो वधुवरां कुर्वंतु वो मंगलम्. ॥ ३१

[12]लक्ष्मी कौस्तुभ [13]पांचजन्य धनु हें अंगीकरी श्रीहरी,
रंभा कुंजर पारिजातक सुधा देवेंद्र हें आवरी; ।
दैत्यां प्राप्त [14]सुरा, [15]विधू विष हरा, उच्चैःश्रवा भास्करा,
[16]धेनू [17]वैद्य, वधूवरांसि [18]चवदा कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३२

इंद्रश्चंद्र कुबेर वायु निऋती ब्रह्मा [19]कवी दिक्पती,
सिद्धाश्चारण यक्ष गुह्यक रवी [20]हाहा हुहू वाक्पती ।
गंधर्वादि मरुद्गणा सुरमुनी किन्नार शे[21]षोरगी,
ईशानाग्नि [22]जलेंद्र हे वधुवरां कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३३

गंगा भागिरथी कलिंदतनया मंदाकिनी संगमीं,
कावेरी सरयू सरस्वति शिवा कृष्णा पयोष्णी नमीं. ।

---

१. या पद्याचें वृत्त 'कलहंस.' २. देवांगना. ३. मधुपर्क—विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां पादप्रक्षालनादि करून मध, तूप आणि दहीं हीं मिश्रित करून त्यास समर्पून गंध वस्त्र इत्यादिकांनीं याची पूजा करणें या विधीला 'मधुपर्क' म्हणतात. ४. रुक्मिणीला. ५. सुनेला. ६. 'दिव्यरत्नें' असा अन्य पाठ. ७. त्वरा, घाई. ८. पुष्पें. ९. अंत्रपाट—अंतःपट, विवाहकालीं वधूवरांमध्यें जो पडदा धरतात तो. १०. पायघोळ. ११. कमरपट्टा. १२. 'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा' इत्यादि मंगलाष्टक सुप्रसिद्ध आहे. १३. विष्णूचा शंख. ['शंखो लक्ष्मीपतेः पांचजन्यः' इत्यमरः. पंचजन दैत्याच्या हाडापासून झालेला म्हणून पांचजन्य.] १४. मद्य. १५. चंद्र. १६. कामधेनु. १७. धन्वंतरि. १८. चवदा रत्नें. १९. बृहस्पति. २०. गंधर्वविशेष. २१. उरग=साप. २२. वरुण.

रेवा गंडकि कौशिका प्रवरदा भोगावती गोमती,
सिंधू धर्मक शोणभद्र शिव हे, कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३४
काशी कांचि अवंतिका मधुपुरी माया अयोध्या बरी,
श्रीमद्द्वारवती [1]सुपुण्यजनका विख्यात पृथ्वीवरी; ।
क्षेत्रें धर्मपरायणें अनुपमें जीं वर्णिलीं कौतुकीं
तीं कल्याण वधूवरांसि इतुकीं, कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३५
[2]मत्स्यः [3]कूर्म तथा [4]वराह, [5]नृहरी चौथा, [6]बटू पंचमा,
श्रीमद्भार्गवराम राघव हरी बौद्ध्या कलंकी नमा; ।
हे दाहा अवतार भूर्भुवधरा पाताळिंचे भूपती,
संरक्षूत वधूवरांसि सुमती, कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३६
आतां सावध सावधान समयो साधा समीपें असे,
[7]वाग्दानासि करा पलार्ध घटिका संपूर्ण आली असे. ।
भावें सद्गुरुचें [8]पदांबुज धरा चित्तीं, स्मरा सादरा,
दोंपक्षीं [9]कुलदेवता वधुवरां, कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३७
[10]लक्ष्मीकांतपदारविंद हृदयीं भावें स्मरा यापरी,
बोले सद्गुरु सावधान, समयीं राहोति वाजंतरी. ।
होती मंगलघोष ते द्विजमुखें, संपूर्ण झाली [11]घडी,
सोडा अंतरपाट हा, वधुवरां कुर्यात् सदा मंगलम्. ॥ ३८
ॐपुण्य शब्द म्हणतां वधु शीघ्र पाहे, दिव्याक्षता यदुविरावरि टाकिताहे, ।
घाली हरी वधुवरी शुचिअक्षतांसी गर्जेति मंगळतुरें [12]सुरनिर्जरांसीं. ॥ ३९
[13]पश्चिमाभिमुख नोवरी बसे, प्राग्दिशीं सुमुख नोवरा बसे, ।
[14]वोहरें [15]सुतविलीं सुलक्षणें बांधिलीं उभयतांसि [16]कंकणें. ॥ ४०

---

१. पुण्यप्रद. 'अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका । पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥.' या सात पुरी मोक्ष देणाऱ्या होत असें वर्णन आहे. २. हें संस्कृताप्रमाणें प्रथमेचें एकवचन आहे. ३. कांसव. ४. डुकर. (यज्ञवराहावतार.) ५. नृसिंह. ६. वामन. ७. वाग्दान=वाग्निश्चय. मी आपली मुलगी तुमचे मुलास देतों, अथवा तुमची मुलगी आपल्या मुलास करतों एतन्निश्चयप्रधान एक विवाहांग कर्म आहे त्यास 'वाग्दान' असें म्हणतात. ८. चरणकमल. ९. कुलाचें संरक्षण करणारी अधिष्ठात्री देवता. १०. विष्णुचरणकमळ. ११. लग्नघटिका भरली. १२. सुर=देव=निर्जर. 'सुर निर्जर' पदाची योजना पुनरुक्तिदोषमूलक होय. १३. या श्लोकाचें वृत्त 'रथोद्धता' आहे. १४. वधुवरें. १५. सुतानें गुंडाळिलीं. १६. कंकण–कांकण, यज्ञांत किंवा विवाहांत मंत्रून मनगटास दोरा बांधितात तें.

धनें जिरें वायन [1]झालि यानें, वधू कडे घेतलि नोवऱ्यानें, ।
शिंपावया [2]आम्र निघे **मुरारी**, [3]कपाट देती मग राजनारी. ॥ ४१
नांवें घेवविलीं, तदां गदगदां राजांगना हांसती,
केलें मुक्त कपाट, वाट दिधली, गेला पुढें **श्री**पती, ।
[4]श्री**गौरीहर** पूजिला वधुवरीं आम्रद्रुमा सिंचिलें,
आलीं बाहिर वैदिकें मग निकें होमासि संपादिलें. ॥ ४२
असें झालें [5]पाणिग्रहण विधिनें [6]सप्तपदिचें,
वराचे [7]वामांगीं मिरवत वधू, [8]रूप **रति**चें. ।
'दिजे आज्ञा' रायाप्रति **हरि** म्हणे 'जाउं सदना.'
प्रभू प्रार्थी, 'कीजे मम भवनिं [9]चातुर्थहवना'. ॥ ४३
आले [10]कर्ण पिळावयास **हरि**चे चौघे निके मेहुणे,
भीती **रुक्म** विटंबिला म्हणउनी श्री**कृष्ण** जाणे खुणे, ।

---

१. झालि=झाल=परडी. विवाहांत या झालींत (वंशपात्रांत) पिठाचे दिवे, फळें इत्यादि पदार्थ घालून कन्यादात्यानें तिची यथाविधि पूजा करून ती वराच्या मातेला किंवा तिच्या स्थानीं जी कोणी असेल तिला देण्याची चाल आहे, या झालीस 'ऐरिणी' असें म्हणतात आणि या आचारास 'ऐरिणी-पूजन' असें नांव आहे. २. देवकाच्या सुपांत मांडलेल्या आम्रपत्रांवर पाणी शिंपडावें—असा विधि आहे. ३. दार बंद करतात. ४. श्रीगौरी=पार्वती, शिवपत्नी, हर=शिव. ५. विवाह. ६. नवऱ्यानें नवरीचा हात धरून जे तांदुळाचे सात पुंज ओलांडितात तिचें. [सप्तपदी (सात पदांचा समुदाय). अग्नीच्या उत्तरभागीं तांदुळांचे सात पुंज घातलेले असतात त्यांवरून प्रथम वधूनें व तिच्या मागून वरानें पाय देऊन सात पावलांपर्यंत मंत्र म्हणत जाण्याचा एक विवाहांत मुख्य विधि आहे. या प्रत्येक पावलाच्या वेळीं जे मंत्र म्हणतात त्यांचा भावार्थ असा—(१) प्राशनापुरता, (२) अन्नापुरता, (३) धनधान्यापुरता, (४) आरोग्यापुरता, (५) प्रजोत्पादनापुरता, (६) ऋतुकार्यापुरता आणि (७) संवगडीपणाचा (मित्रपणाचा) तुझा माझा संबंध झाला. हा विधि झाला म्हणजे कन्यादान कायम झालें असें समजतात.] ७. वामांग हेंच पत्नीचें बसण्याचें स्थान होय. ८. लावण्य. ९. चतुर्थी होम—(चतुर्थ हवन). हा होम केल्यानें पतीचा पत्नीशीं समागम होऊन ती त्याची होते. याविषयीं वचन आहे तें:—'चतुर्थीहोममंत्रेण त्वग्मांसहृदयेंद्रियैः । भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा सा भवेदिति. ॥' याचा भावार्थ:—चतुर्थी होमानें त्वचा मांस हृदय आणि इंद्रियें यांच्यायोगें पत्नी भर्त्याशीं संयोग पावते आणि त्याच्या गोत्राची होते. (त्याच्या गोत्रांत मिळून जाते.) भीमक राजा चतुर्थ होम करून जावें असा कृष्णास आग्रह करीत आहे यावरून वधू विवाहसमयीं पर्याप्तयौवना असावी असें दिसतें. या गोष्टीचा विचार सामाजिक सुधारणा करणाऱ्यांनीं अवश्य केला पाहिजे. १०. मेव्हण्यानें वराचे कान पिळावे व त्याबद्दल त्याला पागोटें इत्यादि द्यावें हा एक देशीय आचार आहे. देशस्थांत हा प्रचलित आहे.

त्यातें गौरविलें, निशा क्रमिलिया प्रातर्विधी सारिला.
राजा शुद्धमतीस हास्यवदनें अत्यादरें बोलिला. ॥ ४४
‘भोवल्या कळस देवकीकरीं, मूळ जाय तिजला त्वरा करीं[1]; ।
रोहिणी[2]प्रमुख मंदवादिनी[3] मंडपा विहिणि आणि या दिनीं.’ ॥ ४५
राजांगना[4] तदुपरी गजरें निघाली,
श्रीकृष्णमंडपगृहाप्रति शीघ्र आली. ।
प्रार्थूनियां मग तईं वसुदेवजाया
त्या आणिल्या सुनमुखांबुज[5] हो पहाया. ॥ ४६
अंकावरी नवरि घेउनि रूप पाहे,
त्यानंतरें कळस भोवलि तीस वाहे; ।
झालें असें हळदिचें उटणें प्रभावें
त्या वोहरांकडुनि[6] घेववितातिनावें. ॥ ४७
कदंबाभिधानें[7] असे तीर्थ जेथें, तरू मंडपाकार अद्यापि तेथें. ।
महीपाळ[8] आमंत्रणातें निघाला, विवाहि[9] स्वधामासि घेऊनि आला.॥ ४८
घातलीं सकळिकांसि आसनें, मांडलीं कनकरत्नभांजनें[10]. ।
भोजनासि मग पंक्ति बैसली, ते सभा वधुवरीं विराजली[11]. ॥ ४९
लवणमिरकुटाचीं रायतीं[12] एकहारी,
सुरण लवणशाखा आणिती दिव्य नारी. ।
कुवलयदलनेत्रा[13] वाढिती पूर्ण तोषें,
रुणझुणति पदाब्जीं नूपुरें[14] मंदघोषें. ॥ ५०

---

१. भीमकराजा आपल्या पत्नीस म्हणाला, ‘देवकी वगैरे विहिणींना तूं मूळ जाय (बोलावणें जा) आणि त्वरा कर. देवकीच्या हातीं भोवल्या कळस दे. या दिनीं (आजच्या दिवशीं) रोहिणी (देवकीची सवत) वगैरे मृदुभाषणी विहिणींना आण=घेउन ये.’ भोवल्या कळस=भोवल्या (बहुल्या)च्या चार बाजूस ज्या उतरंडी (वह्या) रचतात त्यावर ठेवण्याचीं लहान भांडीं असतात तीं कळस होत. सुनमुखानंतर दोहोंकडच्या विहिणी एकमेकींस ह्या वह्या व कळस यांचें वाण देत असतात. हा आचार आहे. शास्त्र नाहीं. त्याला उद्देशून ४५ व ४७ श्लोकांत भोवल्या कळसाचा उपयोग केला आहे. (भोवलें=बहुलें.) २. रोहिणी=ही वसुदेवाची पत्नी आणि बळरामाची जननी. ३. मंजुभाषिणी. ४. भीमकपत्नी. ५. सुनेचें मुखकमल. ६. वधूवरांकडून. ७. कदंब या नांवाचें. (अभिधान=नाम.) ८. भीमकराजा. ९. विवाहांतील मंडळीस. १०. पात्रें. ११. शोभली. १२. रायतीं—रायतें=आलें, आंबे, आंवळे इ० पदार्थांस दहीं, मोहरी इ० पदार्थ घालून तोंडीं लावणें करितात तें. १३. कमलपत्रनयना. १४. नूपुरें—नूपुर—घुंगरूं, तोरड्या, पैंजण.

निंबें आम्रफलें रसाळ गजरें मूळे तथा भोंकरें,
आलें आंवळिचीं फळें पचविलीं बेलें[1] किती सुंदरें. ।
सुस्वादिष्ट कुशुंबरी अनुपमा पात्रांतरीं राजती,
वृंताकें[2] प्रमुखें प्रभावळि[3] महाशाखांचिया शोभती. ॥ ९१
पात्रीं ओर्दन[4] वाढिलें, लखलखी जैसा शरच्चंद्रमा
क्षीरी, पंचवरान्न[5] पापड वडे लाडू यथानुक्रमा, ।
मांडे तेलवऱ्या बऱ्या गुळवऱ्या घाऱ्या पुऱ्या फेनिया,
संतृप्तें घृतशर्करा पयदधी संपूर्ण हे झालिया. ॥ ९२
नाना सुगंध उदकें भरिलीं सुपात्रें,
आपोषणें[6] करिति सर्व पलार्धमात्रें; ।
प्राणाहुती[7] करुनि सारिति भोजनातें
विज्ञप्ति भूभुज[8] करी प्रभु यादवातें. ॥ ९३
लेह्य[9] पेय[10] चोष्य[11] खाद्य भक्ष्य भोज्य[12] आणिलें,
जें जयासि आवडे तयासि तेंच वाढिलें, ।
प्रीतिपाद्य[13] बद्धहस्त कौंडणेश[14] लौंघवी[15]
'स्वस्थचित्त जेविजे' विवाहियांसि[16] वीनवी. ॥ ९४
सभापंक्तिस्थानीं भ्रमति नव योषा[17] सुगरणी[18],
तयांमध्यें राणि प्रियकर विराजे मुखरणी[19], ।
रसाळे आंब्यांचे रस मधुर वाढीति विहिणी,
सुपक्कां केळ्यांच्या रुचिकर अमूपा[20] शिखरिणी[21]. ॥ ९५

---

१. बेलफलें. २. वांगीं, भटा. ३. सुंदर रांगा. ४. भात. ५. पंचवरान्न=पंचपक्कान्न=घीवर, लाडू, खाजी, जिलबी, आणि गुळोरी. येथें क्षीरी पंच, वरान्न-अशीं पदें पाडावीं हें प्रशस्त होय. पंच क्षीरी-पांच प्रकारच्या खिरी-(१) नखुल्यांची (२) बोटव्यांची (३) शेवयांची (४) मालत्याची आणि (५) सरोळ्यांची. वरान्न=वरण. ६. आपोषण=आपोशान या शब्दाचा हा अपभ्रंश आहे. भोजनाचे प्रारंभीं व अंतीं तळहातावर उदक घेऊन मंत्र म्हणून प्राशन करणें याला 'आपोशान' म्हणतात. 'अमृतोपस्तरणमसि स्वाहा' आणि 'अमृतापिधानमसि स्वाहा' असे मंत्र आरंभीं व अंतीं म्हणतात. ७. पंच प्राणांस भोजनसमयीं दिलेली आहुति. ८. राजा. ९. लेह्य=चाटून खाण्याजोगें-क्षिप्रादि. १०. पेय=पिण्याजोगें-दुग्धादि. ११. चोष्य=चुंफून खाण्याजोगें-पक्क आम्रफलादि. १२. भोज्य-ओदनादि. १३. प्रेमभावानें. १४. कुंड़िननगराधिप. (भीमक.) १५. शाहणा, चतुर, गोड बोलून आपलें काम करून घेणारा. १६. व्याहीमंडळास. १७. स्त्रिया. १८. सुगरीण-स्वैंपाकांत चतुर अशा स्त्रिया. १९. प्रमुख. २०. पुष्कळ. २१. शिकरण.

[1]स्वस्थ संपादिलीं भोजनें मांडवीं, [2]उत्तरापोशणें घेतलीं **याद**वीं; ।
दिव्य तांबूल दे भूप त्यांकारणें, पुष्पगंधाक्षता अंबरें भूषणें. ॥ ९६
सभे बैसले सर्व आनंदरूपें, [3]किजे [4]ऐरणीपूजनालागिं भूपें. ।
दिलीं अंबरें भूषणें दिव्य रत्नें, नृपें अर्जिलीं जीं [5]यशोदार यत्नें. ॥ ९७
शिरीं [6]झालि तैं [7]आफळी व्याहियांचे, [8]हलीनोवरानोवरी**याद**वांचे ।
[9]वंदे **दे**वकी**रे**वती**रो**हिणीसीं करी प्रार्थना घेउनी **रु**क्मिणीसी. ॥ ९८
म्हणे, '[10]अष्टवर्षा भवेत् कन्यका या, इची लागलीसे सुताहूनि माया; ।
तुम्हां दीधली पुत्रवंतीस पाळा' वधू [11]स्फुंदतां [12]बाष्प येती [13]भुपाळा. ॥ ९९
[14]धेंडो नाचविला, स्वधर्म कुळिंचा संपूर्ण संपादिला,
केला होम चतुर्थ, **गौ**रिहर तो [15]श्रीवोहरीं पूजिला; ।
[16]देवोत्थापन [17]भोपैया [18]भुतविला, भूपाळ पाचारिला,
आज्ञा मागितली स्वमंडपगृहा श्री**कृ**ष्णजी चालिला. ॥ ६०

---

१. या श्लोकाचें वृत्त 'स्रग्विणी.' याच्या प्रत्येक चरणांत चार रगण असतात. २. भोजनानंतरचें आपोशान. ३. करी. ४. ऐरिणीपूजन हा विधि विवाहाच्या चवथ्या दिवसीं करतात. यांत वधू-वरांच्या वंशवर्धनार्थ कन्यापिता वरमातेस ऐरिणी दान देतो. तसेंच तिला व तत्पक्षीय स्त्रीपुरुषांस लुगडीं, चोळ्या, धोतरजोडे, शेल इत्यादि यथाशक्ति देतो. ऐरिणीचें पूजन करून ती वरमातेस देतो, तेव्हां जे श्लोक म्हणतात त्यांतील एकाचा अर्थ:—ही पुत्रासारखी पाळलेली सात वर्षांची कन्या तुझ्या पुत्रास दिली आहे, तर तूं आतां तिचें प्रेमानें पालन कर. इतकें झाल्यावर उभयपक्षीय सुवासिनी एकमेकीस वायनें देतात. ५. यशोदार=यशानें भव्य किंवा उत्कृष्ट. ['यशोदार' हें 'अंबरें' याचें विशेषण समजावें.] ६. झालि=झाल=चौकोनी परडी. हिचा उपयोग ऐरणीपूजनसमयीं करतात. ७. धरी. ८. बळराम. ९. भीमक राजा वदे. १०. हा श्लोक असा आहे:—'सप्तवर्षा त्वियं कन्या पुत्रवत्पालिता मया। इदानीं तव पुत्राय दत्ता स्नेहेन पाल्यताम् ॥.' ११. स्फुंदली तेव्हां. १२. रोदनोदक. १३. 'भूपाळा' असा शब्द असून वृत्तसुखार्थ 'भुपाळा' असा ऱ्हस्व केला आहे. १४. धेंडा किंवा झेंडा—मध्यप्रदेश व वऱ्हाड यांतील देशस्थ महाराष्ट्रीयांत झेंड्याचा उपनयन-विवाहादी मंगलकार्यांत मांडवपरतणीच्या दिवशीं एक कुलाचार करित असतात. ज्याचें कार्य होईल त्या मुलाला (मौंजीसमयीं) किंवा नववधूवरास (विवाहप्रसंगीं) न्हावी (म्हाली) कडेवर किंवा दोहों कडांवर घेऊन नाचतो. यालाच 'धेंडा नाचविला' असें येथें म्हटलें आहे, [धेंडा=नाचणारा पुरुष. वधू वराच्या घरीं ज्या दिवशीं जाते त्या दिवशीं धेंडा तिला कडेवर घेऊन नाचतो—असाही प्रकार आहे.] कोंकणस्थांत जसा बोडणाचा किंवा गोंधळाचा कुलाचार आहे तसाच हा देशस्थांत आहे. गोंधळ तर देशस्थांत सर्वत्र कुलाचार आहे. १५. वधूवरांनीं. १६. देवकोत्थापन=कार्यांतीं देवक उठवून मंडप सोडून टाकण्याचा विधि. यजमान व यजमानपत्नी यांनीं देवकाच्या सुपांत ठेवलेल्या पानांवर पाणी शिंपडून त्यांची पूजा करून, देवतांची प्रार्थना करून त्यांस 'सहा सहा महिन्यांनीं

गजस्कंधारूढें मणिचवरडोला वधुवरें,
पुढें नाना वाद्यें ध्वनित चमु वेष्टीत गजरें; ।
निजस्थाना आले, गृह भरुनि, लक्ष्मीस नमिलें,
समारंभें द्वारावतिस उभ येताति नवलें. ॥ ६१
पुन्हा वर्णूं द्वारावति तरि दिवाळी सण सदां,
दरिद्राची वार्ता न करिति पुरींचे जन कदां. ।

---

पुन: आमच्या घरीं या' इत्यादि प्रकार या समयीं होतो. १७. भोपया=भूपया=भोप्या=भवानीचा भक्त. निरनिराळ्या देवतांच्या उपाध्यायांस निरनिराळीं नांवें आहेत, क्षेत्रोपाध्यायांचीं ही नांवें निरनिराळीं आहेत. पंढरपुरचे विठोबाचे बडवे, तुळजापुरच्या भवानीचे भूते, आंब्याच्या जोगाईचे भोप्ये, रामटेकचे रामाचे पंडये, प्रयागचे प्रयागवळ, वगैरे. वाघ्या, मुरळी, भावकाई, भगतिण, जोगतीण, वगैरे हीं भक्तांचीं नांवें आहेत. १८. भोपया भुतविला=भोप्याच्या अंगीं वारें आणविलें. भोपया भुतविणें=देव संचार करविणें, अंगांत आणविणें, 'भाव' आणविणें. हाही एक कुलाचार आहे. ज्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या अंगीं देवतासंचार होतो अशा पुरुषास किंवा स्त्रीस बोलावून आणून त्याच्या किंवा तिच्या इष्टदेवतेचा **मांड** केला असतां, त्या देवतेचा अंगांत संचार होतो, त्या प्रकाराला येथें **भूतविणें** म्हटलें आहे. उदाहरणार्थ–बोडणांत कांहीं स्त्रियांचे अंगीं देवीचा संचार होतो. कांहीं मंगलकार्यें घरांत झाल्यावर अशासारखे कुलाचार (उदाहरणार्थ–गोंधळ, बोडण, डवरा वगैरे) करणें आवश्यक आहेत. हा प्रकार महाराष्ट्रीयांचा झाला. इतर प्रांतस्थांत इतर प्रकारचे कुलाचार, देशाचार आहेत त्यांस 'नेगं,' 'रसूम' अशीं नांवें आहेत. 'भुतविणें' हा 'भूत' नामापासून झालेला नामधातु.

१. दिवाळी—हा शब्द 'दीपावलि' ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. दीपावलि शब्द, दीप म्हणजे दिवा आणि आवलि म्हणजे ओळ–पंगत, ह्या शब्दांच्या संयोगापासून झाला आहे. हा दिवाळीचा सण एकंदर पांच दिवसांचा आहे, असें मानितात. ह्यांतला पहिला दिवस आश्विन वद्य त्रयोदशी होय. तिलाच 'धनत्रयोदशी' असें म्हणतात; अजाण लोक 'धनतेरस' म्हणतात. हा दिवस आणि पुढचे दोन दिवस–म्हणजे चतुर्दशी आणि अमावास्या—ह्यांस सण मानण्याचा परिपाठ कशावरून पडला, ह्याच्या ज्या कथा आहेत, त्यांत एक मुख्य अशी आहे कीं, कोणेएके काळीं, देवांचा अपमान करण्याकरितां, दैत्यांचा राजा भौमासुर, प्राग्ज्योतिषपुरीमध्यें राज्य करीत होता, त्यानें देवमाता अदिति हिचीं भूषणें चोरून नेलीं; त्यावरून उभय पक्षांचें तुमुल युद्ध झालें; आणि त्यामध्यें आश्विन वद्य त्रयोदशीच्या रात्रीं, सत्यभामेच्या हातून भौमासुराचा पराभव होऊन, देवांचा जय झाला. त्या प्रसंगीं, भौमासुर समरांगणामध्यें मरणोन्मुख होऊन पडला; आणि, आपल्या उद्धारार्थ गोपालकृष्णास शरण आला. तेव्हां, त्यानें कृपादृष्टीनें त्याचा उद्धार केला; आणि त्याला असा वर दिला कीं, ह्या तीन दिवशीं तुझ्या प्रीत्यर्थ सर्व लोक दीपोत्सव करितील. तेव्हां पासून हा दीपोत्सवाचा परिपाठ चालला आहे. आणखी एक कथा अशी आहे कीं, दैत्यांचा राजा बळी हा आपल्या तपाच्या सामर्थ्यानें अत्यंत प्रबल झाला; आणि त्यानें इंद्रपद देखील घेऊन देवांस अरण्यवासास लाविलें. तेव्हां, भगवंतांनीं वामनावतार घेऊन बळीजवळ तीन पावलें भूमि मा-

सुवर्णाचीं पद्में झळकति महारत्ननिकरें,
सडे [१]काश्मीराचे [२]विशद गुडियादीक मखरें. ॥ ६२
हली श्रीहरीचा सखा ज्येष्ठ भाऊ, तथा रेवती रुक्मिणी होय [३]जाऊ, ।
जिचा कृष्ण भर्तार विश्वैकतारू निरोपी तितें सर्व संसारतारू. ॥ ६३
विधाता निघंटांत एकाक्षरीया, घृत क्षीर सासू म्हणे पी करीं या. ।
सुनेला पुसे, 'पूर्ण घालीसि बाई!' वदे रुक्मिणी, 'तृप्त मी आतबाई.'॥६४
पुरी द्वारकेमाजि आनंद गाजे, [४]गृहस्थाश्रमीं कृष्ण लक्ष्मी विराजे. ।
[५]टिका श्लोक आख्यान संपूर्ण झालें, शुकाच्या मुखें वाक्य ऐसें निघालें.॥६५

---

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित.)

[६]आनंदाब्दक शालिवाहन शके [७]षण्णंदबाणक्षमा,
मासांचा [८]नृप मार्गशीर्षक महा बोले कवी सत्तमा. ।

---

गून घेतली. आणि मग विराटस्वरूप धारण करून, बळीच्या मस्तकावर पाय देऊन, त्यास पाताळीं घातलें; आणि देवांचें राज्य देवांस दिलें. ही गोष्ट आश्विन वद्य त्रयोदशीस झाली; पुढें दोन तीन दिवसांत सगळे देव त्याच्या बंदींतून सुटून स्वस्थानीं गेले. लक्ष्मी क्षीरसागरीं जाऊन स्वस्थ राहिली. म्हणूनच त्या दिवशीं लक्ष्मीपूजन करण्याचा परिपाठ पडला आहे. पांचवा म्हणजे शेवटचा दिवस भाऊबिजेचा. तो कार्तिक शुद्ध द्वितीयेस पडतो. त्या द्वितीयेस 'यमद्वितीया' म्हणतात. त्याची उपपत्ति अशी सांगितली आहे कीं, यमुना आणि यम हीं बहीणभावंडें होतीं. यम दक्षिणदिशेस आपल्या राज्यावर आणि यमुना ही उत्तरेस आपल्या पतीच्या गृहीं असल्यामुळें, फार दिवस त्यांची भेट झाली नव्हती; आणि एकमेकांवर त्यांची प्रीति अतिशयित होती. म्हणून, यमराज, आपल्या भगिनीस भेटण्याकरितां तिच्या येथें गेले, आणि तेथें तिनें त्यांचा आदरसत्कार उत्तम प्रकारें करून मोठा उत्सव केला; आणि तिला यमराजांनीं नानाप्रकारचीं मोलवान वस्त्राभरणें देऊन संतुष्ट केलें; ही गोष्ट कार्तिक शुद्ध द्वितीयेस घडली; आणि ती त्या उभयतां बहीणभावंडांस अत्यंत लाभदायक झाली. तेव्हांपासून हा भाऊबिजेच्या सणाचा परिपाठ पडला. अशी ह्या सणाची उपपत्ति प्राचीन ग्रंथांवरून कळते. ('दिवाळी.' पृष्ठ ३-५.)

१. केशराचे. ['काश्मीरं कुंकुमेऽपि स्याट्टंकपुष्करमूलयोः' इति मेदिनी.] २. स्वच्छ. ३. यातृ=जाऊ. ४. गृहस्थाश्रम=चार आश्रमांपैकीं एक. [ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम मानिले आहेत.] ५. येथें छंदोभंग न व्हावा म्हणून 'टी' हें अक्षर कवीनें लघु घातलें आहे. ६. आनंद+अब्दक=आनंदनामक+वर्ष, संवत्सर. ७. षट्=सहा; नंद=कुबेराच्या नऊ निधींपैकीं एक=९; बाण=मदनाचे बाण पांच. 'अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥' अथवा 'उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंच

श्रीमत्कौशिकगोत्र, वस्ति नगरी गौरीपुरी जाणिजे,
मुख्य स्थानक बीड नीडतरफेमध्यें नृपें राहिजे. ॥ १
'श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर' निकें संपूर्ण हें वाचिजे,
ऋग्वेदोत्तम आश्वलायन महाशाखांबुधी जाणिजे, ।
वर्णी विठ्ठल दुग्धसागरकुलालंकारचूडामणी,
पद्यें प्राकृत सप्त सर्ग तिनशें त्रेपन्न चिंतामणी. ॥ २

## विद्वज्जीवन.

### उल्लास पहिला.

(श्लोक.)

कमलनयन कान्हा जो उभा कुंजशाई
मुरलिमधुरनादें जो वळी लक्ष गाई; ।

वाणाः प्रकीर्तिताः ।।' =५; क्षमा=पृथ्वी=१=१५९६. हा विठ्ठल कवि छत्रपति शिवाजी महाराजांचे वेळीं होऊन गेला असें शके १५९६ वां वरून होतें. ८. येथें मार्गशीर्ष मासाला मासांचा राजा असें म्हटलें आहे. भगवद्गीतेंतही 'मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः' [अध्याय १० श्लोक ३५] असें या मासाचें प्रधानत्व वर्णिलें आहे. अमरकोशांतही 'मार्गशीर्षे सहा मार्ग आग्रहायणिकश्च सः' या श्लोकांत याच मासाचें प्रथमतः वर्णन आहे. कदाचित् प्राचीनकाळीं मार्गशीर्ष हा वर्षाच्या आरंभींचा मास असावा, असें अनुमान यावरून कित्येक विद्वानांनीं काढिलें आहे. हा मास समशीतोष्ण असल्यामुळें यास प्रथम स्थान दिलें असें मधुसूदनकृत गीतेवरील टीकेंत दर्शविलें आहे.

१. हा कवि बीड शहरानजीक गौरीपूर येथील राहणारा. हा जातीनें ऋग्वेदी ब्राह्मण असून त्याचें गोत्र कौशिक होतें. यानें 'सीतास्वयंवर' काव्याच्या अखेरीस आपला थोडकासा वृत्तांत दिला आहे. [पृष्ठ ६४ श्लोक, ४६-४७ पहा.] २. जाणावें. ३. बीड हा गांव मोगलाई हद्दींत पैठणापासून आग्नेयेस सुमारें २५ कोसांवर बेंडसुरा नामक लहानशा नदीच्या तिरीं आहे, हें गांव याच नांवाच्या जिल्ह्याची मुख्य जागा आहे. येथें शेंदोनशें ब्राह्मणांचीं घरें असून कलाबतू तयार करण्याचें काम चांगलें चालतें. ४. वाचावें. ५. सोमवंशकुलदीपक. ६. येथें 'प्राकृत' याचा अर्थ 'मराठी' असा आहे. पंतांनींही 'प्राकृतसंस्कृतमिश्रित' इत्यादि स्थलीं या शब्दाचा उपयोग 'मराठी' या अर्थानें केला आहे. ७. या काव्यांत सात सर्ग असून तीनशें त्रेपन्न श्लोक आहेत. ८. या काव्यास 'विद्वज्जीवन' असें नांव देण्याचें कारण, कवीच्या मतें हें काव्य विद्वान् लोकांच्या जीवितास आधारभूत होय असें बहुधा असावें. याच्या पठनानें विद्वानांस आनंद होईल अशी याची रचना आहे असा कवीचा अभिप्राय दिसतो. विठ्ठलाच्या इतर काव्यांप्रमाणें याचेही सात उल्लास (सर्ग) आहेत. यांत पौराणिक कथांचें वर्णन असून अनेक वृत्तांची योजना कवीनें केली आहे. ९. कृष्ण. १०. मुरलीच्या गोड स्वरानें. 'मुरलिअधरनादें' असा पाठ मानिल्यास मुरलीच्या आणि मुखाच्या आवाजानें असा अर्थ करावा. ११. वळवितो. १२. 'नंद गाई' असाही पाठ आहे.

[1]शतहिमरुचि लोपे गोपिकामध्यभागीं,
    हृदयिं धरि मना! तूं [2]लुब्ध जो रासरंगीं. ॥ १
[3]हरित वसन [4]कांसे कोटिविद्युत्प्रकाशें
    [5]नटवरवपु भासे रासरंगीं [6]उभासे, ।
गवळणि गुण वाचें वर्णिती माधवाचे,
    [7]हरित मन जनाचें [8]मालिनीमाजि नाचे. ॥ २
[9]कर्णीं रत्नमणी [10]मृगांक [11]तरणी तेजोप मोठें गणी,
    केयूरें रमणीय कौस्तुभमणी [12]कांसे झणत्किंकिणी ।
[13]सौवर्णाभरणीं मनोहर मणी जो [14]शोभला भूषणीं,
    तो खेळे तरुणीसवें [15]शिशुगणीं [16]गोपाळचूडामणी. ॥ ३
माया पिच्छ जटीं विचित्र मुगुटीं रत्नें महा गोमटीं,
    कांसे [17]पीत घटी मणी मणगटी मूर्ति स्वयें धाकुटी; ।
[18]वंशी [19]वोष्ठपुटीं सुरेख मुकुटी खेळे कलिंदीतटीं,
    भक्तीतें प्रगटी; अभक्त [20]निवटी, [21]स्वस्थान दे शेवटीं. ॥ ४
कांसे [22]सोनसळा दिसे [23]झळफळा रंगीत माळा [24]गळां
    [25]भाळीं पीत टिळा [26]नवीन विपुळा माळा गळां पुष्कळा, ।
कानीं पद्मकळा [27]प्रफुल्ल सकळां गंधें [28]सुगंधागळा
    खेळे [29]पद्मदलायताक्ष [30]सकळा वेष्टीत [31]कामाकुळा. ॥ ९
संध्यारागपरागचर्चितवपू आरूढ जो उंदिरीं,
    भालीं चंद्र विशाल, वर्ण धवला, चंद्रार्क नेत्रोदरीं; ।

---

१. शंभर हिमरुचि (शीतांशु—चंद्र) असा कृष्ण गोपांगनांमध्यें लोपे. २. आसक्त. ३. हिरवें. ४. कमरेस. ५. उत्तम नर्तकाचा देह. ६. उभा असे. ७. हरण करीत. ८. या श्लोकाचें वृत्त 'मालिनी' आहे; (पक्षीं) मालिनी नामक लतांमध्यें. ९. 'कर्णीं दीप्त मणी' व 'कर्णी दिव्य मणी' असे पाठभेद आहेत. १०. चंद्र. ११. सूर्य. १२. 'कांची कणत्किंकिणी' असाही पाठभेद आहे. १३. सोन्याच्या अलंकारीं. १४. 'शोभवी' असाही पाठभेद आहे. १५. 'शिशुपर्णीं' असाही पाठभेद आहे. १६. गवळ्यांचा शिरोभूषण. (कृष्ण.) १७. पिंवळें. १८. पांवा. १९. तोंडांत, ओंठांत. २०. मारी. २१. आपलें स्थान, वैकुंठपद, मुक्तिपद. २२. सुवर्णरंगयुक्त पट्यांचा (पीतांबर). २३. तकतकित. २४. गळ्यांत. ['गळां' ही सप्तमी होय. येथें 'आं' सप्तमीचा प्रत्यय आहे. जसें—पायां पडतो.] २५. कपाळीं पीत (पिंवळा) टिळा, केशराचा तिलक. २६. 'नवी नव कळा' असाही पाठ आहे. २७. प्रफुल्ल सगळा गंधें सुगंधी गळा' असाही पाठ आहे. २८. सुगंधानें आगळा (श्रेष्ठ). २९. कमलदललोचन. (कृष्ण.) ३०. 'सदला' पाठभेद. ३१. मदनपीडित.

चक्रांभोजगदांकुशादि धरिले हे आयुधें चौकरीं,
ध्याता [1]नाभलगांविचा गणपती निर्विघ्न भक्ता करी. ॥ ६
पाशकार्मुकशरांकुशासनीं जे धरी दुरितघोरशासनीं, ।
ते भजोनि [2]शिखिवाहन [3]शारदा वेदशास्त्रजननी [4]विशारदा. ॥ ७
सद्गुरूसि शरणागत जावें, तो म्हणेल तितकें समजावें; ।
तेंचि बीज हृदयांत [5]जपावें, [6]साधकें मग तयांत लपावें. ॥ ८
जो गोवर्धनपर्वतातळवटी वेष्टीत [7]गोपांवळी,
ज्याचे वेणुरवें [8]हळाहळ निवे, दुष्टासि जो [9]निर्दळी; ।
ज्यातें [10]बल्लवयोषिता मधुवनीं आलिंगिती चुंबिती,
तो कल्याण कवींद्र [11]विठ्ठल म्हणे [12]हो श्रोतयां श्रीपती. ॥ ९
म्यां [13]पूर्वार्जव साधिलें न, तुमचे शास्त्रार्थ ना पाहिले,
श्रीसारस्वतकाव्यनाटकरसालंकार ना देखिले, ।
[14]छंदोग्रंथ निरीक्षिले न, यमकें चित्रेंविचित्रें तुकें,
दोषां[15] सर्व क्षमा करा चतुर हो! द्या धैर्य मातें [16]निकें. ॥ १०
गर्वें ना फुगणें, न निंद्य करणें, निष्ठूर ना बोलणें,
युक्तायुक्त, उणें, मनीं न धरणें, क्रोधें न संभाषणें, ।
पद्या आइकणें, उगेंचि असणें, जाणोनि मूकेपणें,
दोषांतें चुरणें, स्वयं न करणें, हीं साधुंचीं लक्षणें. ॥ ११
[17]छंद[18]ज्ञाननिघंटनाटकरसालंकारकाव्यक्रिया
जो जाणे गुरुदेवतावरकृपा [19]सारस्वतप्रक्रिया, ।

---

१. बीड गांवापासून सात आठ कोसांवर 'लिंब' या नांवाचा गांव आहे व तेथील गणपतीची प्रतिमा लिंब्याचा गणपति या नांवानें प्रसिद्ध आहे तोच हा गणपति असावा. २. मयूरवाहन. ३. सरस्वती. ४. विचक्षण, चतुर. ५. 'जमावें' असा पाठभेद. ६. मोक्षफळ साधण्याची इच्छा ज्यास त्यानें. ७. गोपसमूह. ८. महाविष शांत होई. ९. मारी. १०. गोपवनिता. ११. विठ्ठलानें स्वनामनिर्देश 'सीतास्वयंवर' आणि 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्यांच्या आरंभींही केला आहे. [सीतास्वयंवर–सर्ग १ श्लोक २-४-६; रुक्मिणीस्वयंवर–सर्ग १ श्लोक ५ पहा.] १२. होवो. १३. पूर्व ग्रंथकारांचें आर्जव (सरलत्व). १४. सीतास्वयंवर–सर्ग १ श्लोक ९ पहा. १५. 'दोषां सर्व करा क्षमा चतुर हो द्या धैर्य जें तें निकें' असाही पाठभेद आहे. १६. खरें, स्पष्ट. १७. छंदःशास्त्र. १८. शब्दकोश. १९. सारस्वत व्याकरण.

त्याचें शुद्ध कवित्व मान्य चतुरांमध्यें सभामंडळी
वर्णी **विठ्ठलदास** तो कवि जगद्वंद्य[1] स्वयं[2] भूतळीं. ॥ १२

वाग्देवी! उदरानिमित्त सुंदरा[3] म्यां पाहिल्या सुंदरा,
पैं[4] नोहे जठराग्निशांति विधुरा आला कलौ[5] पाहरा।
गर्भांधा बधिरापुढें श्रम पुरा तूं पावलीसी गिरा[6]!
हा माते! अपराध तो कविवरा सर्व क्षमावा बरा. ॥ १३

माझी स्फूर्ति[7] **सरस्वती**! मज म्हणे, 'बाळा कवी **विठ्ठला**!
मद्वत्सा! श्रमलासि, ऐक सखया! सांगेन जें मी तुला,।
झाला ताप शमेल या हरिकथापीयूषपानें[8] तुझा,
भक्ताचे पुरवी मनोरथ **हरी**, संदेह नाहीं दुजा[9].' ॥ १४

**श्री**सी गुप्त हरी सुधाब्धिजठरीं गेलासि **मेरू**दरीं
धाके [10]शीत हरी **हिमालय**गिरी, [11]चंद्रप्रभा [12]अंबरीं,।
झाला [13]क्षीरसरित्पती **शिव** तरी दिग्वास[14]लीलाधरी,
दाते यापरि वैखरी[15] स्तुति करी भूभार पृथ्वीवरी. ॥ १५

जिव्हे! तूं नटवी[16], तुझे अनुभवीं श्रीमंत सन्मानवी
होती लुब्ध, परंतु एकहि तुला कोणीच ना गौरवी;।
सत्कीर्ती बरवी जगांत उरवी, व्युत्पन्नता बोलवी,
सत्संगें नटवी पवित्र पदवी देशील ज्या सत्कवी. ॥ १६

निवे ताप देहीं असें सौख्य नाहीं, विचारूनि पाहीं करीं हीत[17] कांहीं,।
अदत्ता परीक्षित्य जावो मृगाक्षी भजें [18]खंजनाक्षी प्रभू[19] सर्वसाक्षी[20]. ॥ १७

---

१. जगताला मान्य. २. स्वतः. ३. मोठमोठीं मंदिरें, हवेल्या. ४. पैं, पां, नि इत्यादि निरर्थक शब्द कवितेंत कधीं कधीं पादपूरणार्थ योजितात. ५. कलियुगांत. ६. हे वाणी. ७. कवित्वस्फूर्ति. ८. हरिचरितामृतसेवनानें. ९. या काव्यांतील पद्यांवरून आणि विचारांवरून हें विठ्ठलानें प्रथमतः रचिलें असावें असें वारंवार वाटतें. १०. थंडी. ११. 'चंद्र भ्रमे अंबरीं' असा पाठभेद आहे. १२. आकाशांत. १३. क्षीराब्धि. १४. दिगंबर. १५. वाणी. १६. या श्लोकांत 'वी' अक्षराची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें हा अनुप्रासालंकार होय. नटवी=नर्तकी. १७. येथें वृत्तसुखार्थ 'हित' दीर्घ केला आहे. १८. खंजरीटपक्ष्यासारखे अक्षि (नयन) जिचे ती. [खंजन=ताजवापक्षी.] १९. 'असे सर्वसाक्षी' असा पाठ आढळतो. २०. 'मेरूपासून अणुरेणुत्रसरेणूपर्यंत स्थूलसूक्ष्मपदार्थ, त्यांचा साक्षी–पाहणारा.' (केकावलि.)

व्यर्थ कां श्रमसि, साधका मना! सोडिं हे [1]विषयभोग[2]कामना ।
द्रव्यलोलुप धरी जसा धना, तूं करी [3]हरिपदाब्जसाधना. ॥ १८

यत्नें कल्पलते सुरायपुरीचें आळें बरें बांधिलें,
[4]सांक्षेपें [5]सुरधेनुच्या [6]पयरसें म्यां सर्वदा सिंचिलें; ।
ते वल्ली रुइचीं फुलें प्रसवली, झाली निराशा मना,
हे वांच्छा पुरवील कोण कविची श्रीपांडुरंगाविना? ॥ १९

[7]अंबर्षि [8]ध्रुव तो [9]गजेंद्र परिसा [10]प्रल्हाद [11]पांचालिका
[12]शीबी चक्रवर्ती [13]बिभीषण महा [14]भक्तोपमन्यू निका, ।

---

१. विषयोपभोगवांछा. २. 'बुद्धिकामना' असाही पाठ आढळतो. ३. हरिचरणकमलप्राप्तीचा उपाय. ४. अगत्यानें, मुद्दाम. ५. कामधेनूच्या दुधानें. ६. 'धेनुच्यामृतरसें' असें पाठांतर आहे. ७. अंबरीष—हा सूर्यवंशोत्पन्न नाभाग राजाचा पुत्र. हा मोठा दानशूर, पराक्रमी आणि भगवद्भक्त होता. एकदां द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि याच्या घरीं अतिथि म्हणून आला. तेव्हां राजानें त्यास भोजनार्थ राहवून घेतलें. नंतर मुनि आपलें आन्हिक कर्म करण्यासाठीं नदीतीरीं गेला. या दिवशीं द्वादशी थोडी म्हणजे साधनद्वादशी होती. तेव्हां व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें, तिथि संपली नाहीं तों देवास नैवेद्य समर्पण करून, भोजन न करतां देवाचें तीर्थ प्राशन करून पारणें सोडलें. हें जाणून मुनि संतप्त झाला. त्यानें आपल्या जटेंतील केंसापासून एक अक्राळ विक्राळ कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून राजावर सोडिली. तेव्हां विष्णूच्या सुदर्शनचक्रानें तिचा नाश केला आणि त्या मुनीचा पाठलाग केला. हें पाहून दुर्वास भीतिग्रस्त असा विष्णूस शरण गेला. विष्णूनें 'परत अंबरीषाकडे जा, तो निराहार आहे, त्याचें समाधान कर म्हणजे चक्र तुला सोडील' असें सांगितलें. त्यावरून निरुपाय होऊन तो अंबरीषाकडे परत आला. दुर्वासास पाहतांच राजास हर्ष झाला. त्यानें सुदर्शनाची स्तुति करून दुर्वासाला त्यापासून मुक्त केलें आणि यथेच्छ भोजन दिलें—अशी कथा आहे. (भागवत—नवम स्कंध—अध्याय ४-६.) ८. ध्रुव—उत्तानपाद राजास त्याच्या सुनीति नामक भार्येपासून झालेला पुत्र. या राजास सुनीति व सुरुचि अशा दोन भार्या होत्या, त्यांत सुनीति ही नावडती होती, त्यामुळें तिचा पुत्र ध्रुव हाही नावडता होता. एकदां याचा सावत्र भाऊ राजाच्या मांडीवर बसला असतां हाही बसण्यास गेला, पण हें सुरुचीला आवडलें नाहीं व तिनें त्याचा धिक्कार केला. तेव्हां हा रडत रडत आपल्या मातेकडे (सुनीतीकडे) गेला व झालेली गोष्ट तिला सांगितली, तेव्हां तिलाही फार वाईट वाटून ती म्हणाली, 'परमेश्वराची आराधना केल्याशिवाय हें ऐश्वर्य कोठून प्राप्त होणार?' तेव्हां ह्याला पश्चात्ताप होऊन लागलाच अरण्यांत जाऊं लागला, इतक्यांत मार्गामध्यें ध्रुवाला नारद भेटले. त्यांनीं 'तूं लहान आहेस, परत जा' असें सांगितलें, पण ह्यानें ऐकिलें नाहीं. नारदमुनींस याची दया येऊन त्यांनीं यास एक मंत्र व भगवद्ध्यान यांचा उपदेश केला. अल्पकाळांत यास भगवंतांनीं भेट दिली म्हणून याच्या मनांत स्तुति करावी असें वाटलें, पण सामर्थ्य नसल्यामुळें हस्त जोडून उभा राहिला. तेव्हां हें जाणून परमेश्वरानें त्यास सामर्थ्य दिलें, व यानें स्तुति केली. तीवरून परमेश्वर संतुष्ट होऊन 'तूं छत्तीस सहस्र वर्षें पित्याच्या मागें राज्य कर व या स्थानीं परत ये' असा वर दिला. हें सर्व वर्तमान उ-

हे ध्याती हरि, भक्त वैष्णव तया जो पावला संकटीं
ज्याचें चिंतन केलिया हित मना, ज्यातें भजे धूर्जटी[1]. ॥ २०
पाहे एक विचित्र कौतुक, मना! गर्भी कसें रक्षिलें?
मातेचे स्तनमंडळीं पय पुढें कोणे रिती आणिलें? ।
जे मातापितरें निमग्न सुरतें संमोहि कंदर्पकें[2]
त्यांतें ही न कळेचि काय रचिलें सर्वोत्तमें नाटकें. ॥ २१

---

त्तानपाद राजास कळलें, व तो समारंभपूर्वक सामोरा येऊन ध्रुवास परत नगरास घेऊन गेला, व त्याला राज्याभिषेक करून आपण अरण्यगमन केलें—अशी कथा आहे. (भागवत—स्कं०,४ अ० ८-९.) ९. मागें पृष्ठ ७९ टीप ७ पहा. १०. पृष्ठ ७९ टीप ८ पहा. ११. द्रौपदी. द्रुपदराजाची कन्या. हिला पित्याच्या नांवावरून पांचाली, याज्ञसेनी अशीं नांवें पडलीं. द्रुपदराजानें, हिचें कौतुकानें 'कृष्णा' असें नांव ठेविलें होतें. १२. शिबि—याचें नांव उशीनर असें होतें. याच्या सत्वाची परीक्षा करण्यासाठीं इंद्रानें श्येनाचें रूप घेतलें, आणि अग्नीनें कपोताचें रूप घेतलें, ते दोघे शिबीच्या यज्ञसभेंत आले. कपोत भयाभीत होऊन राजाच्या आश्रयानें लपून राहिला. इतक्यांत त्यास मारण्याच्या मिषानें श्येनही त्याच्याजवळ आला. 'मी क्षुधेनें पीडित झालों आहे, तेव्हां माझा भक्ष्य कपोत मला दे, त्याला आश्रय देऊन तूं अधर्म करूं नको' असें श्येन म्हणूं लागला, तेव्हां राजानें त्यास मृगवराहवृषभमहिषांचें मांस देण्याचें कबूल केलें. पण तें श्येनास आवडलें नाहीं. नंतर 'कपोताचे भारंभार आपल्या शरीराचें मांस कापून देतों' असें उशीनरानें उत्तर केलें. तें श्येनास पसंत पडलें. तुलेमध्यें कपोतास एका बाजूस घालून राजानें आपलें मांस दुसऱ्या बाजूस घातलें, परंतु तें कमी भरलें म्हणून पुन: आपलें मांस घातलें, तरी तराजूंत कपोत जडच येऊं लागला, कपोताचे भारंभार मांस होईना; म्हणून राजा आपण स्वत: पारड्यांत बसला. तें पाहून संतुष्ट होऊन उभयतां इंद्र आणि अग्नि आपलीं रूपें प्रकट करून राजास वर देऊन निघून गेले. (वनपर्व—अध्याय १३०-१३१; १९७-१९८.) १३. रावणसहोदर. (रामभक्त.) १४. उपमन्यु—वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपाद नामक मुनीचा ज्येष्ठ पुत्र. हा लहान असतां बहुतकरून घरींच खेळत असे. एकदां हा दुसऱ्या आश्रमांतील मुलांसह खेळत असतां तेथें यानें गाईचें दूध काढतांना पाहिलें, व तेथील मुलांच्या मातेनें तेथील मुलांस व यास गोरस पान करण्यास दिलें व तें तो प्याला. नंतर तो आपले घरीं आल्यावर आपले मातेजवळ गोरस मागूं लागला. तेव्हां त्याच्या मातेनें नित्याप्रमाणें पिष्ट पाण्यानें कालवून त्याला दिलें परंतु तें तो न घेतां 'काल मी त्या दुसऱ्या आश्रमांत दूध प्यालों तसें दे' असें ह्मणूं लागला. तेव्हां त्याची आई जरा खिन्न होऊन म्हणाली कीं, 'असें दूध तुला मिळण्यायोग्य तुम्हीं नाहीं, कारण पूर्वजन्मीं तुझ्या हातून ईश्वराराधन घडलें नाहीं.' यावरून त्यानें ईश्वराराधन करून आकल्प आयुष्य व समग्र क्षीरसागराचें अधिपत्य अशीं संपादन केलीं—अशी कथा आहे. हा शैव होता व कृष्णासही यानेंच शैवी दीक्षा दिली. हा धौम्य ऋषीचा ज्येष्ठ भ्राता व तंडी ऋषीचा शिष्य होता. (विशेष माहिती महाभारत—अनुशासनपर्व—अध्याय १४ यांत, अथवा सौरपुराण—अध्याय ३६ यांत पहावी.)

१. शंकर. २. मदनानें.

रक्तीं वीर्य भलें जमोनि रचिलें चर्मास्थिचें बाहुलें
जें गर्भीं पचलें, कृमीं कवळिलें दुर्गंधीचें पोतलें, ।
पोटीं मूत्र पुरीष पेव भरले [1]रोगें अती सांचिलें
काळाचें जरि [2]भातुकें तुज मना! सांगीतलें **विठ्ठलें**. ॥ २२
शुक्रीं शोणित एकवाट मिळतां कैसी कला निर्मिली?
दीर्घांशें सुत होय, नातरि [3]सुता हे [4]नेणवे माउली; ।
रेतें शोणित भाग तुल्य मिळतां [5]क्लीबत्व देहासि ये,
त्यामध्यें [6]यमलें फळें निपजती हे साक्षि सर्वांसि ये. ॥ २३
काळें ना उजळें न नीळ [7]धवळें आरक्त ना पीवळें
मोठें ना सरळें दुरस्थ जवळें एकत्र ना वेगळें ।
बोलेना सुकलें अपक्व पिकलें जे साक्षि भूति भलें
ती ठायीं पडलें म्हणोनि धरिलें वाङ्मौन्य म्यां **विठ्ठलें**. ॥ २४

(घनाक्षरी.)

[8]ध्येय ध्याता आणि ज्ञान । ज्ञेय ज्ञाता आणि [9]ज्ञान ।
जे हे होती तत्समान । तैं [10]निधान सांपडे. ॥
आम्ही भक्त भले भोळं । एक नाचे एक लोळे ।
कैंचे कान कैंचे डोळे । अहो! वेड बागडे? ॥
पाहतां सौख्य कोठें नाहीं । पडलों चिंतासागरडोहीं, ।
तेथें तारू आलें पाहीं । आपण **पांडुरंगजी**! ॥
तेणें तेथें दिधली बाहे । ऐसा स्वामी कोठें आहे? ।
म्हणोनि त्याचे हृदयीं राहे । चिंती पाय ते पुजी. ॥ २५

---

१. 'रोगें अघें जिंतिलें' पाठांतर. २. भक्ष्य. खाद्य. ३. कन्या. ४. न जाणे. ५. नपुंसकत्व. ६. जुळीं. ७. यांत 'ळे' आणि 'लें' या अक्षरांची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. ८. या वृत्ताचें नांव घनाक्षरी (कबित्त.) याचें चिंतामणिकविकृत छंदविचारांत लक्षण दिलें आहे तें:—'सोरह पंद्रह वरनपर होत जहां विश्राम । इकतिस अक्षर अंत गुरु कहत घनाक्षर नाम॥'. याचा भावार्थ—या छंदास कवित्त अथवा घनाक्षरी असें म्हणतात. याच्या प्रत्येक पादांत एकतीस अक्षरें असून प्रथम १६ व्या अक्षरावर व नंतर १५ व्या अक्षरावर म्हणजे पादाच्या अखेरीस विराम असतो. याच्या प्रत्येक पादांतही चार भाग असून पहिल्या तीन भागांस यमक असतें. ९. या त्रिपुटी म्हणतात. १०. ठेवा, ब्रह्मरूप ठेवा.

(श्लोक.)

ज्या नामें शतकोटि दग्ध [1]दुरितें जैसीं तृणें [2]पावकें,
ज्या नामें [3]गणिकेसि मोक्ष वरिता यानें विमानादिकें, ।
ज्या नामें तरला [4]अजामिळ चमत्कारास तो पावला;
जेणें उद्धरली [5]गजेंद्र, मजही त्याचाचि लागो [6]ळळा. ॥ २६
[7]विद्वज्जीवनपुण्यपावनकथा [8]वैय्यासकें आपणें
श्रीमद्भागवतीं परीक्षितिप्रती सांगीतली [9]मी म्हणें, ।
जी [10]गीर्वाणमहापुराणदशमस्कंधोत्तमाची टिका,
भाषा [11]प्राकृत हे मराष्ट्रकविता व्युत्पन्न हो! आइका. ॥ २७
श्रीमद्रामचरित्र तेंचि परिसा [12]मंदाकिनी [13]मद्गिरा,
श्रीमत्कृष्णकथा सुनीलयमुना आली [14]त्रिवेणीतिरा; ।
श्रीमत्काव्य सरस्वती प्रगटली श्रीविठ्ठलाची कळा,
श्रीमद्रुक्मिणिकांत दैवत भजा ग्रंथ प्रयागागळा. ॥ २८
हे गंगा [15]त्रिपथा [16]अधोक्षजकथा जो आइके [17]सर्वथा
तो पावे चवथा पदार्थचि तया मानाल हो! नान्यथा. ।

---

१. पापें. २. अग्नीनें. ३. पिंगलेला. (पृष्ठ ५९ टीप २ पहा.) ४. हा एका विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा होता. तो एकदां वनांतून समिधा दर्भ घेऊन परत येत असतां त्यानें रस्त्यांत एक शूद्रस्त्री पाहिली, ती फार सुरूप असल्यामुळें तिला पाहून अजामिळास मोह उत्पन्न झाला. व त्याप्रमाणेंच तिलाही त्याच्या संगतीनें काल घालवावा असें वाटल्यामुळें तीही त्याच्या संगतीनें राहूं लागली. मग त्यानें आपले कुटुंबांतील सर्वांचा त्याग केला. ह्या शूद्रस्त्रीपासून ह्याला दहा मुलें झालीं. त्या सर्वांत त्याचा नारायण नांवाचा एक लाडका मुलगा होता. अजामिळाचा अंतकाळ समीप आला असतां त्यानें पुत्रवात्सल्यानें 'नारायणा! इकडे ये' अशी हांक मारिली. तेव्हां विष्णुदूतांनीं पुत्राचे मिषानें कां होईना, त्याचे तोंडून श्रीविष्णूचें नांव आलें म्हणून त्याचा उद्धार केला—अशी कथा भागवतांत आहे. ५. पृष्ट ७९ टीप ७ पहा. ६. गोडी. ७. विद्वानास जीवन देणारी, शुद्ध आणि पवित्र अशी कथा. ८. व्यासपुत्रें. (शुकें.) ९. कवि विठ्ठल. १०. जी संस्कृत भागवत नामक महापुराणाच्या दहाव्या भागाची टीका.; ११. मराठी. या श्लोकावरून या काव्यांत दशमस्कंधांतील कथांचें निरूपण आहे असें होतें. १२. गंगा. १३. माझी वाणी. १४. गंगा यमुना सरस्वती संगमतीरा. १५. तीन वाटांनीं जाणारी, त्रिमार्गगा. १६. कृष्णकथा. [अधोक्षज=(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः,' (२) 'द्यौरक्षं पृथिवी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥,' (३) अक्षात् इंद्रियाज्जायते इति अक्षजं प्रत्यक्षज्ञानं, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्य सः, (४) अधः कृतं अक्षजं इंद्रियज्ञानं येन.] १७. यांत 'था' आवृत्त असल्यामुळें अनुप्रासालंकार आहे.

गेले जन्म वृथा धरा व्रत कथा बैसोनि **वि**ष्णूरथा

जा सेवा [1]प्रमथाधिपा प्रिय मथा **गी**तार्थ [2]शब्दोल्लथा. ॥ २९

[3]लीलाविग्रह **रामकृ**ष्ण जन हो ! आले स्वयें गोकुळा,

त्यांचें कीर्तन पुण्यपावनकथा गातां सदा सोहळा, ।

धर्मस्थापक विश्वव्यापक जगद्वंद्य व्रजेंद्राघरीं ।

ते दोघे [4]सरिसे पुराणपुरुष क्रीडे विलोकांतरी. ॥ ३०

**नं**दाचीं [5]युगुळें मुलें [6]सुचपळें दोघे सदा सोज्वळे

माथा मंडित जांवळें पदतळें [7]रातोत्पलें कोवळें, ।

[8]रामें वज्र[9]हळें [10]सुरांतककुळें संहारिलीं [11]दोर्बलें;

**कृ**ष्णें [12]शैलें करांगुळीं उचलिला, झाले तळीं गोवळे. ॥ ३१

श्री**रा**में [13]विपिनांत [14]अंहमलिना स्त्री [15]**ता**टिका कल्पना

श्री**कृ**ष्णें सदनांत दैत्यललना संहारिली [16]**पू**तना ।

[17]**का**कुत्स्था रणिं [18]नागपाश जडले, जैसी [19]फणी चंदना,

मातेनें **म**नमोहनासि उखळी केलें कटीबंधना. ॥ ३२

**रा**में उद्धरिली [20]शिला पदरजें, जी शापिली **गौ**तमें,

**कृ**ष्णें वेणुरवें [21]स्वयें उठविली विप्रांगना विक्रमें, ।

**रा**में उद्धरिली द्रुमप्रियतमा भावें [22]अटव्यांतरीं

**कृ**ष्णें पैं [23]**य**मलार्जुनासि चरणें उद्धार केला घरीं. ॥ ३३

---

१. प्रमथांचा (गणांचा) नाथ. (शिव.) २.भाषांतर,तरजुमा. ३.लीलेनें मनुष्यदेह धरणारे. ४.सारखे. ५. दोन. ६. 'अचपलें' पाठभेद. ७.तांबडें कमल. ८.बळराम. ९. हल=नांगर. १०. दैत्यांचीं कुळें. ११. भुजबळें. १२. पर्वत. (गोवर्धन.) १३. अरण्यांत. १४. पापानें मलिन. १५. पृष्ठ २२ टीप १६ पहा. १६. कंसाची अनुचरी राक्षसी. ही तरुण स्त्रीचें रूप घेऊन गोकुळांतील बालकांचा संहार करित नंदाचे घरीं गेली व कृष्णास आपले विषयुक्त स्तन पाजूं लागली. हें तिचें कपट कृष्णास कळून त्यानें स्तनपान करित असतां तिच्या स्तनांचें आकर्षण करून तिचा प्राण घेतला. भागवत–दशमस्कंध–अध्याय ६ पहा. १७.रामलक्ष्मणां. १८.शरभूत सापांचे पाश. १९.साप. २०.अहल्या. (पृष्ठ २६ टीप १ पहा.) २१. 'जवें' असाही पाठ आहे. २२. अरण्यामध्यें. २३. यमलार्जुन या नांवाचे दोन वृक्ष जवळ जवळ होते. एकदां कृष्ण खेळत खेळत त्यांजवळ गेला तेव्हां त्याच्या आईनें त्याच्या कमरेस उखळ बांधिलें होतें. तें उखळ आडवें होऊन त्या दोन वृक्षांमध्यें अडकलें, तेव्हां त्यानें मोठ्या नेटानें पुढें जाण्यासाठीं हिसका मारिला. त्याक्षणींच ते दोन्ही वृक्ष उपटून पडले. यमलार्जुन हे कुबेरपुत्र होते. हे शापामुळें वृक्षरूप झाले होते. ते कृष्णाच्या करस्पर्शानें शापमुक्त झाले–अशी कथा आहे.

रामें [1]प्रस्तर तारिले कपिवरें हे ख्याति रामायणीं,
    गोगोवर्धन माधवें उचलिला गोगोपसंरक्षणीं; ।
रामें रावण कुंभकर्ण समरीं कैसेचे [3]निर्दाळिले
    कृष्णें चाणुर मल्ल कंस मथुरेमध्यें जिवें घेतले. ॥ ३४
[4]कांतारीं रघुनाथ रोदन करी, सीता न देखे पुढें,
    [5]दैत्यारी [6]नवनीत मागत रडे, नेणेति गौळी मुढें; ।
श्रीरामें दशकंधरासि समरीं [7]चिद्रूपडें दाविलें,
    श्रीकृष्णें निजरूप विश्वनयनीं [8]पार्थाचिया घातलें. ॥ ३५
[9]काकुत्स्थासि [10]कलत्र एक, हरि ते [11]सोळा सहस्रा सती,
    [12]लंकादान बिभीषणा, मधुपुरी श्रीउग्रसेनाप्रती, ।
वैकुंठासि रघूत्तमें सकलही नेली अयोध्या पुरी,
    कृष्णें द्वारवतीसि सर्व मथुरा नेली क्षणाभीतरी. ॥ ३६
रामें राक्षस मारिले, यदुवरें संहारिलें दानवां,
    [13]श्रीरामें मृत वानरें [14]उठविले, कृष्णें व्रजीं [15]बल्लवां; ।
श्रीरामें कपिपुंगवांसह वनीं क्रीडा करी काननीं,
    कृष्णें गोपसमागमें विचरितो [16]वृंदावना जाउनी. ॥ ३७
रामें [17]विप्रसुता अकाळमरणापासूनि संरक्षिलें,
    गोपाळें यमलोक शोधुनि [18]गुरुपुत्राप्रती आणिलें. ।

---

१. दगड, पत्थर. नलवानराच्या साहाय्यानें रामानें सेतु बांधला या कथेकडे कटाक्ष आहे. २. 'लंकेसि' असा पाठभेद आहे. ३. मारिले. ४. अरण्यांत. ५. कृष्ण. ६. लोणी. ७. 'चिद्रूप तें दाविलें' असाही पाठ आहे. ८. अर्जुनाच्या. [गीता–अध्याय ११, यांत श्रीकृष्णानें अर्जुनास विश्वरूप दाखविलें याचें वर्णन आहे.] ९. रामाला. १०. स्त्री. ११. भौमासुरास जिंकून आणलेल्या सोळा हजार राजकन्या. १२. 'लंकाप्राप्ति' असाही पाठ आहे. १३. 'रामें वानर संगरीं उठविले' पाठभेद. १४. इंद्रानें अमृतसेक केला तेव्हां सर्व मृत वानर उठले. १५. गवळ्यांना. १६. जालंधरदैत्याची स्त्री वृंदा, तिचें जें वन तें वृंदावन. १७. एकदां राम राज्य करीत असतां एका विप्राचा मुलगा मरण पावला. तेव्हां बापानें शोकविव्हळ होऊन त्या मुलाला राजद्वारीं ठेवून विलाप करण्यास आरंभ केला. रामानें त्याची समजूत घालून त्याचे डोळे पुसून त्यास स्वस्थ केलें. नंतर रामानें विप्रसुतमरणकारण नारदमुनीला विचारलें. तो म्हणाला, 'जातिधर्मांचें उल्लंघन झाल्यामुळें विप्रसुत मेला. कोणी शूद्र तप करीत असावा असें वाटतें, त्याचें निवारण केलें पाहिजे.' नारदाच्या म्हणण्याप्रमाणें रामानें शोध केला. तों दक्षिणदिशेस एका कमलभूषित उत्तम सरोवरासमीप वृक्षाच्या खांदीस लोंबणारा जटाधारी तपोनिरत शंबूक नामक शूद्र दृष्टीस पडला. त्याचवेळीं रामानें त्याचा खड्गानें शिरच्छेद केला. तेव्हां सर्व देव प्रसन्न झाले. आणि 'वर माग' असें रामास म्हणूं लागले.

**श्रीरामें दशकंठ** मारुनि सुरां[1] बंदींतुनी सोडिलें,
श्रीकृष्णें पितरांसि बंधसदनापासूनि दूराविलें. ॥ ३८
**रामें** दिव्य वनीं विहार करितां **सीतासवें** गोरटी,
**कृष्णें** रासविलास गौळणिसवें केला **कलिंदीतटीं**; ।
**रामें** त्यागिलि **मैथिली**, लुटविलीं अंतःपुरें **माधवें**;
दोघे तारक पूर्ण ब्रह्म, जन हो! ध्यावे गिरा गौरवें. ॥ ३९
**विष्णूची** अवतारपंक्तिगणना होईल कालांतरीं;
पैं लागे **बलरामकृष्ण**महिमा वर्णावया वैखरी[2], ।
ते दोघे जगदीशव्यापकपणें सोमार्कबिंबोद्धटीं
यापेक्षां स्तुति काय **विठ्ठल** म्हणे वर्णूं मुखें गोमटी[3]? ॥ ४०

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

**'विद्वज्जीवन'** ग्रंथराज पहिला उल्लास **'विष्णुस्तुती,'**[4]
श्रीमद्भागवतीं **परीक्षिति** करी पृच्छा **शुकेंद्राप्रती**, ।
सांगे **विठ्ठल** कीर्तनें **कलियुगीं** सायुज्यता[5] लाहिजे,
स्वर्ग प्राप्त तपें, अधःपतन[6] हें पुण्यक्षयें पाहिजे. ॥ ४१

---

## उल्लास दुसरा.

(मत्तगयंदवृत्त.)[7]

**कृष्ण जनार्दन कैटभमर्दन केशव माधव वामन विष्णो!**
**श्रीमधुसूदन देवकिनंदन दानवशासन विठ्ठल जिष्णो!** ।

---

रामानें मृतविप्रबालक मागून घेतला–याप्रमाणें ही विप्रसुतकथा आहे. १८. कृष्णाचा गुरु सांदीपनि. हा काश्यपमुनीचा पुत्र. याचे मृत पुत्र परत आणून देऊन कृष्णानें गुरूला गुरुदक्षिणा दिली आणि गुरुपत्नीचें समाधान केलें–अशी कथा आहे. (भागवत–दशमस्कंध–अध्याय ४५ पहा.)

१. देवां. २. वाणी. ३. सुंदर. ४. कदाचित् 'विष्णुस्तुति' हें या पहिल्या उल्लासाचें नांव असावें. ५. चार मुक्तींपैकीं एक. ही चार मुक्तींपैकीं शेवटची मुक्ति. हींत जीवाशीं आणि ईश्वराशीं अभेद होतो, दोन्ही एकरूप होतात. (सायुज्यता, सलोकता, समीपता आणि सरूपता हे मुक्तीचे चार प्रकार आहेत.) ६. अधोगति. ७. या वृत्ताचें लक्षण चिंतामणिकविकृत हिंदुस्थानी 'छंदविचारां'त दिलें आहे. 'सात भगण गुरुजुगलजुत सो कहि मत्तगयंद.' याचा भावार्थ:—ज्या श्लोकाच्या प्रत्येक पादांत सात भगण आणि दोन गुरु अक्षरें असतात त्या वृत्ताला 'मत्तगयंद' असें म्हणतात. ह्याला

जे श्रुति[1]सारपरायण ते जन मुक्त निरंतर त्या हरि[2]नामें
विठ्ठल[3]दास करी हृदयीं जप छंदघटा प्रमदाहित कामें. ॥ १

(श्लोक.)

कुंडलें मणिमनोहर कानीं, पीत[4]चीर जघनीं कर दोन्ही ।
पाउलें सम ईटे[5]वर सानीं[6], तो तुझा कवि **विठो**! वरदानी. ॥ २

‘अहो! **अँक्षराणामकारोऽस्मि**[7]’ **गी**ता त्यजा वर्ण चौथा[8], भुजंगप्रयाता[9], ।
निघे ‘**राम**’ तो नाम तो मीचि **जि**ष्णो[10] !’ वदे सार श्री**कृ**ष्ण साक्षात **वि**ष्णो !॥ ३

**गी**ता कोटिगुणें मनासि रमते, श्रेष्ठ त्रिवेणी[11]हुनी,
**गी**ता श्रीमुखपंकजीं प्रसवली, पादाब्ज**मं**दाकिनी[12]; ।
या **गं**गेसि भगीरथें[13] प्रगटिलें, गी**ता**र्जुनें[14] आणिली,
हे[15] चारी[16] पुरुषार्थ **वि**ठ्ठल म्हणे हे पाहिजे सेविली. ॥ ४

---

‘मदिरा’ असें संस्कृत नांव असून मराठींत ‘सवाई’ म्हणतात. हीच फार पाहण्यांत येते. ८. कैटभ दैत्याचा शत्रु. जगदुत्पत्तीच्या समयीं हा दैत्य विष्णूच्या कर्णमलापासून उत्पन्न झाला व याचा संहार विष्णूनें केला—अशी कथा आहे. ९.वृत्तसुखार्थ येथें ‘देवकी’शब्दाची अंत्य ‘ई’ ऱ्हस्व केली आहे.

१. वेदतत्वनिरत. २. हरि=विष्णु, कृष्ण. [‘हरि’ शब्दाचे अनेक अर्थ आहेत:—‘यमानिलेंद्र-चंद्रार्कविष्णवीशसिंहाखुवाजिषु । शुकाहिकपिभेकेषु हरिर्ना कपिले त्रिषु ॥.’ ३. विठ्ठल हाच ईशदास. ४. पिंवळें वस्त्र. (पीतांबर.) ५. विटेवर. ६. लहान. ७. ‘अक्षराणामकारोऽस्मि’ [भगवद्गीता—अध्याय १० श्लोक ३३] हा गीतेंतील श्लोक आहे. याचा अर्थ असा:—‘अक्षरांमध्यें मी अकार आहें, समासांमध्यें मी द्वंद्वसमास’ इत्यादि. ८. चौथा वर्ण म्हणजे ‘णा’ होय; हा काढिल्यानें ‘राम’ असें पद निघतें. ९. सर्पासारखें चालणें. ‘भुजंगप्रयात’ हें या श्लोकाचें वृत्त आहे. याचें लक्षण—‘भुजंगप्रयातं भवेद्यैश्चतुर्भिः’. १०. हे अर्जुना! ११. त्रिवेणी=गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या प्रयागस्थ संगमास ‘त्रिवेणी’ म्हणतात; या नदीत्रयसंगमांत सरस्वतीचा प्रवाह सांप्रत गुप्त झाला आहे. तीन पेड करुन घातलेल्या वेणीला त्रिवेणी म्हणावयाचें. १२. गंगा. गीता मुखकमलांतून आणि मंदाकिनी पादकमलांतून निघाली. १३. भगीरथ—पूर्वी रामाचा पूर्वज सगर नामक राजा होता, त्याला दोन स्त्रिया होत्या. त्याच्या दोन स्त्रियांपैकीं एकीस साठ सहस्र व एकीस एकच पुत्र होता. त्याचें नांव असमंजस. सगरानें नव्याण्णव अश्वमेध यज्ञ करुन पुन्हा शंभराव्या यज्ञासाठीं अश्व सोडला. तेव्हां इंद्रास धाक पडला कीं, जर शंभर यज्ञ शेवटास गेले तर यास माझें पद मिळेल. या भीतीनें इंद्रानें तो घोडा पळवून पाताळांत कपिलऋषीच्या आश्रमांत नेऊन ठेविला. सगराचे साठ सहस्र पुत्र अश्वरक्षणास होते, ते अश्व पृथ्वीवर कोठें दिसेना म्हणून पाताळलोकीं त्याच्या शोधार्थ गेले. तेथें कपिलमुनीच्या आश्रमांत घोडा पाहून त्यास ताडन करुं लागले. तेव्हां त्या ऋषीनें डोळे उघडून रागानें पाहतांच ते सर्व सगरपुत्र एका क्षणांत जळून भस्म झाले. हें वर्तमान सगरास कळल्यानंतर त्यानें आपला नातू अंशुमान् यास कपिलऋषीच्या सांत्वनार्थ पाठविलें. तेव्हां त्यानें कपिलाला प्रसन्न करुन त्याच्या आज्ञेनें

**गी**तेचा महिमा[१] पवित्र परिसा, '**गी**तामहात्म्यीं[२]' असे,
झाले **व्यास** **शु**केंद्र **सं**जयमुनी, चौथा[३] पुराणीं नसे. ।
जो साक्षाद्भगवत्परायण कथा सारांश वेदार्थिंचा,
प्रार्थी **वि**ठ्ठलदास पाठ करणें[४] यामार्ध[५] संतीं ईचा[६]. ॥ ५
आयका सरल किंकरवाणी[७], अर्थ सार्थक तु किं करवाणि[८] ? ।
देति ते वरद सत्कवि राजे, हो सहाय तुज एक विरा जे. ॥ ६
**नं**दातें गवळी मिळोनि सकळीं आक्षेपिती[९] गोकुळीं
'कैसा गोपकुळीं तुझा सुत बळी ? आश्चर्य भूमंडळीं, ।
जो जो दैत्य बळेंचि[१०] येउनि छळी त्यांतें **ह**री निर्दळी[११],
वंशी[१२] पाणितळीं[१३], वनीं पशु वळी[१४] वेष्टीत गोपावळी. ॥ ७
झाला जन्मदिनास एक महिना तैं शोषिली पूतना[१५],
श्री**शौ**री **म**दनावतार सदना आला तुझ्या सज्जना ! ।
कन्या दिव्य सुना सरोजनयना[१६] संलग्न[१७] सोडीत ना
वाटे चित्रं[१८] मना विचित्र रचना, ते काय सांगेसि[१९] ना ? ॥ ८

---

घोडा नेऊन सगराचा यज्ञ पुरा केला. व आपल्या चुलत्यांचा उद्धार होण्याविषयीं प्रार्थना केली, तेव्हां '**गं**गेशिवाय सद्गति होणार नाहीं' असें कपिलानें सागितलें. तेव्हां **गं**गेला खालीं आणण्याकरितां त्यानें तप आरंभिलें, परंतु त्याचा हेतु तडीस न जातां त्यास मृत्यु आला. पुढें त्याचा पुत्र दिलीप यानें तप केलें पण तोही मरण पावला. अखेरीस भगीरथानें अत्यंत कठिण तपश्चर्या करून **गं**गेस प्रसन्न करून खालीं आणलें व सगरपुत्रांचा उद्धार केला. गंगेला भगीरथानें आणिलें म्हणून 'भागीरथी' असें म्हणतात–अशी कथा आहे. १४. गीता+अर्जुनें आणिली. येथें गीता अर्जुन हीं पदें वेगळालीं असणें इष्ट आहे. १५. हे गीता. १६. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ.

१. मोठेपणा. [इमन् (इमा) प्रत्यय विशेषणास लागून भाववाचक नामें होतात. जसें–गुरु-गरिमा, बहु-भूमा, प्रिय-प्रेमा, काल-कालिमा, मृदु-म्रदिमा, इत्यादि.] २. या नांवाच्या प्रकरणांत–स्तोत्रांत. ३. तीन झाले, चौथा मुनि झाला नाहीं. ४. पाठ करावा. [क्रियावाचक नामें कधीं कधीं काव्यग्रंथांत क्रियापदाऐवजीं येतात. येथें 'सारांश पाठ **करणें**' याचा अर्थ 'सारांश पाठ **करावा**' असा आहे. दुसरीं उदाहरणें–(१) 'सर्वज्ञाला अज्ञ मनुष्यें काय ज्ञान **शिकविणें**' (शिकवावें)–मोरोपंत. (२) वरचेवर पत्र पाठवीत **जाणें** (जावें.)] ५. अर्धा प्रहरभर. याम=प्रहर. ६. इचा=हिचा; गीतेचा. ७. दासाची वाणी. ८. मी काय करूं. ९. प्रश्न करतात, विचारतात. १०. 'बलीय' असाही पाठ आढळतो. बलीय=बलीयस्=बळवान्. ११. निर्दाळण करी, संहारी. १२. 'वेणी' असाही पाठ आहे. १३. हातांत वंशी (पांवा.) १४. वळवितो. १५. पूतना नामक राक्षसी. १६. कमलेक्षणा. १७. 'संलब्ध' असाही पाठ आहे. १८. आश्चर्य. १९. कां सांगत नाहींस.

[१]कंसारी [२]सुभटा कलिंदिनितटा ने[३]लें जई धाकुटा,
तैं आला [४]शकटासुर द्विजहटा कां रे! महा चोरटा? ।
अंगुष्ठें मुगुटा करोनि उलटा संहारिला वो[५]खटा
हाका नंदभटा! तुझा सुत नटा वेषीं घडे गो[६]मटा? ॥ ९

जे आले मरणार्थसाधक [७]तृणावर्तादि संघट्टणा
ते गेले [८]परिणावयासि तरुणा मुक्तीचिया धारणा, ।
जैं पाहे चरणांबुज द्रुमगणा उत्पाटिले दारुणा.
तैं होता करुणानिधी शिशुगणामध्यें लघू रिंगणा. ॥ १०

गोकंठपाश नवलक्ष उणे नितंबी चंचू धरूनि चिरिला [९]बक काक झोंबी, ।
झाला भुजंगम बळें अघ दैत्य आला, तो मारिल्या उपरि [१०]कालिय [११]नाथियेला. ११

[१२]राधामुखांबुजमिलिंद कलिंदकन्ये! क्रीडा करी तंव निशाचर गोपिकानें, ।
तो मारिला मधुवनीं विपरीत केलें, दावाग्निजाळ गिळिले, [१३]व्रज वांचवीलें.॥ १२

गोधनें सकल गोधनवत्सें चोरिले विधि नखें विधि कच्छें, ।
गोकुळीं प्रगटिला अधिकारी पूर्णब्र[१४]ह्म अवतार [१५]मुरारी. ॥ १३

गोपांगनासि [१६]यमुनातटिं नग्न केल्या, वेणुस्वरें [१७]ऋषिनितंबिनि [१८]चोजवील्या, ।
[१९]गोवर्धनाद्रि धरिलांगु[२०]लिं सप्तरात्रीं चौदायनें वय तदा हरिच्या चरित्रीं. ॥ १४

---

१. कृष्ण. २. उत्तम वीर. भट=वीर, योद्धा. ३. 'आला अर्धी धाकुटा' असाही पाठ आहे. ४. शकटासुर हा कंसाचा सेवक राक्षस. हा शकटाचें (गाड्याचें) रूप धरून कृष्णास मारण्यास आला होता, परंतु कृष्णानें त्यालाच मारिलें. ५. वाईट, दुष्ट. ६. 'चोरटा' असाही पाठ आहे. ७. तृणावर्त. (पृष्ठ ६९ टीप २ पहा.) ८. परिणय (विवाह) करावयास. ९. बक (बकासुर)—कंसपक्षीय असुर. यमुनातीरीं वृंदावनामध्यें, एकदां गोपालांसहवर्तमान कृष्ण क्रीडा करीत असतां, तेथें यानें बकवेषानें येऊन त्यास गिळिलें. तेणेंकरून याच्या गलप्रदेशीं दाह होऊन यानें कृष्णास मुखाबाहेर टाकिलें, व त्यास पुनः मारायास धांवला. तें याचें दुष्ट कृत्य पाहून, कृष्णानें याचे दोनही चंचू धरिले, आणि ते फाडून यास मारून टाकिलें. (भा०प्रा०ऐ०को०.) १०. सर्प. ११. मारिला. १२. कमलभ्रमर. १३. गोकुळ. १४. 'अविकार' असाही पाठ आहे. १५. कृष्ण. (मुर नामक दैत्याचा अरि.) १६. ही गोष्ट 'कात्यायनीव्रतकथा' या नांवानें प्रसिद्ध आहे. १७. मुनिपत्नी. वामनकृत 'यज्ञपत्न्याख्यान' पहा. १८. 'नाचवील्या' असा अन्य पाठभेद आहे. १९. गोवर्धन—यमुनातीरीं वृंदावननिकटवर्ती पर्वत. प्रतिवर्षी इंद्रानें चांगली वृष्टि करावी, आणि तद्द्वारा धान्यतृणाची विपुलता व्हावी, म्हणून नंद इंद्रयाग करीत असे, तो न करतां ब्राह्मण, गाई आणि गोवर्धन पर्वत यांस उद्देशून यज्ञ केला. त्यावरून इंद्रास मोठा राग आला, व त्यानें गोकुळ बुडविण्यासाठीं सात दिवस सात रात्री भयंकर जलवृष्टि करविली. यामुळें गाई आणि गवळी यांना खाणें मिळेना तेव्हां गोवर्धन पर्वताला बोटावर उचलून धरून त्याच्या खालीं कृष्णानें सर्व गोकुळाचें अतिवृष्टीपासून संरक्षण केलें—अशी कथा आहे. २०. 'जइं सप्तरात्रीं' असाही पाठ आहे. धरिला+अंगुलि या पदांचा संधि अप्रशस्त होय.

सर्पे शरीर गिळितांचि तुझें समुद्रें मारूनि त्यांसि तुज सोडविलें [1]मुकुंदें, ।
नेलें धरूनि **वरु**णें तधिं वांचवीले, गोपां सचित्र उदकीं मग दाखवीलें. ॥ १५

**धेनु**कासुर **नि**मासुर आला तो **प्र**लंब करि साह्य तयांला, ।
प्रे[2]तनाथनगराप्रति त्यांतें [3]प्रेरिले [4]हलधरें बलवंतें. ॥ १६

उपजला जगजीवन जैंहुनी द्रुमलता सफला [5]मधुकाननीं ।
[6]मरकतोपलदिव्यगृहांगणीं प्रगटली **क**मला [7]नटधारिणी. ॥ १७

व्रजपुरीं नवलक्ष निके[8]तनें उघडिजे [9]नयनाब्जविलोचनें ।
भुलविल्या [10]शरदिंदुनिभानना, [11]'हरि कसा मग तूं हि कथींचना ? ॥ १८

[12]'वोसंगी स्तनपान **कृ**ष्ण करितां माता [13]निरीक्षीतसे,
**शौ**री आ पसरी [14]विजृंभणमिषें, ब्रह्मांड पोटीं दिसे, ।
तें देखोनि मनांत विस्मय करी, कांपे **य**शोदा सती,
[15]दृग् लावी [16]मृगशावलोलनयना कैसा सुत **श्री**पती ?' ॥ १९

**नंदें** आयकिलें म्हणे, 'बहु भलें, जें जें तुम्हीं पूसिलें,
तें [17]**गर्गें** पहिलेंचि गुह्य कथिलें, [18]साचार म्यां मानिलें, ।
सच्चिद्रूप भलें स्वयें प्रगटिलें श्री**विष्णु**नें आपुलें,
[19]त्वद्भाग्य [20]स्फुरलें, म्हणोनि उरला सारांश सांगीतलें.' ॥ २०

जो **विष्णू** अवतार घे [21]चहुंयुगीं रूपें [22]अमूपें धरी,
नानावर्णे विचित्र घेउनि [23]वसे [24]ब्रह्मांडभांडोदरीं, ।
तो हा **कृ**ष्ण म्हणोनि पालन करी हें बीज सांगीतलें,
केलें विस्मय गो[25]वळीं, मग गृहा [26]गंतव्य आरंभिलें. ॥ २१

---

१. मोक्षदाता जो कृष्ण त्यानें. २. यमाच्या नगराला. ३. 'मारिले' असाही पाठ आहे. ४. बळरामानें. ५. मधूच्या उद्यानांत. ६. मरकताच्या (पाचेच्या) उपलांनीं (दगडांनीं) दिव्य (सुंदर) अशा गृहांगणांत. ७. 'जगतारिणी' असाही पाठ आहे. ८. गृहें. ९. नयनकमलें. १०. शरत्कालीन इंदूप्रमाणें (चंद्राप्रमाणें) सुंदर आननें (मुखें) ज्यांचीं अशा. ११. 'हरि कथा तव सूत कथींचना' असाही पाठ आहे. १२. मांडीवर उत्संगीं. १३. पाहतसे. १४. जांभई देण्याच्या मिषानें. १५. दृष्टि लावी. १६. हरिणबालेक्षणा. १७. गर्गमुनीनें. १८. खरोखर. १९. 'त्वद्भाग्य स्फुरलें, कळोनि उगलें संरक्ष सांगीतलें' असाही पाठ आहे. २०. स्फुरण पावलें, वृद्धि पावलें. २१. चार युगांत. २२. बहुत. २३. 'नटे' असाही अन्य पाठ आहे. २४. या विश्वांत. २५. गवळ्यांनीं. २६. गमन. [गंतव्य हें येथें नाम आहे. धातूस 'तव्य' प्रत्यय लागून भविष्यकालदर्शक विशेषणें होतात, पण केव्हां केव्हां त्यांचा अर्थ व्यवहारांत मर्यादित होऊन तीं नामें होतात. जसें—कर्तव्य, भवितव्य.]

चित्ता तत्वविचार शुद्ध न कळे वेदश्रुती[१] शोधितां,
विश्रांतिस्थळ नाढळे हरिविणें नानागमें[२] पाहतां, ।
जो विश्वंभर सर्वसाक्ष नटला साकार सर्वां घटीं
तो पाहे कविराज **विठ्ठल** म्हणे साक्षात **भीमा**तटीं. ॥ २२

**राम राम जय**राम संततें[३], नित्य जो जप करील कौतुकें, ।
त्यांसि पुण्य[४] इतुकें घडे निकें[५], भस्म होति शत कोटि पातकें. ॥ २३

रमा **सार**मासारखी वृत्ति ज्याची, करी चाकरी चापपाणी[६] तयाची, ।
जना सज्जना सत्य मिथ्या कळावें, कवी शीकवी शीघ्र जावोनि ध्यावें. ॥ २४

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

**'विद्वज्जीवन'** ग्रंथराज दुसरा उल्लास हा वर्णिला,
गोपाळीं **व्रज**नायकांसीं पुसिलें तो भाव सांगीतला[७]. ।
आतां गाइन कौतुकार्थ **ह**रिची क्रीडा[८] कालिंदीतटीं[९]
प्रार्थी **विठ्ठल** पंडितीं [१०]परिसिजे पद्यें महा [११]गोमटीं. ॥ २५

---

१. 'श्रुति'शब्दाविषयीं पुढील विवेचन मनन करण्यासारखें आहे:—'जिच्या योगानें धर्म ऐकूं येतो (समजतो) ती श्रुति, असा 'श्रुति'शब्दाचा मूलार्थ आहे. वेदमंत्र म्हणण्याचे वेळेस पाठकाचें चित्ताची एकाग्रता राहून अर्थानुसंधान राहावें म्हणून पुस्तकावरुन पठन करण्याचा निषेध शास्त्रकारांनीं केला आहे. ऐकून म्हणणें यावरुन वेदास 'श्रुति' हें नांव पडलें, व 'श्रुति' शब्दावरुन प्राचीनकाळीं लेखनकला भरतखंडांत नव्हती, अशीं अनुमानें यूरोपांतील विद्वान् करतात तीं बरोबर नाहींत. याप्रमाणेंच वेदार्थाचें स्मरण करुन त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्माचें ऋषींनीं विस्तारानें ज्यांत कथन केलें आहे, असे जे ग्रंथ त्यांचें नांव 'स्मृति.' असा 'स्मृति'शब्दाचा अर्थ प्राचीन संस्कृत ग्रंथकारांनीं केला आहे. याकरितां 'स्मृति' म्हणजे केवळ 'स्मरणानें पढण्याचे ग्रंथ' असा अर्थ करुन स्मृतिकालींही भरतखंडांत लेखनकलेचा अभाव होता असें म्हणणें निराधार आहे. कारण स्मृतींमध्यें न्यायसभेंत मानण्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत त्यांत लेखप्रमाण धरलें आहे.' (व्युत्पत्तिप्रदीप–पृष्ठ ६६ पहा.) २. नाना+आगमें=अनेक+शास्त्रें. ३. सातदां. ४. 'पूज्य' असाही पाठ आहे. ५. स्पष्ट, खरें, चोख. ६. कृष्ण. ७. सांग–सांगितला, माग–मागितला, असें भूतकाळचें रुप अंत्यास 'इत' लागून होतें. ८. लीला. ९. यमुनातटीं. १०. ऐकावीं. 'परिसिजे' 'लाहिजे' इत्यादि रुपें काव्यग्रंथांत विध्यर्थी योजतात हें प्रसिद्ध आहे. ११. सुंदर.

## उल्लास तिसरा.

(श्लोक.)

करकमळनितंबा सांवळी ब्रह्ममूर्ती,
प्रगटलि नटवेषें, व्यापिलें विश्व[1] कीर्ती; ।
अमृतपद[2] वराया सेतु हा पुंडरीकें[3]
कलियुगिं रचिलासे पाहवी[4] साक्षि लोकें. ॥ १
**भा**गीरथी **भी**मनदी समाना, **का**शीपुरी **पं**ढरि तत्समाना[5], ।
**वि**श्वेश तो **वि**ठ्ठल राज पाहा, सांगीतला मंत्र सुखें जपा हा. ॥ २
भू**वै**कुंठपुरी पवित्र नगरी **द्वा**रावती[6] दूसरी,
पृथ्वीहूनि बरी वसे वितिभरी श्री**वि**ष्णुचक्रावरी, ।
**का**शी सौम्य[7] पुरी, अपाय न करी जे दर्शनें उद्धरी,
नांदे मुख्य **ह**री, म्हणोनि चतुरीं वस्ती किजे[8] **पं**ढरीं. ॥ ३
माघस्नानें **प्र**यागीं सुकृत[9] **क**लियुगीं प्राप्त जें होय वेगीं,
जैसा घे सोमयागी[10] अमृतपद[11] जगीं, जें घडे साधुसंगीं, ।
जें कां अष्टांगयोगीं[12] गवसित सलगी ऊर्ध्वरेतःप्रसंगीं
तें श्रीमत्**पां**डुरंगीं **ह**रिचरणयुगीं पाविजे पुण्यभागीं. ॥ ४
प्राण्या[13] रे! घटिका न होय सुटका काल क्रमी नेटका,
मानीना फटकाल[14] देह लटिका मृत्कुंभ[15] हा फूटका, ।
ये जोडूनि टका दुरांश कटका जाऊनि कर्णाटिका,
तैसा कां भटका श्रिकृष्ण[16] चुटका साधी मना कंटका. ॥ ५

---

१. 'कृष्णकीर्ति' असाही पाठ आहे. २. मोक्षस्थान. ३. विठ्ठलभक्तविशेषानें. ४. 'पाहिजे' असाही पाठ आहे. ५. 'तुल्य जाणा' असा अन्य पाठ आहे. ६. द्वारका—कंसास मारून मथुरेमध्यें कृष्ण राहिला असतां, कंसाचा सासरा जरासंध मगधदेशचा राजा, याणें अठरा वेळां मथुरेस वेढा दिला; परंतु तो व्यर्थ झाला. तरी सुखानें राहण्याकरितां कृष्णानें द्वारकानामक नगरी गुजरायेच्या पश्चिमेस समुद्रामध्यें वसविली. पूर्वींचें द्वारका बेट समुद्रांत गुप्त झालें, व हल्लीं जी द्वारका आहे ती त्या द्वारकेच्या जवळच दुसरें बेट आहे असें म्हणतात. [विविधज्ञानविस्तार—पु० ५ अं० ६.] ७. 'सांबशरी अपार नगरी जे दर्शनें उद्धरी' असा अन्य पाठ आहे. ८. करावी. ९. पुण्य. १०. सोमयज्ञ करणारा, (राजसूय यज्ञ करणारा.) ११. मोक्षस्थान. १२. योगाचीं अंगें आठ आहेत:—नियम, प्राणायाम, प्रत्याहार इत्यादि. १३. 'पुण्याचा चुटका न होय घटिका' असाही पाठ आहे. या श्लोकांत 'टका' पदाची आवृत्ति आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. १४. नीच, हलकट. १५. मातीचा घडा. १६. येथें 'श्री' छंदोभंग न व्हावा म्हणून ऱ्हस्व केली आहे. असा प्रकार विठ्ठलाच्या काव्यांत सर्वगामी आहे.

चैत्र मास तिथि पूर्ण चंद्रमा, दिव्य कुंजवन कामिकलोपमा, ।
ते स्थळीं सुरत[1]रूतळीं हरी वाजवी सुरस [2]रत्नमोहरी. ॥ ६
तो व्रजासि मुरलीधर गेला, गोपिकासीं विरहज्वर झाला; ।
चालिल्या नविन कुंजवनासीं साभिमान [3]वृषभानुसुतेसीं. ॥ ७
[4]पाटव्य वर्णू जरि इंद्रियाचें तें [5]तों निजागार [6]मनोभवाचें, ।
शृंगारबाहूल्यरस[7]प्रबंधीं संक्षेप सांगेन कथासमंधी. ॥ ८
[8]मधुविपिना परमादर [9]जाया [10]रसं पहिला करि सादर [11]जाया, ।
[12]नग परिवेष्टित लंपटजाया [13]व्रजमहिषी हरिची पट [14]काया. ॥ ९
देशपरत्वें सुंदर [15]योषा प्राकृत लेणें लेत विशेषा, ।
संस्कृत मत्ते वर्णिन सोळा छंद निरोपी '[16]चंपकमाळा' ॥ १०
अभ्यंग चीर तिलकीं [17]मृगनाभि नेत्रीं मुक्तावली अगरुचंदन गोपगात्रीं ।
श्रीकुंडलें श्रुतिपुटीं, [18]मणिमुक्त नाकीं [19]पत्रावली कुचयुगीं [20]रचना विलोकी. ॥ ११
[21]मनगटीं वलयावरि आदरें, [22]पदयुगीं झणकारिति [23]नेपुरें; ।
[24]सरळभूषणमंडित वेणिका, मग विडी वदनीं धरि राधिका. ॥ १२
कानीं [25]तानवडे विचित्र [26]सुघडे चंद्रोपमे [27]चोखडे,
चोळीचें निरडें दिसे धड पुढें मुक्ताफळा येवढें; ।
रंगाचें लुगडें, कृशांग उघडें, दावीतसे चोखडें,
स्वर्गीचेहि पडे, भुले मन कुडें, देखोनियां रूपडें. ॥ १३

---

१. येथें 'तरु' शब्द छंदोभंग टाळण्यासाठीं दीर्घ केला आहे. २. उत्तम पांवा. ३. राधिकेशीं. ४. पटुता, कुशलता. ५. तर. ['तों' हें पादपूरणार्थक अव्यय जाणावें.] ६. मदनाचें. ७. 'प्रसंगीं' असाही पाठ आहे. ८. या श्लोकाचें वृत्त **तामरस**. 'इह वद **तामरसं** नजजाय:' ह्या लक्षणाप्रमाणें या श्लोकाच्या प्रत्येक पादांत न, ज, ज आणि य असे गण येतात. ९. जाण्यासाठीं. १०. पहिला रस=शृंगाररस. ११. स्त्रियांस. १२. 'जग परिवेष्टित' असाही पाठ आहे. १३. गोकुळांतील स्त्रिया. १४. 'जाया' असाही पाठ आहे. १५. स्त्री. १६. या श्लोकाचें वृत्त 'चंपकमाला' होय. याच्या प्रत्येक पादांत भ, म, स, आणि एक गुरु अक्षर अशी रचना असते. यांत पांचव्या अक्षरावर यति आहे. याचा अन्य पाठ:-'देशपरत्वें प्राकृत लेणें । देतिहि रत्नें भूषित लेणें ॥.' १७. कस्तुरी. १८. नथ. १९. पत्रावळी='पत्राकार पंक्ति—शृंगारी पुरुष स्वहस्तानें कुंकुमकेशरादि सुगंध द्रव्यांनीं आपल्या प्रियांच्या स्तनगल्लाद्यवयवांवर मकरपत्राकार वेलबुट्टी काढितात ती.' [यशोदापांडुरंगी—केकावली पृष्ठ ४७.] २०. 'रसना' असाही पाठ आहे. २१. 'मनगट=मणगट=मणिबंध. २२. दोन पायांत. २३. नूपुरें=पैंजण. २४. 'रूळत अंचळ मंडित वेणिका' असाही पाठ आहे. २५. अलंकारविशेष. २६. सुंदर. २७. उत्तम.

नीळे निर्मळ [1]पुष्पराग [1]मरकें [1]वैडुर्य चिंतामणी,
[1]माणिक्यें मणि [1]पद्मराग जडिले राधेचिया भूषणीं, ।
गोमेदो[1]त्पलपा[1]चिरत्ननिकरीं वज्रप्रभालादिभा,
श्री[2]जांबूनदहेम त्यावरि पडे मुक्ताफळांची प्रभा. ॥ १४

नीळी [3]कलिंदतनया [4]नवरोमराजी, मुक्तावळी सुरनदी [5]धवळी विराजी, ।
मध्यें सरस्वति प्रवाळमणी निवेदी, तीर्थ प्रयागवनिता [6]हृदयारविंदीं. ॥ १५

कुचीं कंचुकी [7]भूषसंन्यास केला, मनींचा तिनें भ्रष्ट [8]संन्यास केला; ।
अहंताप तो देवकन्यास केला, महागर्व त्याचा [9]उपन्यास केला. ॥ १६

करी स्वच्छ सारंग [10]सारंगनेत्रा, निरीक्षी कसा रंग सारंगनेत्रा. ।
[11]मृगांक स्वता रंग [12]सारंगपाणी, दिसे लालसा लाल सारंगपाणी. ॥ १७

निघाली वना राधिका कामसेना, न वाखाणितां ग्रंथ साक्षीस येना; ।
स्मराचा सखा चंद्रमा होय माना, मुखीं साम्यता पावली सत्यभामा. ॥ १८

[13]मृगाक्षी म्हणे कीं [14]नवीनांबुजाक्षी [15]चलन्मीनदृग्बाण ते [16]खंजनाक्षी, ।
स्फुरे भ्रूलता वक्रचाप स्मराचें, [17]महा वाद्य [18]कंबुग्रिवा शंकराचें. ॥ १९

([19]मंदिरावृत्त.)

[20]पीन [21]पयोधर कीं [22]धरणीधरमंदरमेरुघनस्तनलिंगें,
कीं [23]करिशावककुंभ किं कंदुक गुच्छ करी धरि जोति अनंगें, ।
कीं कुचमंडल कीं [24]घटवर्तुल तालफळें [25]वृंतें गोल सदा
बिल्व कपित्थ अलंबु पदा छंद कवींद्र म्हणे प्रमदा. ॥ २०

---

१. रत्नविशेष. २. सोनें. ३. यमुनानदीचें उदक काळें, व गंगेचें शुभ्र आहे. ४. 'तनुरोमराजी' असाही पाठ आहे. ५. पांढरी. ६. हृदयकमळांत. ७. भूषणें घालणें. ८. संन्यास=उत्तम विचार. ९. त्याग, एकीकडे ठेवणें. १०. हरिणाक्षी, एणाक्षी. ११. चंद्र. १२. कृष्ण. (शार्ङ्गपाणि=शार्ङ्ग चाप ज्याच्या हातांत तो.) १३. मृगशावाक्षी, मृगशावनयना. १४. नूतनकमलनेत्रा. १५. चंचल मीनाप्रमाणें कटाक्षशर जिचे अशी. १६. खंजनपक्ष्याप्रमाणें डोळे जिचे ती. १७. 'महावाद्य कंबुग्रिवा कंठ साचे' असाही पाठ आहे. १८. कंबूसारखी (शंखासारखी) ग्रीवा (कंठ) ज्याची तो. ['रेखात्रयांकिता ग्रीवा कंबुग्रीवेति कथ्यते' इति हलायुधः—वीरराघवकृत टीकान्वित महावीरचरित पृष्ठ ८३.] १९. याचें हिंदुस्थानी नांव '**मत्तगयंद.**' या छंदाला सवाई म्हणण्याचा परिपाठ आहे. हीच फार पाहण्यांत येते. कामदावृत्ताप्रमाणें सवाईत गणभेद, अक्षरभेद आणि क्रमभेद कधीं कधीं आढळतात. या पद्याच्या उत्तरार्धातच गणभेद आढळतो तो वाचकांनीं पहावा. २०. पुष्ट. २१. स्तन. २२. पर्वत. २३. गजबालगंडस्थल. २४. कुंभ. २५. वाटोळे.

(श्लोक.)

योद्धा महा पुष्पधनुष्यबाणीं त्याचे करीं शस्त्र जसें [1]सुपाणी, ।
तैसी दिसे भूषणयुक्त वेणी कीं सांवळी [2]नागिणिकांचि वेणी. ॥ २१

बाल नाग लघु [3]गोंडेस साजिरी हेमदंड कर [4]मंडित त्यापरी, ।
[5]दुर्ग धाम तनु दुर्ग भूवरी युध्यते रतिनितंब[6]केसरी ॥ २२

स्मराचे घनाकार कर्ण स्त्रियांचे शुचीदंतपंक्ती हिरे मन्मथाचे, ।
सुजिव्हा जसी ते नदी [7]ताम्रपर्णी तनू दिव्य कांता [8]सुकंदर्पवाणी. ॥ २३

बाणांकुशांबुज····हृदयांबु पेटी, [9]रंभोरु नाभि विरहा परि येक पाटी, ।
[10]सोपानमार्ग [11]त्रिवळी स्मर खड्गपाणीं, पादाब्ज कामकमळें नवपद्मवाणी. ॥ २४

वना निघाली [12]गजमत्तचाली कामेश्वराची चमु दिव्य झाली, ।
तीचे शिरीं छत्र धरी मुरारी, उष्णें पिडीना भृश [13]भानु कारि. ॥ २५

अलंकार त्याली [14]प्रफुल्लांबुजाक्षी निकुंजालया जावयातें [15]अपेक्षी; ।
ठकारें निघाली मदोन्मत्त चाली मनीं [16]राजहंसासि लज्जा उदेली. ॥ २६

कल्याण नेती शकुन प्रयाणीं, [17]स्वेच्छें वरी रत्न अनेक लेणीं, ।
मुहूर्त जुंबाड [18]घबाड मानी, केंद्र त्रिकोणीं ग्रह सौम्यलग्नीं. ॥ २७

[19]तेथें चंद्रमुखी तिची प्रियसखी आली मनासारखी,
तैं बोले स्वमुखीं धरोनि वळखी मी हो ! नव्हे [20]परखी, ।
[21]सांगे कार्य, सुखी करी नवि सखी, पाहे वनें आणखीं,
घेई ये चवखी प्रमाण निरखी साक्ष स्वभू शंभु कीं. ॥ २८

---

१. उत्तम पाणीदार, तीव्र. २. नागिणींचें वेंटाळें. ३. 'षोडश' असा पाठ ग्रहण केल्यास 'सोळा वर्षांची' असा अर्थ होऊं शकेल. ४. 'दंड तया वरी' असाही पाठ आहे. ५. 'गुह्य' असाही अन्य पाठ आहे. ६. सिंह. ७. ताम्रपर्णी=मलयपर्वतापासून उत्पन्न होणारी नदी. ही फार लहान आहे तरी हिची मौक्तिकांविषयीं ख्याति आहे. [रघुवंश–सर्ग ४-५० 'मिळे ताम्रपर्णी समुद्रास जेथें । अती उत्तमें मौक्तिकें होति तेथें'.] ८. मदनासारखी. ९. कदलीसारख्या मांड्या जिच्या ती रंभोरु. (रंभा+ऊरु =कदली+मांडी.) १०. पायऱ्यांचा मार्ग. ११. त्रिवली=उदरावरील तीन चिरम्यांचा समूह ती. १२. मत्तगजगामिनी. १३. सूर्य. १४. विकसितकमलनेत्रा. १५. इच्छी. १६. राजहंस. ['राजहंसास्तु ते चंचुचरणैर्लोहितैः सिताः' इत्यमरः.] १७. 'सवत्स वरि वत्स' असाही पाठ आहे. १८. घबाड मुहूर्त=शुभ मुहूर्त. १९. कुंजवनांत. या पद्यांत वारंवार 'खी' या वर्णाची आवृत्ति झाली आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. २०. परकी. २१. 'सांगे कार्य सुखी करी नवि सुखी सांगे नये आयकी' असाही पाठ आहे.

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

**विद्वज्जीवन** ग्रंथराज, तिसरा उल्लास तो वर्णितां,
　　[1]चित्तोल्लास कवीश्वरासिं हरिनें केला, कथा ऐकतां, ।
गेल्या कुंजवनासि [2]हंसगमना पाहावया श्रीहरी;
　　प्रार्थी **विठ्ठल** पंडितीं परिसिजे, दारिद्र्यदोषा हरी. ॥　　२९

---

## उल्लास चवथा.

(श्लोक.)

कानीं [3]कांचन [4]कुंडलें, कर [5]कटीं, कंठीं [6]सुमुक्तावळी,
　　भालीं चंदन, [7]पीत चीर जघनीं, काया खुजी सांवळी; ।
[8]श्रीवत्सांकित भूषणें प्रगटलीं [9]भीमापेगच्या तटीं,
　　श्रीमद्रुक्मिणिकांतमूर्ति हृदयीं मी ध्यातसें [10]गोमटी. ॥　　१
[11]जेणें आचरणें करोनि तरणें तें कां न कीजे म्हणे?
　　काळें आप्तपणें दिल्हे [12]अवन जें तें तों नये टाकणें, ।
ज्या नामस्मरणें करोनि [13]तरणें सायुज्यता भाकणें
　　तें कां न स्मरणें अधर्म करणें, हे श्लाघ्य कोण्या गुणें. ॥　　२
　　निकुंजवन शोधिलें, गणपचक्र धुंडाळिलें,
　　　　सहस्रदळ टाकिले, ग्रहदशा⋯⋯⋯पाहिले, ।
　　अनाहत उलंघिले उपरि यान आरंभिलें,
　　　　विशुद्ध वन लागलें, [14]सरळ वृक्ष पृथ्वी भले. ॥　　३
[15]सहस्रपत्रा रुजिणावयाचे, [16]उपाय हे ते स्थळिं जावयाचे, ।
दारिद्र्यदावानळचक्र मध्यें उल्लंघिल्या प्राप्त निजात्मबोधें. ॥　　४

---

१. चित्ताला आनंद. २. हंसगामिनी गोपी, हंसासारखें सुंदर गमन (गति) ज्याचें त्या. ३. सोन्याचीं. ४. कुंडलें="सोन्याचीं कुडीं. यांत एक खालोखाल एक व एकावर एक बसविलेलीं तबकटें असून त्यांच्या कोंदणांत हिरे बसविलेले असत. प्राचीन काळीं स्त्रियांप्रमाणें पुरुषही असलीं कुंडलें कानांत घालीत. व उत्तर हिंदुस्थानांत अजून सुद्धां तसें करितात." [देशी हुन्नर–पृष्ठ ४५.] ५. कमरेवर हात. ६. मोत्यांची कंठी. ७. पिंवळें रत्न. ८. श्रीवत्स भूषणानें युक्त. ९. भीमानदीच्या तीरीं. १०. सुंदर. ११. ज्या (आचरणानें). १२. संरक्षण. १३. संसारसागरतरण. १४.'सुरस वृत्त पृथ्वी भलें' असाही पाठ आहे. १५. कमळा. १६. 'भुतावळिचे झगडे सभोंते' असाही पाठ आहे.

[1]भ्रुमध्याग्नि गोल्हाट टाकोनि द्यावे, सुषुम्नासवें ब्रह्मरंध्रासि जावें, ।
कपाटासि पाठा पडे जैं स्वभावें न यावें पुन्हा त्याच डोहीं बुडावें. ॥ ५
मद्भक्ति चौथी [2]परिचारिका म्हणे प्रिया प्रिया चक्र [3]किरीट भूषणें, ।
नवीन पाहे फुलल्या वनस्पती, वसंत आला ऋतु या वनाप्रती. ॥ ६
आतां '[4]वसंततिलका' सखि ! नाम याचें, '[5]सिंहोन्नता' कलियुगीं मत कश्यपाचें, ।
'उद्धर्षिणी' मग वरी कथिली ललामें या द्वापरांत 'मधुमाधवि' युक्त नामें. ॥ ७

अशोकवनस्थळिमाजि [6]विराजी [7]महाहरिचंदनपादपराजी, ।
सखि ! [9]सहकार [10]महीरुह नाम कथिति कवीश्वर [11]मौक्तिकदाम. ॥ ८
कोराट पालाश कदंब निंब, [12]औदुंबरा[13]श्वत्थ मधु [14]प्रलंब, ।
संतान रातांजन पारिजात मंदार कल्पद्रुम या वनांत. ॥ ९
शाल विशाल विराजित कोटी [15]मॉल विशाल तरूघन वाटी, ।
चित्र विचित्रहि ताल समीपें शील सुशील सुगंधित पुष्पें. ॥ १०
चारी बोरी आंवळी, सोनकेळी, चिंचा, मेथा, कर्दळी, नारिकेळी, ।
मल्ली वल्ली आठरा भार [16]संख्या त्या⋯⋯शालिनी मुख्य मुख्या. ॥ ११
आंवळि, शालमली तिळ, भोंकरि, रायणि गोंदणि पीपका ये परी, ।
पूगि खजूरि काद्रावडि द्राक्षिका नागवल्लिलता दाखवि शालिका. ॥ १२
चापे केतकि मोगरे सुरतरू जाईजुई शेंवती,
वेणू वेत कणेर मंद पवनें [17]हेलाविती मालती; ।
भूपाळें मधु माधवें वनलता साऱ्या प्रफुल्ला महा,
वल्लीचें ऋतुचें स्वयंवर पटा [18]शार्दूलविक्रीड हा. ॥ १३

---

१. येथें छंदोभंग झाला आहे. २. दासी. ३. मुकुट. ४. 'वसंततिलका'वृत्तालाच उद्धर्षिणी, सिंहोन्नता, सिंहोद्धता आणि मधुमालती अशींही नांवें आहेत. 'उक्ता वसंततिलका तभजा जगौ गः । सिंहोन्नतेयमुदिता मुनिकाश्यपेन । उद्धर्षिणीयमुदिता मुनिसैतवेन' । नागेन सैव गदिता मधुमाधवीति ।' [वृत्तरत्नाकर पृष्ठ ४८ पहा.] ५. 'सिंहोद्धता कृतयुगीं मत कश्यपाचें' असाही पाठ आहे. ६. शोभे. ७. उत्तम प्रकारचा चंदन. ८. वृक्षपंक्ति. ९. आम्र. १०. वृक्ष. ११. या वृत्ताचें नांव 'मौक्तिकदाम.' याचें लक्षण 'चतुर्जगणं वद मौक्तिकदाम' असें आहे. यांत चार जगण असतात. १२. उंबर. १३. पिंपळ. १४. वृक्षादिकांची शाखा. १५. 'माल तमाल तरू घन वाटी' असाही पाठ आहे. १६. 'शाखा' असा अन्यपाठ आहे. १७. हालतात. १८. या श्लोकाचें वृत्त 'शार्दूलविक्रीडित' आहे. याचें लक्षण असें आहे:—'मसजैः सततैर्गेन युक्तमेकोनविंशवत् । शार्दूलक्रीडितं प्राहुश्छिन्नं द्वादश सप्तभिः ॥ ३६ ॥' [सुवृत्ततिलक—प्रथम विन्यास.] 'साकाराद्यक्षरैः पादपर्यंतैः सविसर्गकैः । शार्दूलक्रीडितं धत्ते तेजो जीवितमूर्जित-

श्रोते हो! वनकुंज त्यांतिल महा तेथें ऋतू नोवरा,
आलासे मलयानिल द्विपिंहुनी बैसोनि त्या सैंवरा; ।
वल्ली मात्र कलत्र[1], वृक्ष तितुके पौरस्त साधू वनी,
वाद्यें[2] वाजति शंख[3] दुंदुभि[4] झणत्कारेंहि नाना ध्वनी. ॥ १४
ब्राह्मण सप्तक जोसि तरूतळिं शिबि वाहन सुखें करिती,
मंगल मंत्र विलोकि तटाकिं तटीं कुहु कूहु शब्द करिती ।
सौक्ष[5] हुताशन लग्न स्मरे विरहाग्नि कलिंदिनी तीर्थी,
क्षेत्र सुशीतल साइ मधुवन वापि[6] पवित्र दिसे शुभार्ती. ॥ १५
या वसंतासवें ग्रीष्म आला जवें वृक्ष तेथले वैभवें गौरवीले
तापली शीतळें होति मंदानिलें पांथ साधू जळें शांत केले; ।

---

म् ॥ ३५ ॥ विसर्जनीयस्योत्वेन पदैर्निम्नोन्नतैरिव । शार्दूलक्रीडितं याति पाठे सायासतामिव ॥ ३६ ॥ विच्छिन्नपादं पूर्वार्धे द्वितीयार्धे समासवत् । शार्दूलक्रीडितं भाति विपरीतमतोऽधमम् ॥ ३७ ॥ आद्यंतयोर्गुणोत्कर्षकांत्या सर्वातिशायिनोः । शार्दूलक्रीडितं धत्ते मध्ये तद्गौरवोन्नतिम् ॥ ३८ ॥ आद्यंताकारविरहात्पर्यंते चाविसर्गतः । शार्दूलक्रीडितं स्वस्य रूपं नैवोपलभ्यते ॥ ३९ ॥' [सुवृत्ततिलक–द्वितीय विन्यास.] 'शौर्यस्तवे नृपादीनां शार्दूलक्रीडितं मतम् ॥ २२ ॥' [सुवृत्ततिलक–तृतीय विन्यास.] याचा भावार्थ असा:—ज्या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत १९ अक्षरें असतात आणि बाराव्या आणि त्यानंतर सातव्या अक्षरावर यति असतो आणि ज्यांत म-गण, स-गण, ज-गण, स-गण, त-गण, त-गण आणि एक गुरु अक्षर अशी रचना असते त्यास **शार्दूलविक्रीडित** वृत्त म्हणावें. अकरादिपासून विसर्गापर्यंत प्रत्येक चरणांत अक्षरें गोविलीं असलीं तर तें **शार्दूलविक्रीडित** मोठें भारदस्त आणि सतेज असें समजावें. जागोजागीं विसर्गयुक्त पदें आल्यानें **शार्दूलविक्रीडित** म्हणतांना खालउंच चालल्याप्रमाणें हिसके बसतात. पूर्वार्धांत वेगळालीं पदें असलीं व द्वितीयार्धांत समासयुक्त असलीं तर तें **शार्दूलविक्रीडित** विपरीत आणि निकृष्ट समजावें. आरंभ आणि अंत हे सुंदरतम साधतां आले तर गुणोत्कर्षाच्या सौंदर्यानें मध्यभागीं **शार्दूलविक्रीडिता**स गौरव आणि श्रेष्ठत्व प्राप्त होतें. आरंभीं आणि शेवटीं 'आ'कार नसला व अंतीं विसर्ग न आला तर **शार्दूलविक्रीडिता**स आपलें स्वरूप प्राप्त झालें नाहीं असें समजावें. राजे वगैरे भुजबलशाली वीरांच्या शौर्याची प्रशंसा करायाची असली तर **शार्दूलविक्रीडित** योजावें, असें ज्ञात्यांचें मत आहे.

१. स्त्री. २. 'वाद्यें वाजति ते मधुव्रत पुढें गुंजार शाखा ध्वनी' असाही एक पाठ आहे. ३. शंख–"शंकराचा पांचजन्य व विष्णूचा देवदत्त त्यांचीं हीं धाकटीं भावंडें होत. बौद्ध धर्माचेही लोक शंख वाजवितात. जंगमाचें तर हें उदरनिर्वाहाचें साधन आहे." [देशी हुन्नर–पृष्ठ ३९.] ४. दुंदुभि=(नौबद) एक प्राचीन रणवाद्य अशी याची प्रसिद्धि आहे. ५. 'साक्ष हुताशें नलासि स्मरे विरहासि कलिंदिनीतीर्थी' असाही पाठ आहे. ६. 'वायु पवित्र शुभार्थी' असाही पाठ आहे.

त्यासवें मागुते सस्य वर्षा ऋतु ते मेघ धारामृतें वाढवीले
वृत्त हें पैं भलें [1]**दं**डका वर्णिलें सत्कवी **विठ्ठ**लें पद्य केलें. ॥ १६

वेदप्रगल्भ दूतिका मनोहरा [2]प्रमाणिका ।
विचारी जे विचक्षणी महानग स्वरूपिणी. ॥ १७

जल कंबुशे बहु [3]पंक होय वाटे नद नदी याप्रति पूर फार दाटे ।
धन दुर्दिनोत्तम मानला समग्रा रस निपजे सखि! वृत्त '[4]**पु**ष्पिताग्रा' ॥ १८

कांतालक्षण दुर्ग [5]उग्र मलके जिंकावया कारणें,
केली चाल गडोत्तमासि भवती सामंत संरक्षणें, ।
ते ते कोण म्हणाल हो! चतुरसे ते लागले सांगणें,
शृंगारोत्कट **शो**णभद्र फुगला श्रीसत्कृपेच्या गुणें. ॥ १९

आत्मभू **ब्र**ह्मभू **रा**मनामें बरी दोष स**द्वि**ठ्ठलातें दिजे चातुरीं, ।
ग्राम याचे चिदाकाश येणें घडे, शक्रचापा बरे द्वार पूर्वेकडे. ॥ २०

प्राग्द्वारें स्मर [6]भूभुज प्रगटला वेष्टीत सेनासवें,
शंख स्फूरण मेघ दुंदुभि झणत्कारोनि नाना रवें, ।
[7]दंती मंतद्रि गंधराधिकवधू गंडस्थळींचा [8]मंदू
मेघोद्धारतुषारबिंदु गळती जिंकोनि घ्यावा वधू ॥ २१

विद्युल्लतालक्षण खड्गवल्ली हे वेळ वेळा **र**तिनाथ झेली ।
आकाश कोशांत निवांत नांदे नाचे मयूरी रसराज दोंदे. ॥ २२

**का**माचा **म**लयानिलोत्तम रथ शृंगारिला [9]सौरभें,
[10]हांतीं शस्त्र धरोनि दावि महिमा कोंडे **र**ती वल्लभे; ।
[11]प्रत्यंचा भ्रमरावळी ऋतुपती **का**मासवे सारथी,
[12]बैसोनी **म**करध्वजें कटक, ही केली विराजे स्थिती. ॥ २३

---

१. हें एका वृत्ताचें नांव आहे. २. हें वृत्ताचें नांव आहे. याच्या चरणांत जगण, रगण, एक लघु व गुरु अशीं अक्षरें असतात. ३. चिखल. ४. हें अर्धसमवृत्तांपैकीं वृत्त आहे. यालाच 'औपछंदसिक' असेंही म्हणतात. याचें लक्षणः—'अयुजि नयुगरेफतो यकारो युजि तु नजौ जरगाश्च पुष्पिताग्रा.' न, न, र, य (सम चरण) न, ज, ज, र, ग (विषम चरण) अशी याची रचना असते. ५. 'गर्भ छलके' असाही पाठ आहे. ६. राजा. ७. 'दंती मत्त झलंदरोदक झरे गंडस्थळींचा मदू' असाही पाठ आढळतो. ८. मदोदक–गंडस्थळांतून स्रवणारें उदक. ९. सुवासानें वसंतांतील सुगंधानें. १०. 'हातीं पुष्प धनुष्य पंच धरिलीं कोंडे रती वल्लभें' असाही पाठ आहे. ११. दोरी. १२. 'वर्षती' असाही आहे.

सेना तीन वयें वनांकुर महा मंत्री अलंगावरी,
　　ठाणीं बैसविलीं [1]जिणोनि नगरें [2]मुग्धांगदेशांतरीं; ।
जे जे जे उपमेसि रम्य तितुके दुर्गाधिकारी धरी,
　　चोराचें स्थल चार मंडल पुरी मुक्तापगेच्या तिरीं. ॥　　२४
कामें गौरविला विलासमहिमा आरंभिला तो उभा,
　　[3]तन्वंगी सुकुमार तूं [4]घनतमामध्यें जसी पौर्णिमा, ।
रंभेची प्रतिमा मुखासि उपमा साजे [5]शरच्चंद्रमा,
　　वाग्बाणीं परमादरें प्रियतमा जिंकोनि ये [6]संग्रमा. ॥　　२५
हस्तीचीं [7]यमलें [8]महामदजळें दावेति गंडस्थलें,
　　त्या गर्वें विपुलें [9]मधूकरकुलें वारी [10]स्वकर्णानिळें; ।
हें पाहे सगळें उणेंपण बळें [11]आलें असें [12]आगळें,
　　जाती भृंगकुळें वनांत कमळें [13]शोधावया पुष्कळें. ॥　　२६
श्रीदुर्गी उघडे [14]पयोधर पडे आधी करी [15]वांकुडे,
　　तेणें कंदुक उंच [16]खंदकि पडे घेवोनियां तो भिडे; ।
यालागीं न पडे सुवर्ण लुगडें देहा तिच्या रोकडें,
　　केल्या यत्न बुडे, प्रयत्न न घडे, सायोज्यता सांपडे. ॥　　२७
दे सत्कार [17]मनोज युद्ध [18]करितां [19]योषांगनाकारणें,
　　[20]श्रवणीं तें नव चित्र कर्णयुगुलें दे कुंडलें भूषणें, ।
हस्तातें मणिकंकणें श्रककुची तांबूलबिंबाधरा
　　केलें बंधन त्या [21]कुचासि समरीं जे पाठिमोरा परा. ॥　　२८
स्वर्गी कल्पलता पवित्र [22]सरिता वाहे सुधेचि स्वतां,
　　दिव्य स्त्री सुरतासि मुक्त बहुता [23]भोगांगना उद्धता; ।

---

१. जिंकोन. २. सुंदर स्त्रियांच्या अंगप्रदेशांतील. ३. कोमलांगी. ४. मेघांच्या अंधकारांत. ५. शरत्कालीन चंद्र. ६. युद्धा. ७. जुळें. ८. विपुल मदोदकानें. [मद=गंडस्थळांतून स्रवणारें उदक.] ९. मधूकर=मधुकर=भ्रमर=भुंगा. [मधुकर=फुलांवर उडून मधु (मध) गोळा करणारा=भ्रमर.] १०. कानाच्या अनिळें (वायूनें). ११. 'आले महत्वागळें' असाही पाठ आहे. १२. मोठें. १३. 'सेवावया' असाही अन्यपाठ आहे. १४. स्तन. १५. या श्लोकांत 'डे' या वर्णाची आवृत्ति झाली आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. १६. 'कंदुकिं' असाही पाठ आहे. १७. काम. १८. 'शमतां' असाही पाठ आहे. १९. योषा=स्त्रिया. २०. कानांत. २१. 'कुंतलांसि' असाही पाठ आहे. २२. नदी. २३. भोग्य स्त्रिया. (भोगांगनेपेक्षां धर्मांगना (धर्मपत्नी) श्रेष्ठ होय.)

पुण्याची गणिता सरे, मग रिता प्राणी पडे खालता,
हे तारे गळताति तेंवि महता तैसी न सायोज्यता. ॥ २९

आला शरत्काळ सुकाळ झाला, लतांगनाचा गण गौरवीला; ।
निः[1]कंप जाली येंजनास[2] मुंदी शरत्स्त्रिचें साम्य मुखारविंदीं[3]. ॥ ३०

सूर्याचे वहिले[4] मयूख[5] हरिले हेमंतभूपें भले,
स्त्रीवक्षोजगडद्वयावरि तया[6] कारागृहीं घातले; ।
तेजें मंद रवी ऋतु प्रगटला होतां हिंवाळा स्वयें
कांतेचें स्तनमंडळी बसतसे[7] अद्यापि उष्णा जवें. ॥ ३१

यमुना वन माजविलें शरिरें, निजवैभव दाखविलें चतुरें; ।
नवपल्लव शोभति ते बरवे, सखि! 'तोटक[8]' वृत्त जगीं मिरवे. ॥ ३२

श्रीकृष्णाविण कृष्णसारनयना[9] दीनाचिया सारखी,
बोले प्राणसखी [10]त्वरें उठविली 'पाहूं वनें आणखीं,' ।
हस्तें हस्त धरूनियां उपवनीं[11] दोघी जणीं शोभती,
राधा प्रश्न करी पवित्र तुलसी देखोनिया श्रीपती. ॥ ३३

'विश्वातें तुलसी! पवित्र करिशी, वृंदावनीं[12] [13]नांदसी,
पत्रीं[14] तेतिस[15] कोटि देव धरिसी, तीर्थ स्थळीं पाळिसी, ।
ब्रह्मा मूलविसी, मुकुंद कटिशीं, शूली[16] शिरीं वंदसी,
पुण्याची तरि राशि विठ्ठल म्हणे, 'लोळूं तुझें भूमिसीं.' ॥ ३४

हळु चढाळ दिल्हे मलयानिलें तरुण मंजरि कांपविली दळें ।
समजली [17]हरिणांकनिभानना मृगि मृगासि पुसे मृगलोचना. ॥ ३५

---

१. 'निःपंक' असाही पाठ आहे. २. 'पूतनासमृद्धी' असा पाठ लेखी प्रतीवरून दिसतो. ३. मुखकमलावर. [अरविंद=कमळ.] ४. सत्वर, तत्काळ. ५. किरण. ६. 'बलें कारा अहि घातलें' असाही पाठ आहे. ७. 'लपतसे' असाही पाठ आहे. ८. पुढें ३७ व्या श्लोकावरील टीप पहा. ९. मृगलोचना (स्त्री) कृष्णसार=मृग, काळवीट, नयन=नेत्र. १०. 'प्रती' असाही पाठ आहे. ११. उपवन=बाग, उद्यान. १२. वृंदेच्या वनांत. [जालंधरदैत्याची स्त्री वृंदा, तिचें जें वन तें वृंदावन.] वृंदावन म्हणजे तुळसी लावण्याची कुंडी जागा इत्यादि असा अर्थ कालांतरानें झाला आहे.] १३. राहसी. १४. दलामध्यें, तुलसीपत्रांत. १५. आठ वसु, बारा आदित्य, अकरा रुद्र, आणि दोन आश्विन मिळून तेतीस देव होतात, त्यांचेच तेतीस कोटी झाले. 'अदित्यां जज्ञिरे देवास्त्रयस्त्रिंशदरिंदम ॥ १४॥ आदित्या वसवो रुद्रा अश्विनौ च परंतप' ॥१५॥ [आरण्यकांड–सर्ग १५ वाल्मीकिरामायण.] १६. शंकर. १७. चंद्रानना. (हरिणांक=मृगांक, चंद्र, निभ=सम, तुल्य, आनन=मुख.)

[1]उत्यंका हरणी कसी विहरणी वैगुण्यसंभाषिणी,
बालांतःकरणीं निवोनि सजणीपासीं कथी काहणी, ।
हा गुप्तार्थ गुणी बुझोत श्रवणीं वैगुण्यसंभाषणीं
वाग्दोषें मृगिणी वनांत अझुनी नांदेति पर्याटणीं. ॥ ३६

पळसि धरुनि ताठा, काय गा **नी**लकंठा!
विभुविण **व**इकुंठा चालिला प्राण पीठा; ।
कमलिनिनलदेठा खालता लोक लाठा,
[2]तैरि अति उतकंठा लागली पुष्यपीठा! ॥ ३७

[3]कमला क्षणिं प्रश्न करी कमळा, कमलावरि शोभविसी कमळा, ।
कमलावर आणि प्रिया कमळा, कमला कथि तूं त्यज पंक मला. ॥ ३८

नदि**य**मुनेचें स्थिर बहु पाणी, क्षि[4]तिवनितेची सरळ सुवेणी, ।
नग परिवेष्टित वल्लि पवित्रा शशिवदना या '[5]कुसुमविचित्रा'. ॥ ३९

सखियास वदे व्रज गोरटी, भ्रमता न पवे हरि संकटीं, ।
श्रमली न चले पद येथुनी, जन हो! परिसा [6]अतिशायिनी. ॥ ४०

[7]कुंड मंडपिं दिव्य उन्नत पादपीं तप योजिलें,
क्षेत्र [8]हृद्वन पुण्यपावन [9]मंत्रसाधन मांडिलें; ।
पद्मलोचन तापमोचन हेंचि चिंतन ते करी
[10]छंद हा 'वि[11]बुधप्रिया' वरि निश्चयात्मक [12]वैखरी. ॥ ४१

---

१. 'उत्प्रेक्षा हरणी किजे विहरणीं देखोनियां शाहणी' असाही अन्यपाठ आहे. २. 'तसि-परि' असा अन्य पाठ आहे. ३. या श्लोकाचें वृत्त तोटक. 'इह तोटकमंबुधिसैः प्रथितम्' असें याचें लक्षण. याच्या प्रत्येक पादांत चार सगण येतात. यति पादांतीं असतो. याचें लक्षण 'सुवृत्ततिलकां'त सांगितलें आहे तें:—'सकारैरन्वितं वृत्तं चतुर्भिर्युगपत्स्थितैः । उदितं तोटकं नाम वृत्तज्ञैर्द्वादशाक्षरम् ॥' [श्रीक्षेमेंद्रकृत सुवृत्ततिलक २।५]; 'द्रुततालल्यैरेव व्यक्तं रूक्षाक्षरैः पदैः । प्रनर्तयति यच्चित्तं तत्तोटकमभीप्सितम् ॥' [सुवृत्ततिलक २।१६]. ४. पृथ्वीरूप स्त्रीची. ५. 'कुसुमविचित्रा' हें या वृत्ताचें नांव आहे. याचें लक्षणः—'नयसहितौ न्यौ कुसुमविचित्रा' असें आहे. याच्या प्रत्येक पादांत न य न य असे गण यथानुक्रम येतात. ६. या श्लोकाचें वृत्त **उपचित्र.** याच्या प्रत्येक चरणांत तीन सगण एक लघु अक्षर व एक गुरु अक्षर अशी रचना असते. 'उपचित्रमिदं सससा लगौ' [वृत्तरत्नाकर—तृतीय अध्याय]. ७. 'पुष्पमंडप दिव्यपादप ते स्थलीं तप योजिलें' असा अन्य पाठ आहे. ८. हृदयरूप वन. ९. 'मोक्षसाधन' असाही पाठ आहे. १०. वृत्ति, वर्तन; (पक्षीं) वृत्त. ११. देवांना प्रिय; (पक्षीं) विबुधप्रिया हें वृत्ताचें नांव; र स ज ज भ र असे सहा गण यथानुक्रम याच्या प्रत्येक चरणांत येतात. १२. वाणी.

कृष्णें मच्चित चोरिलें, तरि कथा संपूर्ण दोषा हरी,
जारत्वें [1]गुरुतल्पदोषदहनें होती क्षणाभीतरी; ।
श्रीरामायण जो [2]कवीश्वर कथी तद्ब्रह्महत्या हरे,
[3]हालाप्राशन सर्व दोष हरिती जो [4]पूतनारि स्मरे. ॥ ४२

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

विद्वज्जीवन ग्रंथराज चवथा उल्लास हा गोमटा,
दूतीनें वन वर्णिलें, मग सख्या आल्या [5]कलिंदीतटा; ।
राधा कुंजवनीं श्रमोनि रमली प्रार्थी जगन्नायका,
वर्णी विठ्ठलदास कौतुक पुढें, विद्वत्स्व हो ! आयका. ॥ ४३

---

## उल्लास पांचवा.

(श्लोक.)

कंठीं कौस्तुभ कंकणें मणगटीं पत्रावली, [6]मेखला,
[7]केयूरांगद कुंडलें, तुलसिच्या [8]आपादमाळा [9]गळां, ।
[10]विश्वाकारण विश्वसाक्षि नटला [11]साकार सर्वा घटीं,
तो राधे ! करुणाब्धि येइल तुतें भेटावया [12]संकटीं. ॥ १
[13]सर्वात्मा जो अनादी सुत [14]उपनिषदीं गाइला सामवेदीं,
[15]खेळे लीला विनोदीं, [16]जडजन [17]संपदीं उद्धरी, दुःख नेदी; ।

---

१. गुरुपत्नीगमनपाप. २. वाल्मीकि हा दस्युकर्म करून पांथांस मारहाण करून उदरनिर्वाह करी—अशी कथा आहे. ३. मद्यपान. ४. कृष्ण. ५. यमुनातीराला. कलिंदी=कलिंद नामक पर्वतापासून जन्मलेली ती. ६. कमरपट्टा. ७. केयूर="हा एक दंडामध्यें घालण्याचा दागिना आहे. हा बाजुबंदाच्या आकाराचा असून त्याच्या दोन्ही तोंडांस सिंहाचें किंवा दुसऱ्या जनावराचें तोंड करून बसवितात. हा कधीं कधीं जडावाचा केलेला असतो. त्याला गोंडा नसला म्हणजे 'अंगद' म्हणतात." (देशी हुन्नर—पृ० ४७ पहा.) ८. पायांपर्यंत लोंबणाऱ्या माळा. ९. गळ्यांत. (ही सप्तमी विभक्ति होय.) १०. 'विश्वाकार विकारवंत सजला' असाही पाठ आहे. ११. मूर्तिमान्. १२. 'शेवटीं' असाही पाठ आहे. १३. सर्वव्यापक. १४. उपनिषद्ग्रंथांत वेदांतविचार आणि आत्मज्ञान यांचें उपपादन आहे. उपनिषदांत आत्मा म्हणजे काय, जन्मांतर काय आहे, मुक्ति म्हणजे काय, जगताची उत्पत्ति कशी झाली इत्यादि विषयांचें विवेचन आहे. उपनिषदें १०८ आहेत, तथापि त्यांत दहा मात्र मोठीं महत्वाचीं आहेत. त्यांजवर शंकराचार्यांचें भाष्य आहे. त्यांचीं नांवें:—(१) ऐतरेय, (२) छांदोग्य, (३) ईशावास्य, (४) तैत्तिरीय, (५) बृहदारण्यक, (६) मुंडक, (७) मांडूक्य, (८) कठवल्ली, (९) प्रश्न

ज्याचे पादारविंदीं जनित सुरनदी[1], तीर्थ भूतेश[2] वंदी,
नेणो पादारविंदी भ्रमरिणि कुमुदी 'स्रग्धरा[3]' हे निवेदी. ॥ २
वैक्त्रीं[4] निर्माण **गी**ता, पदिं सुरसरिता, नाभिपद्मीं **वि**धाता[5]
**श्री** ज्याची लोकमाता त्रिभुवनिं परता एवढी ज्याचि[6] सत्ता, ।
सर्वात्मा, सर्ववेत्ता, गगनपरिणता, व्यापक प्राणदाता,
**रा**धे ! तो दैत्यहंता तुजहुनि परता काय गेला दिगंता ? ॥ ३
बाला वदे कोकिळबाळलीला, 'दया नये नूतन मेघनीला, ।
मदांध डोळे, बहिराट कानीं, हे इंदिरेची करणीं निदानीं[7]. ॥ ४
उन्मादें बधिरे, सदां निर्दसुरे, गर्भांध होती खरे,
**वि**ष्णू **शे**ष जरेसि नित्य पसरे, हा सर्प तो ना स्मरे, ।
प्राणीमात्र मरे, विषें जिव नुरे, हें सख्य त्याचें पुरें
यापेक्षां चतुरे ! तुझें गण बरें, जीवें जिता इंदिरे ! ॥ ५

---

आणि (१०) केन, या उपनिषदांच्या भाष्यांवर आनंदगिरीची 'रत्नप्रभा' या नांवाची विस्तीर्ण व्याख्या आहे. [सरलार्थबोधिनी गीता–पृष्ठ २१४-२१८ पहा.] १५. 'केली' असाही पाठ आहे. १६. पापराशीनें जड झालेले. १७. सत्वर.

१. गंगा. हिची उत्पत्ति विष्णूच्या पायांपासून आहे म्हणून हिला 'विष्णुपदी' असेंही म्हणतात. आणि विठ्ठलाचा सुद्धां 'पादारविंदीं जनित' म्हणण्याचा उद्देश हाच आहे. ह्याविषयीं मोरोपंतानें एके ठिकाणीं म्हटलें आहे:—'गंगेचा तेंवि जयश्रीचा प्रभुच्या पदांबुजीं उगम' [अष्टम स्तोत्ररामायण–गीति ५७ उत्तरार्ध]. अशा प्रकारचे उल्लेख पंतांच्या आणि इतर सर्वमान्य मराठी कवींच्या ग्रंथांतून फार आढळतात. २. भूतनाथ, शंकर. ३. स्रग्धरा=मालाधारिणी; (पक्षीं) स्रग्धरा हें वृत्ताचें नांव आहे. या श्लोकाचें वृत्त 'स्रग्धरा'. याचें लक्षण:—'युक्तं मरभनैर्यैश्च त्रिभिः सप्ताक्षरैस्त्रिभिः । छेदैश्च **स्रग्धरा**वृत्तमेकविंशाक्षरं विदुः ॥' [सुवृत्ततिलक–१-३७], 'सुकुमाररसस्यात्र रक्षयौ वृत्तमुद्धतम् । वाक्पाकेनैव गलितं कविना नीतमल्पताम् ॥ ४० ॥ आकारगुरुयुक्तादिपर्यंतांतर्विसर्गिणी । अंसस्यूतविरामा च राजते **स्रग्धरा** तराम् ॥ ४१ ॥ आद्यंताकारविरहाद्बंधदोषः स्फुटोऽपि यः । अविलुप्तैर्विसर्गांतैः **स्रग्धरा**यां समीहते ॥ ४२ ॥ [सुवृत्ततिलक–२.] 'शौर्यस्तवे नृपादीनां शार्दूलक्रीडितं मतम् । सावेगपवनादीनां वर्णने **स्रग्धरा** मता ॥' [सुवृत्ततिलक–३-२२]. स्रग्धरेच्या प्रत्येक पादांत म, र, भ, न, तीन यगण, असतात. यति प्रत्येक सप्तम अक्षरावर असतो. हें वृत्त रौद्र, वीर, भयानक अशा रसांस अनुकूल आहे. वायुवेगादिक प्रसंगाचे वर्णनास हें वृत्त योग्य असें समजतात. ४. मुखांत. ५. ब्रह्मदेव. ६. 'थोर' असाही पाठ आहे. ७. अखेरीस. ८. झोंपाळू, निद्राळू.

[1]फुलित निबिड [2]जाई ये स्थलीं आजि बाई !
जवळि चरती गाई, भोंवतीं दाट छाई, ।
त्रिभुवन सुखदाई आणसी सांग काई,
नमन करुनि पायीं लाविला कृष्ण सोई. ॥ ६
भक्ती निघाली गजमत्तचाली, कीर्तनछंदें हरिप्रति गेली; ।
क्रीडति वृंदावनिं जगजेठी मौक्तीकमाला मिरवे सुकंठीं. ॥ ७
वृंदावनधात्री प्रार्थी व्रजबाळा गोपवधूमध्यें देखे घननीळा, ।
पीतांबर कांसे कंठीं वनमाळा विद्वज्जन गाती हे त्रिद्युन्माला. ॥ ८
[3]पदाब्ज हरिचें नमूनि मुगुटीं, उभी तव विभू धरी मणगटीं ।
तिशीं यदुपती विनोद करिती कवींद्र तिजला म्हणे धरि धृती. ॥ ९
बोले लक्षप्रकारें, 'तुजविण दुसरें नावडे या विचारें,
चित्तें वित्तें शरीरें तव भजन बरें फावलें निर्विकारें; ।
स्वस्थें श्रीरंगवीरें [4]वरद यदुवरें दीधले म्यां उदारें'
ऐसीं गंभीर वाक्यें विदधत चतुरें नायकाचित्तचोरें. ॥ १०
'त्वद्भक्तासिं सदा वियोग विपदा, नीचगृहीं संपदा,
हे कैसी त्रिरुदावली तव पदांभोजीं रुळे सर्वदा ? ।
हा भक्तासि उदारशब्द सुहृदांमध्यें न लागो कदा,
हें लज्जा [5]वरदायका ! तुज [6]गदापाणे ! [7]कृपावारिर्दा ! ॥ ११
[9]राधा राणी चतुर शहाणी तुजविण पाणी पीइच ना
स्त्री तुझि कांता पुत्र विधाता म्हणउनि कांता बोलच ना ।
छंद सुमित्रा [10]राजिवनेत्रा ! चाल सुनेत्रा ! कुंजवना
त्रिभंगीछंदा गुणगोविंदा बत्तिस बाधा बोलवना. ॥ १२

---

१. फुललेल्या. २. या पद्यांत 'ई' वर्णाची आवृत्ति वारंवार झाल्यामुळें अनुप्रासालंकार आहे. ३. चरणकमल. ४. 'वरद यदुविरें नायका वित्तचोरें' असाही पाठ आहे. ५. वर देणाऱ्या. ६. गदा आहे हातांत (पाणीच्या ठायीं) ज्याच्या तो. (संबोधन.) ७. 'कृपावर्गदा' असाही पाठ आहे. ८. कृपाघना ! ९. ह्या श्लोकाचा अन्य पाठ असा आहे:—'ते राधाराणी चतुर शहाणी तुजवीण पाणी ही पिई न, परि चालेसना । स्त्री तुझी कांता पुत्र विधाता म्हणे गुणवंता बोलेसना मज मानेसना ॥ छंद विचित्रा चालीस मात्रा अर्जुन मित्रा चाल सुनेत्रा कुंजवना हरि आण वना । त्रिभंगी छंदा गुणगोविंदा बत्तिस बाधा वण जना तुजा (?) बोलवना ॥' १०. कमलनयना !

बारा[1] सोळा रविशशि कळा[2] दाविती[3] वेळवेळां,
काढी माळा दहति विपुळा क्रूर मोठा उन्हाळा; ।
वेळोवेळां तरुपरिमळा सिंचिती[4] गोपबाळा,
मंदाक्राता[5] त्यजुनि सकळां चाल तूं मेघनीळा[6]! ॥ १३

जड जन व्रजराजे तारिले तेंवि भोजें
तिसि चरणसरोजें उद्धरावें सहाजें. ।
सदय हृदय तूझें, कां न बोले न तूझे,
तुजविण भवओझें घे शिरीं कोण माझें? ॥ १४

नव किसलय गुंफे भोवतें पुष्पताफे,
ललितसुमन सोफे त्यावरी भृंगताफे, ।
स्थिर करि मनमेधाकुंज देखोनि राधा,
परम विरहबाधा पावली सापराधा. ॥ १५

विषयसुख न तें घे दीर्घ सूखाद्रि वेंघे
तुजविहित गुणाघे शून्य संकल्प चौघे, ।
परिस वचन सुज्ञा राधिकेची प्रतिज्ञा[7],
कवण करि अवज्ञा चाल वेगीं गुणज्ञा! ॥ १६

विलासिनी! तूं हरि गोंविलासी[8], न येसि किं यासि पुसोनि यासी; ।
नितंविनी[9] जाड्य बहू नितंबिनी विलंबिनी मोक्षपदावलंबिनी[10]. ॥ १७

जीता पुत्र कलत्र[11] मित्र अवघे सत्सोयरेधायरे,
स्वार्थी लोलुप[12] ते न येति मरता कोणीच या मोहरे. ।
अंतीं[13] सोडवणार तूंच मजला, हा भाव माझा खरा,
निःसंदेह कवींद्र विठ्ठल म्हणे चाले दयासागरा! ॥ १८

हरि म्हणे, 'परिसे वचन प्रिये! हृदयिं राग तिनें धरिला नये; ।
दिनमणी[14] रजनीरमण[15] प्रिये तव त्वरें चतुरे! परतोनि ये.' ॥ १९

---

१. सूर्याच्या कला बारा आणि चंद्राच्या सोळा. सूर्याला द्वादशात्मा आणि चंद्राला कलानिधि अशीं नांवें सुप्रसिद्ध आहेत. २. कला=सोळावा भाग (चंद्राचा), बारावा अंश (सूर्याचा). ३. 'दाविती तप्तवेळा' असाही पाठ आहे. ४. 'वेंचिली गोपिबाळा' असाही पाठ आहे. ५. सावकाश चालणें, मंद गमन. 'मंदाक्रांता' हें एका सुप्रसिद्ध वृत्ताचें नांव आहे. ६. घनश्यामा! ७. 'अनुज्ञा' असाही पाठ आहे. ८. गुंतवून घेतलास. ९. स्त्री. १०. मोक्षस्थानाला अवलंबून असणारी. ११. स्त्री. १२. लोभी, आसक्त. १३. 'प्रांतीं' असाही पाठ आहे. १४. सूर्य. १५. चंद्र.

मग तिला अभयकर देई, मालतिला सखि घेउनि जाई; ।
हा [1]रमणीस निरोप निरोपी, हारमणी मग हा तिस [2]वोपी. ॥ २०
वंदोनि [3]पादांबुज ते निघाली, सुवर्णलाहे प्रति शीघ्र आली; ।
मूर्ध्नी करी नम्र [4]पदारविंदीं, वृत्तांत झाला तितुका निवेदी. ॥ २१
कलिंदीचें पाळीं त्रिदश विटपा लीन वदला,
[5]तया पृच्छा कोणी भ्रमर वरि जाती परिमळा; ।
विराजे [6]लौबिंबाधर मुरलि बिंबाधरपुटीं,
तुझे ठायीं मंदादर गमत मंदार निकटीं.' ॥ २२
राधा म्हणे, 'निष्ठुर दानवारी नेदी सपादांबुजदानवारी, ।
जो अंगसंगें करि [7]पूत नारी, तो कां नये गे ! सखि ! [8]पूतनारी. ॥ २३
लागला [9]हिमकरा ग्रह केतू, तेंवि हा मज पिडी शशिकेतू; ।
आलि ! आजि रुसला वृषकेतू, भेटवी मज [10]खगेश्वरकेतू. ॥ २४
सर्पाकार [11]कहार हार करितो [12]जिव्हार भेदीतसे,
गेले चारि [13]प्रहार कां हरि नये व्यवहार खोटा दिसे; ।
अन्यायी परिहार देइल सखे ! [14]सौहार म्यां धुंडिलें
भेटेनाचि, विहारवेळ टळली, बांधोनियां मारिलें. ॥ २५
[15]ताराकांत सुरांतकासि धरितो रंभासुतासारिखा
त्याचा शत्रु पिता नये तरि सखे ! हो सर्व दोषामुखा. ।
ज्याचें भूषण वासुकी म्हणवितो त्याच्या विषाच्या झरें
जाळें तप्त शरीर, विठ्ठल म्हणे हें पद्य वाचा बरें. ॥ २६
ब्रह्म्याचा पणतू उरावरि [16]छळी, नातू नभाचा पिडी
व्योम्याच्या तनयासि, कांकिं विनयें जाते युगाची घडी, ।
दीनाच्या परि कारुणा करितसे गोपांगना राधिका,
ये काळीं हरि भेटता तरि सखे ! संसार होता निका. ॥ २७
मिरवति अभिवत्से [17]मस्तकीं पुष्पगुच्छें,
जवळि जवळि वत्सें गो उभ्या ऊर्ध्व पुच्छें; ।

---

१. सुंदर स्त्रीला. २. ओपी, अर्पी. ३. चरणकमल. ४. पद+अरविंद=चरण+कमल. ५. 'जया पुष्पा' असाही पाठ आहे. ६. चंद्रबिंबाधर. ७. पवित्र, शुद्ध. ८. पूतनेचा अरि=कृष्ण. ९. चंद्राला. १०. खगेश्वर (पक्ष्यांचा राजा गरुड) आहे केतु. केतूच्या स्थानीं) ज्याच्या तो. (कृष्ण.) ११. कहर. १२. मर्मस्थान. १३. प्रहर. १४. शहर, नगर. १५. चंद्र. १६. 'सले' असाही पाठ आहे. १७. 'गो उभ्या ऊर्ध्व पुच्छें' असाही पाठ आहे.

त्रि[1]दश सु[2]लिन पायीं [3]तो हरी लुब्ध जाया
कवण करि उपाया, प्राण जाईल वायां. ॥ २८
कमललोचना! [4]बंधमोचना! [5]पतितपावना! पावसीच ना, ।
प्रगट पौर्णिमापूर्णचंद्रमा! पटु मनोरमा! साधकोत्तमा. ॥ २९
उगवला [6]तिथिपूर्ण [7]कलानिधी तम करेंद्र विराधक पारधी; ।
गिरिपुरंदर दिग्वरिचा तरी, प्रगटला [8]मृगराज वनांतरी. ॥ ३०
अर्धेंदु शीवें धरिला ललाटीं चंद्रार्ध [9]कात्यायनिभालपाटी ।
संपूर्ण झाला सुरतप्रसंगीं, पीयू[10]षधारा द्रवला कलांगीं. ॥ ३१
उगवलीं कमलें [11]यमुनेजळीं विकसलीं कितिएक धरे[12]तळीं ।
भ्रमतसे वरतीं [13]भ्रमरावळी, परिमळें नवकुंजवनस्थली. ॥ ३२
प्रगटली परिपूर्ण वि[14]भावरी, मलयवायु फिरे सुलभावरी; ।
[16]हरि विना बहु व्याकुल[15] राधिका, वदतसे चतुरा सुयशोधिका. ॥ ३३
मूर्तिमंत यमरूप चंद्रमा मारमातुळ पिठी प्रियोत्तमा ।
गंधलेप सखिये! न सोसवे हारभार करि तो नसो सवे. ॥ ३४
सखि म्हणे, 'परिसे व्रजवासिनी! हरिकथा [17]कलिकल्मषनाशिनी ।
वसतसे [18]कमलाकर कीर्तनीं प्रगट होइल [19]कुंजनिकेतनीं. ॥ ३५
कृष्णाचीं लपती स्थळें अनुकुळें [20]सांगीतलीं निर्मळें
ऐका भावबळें यथार्थ सगळें जें गुह्य गुह्यांतलें ।
संताचीं विपुलें मनें सुविमलें ते पाहि ऐसीं स्थलें
तेथेंही हरिकीर्तनीं वसतसे चित्पापहा सांवळें. ॥ ३६

---

१. देव. २. नम्र, लीन, शरणागत. ३. 'त्रिदश विनित जाया तो' असाही पाठ आहे. ४. हे संसाररूप बंधनापासून मोचन करणाऱ्या. ५. पापी जनांस शुद्ध करणाऱ्या. ६. तिथींनीं पूर्ण झालेला. ७. कलांचा निधि=चंद्र. [कला म्हणजे चंद्रबिंबाचा सोळावा अंश असा कला शब्दाचा अर्थ चंद्राच्या वृद्धिक्षयाच्या संबंधानें करतात. चंद्राच्या कला देव प्राशन करतात अशी पौराणिक ग्रंथांत कथा आहे, परंतु चंद्राच्या कलावृद्धिक्षयाचें वास्तविक कारण ज्योतिर्विदांस माहीत होतें. ज्योतिर्विलास–पृ० ७४-७५.] ८. सिंह. ९. दुर्गा–पार्वती. १०. पीयूष=अमृत. ११. यमुनेच्या जळांत. १२. पृथ्वीच्या पृष्ठावर. १३. भ्रमरांची पंक्ति. १४. रात्र. १५. 'विरहाकुल' असाही पाठ आहे. १६. 'वदतसे सखि संचित राधिका' असाही पाठ आहे. १७. कलियुगांतील पाप हरण करणारी. १८. कृष्ण. कमला=लक्ष्मी आहे ज्याच्या करीं (हातीं) तो. १९. लतागृहांत. २०. 'सांगेन मी पुष्कळें' असाही पाठ आहे.

नामें पाप जळे, भयें **यम** पळे, **का**ळासही नाकळे,

आलें विघ्न टळे, भवाब्धि[1] वितुळे, वक्ता स्वरूपा[2] मिळे, ।

**शे**षातें न कळे, जपासि न वळे, जिव्हा गिरा पांगुळे,

पायीं मुक्ति रुळे[3], म्हणोनि सरळे नामार्थ ध्या कोंवळें[4]. ॥ ३७

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

**विद्वज्जीवन** ग्रंथराज परिसा उल्लास हा पांचवा,

उद्धामस्तुति[5] आयका **ह**रिकथा संतोषवी मानवा; ।

जेणें विश्व तरे भवश्रम हरे ते ध्यातसे **रा**धिका,

वर्णी[6] **विठ्ठ**लदास काव्यकविता[7] हे संस्कृताची टिका. ॥ ३८

---

## उल्लास सहावा.

(श्लोक.)

हृषीकेश[8] **गो**विंद **विष्णू मुरारी** विभू पद्मनाभा स्वभू[9] **दानवारी** ।

**अजो**पेंद्र **दा**मोदरः **कृष्ण शौरी** हरी श्रीहरी **कंस चाणूरवैरी**. ॥ १

सर्वेशा ! विदुषा ! पुराण[10]पुरुषा ! **शे**षा ! **विदे**शाधिशा !

**भी**मा ते वर्षा[11]समान निमिषा[12] धांवे जगच्चक्षुषा, ।

तूं घेशी मनुजावतार कलुषा[13] दंडावया किल्मिषा

ताराया निकषा सहस्र[14]शिरिषा ये पाव **कं**सद्विषा ! ॥ २

जय **गो**विंदा ! परमानंदा ! जीवनकंदा ! भगवंता !

पाव, **मु**रारी ! दैत्यकुलारी ! कुंजवीहारी ! जयवंता ! ।

हा भवसिंधू तारकबंधू मानस[15]साधूवीहरणा !

तुजला ध्यातों, पावशि **का**न्हा ! **द्रौ**पदिलज्जासंहरणा ! ॥ ३

---

१ संसाररूप सागर. २. परमात्मरूप लीन होतो. ३. लोळे. ४. 'कोमलें' असाही पाठ आहे. ५. 'अद्वैतस्तुति' असाही पाठ आहे. ६. 'प्रार्थी' असाही पाठ आहे. ७. 'करिता' असाही पाठ आहे. ८. हृषीका–ईश=इंद्रिय+स्वामी=कृष्ण. (विष्णु.) ९. स्वयंभू. १०. विष्णो. ११. वर्ष. १२. अत्यंत अल्पकाळ. १३. पाजी जनांला. १४. सहस्रशीर्षी. १५. 'वंरनसाधु वनहरिणा' असाही पाठ आहे.

ये पुराणपुरुषा ! त्रिपुरेशा ! [1]पुंडरीकनयना ! आदिपुरुषा ! ।
[2]इंदिरावनउरोजललामा ! पूर्णचंद्रवदना ! [3]गुणधामा ! ॥ ४
कृष्णा ! कान्हा ! [4]नवघननीळा ! [5]धांवें पावें सुहृतकमाला ! ।
ऐसी राधा स्तवि व्रजबाला छंदो[6]मत्ता [7]जलधरमाला. ॥ ५
सहज कां रुसलासि दयांबुधी ! तुज नये करुणा करुणानिधी ! ।
[8]कलुषपंजर तूं शरणागता 'द्रुतविलंबित' वृत्त सदोदिता. ॥ ६
गाई गोपाळ वत्सें सकळहि [9]विधिनें चोरिलीं गुप्त रूपें
तीं नेलीं सप्तलोकांप्रति, मग धरिलीं भिन्नभिन्न स्वरूपें, ।
भक्तासाठीं करावी सहज [10]नग धरी, मारिले दैत्य [11]भारी
तैसा तूं पाव आतां कुवलयनयना ! वासुदेवा ! [12]मुरारी ! ॥ ७
इंद्राज्ञेस्तव मेघ वर्षति [13]शिळी धारांबुधारा गळा
तैं गोवर्धन तो बरा उचलिला रक्षावया गोकुळा, ।
तैसा कां [14]करुणाघना ! [15]स्ववहना टाकोनि धांवेसिना
केला [16]कल्पविकल्प विठ्ठल म्हणे अद्यापि पावेसिना. ॥ ८
संसारीं असतां, तुतें न भजतां, झाले कुधी धीमता
स्वाभावें स्मरतां, घडी न भरतां, तूं पावसी तत्वतां, ।

---

१. पुंडरीक+नयन=सितांभोज–पांढरें कमळ+नेत्र. (कृष्ण.) २. इंदिरा+घन+उरोज+ललाम=लक्ष्मी+पुष्ट+स्तन+भूषण. (कृष्णा.) ३. सद्गुणसदना. ४. नूतन मेघाप्रमाणें श्याम वर्ण ज्याचा तो. (संबोधन.) ५. 'धांवें सुत तूं कमल मराळा' असाही पाठ आहे. ६. या वृत्ताचें नांव मत्ता. यांत दहा अक्षरें असून म भ स असे तीन गण आणि एक गुरु अक्षर अशीं दहा अक्षरें असतात. यति चवथ्या आणि दहाव्या अक्षरांवर असतो. याचें लक्षण:—'ज्ञेया **मत्ता** मसभगसृष्टा.' ७. मेघांची पंक्ति. ८. पापसंहारक. ९. ब्रह्मदेवानें. [अघासुराचा वध केल्यावर एके दिवशीं श्रीकृष्ण गोवत्सांस चरावयास सोडून गोपालबालकांसह नदीच्या पुलिनावर भोजनास बसला. इतक्यांत ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाचें सामर्थ्य पाहण्यासाठीं सर्व गोवत्सांस आणि गोपालबालकांस चोरून नेलें. पण तितक्यांचींही रूपें धारण करून श्रीकृष्णानें गोकुळांत सर्व व्यवहार यथापूर्वक चालविला, तेव्हां ब्रह्मदेव त्यास शरण येऊन त्याची स्तुति करूं लागला—या कथेवर येथें कविकटाक्ष आहे. याच विषयावर वामनपंडितांनीं भक्तिरसपूरित 'ब्रह्मस्तुति' नामक काव्य केलें आहे.] १०. पर्वत. ११. 'वैरी' असाही पाठ आहे. १२. मुर+अरि=मुर नामक दैत्याचा शत्रु. (कृष्ण.) १३. 'जलद्वारांबुधीरगेला' असाही पाठ आहे. १४. दयाघना ! १५. आपल्या वहनातें. (गरुडातें.) १६. 'कल्पविलंब' असाही पाठ आहे.

वेश्या[1] आळवितां, अजामिळ[2] अजा! हे तारिले शीघ्रतां,
मी ही त्यां पतितापरी बुडतसें, तुं उद्धरीं प्रार्थितां[3]. ॥ ९
गोसावीकुळिंचा जुनाट बहुतां कालांतराचा हरी,
सद्भक्तासि निरोप सांग, कवणा त्याची करूं चाकरी? ।
मोठासा तुजवीण कोण परता त्यांते निरोपी, सया!
'या दीनावर ती पुरातन दया कीजे' म्हणावें 'तया'. ॥ १०
जें तूं नायकसी स्वभक्तवचनें, तैं साध्य कैसा हरी?
किंवा क्लिष्ट परंतु मौन्य धरिलें हे मान्य लोकोत्तरीं; ।
सर्वज्ञा! म्हणसील त्या न दिधलें, दानाविना नेदैवे[4],
वक्ता उत्तर दे उदारवचनें संताप जेणें निवे. ॥ ११
लंकादान बिभीषणें कृतयुगीं कोणास हो! दीधलें?
सुग्रीवें निज[6]राज्यदान कवणा होतें कधीं [7]वोपिलें? ।
बंधुद्वेषक पिंडपोषक तुवां सिंहासनीं स्थापिले,
भक्त श्रीहनुमंत सेवक[8] तुझा रे! त्यासही ना दिले. ॥ १२
जगीं भक्त प्रल्हाद तो पितृ[9]हंता, स्वयें मारिली जामदग्न्यें[10] स्वमाता[11], ।
पिता[12] पावला मृत्यु रामावतारीं असा निर्दयावंत तूं दानवारी. ॥ १३
दिले सुदामें मुठि दोन पोहे, तो राज्य शक्रासम[13] काय लाहे? ।
सर्वस्व ही दान दिलें बळीनें[14] तो पावला बंधन दीर्घदानें. ॥ १४
जळें दुग्ध संतप्त लोहांगतापें, तशीं भस्म होती तपें कर्मपापें; ।
तुझा मंत्र जप्ता जपीतां भिकारी, करि ग्रास दारिद्र्यदावाग्नि वैरी. ॥ १५
कस्तूरींत पलांडु[15] जैं उपजला तो काय हो! आपुला
त्यागी, दुर्जन दुःस्वभाव न घडे, हे साक्षि साजे मला; ।
ज्याची हो पयसीं विदग्ध[16] रसना[17], तो तक्र फुंकोनि पी,
म्यां केले अपराध जे न कळतां ते तूं क्षमी साक्षपीं[18]. ॥ १६

---

१. गणिका पिंगला. (पृष्ठ ५९ टीप २ पहा). २. पृष्ठ १३४ टीप ४ पहा. ३. मनोभावानें प्रार्थितां. या श्लोकांत 'तां' या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथें अनुप्रासालंकार झाला आहे. ४. न देववे. ५. बिभीषणानें रामास सर्व राज्य दिलें–हें सुप्रसिद्ध आहे. ६. किष्किंधाराज्य. ७. दिलें. ८. 'देखत तुझी वाग्देवता नोबले' असाही पाठ आहे. ९. पित्याचा वध करणारा. १०. परशुरामानें. ११. रेणुका. १२. दशरथ. १३. इंद्रासम. १४. वामनावतारीं बळीनें सर्व राज्य विप्रबटूला दिलें. १५. कांदा. १६. चतुर, विचक्षण. १७. जिव्हा. '**रसना** कांचिजिव्हयोः' इति विश्वप्रकाशः. १८. अगत्यानें.

मख ध्वंसी **कं**सादिक मशक शस्त्राविण किती?

किटः सृष्टीमध्यें मथुनि[1] वससी सर्व जगतीं, ।

तुज प्रीया जाया जनिं वनिं न वर्ते श्रुतिमणी,

महाविद्यावृक्षीं कुडतर कितीका '**शिखरिणी**[2].' ॥ १७

वैरी मारी शरीरीं **स्मर**[3]शर उरसीं[4] आजि हा जीव जीना[5]

धांवें पावें सुवेगीं सुरवरवरदा! यामिनी[6]मित्रमीना ।

दारा फारा **मु**रारी नव जवळि वधू[7] शोभती भव्य भक्ती

**रं**भा **जं**भारिभार्या लटपट नटती **के**शवा! चक्रशक्ती. ॥ १८

सविता[8] रसहास्य नटे ललिता, कविता[9]सि जयापद आयकितां ।

तरि तेचि कवित्व रुचे बहुतां, कवि **इं**द्र तिलागि जलोर्द्धगतां. ॥ १९

शरीं **मार** मारी शरीरांत खेळे ………… तेजा ………… ।

करीं भार भारी कटीं रत्नकांची, गळे नीर नीळे गती मौक्तिकांची. ॥ २०

**मा**कार जारत्व सये! निकुंजीं मानी मला लभ्यसखी सर्वें जी, ।

जीवें सखी सभ्य ललाम नेमा निकुंजिं ये सत्वर जाय कामा. ॥ २१

श्रवणमननदीपें ब्रह्महत्या[11]दि पापें

दहति सखि! तशीं गे! घोर विघ्नें अमूपें, ।

---

१. मारुन. २. या श्लोकाचें वृत्त 'शिखरिणी' आहे. याचें लक्षणः—'यमनैः सभलैर्गेन युक्ता सप्तदशाक्षरा । षडेकादशविच्छेदवती शिखरिणी मता ॥' [क्षेमेंद्रविरचित सुवृत्ततिलक—प्रथम विन्यास ३४.] या वृत्ताविषयीं सुवृत्ततिलकांत पुढील विवेचन केलें आहे:—'शिखरिण्याः समारोहात्सहजैवौजसः स्थितिः । सैव लुप्तविसर्गांतैः प्रयात्यत्यंतमुन्नतिम् ॥ शिखरिण्याः पदैश्छिन्नैः स्वरूपं परिहीयते । मुक्तालताया निःसूत्रमुक्तैर्मुक्ताफलैरिव ॥' [सुवृत्ततिलक—द्वितीयविन्यास ३१-३२.] ३. कामबाण. ४. उरांत. ५. जाईना. ६. रात्रिवल्लभ. ७. वधू. ['**वधू** स्नुषा नवोढा स्त्री वरो जामातृषिंगयोः' इति विश्वः.] ८. सूर्य. ९. 'बिरहानळ तेंवि शर दयिता' असाही पाठ आहे. १०. या श्लोकाचें वृत्त 'तोटक'. याचें लक्षणः—'वद **तोटक**मब्धिसकारयुतम्'. यांत चार सगण येतात. ११. ब्रह्महत्या—हें महापापांपैकीं एक आहे. महापापें पांच आहेतः—'ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः । महान्ति पातकान्याहुस्तत्संसर्गश्च पंचमम् ॥' [मनुस्मृति—११—५५.] याचा अर्थः—ब्रह्महत्या, सुरापान, ब्राह्मणाचें दहा मासे किंवा अधिक सोनें चोरणें, गुरुपत्नीगमन हीं चार व यांशीं संसर्ग करणें हें एक अशीं पांच महापातकें होत असें मन्वादिक म्हणतात.

अमृतपद[1] समीपे प्राप्त पुण्यानुतापें,
हरिहर निजरूपें भेट देती प्रतापें[2]. ॥ २२
एकी तांडव नाचती कवतुकें वृंदावनीं[3] वार्षिकी
व्योमीं कोटि तडित्प्रभा[4] चमकती श्रीपुष्करावर्तकीं[5] ।
वल्ली फुल्लित मंदमारुत[6] ढळे कामज्वरें दाहिली,
तेव्हांची घनसांवळी तनु[7] तिच्या आलिंगना लाधली. ॥ २३
नवी वैजयंती[8] गळां चंपकांची[9], मणीं कंकणें[10] मुख्य गोमेदकांची, ।
रवी तेजराशी कळा दीपकांची, झणी शंकसी मूर्ति **गो**विंदजीची. ॥ २४
मौलिका[11] लीलया लेइली नीगमा, मार्ग नीळा दिसे कांतिमानील **मा** ।
मालिनी भाविति स्वामिसेवाधमा, **मा**धवा सेवितां फांकली काळिमा. ॥२५
तुरा खोविला सेविलासे विलोकीं, महाराज हा राजसे! कीं विलोकीं, ।
जसे कीं अकल्पीत कल्पीत साधे, तसा ध्येय पावे कृपावेल **राधे**! ॥ २६
**रा**धा रात्रीं तल्प[12] यजी हो! मृगनेत्रा, भणे[13] कांते! घ्या विभु आलिंगनगात्रा ।
रात्रीं भीत्या त्रास गमे त्याऽमृतधारा, राधायंत्रीं लिंगितसे मत्तमयूरा[14]. ॥ २७

---

१. मोक्षपद. ['अमृत'शब्दाचे अनेक अर्थ आहेत–'अमृतं यज्ञशेषे स्यात्पीयूषे सलिले घृते । अयाचिते च मोक्षे च ना धन्वंतरिदेवयो: ॥' इति मेदिनी.] २. या श्लोकाचें वृत्त 'मालिनी.' यालाच 'नांदीमुखी' असेंही नांव आहे. याचें लक्षण:–'आदौ षड्दशमं चैव लघु चैव त्रयोदशम् । यत्र पंचदशे पादे ज्ञेया **नांदीमुखी** तु सा ॥' [श्रीभारतीये नाट्यशास्त्रे–अध्याय १५ श्लोक ६६], 'अष्टाक्षरविरामेण युक्ता ननमयै: सयै: । वदंति मालिनी नाम वृत्तं पंचदशाक्षरम् ॥' [सुवृत्ततिलक १।२०], 'विसर्गहीनपर्यंता मालिनी न विराजते । चमरी छिन्नपुच्छेव वल्लीवालूनपल्लवा ॥ २२ ॥ द्वितीयार्धे समस्ताभ्यां पादाभ्यां मालिनी वरा । प्रथमार्धे समस्ताभ्यां पादाभ्यामवरा मता ॥ २३ ॥ अज्ञोऽप्यलक्ष्यं मालिन्यां वीणायामिव विस्वरम् । श्रुत्वैवोद्वेगमायाति वाचा वक्तुं न वेत्ति तम् ॥२४॥ [सुवृत्ततिलक–द्वितीयविन्यास]. ३. 'माधूवनीं' असाही पाठ आहे. ४. विद्युल्लतेची कांति. ५. श्रीपुष्करावर्त नामक मेघांवर. पुष्कर आणि आवर्तक हीं मेघांच्या श्रेष्ठ जातींचीं नांवें आहेत. 'पुष्करा नाम ते मेघा बृहतस्तोयमत्सरा: । पुष्करावर्तकास्तेन कारणेनेह शब्दिता: ॥' (पुराणसर्वस्व.) ६. मारुत=वायु. ७. शरीर. ८. माला. ९. चांप्याची. १०. कंकण=हस्तमंडन. ['**कंकणं** शेखरे हस्तसूत्रमण्डनयोरपि' इति विश्व:.] ११. या श्लोकांत कवीनें चक्रबंध साधिला आहे. १२. शयन. १३. बोले. १४. या श्लोकाचें वृत्त 'मत्तमयूरी.' याचें लक्षण:—'वेदै रंध्रैर्म्तौ यसगा मत्तमयूर:'. यांत म, त, य, स, असे यथानुक्रम चार गण आणि एक गुरु अशीं अक्षरें असतात. यति चवथ्या आणि नवव्या अक्षरांवर असतो. याचें लक्षण भारतीय नाट्यशास्त्रांत आहे तें असें:—षष्ठं च सप्तमं चैव दशमेकादशं लघु । नयोदशाक्षरे पादे ज्ञेयं **म**त्तमयूरकम् ॥' [अध्याय १५ श्लोक ५८ काव्यमाला–पृष्ठ १५८.]

प्रियतमा नमितां चरणांबुजें, हरिति ते [1]परिरंभित चौभुजें ।
मदनमूर्ति चिदंबर सांवळी, व्रजसुता चमके वि[2]जे पींवळी. ॥ २८
मग म्हणे वि[3]कसांबुजलोचना, 'तुज दयांबुधि! कां किंव येचि ना? ।
कठिण चित्त तुझें **म**धुसूदना! मज गमे हृदयीं [4]भवभंजना! ॥ २९
पिपीलिकांते क्षण वज्रधारा केलें दयाळा **म**दनावतारा! ।
स्वामी! समर्था! तुज कोण वारी? चित्तासि ये तें करिसी, **मु**रारी!॥ ३०
[5]**वृं**दावनीं वास तुझा स्मशानीं, ते क्रूर [6]**जा**लंधरदैत्यपत्नी ।
फेडावया भ्रांति तिचि स्वभावें, केलें उदारोत्कट हास्य देवें.' ॥ ३१
सच्चित् स्वरूप **ह**रिनेंचिहि दावियेलें, त्रैलोक्य भानु [7]मुकुरप्रतिबिंब झालें, ।
विस्फारिले नयन, मूर्ति ठसावलीसे, आब्रह्मगोल अवघा **भ**गवंत भासे. ३२
पुष्पीं नदीपुलिनिं रम्य विहार दावी, पत्री नवी नविन गंधविभोग लावी ।
चत्वारि पंच परम श्रुतिसार गाती, सर्वोत्तमा सहित वर्तति भानवेति. ॥३३
[8]वनीं गोवळी लाल सारंगपाणी, **ह**री मोहरी लालसा रंगपाणी ।
वनीं गोवळी लाल सारंगपाणी, **ह**री मोहरी लाल सारंगपाणी. ॥ ३४
ललाटीं टिळा शुद्ध वेल्हाळ नीळा, ककूभांभुजीं जिंकिते हो! स्वलीला ।
ननू कुंकुमा मोद दावी विलोभें, ललामें महा हेममाला हि शोभे. ॥ ३५
आलंगिली तों तमलेश गेला, हा **रा**धिकेला उपदेश केला; ।
स्वानंदडोहीं भरला विदेही, देखे स्वदेहीं **ह**रि सर्व देहीं. ॥ ३६

---

१. परिरंभ=आलिंगन. २. वृत्तसुखार्थ येथें 'वी' ऱ्हस्व केली आहे. ३. प्रफुल्लकमलेक्षणा. ४. हे संसारनाशका! 'भवबंधना' असाही पाठ आहे. ५. मथुरेच्या उत्तरेस सहा मैलांवर यमुनेच्या तीरीं वृंदावन म्हणून गांव आहे. हें पूर्वी वन होतें असें वर्णन भागवत स्कंध १० अध्याय १२ यांत आहे. ६. वृंदा. (पृष्ठ ९२ टीप २२ पहा.) ७. आरसा. ८. या श्लोकांत 'समुद्र' नामक यमक आहे. पादद्वय आणि अर्धद्वय यांचें संपुटासारखें सादृश्य आहे म्हणून यास 'समुद्र' असें नांव आहे. 'समुद्र' यमकाचे तीन प्रकार आहेत:—(१) प्रथम तृतीय आणि द्वितीय चतुर्थ पाद समान (२) प्रथम द्वितीय आणि तृतीय चतुर्थ पाद समान (३) प्रथम चतुर्थ आणि द्वितीय तृतीय पाद समान. यांचेही पोटभेद केले असतां त्या यमकाचे अकरा प्रकार होतात. 'अर्धाभ्यासः समुद्रः स्यादस्य भेदास्त्रयो मताः । पादाभ्यासोऽप्यनेकात्मा व्यज्यते स निदर्शनैः ॥' [काव्यादर्श—तृतीय परिच्छेद—श्लो० ५३.] श्रीरुद्रटप्रणीत 'काव्यालंकार' नामक ग्रंथांत 'अर्धं पुनरावृत्तं जनयति यमकं समुद्रकं नाम । श्लोकस्तु महायमकं तदेवमेकादशैतानि' ॥ [अध्याय ३ श्लो० १६.] असें समुद्रकाचें वर्णन आहे.

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

'**विद्वज्जीवन**' ग्रंथराज परिसा उल्लास हा षष्ठमा,
नेली तेथुनि **राधिका यदुवरें वृंदावना** विभ्रमा[1]; ।
आतां [2]रासविलासकौतुक महा आरंभिलें ते स्थलीं
[3]पूंजी **विठ्ठलदास** सत्कवि जना सद्भावपुष्पांजलीं. ॥ ३७

---

## उल्लास सातवा.

(श्लोक.)

**वैकुंठीं** [4]**ब**लिगोपुरीं क्षितितलीं [5]नागेंद्रतल्पावरी
श्रीम**द्धार**तिं कीर्तनीं **क**लियुगीं तो जो वसे **पं**ढरीं ।
श्री**ना**रायण जो पुराण पुरुषः साक्षात तो **गो**कुळीं
खेळे गोवळिवेष घेउनि **ह**री [6]मंदारशाखांतरीं. ॥ १
'**रासोल्लास**' विलास मास पहिला [7]हव्यास भक्तांमनीं,
[8]वेद**व्यास** उदारहास्य [9]भगवान् साक्षात वक्ता मुनी; ।
त्याची कांस धरूनि दास तरले विश्वास चित्तीं धरा,
श्रोते! हो! इतिहास हा रसपती सर्वांसि माने बरा. ॥ २
माथां बद्धमयूरपिच्छ सरळे [10]गुंच्छावतंसा वरी,
नाना [11]चंद्रक [12]चारु वर्तुल ठसे बिंबे [13]मृगांकापरी, ।
**शौ**रीबाल तमालनील[14]कबरी काळे नभासारिखे
तेथें मोरपिसें विराजित जसे दिक्चाप मेघें सुखें. ॥ ३

---

१. विश्रांति. २. नाचणें इत्यादिक क्रीडांचें कुतुक. ३. 'प्रार्थी' असा अन्यपाठ आहे. ४. पाताळांत बळीच्या द्वारीं. ५. शेषशयनावर. ६. मंदार वृक्षाच्या शाखांमध्यें. ७. इच्छा. ८. व्यासानें वेदांचे विभाग केले म्हणून त्यास 'वेदव्यास' असें म्हटलें आहे. ९. 'भगवान्' शब्दाची व्याख्या आढळते ती:—'उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामगतिं गतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ॥' (म्हणजे, सर्व स्थावरजंगमात्मक जगाचा उद्भव आणि नाश हे कसे होतात, जग आलें कोठून, जाणार कोठें, विद्या आणि अविद्या काय आहेत, हें सर्व जो जाणतो त्याला भगवान् म्हणावें) किंवा सकल ऐश्वर्य, धर्म अथवा वीर्य, कीर्ति, द्रव्य, ज्ञान, वैराग्य हीं सहा भगें ज्यास आहेत तो भगवान्. १०. पुष्पांच्या स्तबकाचें शिरोभूषण. ११. डोळे, चांदवे. १२. सुंदर. १३. चंद्राप्रमाणें. १४. केशकलाप.

आकर्णांत विशाल नेत्रकमळें [1]नीलोत्पलें कोमलें,
मेघश्यामशरीर दिव्यगगना ऐसें दिसे सांवळें ।
श्रीमद्गोकुलपालबाळ नटला गोपालवेषें हरी
सालंकार किरीटवर्धन उभा बिंबाधरीं मोहरी. ॥ ४

नूतन दिव्य गळां [2]वनमाला, गौळणिच्या परिवेष्टित पाला, ।
कुंडलजोड विराजित कर्णीं [3]**दोधकवृत्त** मनोहर वर्णी. ॥ ५

केयूरें मुगुट भुषाई दिव्यमाला सर्वांगीं [4]मलयजपंकलेप केला, ।
**कालिंदीतटपुलिनीं सुवेणु वाहे, श्रोते! हो! सुरसरव '[5]प्रहर्षिणी' हे.** ॥ ६

विदग्ध होती **[6]विपरीतपूर्वा** तेथेंदुवंशस्थ जनासि जावा, ।
उपेंद्रवज्रेंद्र तसेंचि अंतीं मिळोनि जाणा **उपजाति** मागुती. ॥ ७

**रा**ममंडणि निकुंजकाननीं दिव्यभूमिनदि **सू**र्यनंदिनी, ।
रत्नपीठ मणिमंडप स्वतां हा प्रभद्रकपटा **रथोद्धता.** ॥ ८

बिंबोष्ठी नवरंगरत्न मुरली [7]सप्तस्वरें वाजली,
तेणें तल्लिन गोर्धनें जळचरें पक्षीकुळें रीतली; ।

---

१. नीळीं कमळें. २. वनमाला. ['**वनमाला** विधातव्या पल्लवैः कुसुमैः फलैः' इति विष्णुरहस्ये–हेमाद्रि, अथवा 'पत्रपुष्पमयी माला **वनमाला** प्रकीर्तिता' चारित्रवर्धन.] ३. या श्लोकाचें वृत्त 'दोधक'. याचें लक्षणः—'दोधकवृत्तमिदं भभभाद्गैः.' यांत तीन भगण आणि दोन गुरु अक्षरें अशी रचना असून पादांतीं यति असतो. ४. चंदनाच्या उटीचा लेप. [मलयपर्वतावर वृक्ष श्रेष्ठ जातीचे होतात असें वर्णन आहे. मलय देशांत उत्तम चंदन होतो त्याला हरिचंदन अथवा गोशीर्ष असें म्हणतात.] ५. या श्लोकाचें वृत्त 'प्रहर्षिणी'. या वृत्ताचें लक्षणः—'त्रीण्यादावष्टमं यत्र दशमं नैधने तथा । गुरूण्यतिजगत्यां तु त्रिभिश्छेदैः प्रहर्षिणी ॥.' [श्रीभारतीये नाट्यशास्त्रे–अध्याय १५ श्लोक ५६, काव्यमाला पृष्ठ १५७.] ६. ज्या उपजातीचे विषम चरण उपेंद्रवज्रेचे आणि समचरण इंद्रवज्रेचे असतात तिला 'विपरीतपूर्वा' अथवा 'विपरीताख्यातिकी' असें नांव आहे. ७. सात स्वर आहेतः—'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवताः । पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिताः स्वराः ॥' (अमरकोश.) 'षड्जं रौति मयूरस्तु गावो नर्दंति चर्षभम् । अजाविभे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम् ॥ पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम् । अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजरः ॥' १ नि–निषाद–हा शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि–ऋषभ–हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग–गांधार–हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा–षड्ज–हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन् । षड्भ्यः संजायते यस्मात्तस्मात्षड्ज इति स्मृतः ॥' नाक, कंठ, उर, तालु, जिव्हा आणि दांत या सहा स्थानांपासून होणारा तो षडज.] ५ म–मध्यम–हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध–धैवत–हा अश्वाचा,

गोपी नाचति, गोप गाति, यमुना संपूर्णफेणावळी
ऐसी मन्मथरास **विठ्ठल** म्हणे हृत्पंकजीं बैसली. ॥ ९
निर्वैरता[1] प्रगटली सखि! सर्वभूतीं,[2] एकीं स्थळीं नकुळव्याल[3] सुखें असेती. ।
सच्चित्स्वरूप नयनीं नटलें, सुटेना, देखोनि ब्रह्म परिपूर्ण दुजें दिसेना. ॥ १०
दोन्हि गोपांगनामध्य भोगें **ह**री, या प्रकारें **ह**री वेष नाना धरी, ।
वेगळाले थवे रासभूमंडळीं, '**स्रग्विणी**'[4] छंद हा गाइला गोवळीं.[5] ॥ ११
सर्वांतर्गतसर्वसाक्षि[6] सकळां सत्ता जयाची असे,
खेळे सर्वघटीं निरामय[7] निराभास स्वरूपीं दिसे; ।
नाहीं जें म्हणतां जगीं करितसे चाळे **ह**री पांगुळे,
आहे दाखवितो जगद्गुरुकृपा पासाव जे लागले. ॥ १२
भाळीं[8] कस्तूरि काळी, नवकमळकळी खोविली कर्णपाळीं,
वक्षोजीमुक्त झाली पदक डळमळी स्रक् बहू कंठनाळीं, ।
पुष्पीं मंडीत मौळी,[9] वसन झळफळी लेइली नीळ चोळी,
**रा**धा चौरीस ढाळी, **य**दुपति जवळीं क्रीडितां रासमेळीं. ॥ १३
करयुगिं कटिसूत्रीं भूषणीं स्निग्धगात्री,
शरदशशिव मंत्री पूजिला पूर्णपात्रीं; ।
**र**वि हिमकर नेत्रीं कुंडलें कर्णपात्रीं
सहित उदधिपुत्री मूर्ति षट्कोण यंत्री. ॥ १४
बाणांकुशांबुज गदा **द**नुजारि याम्ये, शंखेषु कार्मुक सुदर्शन पाशसौम्ये ।
षट्कोण व्यापक विभू **वृ**षभारि चक्री, श्रीषोडशारि परिवेष्टित वामनेत्री. १५
**वृं**दावतार **व**सुदेवसुता पुराणीं, **वै**यासकी प्रगटले वदली सुवाणी ।
आहे कथासमय **ना**रदसंहितेसी, **वृं**दावनीं वश **ह**री म्हणि **रा**धिकेसी. १६

---

याचें ललाटस्थान; ७ प–पंचम–हा शब्द कोकिलाचा–याचें कंठस्थान वसंतकाळांत. [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु, ऊर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. ८. गाई. ९. रममाण झालीं.

१. वैराचा अभाव. २. प्राण्यांमध्यें. ३. नकुल आणि साप. ४. या छंदांत चार रगण येतात. या वृत्ताचें लक्षण:—'रैश्चतुर्भिर्युता **स्रग्विणी** संमता.' याच वृत्ताला 'पद्मिनी' असें नांव आहे. 'द्वितीयं पंचमं चैव अष्टमैकादशे तथा । पादे यत्र लघूनि स्युः **पद्मिनी**नाम सा यथा ॥' असें याचें लक्षण श्रीभारतीय नाट्यशास्त्र अध्याय १५ यांत आहे. (श्लोक ५० पहा.) ५. गवळ्यांनीं. ६. सकलजनांचे हृदयव्यापार प्रत्यक्ष पहाणारा. ७. रोगहीन, निर्विघ्न. ८. या पद्यांत 'ळी' या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथें अनुप्रासालंकार झाला आहे. ९. मस्तक.

इंद्रनील रत्न कीळ कांतिसी....सांवळा
नंदबाळ कंसमार लोकपाळ सोहळा, ।
आळुमाळ पुष्पमाळ पायिं घोळले इला,
पित्त चैलकास सैल सात वेळ झेलिला. ॥ १७
रत्नदंड चामरें सुशोभितें मनोहरें
झोळकाविता दरें समस्त गोपिकाकरें ।
म्हणोनि कंकणें स्थिरें झणाणिती लघुस्वरें,
विपंच पंधराक्षरें मिळोनि षोडशोत्तरें. ॥ १८
करिति भजनवोढा वोढि गोपी नवोढा,
मग नवजणि लीढा घालिती बाहुवेढा, ।
हळुच म्हणति वोढा हस्त पाखा न काढा,
नयनशर परोढा विंधिति ज्ञानगूढा. ॥ १९
चिदांबराचीं गगनीं वितानें चित्रासनें क्षौमपटोपधानें ।
समुद्रकं दर्पण तालवृत्तक, सुगंधतैलेच शकांत कौतुक. ॥ २०
गंधर्व यक्षगण किन्नर देव येती, विद्याधर प्रचुर गुह्यक गीत गाती, ।
सत्सिद्ध चारण तपोधन तेथ आले, देखोनि कृष्ण नमिला हृदयीं निवाले.॥२१
रंभा घृताची तिसरी तिलोत्तमा सुकेशिका उर्वशिका प्रियोत्तमा, ।
श्रीमंदघोषा गणिकादि मेनका या सप्तही नाचति देवरंजिका. ॥ २२

---

१. अल्प. २. वसन. ३. या श्लोकांत 'रें' या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथें अनुप्रासालंकार झाला आहे. ४. 'ढा' या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथेंही अनुप्रासालंकार झाला आहे. ५. नूतन विवाह झालेली स्त्री. ६. छतें. ७. क्षौमपट=रेशमी वसन. ८. आरसा. ९. पंखा. १०. उर्वशी-नरनारायणमुनींच्या ऊरुसमीपस्थ भागापासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून या स्वर्वेश्येस 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. हिची कथा पुराणांत वर्णिली आहे ती:—बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस नित्याप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं 'इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा,' असें सुचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तपःप्रभावानें पूर्ण करून उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. भागवत–स्कंध ११ अध्याय ४ पहा.

वीणा[1] बीन मृदंगताल मुरली श्रीकोहळा[2] दुंदुभी,
भेरी किंकिणि शंख झल्लरि झणत्कारेति वाद्यें नभीं ।
पुष्पें वर्षति देव दिव्यसुमनें[3] दिव्यांगना[4] नाचती,
........................................... ॥ २३

**ना**रद **तुं**बुरु साधु तपस्वी, यति दिगंबर भक्त मनस्वी ।
**सत्स**नकादिक वैष्णववृंद नर्तति गोवळ गाति विनोद. ॥ २४

**वृं**दारण्यामध्यें बाला यंत्रावर्णी बारा सोळा ।
पूजी **रा**धा श्री**गो**पाळा, श्रोते गाती **विद्युन्माला.** ॥ २५

रजनीं रजनीकर[5] हारमणी, रमणी रमणी जैशा हरिणी ।
हरिणीनयना[6] तितुक्या कमळा, कमळाक्ष[7] निरंतर त्या जवळा. ॥ २६

ऐरावतद्विरदवाहनें[8][9] भद्रजाती[10] **गां**डीवचापकुलिशायुध रुक्म हातीं ।
प्राग्दिक्प्रभू[11] सुरगणासमवेत आला मूर्ध्ना स्वयें **ह**रिपदावरि नम्र केला. ॥ २७

शृंगें चारि त्रिपाद मेषवहनीं[12] आग्नी[13] दिशेचा पती,
हस्त सप्त, विलोहितांग[14] सरसी **स्वा**हा तयाची सती, ।
**श्रीमच्छां**डिल गोत्र दोन्हि वदनें शक्ति स्वभावें करीं
भूदेवा[15] मुख तो कृशानु[16] **ह**रिचे पादाब्ज वंदी शिरीं. ॥ २८

धर्मराज[17] गगनोदर गाभा, वामदंड तरुणांबुधराभा ।
**स्वा**गता स्वमहिमा विलुकूनी वंदिले **ह**रिपदांबुज दोनीं. ॥ २९

उपविष्ट वरिष्ठ सुखासिनी करवाल करीं सहवाहिनी, ।
निरुतेंद्र[18] विभुप्रति पातला, चरणावरि मस्तक ठेविला. ॥ ३०

---

१. वीणा=वाद्यविशेष. [‘**वि**श्वावसोस्तु **बृ**हती **तुं**बरोस्तु **क**लावती । **म**हती **ना**रदस्य स्यात्**स**र-स्वत्यास्तु **क**च्छपी । **शि**वस्य वीणा **ना**लंबी गणानां तु **प्र**भावती ॥’ इति हेमचन्द्रः.] याप्रमाणें प्रत्येकाच्या वीणेचीं निरनिराळीं नांवें आहेत. २. वाद्यविशेष. ३. पुष्पें. ४. अप्सरा. ५. चंद्र. ६. एणाक्षी. ७. कमललोचन. (कृष्ण.) ८. इंद्राचा हत्ती. [‘इरा आपः तद्वान् इरावान् समुद्रः तस्मादुत्पन्नः । इरा उदकानि संत्यस्मिन् इरावान् । इरावत्यब्धौ भवः ऐरावतः ॥’ असा ऐरावत शब्दाचा मूलार्थ आहे. समुद्रामध्यें उत्पन्न झालेला जो तो ऐरावत.] ९. ऐरावत द्विरद (गज) वाहन ज्याचें तो. १०. हत्ती. [‘भद्रो रुद्रे वृषे रामचरे मेरुकदंबके । हस्तिजात्यांतरे भद्रो वाच्यवत् श्रेष्ठ-साधुनोः ॥’ इति विश्वः.] [रघुवंश–सर्ग १४ श्लोक ३१ टीका पहा.] ११. इंद्र. १२. हें वैश्वानराचें वर्णन आहे. १३. आग्नेयी. १४. लाल शरीर. १५. ब्राह्मण. [‘अग्निमुखा वै देवाः.’] १६. अग्नि. १७. यम. १८. नैर्ऋत्यदिशेचा स्वामी.

मकरासनीं[१] वरुण दिक्पति साजे उपजातिवृत्त सखि ! पाश विराजे ।
हरिपाद वंदुनि असे उभांगणीं स्तवितां नदीसहित **'मंजुभाषिणी.'**[२]॥ ३१
हिमकर[३] हरिणावर सखि ! विलसे धनपति[४] शिबिकासनिं गण सरिसे, ।
नमिति उभयता यदुकुलतिलका कविजन म्हणती **'प्रहरणकलिका.'**[५] ॥ ३२
**म**हादेव **ई**शान **शं**भू कपाळी **क**पर्दी **ज**टाजूट **भू**तेश **शू**ळी ।
**वि**रूपाक्ष **भ**र्गो ग्रसितांशुमौळी **म**हेशान दिक्पाल येती त्रिकाळीं. ॥ ३३
कटीं शैल्यबाला, गळां रुंडमाळा, रुळे **वा**सुकी नाग काळा गव्हाळा।
जटामाजि **गं**गा जळाचा जिव्हाळा, वृषारूढ आला, सवें भूतपाळा[६].॥ ३४
**गं**गाभूषणरत्न सर्व मुगुटीं **श्री**वत्स **वि**ष्णुस्तनीं
एकाची तनया सुधाब्धितनया[७], एकासि **का**त्यायनी, ।
ज्यानें वामकरीं कपाळ धरिलें श्रीशंख एका करीं,
एकें बद्धमयूरपिच्छ सरळें अर्धेंदु एका शिरीं. ॥ ३५
एक **द्वा**रवतीपुरीं[८] वसतसे, एक स्मशानीं वसे,
एका लोचन दोन, तीन[९] दुजया, द्वी अक्ष[१०] शोभा दिसे, ।

---

१. मकर हें वाहन वरुणाचें आहे. २. 'मंजुभाषिणी' वृत्तांत स, ज, स, ज आणि एक गुरु अक्षर अशी रचना असते. परंतु विठ्ठलकवीच्या 'मंजुभाषिणीं'त चवथा चरण 'ज' नसून 'स' असतो. या वृत्ताला 'कलहंस' असेंही नांव आहे. मागें पृष्ठ ११९ टीप १ पहा. ३. चंद्र. ४. कुबेर. ५. या वृत्ताचें नांव 'प्रहरणकलिका' अथवा 'प्रहरणकलिता.' याचें लक्षण:—'ननभनलयुगैः प्रहरणकलिका'. यांत न, न, भ, आणि न गण, एक लघु व एक गुरु अक्षर अशी रचना असून सातव्या आणि चौदाव्या अक्षरावर यति असतो. ६. पिशाचसमूह. ७. लक्ष्मी. ८. "द्वारका ह्या चार आहेत; एक गोमती द्वारका, ही स्मार्तांची व बेट द्वारका ही वैष्णवांची आहे. शिवाय, कोडीनार ही मूळची द्वारका होय असें म्हणतात; आणि डाकोरासही द्वारकेची मूर्ति आहे असें म्हणतात; एकून चार द्वारका झाल्या. गोमती द्वारकेस शंकराचार्यांचा शारदामठ आहे तेथें एक डोकीयेवढें उंच असें श्रीयंत्र स्थापन केलें आहे. येथील देऊळ विश्वकर्म्यानें बांधिलें असें म्हणतात. येथें जी गाइकवाडांची गादी आहे तीस 'उग्रसेनाची गादी' म्हणतात. मुसलमानी धांदलींत बोडाणा रजपूत यानें या देवळांतील मूर्ति उचलून डाकोरास आणिली ती परत गेली नाहीं. पुढें स्थिरस्थावर झाल्यावर शंकराचार्यांनीं द्वारकेचे देवळांत नवीन मूर्ति बसविली. तेथेंच शंकराचार्यांची गादी आहे. हें पाहून वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठलनाथजी यांनींही असें सांगितलें कीं, 'मला स्वप्नांत विहिरींत श्रीकृष्णमूर्ति आहे ती स्थापावी असा दृष्टांत झाला.' असें सांगितल्यावर त्याप्रमाणें ती मूर्ति सांपडली तेव्हां तिची स्थापना गोमती द्वारकेपासून दहा कोसांवर दर्यांत जें द्वारका बेट आहे तेथें केली. ह्या बेटद्वारकेंतील हें मंदिर मर्यादी म्हणजे वल्लभाचार्यांचे रीतीप्रमाणें पांच वेळ पूजा व पांच वेळ दर्शन मात्र व्हावयाचें असून इतर वेळेस देऊळ बंद असतें आणि ह्याच रीतीप्रमाणें

जें देऊळ असेल त्यास मर्यादी असें म्हणतात; व जेथें सर्व वेळ दर्शन होतें त्यास स्मार्त रीतीचें मंदिर म्हणतात. तेथें शंखोद्धार वगैरे अनेक तीर्थें असून अष्टनायकांचीं वगैरे देवळेंही पुष्कळ आहेत. तेथें भाट्ये, वाणी, लवाणे वगैरे वैष्णव फार येतात. येथें गोसांवीमहाराजांचे शिष्याचा अधिकार विशेष आहे. वैष्णवांचे छप्पन्न भोग वगैरे करणें तर येथेंच करितात. येथें देवाचे पैशाचीं दुकानें असून तेथें पैसाही फार आहे. या द्वारकेस जातांना दर्याचे कांठीं आरमूडे म्हणून एक गांव असून तेथें तप्तमुद्रा देतात. त्याचे जवळच गोपीतलाव म्हणून एक गांव असून तेथें चार कोस भूमि सर्व गोपीचंदनाची आहे व त्यामध्यें एक तलावही आहे. येथें मुद्रा देण्याचा संप्रदाय पीपाभगत म्हणून होता त्यानें काढिला असें म्हणतात. येथें मिराबाईचें मंदिर आहे. गोमतीद्वारकेस गाइकवाडी मामलेदार राहतात व तो गांव मोठा आहे. गोमती द्वारकेची गोमती नदी ही खारे पाण्याची असून हें गांव बंदरही आहे. ज्या प्रांतांत ही द्वारका आहे त्यास उखामंडळ असें नांव आहे. हा प्रांत वाईट व खडकाळ असून त्यांत वाघीर लोकांची वस्ती आहे, वाघीर हे क्षत्रियवंशज असून त्यांस कावेही म्हणतात. त्यांनींच कृष्णाचें राज्य घेतलें. पुढें ते १८०२ सालीं दर्यांत जहाजें घालून चोऱ्या वगैरे करूं लागले याजमुळें इंग्रज व गायकवाड हे एकत्र होऊन त्यांनीं त्यांचा प्रांत घेतला व त्यांस पेन्शनें दिलीं. पुढें आलीकडे १८५६ सालीं ह्या वाघीरांनीं पुनः दंगा केला व त्यांनीं आपल्या प्रांतांतून गाइकवाडी मामलेदार पळवून लाविला. तेव्हां गायकवाडांनीं इंग्रज सरकारची मदत घेऊन बार्टन साहेब याचे साह्यानें तो दंगा मोडून वाघीरांचें गांव उजाड करून टाकिलें. त्यांनीं दहा वर्षें हा दंगा केला होता व त्यांत दोन्ही द्वारकेचें सर्व धन लुटीस गेलें होतें, परंतु देऊळ मात्र कायम राहिलें. हें देऊळ फार सुंदर व उंच असून तें पांच कोसांवरून दिसतें. द्वारकेस जाणें तें कोणी दर्यांतून जातात, कोणी राजकोटावरून जातात व कोणी पंचतीर्थी करीत दर्याचे कांठानें जातात. पंचतीर्थींत पहिलें तीर्थ तुळशीश्याम. हें गीर पर्वतांत असून तेथें गोड्या पाण्याचीं उष्णकुंडें आहेत; दुसरें तीर्थ सोरटीसोमनाथ; तिसरें पोरबंदर ऊर्फ सुदामपुरी; चौथें माधवपूर, येथें मधुवनांत श्रीकृष्णाचा व रुक्मिणीचा जो विवाह झाला आहे त्याचें बहुलें आहे; आणि पांचवें द्वारका क्षेत्र. या वाटेनें गिरनार म्हणून एक पर्वतशिखर आहे. गीर हा पर्वत चाळीस कोस लांब असून त्याचें एक शिखर उंच आहे त्यास गिरनार म्हणतात. त्याजवर श्रावक लोकांचीं देवळें आहेत व अंबाजी, दत्तात्रय वगैरे कांहीं हिंदूंचींही देवळें आहेत. या पर्वताचे खालींच अशोक राजाचा सुमारें २३०० वर्षांचा दगडावर कोरलेला जुना लेख आहे. त्या नजीकच भूतनाथमहादेव, दामोदरकुंड व गोसांवीमहाराजांची बैठक आहे. गिरनाराखालीं जुनागड म्हणून एक शहर असून तेथील राजा नबाब आहे. तो पूर्वीं यादववंशीय हिंदु होता असें म्हणतात; परंतु अहमदाबादेस मुसलमानी राज्य झालें त्या वेळेस तो मुसलमान झाला. या प्रांतांत ज्या भागांत जुनागड आहे त्यास काठेवाड म्हणतात. हा प्रांत फार उत्तम असून त्यांत नद्या व डोंगर बहुत आहेत. तिकडे कापूस फार पिकत असल्यामुळें तेथील राजाचें उत्पन्न पूर्वींपेक्षां सहापट अधिक झालें आहे. गाइकवाडी अमलांत या प्रांतांत फार खराबी होती. त्या प्रांतांतील सर्व गाइकवाडास खंडणी देत असून जुनागडचे राजासही पेषकष देतात. या प्रांतांत पोरबंदर, जोडीया, वेरावळ, घोगो, भावनगर वगैरे शेंकडों बंदरें आहेत. हल्लीं हा प्रांत सुखी आहे असें म्हणतात. यांत इंग्रजांचा

श्री[1]कंठें ब[2]लियागरंग मथिला, द[3]क्षक्रतू शंकरें,
एकाचें वृ[4]ष या[5]न, एक वि[6]नतापुत्रा वरी आदरें. ॥ ३६
ए[7]कें कोमळकांति सोज्वळचिताभस्में तनू लेपिली,
ए[8]कें चंदनपंक मर्दुनि वपू गंधें सदा चर्चिली, ।
एकें पैं नरमुंडहार धरिले स्वेच्छें शिरी[9]षावरी
एकाचे हृदयीं नवीन तुळसीमाळा रुळे साजिरी. ॥ ३७
एकाची घ[10]नसारवर्णव त[11]नू दु[12]ग्धाब्धिफेणोपमा,
एकाची घननीळ कांति, गगना ऐसी दिसे नीलिमा[13]; ।
[14]शृंगी वाद्य महेश्वरासि, मुरली वाहे स्वं[15]भू सर्वदा,
एका शा[16]र्ङ्ग करीं, पि[17]नाक दुजया हातीं विराजे सदा. ॥ ३८
एकें व्या[18]ल गळां विशाल धरिला विक्राळ तो वासुकी,
एकें आसन घातलें षडदला शेषाचिया त[19]ल्पकीं. ।

---

एकही गांव नाहीं. परंतु राजकोटास पोलिटिकल एजंट याचें ठाणें आहे. पूर्वी यादवांचे वेळेस हा प्रांत एक बेट होतें. त्यांतच यादवांनीं वस्ती करून कृष्ण भगवान् यांनीं राज्य केलें. परंतु आतां समुद्र हटून गेला याजमुळें गुजराथेस हा प्रांत लागला आहे. तरी तेथें नळकंठा म्हणून समुद्राची जागा आहे त्या प्रांतासच लागून कच्छ देश आहे. तेथील वाणी, मेमण, वगैरे आफ्रिकाखंडांत, अरबस्तानांत व झांजिबार प्रांतीं वगैरे अनेक ठिकाणीं व्यापारास जातात. कांठेवाडांत पालीटाणें म्हणून श्रावक लोकांचें एक मोठें देवस्थान भावनगराजवळ आहे. या देशांत स्मार्त, वैष्णव, बीज-मार्गी, श्रावक, स्वामीनारायण, वल्लभाचार्य वगैरे धर्म चालतात. पूर्वी या प्रांतीं गायकवाडाची मोठी फौज असून त्याच्या छावण्या माणिकवाडा, अमरोळी, द्वारका, या ठिकाणीं होत्या व अद्यापिही तेथें थोडे बहुत लोक आहेत. या प्रांतास सौराष्ट्र असें नांव आहे; परंतु त्यास काठेवाड म्हणावयाचें कारण कीं, यांत काठी लोक राहतात." (लोकहितवादीकृत उपयुक्त माहिती—भाग २ पृ० ८-१०.) ९. सांब. १०. तीन डोळे आहेत म्हणून 'त्र्यंबक' असें नांव शंकराला आहे. ११. डोळा.

१. कृष्णानें. २. बलिदैत्याचा यज्ञमंडप. ३. प्रजापति दक्षाचा यज्ञ. [दक्षानें स्वजामाता शंकर व स्वकन्या दाक्षायणी यांस यज्ञसमारंभास बोलाविलें नसतां ती स्वपित्याच्या गृहीं गेली, तेथें तिचा अपमान झाला म्हणून शंकरानें वीरभद्र पुरुष उत्पन्न करून श्वशुराच्या यज्ञाचा विध्वंस केला—अशी कथा आहे.] ४. नंदिकेश्वर. ५. वाहन. ६. गरुड. ७. शंकरें. ८. कृष्णानें. ९. मस्तकावर. १०. कापुरासारखा रंग जीचा अशी. ११. शरीर. १२. दुग्धसमुद्राच्या फेंसासारखी. (शुभ्र.) १३. नीळेपणा. १४. शृंग हें शंकरापुढें वाजविण्याचें वाद्य आहे. १५. स्वयंभू. (कृष्ण.) १६. विष्णुचाप. १७. शिवकोदंड. 'अजगव' असें यास नांव आहे. १८. भुजंग. १९. शयनीं.

कैलासि[1] स्थित नीलकंठ[2], दुसरा वैकुंठवासी हरी,
शौरीशंकर तत्समान मिळले, ते एक एकांतरीं. ॥ ३९
दोघां मार[3] कुमार[4] पुत्र परिसा, दिव्यांगना मा[5] उमा[6],
दोघे देव गवीशकेतु[7] भजती, श्वेतासिता[8] कांतिमा, ।
लंकेशादिक मारिले, हिमकरालंकार[9] एके स्थितीं
श्रीगंगा वर शीर्षि कुंतलभुषा दोघे सदा शोभती. ॥ ४०
कल्पांतीं वटपत्रकोमलपुटीं निद्रिस्त होता स्वभू
नाभीपासुनि जन्म ज्यासि घडला तो शीघ्र आला विभू, ।
हंसारूढसरस्वतीसहित तो आला हरीदर्शना,
भेटे ऊर्ध्व[10]दिशापती मधुवनीं श्रीदेवकीनंदना. ॥ ४१
वाहे शेष वसुंधरा[11] हळु जसी मेरू[12]वरी मोहरी,
.................................................. ।
त्या दंष्ट्रांसि फणादिकां शत सखे! साजे वितानोपमा[13]
तो नागेंद्र अधोदिशापति नमी साष्टांग सर्वोत्तमा. ॥ ४२
कर्णीं दिव्य मणी प्रदीप्तमकराकारें स्फुरत्कुंडलें
तेजें भासुर चंद्रसूर्यकिरणें दिक्चक्र आच्छादिलें, ।
त्रीभंगी यमुनातटींच रमली गोपांगणीं वेढिले
तें साकार स्वरूप आत्महृदयीं सामाविलें विठ्ठलें. ॥ ४३

---

१. कैलास=शिवाचें क्रीडास्थान. ['कैलासः कनकाद्रिश्च मंदरो गंधमादनः । क्रीडार्थं निर्मिताः शंभोर्देवैः क्रीडाद्रयोऽभवन् ॥' इति शंभुरहस्ये.] २. शंकरानें हालाहल विष प्राशन केल्यामुळें त्याचा कंठ काळा झाला, म्हणून त्यास 'नीलकंठ' असें नांव पडलें. ३. मदन. ४. कार्तिकस्वामी. ५. लक्ष्मी. ६. पार्वती. ७. इंद्रियदमन करणाऱ्यामध्यें अत्यंत श्रेष्ठ. ८. श्वेत (पांढरी) आणि असित (श्याम–काळी सांवळी) शोभा धारण करतात. ९. चंद्रमौलि आहे म्हणून हिमकरालंकार असें वर्णन आहे. १०. ब्रह्मदेव. ११. पृथ्वी. १२. मेरू=पर्वतविशेष. ['मेरुस्तु शुशुभे दिव्यो राजवत् समधिष्ठितः । आदित्यतरुणाभासो विधूम इव पावकः ॥ योजनानां सहस्राणि चतुरशीतिरुच्छ्रितः । प्रविष्टः षोडशाधस्तादष्टाविंशतिः विंशतिः ॥ विस्तारात् त्रिगुणस्तस्य परिणाहः समन्ततः ॥' इत्यादि मेरुपर्वताचें वर्णन मत्स्यपुराणांत आहे. हा पर्वत ग्रीक लोकांच्या आलिंपस पर्वतासारखा होय.] १३. वितान=छत.

## सज्जनप्रार्थना.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

**'विद्वज्जीवन'** सप्तमोत्सवकथा विद्वज्जनीं[1] वाचिजे,
ये ग्रंथीं कविधर्म बाधती चुका, चित्तीं कदा नाणिजे, ।
श्लोकार्थी पदबंध दोष न निघे ऐसें घडेना कधीं
रूपें कोकिल कोळसा, परि सखे! तो वंद्य केला बुधीं. ॥ १

खोंवी मंद पदें विचारुनि, पुढें दे दृष्टि शब्दांवरी
गुप्तार्थादि निके सुवर्णसुरसालंकार नानापरी, ।
वर्ते तत्पर सर्वदा निजमनें दोषांगिकारी जरी,
ऐसा **चोर**[2]महाकवी परि सया! पावे सभेभीतरी. ॥ २

**विद्वज्जीवन** ग्रंथराज निपुणो उल्लास षट् सप्तमा,
श्री**कृ**ष्णस्तवनानिमित्य रचिला, प्रार्थूनि **स**र्वोत्तमा; ।
श्रोते! हें लडिवाळ बाळ तुमचें, मी बोलिलों बोबडें,
तें [3]नामामृततुल्य **वि**ठ्ठल म्हणे, मागें तुम्हा येवढें. ॥ ३

[4]ऋग्वेदोत्तम **आ**श्वलायन महाशाखा [5]जगद्वंद्य जे,
श्रीमत्**कौ**शिक गोत्र **पं**ढरपुरा वर्षादिसां जाइजे, ।
श्री**वि**ठ्ठलदास **वि**ठ्ठल कवी वंशोपनामें गुणीं,
क्षीराब्धीपदसागरोत्तमक[6]लालंकारचूडामणी. ॥ ४

---

१. पंडितांनीं. २. "चोर नामक एक प्रख्यात कवि. यानें 'चौरपंचाशिका' नामक एक संस्कृत ग्रंथ केला आहे. या कवीविषयीं जयदेवानें म्हटलें आहे:—'यस्या**श्चोर**श्चिकुरनिकरः कर्णपूरो **म**यूरो **भा**सो हासः कविकुलगुरुः **का**लिदासो विलासः । **ह**र्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु **बा**णः केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय ॥.' याचा भावार्थ असा:—"ज्या कविताबधूचा **चोर** हा चिकुरनिकुर (केशपाश), मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कविकुलाचा गुरु म्हणजे कविश्रेष्ठ जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास) आणि बाण हा जिच्या हृदयांत संचार करणारा साक्षात् पंचबाण (मदन) होय, ती कोणाच्या मनास कौतुक करीत नाहीं?" (विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत निबंधपंचक.) ३. ईशनामसुधा. ४. विठ्ठलानें 'सीतास्वयंवर' आणि 'रुक्मिणीस्वयंवर' या स्वप्रणीत काव्यद्वयाच्या अखेरीस आपला थोडासा वृत्तांत दिला आहे त्याप्रमाणें येथेंही केलें आहे. [सीतास्वयंवर—पृ० ६४ श्लो० ४६-४७ पहा, रुक्मिणीस्वयंवर—पृष्ठ १२७ श्लो० १-२ पहा.] ५. जगताला पूज्य अशी. ६. पृष्ठ १२७ श्लोक २ तृतीय पाद पहा.

व्यापारी हरिभक्तविठ्ठलकवी प्रार्थीत नारायणा,[1]
संरक्षी सकलांसि, ग्रंथ पढतो गोवर्धनोधारणा ! ।
पंचाषष्टि[2] शतद्वयोत्तम पहा पद्यें मिळो अक्षरें,
सप्तोल्लासकथारहस्य रचिलें भावार्थ ध्या आदरें. ॥ ५

---

## द्रौपदीवस्त्रहरण.[3]

(श्लोक)

शैल्य[4]जापतीपुत्र वंदुनी, शोभला दिसे वस्त्रभूषणीं ।
वंदिली त्वरें ब्रह्म[5]कूमरी सर्व भूषणें बाणलीं बरीं. ॥ १
श्रीगुरू ! तुझी नेणवे सिमा, वर्णितां तुतें नास्ति[6] उत्तमा, ।
संत जे सखे भक्तही गुणीं, चातकापरी लुब्ध निर्गुणीं.[7] ॥ २
कुरुपतीसभे श्रेष्ठ बैसला, दुष्ट सर्वही [8]मंत्र योजिला, ।
वचन भूपती बोलिला सभे, ऐकतां प्रभू राहिले उभे. ॥ ३
नमित मस्तकीं बोलिला गिरा,[9] 'भूपती ! तुम्ही मान्य तें करा.' ।
सुयुधना[10]प्रती भूप बोलिले, सर्वही सभे स्वस्थ बैसले. ॥ ४
कुरुपती म्हणे, 'धर्म आणवा, बंधु तो सखा शीघ्र भेटवा; ।
वीटलों जिवा, सर्व वैभवा, ये क्षणीं तुम्ही विदुर पाठवा. ॥ ५

---

१. नारायण. या नांवाच्या उत्पत्तीविषयीं पुढील श्लोक अवलोकनीय आहेत:—'नराज्जातानि तत्त्वानि नराणीति विदुर्बुधा: । तस्य तान्ययनं पूर्वं तेन नारायण: स्मृत: ॥ १ ॥ आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनका: । अयनं तस्य ता: पूर्वं तेन नारायण: स्मृत: ॥ २ ॥' अर्थ—पंडित लोक नारापासून उत्पन्न झालेल्या तत्त्वांना 'नर' असें समजतात. तीं नारें (तत्त्वें) पूर्वीं परमेश्वराचीं अयनें (आश्रमस्थानें) झालीं होतीं म्हणून त्याला 'नारायण' असें नांव पडलें. ॥ १ ॥ उदक नरापासून उत्पन्न झालें म्हणून त्याला 'नर' असें म्हणतात. तें 'नर' (उदक) पूर्वीं ईश्वराचें अयन (वसतिस्थान) होतें म्हणून परमेश्वराला 'नारायण' असें नांव पडलें ॥ २ ॥. २. या काव्याची श्लोकसंख्या २६५ आहे. ३. धृतराष्ट्राच्या अनुमतानें आणि शकुनीच्या मदतीनें दुर्योधनानें कपटद्यूतांत पांडवांचें सकल ऐश्वर्य हरण केलें आणि त्यांस पणांत द्रौपदीसहित जिंकिलें, नंतर तो तिला दु:शासनाकरवीं सभेंत आणवून नग्न करून, तिची अत्यंत विटंबना करण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां तिचा धांवा ऐकून शरणागतवत्सल श्रीकृष्णानें गुप्तरूपें येऊन तिला वस्त्रें पुरविलीं आणि तिची लाज राखिली—अशी कथा सुप्रसिद्ध आहे. तिचेंच वर्णन या काव्यांत विठ्ठलानें केलें आहे. स्वप्नादि प्रकार मूळभारतांत नसून या काव्यांत कवीनें स्वकल्पनेनेंच योजिले आहेत. ४. पार्वतीशंकरसुत, (गणपति.) ५. सरस्वती. ६. नाहीं ज्याहून उत्तम असा. ७. परमेश्वरीं. ८. मसलत, बेत. ९. वाणी. १०. सुयोधन.

नश्वरासि[1] मी काय लुब्धलों, राज्यवैभवें सर्व वंचलों[2] ।
धर्मजी पुढें राज्य तें किती ? मानलें मना, काय संपती ? ॥ ६
बंधु धर्मजी भेटवा मला बोलतां क्षणीं कंठ दाटला, ।
लोचनीं किती पूर[3] चालिला ? जाय रे ! सख्या ! आणिं बंधुला.' ॥ ७
ऐसियापरी राजउत्तरें, वीदुरें विरें मानिलीं बरें, ।
बैसला रथीं, चालिला त्वरें, अश्व तांतडी वागवी बरें. ॥ ८
पातला पुढें सन्निधा[4] पुरीं, येत देखिला पांडुकूमरीं. ।
पैल तो रथीं कोण येतसे ? वाटतो सखा आमुचा असे, ॥ ९
सन्निधीं सखा पातला सभा, बंधु धर्मजी राहिला उभा. ।
आंत आणुनी बंधु भेटले, सर्वही सभे स्वस्थ बैसले. ॥ १०
धर्मजी म्हणे, 'काय गौतमी[5] आळसी तया प्राप्त आश्रमीं, ।
ते परी असे आजि तूमचें, धन्य हो ! जगीं भाग्य आमुचें.' ॥ ११
'सर्वही सुखी' धर्मजी पुसे 'स्नेह तूमचा क्षेमही[6] असे.' ।
करुनियां पुजा धर्म सादरें, मंदसा[7] वदे विदुर उत्तरें. ॥ १२
'सुयुधनें तुम्हां मूळ धाडिलें, भेटिचें बहु ध्यान लागलें, ।
धर्मजी सखा बंधु भेटवा लागली[8] म्हणे ख्याति या जिवा.' ॥ १३

हास्यमूख धर्मराज काय शब्द बोलिला,
'उत्तरेसि आजि अस्त सूर्यराज पातला, ।
आमवातिथीस[9] चंद्र हा नभीं विराजला,
क्षारता त्यजूनी आज सिंधु गोड वाटला[10]. ॥ १४

सुयोधनासिं आजि काय कारुणा विराजली ?
वज्रधार तीव्र काय नम्रतेस पावली ? ।
धरोनि हेतु कोणता तुम्हासि मूळ धाडिलें ?
पूर्व सख्य लोचनीं तुम्हींच सर्व देखिलें.' ॥ १५

धर्मजीप्रती म्हणे विदूर, 'काय बोलणें ?'
पूर्ववर्म दुष्टकर्म सर्व दुःख त्यागणें. ।

---

१. नाशवंत, क्षणभंगुर अशा सुखवैभवाला. २. फसलों. ३. अश्रुपूर. ४. समीप. ५. गोदावरी नदी, गंगा. (आळशावर गंगा लोटली.) ६. कल्याण. ७. हळू हळू असा. ८. 'लागला म्हणे ध्यास या जिवा' असा अन्य पाठ आहे. ९. अमावास्येस. १०. या श्लोकाचें वृत्त 'चामर.'

समान शत्रु मित्र तूज सोमवंशभूषणा![1]
डाव घाव हाव भाव हेतु आणिजे मना. ॥ १६
धर्मजी! तुला सकर्म······[2]चिंति अंतरीं
ते क्षणीं तुम्हासि कर्म लागलें चराचरीं; ।
पूर्व दुःख तीतुकें अनंत सौख्य मानणें,
सुयोधनासि कोण हेतु त्यासि आजि शोधणें? ॥ १७
भाव भाव कीं कुभाव कोण हेतु जाणणें?
मला मनांत वाटतें सुयोधनासि भेटणें, ।
बुद्धि कीं कुबुद्धि कोण कर्म त्यास अंतरीं
क्षीरनीर[3] नीवडीति राजहंस[4] ज्यापरी. ॥ १८
भूपतीस[5] भेटतां कुरूपतीस[6] देखिलें,
बाष्पयुक्त कंठ, नीर लोचनासि पातलें; ।
त्यजूनि सर्वही मुनी वनांत राहिले जसे,
ते गती कुरूपतीस आज बाणली असे.' ॥ १९
नकूल साहदेव[7] भीम कीरिटी[8] सधर्मजी
म्हणे, 'करा विचार सारबुद्धि हेतु काय जी!' ।
वदे विदूर वाक्य त्यांसि कोण बुद्धि सांगणें,
'ज्यास जो गमेल भाव तें त्वरीत बोलणें.' ॥ २०
ते क्षणींच कीरिटी उठोनि राहिला उभा,
ऊठती बहूत हो! परंतु बैसली सभा; ।
करांजली करोनि काय धर्मजीस उत्तरें
विबुद्धिनाथ श्रीगुरूसरीस नित्य उत्तरें. ॥ २१
कल्पिलें जनासि देत कल्पवृक्षराज तो,
आदरें करोनि अन्न तें गणासि मागतो, ।
तयापरीस आदरें वदोनि मंद सागरें
तयासि काय देति ते लघू अनाथ थिल्लरे[9]. ॥ २२

---

१. हे चंद्रकुलभूषणा! (धर्मा). २. अखंड. ३. दुग्ध आणि उदक. क्षीरनीरविवेकन्याय सुप्रसिद्ध आहे. ४. पाणी आणि दूध मिश्र केलेलीं असतां तीं निराळीं करणें या कामांत राजहंसाची ख्याति आहे. ५. धृतराष्ट्रास. ६. दुर्योधनाला. ७. वृत्तासाठीं 'साहदेव' असें पद योजिलें आहे ८. अर्जुन. ९. डबकें, अल्प सरोवर.

जनानिमित्त या धनें भुमीस तोय[1] सोडणें,
घडे तरीच तोय काय राजनासि मागणें ? ।
**भा**रती मती मुढी काय अर्थ पूसिती
बंधुजी सभेसि आजि ते चरीत बोलती. ॥ २३
यथानंतरें **की**रिटी बैसवीला, 'पुढें जाउं भेटी' असा नेम केला. ।
वरीं ते दिसीं भोजनें सर्व झालीं, दुजे वासरीं[2] सर्व सैन्यें निघालीं. ॥ २४
तदा काय **पां**चाळसूता दुतीतें म्हणे, 'जाय गे! **अर्जु**नाचे सभेतें, ।
नमस्कार सांगोनि माझा तयांतें समाचार साकल्य तूं सांग त्यांतें. ॥ २५
निशीचे[3] भरीं वोखटें[4] स्वप्न म्यां गे! सखे! देखिलें तें नये सांगतां गे! ।
त्वरें दूत गे! अंगणीं एक आला म्हणे, 'चाल **पां**चाळसूते! सभेला.'॥२६
करी प्रार्थना त्यांसि नानापरी गे! धरी तो करें नीकरें[5] वेणि कां गे! ।
सखे! वोढितां भूषणा तूट झाली, ग्रिवेचींच गे! फार मुक्तें[6] गळालीं. ॥ २७
सभेमाजि वोढोनि नेलें सखे! गे! दिनासारखी[7] एकली मी उभी गे! ।
सभेचा वदे भूपती काय तेथें, करा नग्न **पां**चाळराजात्मजेतें. ॥ २८
उठे राजबंधू[8] हरी अंबरातें[9], स्मरें अंतरीं मी सखे! **मा**धवातें. ।
असें स्वप्न म्यां देखिलें मध्यरात्रीं, उठें घाबरी तों सखे! कंप गात्रीं. ॥२९
त्वरें जाय तूं सुंदरी! वातवेगें, अगे! **अर्जु**ना वृत्त हें सांग वेगें; ।
न ये जाउं भेटीस **दुर्यो**धनाचे अकस्मात गे! विघ्न होईल साचें.' ॥ ३०
त्वरेनें दुती वातवेगें निघाली, पुढें **अर्जु**नाचे सभेमाजि आली; ।
सभेसन्निधानीं निर्बद्धांजुळी[10] ते[11] दुती **द्रौ**पदीची उभी राहिली ते. ॥ ३१
म्हणे, 'जी! प्रभु! आजि राजांगनेनें[12] नमस्कार सांगीतला थोर मानें, ।
निशीं मध्य निद्राभरें स्वप्न तें हो! असे देखिलें तें नये सांगतां हो!॥ ३२
अकस्मात हो! अंगणीं दूत आला, म्हणे, 'चाल **पां**चाळसूते! सभेला'. ।
धरी दीर्घ वेणी तितें ने सभेतें 'हरी[13] चीरें[14] तेव्हां स्मरे **मा**धवातें[15]. ॥ ३३
प्रभू **कौ**रवाधीपभेटी न जावें मुखें आपुलें **धर्म**जीतें म्हणावें[16].' ।

---

१. तोय सोडणें=त्यागणें, टाकून जाणें. [तोय सोडणें=दान देतांना स्वत्वनिवृत्ति व्हावी म्हणून उदक सोडणें.] २. दिवशीं. ३. रात्रीचें. ४. वाईट. ५. जोरानें, बलात्कारानें. ६. मोत्यें. ७. दीनासारखी. ८. दुःशासन. ९. वस्त्रातें, लुगड्यातें. [अंबर=आकाश; वस्त्र.] १०. हात जोडलेली. ११. ती दूती. १२. राज+अंगना=राजभार्या. १३. फेडी. १४. वस्त्र. १५. श्रीकृष्णातें. १६. या काव्यांत स्वप्नाचा आश्रय धरून कवीनें जें वर्णन केलें आहे तें प्राचीन आणि अर्वाचीन कविजनांस अभिमत आहे असें दिसतें. स्वदेशीय आणि परदेशीय काव्यांत स्वप्नाची युक्ति लढवून चमत्कार केल्याचा प्रकार बराच आढळतो.

उठे **की**रिटी, पातला वीर्यसाधु सभे श्रेष्ठ सिंहासनीं राजबंधु. ॥ ३४
नमस्कार केला प्रभूलागिं मानें म्हणे, 'देखिलें स्वप्न राजांगनेनें; ।
न जावें प्रभू राजभेटीस तेथें, दुती धाडिली शीघ्र सांगावयातें.' ॥ ३५
बंधु उत्तरें ऐकितां बरीं, **ध**र्मजी वदे भारती[1] परी ।
'देव नेणते अंगनामतें मानिजे तया वीषयीं रते. ॥ ३६
अंगनामतें[2] कोण भूपती काय रे! सख्या! बंधु मानिती? ।
अंगनामतें दुःख पावले, अंगनामतें सर्व नाडिले. ॥ ३७
सदा असत्य बोलणें, किमर्थ शब्द मानणें, ।
कळा अपार दावणें, नरोत्तमासि मोहणें, ॥ ३८
अनेक अर्थ बोलणें, विशेष मंद हासणें, ।
स्वहीत अर्थ शोधणें, अनर्थपूर मांडणें, ॥ ३९
ठाणमान चाळणें, अयुक्त मंद बोलणें, ।
करोनि भाव आदरें अपाप पुण्य वेच रे! ॥ ४०
स्त्रिया यापरी बंधुराया! विचारा, **य**माची पुरी प्राप्त ते मुख्य दारा, ।
सुखें वैभवें राजभेटीस जावें, सखा बंधुराया! प्रभूतें करावें.' ॥ ४१
दुती सर्व येवोनि राजांगनेला[3] म्हणे, 'जावयाचा सखे! नेम केला; ।
तुझीं उत्तरें सर्वही **की**रिटीतें मृगांकानने[4]! सर्व सांगीतलीं तें. ॥ ४२
पतिव्रते[5]! पराक्रमें करोनि **ध**र्म भूपती
चालिले त्वरीत गे! सहीत सैन्यसंपती[6], ।
अनाथबंधु सर्वही चमू[7] अपार चालती
खंजरीटलोचने[8]! विंदीस थाट दाटती. ॥ ४३
रथी [9]तुंरग रंगले, अभंग भार[11] चालिले,
अनेक ऊठिल्या ध्वनी तुरंग जासि किंकिणें, ।
निशाण छत्रचामरें सुवर्णदंड साजिरे,
प्रभूवरी विराजिली दिनीं सुपूर्ण साउली.' ॥ ४४

---

१. वाणी. २. वायकोच्या मसलतीनें. ३. द्रौपदीला. ४. चंद्रवदने. [मृगांक+आनन=चंद्र+वदन.] ५. पति हेंच जिचें व्रत ती पतिव्रता. ['आर्तार्ते मुदिते हृष्टा प्रोषिते मलिना कृशा । मृते म्रियेत या पत्यौ सा स्त्री ज्ञेया **पतिव्रता** ॥' इति स्मृतिः.] ६. सैन्यभार, सेनासमुदाय. ७. सेना. ८. खंजरीट=एक पक्षी आहे. यास खंजन, खंजखेट असें म्हणतात. याजविषयीं माहिती वराहमिहिरकृत बृहत्संहितेंत आहे. (अध्याय ४४ पहा.) ९. मार्गात, रस्त्यांत. १०. घोडे. ११. सैन्याचे भार.

सांगतां दुती मात आंगणीं, द्रौपदात्मजा शंकली मनीं, ।
पातले भले दास बोलती '[1]अंबुजानने! बैस वो! रथीं. ॥ ४५
धर्मजी नकूळ साहदेव भीम कीरिटी
प्रताप मल्ल हस्तनापुरीस चालिले हटी; ।
करा त्वरा उशीर फार वेळ आज जाहली.'
बैसली रथीं जसी [2]विद्युल्लता विराजली. ॥ ४६
रथारूढ होऊनियां [3]पंकजाक्षी त्वरें पातली सैन्य जेथें [4]मृगाक्षी. ।
पुरी पातली ते कुरूनायकाची, [5]तुरें वाजलीं भिन्न नानापरीचीं. ॥ ४७
पुढें कौरवाधीश भेटीस आला, म्हणे, '[6]क्षेम दे धर्मजी [7]बंधुबाला.' ।
पदीं देखिलें भूप दुर्योधनाला, अतीआदरें धर्म भेटीस आला. ॥ ४८
भेटले [8]भुपाळ बंधु धर्मजीसि आदरें,
दुष्ट पापरूप काय बोलताति उत्तरें, ।
करी [9]पियूषवृष्टि आजि मेघराज पातला,
[10]सूमनेंसहीत आजि कल्पवृक्ष भेटला. ॥ ४९
मनांत [11]भेदरीत····बाह्यभक्ति दावणें,
पतंगरंग साजिरा परंतु जाय [12]जीवनें; ।
तेपरी सुयोधनें बहूत भाव दाविला,
धर्म बंधुजीसहीत [13]भूवनासि आणिला. ॥ ५०
भीष्म द्रोण हे भेटले बरे, [14]भूपतीपिता [15]मात सोयरे, ।
कर्ण भूपति शीघ्र पातले, धर्मजी सखे बंधु भेटले. ॥ ५१
होति भोजनें ते दिसीं बरीं, काय योजिलें कौरवीं विरीं ।
मंगळें दुजे वासराप्रती, आणिला सभे धर्म भूपती. ॥ ५२
[16]हेममंडपीं बैसली सभा जडित पूतळ्या फांकली प्रभा, ।
स्वस्थ बैसले सर्व भूपती श्रेष्ठ वीर हो! शीघ्र पावती. ॥ ५३
पातला पर्वतापरि [17]रविसूत हो! [18]विरकेसरी
मुगुटमंडित छत्र सज्जित चामरें ढळती वरी, ।

---

१. कमलवदने! २. विद्युल्लता. ३. कमलनयना. ४. मृगलोचना, एणाक्षी. ५. वाद्यें. ६. आलिंगन. ७. बंधूच्या बाला (बापाला). ८. 'भूपाळ' असा शब्द पाहिजे. ९. अमृत. १०. पुष्पांसहित. ११. भेदाचा प्रकार, भिन्नपणा. १२. प्राणातें मुके. १३. 'भुवनासि' असा शब्द असावा १४. धृतराष्ट्र. १५. गांधारी. १६. 'रत्नमंडपीं' असाही पाठ आहे. १७. कर्ण. १८. वीरसिंह.

खड्ग पट्टिश खेटके शुळ तोमरें धरिलीं बरीं,
बैसला विर[1]भार मंडित कुंडलें किरिटी वरी. ॥ ५४
पालखीवरि छत्रचामर वारिती किति चामरें?
चालिला विर[1]भार मंडित खड्ग खेटक तोमरें, ।
**जा**न्हवीसुत देखतां विर[1] राहिले नृपती उभे,
पातला विर[1]भार मंडित बैसला नृपती सभे. ॥ ५५
छत्रचामर पालखी विर[1] **कर्ण** मंडित पातला,
वीरनायकखंडमंडित राजभार विराजिला; ।
बंधु भूपतिसूत सज्जन **पं**डुकूमरिं वंदिला
…………………………………………… ॥ ५६
सभे भूप जेथें **कृ**पाचार्य आला, प्रभूनें तयाला नमस्कार केला, ।
भुपासंनिधीं बैसला आदरेसीं त्वरें बैसले सर्व राजे सभेसी. ॥ ५७
बैसला भुपाळ **धर्म** पाठ नीट सादरें,
रक्त पीत नीळ पांचि रंग त्यांत साजरे, ।
संनिधीं बसोनि दृष्टि पापरूप अंतरीं[2],
सर्व **धर्म**जीस काय बोलताति उत्तरीं. ॥ ५८
'प्रभो! वाउगे काय खेळों कशानें, करा नेम कांहीं दिसे खेळ जेणें.' ।
म्हणे 'जी! बरें' **धर्म दु**र्योधनाला प्रिती आदरें दीधली भाष[3] त्याला.॥५९
त्यावरी **सु**योधनें त्वरीत डाव टाकिला,
कुमंगळें करूनि **धर्म** डावघाव इच्छिला, ।
जिंकिले अपार देश थोर राज पाटणें
रथासही कुंजासही तमा…दुःसाधनें. ॥ ६०
सूर्यपान छत्र वाद्य दास…दूतिका
अपार द्रव्य माणिकें…हेमें[4] शीबिका[5] ।
सुखासनें कनक द्वंद्व चामरें विराजलीं,
**सु**योधनें समस्त वस्तुमात्र तेहि जिंकिली. ॥ ६१
**भीष्म द्रौ**पदात्मजास भाग्य केसरीकटीं
सभाग्य सुंदरा बहूत जिंकिली सिंहकटी, ।

१. येथें वृत्तसुखार्थ 'वी' ऱ्हस्व केली आहे. हा प्रकार विठ्ठलाच्या काव्यांत बराच आढळतो.
२. मनांत. ३. वचन, प्रतिज्ञा केली. ४. सोनें. ५. पालख्या.

जिंकिले समस्त लोक विस्मयासि पावले,
सभा तटस्थ सर्वही उगेच मौन्य राहिले. ॥ ६२
यावरी त्वरीत कौरवेश हास्यउत्तरें
बोलिला सभेसि काय आठवूनि उत्तरें, ।
'जिंकिले समस्त [1]आणभाष पूर्ण घेतली,
पांडवें सभेसि आजि दीनरूप बैसलीं. ॥ ६३
बंधुजी! सभेसि आजि भूवनासि आदरें
द्रौपदात्मजासि सांग सर्व मंद उत्तरें, ।
मंडपा त्वरीत चाल खंजरीटलोचने!
न येइ ते तरी धरून आण अंबुजानने.' ॥ ६४
भूपती नमूनि बंधु [2]भवनासि चालिला
देखिला दुरून जेंवि यमरूप पातला; ।
त्वरें निमित्य काय पापसिंधु पैल येतसे
विचार सार काळ तो कठीण वेळ जातसे. ॥ ६५
नेणवे सभेसि आजि कोण मात वर्तली,
अनाथनाथ श्रीगुरू मुकुंदजीस मानली; ।
कोणता धरूनि हेतु [3]देवरासि धाडिलें,
[4]शंकली मनांत, [5]नीरं लोचनासिं पातलें. ॥ ६६
सन्मुखें भुपाळ बंधु पातलाचि आदरें,
वंदुनी वदे तयासि मंद वाणि उत्तरें, ।
'पतिव्रते! सभेसि आजि भूप द्यूत खेळले
हारिले समस्त आजि दीनरूप बैसले. ॥ ६७
सभे सुयोधनासहीत भीष्म कर्ण भूपती,
बैसले समस्त वीरराज सांगणें किती? ।
[6]कृष्णसारलोचने! त्वरीत चाल मंडपा,
झणि उशीर लाविशी स्थीर हेतु ठाकपा. ॥ ६८
भूपती सभे आणवीतसे, पंकजानने! चाल राजसे! ।
उशिर काय बोलाविला असे, भूपती बहू कोपला दिसे.' ॥ ६९

---

१. 'आणभाक' असाही पाठ आहे. २. घराला. ३. दुःशासनाला. देवर=दीर, नवऱ्याचा भाऊ. ४. भ्याली. ५. पाणी, अश्रु. ६. हरिणनयने! [कृष्णसार=काळवीट, हरिण; कृष्णेन सारः (शबलः) कृष्णसारः.]

काय बोलिली देवराप्रती, 'धन्य हो ! सिमा तूमची स्थिती, ।
देवरा ! तुम्हां लोक हांसती, बैसले सभे सर्व भूपती. ॥ ७०
एकली सभे निंद्य नायका, जाणता तुम्ही पुण्यदायका, ।
भूप देखिती तूमची सिमा, लाज हे प्रभू तूमची तुम्हां. ॥ ७१
वोज हें तुम्हां लाज वाटली, होय देवरा ! आजि माउली; ।
जनक होय रे ! आजि देवरा ! चूलता सखा बंधु सोयरा. ॥ ७२

जान्हवीसुतासहीत कर्ण द्रोण भूपती
बैसले नृपाळ हो ! अनेक वीर भारती, ।
सभेसि बंधुचे वधूसि काय····मान्यता
टाकिला विचार हो ! धरूनि हैतु कोणता ? ॥ ७३

सखया ! शिकवा भुपतीस निती सभे सर्व मिळोनि करा विनती, ।
असे कर्ण तो कृपाळु कृपानिधी तो असे भीष्म जयामति हे सुमति तो.७४
स्वयें जाणति भूतभविष्य बरें, बरवी कथिती भुपतिस नीति रे !' ।
पद सांडिन केशि म्हणे अबळा करुणा वचनीं करु ग्लानि बळा. ॥ ७५
धरि चंद्रमुखी चरणांबुजेतें कुटिलें कवळोनि तिच्या कैबरीतें ।
गजोन्मत्त पद्मलता जसी ते मृगलोचनी ते तयाचि परि ते. ॥ ७६
नयनिं नीर दुःखित सिंहकटी म्हणे, 'राजसख्या ! हळु वेणि धरी. ।
किति मंडित वेणि विराजित हो निबरोनि विचार धरी पदरी. ॥ ७७
ग्रिवें वेष्टित पाच प्रवाळ निळे विरराज कळे सकळे तुटले, ।
करि अंतरिं तूज नये करुणा ? विगलित प्रभु आले तुंसि शरणा. ॥ ७८
असे आण तुम्हा कुरुनाथजिची, विगलीत प्रभू भुषणें रुचिचीं. ।
रति एक तरी भिड हे न धरिली, कसि एक सरील हे पडली ?' ॥ ७९

मुक्त पांच नीळरत्न मुक्त····मालिका
मणी महीस सांडिले तुटोनि भूमिपालका, ।
वदे परंतु पापरूप मंडपासि पातला,
भुमी करोनि द्रौपदी नमूनि भूप बैसला. ॥ ८०
अंधकार यानिमित्य दिव्यरूप कामिनी
प्रकाशवंत साजिरी परंतु जाय जीवनीं, ।
फांकले अनंत कीर्ण दिव्यरूप दामिनी
मंडपांत तेपरी सभेसि खंजलोचनी. ॥ ८१

१. भीष्मासहित. २. वेणीतें. ३. स्त्री, बायको. ४. किरण. ५. सौदामिनी.

सुंदर स्वरूप रूप देखतांचि भूपती,
भले मनासिं आवरोनि माधवासि चिंतिती, ।
पाहती पतीतरूप पापरूप आदरें
यामिनी तयासि फार····दाविली शरें. ॥ ८२
ग्रिवा करोनि खालती उभी कुरंगलोचना[1]
झांकिले तनूसि हेमकांत अंगभूषणा, ।
येकली मनांत तीस कंप फार सूटला,
मनीं त्वरीत यावया मुकुंदराज चिंतिला. ॥ ८३
किती बोलती, 'कोण लावण्य ईचें? उणीं रे! पुढें रत्न[2] क्षीरार्णवाचें[3], ।
सुता[4] साजिरी रत्न हीमालयाची तशी ती नये साम्यता द्रौपदीची. ॥८४
चतुर्वक्र द्वारें सिमा पावकाची[5] पहा ईपुढें, रत्न क्षीरार्णवाची, ।
महीकन्यकेहूनि[6] सौंदर्य भारी पुढें काय? खद्योत[7] त्या भूपनारी.' ॥ ८५
वदे कौरवाधीश, 'कर्णा! भुपाळा पहा हो! इचा कोण लावण्यलीळा, ।
कशी ओतली पूतळी मन्मथाची[8] तनू गौरलीला कळा हाटकाची[9]. ॥ ८६
भुजंगापरी[10] दीर्घ[11] वेणी सखीची, मनोहारि लावण्यता भ्रूलतेची, ।
महामुक्तमाला सुकंठीं विराजे, इचे नेत्र देखोनियां पद्म[12] लाजे. ॥ ८७
अधर चांगले रंगले किती? दशनदीप्तिचे रश्मि[13] फांकती; ।
विलसती किती कर्णभूषणें, शोभती शिरीं मुक्तसूमनें. ॥ ८८
कर्ण शोभले रत्नभूषणीं, जोडिले हिरे हेमकोंदणीं, ।
थाटली ग्रिवीं[14] मौक्तमाणिकें शोभली किती दीप्तिदायकें. ॥ ८९
हृदयीं भुषणें किति रम्यपणीं वर जाळि असे शिरिं मुक्तमणी, ।
दिस तेज दुणें पदकावरुतें कुचकुंभ दिसे दृढ बिल्व जसे. ॥ ९०
भुजदंड कसे गजशुंड जसे, वरि दाट दिसे गजतेज जसे, ।
पह पाणितलें अधरें कमळें भुलवी सकळे इचे कोण लिळे. ॥ ९१
दिस सिंहकटी [15]कशि सूत्रकटीं, वरि रम्य घटी परिधान असे, ।
पदिचीं भुषणें किति रम्यपणें भुपराज म्हणे 'किति मोहियलें!' ॥ ९२

---

१. मृगनयना. २. उत्तम वस्तु. (लक्ष्मी.) ३. दुग्धसागराचें. ४. पार्वती. ५. अग्नीची. ६. सीतेहून. ७. काजवा. ८. मदनाची. ९. सुवर्णाची. १०. सर्पासारखी. ११. लांब. १२. कमळ. १३. किरण. १४. मान. १५. बांधी.

भूपती सभे हेंचि बोलला, 'भूप हो!' म्हणे 'शीकवा इला'।
भूपतीमनीं हेतु कामिनी भूपतीगृहीं होय कामिनी. ॥ ९३
भूपति प्रियविनंति करा भूप सुंदरि भूपती वरा।
'भूप हो!' म्हणे, 'अंबुजानना! भूपती वरी खंजलोचना.' ॥ ९४
भूपती सभे दुष्ट बोलतां, दुःख वाटलें **गो**तमीसुता[1],।
**भा**रताप्रती बोलिला बरें नीतिचीं बरें पुण्य उत्तरें· ॥ ९५
वदे **भी**ष्म, 'आईक राया! भुपाळा वृथा बोलसी पाप हें भूमिपाळा!।
भुपा! आणिली कीं सभे राजबाळा[2] कुढी[3] वासना सांड वेगीं नृपाळा!॥९६
असेचि **राव**णें कुढें महीसुतेसि[4] इच्छिलें,
अपार राज्यभारथाकुळासहीत आटले,।
श्री**रा**मरत्ननायिका[5] अपार दुःख पावली,
तसेचि विघ्र **द्रौ**पदी सभेसि आजि आणिली. ॥ ९७
कुबुद्धिहेतु चंद्रमा गुरूवधूस[5] रातला[6]
जे जनांत निंद्य हो! कलंक त्यांसि लागला;।
मेदिनींत **शुंभनि**शुंभ[7] दैत्य मातला
अनादि आदिखेचरीकरेंचि[8] मृत्यु पावला. ॥ ९८
सुता साजरी रत्न **ही**मालयाची तियेचें गुणें भस्म झाला धराचि,।
कुढें कर्म **इंद्रें अ**हिल्येसि केलें, नृपाळा! भगांकित सर्वांग झालें. ॥ ९९
कुढीं बुद्धि **भ**स्मासुरालागिं[9] होतां जळाली तनू ठेवितां हात माथां;।

---

१. कृपाचार्यां. २. द्रुपदराजकन्या. ३. दुष्ट, आडवी, असरळ, वांकडी. ४. सीतेला. ५. गुरुची पत्नी=तारा. ६. रममाण झाला. ७. शुंभ आणि निशुंभ हे दोघे असुर भ्राते होते. यांना पुरुषापासून मरण येणार नाहीं असा ब्रह्मदेवाचा वर होता, म्हणून हे देवांस, लोकपालांस (इंद्रादिकांस) त्रास देऊं लागले. तेव्हां देवांनीं देवीचें स्तवन करून तिजकरवीं कालरात्रि अथवा कालि नामक शक्ति उत्पन्न करविली. या कालीनें मोहक रूप धारण करुन त्यांस मोहून टाकण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत ही देवी आहे—मनोहर स्त्री नव्हे—असें त्यांस कळलें. पुढें देवीचें आणि यांचें युद्ध झालें त्यांत हे दोघे भाऊ मरण पावले—अशी कथा आहे. ८. कालि नामक देवीनें शुंभ आणि निशुंभ या असुरांस मारिलें. [देवीभागवत—स्कंध ५ अध्याय २१-३१ पहा.] ९. भस्मासुर नामक एक असुर होता. त्यास 'ज्याच्या मस्तकीं हात ठेवशील त्याचें भस्म होईल' असा शिवाचा वर तपोबळानें प्राप्त झाला. तेव्हां भस्मासुर शिवावरच उलटून त्याच्याच मस्तकीं हात ठेवावा अशी कुबुद्धि त्यास आठवली. तेव्हां शिवानें विष्णूचा स्तव केला; त्यावेळीं विष्णूनें मोहिनीरूप धरुन भस्मासुराला भाषणानें संतुष्ट करुन वराची परीक्षा पाहण्याकरितां 'तूं आपले मस्तकावर हात ठेवून पहा' म्हणून सांगितलें, त्याप्रमाणें भस्मासुरानें करतांच त्याचें भस्म झालें—अशी कथा आहे.

भुपाळा ! सुखें सोडि राजांगनेला, वृथा आणिली बंधुजाया सभेला.॥१००

रवी ……… तुरंग रंगले किती
अनंतरूप साजिरें सुखें सुरेख धांवती; ।
तसेंचि हस्ति मस्त हो ! मदें करोनि धांवती,
गिरीसमान फार भार हस्ति बंधु भूपती. ॥ १०१

अनूज वीर पाठिचे बलाढ्य बंधु ठायिंचे,
[1]कृतांतहेर जे परी अपार वीर पांड्चे, ।
हिरेजडित भूषणें असंख्य सैन्यसंपती
तुम्हासि बा ! समान कोण भूप मेदिनीपती ? ॥ १०२

स्वरूप रूप [2]पद्मिनीपरिस [3]खंजलोचनी
गुणें सुभाग्य सुंदरी असोनि तूज कामिनी, ।
अपार राज्य भोगि हें समर्थ भूमिपाळका !
सभेसि काय आणिली बळेंचि [4]बंधुनायिका ? ॥ १०३

कुबुद्धिसार हें असे, [5]परांगनेसि आणितां ।
अपार दुःख पावले करा विचार **भारता** ! ।
[6]निधीसमान संपती परंतु सर्व नाशती, ।
पतंगरंग मानुनी भुपा ! नयेल मागुती. ॥ १०४

सांगतों तुला भूमिपाळका ! सांडि हे सती बंधुनायिका, ।
येकली सभे काय हे सती ? राहिली उभी, सोड भूपती !' ॥ १०५
बोलिला किती नीतिउत्तरें 'भूपती ! नव्हे सर्वथा बरें !' ।
पापसिंधुच्या बैससी तिरीं, काळझोंप हे कोण सांवरी ? ॥ १०६

---

१. यमाचे दूत. २. पद्मिनी ही एक स्त्रियांची जाति आहे. इचें लक्षण:—'प्रांतारक्तकुरंगशावनयना पूर्णेंदुतुल्यानना पीनोत्तुंगकुचा शिरीषमृदुला स्वल्पाशना दक्षिणा । फुलांभोजसुगंधिकामसलिला लज्जावती मानिनी श्यामा कापि सुवर्णपंकजनिभा देवादिपूजारता ॥ उन्निद्रांबुजकोशतुल्यमदनछत्रा मरालस्वना तन्वी हंसवधूगतिः सुललितं वेषं सदा बिभ्रती । मध्यं चापि वलित्रयांकितमसौ शुक्लांबराकांक्षिणी सुग्रीवा शुभनासिकेति गदिता नार्युत्तमा पद्मिनी ॥' (अनंगरंग—अ० १ श्लो० ८-९.) स्त्रियांच्या चार प्रकारांपैकीं एक पद्मिनी. चित्रिणी, शंखिनी आणि हस्तिनी हे तीन अन्य प्रकार. पद्मिनीचें लक्षण:–'भवति कमलनेत्रा नासिकाक्षुद्ररंध्रा अविरलकुचयुग्मा दीर्घकेशी कृशांगी । मृदुचरणसुशीला गीतनृत्यानुरक्ता सकलतनुसुवेशा पद्मिनी पद्मगंधा ॥' (रतिरहस्य). ३. सुंदरनयना. (खंज हा एक पक्षी आहे.) ४. बंधूची स्त्री. ५. दुसऱ्याच्या बायकोला. ६. कुबेराच्या नऊ निधींसारखी. (शंख, पद्म इत्यादि नऊ निधि आहेत.)

येकली सभे खंजलोचनी भूपती सभे मानिले मनीं, ।
बंधुअंगना माउलीपरी भूपति ! बरी बुद्धि हे धरीं.' ॥ १०७
कृपाचार्य द्रोणादि भीष्मादिकानें नृपालागिं सांगीतलें थोर मानें, ।
सिमा सांडिली, क्रोध अद्भुत आला, वदे काय वज्रापरी शब्द त्याला.॥१०८
'जरा तुम्हासि पातली म्हणोनि बुद्धि [1]मंदली,
नव्हे स्वहीतबोलणें अपत्यबुद्धि टाकिली, ।
पुसो तुम्हासि ते दिसी स्वहीतबुद्धि सांगणें,
सकाम सर्व वित्पति तुम्हांसि काय सांगणें ? ॥ १०९
नये तुम्हांसि बोलतां सभेसि काय लाजतां ?
जयास मंद [2]भारती, तयासि काय योग्यता ? ।
गुणें बहूत [3]आगळे, परंतु आज मूर्खता,
विचारसार सांडिला त्यजूनि हेतु कोणता ? ॥ ११०
जरी चाड बैसावयाची सभेसि, तरी लाविजे आपुले लोचनासीं; ।
कळों सर्व चातुर्य आलें मनाला, उठोनी सुखें जा तरी मंदिराला.' ॥१११
असे बोलतां शब्द संधानशेष, सभे दुःख भीष्मास जाळी विशेष; ।
तदा बोलती कौशल्येच्या विचारीं, '[4]दुराशा तुझी हे [5]भविष्या न [6]सारी.॥११२
प्रभू ! हें तुझें पूर्वप्रारब्ध जैसें असे [7]संचिलें दीर्घ संचीत तैसें, ।
[8]क्रियाही तया सारखी दीसताहे, पुढें सर्व जाईल, कांहीं न राहे. ॥ ११३
विचारी बरें रे ! विषें कोण [9]धाला ? नृपाळामधें [10]मातला तो [11]निमाला.' ।
वदोनी असें बैसले पुण्यराशी दुरात्मे तदा काय झाले विशेषी. ॥ ११४
सभेचे प्रभू बोलती भूपतीतें, 'मुखें आपुले वीनवा द्रौपदीतें.' ।
[12]ईळापाळ बोले, 'अहो ! खंजनाक्षी ! तुला सांगतों मान तूं पंकजाक्षी ! ॥११५
सांगतों स्वहीतसार साक्ष सर्व भूपती
धराधरेंद्र इंद्र चंद्र सर्व तूज मानिती, ।
इति [13]महंत सांगते मुनि कुरंगलोचनी !
करोनि सर्व साहिता त्वरीत होय [14]गेहिनी. ॥ ११६
आणा खंजनलोचनेस त्वरिता बैसो [15]मदंकावरी,
पाहो भाग्य समस्त तूर्ण अवघें हंसीपदा सुंदरी ! ।

---

१. मंदावली. २. वाणी. ३. श्रेष्ठ. ४. दुष्ट आशा. ५. होणाऱ्या गोष्टीला, भावी अनर्थाला. ६. दूर करी. ७. सांचलें, जमा झालें. ८. कर्म, कृति. ९. तृप्त झाला. १०. माजला. ११. मरण पावला. १२. राजा. १३. थोर, मोठे लोक. १४. स्त्री. १५. माझ्या मांडीवर.

आहे कोण समान आज मजसीं हें तूं बरें जाणसी
टाकी पांडवआस हेतु मनिंचा कां गे! वृथा शीणसी? ॥ ११७
त्यजि ती सकला अबला भुवनीं मृगलोचनि जाउनिया सदनीं, ।
करिं रत्न प्रवाळ निळें भुषणें सुखे नांद घरी बरें एक मनें.' ॥ ११८
केशरीकटीस[1] पूर्ण शब्दबाण लागले,
पती सभेसि भूपती उगीच मौन्य बैसले; ।
**कर्ण द्रोण भी**ष्मराज मंदमूख बैसले,
**कु**रुपतीअनूज सज्ज **य**मरूप पातले. ॥ ११९
धृतें[2] करूनि शिंपितां प्रचंड ज्वाळ पेटिली, ।
फणींद्रनाथकामिनी[3] विशाळ जेंवि कोपली, ।
तयेपरी नितंबिनी[4] सभेसि दिव्य कामिनी[4]
ति बोलली भुपासि काय कृष्णसारलोचनी[5]. ॥ १२०
'सूर्यसूत[6]! भूपती! तुम्हांसि नीति मानिली,
महींत कोण भूपती सती सभेंत आणिली? ।
तथापि वाक्य कोण हो पतीत बुद्धि टाकिली
शीकवा भुनायकास काळवेळ[7] पातली. ॥ १२१
**जा**न्हवीसुता! वीनती तुम्हा, शीकवा बरी बुद्धि आधमा, ।
आधमें कशी बुद्धि सांडिली? पापरूप हे बुद्धि सेविली. ॥ १२२
भुपासि व्याधि लागली अखंड होत पांचवा,
विवेक बंधुराज तोचि औषधीस मेळवा; ।
मुखांत रोग जल्पतो, भल्यास भूप दाखवा,
सभे समस्त भूपती **कु**रूपतीस वांचवा. ॥ १२३
**कु**रूपतीस टाकिला भविष्यभूतभावना,
म्हणोनि वर्तणूक ही सभेसि बंधु अंगना, ।
भुपासि भूत लागलें त्वरीत सांडनी करा,
करा बहूत यत्न यासि सर्व भूप सांवरा. ॥ १२४
**कर्ण द्रोण भी**ष्मदेव आणि सर्व भूपती
तीर्थराज बैसले परंतु मंदभारती[8],

---

१. सिंहकटीला. २. तुपानें. ३. शेषाची स्त्री, मोठी सर्पिण. ४. स्त्री. ५. मृगनयना. ६. हे कर्णा. ७. मृत्युसमय. ८. ज्यांची भारती (वाणी) मंद (मूढ, मूर्ख) असे.

एकली दिनासमान पापरूप गांजिती,
टाकले मनांत दुःख दुष्ट काय बोलती ? ॥ १२५
अरे! कुरूप पापरूप दुष्टबुद्धि दुर्जना!
अभाग्य दीन दुर्बळा पतीत हेतु कामना, ।
दुष्टशील दुर्मती अनंत पाप जल्पसि
लघू अनाथ किंकरास काय शब्द बोलसी ? ॥ १२६
[1]कुश्चला खरा गर्दभारुपा! कीटका हिना **भा**रता नृपा! ।
कुश्चला खरा! धिक्क रे जिणें! पापसागरा कोण बोलणें ? ॥ १२७
[2]शर्करा दुरी टाकिलीस रे! मृत्तिका मुखीं घालसी बळें, ।
तेपरी तुतें राज्य भोगितां, आणली सभे [3]बंधुभाज [4]तैं. ॥ १२८
मानिलें कसें कूळपाळका ? भोगिसी कसी बंधुनायिका ? ।
वाटलें तुतें काय निष्ठुरा! वोळखी कशी सांडिली [5]गिरा. ॥ १२९
कुटील [6]कामलंपटा मनासि चोज वाटलें,
**द्रौ**पदीस आणितां रे! काय तूज वाटलें ? ।
[7]वायसास काय प्राप्त राजहंसनायिका,
तेपरीच **द्रौ**पदीविचार दुःखदायका. ॥ १३०
पशू [8]मातला थोर कामांध झाला, स्वमातेसि भोगी नसे लाज त्याला,।
तयाचे परी तूं मर्दे मातलासि, कशी वोळखी टाकिली पापराशी! ॥ १३१
सिंहसुंदरी काय [9]जंबुका ? [10]भेकं इच्छिती [11]व्यालनायिका, ।
रत्नमालिका काय रे! [12]खरा! ? काय कस्तुरी [13]ग्रामसूकरा ? ॥ १३२
सिंहाची वधू काय रे! जंबुकासी अरे दुर्जना! काय शोभे तयासी ? ।
असे चंद्रमा **शं**कराचे कपाळीं कसा साजिरा तो दिसे [14]श्वानभाळीं ? ॥ १३३
[15]**गौ**तमी जसी सिंधु हे जरी क्षुल्लका नद्या आदरें वरी, ।
**पा**र्वती जरी बाधिजे [16]भुतें मंद चंद्रमा शीत आरुते. ॥ १३४
ओणवा वनीं शिंपिता घृतें पामरा जरी बाधिजे सितें. ।
पूर्णिमा जरी टाकिली खरी आदरें अमा चंद्रमा वरी. ॥ १३५

---

१. वाईट स्वभावाचा, दुष्टमति. २. साखर. ३. भावाची स्त्री. ४. त्वां. ५. वाणी, उक्ति. ६. मदनासक्ता. ७. कावळ्याला. ८. माजला. ९. कोल्ह्याला. १०. बेडूक. ११. सापाची स्त्री. १२. गाढवाला. १३. गांवांतील डुकराला. १४. कुतऱ्याच्या कपाळावर. [श्वानभाळीं हा समास चिंतनीय आहे.] १५. गंगा. १६. भूतें (पिशाचें). हीं शंकराच्या सेवकवर्गात मोडतात.

टाकिजे धरा[1] व्याळनायकें[2] त्यागिजे जरी वीष त्रिंबकें, ।
साधिजे जरी सिंह जंबुकें टाकिती अही[3] आपुले विषें. ॥ १३६
करीं शस्त्रधारा गिरी चूर्ण बोटीं, जरी वन्हि सेकील हे मेघवृष्टी, ।
जरी अंधकारीं बुडे तेजोराशी[4], जरी मत्स्यकें भेदिजे पर्वतासीं, ॥ १३७
कुरुपती! जयीं ईतुकें घडे, द्रौपदी सती तूज नातुडे[5], ।
तूज रे! वधू सूदरां करें, मग दिसे बरी शुभ्र अंकुरें. ॥ १३८
भूपति असे रम्यकामिनी दामिनी[6] जशी साजिरी घनीं[7], ।
कांतिची तिच्या फांकली प्रभा, हाय रे! तुझी प्राणवल्लभा. ॥ १३९
सुंदरी स्वयें शोभली असे, श्रोणि ते सदा चर्चिली दिसे, ।
दशन ओळिची[8] फांकली प्रभा, होय रे! तुझी प्राणवल्लभा. ॥ १४०
कामिनीपरी बोधवी मना, देतसे कशी दुःख दुर्जना, ।
काळही मनीं शंकला उभा, होय रे! तुझी प्राणवल्लभा. ॥ १४१
नेटकी रुपें खंजलोचना घातले तिणें काळ अंकना, ।
देखतां तितें कंप रे! नभा, होय रे! तुझी प्राणवल्लभा. ॥ १४२
भक्षिते विरमांस शोणित[9] मारिते रजनीचरा[10],
दैत्यदानववीरमानव त्यासि अंतरिं भेदरा, ।
पामरा तुज ते वरी अंकमंडित साजिरी
राजवैभव सूतबांधव भोगि संपति सुंदरी. ॥ १४३
हेतु जों तुझ्या सर्वथा नुरे, भूपती! तुझी कामना पुरे, ।
जाणती तितें सर्वही सभा होय रे! तुम्ही प्राणवल्लभा. ॥ १४४
जरा मृत्यु नाहीं गदा नाम तीचें, करी सर्व निर्मूळ नक्तंचरांचें[11] ।
तिचें नाम घेतां पडे सर्व श्रांती, वसे तेच अंकीं[12] तुझे प्राणहर्ती. ॥ १४५
कुलांगनेस[13] इच्छितां सवेग मृत्यु पावसी,
सभे सतीस आणली रणक्षितीस[14] लोळसी, ।
कुटील नेत्र जीभ रे! रणांत गीध भक्षिती
भुतें रणांत श्वापदें विषासमान वाटती.' ॥ १४६
बहू दुःख गंगासुतालागिं झालें, म्हणे भूपती, 'फार म्यां शीकवीलें, ।
मदाचेनि गर्वे प्रभूनायिकेसी करें आपुले लाविलें पावकासीं[15]. ॥ १४७

---

१. पृथ्वी. २. शेषानें. ३. साप. ४. सूर्य. ५. न मिळे. ६. वीज. ७. मेघांत. ८. दंतपंक्तीची. ९. रक्त. १०. राक्षसांला. ११. राक्षसांचें. रात्रीं भ्रमण करणाऱ्यांचें. १२. मांडीवर. १३. कुलीन स्त्रियेला. १४. समरांगणावर. १५. अग्नीला.

बुद्धि ही तुझी वन्हिसारखी, साहि बंधु हे एणसे सखीं, ।
कामनावनीं वन्हि पेटला, सांगतां तुतें कोप वाटला. ॥ १४८
प्रारब्धरेषा अतिदुष्ट पाहे कलेवरें संचित पूर्ण पाहे, ।
क्रियाही तयासारखी दीसताहे पुढें सर्व जाईल कांहीं न राहे.' ॥ १४९
कोपला भुपाळकाळ क्रोधरूप बिंबलें,
दावि तैं विशाळ व्याल [1]काळकूट आपुलें, ।
पाडिली विशाळ ग्रंथि जेंवि भूल आदरें
बोलिला सभेसि काय द्रौपदीस उत्तरें. ॥ १५०
'सुंदरी ! अगे ! कोण तूं सती ? भोगिसी सुखें पांचही पती ?
लोक हे तिन्ही नायिका किती ? देखिला तयां एकची पती. ॥ १५१
पूर्णता नव्हे येकल्या नरें कामना तुझ्या मानिले बरें, ।
पांच गे ! पती साधिले तपें, कोण ही सिमा सांग तूं जपे. ॥ १५२
व्रत हें कसें मिरविसी जनीं ? तुजसारिखी कोण पापिणी ? ।
शब्द हे तुझे बाण लागले, हृदय हें बळें पूर्ण भेदिलें. ॥ १५३
नमिशील विषापरि शब्द कसे ? अणुमात्र कशी तुज भीड नसे ? ।
परि ते तुझि पाप वदे [2]रसना करिता शतखंड न ये करुणा. ॥ १५४
तिळतुल्य [3]तनू करितां निकरें, तुज राखिल कोण विरांत बरें ? ।
करितां तुज ताडन दुःख जरी, तुज कोण सखा मज सांग तरी ?॥ १५५
खुडितो पदपाणि पयोधर गे ! कुटिले ! मज तों क्षणही न लगे, ।
पति देखत पापरूप तुज गे ! निकरें मुख तोडुनि टाकिन गे ! ॥ १५६
रक्षितो तुतें कोण सांग तो ? साम्यता मतें कोण वीर तो ? ।
मारिता तुतें नीकरे करें वारिजे [4]मतें कोणत्या विरें. ॥ १५७
पापरूप भार्यसी आजि मीच छेदितों,
परंतु बंधुभाज गे ! म्हणोनि भीड राखतो; ।
विटंबितो सभेस गे ! सर्व भूप देखती
बळें करुनि सांग गे ! भुपाळ कोण वारिती ? ॥ १५८
सभे श्रेष्ठ सिंहासनीं स्वामि तूतें कसे बैसले गे ! सखे बंधु माझे ।
कृपाचार्य गे ! भीष्म द्रोणादिकाचा श्रुतीनाम राजा नसे पाड त्याचा. ॥ १५९

१. विष. २. जीभ. ३. शरीर. ४. मला.

तुझें चैल[1] घेतां सभेदेखतां गे ! तुतें देखती नग्न हे भूपती गे ! ।
तुझें गुह्य गे ! देखती विश्व आतां, तुतें कोण गे ! रक्षिता सोडवीता!'॥ १६०
वदे भूपती दुष्ट कालस्वरूपी, वमे[2] वीष जैसा अही[3] दीर्घकोपी, ।
करी गर्जना अंबरीं मेघ जैसा, कुरुनाथ बोले सभेमाजि तैसा. ॥ १६१
यानंतरें काय दुशासनातें म्हणे, 'रे ! करीं नग्न या द्रौपदीतें.' ।
सभेमाजि बोलूं सरे पापसिंधू त्वरेनें तसा ऊठला राजबंधू. ॥ १६२

पांचाळी निरि वोढितां दचकली, कृष्णास बोंभायली[6],
'बापा ! पाव मला, विपत्ति घडली, वैरीसभा दाटली ।
भर्तारीं उगलीच मौन्य धरिली, शूरक्रिया टाकिली,
ही ती लाज तुला तुझी बहिणुली[7] दुःशासनें गांजिली.'॥ १६३

यानंतरें ते करी स्तूति बाळा, 'मुकुंदा ! हरी ! केशवा ! मेघनीळा ! ।
कृपाळा ! घनश्याम गोविंद ! शौरी ! आनंदकंदा ! मज तारिं तारी ! ॥ १६४

गोपिवल्लभ माधवा हरि यादवा मधुसूदना !
अच्युता ! ऊपेंद्र-ईश्वर कामिनीमनमोहना ! ।
नंदनंदन दानशूर श्रीहरी अरिमर्दना !
पूतनांतक अंतकांतक दासपालक वामना ! ॥ १६५
शामजी सखया ! हरि सभे सर्व अंतक[8] बैसले,
पाव रे ! करुणाकरा ! त्वरें धांव सत्वर माउले[9] ! ।
केसरी असतां शिरीं अरि गांजिले हरि ! धांव रे !
चतुर सुंदर डोळसा क्षण एक टीकुनि पाव रे ! ॥ १६६
पद्मिनीपति ! कर्णिकातिरवासिनी यदुनायका !
सांवळे मुरमर्दने ! कुळदेवते ! वरदायका ! ।
सांवळे मुरलीधरे ! कमलानने ! जगव्यापका !
गांजिली मज दुर्जनीं सभे एकली सुखदायका ! ॥ १६७
ये त्वरें यदुनायिके ! करुणानिधे ! मज सोडवीं,
श्यामसुंदररूप येइं समयीं मज दाखवीं, ।

---

१. लुगडें. २. टाकतो. ३. सर्प. ४. दुर्योधन. ५. दुःशासन. ६. हांक मारिती झाली, धांवा करती झाली. ७. बहीण. [बहिणुली-हें शब्दरूप भाषाशास्त्रशोधकांस विचार करण्यासारखें आहे.] ८. यम. ९. हे आई ! १०. या श्लोकांत आणि पुढील श्लोकांत ईश्वराकडे मातृवात्सल्यादिक धर्म आणण्यासाठीं पुंलिंगी शब्दांचीं स्त्रीलिंगीं रूपें कवीनें जाणून बुजून योजिलीं आहेत. ही योजना ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

ये हरी ! धरिली निरी न दिसे उरी [1]जगजीवना !
भक्तवत्सल हें बिरीद तूंझि काय मधुसूदना ! ॥ १६८
श्रीदपा हरिचिद्धना चरणांबुजें तुझिं चिंतिती,
देव फणिवर यक्ष किन्नर लोक मुनिजन वंदिती, ।
जय जयाजी विश्वव्यापक दासपाळक ये हरी !
पाव सत्वर [2]सिंधुजापति ! सर्वथा न उरे उरीं. ॥ १६९
अनाथनाथ श्रीहरी ! क्षणीं उशीर लाविशी,
उशीर फार जाहला मला हरी न पावसी ? ।
जळीं गजेंद्र गांजिला हरि ! त्वरीत सोडला,
द्रौपदीस गांजितां रे ! काय लोभ आटला ? ॥ १७०
दयाळु देव सर्व तूंचि दीनबंधु सोयरा,
तमालनीळ माधवा ! भरूनि तेज [3]अंबरा, ।
फोडिला विशाळ स्तंभ [4]भक्तराज रक्षिला,
द्रौपदीस गांजितां रे ! काय लोभ आटला ? ॥ १७१
मयूरपिच्छभूषणा ! त्वरीत पाव यादवा !
कृपाळु दासबंधुजी रे ! धांव पाव माधवा ! ।
मागतांचि क्षीर [5]त्यांसि क्षीरसिंधु दीधला,
द्रौपदीस गांजितां रे ! काय लोभ आटला ? ॥ १७२
मुकुंद देव वासुदेव यासि नामें चांगलीं,
परंतु दीन येकली सभेसि आजि गांजिली, ।
ध्रुवासि राज्य दीधलें विचारसार मानिला,
द्रौपदीनिमित्य तूज फार शीण वाटला ? ॥ १७३
[6]पंकजानना ! सुंदरा हरी ! धांव रे ! सख्या गांजिती अरी, ।
सर्वही सभे दुष्ट बैसले, आज तूं त्वरें पाव माउले ! ॥ १७४
चिंतिते सदा द्रौपदी सती, मानसें तुझ्या पावने किती ? ।
हे हरी ! जरी मानिलें तुंतें, सोडवी हरी ! कोण आमुतें ? ॥ १७५

---

१. जगतास जीवनासारखा असा. २. लक्ष्मीवल्लभ. ३. आकाशा. ४. प्रल्हाद. ५. उपमन्यु नामक मुनिपुत्राला. उपमन्यु हा व्याघ्रपाद नामक मुनीचा ज्येष्ठ पुत्र होय. यानें तीव्र तप करून ईश्वराराधन केलें तेव्हां त्यास आकल्प आयुष्य आणि क्षीरसागराचें स्वामित्व या दोन गोष्टी ईश्व-प्रसादानें प्राप्त झाल्या—अशी कथा आहे [अनुशासन पर्व–अध्याय १४.] ६. कमलवदना !

छळीतीहि बाळका माउलीतें, न वाटे परिसी न तिचे मनातें, ।
कदापि नऱ्हे माय निष्ठूर हेतु, मुकुंदा! तसी आमुची माउली तूं.॥ १७६

राज्य सौख्य संपतीसि गुंतलासि वामना!
[1]रातलासि भोगितां रे! खंजरीटलोचना! ।
नैश्वरास ईश्वरा तुं लुब्धलासि काय रे?
अनाथनाथ दीनबंधु नाम व्यर्थ जाय रे! ॥ १७७

विधीनिमित्य मत्स्यवेष दैत्यराज[2] मारिला,
द्रौपदीनिमित्य तूज काय लोभ आटला? ।
तळास जाच होइल कूर्मवेष घेतला,
द्रौपदीनिमित्य आजि काय शीण वाटला? ॥ १७८

सूकरावतार हेमनाथ दैत्य शोषिला?
द्रौपदीनिमित्य आजि तूज शीण वाटला? ।
भक्तभारतीनिमित्य नारसिंह पातला,
द्रौपदीनिमित्य तूज फार शीण वाटला? ॥ १७९

[3]भक्तराज द्वारपाळ हेतु तूज मानिला,
द्रौपदीनिमित्य तूज फार शीण वाटला? ।
बहूत वेळ हा भुगोल सर्व दान दीधला,
द्रौपदीनिमित्य तूज काय शीण वाटला? ॥ १८०

श्रीराम पूर्णब्रह्म सर्व देव बंद सोडिला,
द्रौपदीनिमित्य तूज फार शीण वाटला? ।
नीलकंठ देवराज सर्व लोभ टाकिला,
द्रौपदीनिमित्य तूज काय शीण वाटला? ॥ १८१

कल्पवृक्षराज आज लोभसिंधु आटला,
लागला उशीर आज भक्त कोण भेटला? ।
दिनासमान येकली सभेंत, भूप कोपला
कोणत्या कळेसि आजि देवराज गुंतला? ॥ १८२

वीधिरूप इंद्र चंद्र ध्यायिलास अंतरें,
फणींद्र हे मुनींद्र तूज चिंतितात आदरें, ।
सिमा श्रुतीस ना कळे, नेणती न उत्तरें,
सांवळ्या! त्वरीत पाव द्रौपदीस आदरें. ॥ १८३

---

१. रममाण झालास. २. हयग्रीव नामक असुरराज. ३. भक्तवर्य बळीचा द्वारपाल.

उदारधीर योगिराज नीळवर्ण वैभवा,
व्रजा विलास खेळण्याशिं लाविलेंस **या**दवा ! ।
गोपिनाथ पूर्णब्रह्म गोपिवेष खेळणें, ।
गांजिले सभेसि आजि **द्रौ**पदीस पावणें. ॥ १८४
कोणत्या वनांत आजि कामधेनु गुंतली ?
अझुनी नयेचि देव कारुणेस माउली ! ।
दुष्ट राजबंधु पापबुद्धि दाखवीतसे
धांव पाव **या**दवा ! कठीण वेळ जातसे. ॥ १८५
प्रिया **रु**क्मिणी पाय चूरीत आहे, दुश्चित्ता **ह**री होउनी ऊठिताहे, ।
म्हणे, 'भक्तया ! कोण हा गांजियेला?' तदा **द्रौ**पदीशब्द कानीं निमाला.॥ १८६
करि स्तूति नानापरी [1]हाटकांगी घनश्याम तो चालिला लाग वेगीं, ।
खगेशासि सांगे, 'त्वरें चाल तेथें असे [2]पंकजाती सभेमाजि जेथें.' ॥ १८७
वनीं सूटला वायु पक्षद्वयाचा, रजें दाटला अंत अष्टा दिशाचा ।
मनोवेग हा टाकिला दूर मागें, सभे पातला **का**न्हया [3]लागवेगें. ॥ १८८
तिनें देखिली मूर्ति **दा**मोदराची, भुमी होतसे वृष्टि या लोचनाची, ।
म्हणे, '[4]नाभि गे ! पावलों' **द्रौ**पदीतें, करें **का**न्हया पूसिले लोचनांतें.॥ १८९
मुगुटमंडित माणिकें बरिं तेजराजित शोभलीं,
रेखिली [5]मृगनाभि सुंदर श्याम कीर्ती बिंबली; ।
मुगुट शोभत [6]कार्मुकावरि सार नासिक साजिरें,
कमललोचन दशनराजित आद्यरानन गोजिरें. ॥ १९०
श्रवणिं डोलत कुंडलें मकराकृतें [7]विजुचेपरी,
माळिका नवरत्नभूषित केयुरें भुजिं साजिरीं, ।
मुद्रिका वर कंकणें बरि चर्चिली उटि केशरी,
खंजअब्ज चक्र [8]पट्टिश पीत अंबरिं साजिरी. ॥ १९१
जडित माणिकें मेखला वरि शोभती लघु किंकिणी,
[9]अंदु नेपुर वांकि तोडर ऊठती मधुरे ध्वनीं, ।
**ग**रुडवाहन पंकजानन पावला **द्रु**पदीप्रती,
जान्हवीसुत [10]भास्करात्मज **द्रो**ण रेखत **श्री**पती. ॥ १९२

---

१. हेमवर्णी. २. कमलनयना. ३. अत्यंत त्वरेनें. ४. भिऊं नको. ५. कस्तूरी. ६. धनुष्यावर. ७. विद्युल्लतेसारखी. ८. आयुधविशेष. ९. सांखळया. १०. कर्ण.

द्रौपदी म्हणे, 'बंधु केसरी! सांवळ्या! बहू गांजिल्या अरी, ।
काय रे! हरी! लोभ आटला? कोणता तुला भक्त भेटला? ॥ १९३
भक्तवत्सला! दुःखवारणा! कोण हे रिती आणिजे मना?' ।
बोलतां असे कंठ दाटला, लोचनीं किती पूर चालिला. ॥ १९४
बोलिला हरी, 'माय! ऊगली, कौरवासि गे! टाकिली भुली. ।
भस्म हे पुढें सर्व होति गे! मातले मदें पापरूप गे!' ॥ १९५
धरेना पुढें क्रोध दुर्योधनातें, वदे काय निष्ठूर दुःशासनातें ।
'त्वरेनें हरी रे! इचे अंबरातें, करी नग्न बा रे सख्या! पापिणी तें.' ॥ १९६
जसा बोलतो भूप संताप कोपें तसें चैल आसूडलें काळरूपें, ।
किती होतसे दुःख साधूजनातें, स्मरोनी हरी लाविले लोचनातें. ॥ १९७
पुढें चैल आसूडलें लागवेगें, दुजें देखिलें हेमरंगी सुरंगें, ।
सभें मानिलें चोज तेव्हां नृपानें, म्हणे, 'काय कौशल्य केलें सतीनें?' ॥ १९८
वदे भारती त्या सभेच्या जनासी, 'कशी बुद्धि पांचाळराजात्मजेसी? ।
परी कर्मरेखा कदापी ढळेना, दुजें वेतल्या हे दिसे नग्नजाना.' ॥ १९९

दुर्जनासि सौख्य, दुःख सज्जनासि वाटलें,
भुपाळबंधुनायकें त्वरीत वस्त्र ओढिलें, ।
तीसरें सुरंग रंग पीत बिंदु साजिरें
सभा तटस्थ सर्व भूप देखतात आदरें. ॥ २००
कोपला भुपाळ बंधु चैल पाणि नीकरें
बळें करूनि आंसडीत पीतरंग अंबरें; ।
श्वेत पीत अरुण विचित्र रंग दूसरीं
कुंभि त्यांत पाचबिंदु सर्व भूमि साजिरीं. ॥ २०१
पीत रंग भूमि त्यांत श्याम बिंदु शोभती,
श्यामरंग रक्तबिंदु सर्व भूप देखती, ।
मेघवर्ण येकल्यांत हेमतंतु भूमिका,
अनंत रंग नेसली पंचराजनायिका. ॥ २०२
गर्भसूत हेम तंतुरंग सर्व साजिरा
विद्युल्लता नभांत तेंवि तेज अंबरा, ।

---

१. अश्रुपूर. २. माजले. ३. लुगड्यातें. ४. ओढिलें. ५. वस्त्रें, लुगडीं. ६. द्रौपदी.

छिटे अपारद्वीपिचे अनंतरंग साजिरी
लीहिली दशावतार द्रौपदीस बिंबली. ॥ २०३

क्षिरोदकांत पांचबिंदु राजहंस शोभले,
मत्स्य कच्छ सूकरावतार त्यांत बिंबले, ।
नारसिंह वामनादि जामदग्नि सादरें,
रामकृष्ण पूर्णब्रह्म देव दिव्य अंबरें. ॥ २०४

गाई गोकुळ गोठणें वरि वरी ते नेसली सुंदरी,
गोपी गोवळ गोपिनाथ वरुता ते अंबरीं साजिरी, ।
वल्ली वृक्ष विशाळ नंदनवनें वापी तडागोदरीं,
रंगीं अंबर रंगिले बरि दिसे ब्रह्मांडभांडोदरीं. ॥ २०५

काळी शोण विशाल अंबुजवरी जो हीरवा पल्लवीं
त्यातें मिश्रित तंतु हाटक दुजा जैसा असे माधवी, ।
मुंगा सोनसळा सुरंग तगटीं मुक्ताफळें शोभती,
ज्याचे पल्लव माणिकें जडियले ते कोण जाणे किती? ॥२०६

कितीएक ते चित्रविचित्रकारें किती शोभती नृत्य रंगीं मयूरें, ।
कितीएक थवे वरी पक्षियांचे, कितीएक भावी गोळांगुळाचे. ॥ २०७

कितीकावरी पक्षि नानाविलासी, कितीएक कुरंग निपाड शेषी, ।
कितीकावरी ते सभा वासुकीची, मनोवृत्ति विस्मीत दुर्योधनाची.॥ २०८

आले द्राविड कोंकणे गुडिकळा कोल्हार कोशंबिरी
अंगा वंग कलिंग कुंजर गया गांधार काशीपुरी ।
मारू माधव मालिमा मधुमती वैदर्भ वैराटिका,
वेणीमाधव बागुला सकनुज वैराग्यही वेटिका. ॥ २०९

मेरूत लेवार नेमाल मंजुमटिची, खुरासाननें तांड जालंदराची, ।
महीपाळका उरले कै कैचे लाहोर तेलंग ते बर्बरीचे. ॥ २१०

अतळ वितळ सुतळ ते रसातळहि तळें
गगटी अवसुके रत्नराजित सरळ पातळ ठोसरे, ।

---

१. क्षीरोदक=उत्तम वस्त्र. २. डुकराचा अवतार आणि इतर अवतार त्या पाटावांवर चितारिले होते. ३. वानरांचे.

कनकमंडित अंबरें विराजित बहु सुंदरें,
नेसली द्रुपदात्मजा कुरुनाथ देखतसे बरें. ॥ २११
त्वरें पातली आसुके द्वारकेची असंभाव्य ते दिव्य मायापुरीची, ।
अयोध्यापुरी ते रघूनायकाची असंख्यात रंगेचि नेदंबरीची. ॥ २१२
प्रतिष्ठान पद्मावती पीत रंगे, पुढें पातली मैथुळी लागवेगें, ।
सुरंगीत ते अंबरें पट्टनीची, द्विपें सप्तलावण्यता शीवकांची. ॥ २१३
सभे लोटला सिंधु दिव्यांबराचा, हरूं लागला बंधु दुर्योधनाचा; ।
बळेंसी किती अंबरे राजबंधु, त्वरें ओढितां भागला पापसिंधू. ॥ २१४
हरी येक आसूक तो राजभ्राता, चतुर्भूज तो नेसवी कंसहंता. ।
फिरे मागता हस्त दुःशासनाचा, पुढें थाट तो नीळ दिव्यांबराचा.॥२१५
द्रोणादि भीष्म शकुनी श्रवणाभिधानी, त्यांतें म्हणे नृप कसे सुबळाभिमानी ।
हे सुंदरी कुटिल काय रे! खंजनाक्षी, मायाबळें सकळ मोहित पंकजाक्षी.२१६
इणें बांधिली दृष्टि आधी सभेची, गती राहिली सर्वही लोचनांची,[3] ।
इनें लक्षितां लक्ष कांहीं दिसेना, इनें गोविलें चक्षु[3] कांहीं सुचेना. ॥ २१७
पहा बंधु माझे बळा वित्तमानें, तुला देखतां जिंकिले इंद्र जेणें, ।
तया वोढितां अंबरें[4] शीण आला, महा वीर तो भग्न होवोनि गेला.'॥२१८
वदोनि हेंचि उत्तरें त्वरीत बंधु वारिला[5],
वंदिला भुपाळबंधु सन्मुखेंचि बैसला; ।
बंधु पंच भूप धर्मराज दुःख पावला,
निकें म्हणोनि अंतरीं मुकुंदराज चिंतिला. ॥ २१९
यानंतरें द्रौपदि भूपतीतें, म्हणे, 'आणिलें द्यूतकर्मास येथें, ।
तुवां जिंकिला धर्म कापट्यबुद्धी, पुन्हा द्यूत खेळूं, त्वरें आण आधीं.'॥२२०
असें बोलतां आणिलें द्यूत वेगीं, भुपाळापुढें मांडिलें लागवेगीं; ।
स्मरोनी हरी बैसली हाटकांगी[6], उभा राहिला कान्हया पृष्ठभागीं. ॥२२१
बैसली सभेसि देवि खंजरीटलोचनी,
शोभली नभांत जेंवि दिव्यरूपदामिनी[7]; ।

---

१. ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती–भाग २–पृष्ठ ६ पहा. पृष्ठ ४ 'सप्तपुऱ्या' शब्द पहा. २. नेत्रांची. ३. नेत्र. ४. वसनें. ५. निवारिला. ६. सुवर्णांगी. ७. सौदामिनी, वीज.

स्मरोनि देव अंतरीं त्वरीत डाव टाकिला,
सोडवी पतीस, भूप अंतरांत खोंचला. ॥ २२२
आपणासि सोडवी त्यजोनि डाव दूसरा,
पाठिसीं अनाथनाथ दीनबंधु सोयेरा, ।
म्हणोनि डाव टाकिला कळे जनासि कायसा?
परंतु काय जाणतील पापरूप वायसा? ॥ २२३
पातला पुढें **शकुनि** आदरें, नरपतीप्रती बोलिला बरें, ।
'कुलांगनेसि हो काय खेळणें? मांडिलें कसें द्यूत दुर्जनें?' ॥ २२४
यानंतरें तो उठे पापसिंधू, निघाला, सवें सर्वही राजबंधू; ।
असंभाव्य वेष्टीत तो वीरमेळा, नृपाळासवें चालला लोकमेळा. ॥ २२५
दिनांचे परी देखिलें **पां**डवांतें, दयापूर आला कृपासागरातें; ।
करी लोभ माता जशी बाळकांतें, करें पूशिलें **कान्ह**यें लोचनातें. ॥ २२६
**धर्म**जीप्रती प्रेम नावरे, भूप तो उभा राहिला त्वरें. ।
सुजन मोहरा सांवळ्या **हरी**! जनक माउली आमुची खरी. ॥ २२७
चिद्घना **हरी**! देवनायका! सगुण! सांवळ्या! विश्वव्यापका! ।
जय जयाजि हे! सिंधुजापती! वर्णितां तुतें भागल्या श्रुती. ॥ २२८
**हरी**! सिंधुजामात देवा! समर्था! कृपाळूपणें वारिसी भक्तचिंता, ।
तुझा आसरा हे! स्वयें सृष्टिकर्ता, ब्रिदें सांच केलीं **जग**न्नाथ ताता!॥ २२९
कळेना सिमा ये धराधारकातें, कळेना तुझा पार वेदा श्रुतीतें, ।
कळोनी विधाता महायोगियातें, म्हणोनी स्मरा भक्त त्या देवतातें' ॥ २३०
**मुकुंदें** किती वारिला बैसवीला, पुढें **धर्म**रायें नमस्कार केला, ।
चतुर्भुजें सर्वोत्तमें **धर्म**जीतें, कृपाळूपणें गुजें सांगितलें तें. ॥ २३१

---

१. दुर्योधन. २. कृष्ण. ३. दीन जनांसारखें. ४. कृष्णातें. ५. हे लक्ष्मीपति. ६. क्षीरसागराचा जांवई. ७. वेद.

# भगवद्गीता.

(कटिबंध.)

जगदात्मा भगवान् निगमगुरु श्रीहरि चिंतावा. । अगणितगुणगण नारायण पांडवसारथि सेवावा. ॥ ध्रुवपद. ॥

पूर्णवस्तुचित्स्वर्णरूप जें, कारणात्म ओंकारवाच्य जें, तो रमेश भूभार-भूतनृपमारणार्थ अवतार धरी कीं, प्रबळ भारती वीर दोंदळीं, शूर सर्व अनिवार ते कुरुक्षेत्रिं मीनले[1], कौरवेंद्रबळ नीरधि[2]समचि अपार भीष्म दळभार रक्षिता, धीर पांडवा वारिजाक्ष आधारमुख्यबळ, घोरयुद्ध गंभीर भीमदळ[3], सारणार रथ, वारण[4]मालाकार व्यूह ऊदार तुरंगम, त्या रणिं शोभति, येरयेर संहार कराया, स्वार तदा तल्वार झळकविति, भारी तोच उभारी ध्वज चौभेरी त्या दळीं, भेरी गर्जति, धों धों धों धों झं झं झांगड, झनन नगारे, काळसारे शंख स्फूर्जित, करिति तुतारे फार वाजती, चार[5] मात्र संचार मांडिती, सुविचारवंत निर्वैर[6] धर्मनृप, त्या रणिं पाय उतार जाय नमि, गौरवि गुरुला, तो रम्य तदा शिरोभिनंदित ये रथिं पुनरपि, मेरुपरी आकार जयास समीरसुत[7] ध्वजिं भैरवरव[8] करि, मारुतजव शिव वारु धुरंधर, चार जुंपिले, उरमान ताठुनी, कानहि फररर करिति स्थिरगति, प्रेरी त्याला, नीरदनीलशरीर[9] सुपीता, पटीं कटितटीं, हिरे मुकुटशिरिं हार गळा केयूरभुजालंकारकिंकिणी[10], थोर कुंडलें फार चंचलें, चारुगंड युगतारावत्, श्रमनीरबिंदुवरि भूरजकणकस्तुरी निढळीं[11], तनुरुह[12]विलुलित सारथि ऐसा, दोरे धरि करिं, 'होरे होरे' म्हणत मुरारी, विलसे त्या रथिं, अर्जुन बद्धकवचसंनद्ध म्हणे, 'हरि ! युद्ध करीसा प्रसिद्ध कोण नृप, शुद्ध मि पाहिन, मध्यें ने रथ.' 'सिद्ध' म्हणे गोवर्धनधारी, करि तद्वचना बुद्धिमंत नर, योद्धे पाहुनि दुर्धरशोकाविद्ध वदे तैं, 'हा! शिव शिव शिव! वृद्धजनांशि विरुद्ध असें करूं? पद्धति हे अभिवृद्धि न दे मज. ऋद्धि नको कुळ निर्दळुं कैसें? करिन जरि कदन, वरिन यमसदन, घडल गुरुहनन, जडल अघ गहन[13], धरिन यतिवतन, भरिन जठरघन,' यापरि अर्जुन बोलुनि शरधनु टाकुनि रोदन करि, तें निरखुन हरि मनिं दचकुन, 'हा! धिक् तुज,' कौंतेयासि म्हणे, 'कोण समय हरिपुंगव हा, उपहास करिल पहा, शोक महा हा, करिशि अहाहा, कीर्ति

१. मिळाले. २. समुद्रासारखें. ३. भयंकर सैन्य. ४. हत्ती. ५. दूत. ६. अजातशत्रु. ७. मारुति. ८. भयंकर शब्द. ९. मेघश्यामदेह. (कृष्ण.) १०. लहान घंटा. ११. कपाळीं. १२. केंस. १३. विपुल, दाट.

जाय अपकीर्ति घडे जरि, मरण बरें तरि,' यापरि तो हरि, बोलत वरि परि, जिवलग मित्रा स्पर्शुनि गात्रा, विकसितनेत्रा धरि करि तोत्रा[1], ज्ञानदमुद्रा, दावुनि भद्रा शोकसमुद्रांतूनि सुभद्रापतिस उद्धरी, मोह संहरी, प्रथमविषादा परिहरि, मोदा पाववि शरणग, पारिजातनग, सदयहृदयजगदुपकारक उपदेशस्फुटतरु, सुखकरकवि बरवा. ॥ जगदात्मा० ॥ १

'विरस[2] फाल्गुना! करिशि वल्गना, लोकवत् फुका शोक करिशि कां? देह नश्वर स्नेह काय स्थिर? स्वात्मरूप हें नित्य समज हें, असत सत्य ना, सत्य[3] असत ना सुज्ञ जाणती, अज्ञ नेणती, नसे प्रेरिता, नसे मारिता, सर्वें कारिता, गर्वहारिता, जनन मरण या तनुस नात्मया, अज अनामया, समज अव्यया, सांख्यादि अशी, योगबुद्धि असि जाण कर्म जें, मज समर्पिजे, सिद्धि कि विजया, अजया लाभालाभासम सुख, दुःखा हे त्यजि धोका समजुनि, वर्म करी निजधर्मा, कर्म कनिष्ठ[4] ज्ञानवरिष्ठस्थित[5]प्रज्ञता, अद्वितीयता, ब्रह्मपदार्था पावशि पार्था, सांख्ययोग हे लक्षुनि पाहे. ॥ जगदात्मा० ॥ २

ज्ञान थोर तरि कर्म करीना, न म्हणत त्याविण सिद्धि वरीना, असक्त होउनि कर्म करावें[6], हें मम मत येणेंचि तरावें, पावलेचि जनका[7]दिक सिद्धि, कर्मयोग परि सेवुनि ऋद्धी, आधि जिंकुनी, इंद्रियनिकरा[8], निवटी[9] कामादिक येकसरा, मनं[10]बुद्धिहुनी पर जो तिसरा, आत्मा जाणशि तरि ना दुसरा[11]. ॥जगदात्मा०॥ ३

अनादि हें गुज तुज म्यां कथिलें, उपनिषदांचें सारचि मथिलें, हेंचि मि वदलों विवस्वताला[12], नेणशि अज[13] मी मच्चरिताला, कर्मगहन मम वर्म नुमजतां, ज्ञानयज्ञपर सर्व मखाला, वदती संत ज्ञानसुखाला, योगन्यस्तक्रिय जो झाला, ज्ञानें संशय सर्व विझाला, कर्म न बाधी त्या ज्ञानाला, यास्तव मारी या सैन्याला, ज्ञानयोग म्यां कथिला दक्षा! येणें पावशि चतुर्थमोक्षा. ॥ जगदात्मा० ॥ ४

न्यासयोग ही वदलों म्हणउनि, द्विविध न मानी, एकचि दोनी, प्राणवस्तु या दोन्ही करुनी, एकचि उमजे जो तो ज्ञानी, योगाविण संन्यासचि न घडे, कर्मयोग ते दोन्हीं उघडे, जाणुनि निस्पृह हो याविषयीं स्थिरधी अंतःसुखिया होई, भोग[14]सुहृद मी समज तूं हृदयीं, मदुदित पंचम वेदचि पाहीं. ॥जगदात्मा०॥ ५

---

१. चाबूक. २. हताश. ३. गीता, अध्याय २ श्लोक १६ पहा. ४. 'करिष्ट' असा अन्य पाठ आहे. ५. गीता– अध्याय २ श्लोक ६१ पहा. ६. अध्याय ३ श्लोक ९ आणि १९ पहा. ७. अध्याय ३ श्लोक २० पहा. ८. इंद्रियांचा समूह. ९. मारून टाक. (श्लोक ४१ पहा.) १०. मनाहून आणि बुद्धीहूनही वेगळा. (आत्मा.) ११. अध्याय ३ श्लोक ४३ पहा. १२. सूर्याला. १३. अजन्मा. १४. श्लोक २९ पहा.

टाकुनि गृह तुर्याश्रम येणें, तो संन्यास असें तूं न म्हणें, कर्मफलानाश्रित जो योगी, तो [1]संन्यासी न विधि त्यागी, ध्यानीं चित्त निमग्न न जोंवरि, मदुक्तकर्माचरणहि तोंवरि, चित्तलयास्तव, तर तूं आधीं, अष्टांगान्वित योगचि साधीं, आधाराहुनि षष्ठां भोजीं, मनहि आत्मसंयमनें याजी, सर्वाधिक कीं योगाधिक कीं, योगी त्याहुनि अधिक गमे जो रत [2]मद्भजनीं. ॥ जगदात्मा० ॥ ६

भजनालागीं स्वरूप कथितों, आधीं माझें, सावध समजे, जड चित्प्रकृती, मम धरिति जगा, कारण मी रज्जुपरी भुजगा, मोहित जग हें मायात्रिगुणें म्हणउनि माझें स्वरूप नेणे, माया दुस्तर, तरति [3]चतुर्विध भक्ततया तममात्मा कीं बुध,ते जाणति जे,भजति मम पदा,ब्रह्माध्यात्मादिक सातपदा. ॥जगदात्मा०॥७

जाणुनि अंतीं मजला स्मरिजे, यास्तव [4]सप्त पदार्थहि उमजे, ओंकाराक्षर वदतचि मातें, स्मरतचि [5]त्यजि जो या देहातें, तो नर परगति पावे बरवा, यास्तव अनुदिन, मी आठवावा. ॥ जगदात्मा० ॥ ८

कठिण असो हें, आणिक निज गुज, [6]सुराजविद्या कथीन मी तुज, रचिलें जग म्यां, त्यांत मि नाहीं शुक्ति रुप्यांत न जैसी पाहीं, तें जग माझ्या स्वरुपीं आहे, [7]वायु जसा कीं गगनीं वाहे, [8]खल हे नेणति मातें न भजति, भजती सुमती, तूंही मज भज, जें जें करिशी अर्पिं शुभाशुभमुक्त[9]चि होसी, मन्मन हो नवविधभक्ति करी, मातें [10]पांवसि, दे भाक करीं. ॥ जगदात्मा० ॥ ९

'परमधाम तव केंवि भजावें ? कोठें देवा ! तुज चिंतावें,' म्हणसिल तरि मम ऐक विभूती, संक्षेपें तुज देतों निगुती. [11]**आ**दित्यांतहि **वि**ष्णु मि, **नि**गमीं **साम** मि, **शं**कर **रु**द्रांतहि मी, [12]इंद्रियगणिं मन, वाचेमाजी प्रणव मी जप, मख यज्ञांमाजी, शस्त्रभृतीं [13]दशरथसुत तो मी, अनंतरूपें तुज मी किति वदुं, जें जें श्रीमत् तें मी जग हें, एक्या अंशें व्यापुनि राहें. ॥ जगदात्मा० ॥ १०

मी परमात्मा श्रीपतिविश्व, अमूप मदंशें, व्यापिजे तसे,परमाद्भुत हें रूप विलोकी.' यापरि बोलुनि, त्या **पा**र्थाला [14]दिव्यदृष्टियुग नव्य लेववुनि, भव्यमूर्ति मुनिसेव्य दाखवी, अंबरिं मुगुटें चुंबुनि दाटति, लंबभुजाकर झोंबति [15]दिक्करि, कुंभाचरण स्तंभ व्यापिति, [16]कुंभिनिचें तल तुंबल उदरें, लोंबति त्यांत महांबुधि सात

---

१. श्लोक २ पहा. २. श्लोक ४७ पहा. ३. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी. (श्लोक १६ पहा.) ४. ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ इत्यादि (अध्याय ८ श्लो० १-३.) ५. श्लोक ६-८ पहा. ६. श्रेष्ठ विद्या. (अ० ९ श्लो० २.) ७. श्लोक ६ पहा. ८. श्लोक ११ पहा. ३ श्लोक २८ पहा. ९. श्लोक २८-२९ पहा. १०. श्लोक २१ पहा. ११. श्लोक २२ पहा. १२. श्लोक ८ पहा. १३. श्लोक ३१ पहा. १४. श्लोक ४६ पहा. १५. दिग्गज. १६. पृथ्वीचे.

उचंबति त्यांतहि अंबुज जाडें शंभरि तेथें, **अं**बुजभवकृत, विश्व समस्तहि, न-श्वर गुरुकुल विश्वरथ सकल, अश्वरथि सकल, विश्वरूप महदैश्वरयोगहि, एक भाग **ह**रिलोकरम्यहि, नैकवर्ण वपु सुंदर चंदन गंधमाल्यधर कंधरमणि पीतांबर नेसे, **तुं**बर **ना**रद मंजुळ गाती, एकिकडे बहु भीकररूपें, तन्मुखपंक्ती सन्मुख उघड्या उन्नतदाढा उन्मदकौरव सैन्य तदंतरिं, जातां चघळी एकादशनांतरि सगळेंचि गिळी, प्रतिजगदर्वी अतिभयकंपित, आपण आपणा. **अ**र्जुन पाहुनि गर्जुनिया स्तवि, 'रक्ष म्हणे जलजाक्ष **ह**री ! तव पूर्वरूपची सर्वसुखास्पद, दावि चतुर्भुज सावळि आकृति,' परिसुनि हें **ह**रि, **वि**राट परिहरि, सौम्यरूप अति-रम्य वदे तैं, 'गम्यरूप हें सहसा नोहे, भक्षुनि पाला, जपातपाला, करिती त्याला, भजन करिशि तरि सुलभ मी तुजला, संगरहित मत्कर्म करित, मद्धर्म परम तूं सदय हृदयहित, करि तनुभृति मम, अगुण सगुण कतमाहि पदा धरि, तरि तूं सखया ! झडकरि तरशि भवा. ॥ जगदात्मा० ॥ ११

'सगुण निर्गुणामाजी कवणा, मानूं यापरि म्हणशिल तूं जरि, श्रमशिल नि-र्गुणिं सुलभ मी गुणी, अनन्ययोगें [1]अनुरागें मज, भजती त्याला उद्धरि [2]वेहिला, माझे ठायीं, स्थिरधी होईं, न होय तरि [3]अभ्यास करी तूं, हें जरि न होय तरि हो मत्क्रिय, कर्मी सक्त तरि हो मद्रत, यद्वा दमइंद्रियें धरी शम, कर्म त-त्फलें, सर्वहि तूं मजलागुनि अर्पी. ॥ जगदात्मा० ॥ १२

ज्ञानावांचुनि अनन्यभक्ती, करुनी कैशी होइल मुक्ती, म्हणसि समज तूं ज्ञानज्ञेया, क्षेत्रतज्ज्ञहीं जीव निराळा, प्रकृतिस्थचि तो प्रकृतिगुणाला, भोगी साक्षी ईश्वर त्याला, हें समजाया ज्ञानसाधनें, अष्टादशही ज्ञानलक्षणें, ज्ञेयब्रह्मचि जाणुनि तर हो, समाधि सर्वत्रहि ते राहे. ॥ जगदात्मा० ॥ १३

जीवगुणाचा योग कसा तें, ज्ञानहि उत्तम पुनरपि वदतों, [4]प्रकृतियोनि मम तीच्या ठायीं, संकल्पाभिध गर्भ मि ठेवीं, म्हणवुनि चवदा भुवनालागीं बी-जद [5]जनक मि, परि निःसंगी, प्रकृति त्रिगुणें जीव बद्ध हा, होतो भजता मज मुक्त पहा, ब्रह्मैकांतिक सुख अव्यय जे, त्याचा [6]लक्ष्यार्थहि मी समजे. ॥ जग-दात्मा० ॥ १४

विराग कारण या ज्ञानाला, तोचि हेतु भवतरुनाशाला, ऊर्ध्वमूल [7]अश्वत्थ-तरू ते, [8]असंगशस्त्रें छेदुनि परतें, पद पावावें, जें पावलिया [9]परतति पुनरपि, बुध

---

१. प्रेमानें, श्रद्धेनें. २. सत्वर. ३. श्लोक ९ पहा. ४. श्लोक ३ पहा. ५. श्लोक ४ पहा. श्लोक २६-२७ पहा. ७. श्लोक १ पहा. ८. श्लोक ३ पहा. ९. श्लोक ४ पहा.

न भवीं या जातें रवि शशि, न भासविति ते, मम तेजचि तें सर्वा भूतीं, जीव ममांशचि, तो देहांतरिं सेंद्रिय जातो, [1]गंधवहापरि विषयहि पंच, दशेंद्रिययोगें, सेवी कर्म करी अनुरागें, येतां जातां यातें ज्ञानी, जाणति नेणति कीं अज्ञानी, मी सर्वांच्या [2]हृदयीं आहें, वेद्य मी वेदें तद्विध साहे, क्षर [3]अक्षर पुरुषांहुनि उत्तम, ऐसें जाणे मज तो [4]सत्तम, तोचि सर्वविद् शास्त्र समजता, कृतकृत्यहि तो जाण भारता ! ॥ जगदात्मा० ॥ १९

या शास्त्रीं तो नर अधिकारी, [5]दैवी संपत्तीच जयावरि, [6]आसुर संपद्युत जे नर कीं, घालितसें मी तयास नरकीं, कामक्रोधलोभास जो त्यजी, भक्त तोचि निःश्रेयस काजी, शास्त्रेंविण नरपरंपरा जी, स्वमतें करि तप एकसरा जी, षोडश उपचारि जो सुरा जी, पूजी परगति तीस न राजी. ॥ जगदात्मा० ॥१६

शास्त्रावांचुनि पाहुनि वृद्धा, ते नर यजिती धरिती श्रद्धा, कवणगुणाश्रित म्हणसी तरि हे, त्रिगुणें श्रद्धा तीही तीपरि, [7]सात्विक राजस तामस याचें, स्वरूप उत्तम, मध्यम नीच, गुणयुत यज्ञाशन तपदानें, सर्वचराचर आपल्या मानें, ॐ तत्सत् या निर्देशानें होति मदर्पित तेचि समाने, सत्राशे जें अश्रद्धेनें केलें इहपर देऊं नेणे. ॥ जगदात्मा० ॥ १७

उक्तचि वदतो संशय जाया, न्यासत्यागलक्षण कौंतेया ! [8]काम्यकर्म जें तेंचि टाकिजे, न्यास संप्रती बोलती यती, सर्वकर्में आचरूनिही, दे फल मजला त्याग तो भला, दोषयुक्त जें कर्म टाकिजें, यापरि [9]कोणी बोलति वाणी, निश्चय आतां ऐक तूं पार्था, यज्ञ दान जप [10]पावन जें [11]तप; तें न त्यजावें फल वर्जावें, इष्ट एक फल, दुसरें केवल, तिजे [12]सरेमिसळ, जाण हे त्रिदळ, जो अत्यागी तो नर [13]भोगी, हेतुपंचकी होय [14]कर्म की, येथ शहाणा, कोण आपणा, लावि मीपणा, करुनिया पणा, अहंभावना, ज्यास शिवेना, बुद्धि जयाची, लिप्त नव्हेची तो मज एका स्वयें वधो कां, तया न धोका, न मारीच तो, [15]बद्ध न होतो, मी जें म्हणणें तें या त्रिगुणें, बंध पावणें, स्वर्गी धरणी, मुक्ति त्रिगुणी, ऐसा कोणी नाहीं

---

१. वायु. (श्लोक ८.) २. श्लोक १५पहा. ३. अविनाशी. (श्लोक १६.) ४. श्लोक १९-२० पहा. ५. श्लोक १-३ पहा. ६. श्लोक ४ पहा. ७. श्लोक ४ पहा. ८. मनामध्यें कामना धरून केलेलें कर्म. ९. कोणी पंडित. १०. विवेकी जनांचें चित्त शुद्ध करणारें. ११. श्लोक ३ पहा. १२. मरणानंतर भोगतो. १३. मिश्र. (श्लोक १२.) १४. सांख्यशास्त्राप्रमाणें कर्मांचे सिद्धीला पांच कारणें आहेत. (श्लोक १३.) १५. श्लोक १७ पहा.

प्राणी, जरि तूं म्हणसी तरि मुक्ति करी, स्ववर्णधर्में, यथोक्तकर्में जे नर वर्तति, ते गति पावति, दोषयुक्त जें कर्म सहज बा! तेंचि टाकिजें, करूनि अर्पिजे, करितां ऐसें, ज्ञानशुद्धसे पावुनि मग तो, ध्यान करी तो, निर्मम होउनि, शांति पावतो, सकलहि त्यजि तो, मजला भजतो, अचलभक्तिनें, मननशक्तिनें, तो मज एका, समजे जितुका, आहे तितुका, मग मज मिळतो, धन्य फळतो, अणिक न होतो, [1]ब्रह्मचि होतो, स्ववर्णकर्में, आचरवर्में, ते मज देईं, मुक्तिस जाईं, नायिकसी जरि, नाससि तूं तरि, व्यर्थ तवाग्रह, हा प्रकृतिग्रह, पाववि निग्रह, न करिन म्हणशी, ते तूं करिशिल, आहे स्थिरचर, भूतीं ईश्वर, माया करवी, त्यातें फिरवी, त्यासचि भावें, शरण रिघावें, मदुदित निजमनिं, सकलहि समजुनि, रुचलें जैसें, तूं [2]करि तैसें, पुनरपि निजगुज, परम कथिन तुज, [3]मन्मन हो भज, मन्नमनें भज, पावसि हें निज, भाषित ऋतगुज, धर्महि परता, सांडुनि आतां, मज भक्तिरता, ये शरण हिता, सकलहि [4]दुरितांहुनि उद्धरिता, मी सुखकर्ता, म्यां सांगितलें, तें मनिं रुतलें, किंवा वितुलें.' वायां गेलें, त्या **हरि** बोला, **अर्जुन** [5]धाला, म्हणे **हरी**ला, 'मोह[6] निमाला, संशय गेला, तव वचनाला करिन हा भला, बोध लाभला.' मग तो [7]वहिला घे चापाला, निरखि नृपाला, तंव तो आला, आवेशाला, ताव मिशाला, देउनि शाला, **जगदी**शाला, वदे वशाला, 'या अश्वाला, देइ कशाला, उशिर कशाला, मत्सदशाला, सहस्रशाला, भिडवि विशाला, घडवि यशाला, अन्यपिशाला, गणशाशाला, धुंडवि दिशाला, या माशाला, रण कशाला, बांधूं याला, कीं पाशाला, सोडूं कीं हे अंदेशाला?' हे वचनाली, ऐकुनि सगळी, म्हणे, 'भूतळीं, या राजकुळीं, तूं एक बळी, मी तो गवळी.' **नर** या बोली, धरि निजमौळी, हरिपदकमळीं, ठेवुनि हेली, म्हणे, 'निराळी हे स्तुति जाली, तूं जरि जवळी, तरिच मी बळी.' **गी**तावल्ली मोक्षें फळली, **व्या**सें ग्रथिली, **सू**तें कथिली, राया रुचली, नाहीं पचली, जो प्रतिकवळी, कंठीं कवळी, त्याला पिवळी, न रुचे कदळी, जशि उष्ट्राला, **धृ**तराष्ट्राला, **गी**ता माता तैसी होतां, वाहुनि चिंता, म्हणतो **सू**ता, 'आमच्या पूता, घडे विजयिता, त्याला निश्चय, सांगे **सं**जय, तेथें रिपुजय, धन्वि **ध**नंजय, अपरधनंजय, जेथ **र**मावर, **कृ**ष्ण परात्पर, जो योगीश्वर, तेथें [8]जयश्री, भूतिमहाश्री, नित्य शुभश्री, अष्टादश विस्पष्टपुराणी, धिष्ठितसार, [9]श्रेष्ठाम्नायसमा शुचि **गी**ता,

---

१. श्लोक ५३-५४ पहा. २. श्लोक ६३ पहा. ३. श्लोक ६५ पहा. ४. पातकांपासून. (श्लोक ६६ पहा.) ५. संतुष्ट झाला. ६. श्लोक ७३ पहा. ७. सत्वर. ८. श्लोक ७८ पहा. ९. उत्तम वेदासारखी.

अष्टान्वित अक्लिष्ट पद्धति जे, इष्ट हरी त्या ज्ञानेष्टीनें, तुष्ट तयाप्रति, [1]अभीष्टवितरणदीक्षित [2]विठ्ठल रक्षित पुंडलीक, क्षितिमंडळीं, लक्षजनाप्रति क्षेम देत जो उभा समक्षचि, ईक्षणमात्रें मोक्षचि देतो, म्हणउनि निशिदिनिं, मनिं त्या स्मरुनी, न विसरु हरिगुरु, गुणगणविभवा. ॥ जगदात्मा० ॥ १८

---

# [3]बिल्हणचरित्र.

## पूर्वार्ध.

(वसंततिलकावृत्त.)

[4]श्रीवीरसेन नृप गुर्जरदेशवासी वास्तव्यपूर नलपट्टन नाम त्यासी, ।
पृथ्वी समुद्रवलयांकित कीर्तिदाता [5]विद्याविशारद महा श्रुतिशास्त्रवक्ता. ॥ १

---

१. इष्ट देण्याविषयीं निपुण (दीक्षा घेतलेला). २. हें या कटिबंधकाराचें नांव होय असें समजून हें प्रकरण एका 'काव्यसंग्रह' हितैषी मित्रानें आमच्याकडे विठ्ठलाचें म्हणून प्रसिद्धीसाठीं पाठविलें तें स्थलविशेषीं दुरुस्त करून प्रसिद्ध केलें आहे. पण हें विठ्ठलकृत नसावें असें दिसतें. ३. **बिल्हण**–**का**श्मीर देशांत सर्वगुणसंपन्न **प्र**वरपूर (श्रीनगर) नांवाचें एक नगर आहे. तेथून तीन कोसांच्या अंतरावर **ज**यवन नांवाचें एक स्थल आहे, याच्याजवळ परम रमणीय **खो**नमुख (खुन्मोह्) नांवाचें एक गांव आहे; तेथें **गो**पादित्यमहिपतीनें ख्रिस्तशकाच्या पूर्वीं चवथ्या शतकांत श्रौत, स्मार्त, धर्मानुष्ठानानें वागणारे असे कांहीं कौशिकगोत्रोत्पन्न अत्युत्तम ब्राह्मण मध्यदेशाहून सत्कारपूर्वक बोलावून ठेऊन घेतले. त्यांच्यांत सकलवेदवेदांगज्ञ **मु**क्तिकलश नांवाचें एक पंडितरत्न होतें. त्याला परोपकारी, पराक्रमी व विद्वान् **रा**जकलश नांवाचा एक पुत्र होता. त्यापासून पतंजलिकृत महाभाष्यावर उत्तम टीका करणारा **ज्ये**ष्ठकलश नांवाचा एक पुत्र झाला. याचा विवाह **न**गादेवीशीं झाला. त्याला **इ**ष्टराम, **बि**ल्हण व **आ**नंद हे तीन रूपवान् पुत्र झाले. ते चार वेद, सहा शास्त्रें, चौसष्ट कला, व चौदा विद्या यांचे केवळ सागर होते. त्यांची सत्कवींत गणना ह[illegible] असे. त्यांला सर्व ठिकाणीं विद्वत्समूहांत बहुमान मिळत असे. **बिल्हण**, आपला बाल्यकाळ संपल्यावर यौवनावस्थेंत पुष्कळ देश पाहण्याची उत्सुकता असल्यामुळें **अ**नंतदेवसूनु **क**लशभूपतीच्य[illegible] वेळीं (अर्थात् ११ व्या शतकाच्या उत्तरार्धीं) **का**श्मीर देशाहून बाहेर पडला. व **म**थुरा, **वृं**दावन, **क**नोज, **का**शी, **प्र**याग, **दि**ल्ली, **धार**, **गु**जराथ, **सो**मनाथ **प**ट्टण, **से**तुबंधादि स्थलें पाहून त्या त्या ठिकाणीं राजसभेंत बहुमान मिळवून दक्षिण देशांत **क**ल्याण नांवाची जी **चा**लुक्यवंशी नृपतीची राजधानी, ती पाहण्यासाठीं आला. तेथें **चा**लुक्यकुलदीपक **क**र्नाटकदेशाधीश **कुं**तलेंदु **त्रै**लोक्यमल्ल व त्याचा पुत्र **वि**क्रमांकदेव यांनीं त्यास पुष्कळ संपत्ति देऊन '**विद्याधिप**[illegible]' ही पदवी बहुमानपूर्वक अर्पण केली. त्या ठिकाणीं राहून यानें 'विक्रमांकदेवचरित' या न[illegible] एक महाकाव्य रचिलें. हें सर्व त्या चरित्रावरूनच समजतें. 'बिल्हणचरित' नांवाच[illegible]

काव्यांत याच्या विषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख केला आहे. "गुर्जर देशाचा राजा वीरसिंह हा अणहिल्लपट्टन नामें नगरींत राहून राज्य करीत असे. अवंतीभूपालाची कन्या सुतारा ही याची महिषी होती. त्यांला शशिलेखा नांवाची एक कन्या झाली. तिला यौवनदशा आली असतां ती अतिशयित लावण्यवती दिसूं लागली, व मातापितरांस तिला पाहून फार आनंद होत असे. तिचा पिता तिच्या अध्ययनाविषयीं नेहमीं चिंताकुल असे. अशा वेळेस काश्मीर देशाचा सुप्रसिद्ध बिल्हण कवि त्या ठिकाणीं आला. राजपुरोहितांनीं अतिकौतुकानें त्याला राजासमीप नेलें. वीरसिंह राजानें त्याचें अनुपम विद्याकौशल्य पाहून व त्याची अतिमधुर कविता श्रवण करून त्यास विपुल संपत्ति दिली, आणि आपली कन्या शशिलेखा हिच्या शिक्षणाकरितां त्याची विनंतिपूर्वक योजना केली. तिनेंही पित्याच्या आज्ञेप्रमाणें बाल्यावस्थेंतील क्रीडा सोडून देऊन आपला गुरु बिल्हण याची शुश्रूषा करून मनापासून विद्याभ्यास केला. थोडक्याच दिवसांत तिला संस्कृतप्राकृतादिक सर्व विद्या अवगत झाल्या. एके दिवशीं पुष्पमालादिक सुवासिक पदार्थांचा घमघमाट सुटला आहे अशा महालांत बिल्हण कवीनें त्या राजकन्येस कामशास्त्राचें शिक्षण देण्यास सुरुवात केली असतां, रूप, यौवन, विद्या, विनय इत्यादि सकलगुणयुक्त त्या कविश्रेष्ठावर त्या शशिलेखेचें मन जडलें, व तिनें नानाप्रकारचे हावभाव दाखवून त्याचें चित्त आकर्षण केलें. कवीनेंही काममोहित होऊन तिला आपली पूर्वदत्त भार्या समजून गुप्त रीतीनें तिचें गांधर्वविधीनें पाणिग्रहण केलें. कामशास्त्राप्रमाणें पुष्कळ प्रकारच्या क्रीडा करून त्यानें राजकन्येस अत्यंत सुख दिलें. अशा प्रकारें कोणास नकळत सुखानुभवांत त्याचे पुष्कळ दिवस गेले. द्वारपालांनीं संभोगचिन्हांकित म्लानशिरीषकुसुमाप्रमाणें, पूर्वींचे तप्तसुवर्णकांतीसारिखे त्या राजपुत्रीचे अवयव पाहून यांचें सर्व चौरकर्म कसें तरी समजून घेऊन राजास इत्थंभूत निवेदन केलें. हें वर्तमान ऐकून राजाचें हृदय वज्राघात झाल्याप्रमाणें दणाणून गेलें. त्याच्या आंगाचा तिळपापड झाला आणि बिल्हणास सुळावर चढविण्याचा आदेश केला. तेव्हां मारेकऱ्यांनीं बिल्हणास सुळावर चढविण्याचे ठिकाणीं आणलें व ते त्यास म्हणाले, 'अरे! आतां तुझा मृत्यु जवळ आला आहे. तूं आपल्या आराध्य देवतेचें स्मरण कर.' परंतु बिल्हणाचें त्या राजकन्येवर मन अत्यंत ग्ध असल्यामुळें त्यानें मृत्यूची कांहींच पर्वा बाळगली नाहीं व 'अद्यापि तां कनकचंपकदामगौरीम्' ग त्यादि पन्नास श्लोक शशिलेखेचें रूप आठवून तितक्यांतल्या तितक्यांत म्हणून टाकिले. त्या वेळेस रा जानें आपल्या महिषीच्या मुखानें त्याच्या ठायीं आपल्या प्राणप्रिय कन्येचा प्रेमातिशय असल्याचें ऐकून आपला कोप किंचित् आवरून धरिला, व बिल्हणाच्या अपरंपार गुणामुळें त्याची कांहीं कींवही आली. जेव्हां परिजन, मंत्रिगण, पौरवर्ग, इष्टमित्र या सर्व भोंवतालच्या लोकांनीं त्यास बोध केला, त्यांं राजानेंही ब्रह्महत्येस भिऊन परमेश्वराचीच अशी इच्छा असावी असें मनाचें समाधान करून घा कवीस सुळावर न चढविण्याचा हुकूम केला. मग त्यानें पुष्कळ गांव, हत्ती, घोडे, सुवर्ण, रत्नें त्यादि समृद्धि देऊन आपली कन्या शशिलेखा त्यास अर्पण केली. अशा प्रकारें बिल्हणकवि कारः ळाच्या दाढेंतून सुटून राजाची कृपा संपादन करून शशिलेखेसहवर्तमान पुष्कळ सौख्य अनुभनि त झाला." या कथानकावर सर्वस्वीच विश्वास ठेवितां येत नाहीं. कारण; बिल्हण कवि ख्रिस्तीच्या ११ व्या शतकाच्या उत्तरार्धीं काश्मीर देशांतून बाहेर पडला. त्यावेळेस (सन १०७२ ६६ ५१०९४ इ० पर्यंत) अणहिल्लपट्टनांत चालुक्य वंशांत झालेला भीमदेवपुत्र कर्णराज नां-

पट्टांगना[1] नृपतिची विमलाभिधानी[2], बाला अवंतिपुरिची वरभोगदानी ।
कन्या तिची विमल चंद्रकला[3] प्रदीपा, जाणा तयेवरि असे जनकानुकंपा[4]. ॥ २
देश प्रजाजन सुखी बहु पूरवासी राका[5] निशा नगर सत्य गमे जनासी. ।
देखोनि लोक ललनेसि[6] गवाक्षपंथें[7] नेणो दिवा उगवला मुखचंद्र जेथें. ॥ ३
चंद्रोपमा शशिकला वयवृद्धि पावे, क्रीडार्थ ये निजसभेप्रति तातसेवे; ।
कंदर्प[8]सिंधुलहरी जशि दिव्य कांता, देखे पिता करि सुताध्ययनार्थ चिंता. ॥ ४
राजा वदे प्रतिदिनीं स्वपुरोहितातें, 'चिंता मनीं निजसुताध्ययनार्थ मातें, ।
जाणे कवित्व, गुणमंडित शास्त्रवक्ता[9], घेऊनि ये, करिन संग्रह, बुद्धिवंता!' ॥ ५
चिंता करी नृपपुरोहित तों, स्वभावें, काश्मीरदेशकवि बिल्हणमिश्र नावें.।
देशावरास्तव तया नगरास आला, सन्मानिला द्विजवरें सदनासि नेला. ॥ ६
स्वस्थान देश कुळदैवत बिल्हणातें मंत्री पुसे; 'कुशळ सर्व' म्हणे तयातें. ।
विध्युक्त पूजन करोनि पुरोहितानें दिव्यांबरें[10] भुषण दीधलें थोर मानें ॥ ७
मंत्री म्हणे, 'निजसुताध्ययनार्थ राजा, पाहे[11] कवीश्वर प्रतीदिन एक वोजा[12] ।

---

वाचा राजा राज्य करीत असे. वीरसिंह नव्हे. कारण चापोत्कटवंशीय वीरसिंह राजाची समाप्ति इ० स० ९२० त झाली. हें ऑनरेबल् ए. के. फॉर्बस्प्रणीत 'रासमाला' नांवाच्या गुजराथ देशाच्या इतिहासावरुन उघड होत आहे. तेव्हां ११ व्या शतकाच्या उत्तरार्धीं बिल्हण कवि गुर्जर देशांत गेला, हें म्हणणें असंबद्ध आहे. गुर्जर देशांत बिल्हणास कांहीं कष्ट सोसावे लागले हें 'विक्रमांकदेवचरितां'त एक पद्य आहे त्यावरुन कळतें. तसेंच कल्याण नगरींतही कुंतलाधीशाकडून अपार संपत्ति मिळाली असतांही यास कांहीं विपत्ति भोगावी लागली असें काश्मीर देशांतील 'चौरपंचाशिका' नामक पुस्तकाच्या आरंभांतील श्लोकद्वयावरुन स्पष्ट होत आहे. आज मित्तीस 'चौरपंचाशिका', 'विक्रमांकदेवचरित' व 'कर्णसुंदरी' नाटिका हे तीनच ग्रंथ बिल्हणरचित उपलब्ध आहेत. त्या तीन ग्रंथांत नाहींत असे कांहीं श्लोक शार्ङ्गधरपद्धति, सूक्तिमुक्तावलि इत्यादि ग्रंथांत बिल्हणाचे नांवावर घातलेले आढळतात. यावरून बिल्हणाचा आणखी एखादा कोणता तरी ग्रंथ असावा असें वाटतें. ह्या तीन ग्रंथांपैकीं 'चौरपंचाशिका' तर सुप्रसिद्ध आहे. 'विक्रमांकदेवचरित' डाक्टर ब्यूलर यांनीं जेसलमीर नगराहून मिळवून प्रकाशित केलें आहे. 'कर्णसुंदरी' सन १८८७ त ग्वाल्हेरचे पंडित गंगाधर जोशी यांच्याकडून मिळवून जयपुरचे पंडित कै० महामहोपाध्याय दुर्गाप्रसाद व रा० काशीनाथ पांडुरंग परब यांनीं काव्यमालेंत प्रसिद्ध केली. ४. हाच वीरसिंह असावा. ५. विद्येंत निपुण.

१. मुख्य राणी. २. अभिधान=नांव. ३. हीच शशिलेखा. ४. कृपा. ५. पूर्णिमा. ६. स्त्रियेला. ७. झरोक्याच्या मार्गानें. ८. मदन. ९. 'शास्त्रवेत्ता' 'श्रेष्ठवक्ता' असे पाठभेद आहेत. १०. 'पूज्यांबरें दिधलिं सुकृत दीर्घ मानें', 'भोज्यांबरें प्रितिपुरस्कर दीर्घ मानें' असेही पाठ आहेत. ११. 'पाहे मुनीश्वर कवीश्वर एक वोजा' असा पाठभेद. १२. ओजस्वी, तेजस्वी.

भाग्योदयार्थ घडलें नगरासि येणें, सांगों नृपास, मग जाउन भेट घेणें.' ॥ ८
गेला सभेप्रति पुरोहित काय बोले, 'राया! मनोरथ तुझे परिपूर्ण जाले, ।
**का**श्मीरदेशकवि **बि**ल्हणमिश्र नामें आला, नृपाश्रय[1] दिजे नृपसार्वभौमें.' ॥ ९
तोषोनि भूपति म्हणे स्वपुरोहितासी, 'भेटावया त्वरित घेउन ये कवीसी.' ।
'हो जी !' म्हणोनि गुरुजी सदनासि आले; प्रेमादरें प्रभुशिं नेउनि भेटवीलें. ॥ १०
प्रज्ञा प्रगल्भ, कवितारसवृत्ति मोठी, संतोषले नृप सभासद धूर्त[2] पोटीं, ।
छंद प्रबंध यमकें पदबंधदीक्षा, वेदोक्त संस्कृत गिरा प्रभु दे परीक्षा. ॥ ११
जाला मनीं परम तोष महा नरेंद्रालंकार हेम[3] वसनें दिधलीं कवींद्रा. ।
विज्ञप्ति भूभुज[4] करी, 'कविचूडरत्नें[5] कन्येसि अध्ययन सांग किजे प्रयत्नें.' ॥ १२
'आज्ञा समर्थ तुमची' कविराज बोले. केला मुहूर्त पढतां पद पाठ झाले. ।
प्रज्ञा विशाळ गुणवंत पढों निघाली, थोड्या दिसांत तिसि व्युत्पति फार झाली. ॥
केलेंच अध्ययन संस्कृतप्राकृताचें, **पा**तंजलादिक[6] महाश्रुत शास्त्रचर्चें ।
गांधर्व वैद्य रस ज्योतिष मंत्रविद्या, भाषा कवित्वगुण काव्य कला समुद्या. ॥ १४
तो[7] बोलला वचन, '**चं**द्रकले! सुशीले!, जाली तुला सकळ व्युत्पति राजबाळे!
नाहीं तुला शिकविलें स्मरशास्त्र[8] पाहीं, अभ्यासितां विदित होइल सर्व तेंही'. ॥ १५
ते[9] बोलतां परम सद्गद मंद वाचे, पादारविंद[10] धरिलें कवि**बि**ल्हणाचें, ।
'तें कामशास्त्र[11] तुमचेनि मुखें वदावें, त्यानंतरें[12] स्वनगराप्रति शीघ्र जावें.' ॥ १६
शोभे निकें[13] तनु तिचें महके[14] सुगंधें, कर्पूर[15] धूप मणिमंडित पाचबंधे, ।
शृंगारिले लखलखाट दिसे दिगंतीं, सौदामिनी[16] लवत तेज पडे दिगंतीं. ॥ १७
शृंगारकानन[17] गमे निज मन्मथाचें[18], देखोनि चित्त रमलें कवि**बि**ल्हणाचें. ।
आमंत्रिला त्वरित[19] मन्मथ तो शरीरीं, आरंभिलें '[20]रतिरहस्य' म्हणे विचारीं. ॥ १८
नानासनें नयन वर्तन[21] हास्य गोष्टी, कंदर्पसिंधु[22] विपरीत कला प्रतिष्ठी, ।
हें सांगतां परम व्याकुळ कामबाणें[23], जाली म्हणे विविध शास्त्रविधिप्रमाणें. ॥ १९

---

१. 'गृहाश्रय' पाठांतर. २. चाणाक्ष पंडित. ३. सुवर्ण. ४. राजा. ५. शिरोमणि. ६. महाभाष्यग्रंथादिक. ७. 'मी बोलिलों' पाठांतर. ८. कामशास्त्र. ९. 'तेजल्मना' पाठांतर. १०. पादकमल. ११. कामशास्त्रावर 'कामसूत्र' नामक श्रीवात्स्यायनप्रणीत ग्रंथ आतां सुप्रसिद्ध आहे. १२. 'त्यानंतरें मग तुम्ही नगरासि जावें' असाही पाठ आहे. १३. स्पष्ट, खरोखर. १४. मोहकें. १५. 'कस्तुरी' पाठभेद. १६. वीज. १७. अरण्य. १८. मदनाचें. १९. 'मदनभूपतिनें' पाठभेद. २०. 'रतिरहस्य' नामक कामशास्त्रग्रंथ. हा ग्रंथ कुक्कोक कवीनें केल्यामुळें त्या ग्रंथास 'कोकशास्त्र' असें नांव पडलें. या ग्रंथाचे बारा परिच्छेद आहेत. २१. 'नूतन' पाठभेद. २२. समुद्र. 'युद्ध' पाठभेद. २३. 'पंचबाणें' पाठभेद.

हें ऐकुनी खवळलें मन आंवरेना, होणार जाण सहसा लिहिलें टळेना. ।
दैवी कळाघटित तेंच विचारिलेंसे, गांधर्वलग्न सदनीं मग लाविलेंसे. ॥ २०
यानंतरें खचितरत्नपलंगसेजे, क्रीडा करी प्रथम कामसुखासि लाजे, ।
आलिंगनीं दृढ तिला धरितांचि झाडी, संघट्टनीं बहुत भी परि मी न सोडी. ॥
म्यां घातला स्वकर जों निरिमोचनातें, कंदर्पमंदिरकपाट[1]सुवेष्टनातें. ।
बाळा वदे सुरतहास्यरसाधिकारी, 'पद्मासनीं कवण तस्कर [2]वित्त चोरी?'॥ २२
आलिंगिली नृपसुता सुरताभिलाषें, आरंभिलें मदन[3]संगर सावकाशें ।
बिंबाधरासि [4]रदंश नखक्षतादी, संभोगसौख्य रमतांनुभवी विनोदी. ॥ २३
झांकी स्वगुह्य वसनें सुरतप्रसंगीं, ठेवी कटाक्षकमलावरि हात वेगीं, ।
[5]तल्पीं सुगंधसुमनें मणिरत्नमंचीं, क्रीडा कुतूहल करी [6]तनया नृपाची. ॥ २४
[7]पद्मानना बहुत भी मृग[8]शावकाक्षी, [9]मातंग[10]कुंभयुगुलस्तनभार साक्षी ।
रक्त [11]प्रवाल रुचिराधरबिंबशोभा, कुंदोपमा [12]दशनपंक्ति [13]हिरावली [14]भा. ॥ २५
आम्रप्रवाल करपल्लव राजसेचे, [15]ऊर्ध्वें [16]मृगेंद्रकटि वर्णिल कोण वाचे? ।
सौवर्णचंपकतनू मदनाभिरामा, साजे मुखास उपमा परिपूर्ण [17]सोमा. ॥ २६
पद्मासनादि जितकीं श्रुत को[18]कशास्त्रीं, मीं सर्वदानुभविलीं रतिसौख्यतंत्रीं ।
दासी तयेसि परिवेष्टित रक्षणार्थ, त्या जाणती पुरुषभुक्तकलापदार्थ. ॥ २७
बिंबाधरासि दशनक्षत [19]रूढ झालें, तैसेंच चुंबन तयांसि दिसोनि आलें, ।
कामांकुशें उमटती व्रण त्या कुचाग्रीं, ते देखिली पुरुषभुक्त [20]वधू समग्रीं. ॥२८
दूती वृतांत कथिती वरवेत्रधारा, जे सर्वदा असति रक्षण राजद्वारां ।
संस्कारिली गुरुवरें तनया नृपाची, तेथें परागमनता प्रे[21](म?)ति प्राप्त कैंची? ॥२९
[22]दूती [23]कृतांतसम केवळ काळदृष्टी, कर्णीं नृपास कथिती निज गुह्य गोष्टी, ।
चित्तीं [24]महींद्र न धरी बहु कोपलासे, 'ऐसें कदापि न घडे' ति[25]सें बोललासे.॥३०
भूपाळसेवकजनीं म्हणिजे, 'कवींद्रा ! तूं जो पदार्थ करिशी श्रुत तो महींद्रा. ।
यानंतरें अधिक सावध तूं असावें, गंतव्य शीघ्र नगराप्रति [26]तां करावें.' ॥३१

---

१. 'विघट्टनातें' पाठभेद. २. 'चित्त' पाठभेद. ३. युद्ध. ४. दांत. ५. शयनावर. ६, कन्या. ७. कमल. ८. बाल. ९. हत्ती. १०. गंडस्थल. ११. पल्लव. १२. दांतांची पंक्ति. १३. हिऱ्यांच्या पंक्तीची शोभा. १४. कांति. १५. 'ऊरे' पाठभेद. १६. सिंह. १७. चंद्र. १८. रतिरहस्यीं श्लोक १८ टीप पहा. १९. 'दाट' पाठभेद. २०. कन्या. २१. 'परि' पाठांतर. २२. 'दूतीं कृतांत गण केवळ काळ गोपीं' असा पाठभेद. २३. यम. २४. राजा. २५. 'म्हण' असा पाठभेद. २६. त्वां.

राजानुगीं[1] शिकविलें परि नायकें मी, गेलों पुन्हा शशिकलानिलयास[2] कामी[3] ।
'जातों' म्हणोनि वदतां न वदे प्रकोपें, पायां पडे तंव उभे नृपदूत सोपे.॥३२
दोघां जणां गंवशिलें[4] नृपवेत्रधारीं, बाळा तयांस विनवी बहुतां प्रकारीं, ।
'राखा चुडे, पदर मी पसरोनि मागें.' गेले दिलें धन उदंड करीं प्रसंगें.॥३३
'भ्रूविभ्रमा[5] करुनियां बहु कोप आला, कां ते क्षणीं विरह पीडितसे कवीला ?।
दृष्टि प्रसन्न मज सत्वर होय पाहीं, चित्तीं कदापि न धरीं गुणदोष कांहीं.' ॥ ३४
ऐसा विनोद करितां नृप गुप्तरूपें, द्वारीं उभा [6]चरित देखतसे समीपें, ।
साचोळ तो उभयतांसि सुचावलासे, म्यां श्लोक दृष्टिसि फिरावुनि वर्णिलासे. ३५
एकासनीं उभयतांप्रति तैं धरावें, तो जाय सन्मुख तया उडवी स्वभावें. ।
वेष्टोन भाळ [7]नयनोत्पलपल्लवानें[8], कोयाळकूजितें[9][10] वदे तशि मंदतेनें. ॥ ३६
बोले कवी, 'मदनदुःख कदा न साहे, म्यां प्रार्थिली सहज दृष्टि कदा न राहे;।
[11]कांतापिता नयन पद्म यथार्थ दोन्ही, हे [12]जलपती भ्रम नरेंद्र मनीं न मानी.'॥ ३७
वंदोनियां शशिकला पद भूपतीचे, बोले भयें चकित सद्गद मंद वाचे ।
तों देखिलें चरित गुप्त विकल्प काय ? भूपा क्षमा धरुनि शीघ्र निघोनि जाय. ३८
जाला भयाभित वदे कविराज कांहीं, 'भाग्योदयें [13]निरसिलें निज विघ्न पाहीं. ।
तूं राहशील परती मज दूत नेतां, आतां तरी मज निरोप दिजे प्रिये [14]तां.'३९
हें आयकोन [15]उगली नरनाथबाळी, कांपे शरीर पवनें जशि बाळकेळी, ।
वाग्दोर त्यासि रदपंक्ति कपाट लावी, टाकी त्रयोदशगुणी क्षितिभाळ ठेवी. ४०
'म्यां अर्चिलेचि पति [16]पूर्वऋणानुबंधें, त्यागीतसां मज तुम्ही कवण्यापराधें ? ।
हा तो विचार करितां न मिळे स्वधर्मीं, [17]जीना मुहूर्त तुमच्या विरहानळें मी. ४१
विद्युल्लता [18]जलदवर्जित केंवि होय ? अस्तंगता शशिकला दिसतील काय ? ।
कामानळें विरहिणी सहसा न वांचे, तैसें त्वदर्शन विना क्षण मी न वांचें.'४२
'[19]मुग्धे ! तुझ्या सुरतसौख्यरसें करोनी, [20]पांवेन य [21]झषकेतन सत्य मानी ।
चित्तीं दृढत्व धरिजे त्वमनित्य पाहीं, नाना विपत्ति मज होइल देख तेंही. ४३
[22]नेतील दूत करुनी [23]सखि बद्ध मातें, सत्वात्मना ? फिरविती नगरा [23]संभोंते ।
स्त्री मारमूर्ति [24]मदिरासरितासुपानें, कैसेनि पै भुलुं न ये [25]मधुपानतेनें ? ॥ ४४

---

१. सेवक. २. गृह. ३. कामुक. ४. पकडिलें. ५. भ्रूविक्षेप. ६. आचरण. ७. नेत्रकमल. ८. पदर. ९. कोकिल. 'कोकीलकूजित' पाठभेद. १० ध्वनि. ११. 'मातापिता' पाठ. १२. 'जन्मतां मग' पाठ. १३. निवारिलें. १४. त्वां. १५. उगी राहे. १६. 'पूर्ण' पाठ. १७. जगेंना. 'जाणा' पाठ. १८. मेघ. १९. 'अंकुरितयौवना मुग्धा.' २०. 'पावेन मी यमनिकेतन' पाठ. २१. मीनध्वज. २२. 'खरयान करुनि' पाठ. २३. 'सरितांबुपानें' पाठ. २४. मद्यनदीसेवनानें. २५. मद्य.

कामातुरास भय लाज नसे कदा ही, स्त्रीलुब्ध ते [1]परम मूर्ख विशेष पाहीं ।
ऐसें म्हणोनि वदला सुरतानुरागें, केलांगिकार कविमूढ [2]केलाप्रसंगें. ॥ ४५
अन्योपभोग मग नित्य करी तियेशीं क्रीडारसें [3]विनटले निज दुर्मतीशी ।
देखोनियां सकळ कौतुक भूपदासी सांगे मुखें चरित [4]राजपुरोहितासी. ॥ ४६
मंत्री म्हणे, 'नर[5]मृगाधिप सार्वभौमा ! वैरी[6]मतंगसुविदारण कीर्ति सीमा ।
[7]वैदेशिकें बुडविलें कुळ पापकर्मी जाणोनियां क्षमसि कीं धृति नास्ति धर्मी.' ॥ ४७
हें आयकोनि [8]वसुधापति तप्त झाला, को[9]पध्वनी तइं कसा गगनासि गेला; ।
पाचारिलें मग पुसे [10]परिचारिकेतें; सांगीतलें मग तिनें श्रवणीं नृपातें. ॥ ४८
जाणोनियां महदनर्थ पुरोहितासी राजा पुसे, 'कवण शासन [11]तस्कराशीं?' ।
मंत्री म्हणे, 'परिसिजे कुलशीलरत्नें [12]शूलाग्ररोहण किजे परिवार यत्नें.' ॥ ४९
आज्ञा दिली क्षिति[13]भुजें; मग वेत्र[14]पाणी नेती तयासि पुसती जन [15]लीनवाणी ।
[16]ते सांगती, 'हरिलिसे नरनाथबाळी, लो[17]कापवाद उठला नगरीं सुमेळीं.' ॥ ५०
'द्वारीं महींद्रतनया मजलागिं लक्षी, म्यां देखिली मग म्हणे [18]कमलायताक्षी, ।
स्वर्गासि बिल्हणकवीश्वर जाय मानें येना पुन्हा [19]सुरसतीसुरताभिमानें. ॥ ५१
पाहावयासि [20]मिनले जन पौरवासी, विज्ञापिती धनिक सेवक [21]भूभुजासी; ।
मागेल द्रव्य तरि देउनि भूपतीतें निर्मुक्तता करिशि त्या कविबिल्हणातें. ॥ ५२
पाहावया नृपसुता गुरुपौरजाया येती [22]मतंगगमनी बहु घाबरीया; ।
कोणी कटीं वसन खोवुनि एक हातें, कोणी करें धरुनि मुक्तहि कंचुकीतें. ॥ ५३
बिंबाधरासि दयितें रददंश केले, पाहात [23]दर्पण करीं सखि एक चाले. ।
वेण्यार्ध गुंफित नितं[24]बिनि एक आली आच्छादुनी कुच करें सरशी निघाली. ॥ ५४
तांबूल घेउन उभी करिं [25]राजपंथीं गुंफीत हार करिं सूत्र विमुक्त[26]ग्रंथी; ।
कोणी उभ्या धरुनि कंठ परस्परें ही कोणी ग[27]वाक्षविवरांतुनि देखते ही. ॥ ५५
संगें शतेंशत वधूगणलोक येती, [28]वध्यावनांत कवितें नृपदूत नेती; ।

---

१. 'पुरुष' पाठ. २. 'कलत्रसंगें' पाठ. ३. 'विसरले निज दुर्दशेसी' पाठ. ४. राजाच्या उपाध्यायाला. ५. सिंह. ६. हत्ती. ७. गुरु. ८. राजा. ९. 'वाटे धनंजय जसा' पाठ. १०. दासी. ११. चोर. १२. शूळाच्या अग्रावर चढविणें, सूळीं देणें. १३. राजा. १४. वेत्रधारी. (शिपाई.) १५. नम्र. १६. 'सांगेति दूत हरिलीं नरनाथ रत्नें' पाठभेद. १७. 'लोकापवाद उठला नगरीं प्रयत्नें' पाठभेद. १८. कमललोचना. १९. अप्सरा. २०. जमले. २१. राजाला. २२. गजगती. २३. आरसा. २४. स्त्री. २५. मार्ग. २६. ग्रंथी=गांठ. २७. खिडकी. २८. वध्यस्थान.

दिव्यांगना सकरुणा वदति स्वभावें, 'लक्ष्मीपती कविस या जिवदान द्यावें.'॥ ५६
वध्यावनांत मग रोवुनि शूल हेरीं काश्मीरकासि वदती, 'हित तूं विचारी,[1] ।
सुस्नात होउनि भजें जगदीश्वराला अंतीं मती गति तशी मग होय त्याला.' ॥
बोलेंच ना म्हणुनि बोलति लोक मातें अद्यापि कां न भजसी भगवंतजीतें? ।
माझा सुशब्द न फुटे, मज बुद्धि कैंची? ज्ञाते पुन्हा वदति, 'भक्ति करीं हरीची.'॥
संसार दुस्तर भवार्णव थोरें[2] तारीं गाती जयासि सुर शक्र विधी[3] पुरारी[4] ।
जो सर्वलोकहृदयांबुजहंस त्यातें, ध्यानीं मुनींद्र भजती निजमुक्ति होते. ॥ ५९
हें बोलिजे जैनपदें[5], मग म्यां तयांतें, जाणोनि उत्तर दिलें हृदयीं वसे तें. ।
'हो! आयिका नृपसुतारतिसौख्य जाणें, अद्यापि[6] देव दुसरा तिजवीण नेणें.'॥ ६०

---

## उत्तरार्ध.[7]

(वसंततिलका वृत्त.)

अद्यापि ते कनकचंपकवर्णगौरी, उत्फुल्लपद्म[8]नयना तनुरोम[9]हारी ।
सुप्तोत्थिता[10] च शयनीं मदविव्हलांगी, विद्या जशी गति तशी स्मरतों प्रसंगीं.॥ १
अद्यापि चंद्रवदना नवयौवनांगी, पीनस्तनी मजपुढें उभि हेम[11]रंगी ।
माझी तनू स्मरशरें[12] पिडितांचि वेगीं, गात्रें सुशीतल करी सुरतप्रसंगीं ॥ २
अद्यापि ते शरदपुष्पदलायताक्षी, वक्षोज[13]वर्तुलपटद्वय मी निरीक्षीं ।
आलिंगितां सुरस घे मधुरा[14]धराचा, जैसा मिलिंद[15] रस घे नवपंकजा[16]चा. ॥ ३
अद्यापि नाक्रम[17]तनू तिचि तेजराशी, चुंबावया रुळत कुंतल[18] गंड[19]देशीं[20] ।
ते[21] वारितां ध्वनि उठे करकंकणाची, तेणें करोनि मुरकुंडि वळे मनाची.॥ ४
अद्यापि ते सुरतजागरघूर्णमानें, वक्रा विलोकन करी सुरताभिमानें, ।
शृंगारसार[22]नलिनी गज[23]राजगामी, सलुज्जनम्रवदना शयनीं[24] स्मरें मी. ॥ ५

---

१. चिंती. २. 'घोर' असाही पाठ आहे. ३ ब्रह्मा. ४. शिव. ५. पुरवासी. ६. 'अद्यापि मी तिजविणें द्विज देव नेणें' असें पाठांतर आहे. ७. या काव्याच्या जुनाट हस्तलिखित प्रतींत पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे भाग केले आहेत, म्हणून ते येथेंही तसेच कायम ठेविले आहेत. कथासंगतीकडे पाहिलें असतां असे भाग करण्याचें प्रयोजन फारसें दिसत नाहीं. ८. कमल. ९. केश. १०. आधीं निजलेली व नंतर उठलेली, निजून उठलेली. ११. सुवर्ण. १२. बाण. १३. स्तन. १४. गोड. १५. भ्रमर. १६. 'पल्लवाचा' पाठांतर. १७. 'निष्फल' पाठ. १८. केश. १९. गाल. २०. प्रांत. २१. 'देखोनियां निजमनीं सुखसिंधु लोटे । उद्बाहुवल्लि पसरुनि कलत्र भेटे ।।' असाही पाठ आहे. २२. सरोवर. २३. 'द्विजराज' पाठभेद. २४. 'तिजला' पाठभेद.

अद्यापि ते मदनमंदिर[1]वैजयंती, ग्यां देखिली वि[2]रहव्याकुल मध्यरातीं; ।
आलिंगिली कर[3]लता पसरोनि तीसी, सर्वात्मना विसर तो न पडो मनासी.॥ ६
अद्यापि कामरतितांडवसूत्रधारी, पूर्णेंदुबिंबवदना जशि दि[4]व्यनारी, ।
[5]बाला विशालनयना[6]लिकदीर्घचिन्हीं, [7]व्योमासमान कुचमंडल दीर्घ दोन्ही. ॥ ७
अद्यापि ते [8]मलयचंदनलेपभोगी, [9]कस्तूरिकेशरसुमिश्रितचर्चितांगी, ।
[10]चातुर्य[11]चारुशतचुंबनदानकामीं, सलज्ज[12]खंजनयना शयनीं स्मरें मी. ॥ ८
अद्यापि ते शरदचंद्रमुखी मृगाक्षी, लीलाधरा त[13]रलमीनदशा निलक्षीं, ।
काश्मीरचंद्र [14]मृगनाभिविलेपितांगी, तांबूल देउनि विलासिनि नित्य भोगी.॥ ९
अद्यापि ते [15]कनककांति कलाभिधानी, [16]प्रस्वेदबिंदु वदनीं रतिखेद मानी, ।
[17]सारंगलोलनयना सुरताधिकारी, गोडी कदापि न विटे तिचि खंति भारी.॥ १०
अद्यापि एक मनिं विस्मितता तयाची, मी शीकलों परि हि जीवित नावळे ची।
तें गुप्त चिन्ह कळलें मजलागिं ज्ञानीं, तेव्हां सुवर्ण[18]दल लेवविलें सुकर्णीं.॥ ११
अद्यापि ते कनककुंडलजोडधारी, रात्रीस चंद्र विपरीत सुखाधिकारी, ।
आंदोलनें करुनियां जलबिंदु येती, मुक्ताफळें विखुरलीं मजला गमे तीं. ॥ १२
अद्यापि ते [19]करिविदारण[20]चक्रनेत्रें, [21]दंतक्षतें सुरतविभ्रम होति गात्रें ।
वस्त्रांचलस्खलन होत विलोकितांची, तीच्या स्तनांसि उपमा स्मर[22]कंदुकांची.॥ १३
अद्यापि ते [23]तरुणपल्लवरक्तपानी, चोळी तिची तटतटीत [24]भुजंगवेणी, ।
तुंडीफळाधर कपोलसुवर्णपात्रें, ते मी स्मरें [25]सरलहंसगतीवगात्रें. ॥ १४
अद्यापि [26]हेमरुचिरा मृग[27]शावकाक्षी, [28]अंभोजवर्तुलपयोधर [29]पीन[30]वक्षी, ।
बीजे [31]मृगांक उदयो करि तेंवि देखा, श्री[32]चंद्रचूड [33]कुंचरूपनखेंदुरेखा. ॥ १५
अद्यापि कज्जलविराजित [34]पूर्णनेत्री, कर्णीं सुवर्ण धरि केतकि राजपुत्री, ।

---

१. पताका. २. 'मदनव्याकुळ' पाठ. ३. वेल. ४. अप्सरा. ५. 'बाला स्यात्षोडशाब्दा तदुपरि तरुणी त्रिंशतिर्यावदूर्ध्वं प्रौढा स्यात्पंचपंचादशवधि परतो वृद्धतामेति नारी.' (रतिरहस्य). ६. केश. ७. आकाश. ८. मैलागिरी (मलयपर्वत). हा सह्याद्रि पर्वताचा दक्षिणेकडील भाग आहे. येथें चंदन उंचप्रतीचा होतो. ९. 'कस्तूरिकेशर अरक्त सुमिश्रितांगी' असा पाठभेद आहे. १०. 'चातुर्यतादशनचुंबन' पाठांतर. ११. सुंदर. १२. पक्षिविशेष' १३. चंचल. १४. कस्तूरी. १५. सोनें. १६. घाम. १७. मृग. १८. पत्र. १९. हत्ती. २०. 'वक्रनेत्रें' पाठांतर. २१. 'दंतक्षतें करुनि' पाठांतर. २२. चेंडू. २३. 'अरुण' पाठ. २४. सूर्य. २५. 'अलस-हंसगती विचित्रें' पाठ. २६. सोनें. २७. बालक. २८. 'रंभोरु' पाठ. २९. 'मी निरीक्षीं' पाठ. ३०. पुट. ३१. चंद्र. ३२. शिव. ३३. 'निटिलीं जशि इंदुरेखा' पाठ. ३४. 'लोलनेत्री' पाठ.

नीले कलाप **यमुना** सुमनेक **गंगा**, भांगीं **सरस्वति** गुलाल बुका **प्रयागा**.॥१६
अद्यापि ते गलतकुंतलपाश पाहे, बिंबाधरी[1] जलनदी[2] चिरकाल वाहे, ।
पीनोन्नत[3]स्तन कठोरहि चक्रवाकें[4], मुक्ताफळें सुखद[5] त्यांवर तेज फांके. ॥ १७
अद्यापि रत्नमणिदीपजनी[6]लतेचे, नाना विचित्र पडदे रसराजकाचे ।
राजात्मजा मजपुढें उभि मी निरीक्षीं, सल्लज्जमूत सुविलोकित खंजनाक्षी. ॥ १८
अद्यापि ते गलित कुंतलपाश[7] काळे, वक्षोज नम्र वरि मौक्तिकहार लोळे, ।
**द्रो**णाद्रि **मं**दरगिरी पयसिंधु[8]पाळी, तैसे पयोधर तिचे धरिं भोगकाळीं. ॥ १९
अद्यापि राजतनया मृगशावनेत्री, म्यां देखिली विरहव्याकुळपुष्पगात्री ।
आलिंगिली भुजलता पसरोनि शाली, ते राजहंसगमना स्मर[9] अंतकाळीं, ॥ २०
अद्यापि ते कुशल काव्यकलाविनोदी, ते मी स्मरें, त्रिदंशनाथ[10]सुखासि निंदीं. ।
संकीर्ण[11] होय सुरतीं सुकुमार बाळी, काकूलतीस्तव धरी मज कंठनाळीं. ॥ २१
अद्यापि[12] ते सुरतसंगर[13] पूर्णताक्षी, सन्न स्मरें गलितचीरकलाप लक्षीं ।
शृंगारसारस[14]नलिनीसह राजहंसी जन्मांतरीं निधन[15] कोण[16] वरील तीशी? ॥ २२
अद्यापि बाळहरिणीनयनीं स्मरें मी, कंदर्पयुद्ध मजशीं करि गुप्तधामीं[17]; ।
वक्षोजकुंभ घन पीन धरीं करपाणी[18], तेव्हां सुरेंद्र[19]सुखतुच्छ मनासि नाणीं.॥ २३
अद्यापि भूतलवटी वर वामनेत्रा[20], सर्वांग कोमल तनू नवनीत[21]गात्रा, ।
शृंगारनाटकविशारद[22]गीतनानालंकारकाव्यरसजाण कदा[23] तुटेना, ॥ २४
अद्यापि ते[24] मजविना क्षणही न राहे, कामानळें निजवियोग कदा न साहे; ।
मी मागुता छळिन यास्तव फार धाकें, प्राणाधिका न विसरे मजला[25] स्वभाकें[26]. ॥ २५

---

१. तोंडलें. २. 'पय' पाठ. ३. उंच. ४. चक्रवाक या नांवाचा एक पक्षी आहे. यासच 'कोक' असें म्हणतात. हे पक्षी जलाशयाच्या आश्रयानें राहतात. त्यांत पुरुष (नर) आणि स्त्री (मादी) यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांस वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें. पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची परस्पर भेट होते, व तीं सारा दिवस एके ठिकाणीं राहून घालवितात—अशी कविप्रसिद्धि आहे. 'त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व सभयममुम् । क्षयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्च्छां ते ॥' इत्यादि सुभाषितांवरून या कोक (चक्रवाक) पक्ष्याची स्थिति सुव्यक्त होते. ५. 'स्फुरत यास्तव' पाठ. ६. 'रत्नमय दीप विलोकितों जे' पाठांतर. ७. केश. ८. समुद्र. ९. 'सर्व' पाठांतर. १०. देवराज. (इंद्र.) ११. 'संकीर्ण घाम सुटतां' पाठांतर. १२. 'अद्यापि ते सुरतजागरघूर्णिताक्षी' पाठांतर. १३. सुरतसंग्राम. (संगर=युद्ध.) १४. सरोवर. १५. मरण. १६. 'कोण त्यजी तयेसी' पाठांतर. १७. गृह. १८. हात. १९. 'सुरेंद्रपद' पाठांतर. २०. सुंदर. २१. लोणी. २२. निपुण. २३. 'तसे सुटेना' पाठांतर. २४. 'मी तिजविना' पाठांतर. २५. 'भजलों' पाठ. २६. शपथ.

अद्यापि ते प्रथम यौवनभोगदानी, तीचा वियोग घटिकावधि कल्प[1] मानीं ।
क्षोमोदरी[2] परम लीन विधूतकामी[3], सोडावया तिज समर्थ कदा नव्हें मी. ॥ २६
अद्यापि देव मनिं विस्मय मानिताती, ठाकोनियां त्रिदिवें[4] कौतुक इच्छिताती; ।
प्राणप्रयाण करणें[5] मज शीघ्र काळें, यानें[6] नभीं[7] प्रकटलीं दिसती विशाळें. ॥ २७
अद्यापि वारण[8]मंदोत्कट[9]मत्तगामी, दुःखें करोनि मदनाग्नित देह होमी ।
हस्तोदकें[10] करिकलेवर चीर आले[11], ते आठवे घडि घडी अनुचीत जालें. ॥ २८
अद्यापि सुंदरपणासि रती न ठाके, चंद्रीं कलंक, मुखिं निर्मळ तेज फांके, ।
कामानळें निजकलेवर[12] दग्ध केलें[13], देखेन कैं वदन मागुति दुःख जालें[14] ? ॥ २९
अद्यापि मी क्षणवियोग तिचा न साहें, मुष्टींत जीव धरुनी तनुवाट[15] पाहें ।
राजात्मजा त्यजिल देह म्हणोनिशानें, लावीं विलंब गगनीं गमना विमानें. ॥ ३०
अद्यापि विस्मय[16]मते गवसावयातें, आले नृपानुग[17] बळी मज न्यावयातें, ।
बाला यदर्थिं निजपल्लवदान मागे, तें म्यां कसें विसरिजेल भडाग्नि लागे. ॥ ३१
अद्यापि चंद्रवदना करि फार खंती, लावण्य[18]सागरलता द्विजराज[19]कांती. ।
रात्रौ दिवा स्मरण होय तिच्या मुखाचें, दावा मुहूर्त[20] मुखवारिज[21] वल्लभेचें. ॥ ३२
अद्यापि मीं धरितसें निजजीविताशा, जन्मांतरीं वरिन हे प्रमदा[22] परेशा[23] ! ।
अन्योपभोग मजला नलगेच कांहीं, ते दाखवा शशिकला कवळीन बाहीं[24]. ॥ ३३
अद्यापि वक्त्रकमळावरि भृंग येती, गंडस्थळीं[25] परिमळास्तव चुंबिताती, ।
हे वारितां, ध्वनि उठे करिं कंकणांची, तेणेंकरून मुरकुंडि वळे मनाची. ॥ ३४
अद्यापि तन्वि मधुराधरदान[26] देते, म्यां रोविलें निजनखें स्तनमंडळातें, ।
उद्भिन्नरोम पुलकांकित[27] होय बाळा, [28]ते आठवे मदनमंजरि वेळवेळां. ॥ ३५
अद्यापि एक मनिं विस्मय थोर जाला, पोटांत राग नसतां धरिला अबोला, ।
पायां पडोनि समजाविलि मंदवाणी, मी दास कोप न धरीं गुणरत्नखाणी. ॥ ३६

---

१. ४३२०००००० वर्षें=कल्प. २. कृशोदरी. 'शातोदरी' पाठ. ३. 'असे सकामी' पाठ. ४. आकाश. ५. 'समयोचित' पाठांतर. ६. विमानें. ७. आकाशांत. ८. हत्ती. ९. 'मदोन्मत मंदगामी' पाठांतर १०. 'बाष्पोदकें' पाठभेद. ११. 'श्वासोदकें करिकलेवरि चीर लोळे' पाठांतर. १२. शरीर. १३. 'झालें' पाठांतर. १४. हा प्राण सांडिन तयेविण सत्य बोलें' पाठांतर. १५. 'नृपवास' पाठांतर. १६. 'विस्मय मनीं' पाठांतर. १७. राजसेवक. १८. सौंदर्य. १९. चंद्र. २०. क्षणभर. २१. कमळ. २२ युवति. २३. हे ईश्वरा. २४. बाहूंनीं, भुजांनीं. २५. गाल. २६. 'पान' पाठांतर. २७. रोमांचित. २८. 'ते आठवे मदनसंगर खेळुं वेळां' पाठभेद.

अद्यापि धांवति करी हित काम नेणें, [1]आर्येवरी सखि उभी सहवर्तमाने ।
कंदर्पतप्त परिव्याकुळ राजकन्या, ती कारणें स्मरतसें सुरता[2]धन्या ॥ ३७
अद्यापि [3]जाणिव [4]नसे निज निश्चयेसीं, [5]मेनेसि शाप दिधला [6]मघवासभेसी, ।
मोहावया [7]जन वदे [8]चतुराननानें, हें निर्मिलें युवतिरत्न गुणाभिमानें. ॥ ३८
अद्यापि हंसतुलिकेवरि राजपुत्री, संगीत गायन करी रतिसौख्यदात्री, ।
[9]तें आयकोनि रिझल्या [10]सुरराजकन्या, वर्णावया स्मरवधू सुरता दिसेना. ॥ ३९
अद्यापि कज्जलविराजित नेत्रबाणीं, भ्रू[11]कार्मुका मदनशक्ति [12]तसे सुवर्णी, ।
कर्णांत ओढुनि ढळे कमळाननेची, ते [13]भोगितां कवण पंडित दोष वाची॥ ४०
अद्यापि निर्मलशरच्छशिगौरकांती, तात्काळ ते मन हरी मुनि वश्य होती; ।
ते पूर्णचंद्रमुखचुंबनदान मागें, देखोनियां रति करीं मग सानुरागें. ॥ ४१
[14]अद्यापि ते शरदकुंदसुगंधितांगी, देखोनि होय [15]मकरध्वज [16]वाममार्गी, ।
दि[17]व्यांगनासुरततीर्थकृतोपकारी, जन्मांतरीं वरिन [18]मी मनिं हेतु भारी. ॥ ४२
अद्यापि [19]यां क्षितितळीं प्रतिमा तयेशीं, बाळा निरीक्षिलि नसे गुणरत्नराशी; ।
दिव्यांगनादिक गुणोत्तम [20]कामसेना, वर्णावयास समता [21]दुसरी असेना. ॥ ४३
अद्यापि राजतनया [22]हितही न जाणे, वर्ते तशी कुटिल भाव [23]मनासि नेणें; ।
मी एक दैवत तितें दुसरें न मानी, ते राजहंसगति चिंतितसें नि[24]दानीं. ॥ ४४
अद्यापि ते नृपतिशेखरराजपुत्री, संपूर्णयौवनमदालस खंजनेत्री ।
गंधर्वयक्षसुरकिन्नरराजकन्या, दि[25]व्यांगना [26]परिनितांत वयांतधन्या. ॥ ४५
अद्यापि वर्तुलपयोधरमंडितां[27]गी, कंदर्पसागरलता कृश मध्यभागीं, ।
म्यां भोगिले सकल भोग तिच्या[28]नुरागें, होते व्यथा नि[29]शिदिनीं वनितावियोगें. ४६

---

१. 'अर्धोदयीं' पाठांतर. २. 'वदान्या' पाठांतर. ३. ज्ञान. ४. 'दिसे मज' पाठांतर. ५. अप्सराविशेष. ६. इंद्र. ७. 'जनपदा' पाठांतर. ८. ब्रह्मा. ९. 'अत्यंत सुंदर जशी शशिरूपवंती । वर्णावया पिकवधू न समेसि येती ॥' असा पाठभेद आहे. १०. 'सुरनागकन्या' पाठांतर. ११. धनुष्य. १२. 'तसी सुखाणी' पाठांतर. १३. 'वर्णितां' पाठांतर. १४. 'अद्यापि ते शरदचंद्रमुखी शुभांगी' पाठांतर. १५. मीनकेतु. १६. 'पात वेगीं' पाठांतर. १७. अप्सरा. १८. 'हा' पाठभेद. १९. 'म्यां' पाठभेद. २०. फौज. २१. 'उपमा दिसेना' पाठांतर. २२. 'निजहीत' पाठांतर. २३. 'पदार्थ' पाठांतर. २४. संकट. २५. 'वर्णावया पिकवधू समतेशि येना' असा पाठभेद. २६. 'परिणितां न पवेति धन्या' पाठांतर. २७. भूषित. २८. प्रेम. तिच्या+अनुरागें अशीं वेगळालीं पदें असणें इष्ट आहे. २९. रात्र.

अद्यापि ते कनककांति मदालसांगी, संह्लज्जनम्रवदना स्मरतों [1]प्रसंगीं, ।
[2]त्यागीं न औषधसुधा [3]सरिता गुणांची, म्यां वर्णिली क्षितितलीं [4]गुणकीर्ति तीची. ४७
अद्यापि ते नृपसुता रतिभोगकालीं, प्रेमादरें करयुगें धरिं कंठनालीं, ।
दंतोष्टपीडनक्षतें क्षतभाव दावी, ते मी स्मरें [5]मदनमंदिरदेवदेवी. ॥ ४८
अद्यापि ते वरवधू सुभगावियोगें, [6]आली सलज्ज सकलांप्रति [7]मंत्र सांगे; ।
विज्ञापना करितसे परिसा सुचित्तें, लोटांगणीं शरण बिल्हणपंडितातें. ॥ ४९
अद्यापि [8]धूर्जटि धरी [9]विषें तें स्वकंठीं, कूर्मे [10]धरांगिरिवरा धरलें स्वपृष्ठीं, ।
[11]आपोनिधीस [12]वडवानल नित्य जाळी, [13]केलांगिकार [14]बुधें पाळिति सर्वकाळीं. ॥ ५०
अद्यापि ते प्रथमसंगमभोगकाळीं, म्यां फेडिला हळुच कासवटा [15]सुकाळीं, ।
[16]लाजोनि दीप कर कोपुनि शीघ्र वातें, कर्णोत्पलीं विझविले मज आठवे तें. ॥ ५१
[17]अद्यापि ते स्मरतसें [18]सरसीरुहाक्षी, मार्गीं व्रजें रमण बिल्हण मी निरीक्षीं, ।
कामानळें निज[19]कलेवर दग्ध जालें, [20]हां प्राण सांडिन तियेविण सत्य बोलें. ॥ ५२
प्रत्युत्तरासि सखि सादर [21]शीघ्र झाली, [22]बोले मुखावरि दिशा शशिची झळाळी; ।
सौभाग्यपर्वत तुझा न फुटे नखाग्रें, चूडे [23]अभंग वरशील सुखें समग्रें. ॥ ५३
नेलें [24]निशाचरवरें [25]जनकात्मजेसी, नेदीच खंजनदृशा [26]रघुनंदनासी, ।
तीकारणें [27]रणमही जिवदान केलें, म्यां एक मस्तक दिलें तरि काय [28]जालें ? ॥ ५४
राजा विचार करि, 'होइल [29]ब्रह्महत्या, [30]स्त्रीघातपातक घडे सहसा निमित्या, ।
[31]कन्यार्पिजे निजकरें कविबिल्हणासी, दोघें जणें वसुत देइन [32]वित्त त्यांसीं.' ॥ ५५

---

१. संकट. 'उठतां पलंगीं' आणि 'लुटितां पलंगीं' पाठांतरें. २. 'ती जीवनासि धरितां' आणि 'ती जीवनौषधिसुधा' अशीं पाठांतरें. ३. नदी. ४. 'प्रतिमा तयेची' पाठांतर. ५. 'मदनमूर्ति मनीं वदावी' पाठांतर. ६. 'संतप्त होय सकलां प्रतिपात्र सांगे' पाठांतर. ७. मसलत. ८. शिव. ९. विषधारणास्तवच त्याला 'नीलकंठ' असें नांव आहे. १०. 'समुद्रवसना' पाठांतर. ११. 'अंभोनिधीस' पाठांतर. १२. वडवाग्नि. १३. 'अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति' हा याचा भावार्थ आहे. केला+अंगिकार अशीं निरनिराळीं पदें असणें इष्ट आहे. १४. ज्ञाते. १५. 'समूळीं' पाठांतर. १६. 'लाजोनि दीपकर कांपति वक्रवातें' पाठांतर. १७. 'राजात्मजा मग म्हणे सरसीरुहाक्षी' पाठांतर. १८. कमल. १९. शरीर. २०. 'देखेन कें वदन मागुति दुःख झालें' पाठभेद. २१. 'सिद्ध' पाठांतर. २२. 'घडे मुखावरि दिसे शशि तेजशाली' पाठांतर. २३. 'अखंड' अन्यपाठ. २४. रावण. २५. सीता. २६. राम. २७. रणभूमि. २८. 'गेलें' पाठांतर. २९. 'विप्रहत्या' पाठांतर. ३०. 'स्त्रीघातपाप न घडो सहसा निमित्या' पाठभेद. ३१. कन्या+अर्पिजे अशीं वेगळालीं पदें असणें इष्ट आहे. असे प्रकार विठ्ठलाच्या काव्यांत फार आढळतात. [मागें पृ० १३८ श्लो० ४ चरण ३ गीतार्जुनें आणिली—पहा.] ३२. धन.

श्रीबिल्हणासि मग नेउन वीरसेनें, पाचारिली शशिकला दिधली विधानें; ।
ग्रामें पुरें धन दिलें यश वाढवीलें, धूर्तासि विठ्ठल म्हणे परिपूर्ण जालें. ॥ ९६

---

# [1]रसमंजरी.

## उपोद्धात.

(श्लोक.)

ठेवी पाय पुढें [3]स्वकीयच सदा [4]नीचोच्च [5]भूमीवरी
कांतेला श्रम हो झणी [6]म्हण [7]तरुपुष्पें स्वहस्तें [8]हरी,।

---

१. यथाविधि, यथाशास्त्र. २. भानुदासकृत संस्कृत 'रसमंजरी'चें हें महाराष्ट्र भाषांतर विठ्ठलकवीनें शा०श०१६०१ त प्रभव संवत्सरीं शहागड येथें केलें असें याच्या शेवटच्या श्लोकांत आहे. ह्या भाषांतराचे एकंदर १३९ श्लोक आहेत असें कवि म्हणतो. परंतु 'काव्येतिहाससंग्रह'कारांस मिळालेल्या पोथींत फक्त १२४ श्लोक आहेत. तसेंच नागपुरास भोंसले सरकारचे पुस्तकालयांतून आम्हांस मिळालेल्या पोथींतही[1] १२४ श्लोक आहेत. ह्यावरुन ह्या ग्रंथाचे १५ श्लोक हल्लीं उपलब्ध नाहींत असें उघड होतें. मूळ संस्कृत ग्रंथाचा कर्ता भानु, याच्या बापाचें नांव गणेश्वर असून तो विदेहदेशांत (विदर्भभूमींत) राहणारा होता इतकीच काय ती त्यानें आपल्याविषयीं माहिती आपल्या ग्रंथाच्या शेवटीं एका श्लोकांत[2] दिली आहे. हें भाषांतर कित्येक ठिकाणीं चांगलें उतरलें आहे तरी ह्यांत कांहीं दोष आहेत असें वाचकांच्या लक्षांत येईलच. शृंगार, वीर, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, व शांतरस या नऊ रसांपैकीं पहिला जो शृंगार तदाधारभूत जी नायिका (स्त्री) तिजविषयींच या 'रसमंजरी'त विचार आहे. विठ्ठलानें आपल्या ग्रंथाचे तीन उल्लास केले आहेत. पहिल्यांत ३८ श्लोक आहेत, त्यांत मुग्धादि सोळा नायिकांचें व त्यांच्या कांहीं पोटभेदांचें वर्णन आहे. दुसऱ्यांत ४८ श्लोक आहेत, त्यांत प्रोषितभर्तृकादि नायिकावस्थानवकाचें व त्याच्या पोटभेदांचें वर्णन आहे, शेवटच्या उल्लासांत ३६ श्लोक आहेत, त्यांत नायिकातारतम्य, सखीकर्म, दूतिकर्म, पतिभेद, नायकभेद, सात्विकभावाष्टक, शृंगारभेद, अवस्थादशक व दर्शनत्रय या नऊ विषयांपैकीं कांहींचें वर्णन आहे. शेवटचे २ श्लोक उपसंहारात्मक आहेत. तसेंच पहिले २ श्लोक उपोद्धातात्मक आहेत. पहिला उल्लास व दुसरा उल्लास या प्रत्येकाच्या अखेरीस उपसंहारात्मक एकेक श्लोक असून, दुसऱ्या उल्लासाचे आरंभीं एक उपोद्धातात्मक श्लोक आहे. हे तीन श्लोक धरुन या

---

१. या पोथीचीं सुवाच्य लिहिलेलीं ७२ पानें असून तींत मधून मधून मूळ संस्कृत ग्रंथांतील विषयप्रकाशक गद्यलेख उतरुन घेतलेला आहे. २. तो श्लोक असा:—'तातो यस्य गणेश्वरः कविकुलालंकारचूडामणिर्देशो यस्य विदर्भभूः सुरसरित्कल्लोलकिर्मीरिता । पद्येन स्वकृतेन तेन कविना श्रीभानुना योजिता वाग्देवी श्रुतिपारिजातकुसुमस्पर्धाकरी मंजरी ॥.'

[1]पर्यंकास [2]मृगाजिनें करि [3]रतीनिद्रा स्वभागें करी
[4]अंत:प्रेमभरालसा [5]प्रियतमा अंगीं [6]पुरारी धरी. ॥ १
[7]रसाळ '[8]रसमंजरी' प्रगट **भानु**नामा करी,
कवींद्र धरणीवरी रसिक हर्षवी अंतरीं; ।
मनोमधुर चातुरी करुनि भोगिती [9]अंतुरी,
[10]सुधाहि न पवे सरी, नव रसें विराजे बरी. ॥ २

## उल्लास पहिला.

(श्लोक.)

गतागत[11]कुतूहलें नयनिंच्या [12]अपांगावरी
[13]स्मितद्युति पडे पतिव्रतवधू [14]सुबिंबाधरी, ।
सुधेपरिस गोड तें वचन कांतकानीं करी
सतीस जरि कोप ये तरि बुडे तिच्या [15]अंतरीं. ॥ १
आलें [16]यौवन, [17]**का**मदेवधरणीपाळें स्वयें धाडिलें,
केलें वास्तुविधान [18]एणनयनागात्रीं बसाया भलें, ।
डोळां [19]खंजनचातुरी, मुखकळा [20]सौधांधरी माधुरी
वाचा ते हि सुधासमुद्रलहरी लावण्य [21]अंगीकरी. ॥ २

---

ग्रंथांत एकंदर १२७ श्लोक आहेत. पैकीं १२०त मात्र विषयप्रतिपादन आहे. या ग्रंथाचे आणखी निदान १२ तरी श्लोक पाहिजेत ते शोधकांनीं मिळविण्याची तसदी घ्यावी अशी सविनय प्रार्थना आहे. ३. 'स्वकीय सदनीं' असाही पाठ आहे. ४. उंचसखल. ५. 'पृथ्वीवरी' असा अन्य पाठ. ६. म्हणून. ७. झाड. ८. काढी.

१. पलंगास. २. हरणाचीं कातडीं. ३. 'सुखें निद्रातिभोगां वरी', 'सुखें निद्रा निजांगें वरी' असे अन्य पाठ आहेत. ४. अंत:+प्रेम+भर+अलसा=अभ्यंतर+हरविषयक प्रेम+बाहुल्य+अलसा. ५. 'आत्मीयं चरणं' इत्यादि पहिला श्लोक पहा. ६. शिव. ७. विद्रुत्कुल' इत्यादि दुसरा श्लोक पहा. ८. शृंगारादि नव रसांनीं भरलेली मंजरी. हें या ग्रंथाचें नांव आहे. ९. स्त्री. 'अंतरीं' असाही पाठ आहे. १०. अमृत. ११. कौतुकानें. 'गतागतकुतूहलं' इत्यादि तिसरा श्लोक पहा. १२. डोळ्याच्या कोंपऱ्यापर्यंत. १३. हंसण्याचें तेज. १४. तोंडल्यासारखा खालचा ओंठ आहे जिचा अशी. १५ ह्या श्लोकांत स्वीया पतिव्रतेचें वर्णन आहे. १६. तारुण्य. 'आज्ञप्त' इत्यादि चौथा श्लोक पहा. १७. मदनराजानें. १८. हरिणलोचनेच्या शरीरीं. १९. पक्षिविशेष. खंजरीट पक्ष्याची चतुरता (वैदग्धी). २०. सुधेला कमीपण आणणारी. २१. यांत मुग्धेचें (अंकुरित यौवनेचें) वर्णन आहे.

[1]नीरांतूनि निघोनि [2]नीरजमुखी तीरास आली असे,
कानीं काय [3]सरोज झोंबुनि बसे, आकर्ण नेत्रां पुसे, ।
शैवाळांकुर कां न जाति अझुनी [4]रोमाळि घांसी बळें,
श्रोणीभार न जाणतां घडिघडी बोले '[5]बहू [6]भागलें.' ॥ ३
कुच स्वयंभुहि [7]शंभु [8]तुझा दिसे, परम सुंदर गौरहि हा असे, ।
कवण [9]धन्य करील नखें तरी, शशिकळा बरवी [10]शिवशेखरीं. ॥ ४
[11]हातीं ही धरिली, स्वयें [12]बुझविली, शय्येवरी आणिली,
बाळा नीजविली, परंतु नवली तीची बहिर्देखिली; ।
पारा स्थीर करी धरूनिच करीं जो देख भूमीवरी
तो भोगील परोपरी करुनियां नारी नवी [13]नोवरी. ॥ ५
कांहीं एक [14]निमीलितेक्षणभरी नीरी बरी सांवरी
[15]ऊरूयुग्म बराबरी करुनियां हस्तें [16]कुचांतें धरी; ।
कांताशीं न करीच गोड वचनें, निद्रेसि अंगीकरी,
ऐसी भूमिवरी समस्तहि असे [17]विश्रब्ध नारी परी. ॥ ६
निद्रा करीन तरि कांतमुखा न पाहें, जागी असेन तरि कामुक [18]भोगिताहे; ।
ऐसी [19]सरोजनयना मनिं चिंतिताहे, निद्रा नये नयनिं जागरही न [20]साहे. ॥ ७
थानें [21]चोळूनिशानें वदनकमळही आकळीलें पतीनें,
कंठीं आलिंगनानें निजवुनि अधरीं चुंबिलें आदरानें; ।
साडी फेडूनि केलें रत तंव हरिलें चित्त सूर्योदयानें,
[22]चैलांतानें वधूनें श्रवणसरिसजां झांकियेलें [23]छलानें.[24] ॥ ८
[25]नखक्षत उरावरी [26]रदवणासि बिंबाधरीं
चळे बकुळमाळिका गळित होय मुक्तावळी ।

---

१. उदकांतून. 'नीरात्तीरमुपागता'इत्यादि पांचवाश्लोक पहा. २. नीरज=कमल. ३. कमल. ४. रोमावली. ५. फार श्रांत झाल्यें. ६. यांत अज्ञातयौवना नायिकेचें वर्णन आहे. ७. सुखोत्पादक; (पक्षीं) शंकर. ८. हे कमललोचने (तुझा.) ९. सौभाग्यशाली. 'स्वयंभूः' इत्यादि सहावा श्लोक पहा. १०. यांत ज्ञातयौवना नायिकेचें वर्णन आहे. ११. 'हस्ते धृतापि' इत्यादि सातवा श्लोक पहा. १२. समजाविली. १३. यांत नवोढा नायिकावर्णन आहे. १४. मिटलेले. १५. मांड्या. १६. 'दरमुकुलित' इत्यादि आठवा श्लोक पहा. १७. यांत विश्रब्धनवोढेचें वर्णन आहे. १८. 'स्वापे प्रियानन' इत्यादि नवम श्लोक पहा. १९. कमललोचना. २०. यांत अतिविश्रब्धनवोढेचें वर्णन आहे. २१. 'संस्पृश्य' इत्यादि दशम श्लोक पहा. २२. वस्त्रानें. २३. मिषानें. २४. यांत प्रगल्भेच्या रतिप्रीतीचें वर्णन आहे. २५. 'नखक्षतम्' इत्यादि एकादश श्लोक पहा. २६. दांत.

रतांतसमयीं असें सकळ देखिलें म्यां सये !
नसे स्मृति नसे रती शिकविलें तुझें तें [1]नये. ॥ ९
[2]प्रेमद्भ्रमरपुंज ही दुरिल कुंज तूं सेविला
श्रमें करुनियां तुला बहुत घर्म हा जाहला ।
हरीन नलिनीदळें करुनि मंदमंदानिळें
वदे वचन गोड तें अमृत जोडल्यानें [3]छळें. ॥ १०
[4]रात्रीं जागर जाहला तुज असे नेत्रीं मला [5]शोणिमा
तूं प्यालास [6]मधूस तें करितसे माझ्या मनीं [7]विभ्रमा ।
भ्राम्यद्भृंगघनीं निकुंजभवनीं तूं पावसी [8]श्रीफळा
मारी मारशरी करूनि मजला मी भोगितें त्या [9]फळा. ॥ ११
कांता प्रीतिकरा मनोहरवरा [10]तारुण्यभूषाकरा
[11]धीरा वीर्यपराक्रमैकचतुरा स्वामी मला तूं खरा ।
ऐसें बोलुनि कामिनी ठिवितसे दृक्प्रांत कांताननीं
श्वासोच्छ्वास करूनि बाष्प भरलें [12]संपूर्णचंद्राननीं. ॥ १२
[13]पर्यंकीं न चढेसि [14]बोलसि न कां [15]पीयूषवाक्यें मशीं
दृक्पातेंहि [16]सनाथ तूं न करिसी कोपप्रकाशें कशी ।
ऐसें केतकगर्भगौरदचि[illegible] [illegible]सि [17]संगोपिसी
जें वक्त्रीं स्मित तें सखी न करिती तैं सत्य तूं [18]कोपसी. ॥ १३
[19]शशीचे कळेमाजि देखोनिशानें, शिवा आपुलें बिंब कोपे त्वरेनें ।
हराचे शिरीं दूसरी कोण राहे, करानें हरा भेडसावूनि [20]पांहे. ॥ १४
येतां तल्पसमीप कांत ललना ते वक्र [21]घोणा करी

---

१. यांत प्रगल्भेला झालेल्या संमोहाचें वर्णन आहे. २. 'लोलालिपुंज' इत्यादि द्वादश श्लोक पहा. ३. यांत मध्याधीरेचें वर्णन आहे. ४. 'जातस्ते निशि जागरः' इत्यादि तेरावा श्लोक पहा. ५. लाली. ६. मद्यास. ७. चळा. ८. बेलफळ किंवा नारळ. ९. यांत अधीरा मध्या नायिकावर्णन आहे. १०. 'लावण्यभूषाधरा' असाही पाठ आहे. ११. 'कांतानुराग' इत्यादि १४ वा श्लोक पहा. १२. धीराधीरा मध्या नायिकावर्णन आहे. १३. पलंगावर. १४. 'नो तल्पं भजसे' इत्यादि १५ वा श्लोक पहा. १५. अमृत. १६. धन्य, सुखी. १७. झांकतोस. १८. यांत प्रगल्भधीरेचें वर्णन आहे. १९. 'प्रतिफल' इत्यादि १६ वा श्लोक पहा. २०. यांत अधीरा प्रगल्भेचं वर्णन आहे. २१. घोण=नाक.

बोले दीनपणें करूनि वचनें तेंव्हां स्मित[1]श्री धरी ।
हस्तीं हस्त ठिवीतसे तंव पुन्हां कोपास अंगीकरी
नेत्रातें पसरीतसे पतिवरी रक्तोत्पलांचे पे[2]री. ॥ १५

एके अंथरुणीं स[3]रोजनयना दोघी निजेल्यावरी
[4]ग्रीवा उच्च करूनि पाहत पती तों एकि निद्रा करी ।
गेला अन्यवधूप्रती मृदु करें चै[5]लांचलातें धरी
केली गुप्त निशारती तंव वधू ते होय जागी ब[6]री. ॥ १६

[8]अंत:कोपकषायित प्रि[7]यतमा देखोनि दोघी वनीं
पुष्पें वेंचवयास योजित असे एकीस नम्राननीं ।
अर्धो[9]न्मीलितनेत्रको[10]णें नवलें रा[11]मानना पाहतो
[12]स्मेराधें ऽधरपल्लवीं नव वधू आ[13]णीक आ[14]लिंगितो. ॥ १७

धैर्याधैर्यपरिग्रहाग्रहधरा दोघी प्रिया [15]सुंदरा
त्यांला प्रीति करावया पति धरी रत्नांसि त्यां सादरा ।
एकीला दिधलें त्वरें करुनियां नेदी दुजीला खरा
ते झोंबे बहुसाल वल्लभ तिच्या चुंबीत बिं[16]बाधरा. ॥ १८

[17]स्मराला सेवा[18]या धरणिवरि रेवा[19]तट वसे
सुगंधाचा वारा म[20]लयज बरा वाहत असे ।
पहा प्रावृट् धन्या नव जलद विस्तारुन वसे
सखे वो! कांहींही करिं मन पराधीनच [21]असे. ॥ १९

[22]सासू कोपतसे सुहृज्जन तसे जाऊहि निंदीतसे
त्या गेहांत निजेनसें सखि! पुन्हा माझे मनीं ही नसे ।

---

१. 'तल्पोपांत' इत्यादि १७ वा श्लोक पहा. २. यांत धीराधीरा प्रगल्भेचें वर्णन आहे. ३. 'एकस्मिन् शयने' इत्यादि १८ वा श्लोक पहा. ४. मान. ५. चैल+अंचलातें=वसन+पदरातें. ६. यांत धीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन आहे. ७. रागानें लाल झालेले. ८. 'अंत:कोप' इत्यादि १९ वा श्लोक पहा. ९. उघडलेले. १०. कोपरा. ११. स्त्रीमुखातें. १२. गालांत हंसणें. १३. दुसरी. १४. यांत अधीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन आहे. १५. 'धैर्याधैर्य' इत्यादि विसावा श्लोक पहा. १६. यांत धीराधीरा ज्येष्ठा कनिष्ठा वर्णन आहे. १७. मदनाला. १८. 'अयं रेवाकुंज' इत्यादि २१ वा श्लोक पहा. १९. नर्मदानदीचें तीर. २०. पर्वतविशेष. २१. यांत परोढेचें वर्णन आहे. २२. 'श्वश्रूः कुप्यति' इत्यादि २२ वा श्लोक पहा.

मारी [1]मूषक थोर कोणें[2]कुहरीं राहोन ते मांजरी
उत्कालेन करी करूनि मजला पीडा शरीरीं करी[3]. ॥ २०

[4]तमालतरु दाटती, बहुत मालती फूलती
सुवाससुख भोगिती, [5]भ्रमरपुंजही गुंजती, ।
निकुंज [6]तटिनीतटीं असति, [7]पांथ! जा त्यांप्रती,
[8]निदाघतपनातपें श्रमति ते तयां [9]सेविती. ॥ २१

[10]घरंधणी म्हणतां निज सेवका, 'त्वरित हा [11]बदरीद्रुम तोडिं का'।
अइकतां रमणी अतिशाहणी त्यजि जळांत [12]हिंवांत [13]कुठारिणी[14]. ॥ २२

[15]जें झालें जितकें समस्त तितकें होऊनि गेलें असे,
जें होईल पुढें पुढें सकळ ही तें होउं देवूं तसें; ।
जें होतें सखि! तेंच होत असतां वीलंब कां दाविसी?
लज्जा सोडुनि, बोल गोड वचनें, कां तूं वृथा [16]कोपसी? ॥ २३

[17]हे मेघ [18]वारिकण वर्षति नो नरांसी, हे शैल[19] देति तृण नेदिति पुरुषांसी, ।
हा वृक्षही फळ फळे न फळे, जनासी, कैसी [20]विधे! पुरविली [21]कुलटा[22]असोसी[23]? ॥

[24]लवंगलतिकादळें झडति चैत्रमासीं बळें,
[25]परोढवनितावळी करित दुःख तें [26]आगळें, ।
[27]कपोलतल पांढरें धरिति तालपत्रापरी
विशेष मदनानळें जळतसे सदा अंतरीं[28]. ॥ २९

---

१. उंदीर. २. कोंपऱ्यांतील बिळांत. ३. यांत गुप्तावर्णन आहे. ४. 'निबिडतमतमाल' इत्यादि २३ वा श्लोक पहा. ५. भ्रमरांचे समुदाय. ६. नदी. ७. हें पांथा! सूर्य प्रखर आहे यास्तव नदीतटावर जेथें निकुंज आहेत तेथें तापोपशमनार्थ जा. ८. उन्हाळा. ९. यांत वाग्विदग्धावर्णन आहे. १०. 'दासाय भवननाथे' इत्यादि २४ वा श्लोक पहा. ११. बोरीचें झाड. गृहस्वामीनें दासाला हा बदरीद्रुम तोडून टाक अशी आज्ञा केली असतां रमणी (हरिणाक्षी) [स्वचौर्यरतस्थानभूत बदरीवृक्षाचा छेद झाल्यानें स्वसंकेतस्थान नाहींसें होईल या भयानें] घरांतील कुऱ्हाड पाण्यांत फेंकून देते. १२. हिंवाळ्यांत. १३. कुऱ्हाड. १४. यांत क्रियाविदग्धावर्णन आहे. १५. 'यद्भूतं तद्भूतं' इत्यादि २५ वा श्लोक पहा. १६. यांत लक्षितावर्णन आहे. १७. 'एते वारिकणान्किरंति' इत्यादि २६ वा श्लोक पहा. १८. पाणी. १९. पर्वत. २०. हे विधात्या! २१. जारिणी. २२. उत्कट इच्छा. २३. यांत कुलटावर्णन आहे. २४. 'समुपागतवति चैत्रे' इत्यादि २७ वा श्लोक पहा. २५. दुसऱ्यानें जिच्याशीं लग्न केलें आहे अशी. २६. थोर. २७. गाल. २८. यांत परोढावर्णन आहे.

२९ वि० का०

[1]निद्रा [2]मयूरमिथुनें करिती, कपोती गाती, नवीन तरुपल्लव हालवीती, ।
तैशींच आणिक वनें कितिही नसेती, खेदासि कां करिसि? जा पति भोगीं राती[3]. ॥

[4]रसाळतरुमंजरी धरुनि कृष्ण कानीं बरी,
[5]त्वरें करुनियां वराप्रति पहातसे सुंदरी; ।
प्रतप्तविरहानलें नयनिं वाहताती जळें,
मनीं म्हणत राधिका हरि वरील गोपीकुळें[6]. ॥ २७

[7]जाऊ [8]हीनविलोचनी, नणद ते [9]बैरांट कानीं असे,
राहे कांतहि गोठणीं, तरुणि ते संतोष मानीतसे; ।
चोळी दाटतसे उरावरि, धरी बिंबाधरीं [10]शोणिमा
साडी नेसुनियां त्वरें करितसे पांथास कामभ्रमों[11]. ॥ २८

[12]कांहीं वक्रित हार फार सरळा भ्रू वांकडी हांसते,
प्रांतीं भोंवति लोचनें, भुजिं ठिवी [13]कर्णावतंसास ते. ।
[14]अंगोळीस जडीत घालुनि मुदी कानास कांडोळिते,
ऐशी ते नृपकन्यकाहि दयिता[15]व्याजें स्वयें पाहते[16]. ॥ २९

[17]आला देखुनि आंगणीं बहुधनी दाता मनीं हर्षली,
आलिंगीति परस्परें स्तन तिचे चोळी उरीं दाटली; ।
आनंदाश्रुजळें त्यजी घडिघडी [18]धम्मिल्लमाला[19]छळें
आकर्णांतविलोचना पतिपशीं येऊनि बैसे [20]बळें. ॥ ३०

[21]'गेलीस तूं कुंज पहावयासी, त्या पापियाच्या सदना नसेसी, ।
पलाशपुष्पाभरणें धरीसी' ऐसें वदे कामिनी दूतिकेसी[22]. ॥ ३१

[23]भूषणें जडित लेउनिशानें, धन्य होसि सखि! कांतकृपेनें; ।
अंतरेल पति रूप पहाया, भूषणें मज न देत धरार्यो[24]. ॥ ३२

---

१. 'निद्रालुकेकिमिथुनानि' इत्यादि २८ वा श्लोक पहा. २. मोरांचीं जोडपीं. ३. यांत अनुशयानावर्णन आहे. ४. आंब्याचें झाड. 'कर्णकल्पितरसालमंजरी' इत्यादि २९ वा श्लोक पहा. ५. 'स्वयें' असाही पाठ आहे. ६. यांतही अनुशयानावर्णन आहे. ७. 'गोष्ठेषु तिष्ठति पतिः' इत्यादि ३० वा श्लोक पहा. ८. आंधळी. ९. बहिरी. १०. लाली. ११. यांत मुदितावर्णन आहे. १२. 'किंचित्कुंचितहारयष्टि' इत्यादि ३१ वा श्लोक पहा. १३. कर्णभूषणास. १४. बोटांत. १५. मिष. १६. यांत कन्यकावर्णन आहे. १७. 'आनंदाश्रुपयांसि मुंचति' इत्यादि ३२ वा श्लोक पहा. १८. केंस. १९. मिष. २०. यांत वित्तमात्रोपाधि सामान्यवनितावर्णन आहे. २१. 'त्वं दूति निरगाः' इत्यादि ३३ वा श्लोक पहा. २२. यांत अन्यसंभोगदुःखितावर्णन आहे. २३. 'वपुषि तनोति' इत्यादि ३४ वा श्लोक पहा. २४. यांत प्रेमगर्वितावर्णन आहे.

[1]लोचनास उपमा कमळाची, दे पती सुवचनास सुधेची[2], ।
सांग काय करुं यत्न तयाचा, दोष कांत धरि शांतपणाचा[3]. ॥ ३३

[4]स्वेदोदकें[5] करुनि पिच्छिल[6] आंग बाई! होऊनि [7]कंटकित शोभत ठाइं ठाईं; ।
हा कांत [8]अन्य वधु जे घडि पाहताहे, कोठें ठिवील पद [9]मान तुझा न सांहे[10]. ३४

[11]चुकोनि तें नाम मुखास आलें, हें सत्य मानीं सखि! एक बोलें; ।
न मानिसी तें दिव[12] मी करीतों, रोमावळीव्याळ[13] करीं धरीतों[14]. ॥ ३५

[15]कपाळीं पतीचे परस्त्रीपदाचा, पडे डाग देखोनियां यावकाचा[16], ।
प्रियालोचनप्रांत आरक्त झाले, प्रियाचे मनीं भासती कामभाले[17]. ॥ ३६

---

## उल्लास दुसरा.

### विषयोपन्यास.

(श्लोक.)

पूर्वीं प्रोषितभर्तृका परिसणें, त्यानंतरें खंडिता
तीपूढें कलहांतरा, चतुर ते स्त्री विप्रलब्धान्विता, ।
उत्का वासकसज्जिका, तदुपरि स्वाधीनभर्तूरिका,
जाणावी अभिसारिका नवम ते प्रोष्यत्प्रिया नायिका. ॥ १

### नायिकावर्णन.

(श्लोक.)

[18]लज्जेनें तरि दीर्घ दुःख सखयांपाशीं न ये बोलतां,
शैवालास्तरणीं न ये पहुडतां, शंका पडे सांगतां; ।
कंठीं गद्गदवाणि लोचनजळें द्रावैति ना अन्यथा
संतापाकुळ फार पद्मनयना[19] [20]कंदर्प जाणे व्यथा[21]. ॥ २

---

१. 'कलयति कमलोपमानमक्ष्णोः' इत्यादि ३५ वा श्लोक पहा. २. अमृताची. ३. यांत सौंदर्यगर्वितावर्णन आहे. ४. 'स्वेदांबुभिः क्वचन' इत्यादि ३६ वा श्लोक पहा. ५. घाम. ६. व्याप्त, कर्दमयुक्त. ७. रोमांचित. ८. 'अन्य वधुला नग देत आहे' असा अन्य पाठ आहे. ९. गर्व. १०. यांत मानवतीवर्णन आहे. ११. 'यद्गोत्रस्खलनं तत्र' इत्यादि ३७ वा श्लोक पहा. १२. शपथ. १३. साप. १४. यांत मानवतीवर्णन आहे. १५. 'दयितस्य निरीक्ष्य' इत्यादि ३८ वा श्लोक पहा. १६. अळित्याचा. १७. यातही मानवतीवर्णन आहे. १८. 'दुःखं दीर्घतरं' इत्यादि ३९ वा श्लोक पहा. १९. कमललोचना. २०. मदन. २१. यांत मुग्धा प्रोषितभर्तृकावर्णन आहे.

[1]हीं कंकणें मनगटीं सखि! वस्त्र तेंची, [2]श्रोणी निबद्धरसना मणियुक्त [3]कांची, ।
गुंजारव भ्रमरवाणि किमर्थ आजी, हें सांग गे! सखि! पुसें मति काय [4]डाजी?॥ ३

[5]माला बालांबुजदलगलन्हार मुक्ताफळांचा,
कांची श्रोणी त्यजुनि जघनीं नेणवे भाव साचा; ।
बाहूमूळीं चढति वलयें, कां पुसे दूति वाचा,
प्रस्थानीं हें किमपि पतिच्या सांग गुह्यार्थ [6]साचा. ॥ ४

[7]सासू [8]पंकजपत्र दे, तदपि तें घेतें म्हणे भ्रू लवे,
कंदर्पें परितप्त यास्तव करें नेघे व्यथा उद्भवे; ।
वाचे नो [9]बोलवे सुहृद्गणमुखें या उत्तरा दे वदे,
उष्ण श्वास निघेति [10]एणनयना कोणास जाणों नदे[11]. ॥ ५

[12]विरहें विदित व्हावा, प्रेम कांतासि दावी,
पुनरपि धन द्यावें, आपुली प्रीति लावी; ।
[13]मरिच नयनपद्मीं घालुनी [14]बाष्प आणी,
धृत उभि पुरयोषा द्वार [15]कांतप्रयाणीं. ॥ ६

[16]हृदय कां [17]कलशांकित हें तया, पतिस इच्छित [18]दार पुसावया, ।
[19]प्रियतमें मग चिन्हित देखिली, मग करें धरुनी [20]परिरंभिली. ॥ ७

[21]वक्षोजचिन्हित उरा पतिचे निरीक्षी, उच्छ्वास टाकित असे न वदे परीक्षी, ।
प्रातर् उठोनि मुख [22]मार्जितसे करानें, [23]बाला विलो[24]चन पुसी पटु[25]पल्लवानें. ॥ ८

[26]माझें चिन्ह सपत्निचें स्वनयनीं देखोनियां बोलिली,
पादालक्तमुखावलिप्त मग ते चित्रोपमा राहिली; ।

---

१. 'वासस्तदेव वपुषो' इत्यादि ४० वा श्लोक पहा. २. कुल्ले. ३. कमरपट्टा. ४. यांत मध्या प्रोषितभर्तृकावर्णन आहे. ५. 'माला बालांबुजदलमयी' इत्यादि ४१ वा श्लोक पहा. ६. यांत प्रौढ प्रोषितभर्तृकावर्णन आहे. ७. 'श्वश्रूः पद्मदलं' इत्यादि ४२ वा श्लोक पहा. ८. कमलदल. ९. बोलवे. १०. मृगाक्षी. ११. यांत परकीय प्रोषितभर्तृकावर्णन आहे. १२. 'विरहविदितमंतः' इत्यादि ४३ वा श्लोक पहा. १३. मिरीं, मिरची. १४. अश्रु. १५. यांत सामान्यवनिता प्रोषितभर्तृकावर्णन आहे. १६. 'वक्षः किमु कलशांकितं' इत्यादि ४४ वा श्लोक पहा. १७. कुंभचिन्हित (स्तन). १८. स्त्री. १९. यांत मुग्धखंडितावर्णन आहे. २०. आलिंगिली. २१. 'वक्षोजचिन्हितमुरो' इत्यादि ४५ वा श्लोक पहा. २२. धूत असे. २३. यांत मध्याखंडितावर्णन आहे. २४. नेत्र. २५. पदर. २६. 'कांतं वीक्ष्य विपक्ष' इत्यादि ४६ वा श्लोक पहा.

टाकी श्वास अधोमुखें न वदली आणोनि नेत्रोदक,
[1]प्रातर्दर्पण दाविला मज तिणें ऐसें वदे नायकें[2]. ॥ ९

[3]देखे प्रियासि [4]वलयांकित कंठदेशीं, मुक्ताक्षतादि न वदे पुरुषा विशेषीं, ।
दूतीकडे मृगदृशा उभि दूरि पाहे, नेत्रांबुपात करितां जळपूर्ण वाहे. ॥१०

[6]उरीं स्तन कुचंबले, मदनमोक्ष कोणे स्थळीं,
नसे स्मरण आमुचें पति तुम्हांस वक्षोत्पळीं, ।
वदे प्रचलचेतसा प्रियतमासि [7]वारस्त्रिया
हरोनि करकंकणा त्वरित घेतसे त्याचिर्या. ॥ ११

[9]न वदत पतिला उगी भिडेनें, न कथिति सखियां सलज्जतेनें, ।
[10]मलयमरुत पैं सुगंधि वाहे, मनिं सुख नसतां जिला न [11]सोहे. ॥ १२

[12]उसरमा मनिंचा वदतां नये, जरि वदों तरि लाजतसें सये ! ।
उगि अधोमुख यास्तव ते असे, किमु वदों न वदों [13]विदधीतसे. ॥ १३

[14]रुधिर नेत्र फिकें मन कां तुझें, करसरोरुह[15]तर्जन मी बुझें, ।
कलहकोप किमर्थ तयावरी, सखि म्हणे हित काय [16]तनूदरी[17]. ॥ १४

[18]भर्तारा लघु मानिलें, वचन म्यां नाकर्णिलें त्या गुणें,
गेलें धैर्यधन, [19]त्रपा उडविली जैसी [20]समीरें [21]तृणें; ।
बिंदुप्राय [22]तटाकिनी पळविली म्यां नीति देशांतरें
क्रोधें धिक्कृत बुद्धिधिग्विधिवशा बोले [23]रसाळोत्तरें. ॥ १५

[24]होतीं पंकजचिन्ह भालपटलीं भाग्याक्षरें [25]वेधसें
जें जें पैं लिहिलें यथार्थ सखिये ! योजूनि आलें तसें; ।

---

१. आरसा. २. यांत प्रौढाखंडितावर्णन आहे. ३. 'कान्तं निरीक्ष्य वलयांकितकंठदेश' इत्यादि ४७ वा श्लोक पहा. ४. कंकणचिन्हित. ५. यांत परकीय खंडितावर्णन आहे. ६. 'उरस्तव पयोधरांकितमिदं' इत्यादि ४८ वा श्लोक पहा. ७. वेश्या. ८. यांत सामान्यवनिता खंडितावर्णन आहे. ९. 'अनुनयति पतिं' इत्यादि ४९ वा श्लोक पहा. १०. मलयपर्वतावरून येणारा वायु. ११. यांत मुग्धा कलहांतरितावर्णन आहे. १२. 'विरमति कथनं विना' इत्यादि ५० वा श्लोक पहा. १३. यांत मध्या कलहांतरितावर्णन आहे. १४. 'अकरोः किमु नेत्रशोणिमानं' इत्यादि ५१ वा श्लोक पहा. रुधिर=लाल. १५. झिडकारणें. १६. सिंहकटी. १७. यांत प्रौढा कलहांतरितावर्णन आहे. १८. 'भर्तुर्यस्य कृते' इत्यादि ५२ वा श्लोक पहा. १९. लज्जा. २०. वायूनें. २१. गवतें. २२. नदी. २३. यांत परकीया कलहांतरितावर्णन आहे. २४. 'यत्पंकेरुहलक्ष्म पाणिकमलं' इत्यादि ५३ वा श्लोक पहा. २५. ब्रह्मदेवानें.

केला म्यां परि कोप कां? पति वृथा धिग् बुद्धि धिग् बोलणें,
धिक् तारुण्य वयासि धिग् धिगि सये! चातुर्य धिग् भाषणें'[1] ॥ १६
आलींनीं[2] शपथा करूनि कपटें नेली निकुंजालया[3],
तेथें कांत नसे, म्हणोनि उगली पावोनियां विस्मया, ।
पाहे क्रोधित पद्मपत्रनयना कुंजोपकंठाकडे,
गुंजत्कार मिलिंद[4] मंद करिती पैं दृष्टि त्यासी जडे[5]. ॥ १७

[6]संकेतकेलिसदनीं[7] दयितासि[8] पाहे, तेथें नसे, थबकली उगलीच राहे, ।
वाचेस शब्द न फुटे विकचार्धदृष्टी[9], [10]तांबूलवीटि वदनीं करि चित्र सृष्टी[11]. १८

[12]देखे [13]शून्य निकुंजसद्म[14], मग ते [15]कामानळें व्यापिली,
सांगेना गुज दूतिकेसि, न पुसे वार्ता, उगी राहिली; ।
'शंभो! शंकर! चंद्रचूड! भगवन्! श्रीकंठ! ऊमापती!
[16]त्राहि त्राहि' म्हणे मृगेक्षणि, करी ऐशी शिवाची स्तुती[17]. ॥ १९

[18]धैर्यव्याळफडेसि देउनि पदा[19], उत्तीर्णलज्जापगा[20],
अंगीकारुनि जाय दाट तिमिरीं[21], देखेचि ना सौभगा[22], ।
संतापाकुळ पैं प्रतप्त मदनें, तों होय मेघध्वनी[23]
क्रोधें पाहतसे [24]कृतांतमहिषा सादृश्य[25] मानी मनीं[26]. ॥ २०

[27]कपट करुन कोणी एक वारांगनेनें[28], कथुनि रसिक गोष्टी कांत नेला स्पृहेनें, ।
हसति मधुपनेत्रा[29] कुंजकेलि[30]प्रसंगीं, विकचकुसुमवर्णा प्रीति लावी पलंगीं[31]. ॥ २१

---

१. यांत सामान्यवनिता कलहांतरितावर्णन आहे. २. 'आलीभिः शपथैरनेककपटैः' इत्यादि ५४ वा श्लोक पहा. सख्यांनीं. ३. प्रदेश. ४. भ्रमर. ५. यांत मुग्धा विप्रलब्धावर्णन आहे. ६. 'संकेतकेलिगृहमेत्य' इत्यादि ५५ वा श्लोक पहा. ७. क्रीडागृह. ८. प्रियकरास. ९. विकसित आहे अर्धदृष्टि जिची अशी. १०. पट्टी. ११. यांत मध्या कलहांतरितावर्णन आहे. १२. 'शून्यं कुंजगृहं निरीक्ष्य' इत्यादि ५६ वा श्लोक पहा. १३. पतिरहित. १४. गृह. १५. मदनाग्नीनें. १६. रक्षण कर. १७. यांत प्रौढा विप्रलब्धावर्णन आहे. १८. 'दत्वा धैर्य भुजंगमूर्ध्नि चरणं' इत्यादि ५७ वा श्लोक पहा. १९. धैर्यरूप व्यालाच्या (सापाच्या) फडेवर पाय देऊन. २०. उतरून गेली आहे लज्जारूप आपगा (नदी) जी अशी. २१. घन अंधकाराला. २२. प्रियकरास. २३. मेघांचा कडकडाट होऊन पाऊस पडूं लागला. २४. यम. २५. 'भ्रांतीस' असा पाठ आहे. २६. यांत परकीयाविप्रलब्धावर्णन आहे. २७. 'कपटवचनभाजा' इत्यादि ५८ वा श्लोक पहा. २८. वेश्येनें. २९. भुंग्यासारखे काळे आहेत डोळे जीचे ती. ३०. क्रीडा. ३१. यांत सामान्यवनिता विप्रलब्धावर्णन आहे.

'[1]कां अद्यापि न [2]ये गृहा' मनिं म्हणे '[3]अन्यांगने पावला,'
लज्जेनें न पुसे सखिप्रति कदा [4]कंदर्प झेंपावला; ।
दीर्घ श्वास न टाकिले, थबकली, पाहे न कोणाकडे,
तापे [5]पंकपलांडुपांडुरनिभा दोहीं [6]कपोलीं पडे[7]. ॥ २२

[8]आणायासि न गेलिस प्रियसखी भ्याला दुजे सर्पिणी
क्रोधें काय निषेधिलें मज गमे वार्ता वदें धर्मिणी, ।
कर्णीं केतकपत्र त्यावरि तदा बाष्पांबु टाकीतसे,
जालें रक्तक पक्ष्म पंकजदृशी खेदासि [9]मानीतसे. ॥ २३

[10]भ्रांता निकुंज सखि! वल्लि [11]रसाळ तात, माता [12]क्षपा पितृतमासि पुसें वृतांत, ।
[13]नीलांबुदाभ इकडून नसे न गेला, दामोदर प्रिय दुजे प्रमदेन नेला[14]. ॥ २४

[15]जालें स्नान घनोदकें वसति पैं केली महा[16]काननीं,
शीतश्चंदन चर्चिला [17]स्मर सदा आराधिला आसनीं; ।
केलें जागरणव्रतासि, [18]रजनी लज्जा दिली दक्षिणा,
ऐसें म्यां तप साधिलें [19]फळ नव्हे हे प्रोक्त [20]मध्यक्षणा. ॥ २५

[21]कां मित्र ये ना चि निकुंजगेहा, चिंता करी खेद विशेष देहा, ।
टाकी शरीरावरि बाष्पधारा, द्रव्याभिलाषास्तव [22]पण्यदारा[23]. ॥ २६

[24]माळा गुंफित हार हेम[25]रशना गंधें सुगंधादिकें
पात्रें सिद्ध करी प्रदःत करुनी कार्य प्रयोजी निकें, ।
'या रात्रीं [26]रति नेमिली प्रियतमें' दूतीस भाषीतसे,
हांसे चंद्रमुखी प्रसन्नवदना दूरस्त [27]पाहातसे. ॥ २७

---

१. 'यन्नाद्यापि समागतः' इत्यादि ५९ वा श्लोक पहा. २. (पति) ये—असा संदर्भ. ३. दुसऱ्या स्त्रियेकडे गेला. ४. मदन. ५. कांदा. ६. गाल. ७. यांत मुग्धा उत्कंठितावर्णन आहे. ८. 'आनेतुं न गता किमु' इत्यादि ६० वा श्लोक पहा. ९. यांत मध्या उत्कंठितावर्णन आहे. १०. 'भ्रान्तर्निकुंज सखि यूथ' इत्यादि ६१ वा श्लोक पहा. ११. आंबा. १२. रात्र. १३. निळ्या ढगासारखा. १४. यांत प्रौढा उत्कंठितावर्णन आहे. १५. 'स्नानं वारिदवारिभिः' इत्यादि ६२ वा श्लोक पहा. १६. अरण्य. १७. मदन. १८. रात्र. १९. पतीला पाहिलें नाहीं. २०. यांत परकीय उत्कंठितावर्णन आहे. २१. 'कथं न कांतः समुपैति कुंजं' इत्यादि ६३ वा श्लोक पहा. २२. वेश्या. २३. यांत सामान्यवनिता उत्कंठितावर्णन आहे. २४. 'हारं गुंफति तारकातिरुचिरं' इत्यादि ६४ वा श्लोक पहा. २५. सोन्याचा कमरपट्टा. २६. क्रीडा, संभोग. २७. यांत मुग्धा वासकसज्जावर्णन आहे.

[1]गुंफी हार [2]कुतूहलें [3]चतुरता कांता निरीक्षावया,
चित्रालोकन[4]कैतवें करुनियां द्वारीं विलोकी तया ।
[5]ले रत्नाभरणें नवीं पतिमिसें, देखे सखी लोचनीं,
पद्माक्षीचरितासि पाहुनि तदां कंदर्प हांसे [6]मनीं. ॥ २८
[7]करी [8]वपुषि भूषणें [9]चिकुरधोरणी धूपिले,
करूनि उपचार म्यां शयनसन्निधी ठेविले, ।
न ये प्रिय तदां वृथा सखि! कदापि त्या स्पर्शिना,
म्हणे, 'कनककांतिमा उगवलासि कां [10]दुर्दिनां?' ॥ २९
[11]सासेला [12]निजवी, प्रदीप विझवी, [13]सौध[14]गृहाभीतरी
आकर्णी श्रवणीं कपोत घुमती चेष्टा बुजे सुंदरी; ।
पाहे रत्नविभूषणेंऽश्रु गळतां शोभे कपोलद्युती,
आला काय नसेल कांत शयना हस्ताब्ज लावी [15]सती. ॥ ३०
[16]हस्तें [17]ओढिल वस्त्र, चुंबिल तदा [18]चूडामणी मागणें,
कांची याचिन, हस्त ठेविल कुचीं तेव्हांचि त्या कारणें. ।
आंगीं लाविन चंदनोत्तम तया कस्तूरिका भूषणें,
तैं माझे पुरती मनोरथ म्हणे वारांगना [19]पाहाणें. ॥ ३१
[20]मध्ये न [21]कृशता, कुचीं न [22]घनता, देहीं नसे [23]भास्वता,
श्रोणीं न [24]पृथुता, गतीं न [25]जडता, नेत्रीं नसे वक्रता; ।

---

१. 'शिल्पं दर्शयितुं करोति' इत्यादि ६५ वा श्लोक पहा. २. हौसेनें, आनंदानें. ३. कांतानें आपली चतुरता पहावी यासाठीं. ४. मिष. ५. धारण करी. ६. यांत मध्या वासकसज्जावर्णन आहे. ७. 'कृतं वपुषि भूषणं' इत्यादि ६६ वा श्लोक पहा. ८. शरीरावर. ९. केशपाश. १०. यांत प्रगल्भ वासकसज्जावर्णन आहे. ११. 'श्वश्रूं स्वापयति च्छलेन च' इत्यादि ६७ वा श्लोक पहा. १२. मला मातृसदनीं महोत्सव पाहण्यास गेलें पाहिजे असें सांगून सासवेला कपटानें निजविलें. १३. गच्ची. १४. आंत. १५. यांत परकीया वासकसज्जावर्णन आहे. १६. 'चोलं नीलनिचोलकर्षणविधौ' इत्यादि ६८ वा श्लोक पहा. १७. हातानें माझ्या लुगड्याची नीरी ओढील तेव्हां वस्त्र (लुगडें) मागेन व जेव्हां चुंबन घेईल तेव्हां चूडामणि मागेन—असा भाव. १८. मूदराखडी. १९. यांत सामान्यवनिता वासकसज्जावर्णन आहे. २०. 'मध्ये न कृशिमा स्तने न' इत्यादि ६९ वा श्लोक पहा. २१. मध्यभाग (कटि) कृश नाहीं. २२. गुरुता, पुष्टपणा. २३. कांतिमत्त्व. २४. प्रथिमा. २५. मंदत्व.

[1]लास्या न [2]दृढता, न [3]वाणिपटुता, हास्या न गंभीर[4]ता,
ऐशी[5]र्था दयिता मशींच वशता, नेणें सखे! संमता. ॥ ३२
[6]सुरतोत्सवकाम जरी न करीं, दृढ नीरि जरि [7]स्वकरें न धरीं, ।
पति [8]सोडि न [9]पृष्ठि तथापि कधीं, करणें तरि काय सखे! हि [10]विधी.॥ ३३
[11][12]पीयूषाधरपल्लवा सुवचसा हास्यादि पैं जाणत्या,
नाना स्पष्टविलासिनी मृगदृशा आहेत कित्येक त्या; ।
स्वप्नीं नावडती न, जाय परता, नेत्रीं न पाहे कदां,
[13]कांता भेद करील कोण? मजला तो वश्य आहे [14]सदां. ॥ ३४
[15]आहेत [16]प्रमदा सखे! निजगृहीं सालंकृता धीमता,
कांची[17]नूपुरकंकणादिकझणत्कारा न वि[18]श्राम्यता; ।
त्या कोणी [19]नलगेचि, तो मज सवें [20]प्राणेश [21]भोंवे सदां,
[22]कांतारीं सदनीं विसंबत नसे, पृष्टी न सोडी [23]कदां. ॥ ३५
[24]आहेत प्रतिमंदिरीं [25]मृगदृशा लीलासुधाब्धीसमा,
स्रोतस्यूतसरोजसुंदरचमत्कारा दृशाविभ्रमा; ।
मोठी चित्रविचित्रमन्मथकळा प्रीति स्वभर्ता करी
पाहें चित्त समेत वित्त मज दे, हा हेतु नेणें [26]तरी. ॥ ३६
[27]दूती वि[28]द्युल्लतामुपागत, [29]समप्राणप्रिया हो! निशा,
गर्जे ज्योतिषि मे[30]घ दावित असे प्रस्थानवेळा दिशा; ।

---

१. यांत मुग्धास्वाधीनपतिकावर्णन आहे. या पद्यांत 'ता' या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथें 'अनुप्रासालंकार' आहे. २. लास्यांत (नृत्यांत) अभ्यास विशेष नाहीं. ३. भाषणांत श्लिष्टत्वादिक चातुर्य. ४. प्रगल्भता. ५. असें असूनही माझ्यावर माझा दयित (प्रिय) आसक्त आहे. ६. 'यद्यपि रतिमहोत्सवे न कारो' इत्यादि ७० वा श्लोक पहा. ७. आपल्या हातानें. ८. 'नो सडि' असें मूळांत आहे. ९. पाठ. १०. यांत मध्या स्वाधीनपतिकावर्णन आहे. 'विदधी' असा अन्य पाठ आहे. ११. 'रक्तस्याधरपल्लवस्य' इत्यादि ७१ वा श्लोक पहा. १२. अमृत. १३. माझ्या कांताचा भेद अन्य कोणती स्त्री करणार आहे? माझ्या पतीचें मन कोणती परकी स्त्री आकर्षून घेणार आहे? १४. यांत प्रौढास्वाधीनपतिकावर्णन आहे. १५. 'स्वीयाः संति गृहे' इत्यादि ७२ वा श्लोक पहा. १६. स्त्रिया. १७. पैंजण. १८. झणत्काराला कधींही विश्रांति नाहीं. १९. अशा प्रमदांची त्यास गरज नाहीं. २०. प्रियकर. २१. मागून मागून फिरे. २२. अरण्यांत. २३. यांत परकीया स्वाधीनपतिकावर्णन आहे. २४. 'संत्येव प्रतिमंदिरं' इत्यादि ७३ वा श्लोक पहा. २५. एणाक्षी. २६. यांत सामान्यवनितास्वाधीनपतिकावर्णन आहे. २७. 'दूती विद्युदुपागता' इत्यादि ७४ वा श्लोक पहा. २८. विद्युल्लता हीच दूती आली. २९. प्राणप्रियेसारखी निशा ही सुद्धां आली. ३०. मेघ हाच ज्योतिषी (दैवज्ञ.)

झिल्ली[1]चे रव[2] होति तेचि तिमिरीं[3] मांगल्य जल्पे क्षपा[4],
जालासे दयिताभिसार[5]समयो, मुग्धे! त्यजावी[6] त्रपा[7]. ॥ ३७
भ्याली[8] नसेसि किमु पंथि भुजंग[9]मासी, शंकेसि मद्भुज विलोकुनि तेंवि त्यासी, ।
अंभोधर[10]ध्वनिस भ्यालिस कीं कळावें, मद्भाषणें वदन वक्र किंमाचरावें[11]? ॥ ३८
स्तन[12]कलशांकित भार फार जाला, किसलय[13]कोमल[14]कांतिमा पदाला ।
गमन कसें करिशील सांग भावें, रजनि[15] मनोरथ त्या रथीं बसावें[16]. ॥ ३९
रभसा[17][18] जलदार्क[19][20] मानि लोभा, रजनी दिवसांधकार शोभा ।
वन वेश्म[21] विमार्ग मार्ग वाहे, प्रमदे! कांत विचार [22]सांगताहे. ॥ ४०
[23]चंद्रोदयीं चंदन लावि हातें, स्मेरानना[24] उदित[25] जावयातें ।
भेदावया चित्त तिचें प्रतापी, कंदर्प लावी कुमुदां स्वैवापी[26]. ॥ ४१
पल्ली[27]गोपनिमंत्रिता मृगदृशा पर्वोत्सवाकारणें,
ते धाडी गृहिंची पुढें स्मितमुखी राहे मिसें पाहणें ।
गोपीगोप समानयौवनमदें क्रीडा करूं लागलीं
नाना चुंबन कंठलग्न सुरतें प्रेमोत्सवें रतिलीं[28]. ॥ ४२
कांची[29]चे झणकार होति जघनीं चांचल्य चैलांचळीं
वक्षोजां[30] दृढ कंचुकीं गवसिलें मत्तेभ[31] गा! भूतळीं ।
रुक्मा[32]लंकृत हर्षयुक्त मदनोन्मादप्रसन्नानना
श्रीमंताप्रति जाय कुंजभवना क्रीडेसि वारांगना[33]. ॥ ४३
प्रस्थाना[34] गत कंकणें सम तयां नेत्रोदकें जाइजे
गेलें धैर्य म्हणोनि त्याहुनि पुढें प्रस्थान चित्तें किजे ।

---

१. कीटकविशेष. (रातकिडा.) २. झंकृतिरव. ३. अंधारांत. ४. रात्र. ५.अभिसार=प्रियकराचे भेटीस नटून जाणें. ६. यांत मुग्धाभिसारिकावर्णन आहे. ७. लाज. ८. 'भीतासि नैव' इत्यादि ७५ वा श्लोक पहा. ९.सापास. १०. घनगर्जनेनें. ११. यांत मध्याभिसारिकावर्णन आहे. १२. 'स्फुरदुरसिजभारभंगुरांगी' इत्यादि ७६ वा श्लोक पहा. १३. पल्लव. १४. शोभा. १५. रात्र. १६. यांत प्रौढाभिसारिकावर्णन आहे. १७. 'रभसादभिसर्तुमुद्यतानां' इत्यादि ७७ वा श्लोक पहा. १८. वेगानें. १९. मेघ. २०. सूर्य. २१. घर. २२. यांत परकीयाभिसारिकावर्णन आहे. २३. 'चंद्रोदये चंदनमांगकेषु' इत्यादि ७८ वा श्लोक पहा. २४. हास्य. २५. तयार. २६. यांत ज्योत्स्नाभिसारिकावर्णन आहे. 'सुवापी' आणि 'सुचापी' असे पाठभेद आहेत. २७. 'पल्लीनामधिपस्य' इत्यादि ७९ वा श्लोक पहा. २८. यांत दिवसाभिसारिकावर्णन आहे. २९. 'लोलच्चोलचमत्कृति' इत्यादि ८० वा श्लोक पहा. ३०. स्तनांतें. ३१. मदोन्मत्त हत्ती. ३२. सोनें. ३३. यांत सामान्यवनिताभिसारिकावर्णन आहे. ३४. 'प्रस्थानं वलयैः कृतं' इत्यादि ८१ वा श्लोक पहा.

गेली निश्चित चित्तवृत्ति, मग ते ठायीं विचारी हिता,
धाडी जीवित आपुलें पतिसवें देशांतरा योषिता[1]. ॥ ४४
प्राणेश्वराप्रति[2] भिडेस्तव बोलवेना[3], क्षामोदरी[4] वदन आगळि वर्जवेना, ।
कुंजगृहीं सखि समीप वदे न जावें, उन्मत्तकोकिलकल[5]ध्वनि आयकावे[6]. ॥ ४५
जातां[7] प्रियो श्वसित नान वदे प्रयाणीं, स्फुंदे न दीर्घनयना जलबिंदु नाणी, ।
आयुर्दिना मृगदृशा पठियेसि मापी[8], नेदी कळा करतळें निटिळासि[9] लोपी[10]. ॥ ४६
[11]कां योषेसि न सोडिजे हरि तनुत्यागीं वियोगज्वरें ?
राधा प्रश्न करी कृतांजळि पुढें 'कृष्णा ! निवेदीं खरें, ।
कर्पूरोदक भेषजादि[12] कुसुमें तांबूल देती सदा
घेतां दुःसह कोळकूट[13] गमतें संतोष नेदी कदा[14]. ॥ ४७
सर्पाच्या[15] फडियेसि पाय दिधले, म्यां नीति पैं त्यागिली,
त्याग श्रीगुरुभक्तिचा करुनियां, मया[16] खरी मानिली; ।
सर्वांगीं शत यातना हृदयुगीं प्रस्थान[17] देखोनियां,
[18]कुंभीपाक वियोग रौरवें[19] महाक्रोधें गमे स्वामिया[20] ! ॥ ४८
'द्यां[21] मुद्रिका मज[22] तुम्हीं करकंकणासी, तेणें वियोग तुमचा [23]न कळे मनासी' ।
ऐसें वदोनि नयनोदकबिंदु गाळी, वारांगना[24] प्रियतमाप्रति लोभ चाळी[25]. ॥ ४९

## उपसंहार.

(श्लोक.)

श्रीशृंगारलता रसाल रचना व्युत्पन्न हो ! आयका
नारी पंचविधा पृथक् नवजणी वाखाणिल्या नायका ।

---

१. स्त्री. २. 'प्राणेश्वरो किमपि जल्पति' इत्यादि ८२ वा श्लोक पहा. ३. प्राणेश्वर देशांतराला जातो असें ऐकून भिडेनें त्याची स्त्री बोलेना. ४. क्षाम (तनु) आहे उदर जीचें ती. ५. मधुर. ६. यांत मुग्धाप्रोष्यत्पतिकावर्णन आहे. ७. 'गंतुं प्रिये वदति' इत्यादि ८३ वा श्लोक पहा. ८. मोजी. ९. कपाळ. १०. यांत मध्याप्रोष्यत्पतिका वर्णन आहे. ११. 'नायं मुंचति सुभ्रुवामपि' इत्यादि ८४ वा श्लोक पहा. १२. औषध. १३. विष. १४. यांत प्रौढाप्रोष्यत्पतिकावर्णन आहे. १५. 'न्यस्तं पन्नगमूर्ध्नि' इत्यादि ८५ वा श्लोक पहा. १६. खोटी बुद्धि. १७. तुमचें जाण्याचें प्रस्थान. १८. एक नरक आहे. येथें पापी मनुष्याला मडक्यांत घालून शिजवतात असा समज आहे. १९. एक नरक आहे. २०. यांत परकीया प्रोष्यत्पतिकावर्णन आहे. २१. 'मुद्रां प्रदेहि वलयाय' इत्यादि ८६ वा श्लोक पहा. २२. वसंततिलकावृत्त. २३. 'न वटे' असा अन्य पाठ आहे. २४. वेश्या. २५. यांत सामान्यवनिता प्रोष्यत्पतिकावर्णन आहे.

साहित्यामृत सेविजे क्षितिसुत श्लोकांक चित्तीं धरा
प्रार्थी विठ्ठल दास हास्य वदनें उल्लास हा दूसरा.[1] ॥ १०

---

## उल्लास तिसरा.

(श्लोक.)

स्वभर्तृ[2]शयनागमीं कुच विचित्र उंचावले
रसाळ वचनामृतें अधर पाझरों लागले ।
प्रियासि उटि दे स्मितद्युतिपटीर[3]पंकद्रवें
निरीक्षि[4] नयनांबुजें पतिस चंचळा पेलवें.[5] ॥ १
भ्रूसंज्ञया[6] सकळ दाखवितेसि साक्षी, हांसोनि सुंदर मुरारि म्हणे, 'मृगाक्षी ! ।
बिंबाधरासि दशनव्रण दाट कां हे ?' राधा तदां उगि अधोमुख देखताहे. ॥ २
या[7] दिव्या न बुझें शिरीं सुरधुनी[8] दिव्याग्नि कैसा दर्शीं[9]
आहे सर्प गळां शिवाप्रति म्हणे ते शैलजा[10] सूदशी ।
कैसें द्यूतविधीसि आजि तुजला मी पाठवूं हें वदे
घाली सुंदर हार शंभुसि उमा हांसोनि संतोष दे[11]. ॥ ३
उगवला[12] तम रात्र विकासली, चपळता मदनाप्रति पावली ।
सुरस बोल सखोल सखे ! तया, हृदय मोहुनि आणि निर्जाळया[13]. ॥ ४
केलीसे[14] विधिनें प्रदीपकळिका निर्माण चंद्रानना
ते तों भ्राम्यदशेस्तव प्रगटली सेवेसि दिव्यांगना ।
केला जाण तिणें प्रणाम तुजला श्रीकृष्ण जी जल्पली
निस्नेहें तुझिया महांधतमसीं[15] सृष्टी बुडों लागली[16]. ॥ ५

---

१. 'इति शृंगारलतिका विठ्ठलविरचिता महाराष्ट्रभाषायाः । नवनायिका प्रत्येकं पंचविधवर्णनं नाम द्वितीयोल्लासः ॥' असा समाप्तिलेख आहे. २. 'पतिः शयनमागतः' इत्यादि ८७ वा श्लोक पहा. ३. चंदन. ४. यांत मध्यमनायिकावर्णन आहे. ५. कोमल. ६. 'भ्रूसंज्ञया दिशसि तन्वि' इत्यादि ८८ वा श्लोक पहा. ७. यांत प्रियकृत परिहास (थट्टा) आहे. ८. 'दिव्यं वारि कथं यतः' इत्यादि ८९ वा श्लोक पहा. ९. भागीरथी. १०. डोळ्यांत. ११. यांत प्रियाकृत परिहास आहे. १२. 'अंचति रजनिरुदंचति' इत्यादि ९० वा श्लोक पहा. १३. यांत संघट्टन (समागम) वर्णन आहे. १४. 'चक्रे चंद्रमुखी प्रदीपकलिका' इत्यादि ९१ वा श्लोक पहा. १५. गाढ अंधकार. १६. यांत विरहनिवेदन आहे.

[1]तूं पियू[2]षमयूख वर्ष शिरसीं चंद्रा सुधांबूकणीं
शेषा वीजे[3] शनैः[4] शनैः निजफ[5]णाभोगें सुखें ये क्षणीं ।
तूं [6]मंदाकिनि सिंच शीतल जलें अंगें शिरीषोपमें
पंथीं शैलसुतेसि दुःसह महा अत्यंत क्लांतिक्रमें. ॥ ६
[8]पृथ्वी ! कोमल होय तूं. दिनकरा ! शैत्यांगिकारीं सदां.
मार्गा ! तूं लघु होय. मंद पवना ! ये खेद नेदीं कदां. ।
येईं सन्निध दंडकावनगिरी जाईं पथाबाहिरी
उत्कंठीं वनवास मत्सम महा सीता अती सुं[9]दरी. ॥ ७
[10]देखे यद्यपि हास्यवर्जित तितें लास्याहिनें बोलणें
आरक्तांबुजलोचनद्युति दिसे राहे उगा पाहणें ।
घाली पंकजमाळिका मकरिकारंभा उ[11]रोजांवरी
धूपी [12]कुंतलधोरणी पति तिला संतोषवी यांपै[13]री. ॥ ८
[14]न लज्जाभयक्रोधकारुण्य कांहीं, नसे लोभ ना मोह निःशेष पाहीं ।
[15]जपापुष्पवर्णोपमा कोमलांगी, पुन्हा हस्ति त्याच्या न लागे [16]कृशांगी. ॥ ९
[17]बाह्यात्कारपरायण स्थिति तुझी वज्रोपमीं मानसीं,
ऐशीं आइकिलीं उदास वचनें कांतें तिचीं तामसीं ।
प्रातर्वीतविलोकनास्तव बळें प्रस्थान केलें असें
देखे त्या कृपणासि वामनयना मानीं शठत्वें अ[18]सें. ॥ १०
[19]अंधारदिक्प्रांतनि[20]शाकराळीं, जासी कसी एकट तूं निराळी ।
कुंजालया शैवलिनीतटासी, साह्यो तुला कोण सखे ! वि[21]लासी ? ॥ ११
हेमं[22]जंबीर पैं कांत हातीं धरी, खेळवी त्यासि देखोनियां सुंदरी ।
सूर्य रेखाटिला चित्र भिंतीवरी, चंद्रबिंबानना बिंदु दे त्यों[23]वैरी. ॥ १२

---

१. 'त्वं पीयूषमयूख मुंच' इत्यादि ९२ वा श्लोक पहा. २. अमृतकिरण. ३. वारा घाल. ४. हळू हळू, सावकाश. ५. फडेचा विस्तार. ६. भागीरथी. ७. यांत पतिवर्णन आहे. ८. 'पृथ्वि त्वं भव कोमला' इत्यादि ९३ वा श्लोक पहा. ९. यांत अनुकूलपतिवर्णन आहे. १०. 'आस्यं यद्यपि हास्यवर्जितमिदं' इत्यादि ९४ वा श्लोक पहा. ११. स्तनांवर. १२. केशपाश. १३. यांत मध्यम वैशिकवर्णन आहे. १४. 'उदयति यदि हृदि नैव' इत्यादि ९५ वा श्लोक पहा. १५. जास्वंदीचें फूल. (मूळांत 'बकुल' आहे.) १६. यांत अधम वैशिक वर्णन आहे. १७. 'बाह्याकूतपरायणं' इत्यादि ९६ वा श्लोक पहा. १८. यांत मानीनायकवर्णन आहे. १९. 'तमोजटाले हरिदंतराले' इत्यादि ९७ वा श्लोक पहा. २०. भयंकर. २१. यांत वचनव्यंगसमागम चतुरवर्णन आहे. २२. 'कांते कनकजंबीरं' इत्यादि ९८ वा श्लोक पहा. २३. यांत चेष्टाव्यंगसमागम चतुरवर्णन आहे.

[1]ऊरू[2] [3]रंभा नयन कमळें बाल शैवाल भांगीं
इंदू वक्त्रीं अमृत वचनीं पद्मतंतू कृशांगीं ।
नाभी कूप त्रिवळि स[4]रिता पल्लवाकार पाणी
ऐसी योषा हृदयिं वसतां विंधि तो **काम** बा[5]णीं. ॥ १३
[6]शोभे सरःस[7]लिलकेलि करावयातें, आली मिसें करुनियां सुरतस्थळातें ।
स्मेरानना द्युतिचमत्कृत उ[8]त्तमांगी, अंगीकरी स्मरतसे हृदयानुरा[9]गी. ॥ १४
ने[10]ला शून्य निके[11]तना स[12]हचरी निर्मानुषी कानना,
पुष्पाचेनि मिसें करूनि झुरला विस्फारितां लोचना ।
द्यायालागिं विडा उरोज उघडे घालोनि गेल्यें तदां
तें नेणें पति चिन्ह यत्न किति म्यां केलेऽनभिज्ञे क[13]दा. ॥ १५
[14]अक्रोधें करुणासगर्भ वचनें बोलेसि ना कामिनी,
[15]पीयूषें भरिं वापिका परिमळें [16]आमोदवीं मेदिनी[17] ।
आतां सर्व असो स्पृहार्थ नयनें तूं पाहसी ज्या क्षणें,
त्याचें पैं तप धन्य कोपसि जया वंदीन त्या का[18]रणें. ॥ १६
चंद्रां[19]चे उदयीं सुशीतळ हळू ये वायु गंधासवें,
पाहें कोकिल कूजती अलिकुला उत्साह गुंजारवें ।
ऐसे हे रस सिद्ध सर्व असतां **कंदर्प** वैद्य स्वयें
केल्यानें उपचार कां नव्हति पैं होती सखे! नि[20]श्चयें? ॥ १७
[21]तो **नंद**सूनु सखि चंद्रमुखी प्रसंगें, नेला निकुंजसदनाप्रति **काम**संगें ।
**चेटें** करूनि मग ये कपटें नदीसी, तृष्णेपिडे जळमिसें सरला त्व[22]रेंसी. ॥ १८
[23]पद्मानना शयनिं आणुनियां विलासी, इच्छी मनांत कुचकंचुकिमोक्षणासी ।
केला विनोद तंव एक **विदूषकानें**, प्रातोदयीं तरुण कु[24]क्कुट शब्दमानें[25]. ॥ १९

---

१. 'उरू रंभा दृगपि कमलं' इत्यादि ९९ वा श्लोक पहा. २. मांड्या. ३. केळ. ४. नदी. ५. यांत प्रोषितपतिवर्णन आहे. ६. 'यांत्या सरः सलिलकेलिकुतूहलाय' इत्यादि १०० वा श्लोक पहा. ७. जलक्रीडा. ८. मस्तक. ९. यांत उपपतिवर्णन आहे. १०. 'शून्ये सद्मनि योजिता' इत्यादि १०१ वा श्लोक पहा. ११. गृह. १२. सखी. १३. यांत अनभिज्ञनायकवर्णन आहे. १४. 'कोऽयं कोपविधिः प्रयच्छ' इत्यादि १०२ वा श्लोक पहा. १५. अमृतानें. १६. सुवासित कर. १७. पृथ्वी. १८. यांत पीठमर्दवर्णन आहे. १९. 'आयातो कुसुमेश्वरो विजयते' इत्यादि १०३ वा श्लोक पहा. २०. यांत विटवर्णन आहे. २१. 'सा चंद्रसुंदरमुखी' इत्यादि १०४ वा श्लोक पहा. २२. यांत चेटवर्णन आहे. २३. 'आनीय नीरजमुखी' इत्यादि १०५ वा श्लोक पहा. २४. कोंबडा. २५. यांत विदूषकवर्णन आहे.

[1]रोमांच कंप स्वरभंग चिन्हें, स्वेदाश्रुपात प्रलयादि भिन्नें ।
निर्वर्णता आणिक पात तोही, पैं आठ हे [2]सात्विक भाव देहीं. ॥ २०
[3]वांचे भेद दिसे दशीं जळ कुचीं स्वेद प्रकंपोधरा,
भाळीं पांडुरता वपू पुलकिता चित्तें विलोकी धरा ।
देहीं आळस पादयुग्मिं जडता हे गोष्टि सांगें खरी,
मी जाणें [4]नृपनायकासि नयनीं त्वां देखिलें सुंदरी[5]. ॥ २१
[6]कोकिळा[7] बहु रसाळ कूजती, चंचला लवति मेघसंतती ।
तारकायुत मृगांक यामिनी, दोलती [8]लहरि [9]देववाहिनी[10]. ॥ २२

---

१. 'स्वेदस्तंभोऽथ रोमांच' इत्यादि १०६ वा श्लोक पहा. २. आठ सात्विक भाव (शरीरज). सात्विकभाव—हे शरीरविकार आहेत. यांचे चार भेद मानतात. ते असे:—"१ **कायिक** २ **मानसिक** ३ **आहार्य** आणि ४ **सात्विक**. (१) **कायिक**—शरीराचे जे चलनवलनादि व्यापार, आणि मनोविकार उत्पन्न झाल्यावर मुखावर होणारीं त्या त्या मनोविकारास योग्य अशीं चिन्हें. हे सर्व कायिकअनुभाव होत. (२) **मानसिक**—जसा मनोविकार उत्पन्न झाला असेल किंवा नाटकांत पात्रास त्या त्या प्रसंगीं जो मनोविकार उत्पन्न झाल्याचें अभिनयानें दाखवावें लागतें, तशी मनाची स्थिति असल्याचें दाखविणें किंवा प्रमोद ब्रह्मानंद समाधि इत्यादिक. (३) **आहार्य**—वेष धरून अभिनयद्वारा जें भाव दाखविणें तें. जसें:—विष्णूचें सोंग घेऊन चतुर्भुज होणें, सोंड लावून गणपति होणें, इत्यादिक. ह्याचा नाटकांत मात्र उपयोग आहे. (४) **सात्विक**—सत्वगुणापासून उत्पन्न होणारे जे शारीरिक विकार ते आठ आहेत. त्यांचीं नांवें व लक्षणें:—(१) स्तंब.—शारीरिक सर्व धर्म कायम असतां कांहीं कारणांनीं अकस्मात् गतिनिरोध होतो तो. (२) स्वेद.—घाम श्रमापासून उत्पन्न झालेला असला तर तो सात्विकभागांत गणला जाणार नाहीं; कारण तो मनोविकाराचें कार्य नव्हे. (३) रोमांच.—क्रोध, भय, हर्ष, राग, इत्यादिकांपासून अंगावर कांटे उभे राहतात ते. (४) स्वरभंग.—आवाज बदलणें. सर्दी झाली असतां जो आवाज बदलतो तो मनोविकारजनित नसल्यामुळें स्वरभंग समजूं नये. (५) वेपथु.—अंगास कंप सुटणें. हर्ष, भीति इत्यादिकांपासून हा होतो. साधारण एखाद्या वेळीं अंग कांपूं लागतें त्यास वेपथु म्हणत नाहीं; कारण तो कंप मनोविकारापासून उत्पन्न झालेला नसतो. (६) वैवर्ण्य.—शरीराचा रंग पालटणें. (७) अश्रु.—स्पष्टच आहे. (८) प्रलय.—चेष्टानिरोध. स्तंभांत गतिनिरोध असतो, व ह्यांत चेष्टानिरोध असतो. निद्रेंतही चेष्टानिरोध आणि गतिनिरोध असतो; पण तो मनोविकारजनित नसल्यानें तेथें स्तंभ किंवा प्रलय मानीत नाहींत. येणेंप्रमाणें हे आठ सात्विकभाव आहेत." [रसप्रबोध—पृष्ठ ६-८ पहा.] ३. 'भेदो वाचि दृशोर्जलं' इत्यादि १०७ वा श्लोक पहा. ४. मूळांत 'केशव' असें आहे. ५. यांत अष्टसात्विकभाववर्णन आहे. ६. 'वियति विलोलति जलदे' इत्यादि १०८ वा श्लोक पहा. ७. मूळांत 'कपोत' आहे. ८. लाटा. ९. भागीरथी. १०. यांत संभोगशृंगारवर्णन आहे.

[1]प्रादुर्भूत नवीन [2]वारिद तुझें पादाब्ज पाहावया,
कंठीं प्राण वसे सरोजदृशिचा वक्त्रेंदु देखावया ।
सांगों काय स्तनासि पक्ष फुटले पैं पल्लवाच्या छळें
दूती बोलतसे प्रियाप्रति मुखें मंदोत्तरें [3]कोमळें. ॥ २३
[4]सरोजपत्रासदृशा निजेली, चित्तें दृगीं वस्ति तयांत केली, ।
बुडोनि तेथें मन मग्न राहे, चक्षू लघुत्वें भ्रमताति [5]पाहें. ॥ २४
[6]मी आजि जातें यमुने रमाया, कुंजालयीं वेणुरवें स्फुराया ।
राधा अधो पाहत विभ्रमातें, करूनि नेत्रोत्पलतोरणातें[7]. ॥ २५
श्री[8]काकुत्स्थ सुमित्र दुःखित महा कोणा कळेना व्यथा,
नोष्णा श्वास न वारि  नेत्रकमळीं नेदे कळों अन्यथा ।
[9]वातावर्त जसा स्मरज्वर तसा पीडी तया कारणें
सीतेच्या स्मरणें करूनि शमवी श्रीराम तो [10]पाहणें. ॥ २६
[11]पाहावा मुखचंद्रमा स्तनतटस्पर्शादि संभाषणें
स्त्रीशीं केलिकथाप्रलाप विरहावस्थेविना पाहणें ।
वारंवार प्रतिक्षणीं विषय ते चित्तीं स्मरावे सदा
ऐसा हा विरही सखीप्रति वदे कालानुरूपें [12]तदा. ॥ २७
[13]ग[14]रळद्रुमकंद चंद्र [15]आहे, करुणापद्म वसंत दंति[16] पाहें ।
रजनी स्मर[17]खड्गवल्लि जागे, करणें काय विधातयासि [18]सांगें. ॥ २८
[19]अर्ध विलक्षण चक्षु विलासे, अर्धसमीलन चित्त निवासे ।
अर्ध ससंस्पृश हस्तगिरी हे, काय करूं सखि! आजि मि पाहे[20].॥२९

---

१. 'प्रादुर्भूते नवजलधरे' इत्यादि १०९ वा श्लोक पहा. २. मेघ. ३. यांत विप्रलंभशृंगार आहे. ४. 'तस्यां सुतनुसरस्यां' इत्यादि ११० वा श्लोक पहा. ५. यांत अभिलाषवर्णन आहे. ६. 'मया विधेयो मुहुरद्य' इत्यादि १११ वा श्लोक पहा. ७. यांत चिंतावर्णन आहे. ८. 'रामो लक्ष्मणदीर्घदुःखचकितो' इत्यादि ११२ वा श्लोक पहा. ९. वावटळ. १०. यांत स्मृतिवर्णन आहे. ११. 'संस्पृशी: स्तनसंस्पर्शो' इत्यादि ११३ वा श्लोक पहा. १२. यांत गुणकीर्तनवर्णन आहे. १३. 'गरलद्रुमकंदमिंदुबिंब' इत्यादि ११४ वा श्लोक पहा. १४. विषवृक्षाचा कांदा. १५. पुष्पिताग्रावृत्त. १६. हत्ती. १७. खड्ग=तरवार. १८. यांत उद्वेगवर्णन आहे. उद्वेग=सकल विषय टाकण्यास योग्य होत असें कामक्लेशजनित ज्ञान. १९. 'अर्धमुद्रीक्षणं चक्षु' इत्यादि ११५ श्लोक पहा. २०. यांत प्रलापवर्णन आहे.

[1]प्रति[2]फल हि[3]मधाम्नी कांत देखे मृगाक्षी[4]-
स्मितमुख उदयातें मानिता होय साक्षी ।
मग शिथिलित वाचे नोक्त साशंक्यमानें,
स्पृशति [5]पुंकलभाजें [6]पाणिपंकेरुहानें[7]. ॥ ३०
[8]कां रे [9]विधू मृगदृशामुख अद्वितीय, कंदर्प दर्प न [10]दृगंबुज नान्यदीय, ।
झंकारसी मधुकरा! तनु तप्त होय, कर्मासि धिग्, न वपु ईदृश दृष्ट होय[11]. ॥३१
[12]कामाचे धनु ते [13]क्षुरप्र मनसीं भ्रूवल्लि नेत्रोत्पळें
तें पैं वक्त्र दृगंचलासि मिनलें चांचल्य मत्स्यागळें, ।
चंद्राचा उदयो प्रकाश मिरवे अन्यांगना पाहिना,
तन्वंगीप्रति भूलला पति तदां कोठें कदां जाइनों[14]. ॥ ३२
[15]हातीं जों ध्वनि कंकणें न करिती, नाचेत ना भूषणें,
जों तारासम दृष्टि निश्चळ नसे तों काय तें पाहणें ? ।
नाहीं कांपविलें उरोजवसना, तों भेद नोहे रते,
त्वन्नामस्मरणें करूनि [16]पुंलकारंभो समुज्जृंभते[17]. ॥ ३३
[18]मुक्ताहार स्तनगिरिं नसे, कंकणें नैव हातीं,
कर्णीं स्वर्णाभरण न दिसे देखिलें आजि रातीं; ।
स्वप्नामध्यें बकुल[19]मुकुला भूषणीं जो वसे तो,
कोण्या चोरें हृदय हरिलें, त्यासि जोडा नसे [20]तो. ॥ ३४
[21]नीवी हरी, स्तनतटीं [22]लिहिलें नखानें, बिंबाधरीं दशनदंश दिसेति मानें, ।
ऐसें विलेखित पटीं दयिता विलोकी, बाला पुरे वनजहारविहार [23]शंकी. ॥३५
[24]चित्ता! चंचळता त्यजीं, प्रियसखी! लज्जे! न पीडीं कदां,
भ्राते! लोचन हो! निमेष भगवान् पाहों न दीजे सदा, ।

---

१. 'प्रतिफलममृतांशोः' इत्यादि ११६ वा श्लोक पहा. २. प्रतिबिंब. ३. चंद्राचें. ४. मालिनीवृत्त. ५. रोमांचयुक्त. ६. हस्तकमलानें. ७. यांत कायिकव्यापारद्योतक उन्मादवर्णन आहे. ८. 'किं रे विधो मृगदृशो' इत्यादि ११७ वा श्लोक पहा. ९. चंद्र. १०. नेत्रकमल. ११. यांत वाचिकोन्मादवर्णन आहे. १२. 'कोदंडं विशिखो मनो' इत्यादि ११८ वा श्लोक पहा. १३. बाण. १४. यांत व्याधिवर्णन आहे. १५. 'पाणिर्नीरवकंकणं' इत्यादि ११९ वा श्लोक पहा. १६. रोमांचोद्गम होतो. १७. यांत जडतावर्णन आहे. १८. 'मुक्ताहारं न च कुचगिरेः' इत्यादि १२० वा श्लोक पहा. १९. कळा, कळी. २०. यांत स्वप्नदर्शनवर्णन आहे. २१. 'नीवीं हरेदुरसिजं' इत्यादि १२१ वा श्लोक पहा. २२. ओरखाडलें. २३. यांत चित्रदर्शनवर्णन आहे. २४. 'चेतश्चंचलतां त्यज' इत्यादि १२२ वा श्लोक पहा.

पिच्छें मूर्धनि[1], पंकजें श्रुतिपुटीं[2], [3]वंशी विराजे करीं, ।
तो **दा**मोदर दृष्टिगोचर असो सर्वज्ञ सर्वांतरीं[4]. ॥ ३६

## उपसंहार.

### विद्वज्जनप्रार्थना.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

म्यां[5] केली 'रसमंजरी'वरि टिका, माधुर्य ईचें पहा,
दोषां[6] सर्व करा क्षमा चतुर हो! सर्वज्ञ तुम्ही अहां, ।
ऐसें प्रार्थितसे **म**हाकवि तया कर्णीं करा भूषणें,
पूर्णत्वें करिजे दया मजवरी नालोकिजे दूषणें. ॥ १

स्वस्ति **श्री**नृपशालिवाहनशके धर्माभ्र सोळा (१६०१) महा
**चै**त्रादि **प्र**भवाब्द **वि**ठ्ठल म्हणे [7]नंदत्रिभू[8] (१३९) ग्रंथ हा, ।
श्रीमत्**कौ**[9]शिक गोत्र, काव्य रचिलें **शा**हागडीं पांहणें[10],
**श्री**शृंगारलता नवाब्धि[11] (४९) तिसरा उल्लास हा वाचणें. ॥ २

---

## [12]पांचालीस्तवन.

(श्लोक.)

कथेच्या प्रारंभीं **ग**णपतिपदांभोजकवळे,
प्रसंगा वाग्देवी स्तवुनि गुरुपादीं मन मिळे; ।
**म**ऱ्हाष्ट्री हे भाषा नवरसिक संक्षेपवचना,
वदे **व्या**सोच्छिष्ट प्रतियमक गीर्वाण रचना. ॥ १

गुणज्ञीं वाचावी नवरसिक ती **भा**रतकथा,
**स**भापर्वीं 'वस्त्राहरण' कथिलें तोचि उलथा[13]; ।

---

१. मस्तकावर. २. कानांवर. ३. मुरली. ४. यांत साक्षाद्दर्शनवर्णन आहे. ५. भानुदासानें. (कचित् भानुदत्तमिश्र असेंही कविनाम आढळतें.) 'माध्वीकस्यंदसंदोह सुंदरी' इत्यादि १२३ वा श्लोक पहा. ६. 'दोषां सर्व खरा परी चतुर हो' असाही पाठ आहे. ७. नंद=नऊ. ['नवसंख्या नंदरंध्रनिधिगोंऽकनभश्वराः । १२ संज्ञाप्रकरण, मुहूर्तमाला-पृष्ठ ५.] ८. भू=एक. ['एकं भूमिरिंदुरूपम्' मुहूर्तमाला-पृष्ठ ५.] ९. मागें पृष्ठें ६४, १२६ व १७५ हीं पहा. यांत कवीनें आपल्याविषयीं कांहीं माहिती दिली आहे. १०. 'राहणें' असाही पाठ आहे. ११. अब्धि=चार. ['चत्वारोऽब्धिश्रुतियुगकृताः' मुहूर्तमाला-पृष्ठ ५.] १२. या काव्यांत सभापर्वांतील सुप्रसिद्ध वस्त्राहरणप्रसंगीं द्रौपदीनें केलेला कृष्णस्तव (धांवा) आहे. १३. भाषांतर. पृष्ठ १५ श्लोक १० वा यांत हाच शब्द ('उलथा') योजिला आहे.

सदा सेवी दीव्यांवर हरिकथा दोषहरणीं,
रुची छंदामध्यें **'यमनसभला गः शिखरिणी'**.[1] ॥ २

**कुरुश्रेष्ठें**[2] पाचारुनि **शकुनियां** मंत्र पुसिला,
पुढें **इंद्रप्रस्था**प्रति **विदुर** जाऊनि वहिला; ।
पुन्हा आला **पांडु**नृपकुमर घेऊनि सरिसा,[3]
कळेना कर्माची गति गहन[4] होणार[5] परिसा. ॥ ३

जिनें सारी जीती नृपकपट फांसे करुनियां,
पडे हारी **धर्मा** प्रभुविभव नेलें हरुनियां; ।
सभे नेली **कृष्णा**,[6] तिस कठिण **दुर्योधन** वदे,
'वधू होई जानूवरिच बस ये स्वानुभव दे.' ॥ ४

**कुरुश्रेष्ठा** दुष्टाप्रति वचन बोले **द्रुपदजा**,
'मदांधा! पांचांचें भय न धरिसी उन्मत गजा; ।
मृगेंद्रांची मुग्धा[7] परणिन[8] म्हणे जंबुक[9] बळें
गदा बैसे मांडीवरि नवरि केळावलि बळें.' ॥ ५

नृपावक्षस्थानीं अतिकठिन वाग्बाण भरले,
विदारी सर्वांगे परि तिजवरी खड्ग न चले; ।
प्रबोधी बंधूतें, 'कुच धरुनियां नग्न करणें
प्रिया हे पांचांची, किमपि न इची भीड धरणें.' ॥ ६

प्रभू **भीष्मद्रोणा**दिक परम धार्मीक वदती,
'अहो! जी **गांधारा**! वचन अवधारा[10] दृढमती ।
सती ही **पांचाली** कुल सकल जाळील नृपती!
सभेमध्यें वस्त्राहरण कथिलें निंद्य जगतीं.' ॥ ७

वनीं जैशी धेनू विपिनिं[11] परिवारें गवसिली,
तशी ते **पांचाली** शरण वनमाळी[12] विनटली.[13] ।

---

१. या श्लोकाचें वृत्त 'शिखरिणी' आहे व यांत य, म, न, स आणि भ गण, एक लघु अक्षर व एक गुरु अक्षर अशी रचना असते. सहाव्या व सातव्या अक्षरांवर यति असून एकंदर सतरा अक्षरें असतात. २. दुर्योधनानें. ३. लौकर, एकदम. ४. दुर्गम्य, अज्ञेय. ५. भावी गोष्ट. ६. कृष्णा=द्रौपदी; कृष्ण=केशव; कृष्ण=अर्जुन; कृष्ण=व्यास (सत्यवतीपुत्र). ['**कृष्णः** सत्यवतीपुत्रे वायसे केशवेऽर्जुने । **कृष्णा** स्याद्द्रौपदीनीलीकणाद्राक्षासु योषिति । मेचके वाच्यलिंगः स्यात् क्लीबे मरिचलोहयोः' इति विश्वः.] ७. सुंदर युवति. ८. परिणय करीन, विवाह करीन. ९. कोल्हा. १०. ऐका. ११. अरण्यांत. १२. श्रीकृष्णाला. १३. गेली.

पढे स्तोत्रीं, 'कृष्णा! नरहरि! तुवां जी! प्रगटिजे,
हरी वस्त्रें दुःशासन तरिच दुःशासन[1] किजे. ॥ ८
मुकुंदा! गोविंदा! प्रभु विभु हरी! पद्मनयंना!
हृषीकेशा! लक्ष्मीपति! मधुरिपू! दैत्यदलना! ।
त्वरें पावें कृष्णा! अभयवरदा! सत्य करणें
चकोरी मी कृष्णा! अमृतकर[2] तूझें प्रसरणें. ॥ ९
प्रतिज्ञेच्या पाशीं दृढ गवसिले पांडव बळी,
दयाब्धी! सांभाळीं भगिनि तुझि अत्यंत दुबळी; ।
.............................................

जळामध्यें किंवा कमळिणिस कंजी वुरदळी. ॥ १०
गजेंद्रें[3] प्रऱ्हादें[4] स्तवन करितां पावसि मनीं,
कनिष्ठिकें[5] गोवर्धन[6] उचलिला त्वां लघुपणीं; ।
कृपासिंधो! बंधो! यदुपति! भुजंगेंद्रशयना[7]!
न येसी, तैं प्राणा त्यजिन करुणांभोजनयना[8]! ॥ ११
जळाब्धी पाषाणीं बुजुनि कपि[9] पायीं उतरले,
प्रतापें लंकेशादिक दनुजता[10] क्रूर दमिले; ।
तुवां नेली रात्री मधुपुरिवरी द्वारवतिसी[11],
तुं माझा कैवारी, विसरसिल केंवी विनतिसी? ॥ १२
अनंतें ब्रह्मांडें वसति तुझिया रोमविवरीं,
अनंताचे[12] तल्पीं[13] पहुडसि[14] सुधासिंधुजठरीं; ।
अनंता हे कूर्माकृति[15] धरुनि पृष्ठीस धरिली,
अनंतात्मारामा! त्रिभुवन गुढी त्वां उभविली. ॥ १३
जळीं तूं पाषाणीं गगनपटळीं भूतळवटीं,
समस्तीं सर्वा त्या अखिल[16] वससी तूं घटमटीं; ।
तुझें येणें जाणें भ्रम सकळ मिथ्यामय दिसे,
कळेना वेदांता, तुजविण रिता ठाव न दिसे. ॥ १४

---

१. वाईट शिक्षा, कडक शिक्षा. २. चंद्र. ३. पृ० ७९ टीप ७ पहा. ४. पृ० ७९ टीप ८ पहा. ५. अंगुळीनें. ६. पृ० १४० टीप १९ पहा. ७. शेषशयना. ८. दयापूर्णकमलनेत्रा! ९. वानर. १०. राक्षसांचे समूह. ११. पृ० १७१ टीप ८ पहा. १२. शेषाचे. १३. तल्प=बिछाना, शयन. १४. निजतोस. १५. कूर्म=कांसव. १६. सर्व.

रिता होता पूर्वी तव पदजळें सिंधु भरिला,
तुझा नामीका त्या फणिपतिविषज्वाळ शमला; ।
अहल्या उद्धारा सकळ जगदोद्धारक मठा,
त्वरें धांवें पावें द्रुपदतनयेच्या स्तवपटा.' ॥ १५

पांचाळी निरि ओढितां दचकली, कृष्णा सभे भीयली,
'बापा ! धांव मला विपत्ति घडली वैरीसभा थाटली; ।
भर्तारें[1] उगलीच शांति धरिली, शूरक्रिया[2] टाकिली,
हे लज्जा तुजला तुझी बहिणुली दुःशासनें गांजिली. ॥ १६
गजेंद्रें[3] आकांतीं स्मरण करितां शोक हरिला,
दयाब्धी ! प्रल्हादें[4] स्तवन करितां स्तंभ[5] चिरला; ।
व्रजासाठीं गोवर्धन[6] उचलिला, त्वां जिवविली,
विचित्रें पांचाळीप्रति अमुप वस्त्रें पुरविलीं.' ॥ १७
हृदिस्थानीं आयूर्भज्ञनि मग मूर्ति प्रगटली,
चमत्कारें ध्यानीं न वदत, असे स्तब्ध उगली; ।
हरी जेव्हां दुःशासन वसन[7] तेव्हां सुनयना
प्रभू साक्षात्कारें वसति तिचिया निर्भयपणा. ॥ १८
नृपाज्ञेनें दुःशासन वसन नीच स्थळिं करी,
दुजें देखे दिव्यांबर परि चमत्कार न धरी; ।
बळें ओढी तेव्हां वसन दुसरें भीतरिं[8] असे,
विचित्रा वस्त्रांचे ढिग पसरिले पर्वत जसे. ॥ १९
पुन्हा तेजूं[9] लागे तंव तिजकडे पाश शमले,
सभेमध्यें भीमार्जुन परम कोपें खवळले; ।
तयां वारी धर्मप्रभु मग विचारोनि नयनीं,
'उगे राहा यांतें अपशकुन होईल शकुनी. ॥ २०
प्रसन्न श्रीनारायण जवळि जन्मांतर ऋणी
असें जें हें केलें सुकृत न सरे धन्य असुनी, ।
उषःकाळीं[10] ज्याचें स्मरण करितां दोष हरती,
म्हणोनीयां सांगे हरिसि विनटावें दृढ मती.' ॥ २१

---

१. भ्रतारें. २. पराक्रम, शौर्य. ३. पृ० ७९ टीप ७ पहा. ४. पृ० ७९ टीप ८ पहा. ५. खांब. स्तंभ=stump. ६. पृ० १४० टीप १९ पहा. ७. वस्त्र. ८. आंत. ९. सजूं. १०. प्रातःकाळीं.

[1]शके **आनंदाब्दीं** [2]रसनिधिइषूभू (१५९६) इह वने
वसेता चक्रांतीं प्रथम विधि [3]पीयूषवचनें।
अलंकारा ग्रंथीं सुरस यमकें पद्यरचना
[4]**अनंताच्या** पुत्रें प्रचुर विनवी पंडित जना. ॥ २२
[5]सहस्त्रा ग्रामांचा **बिड** परगणा, **चो**हटपुरी
तयामध्यें **गौ**रीपुरिस रचिला ग्रंथ चतुरी, ।
पढे जो **'पांचाळीस्तवन'** सुकृती तेच पदवी
कथा हे संपूर्ण प्रगट विनवी **विठ्ठल** कवी. ॥ २३

---

## [6]कबीरकथा.

(गीतिवृत्त.)

श्री**राम**चरण वंदुनि रचितों **'कबिराख्यसंतचरिता'**तें; ।
न्यून्याधिक्यसहितही रुचतें [7]शिशुवाक्य [8]साधुचरितातें. ॥ १
[9]संतचरित्रें गाती ऐकति, ते धन्य धन्य मान्य जनीं, ।
श्री**राम**चंद्रनामस्मरण जयाचे मुखीं [10]दिवांरजनी. ॥ २
यवन **क**बिर या नामें मोमिन **ह**रिभक्त मान्य [11]विश्वासी; ।
**का**शीवास करुनि तो श्रीहरिगुरुभक्तिमाजि [12]विश्वासी. ॥ ३
[13]**रा**मानंद गुरूची आज्ञा वंदूनि भजतसे **रामा**, ।

---

१. शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ह्या वर्षीं विठ्ठलानें हें काव्य केलें. २. रस=सहा, निधि=नऊ; इषु=पांच; भू=एक. [मुहूर्तमाला–पृष्ठ ५.] ३. अमृतवचनें. ४. विठ्ठलाच्या पित्याचें नांव अनंत असावें असें दिसतें. ५. पृ० ६४ श्लोक ४६-४७, पृ० १२६-१२७ श्लोक १-२, पृ० १७५ श्लोक ४ पहा. ६. हा एक महान् साधू होऊन गेला. ह्याचा जन्म शके १०७० त काशींत झाला व शके १३७०त मगर येथें मरण पावला. ह्याच्या गुरुचें नांव रामानंद. ह्याचे श्रुतगोपाळ व धर्मदास हे दोघे पट्टशिष्य होते. ह्यानें 'शुकनिधान' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याशिवाय पदें व दोहरेही अनेक आहेत. हा मरण पावला त्या वेळेस त्याच्या अर्ध्या देहाच्या तुळशी व अर्ध्या देहाचा सबजा झाला. साधुसंतांस भोजन देण्यासाठीं एका सावकाराकडे आपली स्त्री गहाण ठेविली-इत्यादि आख्यायिका प्रसिद्धच आहेत. (भक्तविजय अध्याय ५-६ पहा.) ७. बाळक, तोक. ८. सदाचारसंपन्नजनातें. ९. साधूंचीं चरित्रें. १०. रात्रंदिवस. ११. जगाला. १२. विश्वास ठेवी, भरंवसा ठेवी. १३. हा कबीर, व ज्ञानेश्वर निवृत्ति इत्यादिकांचा बाप विठ्ठलपंत, यांचा गुरु. यानें **'आनंद'** नांवाचा नवा सांप्रदाय काढिला, तो उत्तर हिंदुस्थानांत चालू आहे. हा मोठा विद्वान् होता.

**रा**माविण सुख नेणे [१]तोही, त्याची तसीच ते [२]रामा. ॥ ४
एका दो तीं दिवशीं विणुनि विकी, तूलतंतु नव सेला, ।
तेणें प्रपंच बरवा करुनि धरी **राम**भक्तिहौसेला. ॥ ५
[३]अभ्यागत गृहिं येतां तोषवुनी त्यासि अन्नदानानें, ।
भोजन करुनी अथवा रक्षी [४]स्वतनूस तोय[५]पानानें. ॥ ६
या परिची धरि नि[६]ष्ठा ते सत्य [७]मृषा पहावया **रा**में ।
सहस्र बैराग्यांचीं रचिलीं रूपें [८]प्रगल्भ [९]अभिरामें. ॥ ७
तीलक, टोप्या, माळा, कंठिसहित्या विचित्र गोधडिया, ।
पवित्र भिक्षापात्रें, सोंटे, ज्यालागिं शोभती कडिया. ॥ ८
यापरि सहस्र संख्या दिवसांतीं पातले [१०]**क**बिरसदनीं, ।
मागति भिक्षा, बोलति **रा**माचें नाम [११]चारुतर वदनीं. ॥ ९
'बहुत असों उपवासी, दे अन्नालागिं दातिया! [१२]करुण; ।
दाता त्यासचि वदती [१३]भूतांची ज्यास येतसे [१४]करुण.' ॥ १०
यापरि भक्तशिरोमणि त्यांच्या वाक्यें [१५]संखिन्न बहु झाला, ।
परि सत्कर्मी कांता सुत किंवा निज शरीर तृण झाला. ॥ ११
सदनिं विचारुनि पाहतां, कण धान्याचा नसे, रुका अडका, ।
निश्चय परंतु **रा**मीं देइल त्यालागिं तो पडूं नड कां? ॥ १२
शेट[१६] नगर या नामें नगरीं धनिकाढ्य मान्य विपुल धनी, ।
[१७]हाटामाजि [१८]दुकानें सकळ फिरुनि जाय त्याचिया सदनीं. ॥ १३
वृत्तांत तापसांचा **क**बिरें संपूर्ण घालितां कानीं, ।
निर्धन समजुनि उत्तर केलें त्यालागिं काय धनिकांनीं. ॥ १४
'कांता [१९]मनोज्ञ तूझी शयनार्थी आजी येथ मज द्यावी, ।
काय [२०]अपेक्षित तुजला ते सामग्री गृहीं सुखें न्यावी.' ॥ १५
ऐकुनि वचन तयाचें, उत्तर त्यालागिं **क**बिर काय करी? ।
'शपथपुरःसर याचे देतों आणोनि [२१]योषितेसि करीं.' ॥ १६

---

१. तो कबीर. २. स्त्री, बायको. ३. पाहुणा. ४. आपल्या देहाला. ५. पाणी पिऊन. ६. भक्ती. ७. खोटी, असत्य. ८. शूर, प्रौढ. ९. मनोहरें. १०. कबिराच्या घरीं. ११. सुंदरतर. १२. कृपेनें, कृपा करून. १३. प्राणिमात्रांची. १४. दया. या अर्थात कवीनें 'दाता' कोणास म्हणावें हें सांगितलें आहे. १५. दुःखित. 'सखेद' असाही अन्य पाठ आहे. १६. वृत्तासाठीं 'शेट नगर' असा 'नगरशेट' या शब्दांमध्यें फेरफार केलेला आहे. १७. बाजारांत. १८. हा शब्द फारसी आहे. १९. सुंदर. २०. पाहिजे असेल तें, इष्ट, वांछित. २१. स्त्रियेसी.

कबिरमुखांतुनि वाणी ऐकुनि संतोषि होय बहु वाणी. ।
गुणहि तयाचे वानी, बोले कबिरासि 'काय तुज वाणी[1]?' ॥ १७
कणीक, तंदुळ, घृत, गुळ, डाळ, सिता[2] चिंच, मीठ, मिरें[3]शेंगा, ।
शाखा भाज्या बहुविध वृंत्ताकें[4] भोंपळे मुळे शेंगा. ॥ १८
स्वकीय दासांकरवीं वृषभांवरि[5] वाहुनी बहुत गोणी ।
मस्तकिं गोणी कोणी घेती, पाठीवरी करीं कोणीं. ॥ १९
विपुल भरुनि सामुग्री पाठवितो साहुकार कबिरघरा. ।
'अति मान अतीतांतें[6], दे वाढुनि,' सर्व वदत पाककरा[7]. ॥ २०
भोजन करुनि तपस्वी झाले संतृप्त सर्वही ज्ञानी, ।
पुढिल कथासंदर्भी द्यावें अवधान[8] सर्व सुज्ञांनीं. ॥ २१
कांतेप्रति एकांतीं निवेदिलें वृत्त, सर्वही कबिरें, ।
पतिव्रता प्रत्युत्तर दे यतिलागोनि योग्य बहुत बरें. ॥ २२
'परपुरुषासी[9] रमतां, घडतो व्यभिचार बोलती लोकीं. ।
आज्ञांकित मी तुमची धर्माधर्मार्थसार अविलोकीं.' ॥ २३
कबिर वदतसे, 'ललने! सर्व घटीं एक राम अवतरला, ।
हे खुण जाणुनि वर्ते, सहजसुखें तोचि एक भव[10] तरला. ॥ २४
जो कां माझे हृदयीं तोचि वसे राम हृदयिं धनिकाच्या, ।
यास्तव लौकिकरीती कां तूं धरितेस सांग मनिं काच्या?' ॥ २५
यापरि विवेक वदतां, ते स्त्री सोडूनि सकळ [11]संदेहा ।
कांता पतितें वंदुनि शृंगारी सांग आपुल्या देहा. ॥ २६
निशीर्धसमयीं[12] जलधर[13] धारा वर्षे महा शिळा धारी, ।
स्त्रीतें [14]स्कंधीं वाहुनि धनिकगृहा जाय कबिर आंधारीं. ॥ २७
शय्योपभोगरचना रचुनि बसे, [15]मंदिरांत परदारी[16] ।
कामांध वाट पाहे, तरि बाहिर पाय वाजती दारीं. ॥ २८

---

१. कमतरता. २. साखर. ३. मिरच्या. ४. वाटोळे. ५. वृषभ=बैल. ६. अतिथींतें. ७. स्वयंपाक करणाऱ्याला, आचाऱ्याला. ८. लक्ष्य, ध्यान. ९. ह्या अर्धात व्यभिचार कशाला म्हणतात हें सांगितलें आहे. १०. संसार. ११. संशयाला. १२. मध्यरात्रीस. १३. मेघ. १४. खांद्यावरून. १५. बैठक, दिवाणखाना. ['मंदिरं नगरेऽगारे मंदिरो मकरालये' इति विश्वः.] १६. परके स्त्रीशीं गमन करणारा, व्यभिचारी.

धनिक द्वारि पहातां कांतेसहवर्तमान कबिर खरा, ।
त्यासि विचारुनि तीतें नेउनि महालांत दावितो नखरा. ॥ २९
धनिकगृहीं निज रमणी पावुनि मग जाय, कबिर गेहातें, ।
श्रीरामीं संकट तैं पडतां धरि, कोतवाल[1]देहातें. ॥ ३०
जाउनि धनाढ्यसदना द्वार उघडवी, दुरंत[2] संतापें, ।
अंत:पुरांत रिघतां धनिक विलोकूनि थरथरां कांपे. ॥ ३१
'कवण वधू कवणाची?' पुसतां धनिकास; लाजला[3], भ्याला, ।
नृपपुरुषातें विनवी, 'स्वामी! करुं काय दैवलभ्याला[4]?' ॥ ३२
क्रोधें त्रासुनि वदतां तो लागे कोतवाल[1]चरणासीं, ।
'अपराधी अपराधी चुकलों, मी योग्य होय मरणासी.' ॥ ३३
यापरि विनवित असतां, आज्ञापी कोतवाल धनिकासी, ।
वंदूनि या सतीतें, 'वद वद इस मान जान्हवी कासी.' ॥ ३४
तद्वाक्यें त्या धनिकें नमितां साष्टांग दिव्य पदपद्मा[5], ।
मग नृपकिंकर[6] बोले, 'हे स्त्री पावोनि[7] दे इच्या सद्मा[8].' ॥ ३५
श्रवण करूनि तदाज्ञा स्कंधीं वाहूनि साधुकबिरसती, ।
नृपपुरुषासह पोंचवी पतिसन्निध तेथ जे तिची वसती. ॥ ३६
पति कांतेस विचारी, 'कां तूं आलीस दुर्ग गे! चंडी?' ।
उत्तर करि धनिक तदां, 'आणिलि मी, कोतवाल मज दंडी[9].' ॥ ३७
कबिर वदे, 'मी अपुली स्त्री देतां कोतवाल काय करी? ।
दावा मज तो कोठें?' म्हणुनि धनाढ्यासमीप धरित करीं. ॥ ३८
कबिर धनाढ्यहि दोघे जाती ग्रामस्थ[10] कोतवालघरा, ।
त्यातें कबिर विचारी, 'कां या धनिकासि गांजिसी, चतुरा!? ॥ ३९
मी अपुलि स्त्री देतां काय तुझें सांग येथ जात असे?' ।
तो बोले, 'मजलागीं यांतिल तिळमात्र ठाउकेंचि नसे.' ॥ ४०

---

१. हा समास चिंतनीय आहे. २. ज्या रागाचा वाईट परिणाम होईल अशा रागानें. ३. येथें 'कारकदीपक' नामक अलंकार आहे. ४. दैवानें प्राप्त झालेल्या वस्तूला. ५. चरणकमळास. ६. राजसेवक. किं करोमि कुर्याम् वा इति स्वामिनं पृच्छति इति किंकरः। अथवा कुत्सितं करोति इति. 'काय करूं महाराज' असें विचारणारा सेवादक्ष चाकर याला किंकर म्हणावें. किंवा जो काम नीट करीत नाहीं, कारण चाकरच तो, म्हणूनही त्याला किंकर म्हणावें. ७. पोंचवून दे. ८. घरास. ९. शिक्षा करी. १०. गांवांत राहणारा.

तत्क्षणिं कबिर विचारी चित्तीं, 'आश्चर्य! काय हें झालें?' ।
चरित रघूरायाचें सत्य तयातें मनीं कळों आलें. ॥ ४१
मग बहुत खिन्न चित्तें श्रीरामाच्या करीतसे स्तवना, ।
'स्वामी! तूं धनिकासी दर्शन देऊनि हरिसि[1] पापवना. ॥ ४२
मजनिमित्त अन्यातें श्रीरामा! भेटलाभ तूं देशी, ।
बापा! मज कां त्यजिसी? तुजविण मी हीन दीन परदेशी.' ॥ ४३
रामस्तवन करुनि त्या धनिकालागूनि पावत्री[2] सदनीं, ।
त्यातें वंदुनि निजगृहिं आला हरिभक्त राम धरि वदनीं. ॥ ४४
यापरि दोघे बोलुनि जातां बाहेर कोतवाल नसे, ।
नसती बैरागीही, श्रीहरिमायाच पाहतां विलसे[3]. ॥ ४५
यांपरिचे[4] ते साधू सर्वहि भूतीं समान मति करुणा ।
विठ्ठल मानसिं त्यातें धरुनि तयाच्याचि वंदितों चरणा. ॥ ४६

---

# पदसंग्रह.

## भक्तिपर पदें.

### पद १ लें.

गजवदना तुम्हि स्मरा स्मरा । मनिं भाव धरुनियां बरा. ॥ ध्रुवपद. ॥
तो नव सुरपति आणुनियां मति देतो मुक्ति सत्वरा ।
विद्या सकळिक आकळि जन सिद्धी येतसे घरा ॥ गजवदना० ॥ १ ॥
एकदंत गणराज गजानन शोभे मुक्ति सुंदरा ।
जोडुनियां कर विठ्ठल बोले, 'धांव पाव ईश्वरा!' ॥ गजवदना० ॥ २ ॥

### पद २ रें.

प्रपंच विषयीं बहुत त्रासलों 'तारीं राघवा! मला' ।
सकळ जन लौकिकार्थ समजला. ॥ ध्रुवपद. ॥
बाळपणीं अज्ञान बुद्धिला हितानहित नाकळे ।
सदा नाकांतुन शेंबुड गळे ॥

---

१. 'दहसि' असा अन्य पाठ आहे. २. पोंचवी. ३. शोभे. ४. 'ते या परीच साधू' असा अन्य पाठ आहे. ५. पृष्ठ ३९ टीप १० पहा.

काांहीं समज होतां, खेळा पोरापाठीं पळे ।
घरचि हडकितां दिवस मावळे ॥
लोणपाटविटुदांडुलगोऱ्यांमाजि काळ दवडिला. । सकळ० ॥ १ ॥
तरुणपणीं धनदाराविषयीं चित्त जाहलें पिसें ।
टवाळ्या खेळ मस्करी हंसें ॥
परोपरी कौशल्य वाढलें, शृंगारादीसें ।
तुझ्या नामाला कोण पुसे? ॥
मोहमदें स्वच्छंदें रंगुनि स्वहित जीव विसरला. । सकळ० ॥ २ ॥
वृद्धपणीं बहु दमा खोकला बडक्कीं लाळ गळे ।
बोथरें तोंड, डोळे पींवळे ॥
सुना म्हणती, 'मेला म्हातारा कोणी उठवा बळें' ।
पुत्र गांजिती जसे कावळे ॥
भ्रांति बुद्धिला पडुनि मनीं संसार हेतु अडकला. । सकळ० ॥ ३ ॥
अशा संकटीं पाहुनी रामा! तुझे लागलों पायीं ।
अजुनि तरि डोळे झांकसी कायी? ॥
कधीं [1]हंस जाइल ही नकळे, धाक न कोठें कायी ।
उघडुनी कृपादृष्टीनें पाहीं ॥
घेई छंद विठ्ठलनामाचा हेंचि मागणें तुला. । सकळ० ॥ ४ ॥

## पद २ रें.

नमिली जगदंबा दुर्गा शांता । परमात्मकांता ।
साक्षीत्वंग प्रतिपादित वेदांता । प्रियवरदा दांता. ॥ ध्रुवपद. ॥
ब्राह्मी हरिललना गिरिजा काली । हे संज्ञा काली ।
तत्कालोचित मर्यादा पाळी । पाळोनि निराळी ॥ नमिली० ॥ १ ॥
[2]भ्रूलीला प्रकटित मात्रें जगती । निगमश्रुति वदती ।
जे कां भक्तांला दे निज गती । कसी विसरूं मग ती ॥ नमिली० ॥२॥
[3]सर्गस्थितिलयकर निर्जरधात्री । निरुपमित सुगात्री ।
जे विलसे निजभजकमुखीं दिनरात्री । विठ्ठल वरदात्री. ॥ नमिली० ॥३॥

---

१. उपहास, विडंबना. २. नेत्रकटाक्ष. ३. उत्पत्ति, पालन आणि नाश करणारी. ४. देवमाता. ५. इच्छित देणारी.

### पद ४ थें.

पंढरीला जावें भावें ।
कटि कर समपद विमल विटेवरी परब्रह्म वंदावें. ॥ ध्रुवपद. ॥
ज्ञानचंद्रभागामृतडोहीं । निःसंदेह नहावें. ॥ पंढरीला० ॥ १ ॥
पांडुरंगपदपद्मसुधामृत- । पानें स्वस्थ रहावें. ॥ पंढरीला० ॥ २ ॥
परमानंदपरात्परमंदिरीं । विठ्ठलरूप पहावें. ॥ पंढरीला० ॥ ३ ॥

### पद ५ वें.

माझे विठ्ठले! माउले! । दाखवीं निज पाउलें ॥ ध्रुवपद. ॥
ध्वजवज्रांकुशरेखा शोभती । तोडर पदीं मिरवले ॥ माझे० ॥ १ ॥
पीतवसन कटीं करकंकणीं । कंठीं कौस्तुभ डोले ॥ माझे० ॥ २ ॥
विठ्ठल श्रीमुख पाहतां धरणीवरी । आनंदद्रव सुटले. ॥ माझे० ॥३॥

### पद ६ वें.

राMनाम वारी । हित दलन शार्ङ्ग शर कलन सुपथ संचलन रुचिरतर [1]नलिननयनयुग राम ॥ ध्रुवपद. ॥
वीरवर्य रणधीर नीलनवनीरद[2] नभगंभीर गुणालय [3]हीरकरदन [4]समीरकुमर-सख [5]नीरजवदन [6]शरीररुचि सुभग राम ॥ राम० ॥ १ ॥
[7]मंदहसन [8]वृंदारकवरद नंदनादि मुनि मंदुनि करिं [9]मंदार मंद रत विठ्ठल प्रियानंदकंदलग पूर्णमनोभिराम. ॥ राम० ॥ २ ॥

### पद ७ वें.

ये ये ये ये ये ये दीनबंधो! कृपासिंधो! आज ।
मी बहुत श्रमतसें धांव, तुझी जाताहे लाज ।
मज नयनीं पाहसी दीन; किती मी देऊं [10]वांज? ।
बहु विनविला परि हरि! 'न चळे तिळभरि लाज.' ॥ ध्रुवपद. ॥
पशुच बरा द्विज दराज विन उन करुनि घे काज ।
[11]गणिकादिक किति निवडूं दुष्कृति [12]जंतु समाज ।

---

१. कमळाप्रमाणें ज्याला दोन नेत्र आहेत असा. (राम.) २. मेघ. ३. हिऱ्याप्रमाणें ज्याचे दंत आहेत असा. ४. मारुतीचा मित्र. ५. कमलवदन. ६. देहकांति. ७. स्मित करणारा. ८. देवांतें वर देणारा. ९. कल्पवृक्ष, इच्छित वस्तु देणारा वृक्ष. १०. बोभाट. ११. पृष्ठ ५९ टीप २ पहा. १२. प्राणी.

दुष्टमंदभजकवृंदें[1] तारिसी होउनि जहाज ।
पाहिं पाहिं पाहिं रमानायक! सुरराजराज! ॥ ये ये० ॥ १ ॥
दनुजमुनिहरिसिमाजविक्रमविलबलाक बाज ।
धरिसी करीं सतत महाराजाधिराज ।
सुखकर विधिहरनुत[2] वर देसी मुक्ति तेचि भाज[3] ।
परि हरि विठ्ठलासी पदपद्मसुधापान पाज. ॥ ये ये० ॥ २ ॥

## पद ८ वें.

रामा! कृष्णा! गोविंदा! विठ्ठला! मधुसूदना! तूं येईं रे! ॥ध्रुवपद.॥
अनुदिनीं वदनीं जपतों भावें । वारीं या भवमोहा रे! ॥ रामा० ॥ १ ॥
विठ्ठल प्रार्थितसे बहु तुजला । शाश्वत पदवी[4] देईं रे! ॥ रामा० ॥ २ ॥

## पद ९ वें.

ब्रह्म गोकुळांत वागतें । नंदयशोदांगणीं रांगतें. ॥ ध्रुवपद. ॥
ध्यानीं ध्याती शंभूविधी । तेचि गोपिकांतें शोधी ।
पयदधिनवनीत[5] मागतें. ॥ ब्रह्म० ॥ १ ॥
घेवोनी कांबळी काठी । फिरे गाई वत्सांपाठीं ।
विश्व पोटीं तेचि ब्रह्म भागतें. ॥ ब्रह्म० ॥ २ ॥
अहंता दुर्घट नासूनियां । रक्षी भक्तसमुच्चया ।
विठ्ठल या नामें पूर्ण भागतें. ॥ ब्रह्म० ॥ ३ ॥

## पद १० वें.

पतितजनपावना[6]! विठ्ठला! ।
पतितजनपावना! श्रीकांत! अंत पाहसी तूं श्रमविसी मला. ॥ ध्रुवपद. ॥
त्रास बहु मनीं । क्रोधहि नाणीं ।
तुजवांचुनि मजला गति नाहीं, नाहिंसें भासतसे वो! शरण आलों कीं तुला ॥ पतित० ॥ १ ॥
'बहुत तारिले,' । साधु बोलिले ।
निष्ठुरता तुजला कसी? त्यजीं त्यजीं हे सदया! वरदा! लौकिक करणें याला. ॥ पतित० ॥ २ ॥

---

१. वृंद=समूह. २. नुत=स्तुत. ३. भार्या. ४. मुक्ति. ५. दूध+दहीं+लोणी. ६. पापी जनांस पूत (पवित्र) करणाऱ्या!

कसुनि[1] पाहसी, । भय दाविसी ।
तुझे कृपे कळलें बरें खरें खरें हें समजुनि आम्ही विठ्ठल आलंगिला.
॥ पतित० ॥ ३ ॥

**पद ११ वें.**

ये ये कृपाळा! त्वरित धांव ये ।
किति पाहसिल भजनीं भाव, स्वपदीं लाव, त्वरित धांव. ॥ ध्रुवपद. ॥
तापत्रय[2] तापति मज । सदयहृदय! हृदयीं समज ।
जनीं तुजविण करुण[3] कवण गोविंदाच्युतमाधव! ॥ ये ये० ॥ १ ॥
कामादिक काककुळें[4] । टोंचिति तनुलागिं बळें ।
सात्विकमती निकट करिती काव काव काव ॥ ये ये० ॥ २ ॥
विठ्ठलनामें भजनीं । लावुनि उद्धरशी जनीं ।
दाविं दाविं दीनाप्रति पदकैरव[5]. ॥ ये ये० ॥ ३ ॥

**पद १२ वें.**

भगवति! माते! शिवकांते! शांते! श्रमपरिहरिणी! ।
मज शुचिहृदये! सदये! ठेवीं निजचरणीं. ॥ ध्रुवपद. ॥
विषयसुखें जीव सतत पडला विस्मरणीं ।
अंध पिसा होय कसा निरत सदा चरणीं. ॥ भग० ॥ १ ॥
बहुतचि अनुसरला मूढजन मयूत मरणीं ।
करिं करुणा हा शरणागत पतितोद्धरणीं. ॥ भग० ॥ २ ॥
विठ्ठल हा आपुला लक्षुनी लावीं स्मरणीं ।
सुरवरदे[6]! सत्वर दे भक्तिसुधातरणी[7]. ॥ भग० ॥ ३ ॥

**पद १३ वें.**

श्रीशांता दुर्गा जगदंबा देखिली नयनीं ॥ ध्रुवपद. ॥
निगमसार ॐकार पंजर मराल नायिका मंदविहसनी ॥ श्रीशांता० ॥ १ ॥
लसत्कुंकुमविशालभाल मणिजालमालिनी हिमकरवदनी[8] ॥ श्रीशांता० ॥ २ ॥
नेत्रयुगीं शशि[9] मित्र[10] धरी हिमगोत्रपुत्रिका[11] चित्सुखसदनी ॥ श्रीशांता० ॥ ३ ॥

---

१. कसून पाहणें=परीक्षा घेणें. २. पृष्ठ ७६ टीप १ पहा. ३. दयाळू. ४. कावळ्यांचे समूह. ५. पादरूपी कमोदपुष्प. ६. देवांला वर देणारे. ७. नौका. ८. हिम (शीतळ) कर (किरणें) ज्याचीं आहेत त्याप्रमाणें जिचें मुख आहे ती (चंद्रानना). ९. चंद्र. १०. सूर्य. ११. हिमालय पर्वताची मुलगी (पार्वती.)

भुवनभार खरखलदल निवटुनी भक्त सुरनिकर बसवी विमानीं ॥ श्रीशांता० ॥ ४ ॥
विठ्ठल[1]नुत मणिनूपुरयुत पदपद्मभृंग [2]जनकलिमलहरणी ॥ श्रीशांता० ॥ ५ ॥

## पद १४ वें.

ये ये दयाब्धे! रामा! ये ।
ये ये कृपाब्धे! रामा! ये ये करुणाब्धे! रामा! निलया ॥ ध्रुवपद. ॥
मानीं विनती, ये विमानीं बैसुनी, अधमानीं स्तविजे किती मानी वंद्या ॥ये०॥१॥
दारासुताप्तगृहदारार्थ श्रमुनी उदारा! तत्पदीं न कदा र[3]तलों ॥ ये० ॥ २ ॥
धावें, मोहासि या वधावें, मानस हें शोधावें, शोधोनियां बोधावें देवा! ॥ये० ॥ ३ ॥
दावीं पदें स्नेहाचीं दावीं बंधक भवदा विजालीं कीं सौख्यदा विश्वपा ॥ ये० ॥४॥
कामी त्रैलोक्य जनकामीं धरुनि मति कामीं लीताक्षें बा रिकामीं न्यावीं॥ये०॥५॥
[4]जातीविहिन तुज जाती शरण, त्यासी जाती मोक्षाची देशी, जातीशून्या॥ये०॥६॥
द्यावी दृष्टी बा! अन्य या विरहित सदया! विश्ववंद्या नेछीं यावी दया ॥ये० ॥७॥
कानीं विज्ञप्ति नये कां नीर[5]जाक्षा! कां नीति नोहे या रंका निंद्य कीं ॥ ये० ॥ ८॥
लातेनें लाडी शिशुला ते जे मातेसि तुला ते अयोग्य विठ्ठलातें पाहा ॥ ये० ॥ ९ ॥

## पद १५ वें.

रामा! तुझें नाम जपतां जोडे निजसुखजोडी ।
मोडे विषयप्रीति, कोठुनी संसाराची बेडी ॥ ध्रुवपद. ॥
यज्ञादिक सत्कर्मे घडतां, घडती [6]अंतराय ।
सांगतेस्तव तेथें आणिक नामाविण तें काय? ॥ रामा० ॥ १ ॥
तीर्थे स्नानें व्रतें दानें जीं जीं पुण्यें वेदीं ।
तीं तीं नामें सहजें घडती, ऐसें वेद नि[7]वेदी ॥ रामा० ॥ २ ॥
नामामृतरस सेवुनि [8]शंकर तृप्त निरंतर झाला ।
याचिलागीं प्रेमें मस्तकीं वंदी विठ्ठल त्याला ॥ रामा० ॥ ३ ॥

---

१. विठ्ठलनामक कवीनें जिची स्तुति केली आहे ती. २. जनाचें पाप हरण करणारी. कली= पाप. [कलिः स्त्री कलिकायां ना शूराजकलहे युगे–इति मेदिनी; कलिर्विभीतके शूरे विवादेऽन्त्ययुगे युधि' इति हैमः.] 'जनकलिमलमथनी' असा अन्य पाठ आहे. ३. रममाण झालों. ४. नीच जातीचे लोक. ५. कमलनयना! ६. अडथळा, हरकत. ७. सांगे. ८. शंकरानें हालाहल प्राशन केलें तेव्हां त्याच्या अंगाचा दाह होऊं लागला तो शमन होण्यासाठीं तो 'राम'नामाचा जप करूं लागला व तेणेंकरून दाह शांत झाला–अशी कथा आहे.

### पद १६ वें.

भावें भजतां हरि लागे भक्तांपाठीं रे! ।
साधनाच्या कासया [1]आटापाटी रे! ॥ ध्रुवपद. ॥
वाणी तुकोबा नामानें नामा शिंपी रे! ।
माळी सांवत्याचे वाफे जाऊन शिंपी रे! ॥ भावें० ॥ १ ॥
दासीजनीच्या कुडचुली [2]भोणवशा लिंपी रे! ।
होऊनि दामाजीसि [3]पैंडिभार, महार होसी रे! ॥ भावें० ॥ २ ॥
बोधल्याच्या हिंडतो पाठीमागें रे! ।
गोरा कुंभारासीं मडकीं घडूं लागे रे! ॥ भावें० ॥ ३ ॥
तुळसीदासासवें तुळसी पेरूं लागे रे! ।
भागवतीं जो उद्धवासी तत्व सांगे रे! ॥ भावें० ॥ ४ ॥
चोख्यासंगें गवताच्या बांधी पेंड्या रे! ।
नरहरी सोनारासी घडिभरी सांडसदांड्या रे! ॥ भावें० ॥ ५ ॥
कबिराच्या मागाच्या फिरवी कांड्या रे! ।
एकोपंताच्या घरचा कृष्ण [4]पाणीकाव्या रे! ॥ भावें० ॥ ६ ॥
अनंत ब्रह्मांडांच्या कोटी ज्याचे पोटीं रे! ।
अगणित ऐसी भक्तजनाची कोटी रे! ॥ भावें० ॥ ७ ॥
वर्णूं जातां अगम्य महिमा मोठी रे! ।
विठ्ठलत्वें जो देतो घेतो भेटी रे! ॥ भावें० ॥ ८ ॥

### पद १७ वें.

[5]जलजलोचना! भवविमोचना! तारीं सुखघना! श्रीरामा! मजला ।
तुजविण मिथ्या मायेचा गलबला ॥ ध्रुवपद. ॥
[6]नानायोनी पर परतोनी फेर फिरुनी नरदेहा आलों ।
मोहांत मग्न झालों । शास्त्रासी नाहीं भ्यालों ।
मन माने तैसा [7]कर्दम कालविला ॥ तारीं० ॥ १ ॥
सार्थक कांहीं घडलें नाहीं, यास्तव पाहीं करुणेनें बापा! ।

---

१. श्रम. २. चुलीच्या पाठीमागील ओटा. ३. आसक्त. ४. 'श्रीएकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो । स्वकरें चंदन घांसी, गंगेचें पाणि कावडी भरितो.' ॥ मोरोपंत. ५.कमलनयना! ६. चौऱ्यायशी लक्ष योनी. (पृ० ११२ टीप ५ पहा.) ७. चिखल.

न गणूनि पुण्यपापा । परिहरीं त्रिविध[1]तापा ।
तुजविण करुणाकर कवण दुजा याला ॥ तारीं० ॥ २ ॥
धनकनकाची विषयाची गोडी काची चित्ताला कळलें ।
तें चित्तचि कळवळलें । मग तुजकडे वळलें ।
अद्यापि तरि लावीं सन्मार्गाला ॥ तारीं० ॥ ३ ॥
संगत विरक्ती गुरुभक्ती याहुनी मुक्ती तुच्छ निपट[2] वाटे ।
म्हणूनि भजनवाटे । लावितां दुःख आटे ।
कीं **वि**ठ्ठलविनती यावी श्रवणाला ॥ तारीं० ॥ ४ ॥

**पद १८ वें.**

[3]संरक्षिल हे कोण माझी हरि! तुजविण लाज ॥ ध्रुवपद. ॥
स्वजनीं विविधोपहास । तेणें चित्तास त्रास ।
कर्ता याचा निरास । न दिसे मज आज ॥ संर० ॥ १ ॥
तूंचि बंधुबापमाय । तेथें विज्ञप्ति[4] काय ।
दावीं मज दिव्य पाय । किती म्हणूं तरी तुज वांज[5] ॥ संर० ॥ २ ॥
तारक तूं या जगास । देशी गती खगनगास[6] ।
**वि**ठ्ठलमानसमृगास । प्रेमामृत पाज आज ॥ संर० ॥ ३ ॥

**पद १९ वें.**

**रा**मा! येईं रे! । अरे! गुणग्रामा[7]! येईं रे! ॥ ध्रुवपद. ॥
मृदुकर्मलांघ्रि[8]करानन कामदा! चंडसरसकोदंडलसद्भुज शुंडदंड रण-पंडित चतुरा! ॥ **रामा**० ॥ १ ॥
नीलनलिननयना! नतपालना! । कुंदरदनकरविंद कनकक्रुतकुंडलमंडित सुंदरचरिता! ॥ **रामा**० ॥ २ ॥
**सी**तारमणा! विनीतजनपोषणा! । रिक्तविभूषण हत**खरदूषण** रविकुल[9]-भूषण **वि**ठ्ठलचरिता! ॥ **रामा**० ॥ ३ ॥

**पद २० वें.**

**मधुमुर**नरकविनाशा! विश्वाधीशा! परिहारीं भवपाशा ॥ध्रुवपद. ॥
**द्वा**रकाधिप नारका घनवारका चल धारका सुरतारका शुभकारका तुज फार काय वदूं **हरे**! ॥ **मधुमुर**० ॥ १ ॥

---

१. पृष्ठ ७६ टीप १ पहा. २. केवळ. ३. राखील. ४. विनंति, प्रार्थना. ५. बोभाटा. ६. टोळ (खग) आणि झाडें (नग). अर्थात् सजीव व निर्जीव यांस. ७. गुणांच्या समूहा. ८. अंघ्रि=पाय. ९. रविकुलललाम.

[1]चंलद्विद्युदाभासा ! **राम**ा ! [2]सरसिजनयना ! नलिननाभा ! सवनकंद रविधृत मंदरनत पुरंधर भुवनसुंदर रत्नकंदर नीलकंदर रणधुरंधर बंधु **राम**ा ! ॥ **मधुमुर**० ॥ २ ॥

फुल्लपंकजाक्षा **राम**ा ! कुमति[3]तती हति प्रकृति दक्षा करिं विरोधरदर गदाधर पद्मकर वर चक्र भास्कर सारवित्संसारतारक **विठ्ठल**ात्मसुखप्रदा ॥ **मधुमुर**० ॥ ३ ॥

### पद २१ वें.

**शं**भो ! दे पायीं थारा । श्री**मं**गेशा निर्विकारी ॥ ध्रुवपद. ॥
[4]नानायोनीं बहुतचि श्रमलों । म्हणुनी आलों तुझ्या [5]द्वारा ॥ **शं**भो० ॥ १ ॥
संतप्तातें मज लागों दे । तव करुणेचा कांहीं वारा ॥ **शं**भो० ॥ २ ॥
दीन तुझे पायीं लोळतसें । न पाहसी कां उदारा ! ॥ **शं**भो० ॥ ३ ॥
**विठ्ठल** स्तवनें सकळही चुकवी । जन्ममृत्युच्या येर[6]झारा ॥ **शं**भो० ॥ ४ ॥

### पद २२ वें.

देव दयाळू पहा कसा भला । करि सुख भजकांला. ॥ ध्रुवपद ॥
[7]गजनक्र महा खळ । पापी व्याधी चांडाळ ।
जेणें वि[8]प्र [9]**अ**जामिळ । तारियला ॥ देव० ॥ १ ॥
गांजितां [10]**द्रौ**पदी सती । नेणों वस्त्रें पुरवी किती ।
जळतां गर्भी [11]**प**रिक्षिती । राखियेला ॥ देव० ॥ २ ॥
धरुनी **विठ्ठल** नांवा । संकटीं घेतसे धांवा ।
भक्तियुक्त प्रेमभावा । विकला ॥ देव० ॥ ३ ॥

### पद २३ वें.

श्री**राम** जगदात्मा नयनीं देखिला ॥ ध्रुवपद. ॥
विश्वपटांतरीं साक्षिक तंतू । जो व्यापूनि शुद्ध राहिला ॥ श्री**राम**० ॥ १ ॥

---

१. चंचल वीजेप्रमाणें ज्याची कांति आहे अशा ! २. कमलनयना. ३. तती=रांग. ४. चौऱ्यायशीं लक्ष योनींत (पृ० ७६ टी० १ पहा). ५. 'घरा' असा अन्य पाठ आढळतो. ६. खेपा, व्यर्थ जा ये करणें, निष्फळ जाणें येणें. ७. पृष्ठ ७९ टीप ७ पहा. ८. ब्राह्मण. ९. पृष्ठ १३४ टीप ४ पहा. १०. मागें पृ० १७६ टीप ३; व पृ० १७६-२०० यांतील 'द्रौपदीवस्त्रहरण' हीं पहा. ११. गर्भांत असतां याला अश्वत्थाम्याच्या अस्त्रापासून भगवंतानें राखिलें अशी कथा आहे. [भागवत–स्कं० १ अ० १२.]

करुणाब्धी निजजनसाह्यकारी । जो भक्तीभावींच पाहिला ॥ श्रीराम० ॥ २ ॥
विठ्ठल नाम धरूनी जनांत जो । वर्ततां संतीं गायिला ॥ श्रीराम० ॥ ३ ॥

### पद २४ वें.

भक्त संकटीं तारुनि 'करुणाकर' वागविसी नांव ।
बहुत उशीर जाहला सख्या ! श्रीहरी ! त्वरेनें धांव ।
दीनजनबंधू ! वंद्य पद दाव ॥ ध्रुवपद. ॥
त्वन्मायारचित चित्तवृत्तितें गोड दिसे संसार ।
इष्टमित्रपुत्रकामिनीक्षेत्रवित्तघरदार ।
उठति पदोपदीं विषयवासना त्यांसी अंत ना पार ।
बहु जन्मार्जित कर्मशृंखळा त्रिगुणित हे अनिवार ।
............................................ ।
हे नरतनु जरि व्यर्थ जाय तरि करिंचा गेला डाव ॥ श्रीहरी० ॥ १ ॥
जरि शाश्वत म्हणुनी धीर धरूं तरि तें दुःखाचें मूळ ।
तूंचि वदनपुटीं खडा लाविसी वरि लावुनियां गूळ ।
विचित्र तरि काय वदावें तव मायेचें मूळ ।
तरि बिरुदातें जतन करावें पडलें जरि अनुकूळ ।
उदरपूर्तीला मात्र समयीं देउनी पाव अदपाव ।
'तारीं तारीं' दुःखार्णवीं बुडतों नावाड्या ! तूं नाव ॥ श्रीहरी० ॥ २ ॥
देवदैत्यमानवीं समृद्धी काळें होती भ्रष्ट ।
शास्त्रलौकिकाधारें विचार करितां दिसतो स्पष्ट ।
पद्मपत्रजलवत्क्षणभंगुर सुख, परिणामीं कष्ट ।
एक तुझें अविनाश परम पद सर्वां सर्वोत्कृष्ट ।
जनकसनकशुकनारदादि जेथिल जाणती भाव ।
यापरिचा मज दावीं कोण तुजवीण निरंजन गांव. ॥ श्रीहरी० ॥ ३ ॥
सर्व सुखें पाहतां ऐकतां न घडे चित्ता नंद ।
यास्तव त्याचा करुनि अनादर सोडुनि दिधला छंद ।
कसा असों परि तुझा म्हणविला दास मूर्ख मतिमंद ।

---

१. स्त्री. जीला कामवासना फार ती कामिनी. २. वर्चस्व, सरशी. ३. कधींही नाश न पावणारें, सनातन. ४. पोट भरण्याकरितां. ५. दितीचे पुत्र. ६. शेवटीं. ७. आनंद. ['नंदनं वासवोद्याने सुते ना हर्षके त्रिषु' इति रत्नमाला.]

........................................................................ ।
क्षणा क्षणा वृत्तीस तोषवुनी निजभजनातें लाव ।
कलियुगांत विठ्ठल या नामें म्हणविसि पंढरिराव ॥ श्रीहरी० ॥ ४ ॥

### पद २५ वें.

कृपा करिति ते संत, तरी भगवंत अंतरे कसा? ॥ ध्रुवपद. ॥
अमानित्व देणें । स्वात्मबोध घेणें ।
दया ज्याची भूत[1]मात्रीं वसे वैराग्य तें निजभाग्य हा मनीं ठसा ॥ कृपा० ॥१॥
मिळती जेथें जैसे । स्वयें होती तेथें तैसे ।
नित्यानंदें पूर्ण धाले न करिती प[2]रमायास खळही सहवासहीन फा-
रसा ॥ कृपा० ॥ २ ॥
भोगिती भोगांगें । देह प्रारब्धाच्या संगें ।
भेटी होतां त्याची जैसी सुदागत कर कलंक विठ्ठलाचिया हत्सारसा ॥
॥ कृपा० ॥ ३ ॥

### पद २६ वें.

तुझ्या नामाची तुजला लाज । वि[3]ठ्ठला ! समजुनी यावें आज ॥ ध्रुवपद. ॥
मशीपत्र फिरतां हृदयांतरीं । संतापे महाराज ॥ विठ्ठला० ॥ १ ॥
पतीत परि मुद्रांकित असतां । देऊं तुला किती वोंज ॥ विठ्ठला० ॥ २ ॥
विठ्ठल नाम विचारुनि वेंहिलें । तारीं गरिब नवाज ॥ विठ्ठला० ॥ ३ ॥

### पद २७ वें.

तुजवांचुनि तारक सांग सख्या! मज कोण? दयाळा! रामा ॥ध्रुवपद. ॥
भ्रांतीपडळ पडतां मतितें आड घालवूं काळ रिकामा, ।
जे समयीं [6]यमकिंकर वोढिती कोण म्हणे 'सया! थांबा.' ॥ तुज० ॥ १ ॥

---

१. सर्व प्राणीमात्रांवर. २. परम+आयास=मोठे+श्रम. ३. विठोबा, विठ्ठल, विठाई, हीं सर्व एकाच देवाचीं नांवें होत. विठोबा हा कृष्ण होय. एकदां राधा कृष्णाच्या मांडीवर बसली असतां तेथें रुक्मिणी आली, तेव्हां राधेनें तिला अभ्युत्थान दिलें नाहीं म्हणून ती आपला अपमान झाला असें समजून रागानें दिंडीरवनांत येऊन तपश्चर्या करूं लागली. जेथें हल्लीं श्रीपंढरपुर क्षेत्र आहे तेथें पूर्वीं दिंडीरनामक दैत्याचें वन होतें. या वनांत रुक्मिणी असतां कृष्णानें तेथें येऊन तिची मनधरणी करून समजूत केली. नंतर त्या दोघांनीं तेथें 'विठोबा रुक्माई' हीं नांवें धारण करून अखंडवास केला—असें वर्णन ग्रंथांतरीं आहे. ४. बोभाटा. ५. तात्काळ, लवकर. ६. यमाचे चाकर.

जोंवरि संपती तोंवरी कांपती शेवटीं येती न कामा ।
कोठिल बाइल कोठिल लेंकरूं कोठिल काका मामा ॥ तुज० ॥ २ ॥
सर्व वृथा तुझिया भजनाविण, निश्चय हा सुखधामा ! ।
यास्तव **वि**ठ्ठल पाय तुझे मनीं ठेवुनि, घे तव नामा ॥ तुज० ॥ ३ ॥

## पद २८ वें.

श्री**नृ**हरी ! हरीं भवतापा । जो भवकरिस[1] त्वरित संहरी ॥ ध्रुवपद. ॥
पिता सुताप्रती छळितां प्रकटुनी **प्र**ल्हादा[2]अंतरीं ।
इष्ट भजक संकष्टसमयिं काष्टांत स्पष्ट तनु धरी ॥ श्री**नृ**हरी० ॥ १ ॥
दनुजोदरगर्भांत्र[3]मालिका भूषण करि कंधरीं[4] ।
**र**मा रमापति[5]कुमार सुर किती स्तविति नमिति अंबरीं ॥ श्री**नृ**हरी० ॥२॥
कृपा करुनि शिशु[6] नृपासनीं बसवी अपार करीं धरि शरीं ।
जननमरणभयहरण करुणवर **वि**ठ्ठलासि उद्धरीं ॥ श्री**नृ**हरी० ॥ ३ ॥

## पद २९ वें.

श्री**म**हादेव ! देव ! **सां**ब ! **स**दाशिवा ! ।
न[7] मनीं मदपराध[8] **भ**वा ! ॥ ध्रुवपद. ॥
कृतकर्में जननीगर्भांतरीं । लागों दुष्कृत विभवा ॥ श्री**म**हा० ॥ १ ॥
विण्मूत्रीं जठराग्नीं पचवितां । श्रम **अ**गणित होती जीवा ॥ श्री**म**हा० ॥२॥
**वि**ठ्ठलात्मया चरणरजांचा[9] । देईं लाभ नित्य नवा ॥ श्री**म**हा० ॥ ३ ॥

## पद ३० वें.

संतसंग याची देहीं लाभला भला ।
निरतिशय सुखद गा ! मला ॥ ध्रुवपद. ॥
नानायोनीं[10] सतत श्रमतां । अवचट[11] मार्ग उमजला ॥ संत० ॥ १ ॥
निजधन माझें मज सांपडतां । दृढ परमार्थ समजला ॥ संत० ॥ २ ॥
**वि**ठ्ठलप्रियकर सज्जनीं[12] पाहतां । सहज भवजलधी[13] शमला ॥ संत० ॥ ३ ॥

---

१. संसाररूप हत्तीस. २. पृष्ट ७९ टीप ८ पहा. ३. अंत्र=आंतडें. ४. कंठांत. ५. मदन. ६. ध्रुव. ७. मानूं नको. ८. माझे अपराध. ९. रज=धूळ. १०. चौऱ्यायशीं लक्ष योनींत. (पृ० ११२ टी० ५ पहा.) ११. 'अवचित' असा अन्य पाठ. १२. साधूंनीं, संतांनीं. १३. संसाररूपी समुद्र.

### पद ३१ वें.

सांवळी विठाई! माझी । गाजी उभी विटेवर भक्तकाजीं राजी ॥ध्रुवपद.॥
भजकभक्ती हृदयांत लक्षुनी । पीयाली मुखीं फळ फूल पान भाजी ॥ सांव०॥१॥
रणीं श्रांत असतां जी निरिक्षुनी । चोळी कुंतीकुमरांचे वाजी ॥ सांव० ॥२॥
जगत्रयीं विठ्ठल या नामें । गर्जे चंद्रभागातीरीं तेथ जा जी! ॥ सांव० ॥३॥

### पद ३२ वें.

चरण तुझे दावीं रामा रे! । पूर्णकामा ! ने स्वधामा विमलनामा ! ॥ध्रुवपद.॥
गुणग्रामा! । दे विश्रामा ।
जगिं तुजविण कोण तारक आणि सुखकारक आम्हां ॥ चरण० ॥ १ ॥

---

१. स्तवनीय देवतेचा निर्देश स्त्रीलिंगेंकरून करण्याचा संप्रदाय सर्वप्रसिद्ध आहे. तुकारामादिक कवीही विठोबास 'विठाई' 'विठाबाई' वगैरे शब्दांनीं संबोधनपूर्वक आळवितात असें त्यांच्या काव्यांवरून दिसतें. २. ही इंद्रवीट म्हणून प्रसिद्ध आहे. तिची कथा अशी:—इंद्राला गौतमानें अहल्येशीं जारकर्म केल्याबद्दल 'तुला सहस्र भगें पडतील' असा शाप दिला, परंतु इंद्र शरण आला म्हणून मुनि प्रसन्न झाला आणि 'तुझें शरीर चतुष्कोण विटेप्रमाणें पाषाणरूप होऊन दिंडीरवनांत पडेल व तेथें श्रीकृष्णचरणाचा स्पर्श होऊन तूं पूर्ववत् होशील आणि स्वपद पावशील' असा उःशाप दिला. पुढें श्रीकृष्ण विठ्ठलरूपानें पुंडलिकाच्या दर्शनास आले. तोंपर्यंत ही इंद्रवीट पुंडलिकानें नारदाच्या सांगीवरून आपणापाशीं ठेविली होती. श्रीकृष्ण आल्यावर पुंडलिकानें ती वीट पुढें केली. तिजवर श्रीकृष्ण उभे राहिले तेव्हां इंद्र शापमुक्त झाला व वीट तशीच कायम राहिली. ३. पांडवांचे. [भक्तांची मोतद्दारी कृष्ण करतो असें वर्णन काव्यांतून अनेक ठिकाणीं आढळतें—जसें:-(१) अर्जुनतुरंगमांतें जो स्वकरानें करी खरारा जी. (२) असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी. (मोरोपंत.) (३) हयदोरे धरि स्वकरें 'होरे' वदत पार्थरहंवरीं. (देवनाथ.)] ४. घोडे. ५. पंढरपुराजवळच्या भीमानदीला चंद्रभागा असें म्हणतात. हिची कथा अशी आहे:—इंद्रानें अहल्येशीं कपटवेष धारण करुन जारकर्म केलें. त्या कामीं चंद्रानें इंद्रास साहाय्य केलें म्हणून गौतमानें क्रोधानें 'तुला कुष्ट होईल' असा चंद्राला शाप दिला. तेव्हां चंद्र गौतमाला शरण आला. नंतर मुनीनें 'भीमरथींत (भीमानदींत) स्नान कर म्हणजे तुझें कोड जाईल' असा वर दिला. चंद्रानें त्याप्रमाणें केलें तेव्हां तो पूर्वीसारखा झाला. चंद्राच्या भागाप्रमाणें (कोरीप्रमाणें) येथें भीमरथीचा प्रवाह वक्र झालेला आहे तेथें तिला चंद्रभागा असें अन्वर्थक नांव पडलें—अशी कथा पुराणांतरीं आहे. ६. गुणांच्या समूहा. ['गुणग्रामा' हें विशेषण विठ्ठल, देवनाथ, आनंदतनय इत्यादि कवि फक्त रामासच लावतात असें त्यांच्या काव्यांवरून दिसतें. कदाचित् असा पदसमुदाय प्रासासाठींच योजीत असतील.]

घनश्यामा ! । हृदयाभिरामा !
तुझाची भरंवसा मी तुजविण कसा लोटूं घडी पळ यामां ॥ चरण० ॥ २ ॥
दनुजविरामा ! । विबुधललामा ।
छेदीं भवलता हेचि कुशळता देईं विठ्ठल रिकामा ॥ चरण० ॥ ३ ॥

### पद ३३ वें.

सख्या ! रामा ! ये दावीं पाय । दीन मी बोलुनि बोलूं काय ? ॥ ध्रुवपद. ॥
करुणा कवणा तुजवांचुनि विश्वीं । तात तूंचि माय ॥ सख्या० ॥ १ ॥
कामादिक खळशत्रूशरांचे । किति सोसावे घाय ? ॥ सख्या० ॥ २ ॥
स्मरण तुझें लवमात्र न घडतां । वयचि व्यर्थ हें जाय ॥ सख्या० ॥ ३ ॥
विठ्ठलात्मया कवण तुजविणें । शरण रिघाया ठाय ॥ सख्या० ॥ ४ ॥

### पद ३४ वें.

सदा चित्त रंतलें रामीं ।
श्रीरामीं चित्सुखधामीं । दिवा रात्र नलगे कामीं ॥ ध्रुवपद. ॥
शोधुनी पाहतां तन्मय झालों । अकस्मात जडलों नामीं ॥ सदा० ॥ १ ॥
सावध होतां पूर्ण निवालों । नुठेचि पळ घडी काया मीं ॥ सदा० ॥ २ ॥
विठ्ठल स्मरतां द्वैतँ निवालें । कसें जडलें मग ध्यान कामीं ॥ सदा० ॥ ३ ॥

### पद ३५ वें.

करुणाब्धे ! येइं दयाळा ! ॥ ध्रुवपद. ॥
कृपानिधे ! शरण्यासि उपेक्षिसी । उचित काय गोपाळा ! ॥ करु० ॥ १ ॥
क्षणक्षणा तुज विनवित असतां । नये कसा कंटाळा ? ॥ करु० ॥ २ ॥
विठ्ठलात्मया तव बिरुदाची । वृथा होय की माळा ॥ करु० ॥ ३ ॥

### पद ३६ वें.

धांवें पावें गोविंदा गोपाळा ! ॥ ध्रुवपद. ॥
दूर धरिसि तरि चूर करिति मज ।
धरिं करिं लवकर, न करितां उशीर यावें जी ! कृपाळा !॥ धांव० ॥ १ ॥
कांकसदृश खळ, दीन मी दुर्बल, ।
काय बोलुं तुज पाय निकट करीं संकट बळकट फुकट ओढवुनि आलें
रे ! कृपाळा ! ॥ धांव० ॥ २ ॥

---

१. प्रहर. २. पंडितांचें भूषण. (देवांचें भूषण.) ३. जगांत. ४. जाण्यासाठीं. ५. जागा. ६. 'रंगलें' असा अन्य पाठ आहे. ७. भेदबुद्धि. ८. शरण आलेल्यास. ९. कावळ्यासारखे. १०. 'कपाळा' असा अन्य पाठ आहे.

सद्गुणवारिधे ! हे करुणानिधे ! ।
भक्तवृंद रत हे **वि**ठ्ठलकृत परिसुनि विनवणी चरणीं आज मज ठेविं रे ! कृपाळा ! ॥ धांव० ॥ ३ ॥

### पद ३७ वें.

एके भक्तिशी देव भुकेला । अहो ! जहाला. ॥ ध्रुवपद. ॥
व्याध गंज **ध्रु**वबाळ **अ**जामिळ । पुत्रमिषें **ह**रि केला. ॥ एके० ॥ १ ॥
दैत्यसुत **प्र**ऱ्हाद **बि**भीषण । स्वर्णपुरीं स्थिर केला. ॥ एके० ॥ २ ॥
**गो**रा **चो**खा **रो**हिदास **क**बीर । तयाविण लागत सेला. ॥ एके० ॥३॥
**ना**मदेव **ज**नी वाणी **तु**का हांक । मारुनियां वर गेला. ॥ एके० ॥ ४ ॥
भक्तिनें भ्रष्टहि जो **वि**ठ्ठलीं रत । तो स्वपदाप्रति नेला. ॥ एके० ॥ ५ ॥

### पद ३८ वें.

रमावरा ! सुंदरा ! दे उदारा ! पायीं थारा ॥ ध्रुवपद. ॥
कमलनाथ करि वरद हरणा । कनकवसन वनमालाभरणा ! ।
कंजध्वजवज्रांकितचरणा ! । शरणागत निरखुनि करिं करुणा. ॥ **रमा**०॥१ ॥
जलजलोचना ! जलदाभासा ! । जलनिधिशयना ! जगन्निवासा ! ।
पाहसिल याचा काय तमासा । जलविरहित निज जन हा मासा ॥**रमा**०॥२॥
मधुरमंदहासा ! कुंदरदा ! । धरिसी दीन जनांवरि ब्रिरुदा ।
हरुनि कुमति मातंगी वरदा । संरक्षीं शिशु **वि**ठ्ठल वरदा. ॥ **रमा**० ॥ ३ ॥

### पद ३९ वें.

**या**दवा ! **मा**धवा ! मला तारिं **ह**री ! ॥ ध्रुवपद. ॥
शरणागत दासातें रक्षुनि सुख देशी निज भजकां ।
पतीतपावन दीनानाथा ! **या**दवकुळदीपका ! ॥ **या**दवा० ॥ १ ॥
**ना**रदतुंबर गुणगण गाती **स**नत्कुमार निशिदिनीं ध्याती ।
**ब्र**ह्मदेवशिव आदिकरुनियां अखंड तुजला स्मरती ॥ **या**दवा० ॥२॥
गोपीनाथ गोवळवेशा गोपति गॅजउद्धारा ।
**ग**रुडवाहना गतिप्रदा **वि**ठ्ठलभयसंहारा. ॥ **या**दवा० ॥ ३ ॥

---

१. मागें पृष्ठ ७९ टीप ७ पहा. २. मातंग=गज. ३. 'ध्याती' असा अन्य पाठ आहे.
४. गजेंद्राचा उद्धार करणाऱ्या.

### पद ४० वें.

[1]मज तारीं गे! **अंबे! जगदंबे! भवानी!** ॥ ध्रुवपद. ॥
लसत्[2]सरसिजाननारविंदनेत्रे गे! ।
चलत्कुंडले [3]सुकुंतले सुगात्रे गे!।
लसन्नासिके **हरप्रमोदपात्रे** गे! ।
अतिजडमति विनवुं मि किति तुज भगवति! चलकलगति **अंबे**!. ॥ १ ॥
रणत्कंकणांगुलीयकाभिरामे गे! ।
[4]तडिद्दीप्तिवर्ण किंकिणीकदामे गे! ।
झणन्नूपुरांघ्रि निर्जरप्रणामे गे! ।
[5]अतिहितकर बहु सुखकर धरि शिरीं कर चल लवकर **अंबे**!. ॥ २ ॥
धर्म अर्थ काम मोक्ष तुझ्या हातीं गे! ।
[6]दीनं इच्छिला पदार्थ पुरुनि धाती गे! ।
[7]तुझीं स्तोत्रें **विठ्ठलादि** भक्त गाती गे! ।
[8]प्रणतजना जननी सतत करिं मज [9]नत ढकलुनि मत देइं मज गत **अंबे**! ॥ ३ ॥

### पद ४१ वें.

श्री**हरि**चें नाम गा । श्री**हरि**चें नाम गा! ॥ ध्रुवपद. ॥
सुखद गा किं फुकट फुकट दवडिसि वय कळ कळ कसी ।
न धरिसि मनिं कांहिं कांहिं ॥ श्री**हरि**चें नाम गा० ॥ १ ॥
[10]निगमविहित मलविरहित इहपरहित वदति विदित ।
मुनि मनिं विवरुन वदति विवेक पाहीं पाहीं. ॥ श्री**हरि**चें० ॥ २ ॥
कळुनि कळुनि विष [11]कवळुनि विषयिं विजित जितचि फजित ।
घडि घडि पळ पळ होसि ठाईं ठाईं ॥ श्री**हरि**चें नाम० ॥ ३ ॥
स्वहितकरण करिं विवरण जनन मरण जलधितरण ।
**विठ्ठल**नामस्मृतिविण नाहीं नाहीं. ॥ श्री**हरि**चें नाम० ॥ ४ ॥

---

१. 'त्राहीं त्राहीं' असा अन्य पाठ आहे. २. सरसिज=कमल. ३. सुकेशि! ४. 'तडिद्दीप्ति रम्य' असा अन्य पाठ आहे. ५. 'धरिं शरिं कर, अति सुखकर शशिसुवदन लवकर चल अंबे' असा अन्य पाठ आहे. ६. 'दीनें इच्छिला पदार्थ सकळ तया दाती हो!' व 'दीन इच्छिला पदार्थ वरें पाती गे' असे पाठभेद आहेत. ७. 'स्तुती स्तोत्र विठ्ठलादि भक्तवृंद गाती हो' असा अन्य पाठ आहे. ८. 'तवपदीं रत, जननी! सतत, त्यांतचि गत करीं मज नत अंबे!' असा अन्य पाठ आहे. ९. नम्र. १०. वेदविहित. ११. भक्षून.

## पद ४२ वें.

रत रे! रत सखया! राघवनामीं । किति रमसी कामीं? ।
रामनाम सुख[1]धाम निरंतर सेवुनियां त्यज कुमति रिकामी. ॥ ध्रुवपद. ॥
नानाजन्मार्जित दुरितें[2] जळलीं । कृत पुण्यें फळलीं ॥
तैं या नरतनुची प्राप्ती कळली । मग मति कां चळली? ॥
लाज लाज करिं काज स्मरुनि रघुराजपद विरम धनसुतधामीं. ॥ रत० ॥ १ ॥
दारादि विषयांचा भ्रमकृत वारा । समजुनि मनिं थारा ॥
सारा मायिकचि मोहपसारा । सारा निःसारा ॥
इष्ट मित्र कुळ गोत्र पुत्र सर्वत्र वृथा भ्रम काकी मामी. ॥ रत रे० ॥ २ ॥
करणें सत्संगें गतमळ करणें । शुद्धांतःकरणें ॥
स्मरणें हित वरणें संसृति[3] तरणें । सत्कर्माचरणें ॥
समज करुनि हित समज उमज । मनीं देशिक[4]वचनें कवण कसा मी ॥र०३॥
ऐशा साधनें बहु जन तरले । शांतीनें वरिले ॥
सहज देहत्वापासुनि सरले । निजपदिं अनुसरले ॥
करिसि भजन वरि तरसि सह पितर ये विषयीं विठ्ठल हामी[5]. ॥ रत० ॥ ४॥

## पद ४३ वें.

मना! कांहिं तुला नाहिं पहा लाज कसी रे! ॥ ध्रुवपद. ॥
प[6]रकामिनी परधनासि । विविध[7] विषय साधनासि ॥
जपसि टपसि मांजरसा । न क[8]ळुनियां पडसि फसीं रे! ॥ मना०॥ १॥
निगमविहित त्यजुनि मति । वरिसि स्वहितार्थ कुमति ॥
नेतिल भेट यमसदनीं । पडसि फुकट अभरवसीं रे! ॥ मना० ॥२॥
तिळभर तरि भूतदया । बाणेना जरि हृदया ।
तरि मग कवण्याचि गुणें । श्रीहरिला आवडसी रे! ॥मना० ॥ ३ ॥
धरुनि सदृढ संतसंग । विठ्ठल नामेंचि रंग ॥
आयुर्व्यय व्यर्थ करुनि । पावसि भलतेचि कुंशीं रे! ॥ ४ ॥

---

१. सुखगृह. २. पापें. ३. संसार. ४. गुरुवचनें. ५. जामीन. ६. दुसऱ्याची स्त्री. ७.'विषय सौख्यवासनेसी' असा अन्य पाठ. ८. 'परि शेवटीं पडशी अभरवशीं' असा अन्य पाठ आहे. ९. यमभट=यमाचे वीर. १०. रा० रा० पुरुषोत्तम भास्कर डोंगरेकृत 'जरठोद्वाह' नाटकांत पृष्ठ १०१ येथें हें पद रामदासाचें आहे असें म्हटलें आहे.

## पद ४४ वें.

हरि च हे जगदंबा ह्माळसा । नको विसरूं मानसा ॥ ध्रुवपद ॥
जे दिसा शिवाप्रति पिसा । करुनि दशदिशा फिरवि घारसा ॥ हरि० ॥ १ ॥
सुरासुरें[1] मिळुनि समुद्र मथितां । धरी मोहिनी ठसा ॥ ह० ॥ २ ॥
उभय पंक्तिनें बसा म्हणुनि । वाढिते अमृत पसपसा ॥ हरि० ॥ ३ ॥
चंद्र सूर्य मध्यस्थ होय । खळ राहु[2] दनुज देवसा ॥ हरि० ॥ ४ ॥
जसा निरखिला तसा । ते क्षणिं उडवि चक्र तद्दसा[3] ॥ हरि० ॥ ५ ॥
मनीं अपेक्षित जसा । ते क्षणिं देह धरि तसतसा ॥ हरि० ॥ ६ ॥
असा विठ्ठलीं प्रसाद असतां । कोठुनियां वसवसा ॥ हरि० ॥ ७ ॥

## पद ४५ वें.

श्रीराम राम राम । अरे । सुखकारी गा रे ! नाम ॥ ध्रुवपद. ॥
सुखकारी दुःखहारी । सुखकारी गा रे ! नाम ॥ अरे० ॥ २ ॥
दीनबंधु आनंदसिंधु हे । सुंदर मेघश्याम ॥ अरे० ॥ २ ॥
जनक सनक शुक नारदादी । सन्मुनिवृंदाचें धाम[4] ॥ अरे० ॥ ३ ॥
विठ्ठलमानससरसिजें[5]विहरण । जगजनक अभिराम[6] ॥ अरे० ॥ ४ ॥

## पद ४६ वें.

रामाचें नाम वदा । सदा रामाचें नाम वदा ॥ ध्रुवपद. ॥
ज्ञानाची पहाट । तेथें नरतनुहाटँ[7] ॥
यांत करुनि राहाट । त्यजुनि बरा सर्वदा[8] ॥ रामाचें० ॥ १ ॥
पहातां विचार फार । निःसार हा संसार ।
एक रामनाम सार । गार करिल भुवनें चवदा ॥ रामाचें० ॥ २ ॥
विठ्ठलदास । तत्व जाणुनी उदास ।
त्यास आस पास कासयास । भवगज हा वदा ॥ रामा० ॥ ३ ॥

---

१. देवदानव. २. मोहिनीरूप धारण करून विष्णूनें दानवांपासून अमृत आणून देवांस प्राशनास दिलें. तेव्हां राहूनें देवरूप धरून अमृतपान केलें. तें त्याच्या कंठगत होत आहे इतक्यांत चंद्रसूर्यांच्या खुणेंवरून विष्णूनें आपल्या चक्रानें राहूचें शिर छेदिलें. असा अमृताच्यायोगें राहूचा घात झाला. (महाभारत, आदिपर्व, अध्याय १९ श्लो० ४-६.) ३. त्याचा घसा. ४. घर. ५. कमल. ६. मनोहर. ७. हाट=बाजार. ८. हा शब्द फारशी आहे.

### पद ४७ वें.

हरिभक्तिविणें व्यर्थ । मना! स्वार्थ जनीं रे ! ॥ ध्रुवपद ॥

देहगेह[1]पुत्रमित्र । धन[2]कलत्रकुलपवित्र ।
गगन[3]कुसुमसम निगमा विलपति दिनरजनी ॥ हरि० ॥ १ ॥
कपिल दत्त जनक सनक । मुनि नारद शौनक शुक ।
जगज्जलतरंगाकृति । विवरुनि मनिं वसति वनीं ॥ हरि० ॥ २ ॥
कर्मबद्धता हरोनि हरिसि निश्चयें वरोनि ।
वदति संत सुमतिवंत । 'विठ्ठल विठ्ठल' विठ्ठलाचे वदनीं ॥ हरि ॥ ३॥

### पद ४८ वें.

हरिभजनीं कां रत व्हाना? ॥ ध्रुवपद. ॥

गृह धन माना बहु माना । कां [4]वैरजाना मनिं उमजाना ॥ ह० १ ॥
आणुनि ध्याना मन द्याना सम अपमाना । माना मानुनि विषय [5]वमाना ॥ह०॥
सत्पथिं जाना, समजाना वचन नमाना । गुरुसि नमाना स्वरुपिं रमाना ॥ ह०॥
चिद्रस प्याना, सुख ल्याना । एक लहान थोर नमाना विठ्ठल नाना ॥ह०॥४॥

### पद ४९ वें.

वद रे! श्रीराम [6]रविकुलोत्तंस, मुनिहृदय हंस सतत वदनीं गेली झरत झरत मति परत परत किति सुरतनिरत बा! होसि दुःख सदनीं. ॥ ध्रुवपद. ॥

किति रे! रे! निःसंसारी हित संसारी मानसी ।
सुख म्हणुनि पुत्रदारात सपरिवारादिक मागसी ॥
पहा रे! रे! वय चपल झुरत निमिष पल भरत ।
घडि याम दिवस रजनी. ॥ वदरे० ॥ १ ॥
किति रे! रे! [7]वपु सुंदर म्हणुनि [8]पुरंदरसा नटसी ।
कीं मदन रसिक सदन भावना धरुनि तटतटसी ॥
श्रम रे! रे! तुज सकळ कळुनि किति तनुहि जळुनि जातां पहासी नयनीं. ॥ वद रे० ॥ २ ॥

---

१. घर. २. बायको. ३. आकाशपुष्पासारखें भासमान (असत्य, मिथ्या.) ४. टाकाना, वर्जाना. ५. वमणें=ओकणें. ६. सूर्यवंशभूषण. ७. देह. ८. इंद्रासारखा.

भ्रम रे! रे! पाहुनि पिसा होउनि कसा ठकशी ? ।
परमार्थ जित सार्थकतेपरि नेणशी वाट कशी ? ॥
हित मनीं रे! रे! दृढ रे! रे! समजुनि भावार्थ सजुनि रत रत
विठ्ठल भजनीं. ॥ वद रे० ॥ ३ ॥

**पद ५० वें.**

धरा हृदयिं **हरि** पाय । हाचि उपाय राय साजिरा ॥ ध्रुवपद. ॥
जप तप यज्ञ यागादी अमूप । केलीं जरी या शरीरीं ॥
तरि अमृत तरी तें काय जडमति गाय खाय काजा ॥ धरा० ॥ १ ॥
**नारदादि योगि कृष्ण** परब्रह्म भोगी । वदति वाणी जे पुराणीं ॥
मनीं धरुनि तद्भाव । त्यांतचि ठावहि करा जरा ॥ धरा० ॥ २ ॥
**विठ्ठला**ची भुक्ति । तिचे पोटीं आली मुक्ती ॥
त्यजुनि **हरि**गुण प्रीति । न धरी नीतिला निलाजरा ॥ धरा० ॥ ३ ॥

**पद ५१ वें.**

**राम**नाम गाईं आतां रे! मग कोठिल भय चिंता रे! ॥ ध्रुवपद. ॥
बहुत युगायुगीं बहुविध सोंगें । धरुनि बहुत श्रमलासी रे! ॥
**राम**पदाचा मार्ग न कळतां । मोहवनीं भ्रमलासी रे! ॥ **राम**० ॥ १ ॥
वश ममता राक्षसींत होउनि । त्यजिली सन्मति माता रे! ॥
तात विवेक हा श्रमे तिजविषयीं । क्षणही तुतें न पहातां रे! ॥ **रा**०॥२॥
जननी पित्यासी सुखी करि **रामीं** । रंगुनि विविधोपायीं रे! ॥
करुनि कृपा तुज देह नराचा । दिधला **राम**रायें रे! ॥ **रा**० ॥ ३ ॥
विषय दुराशय[1] वर्जुनियां धरी । साधन सदृढ शमाचें! रे! ॥
**विठ्ठल** विनती परिसुनि कानीं । करिं सार्थक जन्माचें रे! ॥ **रा**० ॥४॥

**पद ५२ वें.**

**रामीं** धरीं प्रीति, समया हेंचि उचित रे! ॥ ध्रुवपद. ॥
श्रुतिस्मृतिनीं मथुनि काढिले । कां सांडिशी नवनीत[2] रे! ॥ **रा**० ॥ १ ॥
विषयमदेंबहु भुलुन भल्याची । कां नादरशी[3] रीत रे! ॥ **रा**० ॥ २ ॥
**रामकृष्ण हरि विष्णु जनार्दन** । या नामें गा गीत रे! ॥ **रा**० ॥ ३ ॥
**विठ्ठल** विनती सुखकर इहपर । कां होतोसी फजीत रे! ॥ **रा**० ॥ ४ ॥

---

१. दुर्+आशय=दुष्ट+हेतु. २. लोणी, सार. ३. अनादर करशी.

### पद ५३ वें.

कशाला माळ गळां घालावी? ॥ ध्रुवपद. ॥

हृदयीं काम, हरिनाम न ये मुखीं। धाम धनासी मन लावी ॥ क० ॥ १ ॥
भस्मलसित तनु[1] कश्मलजितमति[2] । होऊनि चित्त न तो लावी ॥ क० ॥ २ ॥
जटाजूट पुटपूट अधरपुटीं । कुटें जनांचीं बोलावी ॥ कशा० ॥ ३ ॥
विठ्ठलभजन मनीं नसतां नर । तनू खरांशीं[3] तोलावी ॥ कशा० ॥ ४ ॥

### पद ५४ वें.

राघवनाम बरें । आदरें तें गाई भव लंघुनि जाई ॥
बा ठकसि कां स्वहित विचारीं रे! ॥ ध्रुवपद. ॥
सतत या नामाच्या श्रवणें । त्रिदशनाथ[4] विधि शिवादि तत्पर ॥रा०॥१॥
शोधुनि पहातां सर्व पुराणें । पावन हे त्रिभुवनीं परात्पर ॥ रा० ॥ २ ॥
अति हितकर परमार्थ निदानीं । विठ्ठल मानसीं वसो निरंतर ॥ रा० ३

### पद ५५ वें.

रसने! रंगें या राघवाचे नामीं. ॥ ध्रुवपद. ॥
मिथ्या चाळा तूं कां पडशी रिकामी, ।
रघुपति म्हणतां तूं तरसिल अंतर्यामीं वो! ॥ ध्रुवपद. ॥
सुंदर नामें सुखधामें या रामाचीं वो! ।
गोडी जाणे शंकर[5] राजा याची, टळेल वो! ।
पिडा या यमदूतां दुष्टांचि वो! ॥ रघुपति० ॥ १ ॥
आतां किती विषयांचा करिशी सोस वो! ।
मजला तारीं, तूं धर नामीं विश्वास वो! ।
या रसनेतें[6] विनवीतो विठ्ठलदास वो! ॥ रघु० ॥ २ ॥

### पद ५६ वें.

लागला चटका । हा प्रपंच अवघा लटका. ॥ ध्रुवपद. ॥
चटका लागला मिरेला[7] । छळुनि विष दिधलें तिजला. ॥
निर्भय होउनियां मनाला । घेतला गुटका. ॥ हा प्र० ॥ १ ॥
चटका लागला कबिराला । छळूं संत आले घराला ।
बायको विकून सावकाराला । मारिला फटका. ॥ हा प्र० ॥ २ ॥

---

१. देह. २. मोह. ३. खर=गाढव. ४. इंद्र. ५. शंकरानें रामनामोच्चार केला तेव्हां विषप्राशनानें झालेला त्याच्या कंठाचा दाह शांत झाला अशी पौराणिक कथा आहे. ६. जिव्हेतें. ७. 'अनेककविकृत पदसंग्रह' पृ० १३५ टीप ८ पहा.

चटका लागला जनीला । सोडून दिधलें गणगोताला ॥
वेगळें होउन जन्ममरणाला । तोडिला तटका. ॥ हा प्र० ॥ १ ॥
चटका लागला विठ्ठलाला । शरण ब्रह्मानंदपदाला ॥
विसर न पडे दिवानिशिला । लवपळ घटका. ॥ हा प्र० ॥ ४ ॥

## उपदेशपर पदें.

### पद ५७ वें.

सखया ! सुखकारक सार हरीचे गुण गा रे ! ॥ ध्रुवपद ॥
पहा हित रे ! भवदवनाशक एक हरीपद परिसोन गा रे ! ॥ सख० ॥ १ ॥
दारादिक रे ! जन धन साधन सकळिक ठगवूंनि देती दगा रे ! ॥ स० ॥ २ ॥
विश्वात्मक रे ! सुखमय विठ्ठल समजुनि जनिं वनिं पाहीं उगा रे ! ॥स० ॥ ३ ॥

### पद ५८ वें.

श्रीरामनाम वदा वदा । वदा वदनिं सर्वदा सदा ॥ ध्रुवपद ॥
नारदादि मुनिजन अनुदिनीं स्तविति जयाच्या पदा, ।
करणि निकर तच्चरणिं निवेदुनि वरा स्वात्मसंपदा. ॥ वदा० ॥ १ ॥
प्रियारामधनधामवामनयनादि कामना मदा ।
त्यजुनि भक्ति भावाल, जरिच पावाल स्वात्मसंपदा ॥ वदा० ॥ २ ॥
कर्मसहित निज धर्मसहित पुनर्वर्म पाहा एकदा ।
विनति करुनि विनवी विठ्ठल अशी नये नरतनू कदा ॥ वदा. ॥ ३ ॥

### पद ५९ वें.

अच्युता ! अनंता ! माधवा ! कृष्णा ! केशवा ! ॥ ध्रुवपद ॥
नामाविण नाहीं सारें रे ! तूं विचारी रे ! सकळ शास्त्रपुराणीं, ।
व्यास वाल्मीकि महाऋषी घोर तापसी यांची नामीं शिराणी, ।
शुकसनकादिक नारद ध्यान सर्वदा नामीं रंगली वाणी. ॥ १ ॥
गणिका अजामिळ पातकी आत्मघातकी त्यांची ऐका काहणी, ।
प्रल्हाद अक्रूर उद्धवा बोध जेव्हां तेथ नामाचीं गाणीं, ।
गाउति गोविंदें लाधली भक्तां पावली, चित्तीं ठेविली त्यांणीं. ॥ २ ॥

---

१. संसाररूपी अरण्याचा किंवा अग्नीचा नाश करणारा. २. 'फसवुनी' असा अन्य पाठ आहे. ३. आराम=बाग. ४. वामनयना=वामलोचना, ['अंगना भीरुः कामिनी वामलोचना' इत्यमरः । वामः कामो लोचने आलोचने नेत्रे वास्याः । यद्वा वामे सुंदरे लोचने चक्षुषी यस्याः सा ।]५. उत्तम. ६. प्रीति. ७. वेश्या, पिंगला. (पृ. ५९ टीप २ पहा.) ८. (पृ. १३४ टीप ४ पहा.) ९. (पृ० ७९ टीप ८ पहा.)

नामाविण नाहीं धर्म रे! नाहीं कर्म रे! ऐसीं संतघराणीं, ।
बोलतां नामचि सोय रे! ऐक्य हें खरें मुख्य प्राणप्रयाणीं, ।
सर्वांसी तीं नामें पावलीं, उभी राहिली विठ्ठलाची निशाणी. ॥ ३ ॥

### पद ६० वें.

हरीच्या गुणाची गोडी श्रवणीं ना धरितां, ।
हृदयीं ना वरितां, हित न विचारितां बा! ॥
अतिसुखकर नरदेह गमावुनी कळत कळत ठकसी वृथाची. ॥ १ ॥
जायामायाकाया वांयाची, सुखाची परि साची धणी घे रसाची ।
........................................................ ।
........................................................ ॥ २ ॥
प्राण्या पाहीं पाहीं कांहीं सोय न सुखाची, ।
घालविसी काळ कां रिताची स्तुति वाचे मुखिं विठ्ठलाची ॥ ३ ॥

### पद ६१ वें.

प्राण्या! गायीं । विठ्ठल रखुमायी ॥ ध्रुवपद. ॥
सकळ जगाचीं मातापितरें । सांडुनी जोडिसी पुढें कायी? ॥ प्रा० ॥ १ ॥
दुर्लभ हा नरदेह गमावुनी । फुकट करिसि हायहायी. ॥ प्रा० ॥ २ ॥
विठ्ठल स्मरतां विठ्ठल होसी । हरती सकळही अपायी. ॥ प्राण्या० ॥ ३ ॥

### पद ६२ वें.

वाचे बोला सतत रामनाम ॥ ध्रुवपद. ॥
स्मरणें वाल्मीक झाला ऋषीवर । येतां मुखीं उफराटें नाम ॥ बो० ॥१॥
गज गणिका चांडाळी अजामिळ । यांला दाविलें स्वधाम. ॥ बो० ॥ २ ॥
विठ्ठलनामस्मरणें रमतां । कुंठलें येणें जाण्याचें काम. ॥ बोला० ॥ ३ ॥

### पद ६३ वें.

रामनामीं मति लागों दे प्राणिया! ॥ ध्रुवपद. ॥
दीनजनोद्धार करुणासागर । दावी प्राण्या तुजप्रती निजधाम ॥ रा० ॥ १ ॥

---

१. फुकट. २. स्त्री. ३. देह. ४. वाल्मीकि 'राम' असा उच्चार न करितां 'मरा' असें म्हणत असे. ५. हत्ती. (पृ० ७९ टीप ७ पहा). ६. पिंगला (पृष्ठ ५९ टीप २ पहा). ७. या चांडाळीची कथा 'शिवलीलामृत' अध्याय ३ ओंव्या १४६-१८० यांत आहे. हिचें पूर्वजन्मीचें द्विजकुळांतील नांव सुमित्रा असें होतें. चांडाळयोनींतील नांव उपलब्ध नाहीं. ८. पृष्ठ १३४ टीप ४ पहा.

गज[1] गणिका[2] चांडाळी[3] अजामिळ[4] । पाहा पाहा पावले कीं सुखधाम[5] ॥ रा० ॥
**वि**ठ्ठलविनवणी परिसुनी बापा! । साधीं साधीं स्वात्मसुखाचें काम ॥ रा० ॥

## पद ६४ वें.

स्वहित पाहिजे तरि तुज सखया! ऐक सांगतों मती ।
स्मर **राम जान**कीपती ॥ ध्रुवपद. ॥
निगम[6] शुद्धतेस्तव आद्यंतीं स्मरती सुरजन **ह**री ।
तो विविध[7] दोष संहरी ॥
तदुदित कर्मारंभांतीं स्मरणेंचि सांग तीं करी ।
परिहरी दुरित[8], जय करी ॥
आदिकवि **वा**ल्मीकि प्रमुख मुनि रमले स्मरणांतरीं ।
बहुतार्थ बोलिले तरी ॥
तदनु[9] वर्तनीं यस्य[10] स्मृत्या **व्या**साची वैखरी[11] ।
इतिहास **भा**रती करी ॥
याचि लागीं सज्जनें स्मृतिपथें विमल साधिली गती ।
कसी त्यासी घडे दुर्गती? ॥ स्वहित० ॥ १ ॥
**कुरुवृद्ध शांतनुगं**गासुत[12] पडतां शरपंजरीं[13] ।
**नि**कटीं[14] असतां श्री**ह**री ॥
**ना**रदादिमुनिवर्यसमाजीं प्रश्न [15]युधिष्ठिर करी ।
वर धर्म वंद्य सुरनरीं ॥
काय कसा वदतांचि पितामह[16] वदला ते अवसरीं ।
बहु **ध**र्माच्या कुसरी[17] ॥
यज्ञदानतपतीर्थें असतां नानापरी ।
न करित नामाची सरी[18] ॥
या स्मरणें उच्चार घडतां नेणो तरले किती ।
कसी त्यासी घडे दुर्गती? ॥ स्वहित० ॥ २ ॥

---

१. हत्ती. (पृष्ठ ७९ टीप ७ पहा). २. वेश्या (पृष्ठ ५९ टीप २ पहा). ३. मागच्या पदावरील टीपा पहा. ४. पृष्ठ १३४ टीप ४ पहा. ५. सुखगृह. ६. वेद. ७. अनेक. ८. पाप. ९. त्याप्रमाणें आचरण ठेविल्यानें. १०. ज्याच्या स्मरणानें. ११. वाणी. १२. भीष्म. १३. शरीरासभोंवतीं अनेक बाण टोंचले असतां पंजराच्या (पिंजऱ्याच्या) आकारासारखें जें आवरण होतें त्यास 'शरपंजर' असें म्हणतात. १४. जवळ. १५. धर्म. १६. भीष्म. १७. कौशल्य. १८. बरोबरी.

दिवा रात्र हरि मात्रचि ठसला प्रल्हादाच्या[1] मनीं ।
गुरु ज्याचा **ना**रदमुनी ॥
त्यासि खळ पिता पुसे 'अरे! तूं कोणाचे चिंतनीं ? ।
गुंतसी दिवस यामिनी[2]' ॥
तो वदला बापातें 'बापा ! **वा**सुदेव जनिं वनीं ।
मनीं तोचि वसे त्रिभुवनीं' ॥
'असे काय या स्तंभीं[3] ?' म्हणवुनी पुसतो रागेजुनी[4] ।
तो म्हणे पाहा समजुनी ॥
निकरें[5] करुनी खांबावरी मारीं गदा त्रिदश[6] पाहती ।
कसी त्यासी घडे दुर्गती ? ॥ स्वहित० ॥ ३ ॥
अति मदांध गज[7] नक्रें[8] पाय आंवळितां करकरां ।
संकटीं स्मरे **श्री**करा ॥
दुराचारिणी गणिका नारी शुक पाळुनी पिंजरा ।
आळवी सहज **र**मावरा ॥
विमल सत्कुलोत्पन्न अजामिळ[9] विप्र[10] पातकी पुरा ।
पापियांत म्हणवी तुरा[11] ॥
बहुत काळ दासीच्या संगें बहुत सेविली सुरा[12] ।
जो परमार्थी निजसुरा[13] ॥
ऐसेयांसी निजनामस्मरणीं ने **वै**कुंठाप्रती ।
असी **वि**ठ्ठलनाम स्मृती ॥ स्वहित० ॥ ४ ॥

---

१. पृ० ७९ टीप ८ पहा. २. रात्र. ३. स्तंभ=खांब. स्तंभ=stump. ४. रागावून. ५. जोर, बळ, नेट. ६. त्रिदश—तीन आहेत दशक ज्यांच्या संख्येंत ते 'त्रिदश' या रीतीनें विग्रह केला असतां तीसपासून एकूणचाळीसपर्यंत अंकांचा बोध होतो. परंतु आठ वसु, बारा आदित्य, अकरा रुद्र, दोन आश्विन मिळून तेहतीस देव असल्यामुळें वरील विग्रहावरून तेतीस देव समजावयाचे. 'अदित्याम् जज्ञिरे देवास्त्रय स्त्रिंशदरिंदम ॥१४॥ आदित्या वसवो रुद्रा अश्विनौ च परंतप ॥१५॥ [वाल्मीकिरामायण– अरण्यकांड सर्ग १४; निर्णयसागर छापखान्याची आवृत्ती पृ० ४७० पहा.] ७. पृ० ७९ टीप ७ पहा. ८. पृ० ५९ टीप २ पहा. ९. पृष्ठ १३४ टीप ४ पहा. १०. ब्राह्मण. ११. श्रेष्ठ. १२. मद्य, दारू. १३. निजलेला.

### पद ६५ वें.

वद वदनीं तूं रामचंद्र मापती पूर्णकाम[1] सदय सखा ॥ ध्रुवपद. ॥

हृदयविहारी । सुरसहाकारी ।
पतितजनोद्धर नृपललाम[2] ॥ वदनीं० ॥ १ ॥
खलकुलहंता । निवटी अहंता[3] ।
सतत सुखोद्धाम स्वसुखधाम ॥ वदनीं० ॥ २ ॥
विश्वविकासी । विविध विलासी ।
विठ्ठलहृत्कमल विमलनाम ॥ वदनीं० ॥ ३ ॥

### पद ६६ वें.

कांहीं तरी करिं प्राणिया ! विचार ॥ ध्रुवपद. ॥

या नरदेहीं हिताहित जाणुनी । करिं बा ! स्वहितविचार ॥ कांहीं० ॥१॥
विठ्ठल प्रार्थितसे तुजलागुनी । करिं बा ! स्वहितविचार ॥ कांहीं० ॥ २ ॥

### पद ६७ वें.

आणा ध्याना । विठ्ठल पंढरीचा राणा ॥ ध्रुवपद. ॥

निर्गुण असतां सगूण झाला स्वछंदें ।
द्वापारीं लीला केली जेणें स्वानंदें ।
नारदवाक्यें पुंडलिका[4] दिधलें दर्शन जाणा ॥ आणा० ॥ १ ॥

---

१. तृप्तेच्छ. २. राजभूषण. ३. अहंता (मीपणा) निवटी (नष्ट करी. ४. पुंडलिक बलरामाचा अवतार होय असें समजतात. **पुं**डलीक हा एक देशस्थ ब्राह्मण होता. याच्या बापाचें नांव **जा**नुदेव आणि मातेचें नांव **स**त्यवती. हा आपल्या पत्नीसह सुख भोगून मातापितरांस अनेक प्रकारांनीं छळीत असे. तीं काशीयात्रेस जावयास निघालीं तेव्हां हाही स्वपत्नीसह त्यांच्या बरोबर निघाला. मार्गीनें यानें आपल्या वृद्ध मातापितरांस पुष्कळ त्रास दिला. **का**शीस आल्यावर हीं सर्व मनुष्यें **कु**कुटस्वामी नामक महातापसाच्या आश्रमासमीप उतरलीं होतीं. तेथें रात्रौ **पुं**डलिकास **गं**गा, **य**मुना, **स**रस्वती या तीर्थदेवतांचा साक्षात्कार झाला. **कु**कुटस्वामी हे साक्षात् मातृपितृसेवारत **श्रा**वणाचे अवतार होत. यांची गोष्ट त्या देवतांनीं **पुं**डलिकास सांगून त्याचे डोळे उघडिले व त्याला शुद्धीवर आणिलें. तेव्हां त्याला आईबापांस दुःख दिलें म्हणून परम पश्चात्ताप झाला. त्याला लागलीच उपरति झाली आणि तो मातापितरांच्या आज्ञेंत राहून त्यांच्या एकनिष्ठ सेवेंत सुख मानून राहूं लागला. नंतर तो त्यांच्यासह काशीहून परत आला आणि **भी**मातटीं **ग**रसळें नामक गांवीं कायावाचामनेंकरून त्यांची सेवा करीत राहिला. पुढें याला **ना**रदाचें दर्शन झालें. ‘भगवान् **श्रीकृष्ण** येतील तोंपर्यंत तूं असाच राहून त्या देवाचें नांव ‘श्री**वि**ठ्ठल’ असें प्रसिद्ध कर’ असें त्याला सांगून **ना**रद इष्टस्थलास गेले.

याच स्वरुपीं येथें असणें विज्ञप्ती ।
दर्शनमात्रें सर्व जनां मोक्षप्राप्ती ।
स्वभक्तवचना मानुनी इटेसम चरणा ॥ आणा० ॥ २ ॥
पंकजनेत्रें[1] पाहणें करुणेनें सर्व ।
ईसीत[2] हास्यें अवलोकन मस्तकीं शर्व ।
विठ्ठलमंत्रें करिजे नामामृतपाना ॥ आणा० ॥ ३ ॥
रूप सांवळें पांडुरकांती मिरवतसे[3] ।
कटीं कर ठेऊनी शांती स्वरुपीं भासतसे ।
माळा कंठीं शोभती तुळशीच्या तरुणा ॥ आणा० ॥ ४ ॥
आषाढीचे यात्रे येती जन लोक ।
संतदर्शनें पावती सुख अलौकिक ।
भक्ती करितां पाप निवारे भीमास्नाना ॥ आणा० ॥ ५ ॥
पुंडलिकाचें दर्शन क्षेत्रप्रदक्षणा ।
करूनी ध्यावें विठ्ठलदर्शन हें जाणा ।
तुळसी बुका लावुनी टाका अभिमाना ॥ आणा० ॥ ६ ॥
पंढरी पाहतां वृत्ती सर्वही पालटते ।
देवीं द्विजीं नामीं बुद्धी लागते ।
सर्व भूतीं नमन करिती भगवत्खूणा ॥ आणा० ॥ ७ ॥
ऐसा महिमा वर्णित वेदही थोटावे[4] ।
विठ्ठलवाणी कैंची ती बोलूं[5] पावे ।
कांहीं बोले हे सत्ता विठ्ठलजीची ।
स्तोत्राच्या पठणीं प्रीति देवाची ॥ आणा० ॥ ८ ॥

---

पुढें रुक्मिणी रुसून आली होती तिची समजूत करण्यासाठीं देव श्रीकृष्ण तेथें आले. तिची समजूत घालून तिच्यासह दिंडीरवनांत पुंडलिकाची झोंपडी होती तेथें देव येऊन उभे राहिले. त्यानें केलेली मातापितरांची सेवा पाहून देवांनीं प्रसन्न होऊन त्याला जन्ममरणबंधमुक्त केलें. 'जे कोणी चंद्रभागेंत स्नान करून श्रीविठ्ठलनामाचा जप करून देवदर्शन घेतील ते संसारपाशमुक्त होतील' असा वरही दिला. प्रत्येक दिवसीं पुंडलिकास भेटण्यासाठीं सर्व तीर्थें येतात अशी भक्तजनांची समजूत आहे. पुंडलीकाचें सविस्तर चरित्र '**भक्तिकथामृत**' नामक ग्रंथांत दिलेलें आहे.

१. कमलनयनानें. २. ईषद्=अल्प, थोडें. ३. 'तळपतसे' असा अन्य पाठ. ४. थोटा (पंगू) होतो, थकतो. ५. बोलूं पावणें=बोलूं शकणें.

### पद ६८ वें.

जपा रा[१]ममंत्रराज अन्य मंत्र काय? ।
हाचि तारकोपदेश शि[२]व करी, सदैव गाय ॥ ध्रुवपद. ॥
**ना**रायणादि येथ रादि वर्ण उणा होय ।
**ना**रायणादि जपे तरी चुकुनी मार्ग जाय ॥ जपा० ॥ १ ॥
'नमःशिवाय' मंत्र जरी मकाररहित होय ।
अकल्याण वाक्य हें वदतां न सिवाय ॥ जपा० ॥ २ ॥
**ह**रि**ह**राख्य मंत्र उभय **रा**मनाम त्यासि हृदय ।
रा[३]जीवसमपदीं पूर्ण ब्रह्म **विठ्ठ**लाख्य गाय ॥ जपा० ॥ ३ ॥

### पद ६९ वें.

पाहीं सख्या शोधुनी मनिं बरवें लटिका संसार ।
जशी यात्रा कीं बा[४]जार ॥
नव्हे कोणी कोणाचें रे! किती तुज विनवूं वारंवार ।
सख्या! तुज विनवूं वारंवार ॥ ध्रुवपद. ॥
परिवाराचें पोषण करितां सर्व पाठी येती ।
कांहीं कठिण गति पडतां अवघीं सोडुनियां देती ।
पडे आपण फेऱ्यातें दुरुनि मति शिकवाया जाती ।
एक दुजा कीं बहुविध निवडाव्या जाती ।
[५]सेखीं विचारें ठसतां लटिका मायेचा बा[६]जार ।
मग मागती भवचक्रीं पडसी याचा कवण विचार. ॥ पाहिं० ॥ १ ॥
आपणातें प्रतिती येतां झांकुनियां डोळे ॥
करी कर्म लौकिकार्थ परि अं[९]तर्यामीं [१०]पोळे ।
विषयवासना पासोडीच्या सांपडोनी खोळे ।
वैरी षड्करण संग[११]रकाळीं आयुर्गती चोळे ।
घडी तव चरित्र लिहिती विचित्र गुप्त लिहिणार ।
त्यांतही परम कठिण यमधर्माचा करभार ॥ पाहिं० ॥ २ ॥

---

१. 'श्रीराम जय राम जय जय राम' हा राममंत्र. २. कल्याण. ३. कमलसमचरणीं. ४. 'व्यापार' असा अन्य पाठ. ५. शेवटीं. ६. 'व्यापार' असा अन्य पाठ आहे. ७. भव (संसार) रूप चक्रीं (चक्रांत.) ८. प्रतीति, प्रत्यय, अनुभव. ९. मनांत. १०. भाजे. ११. युद्धसमयीं.

प्रपंचकष्टें वय वेंचुनियां पालटिली कांया[1] ।
परि विषयवृत्ति बुडतां मूळ उखळेना वायां ।
अधिकाधिक मोहाची संतत वाढती माया ।
मनिं समजेना अंतरेन श्रीहरिच्या पायां ।
कशास मनीं बेडिवार करिसी गेंडि[2] **मा**धव करीं सकुमार ।
कुंदरदन[4] [5]नीलांबुदनिभतनु सुंदर मंद कुमार ॥ पाहिं० ॥ ३ ॥
या भवसागरीं तारणार तरि तोची एक तारी।
**पर**शुराम नृप **राम**कृष्ण पांषाण[6]रूपधारी ।
पुढें **क**ल्की होऊनी निरशिल कलिमळं[7] जगदोद्धारी ।
........................................................................... ।
तोचि **पं**ढरीसी उभा इटेवरी **वि**ठ्ठल हा अवतार ।
नाम तयाचें त्रिभुवन व्यापुनी उरलासे विस्तार. ॥ पाहिं० ॥ ४ ॥

**पद ७० वें.**

श्री**राम** वदनीं वद **द**शरथनृपकुलललाम ॥ ध्रुवपद. ॥
त्रिजगद्भर्ता सुरसहाकारी[9] ।
कुंवलयदलनयन[10] विमलभूषण तनुविजित काम ॥ श्री**रा**० ॥ १ ॥
खलकुलहंता हृदयविहारी ।
श्रुतिनी गादित गुणगणजित दूषण कंठ धाम ॥ श्री**रा**० ॥ २ ॥
चित्सुखदाता पतितोद्धारी ।
भव परिहरी यास्तव धरीं **वि**ठ्ठलमुखीं सतत नाम ॥ श्री**रा**० ॥ ३ ॥

**पद ७१ वें.**

आतां तरी **राम** बोलें । वय न हें व्यर्थ गेलें ।
विषयसंग तुज दंग करिल मति भंग करिती परि रंगसी सखया ! ॥ध्रुवपद ॥
श्रुतिविचार हृत्सार विवरुनी वृथा जन्म नेले ।
साधुसंगतीसुधा परिवर्जुनी स्वहित काय केलें ? ॥ आतां० ॥ २ ॥
**राम**नाम जनतारणार्थ विश्वीं[11] पहा उदेलें ।
विनंती **वि**ठ्ठलाची परिसुनी वद बुडविसी तपेलें. ॥ आतां० ॥ १ ॥

---

१. देह. २. डौल. ३. मित्र. ४. कुंदपुष्पासारखे शुभ्र सुंदर रदन (दांत) ज्याचे तो. ५. निळ्या मेघासारखी तनु ज्याची तो. ६. दगड, पत्थर. ७. पाप. ८. भूषण. ९. देवांचा साहाय्य करणारा. १०. कमलपत्रनेत्र. ११. जगांत.

### पद ७२ वें.

मना! रामपायीं ठेवीं सर्व कामना[1]।
मानुनी तनुधन वमना[2] ॥ ध्रुवपद. ॥
निज विश्रांतीचें मंदिर समजुनी। वश होसी कसा शमना ॥ मना० ॥ १ ॥
सर्व चराचरीं[3] सत्यचि लक्षुनी। करीं कीं निरंतर नमना ॥ मना० ॥ २ ॥
विठ्ठलसंगती लाभली असतां। कां न भजसी खलदमना[4] ॥ मना० ॥ ३ ॥

### पद ७३ वें.

रत रामीं देहीं आल्या प्राणिया! रे!।
किती धरिसी सतत हेतू तव कामीं? ॥ ध्रुवपद. ॥
मृदुतर वाचा। वैभवाचा।
न लभसी विविध लाभ विभुनामीं ॥ रत० ॥ १ ॥
स्त्रीसुतबंधु। हाचि बंधु।
तुमजसी धरुनी ध्यान धन धामीं ॥ रत० ॥ २ ॥
विठ्ठल प्रार्थी। हो हितार्थी।
करीं दुरी कुमतिका मनिं रिकामी ॥ रत० ॥ ३ ॥

### पद ७४ वें.

भज सांब सदाशिवपदातें।
सांबपदकमळीं रमसिल जरि तरि पावसी सुखसंपदेतें ॥ध्रुवपद. ॥
इष्ट भक्त कष्टतां कृपेनें। विनती परिसुनी नयनें।
स्पर्शुनी, तद्भय निरसुनी हरी आपदेतें[5] ॥ भज० ॥ १ ॥
ध्याती मुक्ती मुमुक्षु उपासक शांती निरंजन। सुरमुनिरंजन।
रतिवरगंजन खल तापदातें ॥ भज० ॥ २ ॥
वंदी विठ्ठल ज्याचे मस्तकीं चित्सुखदायक। तो सुरनायक।
कृत हरी सायक दावी निजपदातें ॥ भज० ॥ ३ ॥

### पद ७५ वें.

निरत हो मंगीशपदीं मना!। धरुनी सदृढ भावना।
स्त्रीधनादि भवसाधनीं रमतां विवश पथ त्यागिना ॥ ध्रुवपद. ॥

---

१. इच्छा. २. तनु (देह) आणि धन (संपत्ति) हीं वमनासारखीं तुच्छ मानून. ३. स्थावरजंगमीं. ४. दुष्टांचा संहार करणाऱ्या (परमेश्वराला.) ५. संकटातें.

भजनीं वास कैलास त्यजुनियां कुशस्थळींच्या वना ।
भक्त मुक्त करणें हें ज्याचे हृदयीं वासना ॥ निरत० ॥ १ ॥
विरक्त परि अनुरक्त जाहला अंगनाश जीवना ।
शिरीं सुरस शशिधर[1] मांगीश पार्वती जगजीवना ॥ निरत० ॥ २ ॥
भुजगहार आधार जो गिरीश सर्व क्षत्रभूवना ।
तो महेश विठ्ठलीं कृपा करितां फळती[2] कामना ॥ निरत० ॥ ३ ॥

## पद ७६ वें.

वद हरहर वदनीं भोलानाथ भवानीप्रिय[3] भूतपती[4] ॥ ध्रुवपद. ॥
त्रिपुरदहन त्रिनयन त्रिपुरारे! त्रिदशनाथ[5] त्रिदशांसह हृदयीं जपती ॥वद० १
गंगाधर गिरिजार्धांगीं धरी गळां गरळ[6] सर्वांगी भुजगाधिपती[7] ॥ वद० ॥ २ ॥
दिवा रात्र[8] शिवचरणपंकजीं विठ्ठलादि भक्तवृंद भृंग तळपती ॥ वद० ॥ ३ ॥

## पद ७७ वें.

जोडा रे! जोडा जोडा । वैराग्यभाग्य जोडा ॥ ध्रुवपद. ॥
या संसारीं । या निःसारीं काय उपद्रव थोडा ॥ जोडा० ॥ १ ॥
पाहतां काची । धनकनकाची । खोटी आशा सोडा ॥ जोडा० ॥२॥
कोठिल काया । कोठिल माया । कोटी हत्ती घोडा ॥ जोडा० ॥ ३ ॥
नलगे पैका । निशिदिनीं एका । विठ्ठलवार्ता गोडा ॥ जोडा० ॥ ४ ॥

## पद ७८ वें.

कांहीं विचारी रे! । हृदयीं जप जप कृष्ण मुरारी रे! ॥ ध्रुवपद. ॥
शाश्वत निजसुख गमलें कायसें । पाहा पाहा या संसारीं रे! ॥ कांहीं० ॥१॥
सत्य त्यजुनी असत्य विषयसुख । घेसी नित्य विकारी रे! ॥ कांहीं० ॥ २ ॥
विठ्ठल नामांकुश[9] करीं घेऊनी । भवगजगंड[10] विदारी रे! ॥ कांहीं० ॥ ३ ॥

## पद ७९ वें.

या देहाचा काय भरंवसा । भ्रमसी कसा रे! ॥ ध्रुवपद. ॥
विविध विषय सत्यत्वें मानिसी । परि ते मृगांबु[11] सारे ॥ या० ॥ १ ॥
पूर्ण निजात्मा विठ्ठलासी रमतां । कैंचा द्वैतभाव थारे ॥ या० ॥ २ ॥
स्वप्रकाश विठ्ठलभक्ती । न अहंतेच्या वारें ॥ या० ॥ ३ ॥

---

१. चंद्रशेखर. २. कामना फळणें=इच्छा परिपूर्ण होणें. ३. पार्वतीला आवडणारा. ४. भूतेश (शंकर.) ५. सर्व देवांचा स्वामी. ६. विष. ७. वासुकी. ८. रात्रंदिवस. ९. देवाचें नांव हाच अंकुश. १०. संसाररूप गजाचें गंडस्थल. ११. मृगजल.

### पद ८० वें.

बहुत बोलुनी काय रे! । धरी सद्गुरूपाय रे! ।
[1]चिंतितार्थ फळतील सकळ कळतीलच तरुणोपाय रे! ॥ ध्रुवपद. ॥
[2]पूर्णकाम विश्रामधाम श्रीरामरूप गुरुपाय रे! ।
शरण दुःखभयहरण विमलसुखकरण करुण तरी माय रे! ॥बहुत०॥१॥

---

## प्रासंगिक पदें.

### पद ८१ वें.

[3]हरिच्या वियोगें माय! । झाली पिशी कसें बोलूं तरि काय. ॥ ध्रुवपद. ॥

मलयपवन चंदन उपवन घन सुमनशयन मृदु [4]व्यंजनपवनपरि [5]देहन गमे मजला व्यर्थचि हा जीव जाय. ॥ हरि० ॥ १ ॥

[6]कुसुमशर शर विखरि मजवरि करि घरिं करकर घरधनि गुरुवर युवति निकरहितसा सुचेना सये! उपाय. ॥ हरि० ॥ २ ॥

न करिं कपट करिं उठ खटपट, मुरलीधर [7]नटप्रिय [8]विठ्ठलनिकट हट त्यजुनि करीं सरिसा हृदयीं धरीन पाय. ॥ हरि० ॥ ३ ॥

### पद ८२ वें.

[9]गगनदीपवंशदीपें[10] रघुवीर सुर [11]तारी. ॥ ध्रुवपद. ॥
गोदातटीं पंचवटी । वास करुनि पर्णकुटी ।
खरदूषण खरतर [12]शरें मारुनि भय वारी. ॥ गगन० ॥ १ ॥
[13]सुगळादिक मेळवुनी । [14]उदधीवरि सेतु करुनी ।
लंकापतिकुळ खळबळ मारुनि भय वारी. ॥ गगन० ॥ २ ॥
सीतेसह [15]सुमनयानीं । वन चरती उडति गगनीं ।
विठ्ठलकवि भरतनुरत भेटत परिवारी. ॥ गगन० ॥ ३ ॥

### पद ८३ वें.

[16]कमलनयन हरि दावा गे! सयानो! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. तृप्तेच्छ. २. विश्रांतिगृह. ३. यांत विरही गोपीनें श्रीकृष्णाची केलेली स्तुति आहे. ४. विंझणा, पंखा. ५. अग्नि. ६. पुष्पबाण. ७. 'नट करी' असा अन्य पाठ. ८. 'विठ्ठल सुनट परीसा' असा अन्य पाठ. ९. रामानें वनवासांत असतां काय केलें त्याचें वर्णन. १०. सूर्यवंशदीप (राम). ११. देवांस तारी. १२. बाण. १३. सुग्रीवादिक. १४. समुद्रावर. १५. पुष्पक नांवाच्या विमानांत. १६. कोणी विरहातुर गोपी आपल्या सखीची प्रार्थना करते.

कोणि कावा किमपि न वदावा कपटवेष दावा किं दावुनी दावा तयाचे पायीं लावा; सयानो! वेगीं ॥ कमल० ॥ १ ॥

दावूं बोल मी किती बोलावयाची रीती प्रीती पती रतीपती करुनि विनंती समजावा; सयानो! वेगीं ॥ कमल० ॥ २ ॥

कितीतरि धरुं मी धीर ऐकुनि होति स्थिर नको करूं उशीर ठेविन चरणीं शीर, करिन हृदय स्थिर, विठ्ठलवरद विसावा; सयानो! वेगीं ॥कमल०३॥

## पद ८४ वें.

[1]आइकें यशोदे! बाई! । तुझ्या हरिपुढें उपाय नाहीं ।
करुं कसें सांग करुं कसें? ॥ ध्रुवपद. ॥
येउनी रात्रीं आंधारीं । दगडचि दारावरि मारी ।
[2]गेंडी घेऊनी बरोबरी । युक्तीनें भिंती पोंखरी ।
गृहीं शिरोनी सहपरिवारी । करी [3]गोरसाची [4]तैस्करी ।
वांटुनि दे चोरां पोरीं । खाण्याहूनि नासाड भारी ॥
चाल ॥ हटहटें शिकीं तोडितो ।
फडफडां मडकीं फोडितो ।
मजनिकट डोळे मोडितो ॥
टीप ॥ पहातीस कायी? । चोरटी याची चतुराई. ॥ आइकें० ॥ १ ॥
दाराची करुनि बळकटी । आंगणीं सरांटे वांटी ।
कटकां खड्याची थाटी । रुतती पायांतळवटीं ।
[5]घैरधनी धांवतां पाठी । त्यालाचि मारितो मिठी ।
........................ । ........................ ॥
चाल ॥ त्याची लंगोटी फाडितो ।
दाढीला धरुनि ओढितो ।
मी सोडवितां फेडितो ॥
टीप ॥ वसन, यापायीं । बोलणें सुचेना कांहीं ॥ आइकें० ॥ २ ॥
कवण एके [6]निशीचे वेळे । शिरतां [7]सैदनीं नाकळे ।
मुली माझीं केवळ बाळें । बारा वरुषांचीं कोमळें ।

---

१. गोपींनीं यशोदेला कृष्णाचीं गाऱ्हाणीं सांगितलीं तो प्रसंग. २. सोबती, मित्र. ३. दुधाची. ४. चोरी. ५. नवरा. ६. रात्रीचे. ७. घरांत.

त्यांचिया मुखीं मुख काळें । लावुनी चोळी कुंच बळें ।
घडे विसंग घालुनी भोळें । जाचिलें बहु तया खळें ॥
चाल ॥ थोरले मुलीचा पती ।
त्याची काल केली फजिती ।
त्या गोष्टी मी सांगों किती? ॥
टीप ॥ रडे जांवई । मुली सखिन्न आपुले ठायीं ॥ आइकें० ॥ ३ ॥
तुज दिसे निपट धाकुला । परि नव्हेचि मनिंचा भला ।
विकटचि शब्द बोलिला । आज मजसीं विनोद केला ।
एका एकीं थोरसा झाला । मला म्हणे मीच तुझा दादला ।
........................ । ........................ ॥
चाल ॥ हा लेंकरूंसा दीसतो ।
माणूसपण भासतो ।
परि नव्हे हृदयवासि तो ॥
टीप ॥ राखितो गाई । हा विठ्ठल विश्वालयीं ॥ आइकें० ॥ ४ ॥

**पद ८५ वें.**

हरिचा वियोग मला साहेना साहेना बाई ! ॥ ध्रुवपद. ॥

उगीच मी चुकलें बोलुनी, त्यातें फिरूनि न येसी जेव्हां आला जणों राग कायी? ॥ हरिचा० ॥ १ ॥

जाउनि विनवा त्याप्रति विनयें, मजलाही न्याल जरी लागेन मी त्याचे पायीं. ॥ हरिचा० ॥ २ ॥

विठ्ठलप्रभु गुंतला कोठें? जाइल हा प्राण सये! जरि येइना शेष-शायी. ॥ हरिचा० ॥ ३ ॥

**पद ८६ वें.**

हरि! सर सर परता जाऊंदे सासु परोपरी गांजिल सदनीं. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. स्तन. २. केवळ. ३. 'मला' हा मराठी शब्द फारसी 'मरा' (मीम रे अलिफ)=To me या शब्दापासून झाला असेल काय? 'छत्तिसगडी' भाषेंतही 'मला' ह्या शब्दाबद्दल 'मोला' असें म्हणतात. तर हे 'मरा' 'मोला' 'मला' शब्द मूळांत एकच असतील काय? ४. नवरा. ५. गोपींचें पश्चात्तापपूर्वक भाषण. ६. नम्रतेनें. ७. कृष्ण. ८. गोपीप्रार्थना या पदांत आहे. ९. घरीं.

मज [1]गॅरतीतें ठेविसि नामें ।
'[2]कुरंगाक्षि, गजगामिनि, हे शशिवदनी'. ॥ हरि० ॥ १ ॥
याचि गुणें बहु बहुतचि ठकले ।
सुरतलक्ष लक्षावधी दीक्ष सुरमुनी. ॥ हरि० ॥ २ ॥
श्रवण नको करूं तुज हे कथिती ।
विठ्ठलादि [3]भक्तवृंद तत्पद नमुनी. ॥ हरि० ॥ ३ ॥

**पद ८७ वें.**

[4]ठकविलें आजि मला श्रीहरिनें कुंजवनीं ।
बोलूं काय बोलूं माय ! फोल मानिसील मनीं. ॥ ध्रुवपद. ॥
सकळही शृंगार करुनी । पात्रीं [5]दधिदुग्ध भरुनी ।
मथुरेचा मार्ग धरुनी । जात होतें दुरुनी ।
मातें पाहुनी, वेगीं धांवुनी, आण वाहुनी, यश ठेवी जनीं. ॥ ठक० ॥ १ ॥
ये निकट निजांग वळून । धरिलें तनुतें कवळून ।
[6]कच विखरून । [7]कुचही धरून ।
करुनी वेडी, लावुनि गोडी, [8]वसन फेडी, भय न [9]मानी. ॥ ठक० ॥ २ ॥
नेलें चल चित्त हरून । गेलें मीपण विसरून ।
केलें तें जाय सरून । त्या सचितें, सर्व मतें ।
विहित सतत तत्पदगत विठ्ठल रत तद्भजनीं. ॥ ठक० ३ ॥

**पद ८८ वें.**

[10]सखिये ! धीर धरूं किती ? ।
ऐकुनी होसी बधीर तो हरि धीर धीवर दावा. ॥ ध्रुवपद. ॥
नयनचि दंश मारी । [11]विधुमित्रचि होय [12]तमारी ।
[13]मालतीकुसुमकुमारी । गळां भासे [14]भुजगकुमारी. ॥ सखिये० ॥ १ ॥
मलयपवन करी दाहा । चंदनताप सदा हा ।
दहनचि करणें दाहा । तनुस्पर्श करुनि तरि पाहा. ॥ सखिये० ॥२॥
श्रवण करीं मच्चरिता । तूं त्वत्प्रिये सखयेकरितां ।
जाणुनी विनवा त्वरिता । आणीं विठ्ठल श्रम परिहरता. ॥ सखिये० ॥ ३ ॥

---

१. गृहिणीतें. २. मृगाक्षी. ३. भक्तसमूह. ४. कृष्णलीलावर्णन. ५. दहीं+दूध. ६. केंस. ७. स्तन. ८. वस्त्र. ९. 'मनीं' असाही अन्य पाठ आहे. १०. विरही गोपीचें आपल्या सखीपाशीं भाषण. ११. चंद्र. १२. सूर्य. १३. मालतीच्या फुलांची माळ. १४. सर्पीण.

### पद ८९ वें.

सये! जा गे! हरिला वेगीं आण. ॥ ध्रुवपद. ॥
विविध सुगंधित सुगंध न रुचती। विंधितो संनिध तो पंचबाण ॥ सये० ॥१॥
बहु वेदना ते मज बोलवेना। वृत्तिही निपट अजाण ॥ सये० ॥ २ ॥
विठ्ठलवरदा घेउनि यावें। घालुनि माझ्या गळ्याची आण ॥ सये० ॥ ३ ॥

### पद ९० वें.

कैसी वसूं मी विपिनीं एकली। करुणानिधे! धांव रे! सख्या! हरी! ॥ ध्रुवपद.॥
रजनी तमाची स्मर बहुताची। संकट समयीं पाव रे! ॥ करुणा० ॥ १ ॥
पतिहिन साधा योजिल बाधा। वदुं कारण मी त्यास ठाव रे! ॥ करुणा० ॥२॥
विठ्ठलवरदा रक्षीं बिरुदा। सत्वर चरणासी लाव रे! ॥ करुणा० ॥ ३ ॥

### पद ९१ वें.

दावा राजीवनयन। धीर न धरी हें मन. ॥ ध्रुवपद. ॥
आणा चक्रपाणी। किती शिणवूं मी वाणी ॥ दावा० ॥ १ ॥
लावा त्याचे पायीं। चित्त माझें त्याचे ठायीं ॥ दावा० ॥ २ ॥
विठ्ठलाचा स्वामी। रत झालें त्याचे पायीं ॥ दावा० ॥ ३ ॥

### पद ९२ वें.

मुरली वाजविली गोविंदें। कुंजवनीं नाना छंदें. ॥ ध्रुवपद. ॥
नादें व्याघ्र गाई। स्तब्ध झालीं एके ठायीं ॥ मुरली० ॥ १ ॥
न चले ग! निवारा। कोठुनि पक्षी इच्छितातो चारा ॥ मुरली० ॥ २ ॥
जलचरयुक्त सरिता। स्तब्ध झाली प्रेमभरिता ॥ मुरली० ॥ ३ ॥
गगनीं सुरवरदाटी। ज्याच्या प्रमदा त्याचे पाठीं ॥ मुरली० ॥ ४ ॥
विठ्ठलवरदें मुरली। नादें विश्वाची मति हरली ॥ मुरली० ॥ ५ ॥

### पद ९३ वें.

हरि आला आजि घराला गे! ॥ ध्रुवपद. ॥
मुरलीवाला। धरि वनमाला। भृंगमद भाला। कीं लक्षुनि त्याला। हा जीव निवाला ॥ हरि० ॥ १ ॥

---

१. वरील प्रसंग. २. मदन. ३. विठ्ठलकवीला वर देणाऱ्याला (कृष्णाला). ४. शपथ. ५. हें कृष्णप्रेप्सु मदनशरहत गोपीचें भाषण आहे. ६. रात्रि. ७. वरीलच प्रसंग. ८. कमलनेत्र. ९. मुरलीचा ध्वनि ऐकतांच कोणाची काय दशा झाली तिचें वर्णन. १०. नदी. ११.स्त्रिया. १२. कृष्णलीलावर्णन. १३. कस्तूरी. १४. कपाळाला.

नीलतमाला । कृतशुभगाला । निरखुनि झाला । प्रमोद[1] मनाला । विविधें[2] करणाला ॥ हरि० ॥ २ ॥

पदनिरतांला । दे अमृताला । वंदुनि त्याला । विठ्ठल धाला । कीं तन्मय झाला ॥ हरि० ॥ ३ ॥

## पद ९४ वें.

सजण[3] सखा **राम** माझा नेऊं नका वनीं ।
तुम्हा किती सांगूं समजावुनी मुनी[4] ! ॥ ध्रुवपद. ॥
श्री**राम**विणें कवणें सुखातें । साठवूं आठवूं निजमनीं. ॥ सजण० ॥ १ ॥
सह**सौ**मित्रही बाळक नेतां । रुसती हांसती घरीं जनीं- ॥ सजण० ॥ २ ॥
न्यावी गजरथहयसंपत्ती[5] । मी उदार धन जीवनीं. ॥ सजण० ॥ ३ ॥
**विठ्ठल**प्रिय **र**घुनाथीं रमलों । मी **द**शरथ अनुदिनीं ॥ सजण० ॥ ४ ॥

## पद ९५ वें.

सोडीं[6] सोडीं **हरि** ! । जाऊं दे पाणिया. ॥ ध्रुवपद. ॥
सोडीं रे ! **श्री**पती । गांजिल गृहपती[7] ।
किती करिसी मजसीं तरि गोडी ॥ सोडीं० ॥ १ ॥
तूं धृतषड्गुण । कवण वर्णिल गुण ।
जडजगीं[8] **विठ्ठल**मति तरी थोडी ॥ सोडीं० ॥ २ ॥

## पद ९६ वें.

यशोदे[9] ! तुला काय गे ! । सांगों माय ! गे ! ॥ ध्रुवपद. ॥
चपल कटाक्षें भुलविति मातें । बाळ मी करूं कैसा उपाय गे ! ॥ **यशोदे**० ॥१॥
कठिण कुंचाग्रें[10] तनुतें रोविती । भासतें ते क्षणीं प्राण जाय गे ! ॥ **यशोदे**० ॥२॥
**विठ्ठल**प्रिय मी अन्यथा[11] न वदें । माय ! तूं तुझे साक्षी पाय गे ! ॥ **यशोदे**० ॥३॥

## पद ९७ वें.

सोडीं[12] रे ! **हरि** ! खोडीं रे ! देईं जोडी रे ! ॥ ध्रुवपद ॥
व्रजवनिता[13] तुजलागुनि गांजिती । सांवळ्या ! यांत कायसी गोडी रे ! ॥सोडीं०॥१॥

---

१. आनंद. २. अनेक इंद्रियांला. ३. विश्वामित्र रामलक्ष्मणांस मागण्यास आला असतां दशरथ म्हणतो. ४. हे विश्वामित्रा ! ५. अश्व. ६. गोपीप्रार्थना. ७. नवरा. ८. मूर्ख जगांत; (पक्षीं) जडांत आणि जगांत. ९. यशोदेपाशीं कृष्णाचें भाषण. १०. स्तनांचीं टोंकें. ११. खोटें. १२. यशोदेचें कृष्णापाशीं भाषण. १३. गोकुळांतील स्त्रिया.

ठक तुजला जन सकळही म्हणती । [1]पाडसा ! हा ठसा आजि मोडीं रे ! ॥ सो०॥२
[2]विठ्ठलवरदा ! शिकवूं तुला किती । वासुरा ! आइकें गोष्ट थोडी रे ! ॥ सो० ॥३॥

### पद ९८ वें.

[3]तो यदुराज साजणी ! [4]राजीवनयन वाजवी पांवा ।
गरिब नवाज वाजवी पांवा. ॥ ध्रुवपद. ॥
नामोच्चरितें । कृतसंकेतें । भाव मनीं समजावा. ॥ तो यदु० ॥ १ ॥
[5]कुवलयनयना । गोकुलललना । घेति वनांतरि धांवा ॥ तो यदु० ॥ २ ॥
विठ्ठलप्रियकर । तो करुणाकर । प्रेमें हृदयीं धरावा ॥ तो यदु० ॥ ३ ॥

### पद ९९ वें.

[6]पाहतें मी येईं लौकरी हरी ! ।
उशीर न लावीं, करीं धरीं ॥ ध्रुवपद. ॥
तवगुणकीर्तन पडतां श्रवणीं । कवण नवरी तुज न [7]वरी. ॥ पाहतें० ॥ १ ॥
बंधु [8]हटिता ताताज्ञा [9]न मनी । चैद्य मागधकुळविवरीं. ॥ पाहतें० ॥ २ ॥
मिळती नृपाल [10]शृंगाल तयाप्रती । मथुनी हरीं मज [11]समरीं. ॥ पाहतें० ॥ ३ ॥
विठ्ठलवरदा ! तव [12]पदपंकजीं । रत [13]भीमसुताभ्रमरी. ॥ पाहतें० ॥ ४ ॥

### पद १०० वें.

[14]श्रीहरिलीला । करी सुंदर धरि मुरलीला ॥ ध्रुवपद. ॥
मंदर जेणें [15]नग उचलिला । वर्णुनि ज्यातें हरिती [16]कलिला । नंदयशोदा माउलीला । [17]नंदन तो वदुं काय [18]भुलीला ॥ श्रीहरि० ॥ १ ॥
कंजन ज्याच्या पदावळीला । प्रांजळ जोडीं करांगुळीला । कुंजवनीं तो एकलीला । रंजवी येउनी गोपमुलीला ॥ श्रीहरि० ॥ २ ॥
स्मरणें ज्याच्या आजि भलीला । करिती सुरनर [19]जीभलीला । तो हरि राखी गांवलीला । धरि त्या विठ्ठल साउलीला. ॥ श्रीहरि० ॥ ३ ॥

---

१. हे वत्सा ! २. विठ्ठलाला वर देणाऱ्या (कृष्णा.) ३. कृष्णलीलावर्णन. ४. कमलनेत्र. ५. कमलनयना. ६. रुक्मिणीनें विवाहप्रसंगीं केलेली कृष्णस्तुति. ७. वरणें=लग्न करणें. ८. हट्टी. ९. मानीत नाहीं. १०. कोल्हे. ११. युद्धांत. १२. पदकमळीं. १३. रुक्मिणीरूप भ्रमरी. १४. कृष्णलीलावर्णन. १५. पर्वत. १६. पापाला. १७. पुत्र (कृष्ण.) १८. विसरला. १९. जीभलीला करणें=जिभेची लीला करणें, स्तुति करणें.

## पद १०१ लें.

[1]राजा! वेड तुझें हें काय?। सत्वर धर जा [2]मुनिचे पाय ॥ ध्रुवपद. ॥
कथितों आजी तुज गुज एक । राया! सावधान ऐक ।
अजि तूं म्हणशी जयासि लेंक । राम तो पूर्ण ब्रह्म देख ।
.............................. । .............................. ।
तो हा अवतरला अनपाय ॥ सत्वर धर जा० ॥ १ ॥
पूर्वी कश्यप तूं आर्या! । अदिति हे कौसल्या भार्या ।
उभयतां करुनि तपश्चर्या । आराधुनि [3]देवधुर्या ।
प्रार्थिलें तया वरदवर्या । [4]त्वयास्मत्सुतता स्वीकार्या ।
तो हा तव गेहीं रघुराय ॥ सत्वर धर जा० ॥ २ ॥
तयाची प्रिया [5]जगज्जननी । प्रकटली असे जनकसदनीं ।
घडो उद्योग भला सुजनी । हेतु हा मुनिच्या आण मनीं ।
न धरुनि शंका किमपि मनीं । मुलें हीं अर्पी गुरुचरणीं ।
हा निज कल्याण सदुपाय ॥ सत्वर धर जा० ॥ ३ ॥
असें हें परम गुह्य वृत्त । ऐकतां राजा [6]पंक्तिरथ ।
नयनीं प्रेमाश्रु वहात । आपणा मानी [7]कृतकृत्य ।
मुनिला सानुज तो रघुनाथ । अर्पी कृपण जसें हो! वित्त ।
हर्षे मुनिसह विठ्ठलराय ॥ सत्वर धर जा० ॥ ४ ॥

## पद १०२ रें.

तो रघुराज दयाळ धणी । असतां मी कवणा न गणी. ॥ ध्रुवपद. ॥
सर्वसाक्षी सर्वांतरगत अघटित ज्याची करणी ।
सर्वघटीं प्रतिबिंब दिसोनि अलिप्त जसा [8]तरणी ॥ तो० ॥ १ ॥
विश्वजन विश्वंभर तत्पर विश्वोद्धारभरणी ।
दीनबंधु [9]मुनिवर्यनितंबिनी उठविली चरणीं ॥ तो० ॥ २ ॥
चाप उचलित वदा नृपासी पडोनी चळे [10]धरणी ।
माळ करें मी भूपेशसुता गळीं घालुनियां [11]परणीं ॥ तो० ॥ ३ ॥
कीर्ति मुखें वदति मुनिवर्य महत्पतितोद्धरणी ।
लब्ध सुखें विठ्ठल याचे रतला नामस्मरणीं. ॥ तो० ॥ ४ ॥

---

१. वसिष्ठाचा दशरथास बोध. २. विश्वामित्राचे. ३. श्रेष्ठ देवाला. ४. त्वां आमची सुतता (पुत्रपणा) स्वीकारावी=तूं आमचा पुत्र व्हावेंस. ५. जगन्माता (जानकी). ६. दशरथ. ७. सफलजीवित. ८. सूर्य. ९. अहल्या. १०. पृथ्वी. ११. वरीं, विवाह करीं, परिणय करी.

## पद १०३ रें.

यशोदे! गोपी महा ठकल्या ।
गोपी महा ठक लोपिति भाव निरोपिसि तूं मज ।
म्हणति घरीं जाऊं रे! चल मुला ।
गोष्टी यांच्या सांगुं मी काय तुला ॥ ध्रुवपद. ।
स्वगृहीं मज नेउनि बैसविती । सभोंवत्या आपण ही बसती ।
'होसी पति काय?' असें पुसती । आलिंगुनी उंच सुस्वरें हंसती.॥१॥
म्हणती कृष्ण शीघ्र करीं करुणा । एकांतीं होईं प्रिय तरुणा ।
क्षणोक्षणीं लागति मच्चरणा । किती वदूं जारिणी आचरणा. ॥ २ ॥
विसर्जुनी कंचुकी का लुगडीं । स्मरालया सांडुनियां उघडीं ।
धरुनी मज घालिती फुगडी । म्हणती तूंच आमुचा प्राणगडी. ॥ ३ ॥
गरती जन होउनियां फिरती । कुचेष्टा दाटुनियां करिती ।
करें आपुल्या *** धरिती । विठ्ठल जाणे काय कसें करिती. ॥ ४ ॥

## पद १०४ थें.

मीजोडिन हरिसहवास ।
व्रजवास त्यजुनि, वनवास करिन कवणास न पुसतां ॥ ध्रुवपद. ॥
श्रवण सतत मुरलीरव युत करि मानस हत गत मति सहित तई पतिसहित जन शिकविति हित किती वदूं विपरीत ॥ मी जोडिन० ॥ १ ॥
गृहीं कलकल करिती सकल तनुस कल सकल मन मदन विकल मतिस पटल तम करि तरि हे विठ्ठलवरद निरंतर ॥ मी जोडिन० ॥ २ ॥

## पद १०५ वें.

घातकी मोहरी[1] मन मोहरि तो हरि वो! ॥ ध्रुवपद. ॥
श्रवणीं पडतांचि शब्द स्तब्ध मन लुब्ध होय बहु परि । मजवरि कृपा[2] अंतरीं अंतरीं वो! ॥ घातकी० ॥ १ ॥
विकल गात्र दिन रात्र करित जिव मात्र तनु तव्यावरी । त्यावरि सये! गांजिती गृहकरी[3] वो! ॥ घातकी० ॥ २ ॥
सकल काज जनलाज त्यजुनि यदुराज हुंडकुं[4] चला तरि । व्रजपुरीं कवि विठ्ठलाचे घरीं वो! ॥ घातकी० ॥ ३ ॥

---

१. मुरली. २. 'स्मृति' असा अन्य पाठ आहे. ३. नवरा. ४. हुडकणें=शोध करणें.

### पद १०६ वें.

सखे! मी वरिला हा **यदु**राज । मान करा ना वो! ॥ ध्रुवपद. ॥

निपटकपट जिव करि खटपट मनिं चटपट कांहीं आठवेना । उठवेना वो! धरा ॥ सखे० ॥ १ ॥

**विठ्ठल** वरदवर वर वर **स्मर**शर मारि तरि धीर धरवेना । फिरवेना सांवरा ॥ सखे० ॥ २ ॥

### पद १०७ वें.

धरूं नको पदरीं अरे! **हरी**! । किति कपट काट करिसी निकर पूर्ण दधिघट फुटले, फुटेल फुकट फुकट ॥ ध्रुवपद. ॥

जनिं तुज चाट म्हणति आचाट, त्यजुनियां हाट, सोडीं सोडीं वाट, चोरा! व्रजगवळणी विहिणी बहिणी असती साजणी, बसती जपुनि टपुनि घरीं घरधणी ॥ अरे० ॥ १ ॥

गांजिला पति बुडविलासि विपरीतपणीं दाविसी किती तोरा तोरा न करूं, मज मदन श्रम दे कुंद विषद कोर करंद **विठ्ठल**वरद नमी नमी पद धरून ॥ अरे० ॥ २ ॥

### पद १०८ वें.

कशि मी जाऊं, **गो**विंद लपुनि जपुनि टपुनि बसे वनिं, कशि मीं जाऊं? ॥ ध्रुवपद. ॥

परि हरुनि दया लक्षुनि ह्रदया । नयनशर शरें ताडिता ॥
कवण करिल संरक्षण ते स्थळीं । काय म्हणुनि मज धाडितां ॥ कशि० ॥१॥
धरुनि मज करीं करिल मस्करी । तरि गरतपण गमावलें ॥
हंसति विहिणी बहिणी त्यापरि मग । सहजचि विषयीं फावलें ॥कशि० ॥२॥
गमन परि मतें विपरित गमतें । तुम्हीं तरि मनिं न पहा कसें ? ॥
विनति करित **विठ्ठल** वरदपदीं । न्याल तरि सवें येत असें ॥कशि० ॥ ३ ॥

### पद १०९ वें.

केवढी **हरि**! तुझि माया रे! । जीव जीवासि भ्रमाया रे! ॥ ध्रुवपद. ॥
शक्र विरिंची प्रमुख सुरांतें । लाविते नित्य नमाया रे! ॥ केवढी० ॥ १ ॥
म्हणसि दुरत्यय येते प्रत्यया । योग्य तूं ईशीं दमाया रे! ॥ केवढी० ॥ २ ॥
**ना**रायणनामामृतलहरी । **विठ्ठलीं** विहित रमाया रे! ॥ केवढी० ॥ ३ ॥

---

१. बाजार. २. नवरा. ३. गोपीनीं केलेली स्तुति. ४. इंद्र. ५. ब्रह्मदेव.

### पद ११० वें.

सहज हरीची मनिं मूर्ति जडतां अन्य स्फूर्ति राहिली ॥ ध्रुवपद. ॥
राहे ज्या ज्या ठायीं । चित्त माझें त्याचे पायीं ॥
देणें घेणें कांहिं नेणें स्फुरे हृदयीं तन्नाम गेली वाम काम काहिली ॥सह०॥१॥
जेथें जेथें पाहीं । हरीविण कांहीं नाहीं ॥
मुखीं हरी मनीं हरि होतां सकळ गृहकाज गुरुजनलाज आज वाहिली॥सह०॥२॥
लक्षितां लक्षितां । आलिं विठ्ठल नामें हाता ॥
भीमातटीं वाळुवंटीं उभी विटेवरि नीट शुद्ध वीट धीट पाहिली॥ सहज० ॥३॥

### पद १११ वें.

बाई! त्याला कोणी सांगा गे! । सांगा गे! सांवळियासी ॥
आंगणीं दिवसासि आंगासिं कां झोंबे ॥ ध्रुवपद. ॥
वागों नेदी मज वाटे । हाणी अंगुळिनें स्तनिं गोटे ॥
मागें मागें हिंडे जन नागर[1] पाहति लागवेगें ॥ कोणी० ॥ १ ॥
भूलवी जवळ बसुनी । कांहीं गूज बोलूं म्हणे कोणी ॥
तंव गाल चुंबुनि मम शयनीं करि चैल सैल ऐसा कैसा मूल ॥ कोणी० ॥२॥
सृष्टित कृत्रिम ऐसें । नाहीं चेष्टित तें वदुं कैसें? ॥
मज श्रेष्ठपणाहुनि भ्रष्टविलें यासि 'कृष्ण दैवत' म्हणे विठ्ठलदीक्षित॥ कोणी० ॥३॥

### पद ११२ वें.

कोणी कांहीं म्हणा वो! ।
परि त्यासी मी रत सये! दासी होउनि हरिच्या पदीं ॥ ध्रुवपद. ॥
तो व्रजवासी । स्वामी जिवासी ।
कोण जाणे काशी । प्रयाग द्वारकेसी ॥
पुष्कर पापनाशी । शरयू प्रवरा नदी ॥ मी रत० ॥ १ ॥
सद्गुणराशी । वंद्य सुरांसी ।
प्रेमभावपाशीं । धरुनि भुजपाशीं ॥
विठ्ठलसहवासीं । स्तविति शुक नारदीं ॥ मी रत० ॥ २ ॥

---

१. नगरवासी.

### पद ११३ वें.

चल जाऊं साजणी ! श्रीहरिकडे ।
कां इकडे तिकडे गडे ! गमसि चहुंकडे दडसि वेडे ! ॥ ध्रुवपद. ॥
मुरलीधर मुरलीच्या नादें भरि वृंदावन करि पदपावन ।
बससि काय यदुरायपाय मज माय दाखवीं चारिन मृदु पेढे ॥ चल० ॥ १ ॥
सासू काय करि नणंद जाऊ तरि, दीर मला उंदीर गमतसे ।
धीर धरुनि चल नीरंजनयने[1] ! उशिर होतसे भिसी काय भ्याडे ! ॥ चल० ॥२॥
आसपास जन हांसति म्हणवुनि रासमंडाळिं विलास विवर्जिसी ।
कासयासि हे चारु कुसुमशरमार फार मज नावडती विठ्ठलविभुचेडे ॥ चल० ॥३॥

### पद ११४ वें.

आजुनि कां नये बोल सये ! हरि आजुनि कां नये बोल ।
बोलसि बोल सखोल ते बोलचि झाले सर्वहि फोल ॥ ध्रुवपद. ॥
तो तुजलागिं कदापि न सोडी सुललित वज्र कपोल ।
तूंच वदत होतीस पहा पहा तुझि आणि त्याची झोल ॥ सये ! आजुनि० ॥१॥
शृंगारुनि मुख सुरुचिरतर नग लेवविलेसि अमोल ।
नंदनंदन मुकुंदपदाविण गमति मला काकोल[2] ॥ सये ! आजुनि० ॥ २ ॥
सये ! म्यां तुझिया वचनीं दिधला दृढ सर्वस्वें डोल ।
कार्य घडोनि मग कां वाजेना विठ्ठलवचनीं ढोल ॥ सये ! आजुनि० ॥ ३ ॥

### पद ११५ वें.

मज लावा हरिचे पायीं । पाहीं बहुत उपायीं ॥
पाहा पाहा कांहीं । आपुले ठायीं ॥ ध्रुवपद. ॥
ताप दे कुसुमचाप[3] । करूं किती विलाप ।
करिति संताप माय कीं बाप । कवण तरि आप ॥
गणुं मी किती पाप । माप नाहीं ॥ मज लावा० ॥ १ ॥
सार मुक्तमणि हार । सुमनसंभार[4], गमति मज भार ।
नका करूं फार, कपट उपचार । करुनि निर्धार ॥
होइन मी ठार । कुसुम विष खाई ॥ मज लावा० ॥ २ ॥

---

१. कमललोचने. २. कालमेचक या नांवाचें विष किंवा डोमकावळे. ३. मदन. ४. पुष्पांचा शृंगार.

नका करूं साजणी ! साज निजकाज । न घडतां वाज ।
देतसा राजमुगुट **यदुराज** । दाखवुनि लाज ।
लावा मला आज । **विठ्ठलपायीं.** ॥ मज लावा० ॥ ३ ॥

## पद ११६ वें.

माझ्या घरांत येउनि **गोविंद** । करि नानापरिचे छंद ॥ ध्रुवपद. ॥
गाई दोहुन पीतो दुध । याची केवळ गेली शुद्ध ॥
............... । गे! **यशोदे**! संभाळ अपुला गांव गे! ॥ माझ्या० ॥१॥
माझ्या सुनेस गे! धरिलें । तिला बळेंच गे! चुंबिलें ॥
पाणी आणतां बिदिसि[1] नग्न केलें। मला देखुनि झट्कर पळे गे! ॥माझ्या०॥२
माझ्या गाइला सोडुन दिलें । द्वारीं गर्दभ आणुनी बांधिलें ॥
पहाट[2] होतां दुहायाला[3] गेलें । चहुं थानांचें एकवट जालें गे! ॥माझ्या० ॥३॥
रात्रीं येउन दहिंदुध चोरी । न सांगतां पोरांस बुक्या मारी ॥
आडवा होतो **यमुना**तिरीं । याच्या भेणें जाऊं दिगंतरीं गे! ॥ माझ्या० ॥४॥
नानापरिचीं गाऱ्हाणीं येती । ऐकतां मति तन्मय होती ॥
**विठ्ठलप्रभु** येउनि काकुळती । त्याची अखंड कीर्ति मुखीं गाती गे! ॥माझ्या० ॥५॥

## पद ११७ वें.

**हरिला** जाउन आण ।
सखे! सये! माझी आण[4], माझी आण, माझी आण. ॥ ध्रुवपद. ॥
बाण धरुनि पंचबाण[5] विंधी संधि करुनि उड्डाण ॥ माझी० ॥ १ ॥
प्राणजीवन **विठ्ठलविभु** प्रार्थी स्वार्थी परम सुजाण. ॥ माझी० ॥ २ ॥

## पद ११८ वें.

**देवि**! **त्रिपुरसुंदरि**! मां पाहि सततम् ।
**अंब**! **जगदंब**! दिनहृदयसदये! ॥ ध्रुवपद. ॥
चंद्रकंकणलसच्चंद्रचूडप्रभे! चंद्रमाकृतिभृकुटि! मंदहसने! ।
चंद्रबिंबाधरे! चंद्रवसने! शरच्चंद्रशेखरप्रिये! चंद्रवदने! ॥ देवि० ॥ १ ॥
हेमकांतिप्रभे! हेमकुंडलहेममुक्तिकामणिहेमकरकंकणे! ।
हेममालाग्रीवपदककौस्तुभहेमहेमकट्याभरणहेमवसने! ॥ देवि० ॥ २ ॥

---

१. गल्लींत, रस्त्यांत. २. 'प्रभात' याचा अपभ्रंश 'पहाट.' ३. दूध काढायाला. ४. शपथ. ५. मदन.

चित्रमाल्यांबरे! चित्रजपनीकरच्चित्रलेपनगंध सुचित्रजवने!।
सारिगमपधनी संगीतवाद्यप्रिये! विठ्ठलानंद आनंदजीवने!॥ देवि० ॥३॥

---

## संस्कृत पदें[1].

### पद ११९ वें.

भज भज गजतुंडम्। मतिदं मंडितगंडम् ॥ ध्रुवपद. ॥
लीलाचालितशुंडादंडम्। करधृतरदखंडम्।
स्मृतिदं निजजनजाड्यतमोमार्तंडम्। दंडितपाखंडम्।
विलसद्वाहुचतुष्टयमंडम्। भृतमोदकपिंडम्।
द्विषदिदधानमैक्षवदंडम्। विद्यानलकुंडम्।
सिद्धिममोखुध्वजमरिदंडम्[2]। विठ्ठलाश्रयभांडम् ॥ भज भज० ॥ १ ॥

### पद १२० वें.

शुद्धं ब्रह्मपदं वंदे सीतारामम्. ॥ ध्रुवपद. ॥
हैमवतीहरचित्तविरामम्। दिनकरवंशललामम् ॥ शुद्धं० ॥ १ ॥
पदरज उद्धृत गौतमवामम्। सजलपयोधरश्यामम् ॥ शुद्धं० ॥ २ ॥
विग्रहविडंबितकामम्। विठ्ठलकुतुकारामम् ॥ शुद्धं० ॥ ३ ॥

### पद १२१ वें.

श्रीसांबं नमाम्यहम्। कलिकृतानंतकल्मषापहम् ॥ ध्रुवपद. ॥
विधृतवामनगजास्यरुहम्। गलगलकृत्तिपन्नगावहम् ॥ श्रीसांबं० ॥ १ ॥
कलितनयनसंज्वलितहुतवहम्। मनसिजवेष्टितासहम् ॥ श्रीसांबं० ॥ २ ॥
चरणकमलमुनिहृदयमधुलिहम्। विठ्ठलात्मसुखदकृपाहम् ॥ श्रीसांबं० ॥ ३ ॥

### पद १२२ वें.

स्मर कृष्णं कृपालयम्। निजभजकहृद्भवन सुखोदयम् ॥ ध्रुवपद. ॥
निहतपूतनाशकटवृषहयम्। पशुपंगयशोदास्तनंधयम् ॥ स्मर० ॥ १ ॥
विधिपुरंदरप्रदर्शितनयम्। संदलितमित्रजा बिलेशयम् ॥ स्मर० ॥ २ ॥
मिलितबल्लवीनिकरकृतदयम्। विठ्ठलप्रकृतिचिद्गुहाशयम् ॥ स्मर० ॥ ३ ॥

---

१. हीं संस्कृत पदें फार अशुद्ध आहेत. यांची शुद्ध प्रत मिळवून कोणी दिल्यास तिचा संग्रह योग्य स्थळीं अवश्य करूं. २. आखु=उंदीर.

## पद १२३ वें.

बालमते श्रीपते ! कपटपटु वाग्विलसितं किमिति मां वदसि मृषा हरे॥ध्रुवपद.
लीलाचटुलं मृगजलपटलम् । जलगताभ्रचंचलं न लज्जसि ॥ मां वद० ॥ १ ॥
माहादलविहिता मग्नंविहिता । मनुजमानुवर्धनं प्रियज्जसि ॥ मां वद० ॥२॥
विठ्ठलनुत चतुरावा मनुसुर । अलमनेन भाषणेन मुह्यसि ॥ मां वद० ॥ ३ ॥

## पद १२४ वें.

सांबशिवहर पालय मां परमा कृपा महि देही हर सांब शंकरंग शंकरा रवि संकटं कस कटनिवर्तय ॥ ध्रुवपद. ॥

शंबरारिदहना !। करिटचर्माबरादिवसना ! । शाश्वतदरकंबलाहिकलना ! शाश्वतदिगंबरा ! जगदीशा ! सुरत्पंचवदना ! । त्रिनय दशकरार्थशमना ! खलबलहारका ! ध्वतारका ! सुरारी कुमारकामपूरका ! मरालय ॥ सांब० ॥१॥

मंदरादिवासा ! प्रविलसत मदरागरासा । नटविधि पुरधरात्यहासा । प्रविलय धुरंधरा विहत्क्लेशा । प्रखर गरल कंठा प्रमित गणपति मति हत कुंठा भवमय बाशका विमाशका शकरधृतशाश पाश कोश मृन्महालय ॥ सांब॥२॥

भूषणारिभूषा । विहित रत दोशणप्रदोषा । मुनिशमल शोशणादि सोषा । कृति तिभीषा । विश्ववंद्यचरणा । पदनत विठ्ठलादि शरणा । प्रचुरवरांग । गांग सांग गांग विमलतरंग भंग फुंग मंगलालय ॥ सांब० ॥ ३ ॥

---

## हिंदी पदें.

## पद १२५ वें.

रहियो गुरुबच्चे गुरुकदमसे । भज भज हरदमसे ॥ ध्रुवपद. ॥
भज गुरु नारायण मनमें । धूंड देख सब घट तनमें ॥
कहिये गुरु है रब सब जनमें । रहियो उदमसे ॥ रहियो० ॥ १ ॥
अवल गुरु देख अपना । ले मनमाला जप वो जपना ॥
तनका हुवेगा सपना । मिलजा अदमसे ॥ रहियो० ॥ २ ॥
बहु दीनसे तन पायी । क्या करता कमाई ॥
गाफल मत रहना भाई ! । हुशार दमसे ॥ रहियो० ॥ ३ ॥
गुरु साहेबने मेहरकी । निर्गुण ज्योत जहरकी ॥
और प्रेम लहरकी । विठ्ठलपद्मसे ॥ रहियो० ॥ ४ ॥

### पद १२६ वें.

पंचवदनका नाम लिया सो नही धोका जमकालोका ।
वक्रतुंडसे जी ले बचती सरदार बडा है भूतनका. ॥ ध्रुवपद. ॥
सिरपर गंगतरंग सुशोभत चमकजोति बिज चंदोकी ।
निढिल पटल पर जगम निगमत्रै नशा खुब भंगोकी ।
सुरत चमेली बनी अलबेली शंकर जोत मतवालनकी ।
चढे बैल खुब सहलं त्रिपुरपर सिंधन हातनकी ।
जटा मुकुट सीरा गगन लगो है कर धनु हथियार तिर सुलका ॥ वक्रतुंडसे० ॥ १ ॥
वामांगोपर गिरिजा सोभत बभूत चढावे खूब रंगकी ।
व्याघ्रांबरपर सायल पटली चली सवारी गिरधरकी ।
गजखालनकी बना दुसाला गले माला नररूंडनकी ।
जंगम गजगम ज्योति उजाला तिर लोचनसे आगनकी ।
गगनमंडल सब धूर भरी है हरहर मेला दासनका ॥ वक्रतुंडसे० ॥ २ ॥
अगमनिगम दोड भाट पुकारत बाजत डंका डमरूका ।
नारद तुंबर कीर्ति बखानत ठावठिकाना निर्गुनका. ।
ऐसा भोलानाथ बिराजे गढ किया कैलासनका ।
साही नामका ध्यान जपत है गुरूसाहेब है रामनका ।
उनकी पूर्ण कृपा भई बोले विठ्ठलभट जलकोटनका ॥ वक्रतुंडसे० ॥ ३ ॥

---

### भूपाळ्या.

(१)

उठ वो ! रुक्माबाई ! सावध करिं वो ! देवाशी ।
सनकादिकें स्नान केलें चंद्रभागेशी ॥ ध्रुवपद. ॥
उजाडलें उजाडलें अझुनी निद्रा हो ! कैशी ।
मिळालों लेंकुरें दर्शन द्यावें आम्हाशी ॥ उठ० ॥ १ ॥
ब्रह्मा विष्णु महेश हे सृष्टीचे अधिकारी ।
तेहतिस कोटी देव उभे तिष्ठत महाद्वारीं ॥ उठ० ॥ २ ॥
नारद तुंबर शुभ गायन करी ।
टाळ विणा मृदंग हे वाजति महा गजरीं ॥ उठ० ॥ ३ ॥
निवृत्ति सोपान ज्ञानदेव मुक्ताई ।
नरहरी सोनार गोरा कुंभार गोणाई ॥ उठ० ॥ ४ ॥

नामदेव कबीर मिरा माझी जनाई ।
रोहिदास कूर्मदास तिसरा सेना हा न्हाई[1] ॥ उठ० ॥ ५ ॥
काशी गंगा भागिरथी अवघे तीर्थ सुंदरा ।
झारी भरुन उभे तिष्ठत असति महाद्वारा ॥ उठ० ॥ ६ ॥
'भीमकआत्मजे[2]! आई! करावी त्वरा ।
उठा हो! विठोबा! तुम्ही मुखमार्जन करा.' ॥ उठ० ॥ ७ ॥
इतकेंही ऐकुनि देव जागृत जाहला ।
डोइस टोपी आंगीं घोंगडी ऐसा हरी ल्याला. ॥ उठ० ॥ ८ ॥
उजळती नंदादीप धनीवर देखिला ।
विनविती सती सदा, नकळे माया विठ्ठला. ॥ उठ० ॥ ९ ॥

(२)

उठीं उठीं बा कान्हया! । जाइं वनिं तान्हया! ।
धेनु येती पान्हिया । वत्सांसाठीं. ॥ ध्रुवपद. ॥
आंगीं घालीं आंगडी । खांदीं घेईं घोंगडी ।
पाहती तुझे गडी । वाट तुझी ॥ उठीं० ॥ १ ॥
विनवूं तुतें किती । पायीं [3]ले नवीं [4]जोतीं ।
दहींभाताची [5]शुती । सिद्ध असे. ॥ उठीं० ॥ २ ॥
विठा म्हादा गोंदा । वणजा वांकडा पेंदा ।
उभे असती गोविंदा! । मित्र तुझे ॥ उठीं० ॥ ३ ॥

(३)

जागृती होय हनुमंता । बोले अंजनी माता ।
भेटी जाईं रघुनाथा । सीताकांता [6]लवलाही ॥ ध्रुवपद. ॥
राम शोभे सिंहासनीं । वामांकीं जानकी घेऊनी ।
भरत शत्रुघ्न दोन्ही । चामरें घेऊन ढाळती ॥ जागृती० ॥ १ ॥
करद्वय जोडून सव्य । उभा लक्ष्मण सुग्रीव ।
अंगद बिभीषणराव । जांबुवान आलासे ॥ जागृती० ॥ २ ॥
वसिष्ठ अत्रिऋषीश्वर । संतमंडळी समग्र ।
ऋक्षवानरांचे भार । जयजयकार करिताती ॥ जागृती० ॥ ३ ॥

---

१. न्हावी, हजाम. २. रुक्मिणी. ३. घाल. ४. जोडे, वहाणा. ५. शिदोरी. ६. लवकर, सत्वर.

ऐसें विनवी जननी । मारुती उठले कर जोडुनी ।
मस्तक ठेवी रामचरणीं । विठ्ठल नयनीं विलोकी. ॥ जागृती० ॥४॥

---

## पाळणा.

जो जो जो जो रे! कुळभूषणा! दशरथनंदना! ॥
निद्रा करिं बाळा! मनमोहना! । रामा! लक्षुमणा! ॥ ध्रुवपद. ॥
पाळणा लांबविला अयोध्येसीं । दशरथाचे वंशीं ।
पुत्र जन्मला हृषिकेशी[1] । कौसल्येचे कुशीं ॥ बाळा जो जो रे! ॥ १ ॥
रत्नजडीत पालख[2] । झळके अमोलिक ।
वरतीं पहुडले[3] कुळदीपक । त्रिभुवननायक ॥ बाळा जो जो रे! ॥ २ ॥
हालवी कौसल्या सुंदरी । धरून ज्ञानदोरी ।
पुष्पें वर्षती सुरवरीं । गर्जति जयजयकारीं ॥ बाळा जो जो रे! ॥ ३ ॥
विश्वव्यापका! रघुराया! । निद्रा करिं बा! सखया! ।
तुजवर कुरवंडी[4] करुनीयां । सांडिन अपुली काया ॥ बाळा जो जो रे! ॥४॥
येउनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ।
'राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥ बाळा जो जो रे! ॥ ५ ॥
याग रक्षुनियां अवधारा । मारुनि निशाचरां ।
जाशी सीतेच्या सैंवरा । उद्धरि गौतमदारा ॥ बाळा जो जो रे! ॥ ६ ॥
पर्णिल जानकी सुरूपा । भंगुनियां शिवचापा ।
रावण लज्जित महाकोपा । नव्हे पण हा सोपा ॥ बाळा जो जो रे! ॥७॥
सिंधुजलडोहीं अवलीळा । नामें तरती शिळा ।
त्यावर उतरोनी दयाळा! । नेसी वानरमेळा ॥ बाळा जो जो रे! ॥ ८ ॥
समूळ मर्दूनी रावण । स्थापिल बिभीषण ।
देव हे सोडवील संपूर्ण । आनंदेल त्रिभुवन ॥ बाळा जो जो रे! ॥ ९ ॥
ऐसीं चरित्रें अपार । करील मनोहर.' ।
इतुकें ऐकूनी उत्तर । हांसले रघुवीर ॥ बाळा जो जो रे! ॥ १० ॥
राम भावाचा भुकेला । भक्ताधीन जाहला ।
दास विठ्ठलें ऐकिला । पाळणा गाइला. ॥ बाळा जो जो रे! ॥ ११ ॥

---

१. हृषिक+ईश=इंद्रिय+स्वामी=जितेंद्रिय. २. पाळणा. ३. निजले, ४. कुरवंडी करणें=ओंवाळून टाकणें, बळी देणें.

## कूटसंग्रह.

(श्लोक.)

कोणे एक वनीं विचित्र पुंतळा[1] जेवावया बैसला
पात्रीं जेवण जेवितां, अति बळें पात्रेंचि तो भक्षिला ।
त्याची जे वनिता[2] वनांत फिरतां सूर्यास प्रार्थी सदा;
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा[3] षण्मासिंचा वायदा[4]. ॥ १
[5]पंचायूशीं नव दोन गृह नवरा त्यामाजि सोळा वधू[6]
त्यामागें रिपुं तीन तीन·········त्या त्यांत केला वधू[8] ।
याचा अर्थ करा तुम्ही चतुर हो! थोडी असे आपदा;
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा. ॥ २
शिरें चवदा, नेत्र तेतिस पहा, आहे जया नेटकी
हस्तें आसति सप्तविंशति पहा भोळ्या जना हाटकी ।
शृंगें अष्ट, सुपुच्छ तीन, असती एकवीस शोभे पदा;
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा. ॥ ३
चांरी[10] चंद्र समान भूतलवटीं एके दिनीं देखिले
रामासन्मुख रावणासि[11] हृदयीं **सी**ता धरी आदरें ।
हें तो चित्र विचित्र····बरवें वर्तत आसे सदा;
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा. ॥ ४
राक्षसां प्रिय जे तिचा श्वशुर[12] जो तें वस्त्र भोगी सती
ती ज्यानें धरिली तये कुमरिचा शत्रू सुतेचा पती ।
त्याचा हारचि दार स्वार वनिता कल्याण हो सर्वदा;
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा. ॥ ५
रामा[13]चा जनिता तथा यम[14]पिता हे दोघ बंधू कसे?
सूर्या[15]ची भगिनी यमा[14]चि जननी हें नातें ऐसें कसें? ।
सूर्याचा पुतण्या यमा[14]सि म्हणतो, 'मी बाप तूझा सदा;'
बोले **विठ्ठल** हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा. ॥ ६

---

१. कमल मिटतांच कमलांत कोंडलेला भ्रमर. २. स्त्री. ३. 'उगवा' असा अन्य पाठ आहे. ४. करार. ५. ८५+९+२=शाण्णव सोंगट्यांच्या पटाचीं घरें. ६. स्त्रिया, बायका. (सोंगट्या). ७. फांसे. ८. वध, ठार मारणें. ९. त्रास. १०. रामचंद्र, सीतामुखचंद्र, चंद्र, चंद्रहार. ११. रावण=पदर. १२. सासरा. १३. रामा=कोकिळा. १४. यम=कावळा. १५. सूर्या=कावळी.

ज्याचे मस्तक तीन चार कर हो सा नेत्र ज्या आसती[1]
वेद स्तन चार कर्ण बरवे षट्पाद हे निश्चितीं ।
ऐसा देव स्मरा, लोक अवघे देवादि ज्या वंदिती
त्याचें नाम स्वरूप सांग मजला षण्मासिंची मूदती. ॥ ७
अग्न काष्टाचे उदरीं जन्म झाला एका नरा[2] ।
विठ्ठलकवि म्हणे याचा अर्थ तुम्ही करा. ॥ ८

---

# आणखी उपलब्ध झालेलीं पदें.

## पद १२७ वें.

नमो श्रीनृसिंहा ! तुझ्या चरणकमला। हाचि गमला मला लाभ विमला ! ।।ध्रुव०
जेथ निरुपाधिकानंद लक्षोनि चंपलासमा[3] राहिली स्वस्थ कमला ।
मत्प्रभावासि वर्णाक्षरें वर्णितां निगमत्रय शेषफणिसहित दमला. ॥ नमो० ॥१॥
त्रिविधतापानळें परम संतप्त हा जीव विश्रांतिभंगें विरमला ।
म्हणुनि दीनावना[5] ! शरण आलों तुला तत्क्षणीं भृंगवत्पूर्ण[4] रमला. ।।नमो०॥२॥
करुनि करुणा जगद्वंद्य करुणानिधे ! दे स्वसुख चिद्घना ! विहित शमला ।
मग सहज विठ्ठलभ्रांतिचा वात संताप संजात निभ्रांत शमला ॥ नमो० ॥३॥

## पद १२८ वें.

अनुदिनिं सुखद राम गा गा गा गा ॥ ध्रुवपद. ॥
जडजगीं या श्रीरामचि गावा । नाहीं तरी भासे दगा गा ! ॥ अनु० ॥ १ ॥
स्थिरतर तनु मानिसि तरि । मायामृगजळीं नवल फुगा गा ! ॥ अनु०॥ २ ॥
विठ्ठलचरणीं चित्त समर्पुनी । स्वसुखें बैस उगा गा ! ॥ अनु० ॥ ३ ॥

## पद १२९ वें.

हरि ! मज दे रे ! पायीं थार ॥ ध्रुवपद. ॥
दुस्तरतर ममताजालांतरीं । गेलों गुंतुनि फार ॥ हरि० ॥ १ ॥
सोडूं काय धरूं काय कळेना । जालेंसे मन घार ॥ हरि० ॥ २ ॥
कठिण विषय जिवासि पदोपदीं । करुनि सोडिती ठार ॥ हरि० ॥३॥
विठ्ठलात्मया करुणापांगें । करिं दासांतें गार. ॥ हरि० ॥ ४ ॥

---

१. 'मानिती' असा अन्य पाठ आहे. २. ह्या श्लोकांत विठ्ठलाचें नांव नाहीं तरी हा विठ्ठलकृतच असावा असें वाटतें. ३. मडकें. ४. वीजेप्रमाणें. ५. दीनजनाचें रक्षण करणाऱ्या.

## पद १३० वें

सुखद हरि शयनिं आणा उदार। हारभारउपचार काय करुं सारे ?॥ध्रुवपद.
कंजनयन कुंजविहारी। गोपवृंदसरदार ॥ सुखद० ॥ १ ॥
मदनशराहत हृदयिं स्मरति। अंगसंग परदार ॥ सुखद० ॥ २ ॥
विठ्ठलवरदाविण मज सजणी!। होय काय घरदार ॥ सुखद० ॥ ३ ॥

## पद १३१ वें.

मन जडलें त्या गुरुपायीं। कोणी कांहीं म्हणो. ॥ ध्रुवपद. ॥
निशिदिनीं मजला ध्यान तयाचें। न सुचे त्याविण कांहीं. ॥ मन० ॥१॥
शोधित होत्यें त्रिभुवन सारें। सार[1] दुजें नसे कांहीं. ॥ मन० ॥ २ ॥
श्रीगुरुचरणीं विठ्ठल तरला। भेदें[2] त्यजुनियां पायीं. ॥ मन० ॥ ३ ॥

## पद १३२ वें.

हरि आणुनि साजणि! दावा ग! ॥ ध्रुवपद. ॥
दावा श्रीहरि मजलागुनि दावा कां मजसीं तुमचा।
दावानळ हा रतिवर मंदावा ग! ॥ हरि० ॥ १ ॥
लावा मज चरणिं तयाचे लावालावी न करुनी।
मजला वानुनियां त्यालागीं खुलावा ग! ॥ हरि० ॥ २ ॥
जा वाट मी पाहुं किति समजावा जाऊनी।
कपट गमजा वाइट मद्गुण हा नुमजावा ग! ॥ हरि० ॥ ३ ॥
गावांत सदनांत कवळुनि दगावाल सखयानो!।
व्रजिं उमजा कीं हा विठ्ठल सदनिं बघावा ग! ॥ हरि० ॥ ४ ॥

## पद १३३ वें.

गा गा राघवनामातें। गारा मानुनि विषयातें।
गारासम समजुनि जगत्फुगारा परिहरिजे मनिंचा।
गान निरत किति गा नर तरले गायनकर वर गाउनि वदनीं. ॥ ध्रुवपद. ॥
गान भारती गंगा गातां निरसी दुःसंगा।
गाथा किति गात बससिल उगा थांबुनि करिं भवभंगा।
गाठावा रामचि तु जनद गाठावा पुरुष पतंगा।
गाल फुगवुनि न गाल हरिस न जगाल बगाल यम चित्सदनीं. ॥गा०॥१॥

---

१. उत्तम. २. द्वैत.

गातां नामातें ज्ञानी गांभीर्यें वर विज्ञानी ।
**गां**गेयासम बुधवरवर गांगेया रमले ध्यानी ।
गाहानचि करुनि सुरसरिद्गाहावरिले वंद्यानीं ।
गाय सतत उरु गाय पद निरत गायक **विठ्ठल** सारिगमपधनी. ॥गा०॥२॥

## द्रौपदीवस्त्रहरण.

(शिखरिणीवृत्त.)

कवींद्रें राजश्रीवरदगणराजांघ्रि नमिले,
नमूनी वाग्देवी गुरुचरण भावें प्रणमिले, ।
निरूपी संक्षेपें [1]मुनिकृत सभापर्वणिकथा
मराठी मी पद्यें करुनि रचितों शुद्ध [2]उलथा. ॥ १

सभा केली दुर्योधन शकुनिमामाऽनुमतिनें
विचारी धर्माचें विभव हरिजे द्यूतगतिनें ।
तया पाचाराया गमन करवी शीघ्र विदुरा
असे आला पंडूसुतसह पुन्हा हस्तनपुरा. ॥ २

जिणे धर्मा द्यूतीं कुरुपति [3]कुडे पाश करुनी
क्रियानष्टें नेलें विभव कपटें सर्व हरुनी, ।
सभे आणी कृष्णा [4]कच धरुनि दुःशासन हटें
उभी ठाके बाळा निजवदन आच्छादुनि [5]पटें. ॥ ३

सभे भीष्मद्रोणासहित धृतराष्ट्रादि असती
तयांतें ते काळीं [6]पिकसम वदे मंजुळ सती ।
तुम्हां श्रेष्ठां सर्वांप्रति करितसें प्रश्न पहिले,
'तुम्हीं सांगा द्यूतीं मज कुरुवरें सत्य हरिलें?' ॥ ४

न बोलेती द्रोणादिक विदुर भीष्मादि उगले
भिडेनें कोणाचें कुरुपतिपुढें वाक्य न चले; ।
विकर्णें ते काळीं स्फुटवदन सर्वांसि वदिजे,
'पुसे श्रीपांचाळी उचित वदली, उत्तर दिजे.' ॥ ५

विकर्णाच्या प्रश्नाप्रति वचन कोणी वदति ना
खरें किंवा खोटें गुरुजन निवाडा करिति ना, ।
विकर्णा साहेना त्यजुनि भिड वेगें वदतसे,
'सती द्यूतीं कृष्णा किमपि कपटीं जिंकिलि नसे.' ॥ ६

[7]सभाश्रेष्ठीं त्यानें प्रतिवचन संतोष दिधला,
'विकर्णा! तूं सानापरि वदसि सत्यार्थ विपला.' ।

---

१. व्यासमहामुनिकृत सभापर्वांतील कथा. २. भाषांतर. ३. खोटे. ४. केश. ५. वस्त्रानें. ६. कोकिळेप्रमाणें. ७. सभेंतील श्रेष्ठजनांला.

न साहे कर्णातें, अनुचित विकर्णासि वदिजे,
 'खऱ्याचें तूं खोटें करिसि तुज तात्काळ वधिजे.' ॥ ७
तदां बोले कृष्णा, 'गुरुजनिं निजाज्ञा मज दिजे,
 द्युतीं गांधारानें हृत तुज; सुखें दास्य करिजे. ।
मतें संबोधावें, वचन तुमचें इच्छित असें
 उगे कां बोलाना? त्यजुनि भिड वेगें, दश तसें.' ॥ ८
प्रतिज्ञेची पाळी युंगुळ[1] महिने द्वादश दिवा
 मुनी व्यासें केलें प्रमित पहिलें बंधन जिवा, ।
प्रमाणें धर्माचे दिवस परवां पूर्ण भरले.
 पुढें स्त्री भीमाची दिवस बहु आहेति उरले. ॥ ९
तये वेळे भीमें सहसि सहदेवासि वदिजे
 हुताशीं धर्माच्या युग मत गदा दग्ध करिजे ।
तया भ्रूसंकेतें स्थिर करि गुडाकेश[2] विनवी
 नुलंघीं धर्माची किमपि गुरु मर्याद पदवी. ॥ १०
करी पृच्छा कृष्णा परि पुढति कोण्ही न वदती
 जसीं चित्रीं लेपें विरचित तसे स्तब्ध दिसती ।
सभालोकीं जानू तळ दुरळ दुर्योधन तदां
 महाक्रोधें पाहे पवनसुत[3] मुष्टीं धृतगदा. ॥ ११
प्रकोपें बंधूतें कुरुपति म्हणे, 'नीवि[4] धरणें.'
 अविंद्या दुःशीला अलगट वदे, 'नग्न करणें.' ।
युगीं द्वापारांतीं कुलदहनकृत्या प्रकटली
 कुपी कंदर्पाची विरह विषवल्ली उगवली. ॥ १२
नसे लज्जा पांचांप्रति फडकली यौवनमदें
 न संतोषे एकें सुरतसमरीं कामविशदें ।
सभास्थानीं आतां अवयव इचे स्पष्ट करणें
 'सती' साध्वीमध्यें म्हणवित असे उन्नतपणें. ॥ १३
जसी व्याघ्रें धेनू सुरभि धरिली ऐंकट[5] वनीं
 तसी वेणी दुःशासन गिंवसितां भी निजमनीं, ।

१. दोन महिने बारा दिवस. २. अर्जुन. ३. भीम. ४. नीरी. ५. एकटी.

निराशा सर्वांची मुख किविलवाणें करुनियां
म्हणे, 'श्रीगोविंदाविण कवण पावेल क्षणिं या?' ॥ १४
प्रतिज्ञेच्या पाशीं दृढ गिंवसिले पांडवबळी,
म्हणे, 'धावें कृष्णा! बहिण तुझि मी दीन दुबळी।
रिपूचक्रामध्यें कवण मज रक्षील समयीं[1]
जेवें पावें द्वारावतिपति! तुतें ध्यात हृदयीं. ॥ १५
गजेंद्रें प्रल्हादें दृढभजन केलें हरि! तुझें
तयांचीं त्वां विघ्नें विषम हरिलीं त्या परि बुझें[3]।
न येतां हे लज्जा नृहरि! कवणें दूरि करणें
अनंतब्रह्मांडोदरपति! अवज्ञा न करणें. ॥ १६
अनंतब्रह्मांडें भ्रमति तुझिये रोमविवरीं
अनंताचे[4] तल्पीं पहुडसि सुधासिंधुजठरीं।
अनंता! हे कूर्माकृति! धरणि पृष्ठीसि धरिली
अनंतात्मा रामा! त्रिभुवन गुढी त्वां उभविली. ॥ १७
जळीं तूं पाषाणीं गगनपटळीं भूतळवटीं
स्थळीं दारुस्थानीं[5] घटमठपटीं भूतविकटीं।
बहिर् अंतर्यामीं स्थिति[6] उदय संहार करिसी
स्वरूपें तूं नाना धरुनि धरणीभार हरिसी. ॥ १८
मुकुंदा! गोविंदा! नृहरि! नवफुल्लारनयना!
हृषीकेशा! लक्ष्मीवर! यदुपती! शेषशयना!।
उडी घालीं कृष्णा! अभयवरदा सत्य करणें
चकोरी मी कृष्णा तवकरमयूख[7] प्रसवणें.' ॥ १९
ऋतुस्नाता स्त्रीतें न करि नयनोन्मीलन कदां
निमिष्यार्धें गेला स्तवनगण[8] देवाप्रति तदां।
पुराणोक्तें द्वारावतिस हरि होता, अवसरें
उठे, जागा झाला चरण चुरितां रुक्मिणिकरें. ॥ २०
न सांभाळी पीतांबर चुकुर जूटा उकलला
स्वभक्तांचा वेळाइत भजनभाकेसि भुलला।

---

१. संकटसमयीं. २. वेगानें. ३. समजणें. ४. शेषाचे मस्तकावर. ५. लांकडामध्यें. ६. उत्पत्ति. ७. हस्तकिरण. ८. द्रौपदीनें केलेल्या स्तवांचा समूह.

गलत्पुष्पें धांवे मनपवन सर्पारि[१] न टिपी
निमिष्यें लक्षांशें द्रुपदतनयेतें हरि टिपी. ॥ २१
करी कृष्णा कृष्णस्मरण, हृदयस्थ प्रकटला
चमत्कारें ध्यानीं प्रतिति तिसिं आभास गमला, ।
नसे येणें जाणें नभवत[२] परब्रह्म वसतें
असे आला गेला कथन कथिजे लौकिकमतें. ॥ २२
नृपाज्ञेनें दुःशासन वसननीवी[३] श्लथ[४] करी
दुजें देखे दिव्यांबर परि चमत्कार न धरी ।
बळें वोढी तेंही, तव गवसणी भीतरि वसे
विचित्रां वस्त्रांचे ढिग उचलती पर्वत जसे. ॥ २३
जसे रंभास्तंभा[५] पदर निघती वेष्टित पुटें
तसीं कृष्णा वस्त्रें प्रसवति विचित्रें अनुसुटें. ।
नितंबाचे वेढे उकलि रिपु दुःशासन सळें
छिटें नानावर्णी न सरति किती फेडिल बळें. ॥ २४
मुगी गुंजावर्णी कदर मुकढेली सुरळिया
झुणे नाना शेले निघति जिनसी दाट सळिया ।
मिराणी पाटावें तगटि धटिया पोफळवर्णें
अमोलाचे पीतांबर सुभर सिंधूरवसनें. ॥ २५
विचित्रां वर्णाचे तटप मुगटे भैरव नवे
रुमाली सोनेरी सखरसगरी जोठ बरवे ।
तिधारी चौधारी नव पटतटी मुक्त लतिका
सगर्भे मेचूर्चीं निघति करळें चंद्रकळिका. ॥ २६
कुसुंबी चिंचोरी नव चुनडिया हेमखचिता
पटें लांबें रुंदें पुरवि बहिणीलागिं उचिता ।
विशिष्टें मांजिष्टें नवकमळवर्णें परिकरें
प्रतिष्ठानी साड्या निघती, हरि दुःशासन करें. ॥ २७
सुवर्णाचे तारे तुटतिहि रवी कृष्णसख रे!
अमोघा वस्त्रांचा उदधि फुटला त्या अवसरें ।

---

१. गरुड. २. आकाशाप्रमाणें. ३. लुगड्याची नीरी. ४. शिथिल, सईल. ५. केळीच्या खांबाला.

कसीद्याच्या ओळी पदर रुळती[1] भूतळवटीं
नितंबी विन्यासी मधुरिपु सहस्रा मणगटीं. ॥ २८
पुरें जंबुद्वीपांतिल सकल पेंठा उचलिल्या
शरद्रात्रीं चंद्रासहित उडु जैश्या उगवल्या ।
सहस्रा हस्ताब्जें करि वसनविन्यास जघनीं
दिसों नेदी पादांगुलनख अमित्रासि[2] नयनीं. ॥ २९
स्वइच्छेचा दाता मधुरिपु सहस्रा त्रिभुवनीं
जटाजूट ध्यानीं शतमख विधी नित्य भजनीं ।
सुरांचा कैवारी अवतरण दासास्तव करी
स्वभक्तां रक्षाया झष[3] कमठ[4]रूपें हरि धरी. ॥ ३०
जियेच्या व्यव्हारा मधुमथन वैकुंठपुरिचा
अवर्ण्यो भाग्याचा अखिल महिमा अद्भुत तिचा ।
स्वयें दिंडें सोडी बहिणिस त्वरें नेसवि हरी
नवीं पीतें रक्तें धवलित सहस्रावधि करीं. ॥ ३१
भवानी वामांगी पशुपति वृषारूढ[5] वहनी
बिडौजा[6] इंद्राणी गज विबुध[7] दिक्पाळ वसनीं ।
स्थलें ज्योतिर्लिंगें लखलखित मूर्ति प्रकटती
ध्रुवेंशीं नक्षत्रें तपन[8] शशि बिंबें उगवती. ॥ ३२
ठसे श्रीमुद्रांचे घवघवित संपूर्ण दिसती
अनेका रंगांचे चुबचुबित कल्लोळ निघती ।
त्रिवेणी तीर्थांचीं मुकुटमणि वेष्टी तजवटी
निघाली कालिंदी मधुरिपु कळंबातळवटीं. ॥ ३३
लघू वत्सें गाई मुरलिधरमूर्ति प्रकटती
थवे गोपाळांचे गण गवसणीचे विलसती ।
निघालें कंसाचें चरित मथुरे मल्ल मथिले,
विशाळा दैत्यांचे नग शिशु फणीचे उलथिले. ॥ ३४
पुढें होणाराचीं रणकदन चिन्हें प्रकटलीं
रणीं भीष्मद्रोणादिक सुहृद धेंडें निवटलीं[9], ।

---

१. लोंबती, लोळती. २. शत्रूला. ३. मासा. ४. कांसव. ५. बैलावर बसलेला. ६. इंद्र. ७. देव. ८. सूर्य. ९. मारिलीं.

स्वयें देखे दुर्योधन निधन[1] जानूवरि गदा
पटें फेडी दुःशासन, परि गळाले कर तदां. ॥ ३५
अधोग्रीवा[2] कृष्णा अवयव दिसों नेदिच कदां
जगत्राता दाता न गमति कदां तीस अपदा, ।
अनिष्टें दुश्चिन्हें दिसति मग दुर्योधन मुरे
प्रबोधी बंधूतें 'पटहरण आतां करि पुरें.' ॥ ३६
म्हणे चीरें ठेवा अधिं भरुनि भांडारभुवनीं
पटें झालीं गुप्तें नवल अवघें मानिति मनीं ।
[3]विरे जैसा वातें नव जलद[4] तत्काळ गगनीं
सभे तैसा देखे कुरुपति चमत्कार नयनीं. ॥ ३७
वदे ते गांधारी विनवि, 'धृतराष्ट्रा! परिसिजे
दुरात्मा हा दुर्योधन सुत गडारूढ करिजे ।
पुराणीं ना शास्त्रीं श्रुत नवल कोठें न वितलें
कुलांगारें केलें अघटित, कसें होइल भलें?' ॥ ३८
म्हणे पांचाळीतें असुर धृतराष्ट्रप्रभुपुढें,
'सती! कष्टी केलें सदसि तुज दुःशासन मुढें ।
न कांपें कल्याणी क्षमुनि अपराधासि मजला
स्वइच्छेचा मागें दृढवरद देईन तुजला. ॥ ३९
सति! क्षोभावें ना मजवरि दया पूर्ण करणें.'
अशा बोलें कृष्णा युगलवर[5] मागे, 'परिसणें ।
म्हणावें ना दासी मज कुरुपतीची झिडकुनी
स्वभर्ता सोडावें हृत[6] विभव द्यावें परतुनी.' ॥ ४०
'तथास्तू वो' बोले वरद तिसरा माग जननी,
न मागे पांचाळी मग वर वदे तोष वचनीं, ।
'तुझें प्रातःकाळीं[7] स्मरण करितां नासति अघें[8]
सतीसाध्वीमध्यें अखिल करिसी राज्य अवघें.' ॥ ४१

---

१. मरण. २. खालीं मान केली आहे जिनें अशी. ३. पसरे, विरळ होई. ४. मेघ. ५. दोन वर. ६. चोरलेलें. ७. 'अहल्या द्रौपदी सीता तारा मंडोदरी तथा । पञ्च कन्याः स्मरे नित्यं महापातकनाशिनीः ॥' इत्यादि श्लोक सुप्रसिद्ध आहे. ८. पापें.

तदां पंडूपुत्रां हृत विभव संपूर्ण दिधलें,
    पुढें इंद्रप्रस्था गमन करितां चित्र वितलें, ।
'सभापर्वी' आहे ऋषिकृत [1]अनुद्यूतरचना
    गुणज्ञीं आणावें नवरस महाभारत मना. ॥ ४२
[2]महामाघीं [3]रौद्रीं [4]दृग [5]नभ [6]कळा [7]शालिवहनें
    पदें पद्यें त्रेताळिस कवि विठू अर्थगहनें ।
बिडाखालीं गौरीपुरिं कृत कथा पुण्य करणी
    करू कल्याण श्री '[8]यमनसभला गः शिखरिणी.' ॥ ४३




१. सभापर्वांत 'अनुद्यूतपर्व' म्हणून पोटपर्व आहे. [अध्याय ७४-८१.] २. माघमासीं. ३. रौद्रनाम संवत्सरांत. ४. दृग (नेत्रद्वय म्ह० दोन संख्या). ५. नभ=आकाश=शून्य. ६. कळा=षोडशकळा=१६ संख्या म्हणजे शके १६०२. ७. शालिवाहन. ८. य म न स भ लघु गुरु असे गण आहेत असें शिखरिणी नामक वृत्त.

# रुक्मिणीस्वयंवरांतील बंध.

## सर्ग १. श्लोक ७.


### द्वादशदलकमलबंध.



द्वादशदलकमलबंध.




## सर्ग ३ श्लोक ४
## पट्टिशबंध-




सर्ग ३ श्लोक १८

व्यजनबंध.



सर्ग ३ श्लोक २७

## पट्टिशबंध.




## सर्ग ४ श्लोक १४.

## द्वादशदल कमलबंध.




## सर्ग ४ श्लोक १५

द्वादशदलकमलबंध.




सर्ग ४ श्लोक १७

द्वादशदल कमलबंध




चामरबंध.




सर्ग ४ श्लोक २४


द्वादशदलकमलबंध




मालाबंध-


बा
सो ळा ची
क
ची
मा ति व्र
कां
ची
र ति प
ग
वी
ची सा क्ष
हं
ची
गा ति स
रव्या
ची
क टि त ची
घ रे का मु
झुं
छ
न वि र
ची
तें
दा वि ख
चि
मा
ज्वा ळा न
ची
गु
फ णि म
ची
हा
भा री म
ची

अष्टदलबंध.




मालाबंध.



## सर्ग ४ श्लोक ४१

वापीबंध-




## सर्ग ४ श्लोक ४३

### वापीबंध.



## सर्ग ५ श्लोक ५

### अष्टदलकमलबंध.




द्वादशदलकमलबंध. 



## सर्ग ५ श्लोक ७


## धनुर्बाणबंध.




# सर्ग ५ श्लोक ९




## वापीबंध.




अश्वबंध.



उष्ट्रबंध




चक्रबंध.




सर्ग ५ श्लोक १२


व्यजनबंध -



## वापीबंध·




वापीबंध·




## सर्ग ५ श्लोक ४५

वापीबंध.




स्वस्तिकबंध.




सर्ग ५ श्लोक ४९

वृक्षबंध.




सर्ग ५ श्लोक ५०

स्वस्तिकबंध.




सर्ग ५ श्लोक ५१

स्वस्तिकबंध.




# सर्ग ५ श्लोक ५२ व ५४.

## चक्रबंध.




## सर्ग ६ श्लोक ८

वापीबंध.




## सर्ग ६ श्लोक ९.


व्यजनबंध-




वापीबंध.




वापीबंध.



सर्पबंध.


की
श्री
ळो
झ
र
वि
ल
पु
वि
ख्या
वीं
म
श्र
तूं
ष्क
ति
क्ष्या
ळ
ने
ये
ल
ज्वा
त्र
जिं
य
रा
ति
क्षा
इ
ळा
क्रीं
रु
को
त्यु
क
क्मा
ळिं
से
मि
थ्या
सु
र्व
त्व
भा
री
अ
ण
रा
मो
सां
त
वि
वा
रिं
दि
व
स्था
ब
रि
न
क
स्व

चक्रबंध.



सर्ग ६. श्लोक १६.

वापीबंध.

